# लोकहितवादींची शतपत्रे



संपादक

डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे

कॉन्टिनेन्टल



लोकहितवादी

गोपाळ हरि देशमुख

(इ. स. १८२३ - १८९२)

# लोकहितवादींची शतपत्रे

संपादक

कै. डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे
एम्. ए., पीएच्. डी.

कॉन्टिनेन्टल

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे : ३०

**प्रकाशक :**
अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर पुणे४११ ०३०

**मुद्रक :**
स्वरूप मुद्रण
६८७ नारायण पेठ,
पुणे- ४११ ०३०१

**अक्षरजुळणी :**
सौ. अनुराधा जोशी
१२२७, सदाशिव पेठ,
पुणे४११ ०३०

सर्व हक्क प्रकाशकाकडे

दुसरी आवृत्ती : १९६०
तिसरी आवृत्ती : १९६३
चौथी आवृत्ती : १९७२
पाचवी आवृत्ती : १९७७
सहावी आवृत्ती : १९८५
सातवी आवृत्ती : २००४
आठवी आवृत्ती : २००७

**किंमत : दोनशे पन्नास रुपये**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| **प्रस्तावना** | | | **१ ते ५९** |
| पत्र क्र. | १०० | शतपत्रांचा इत्यर्थ | ६३ ते ६५ |
| **१. विद्या** | | | **६६ ते १२८** |
| पत्र क्र. | ३ | पुण्यात लायब्ररीची स्थापना | ६६ |
| | ७ | छापण्याची कला आणि म्हातारपणी लग्न | ६८ |
| | ८ | जुन्या समजुती | ७० |
| | १९ | हिंदू लोकांचा आळशी स्वभाव | ७३ |
| | २४ | नशिबावर हवाला | ७६ |
| | ३१ | इंग्रजी विद्या | ७९ |
| | ३३ | अर्थशून्य ब्राह्मणविद्या | ८३ |
| | ५० | स्वराज्यातील विद्वान | ८५ |
| | ५५ | पुराणांतील ज्ञान | ८८ |
| | ५६ | नादविद्या | ९० |
| | ५९ | लोकांची समजूत व पुराणादिकांचे सौरस्य | ९४ |
| | ६९ | संस्कृत आणि इंग्रजी विद्या | ९७ |
| | ७७ | पाठ करण्याची चाल | ९९ |
| | ८० | कमती कशाची ? | १०२ |
| | ८१ | प्राचीन ग्रंथांचे अर्थ | १०५ |
| | ८२ | प्राचीन ग्रंथांचे महत्त्व | १०७ |
| | ८४ | संस्कृत विद्या | ११० |
| | ८५ | ज्ञान हाच पराक्रम | ११४ |
| | ८६ | सांप्रतचे पंडितांचे ज्ञान | ११७ |
| | ९३ | नवीन ग्रंथांची आवश्यकता | १२० |
| | ९५ | अभिमान | १२३ |
| | ९७ | सुशिक्षा व पंतोजी आणि संस्कृत व इंग्रजी भाषा | १२६ |
| | १०१ | संस्कृत विद्या | १२८ |
| **२. हिंदूंचे धार्मिक जीवन** | | | **१३३ ते २०३** |
| पत्र क्र. | ४ | शिमग्याचा दुराचार | १३३ |

| | | |
|---|---|---|
| ६ | शाक्त मार्ग | १३५ |
| १३ | वाइट चालींचे प्रकार | १३८ |
| २६ | वैराग्य | १३९ |
| २७ | नाना पंथ | १४२ |
| २८ | विधिनिषेधरूप धर्माचे मूळ | १४६ |
| २९ | बुद्धीने ईश्वर किती कळतो त्याविषयी | १५१ |
| ३५ | मानास व दानास पात्र | १५५ |
| ३६ | स्नान-संध्या | १५७ |
| ३७ | देवपूजा | १६० |
| ४२ | डोले करण्याची चाल | १६२ |
| ४३ | निरुद्योगीपणाच्या चाली | १६६ |
| ४७ | दया | १६९ |
| ५३ | मन हेच ईश्वरी शास्त्र | १७२ |
| ५८ | आचार | १७५ |
| ६४ | धर्मसुधारणा | १७८ |
| ६५ | नीति-प्रशंसा | १८१ |
| ७४ | देवळे व नेमधर्म | १८३ |
| ७६ | मद्यपान | १८६ |
| ७९ | दया | १९० |
| ८३ | भक्ती, कर्म आणि ज्ञान | १९३ |
| ८८ | नीति-प्रशंसा | १९६ |
| ९१ | दानधर्म करणे | २०० |
| ९२ | भिकारी | २०३ |

**३. आमचे धर्मगुरू** — २०९ ते २४६

| | | |
|---|---|---|
| ५ | कन्याहत्या-गवर्नरसाहेबांची बदली व ब्राह्मण लोकांचे अज्ञान | २०९ |
| ११ | ब्राह्मणांचे आचर | २१० |
| १७ | ब्राह्मणांचे आचर | २१३ |
| २० | ब्राह्मणांचे महत्त्व | २१६ |
| २१ | गृहस्थ आणि भिक्षुक यांचा भेद | २१८ |
| ४८ | ब्राह्मण लोकांचा स्वभाव | २२१ |
| ६१ | भटांनी लावून दिलेले वेड | २२४ |
| ६२ | ब्राह्मणांची शिक्षणपद्धती | २२७ |

| | | | |
|---|---|---|---|
| पत्र क्र. | ६३ | अर्थावाचून पाठ करणे | २२९ |
| | ७१ | भटांचा विद्येचा निरुपयोग | २३२ |
| | ७२ | ब्राह्मणांचे ईश्वरी ज्ञान | २३५ |
| | ७३ | धर्मव्यवहारासंबंधी खोट्या समजुती | २३७ |
| | ७५ | ब्राह्मणांचा लोभ | २४० |
| | ९६ | ब्राह्मणांचे पुढारीपणापासून अनहित व वेदान्त | २४३ |
| | १०३ | पंडितांची योग्यता | २४५ |
| | १०७ | खरा धर्म करण्याची आवश्यकता | २४६ |

**४. स्त्रीजीवन** **२५१ ते २८२**

| | | | |
|---|---|---|---|
| पत्र क्र. | २ | लहानपणाच्या लग्नापासून अडचणी | २५१ |
| | १० | पुनर्विवाह | २५४ |
| | १५ | लग्नाविषयी विचार | २५४ |
| | १६ | विधवापुनर्विवाहाविषयी | २६० |
| | ३० | स्त्रियांची स्थिती | २६३ |
| | ७० | पुनर्विवाह | २६७ |
| | ९० | लग्ने | २६९ |
| | ९९ | पुनर्विवाह | २७२ |
| | १०२ | पुनर्विवाह | २७५ |
| | १०४ | पुनर्विवाह | २७६ |
| | १०५ | पुनर्विवाह | २८० |
| | १०६ | पुनर्विवाह | २८२ |
| | १०८ | पुनर्विवाह वगैरे सुधारणा | २८२ |

**५. जातिभेद** **२८७ ते २९५**

| | | | |
|---|---|---|---|
| पत्र क्र. | २२ | जातिविषयी विचार | २८७ |
| | २३ | चार वर्णांची सांप्रतची स्थिती | २८९ |
| | ३९ | वर्णविचार | २९५ |

**६. हिंदूंचे आर्थिक जीवन** **२८७ ते २९५**

| | | | |
|---|---|---|---|
| पत्र क्र. | १८ | आर्जवीपणा व डौलीपणा | २९९ |
| | ४४ | हिंदू लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता | ३०२ |
| | ५१ | हिंदू लोकांची द्रव्योपयोगाविषयी समजूत | ३०४ |

| | | |
|---|---|---|
| ५७ | हिंदू लोकांचा व्यापार | ३०८ |
| ६८ | उद्योगप्रशंसा | ३११ |
| ८७ | एकत्र रहाण्याची चाल | ३१३ |

**७. आमचे राजकारण व राज्यकर्ते** **३१९ ते ३७७**

| | | |
|---|---|---|
| पत्र क्र. १ | इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुतीविषयी | ३१९ |
| ९ | नेटीव अंमलदार | ३२१ |
| १२ | हिंदुस्थानाचील इंग्रजी राज्याचा विचार | ३२३ |
| १४ | राज्यसुधारणा | ३२६ |
| २५ | राज्यसुधारणा | ३२९ |
| ३२ | लांच | ३३२ |
| ३४ | वेळेचा व्यर्थ खर्च | ३३६ |
| ३८ | इंग्रजी राज्यापासून लाभ | ३३८ |
| ४० | लाचेचा गुन्हा | ३४१ |
| ४१ | नाना फडणिसांचे शहाणपण | ३४४ |
| ४५ | हिंदुस्थानच्या पराधीनचेची कारणे | ३४७ |
| ४६ | इंग्लिश राज्याची आवश्यकता | ३५० |
| ४९ | सरदार लोक | ३५३ |
| ५२ | उद्याचा विचार | ३५६ |
| ५४ | इंग्लिश राज्यापासून फळ | ३५८ |
| ६० | हिंदू लोकांनी काय करावे ? | ३६१ |
| ६६ | सरकारी कामदार | ३६४ |
| ६७ | स्वदेशप्रीती | ३६७ |
| ७८ | राज्यांविषयी विचार | ३६९ |
| ८९ | इंग्लिश-सरकार | ३७३ |
| ९४ | इंग्रज सरकार | ३७४ |
| ९८ | डौल व नेटीव राजे | ३७७ |

**टीपा**

| | |
|---|---|
| पत्रांचा मूळ क्रम व या आवृत्तीतील पृष्ठांक | ४०६ |

# लोकहितवादी – अल्पचरित्र

लोकहितवादी यांचे मूळ नाव गोपाळ हरी देशमुख असे होते. त्यांचा जन्म १८ - २ - १८२३ या दिवशी झाला. त्यांच्या कुळाचे मूळ नाव ' सिधये ' असे होते. देशमुख हे नाव वतनावरून पडले. त्यांचे वडील हरिपंत हे पेशव्यांचे सरसेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते. गोपाळराव तेरा वर्षांचे असतानाच ते वारले आणि लगोलग ब्रिटिश सरकारने त्यांचा सरंजाम खालसा केला. तो परत मिळावा म्हणून गोपाळरावांचे बंधू चिंतामणराव यांनी पुष्कळ खटपट केली पण उपयोग झाला नाही. फक्त त्यांच्या मातुश्रींना सालीना रु. ६०० व तिघा भावांना सालीना रु. २०० तनखा देण्याचा ठराव झाला.

इ.स. १८४१ साली गोपाळराव इंग्रजी शाळेत दाखल झाले. तेथील अभ्यासक्रम त्यांनी तीन वर्षांत पुरा केला. पण त्या आधीच त्यांनी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध या ग्रंथांचा अभ्यास केला होता. त्या काळच्या रीतीप्रमाणे पोहणे, घोड्यावर बसणे, नेम मारणे यांतही ते तरबेज झाले होते. पुढील थोड्याच काळात संस्कृत, गुजराथी, फारशी या भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. इतिहासाची तर त्यांना लहानपणापासूनच गोडी होती. ही त्यांची पूर्ववयातील तपश्चर्याच त्यांना ग्रंथरचनेच्या कामी उपयोगी आली.

इ. स. १८४३ साली त्यांना दक्षिणेतील सरदारांच्या एजंटाच्या कचेरीत ट्रान्सलेटरची जागा मिळाली. तेथून सरकारी नोकरीत ते सारखेच उत्कर्ष पावत गेले. १८४६ साली त्यांनी मुनसफीची परीक्षा दिली. १८५२ साली वाई येथे त्यांची ' फर्स्टक्लास मुनसफ ' म्हणून नेमणूक झाली. १८५६ साली ' सब असिस्टंट इनामकमिशनर ' म्हणून त्यांची नेमणूक झाली. या कामावर ते असताना त्यांच्याविषयी लोकापवाद फार उठले होते. अनेकांची इनामे खालसा करण्याची, त्यांनी सरकारी धोरणान्वये शिफारस केली. यात त्यांनी बराच पक्षपात केला असा लोकापवाद होता, पण लोकापवादाला नेहमी आधार असतोच असे नाही.

१८६२ च्या सुमारास अहमदाबादेस ' असिस्टंट जज्ज ' म्हणून त्यांची नेमणूक झाली व १८६६ साली तेथेच ' ॲक्टिंग स्मॉलकॉज जज्ज ' ही जागा त्यांना मिळाली. तेथे ते दहा वर्षं होते. त्यानंतर नाशिकला ' जॉइन्ट सेशन्स जज्ज ' म्हणून त्यांना नेमण्यात आले. तेथूनच १८७९ साली ते निवृत्त झाले. १८८० साली त्यांना सरकारने मुंबईत विधिमंडळाचे सभासद नेमले. १८८१ मध्ये ' फर्स्टक्लास सरदार ' ही प्रतिष्ठा त्यांना प्राप्त झाली. पुढे रतलाम सस्थानात दिवाण म्हणूनही त्यांनी वर्षभर काम केले. इ. स. १८९२ मध्ये वयाच्या ६९ व्या वर्षी पुण्याला त्यांचे देहावसान झाले.

लोकहितवादी हे फार मोठे लेखक होते. १८४८ साली त्यांनी आपल्या लेखनास शतपत्रांपासून प्रारंभ केला आणि समाजाच्या मार्गदर्शनाचे हे कार्य त्यांनी आमरण चालविले. ' ज्ञान हे सर्व सन्मानांचे, पराक्रमाचे, बलाचे व ऐश्वर्याचे मूळ आहे.' अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. म्हणून स्वजनांना शहाणे करून सोडण्यासाठी त्यांनी इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र, संस्कृतविद्या इ. अनेक विषयांवर लेखन केले. निवृत्तीनंतर १८८२ साली त्यांनी ' लोकहितवादी ' हे मासिक सुरू केले होते.त्यात लोकांना बहुविध विषयांचा प्रौढ लेखांच्याद्वारे परिचय करून देणे हाच हेतू होता. ' स्थानिक स्वराज्यव्यवस्था ', ' ग्रामरचना ', ' पृथ्वीराज चव्हाण ', ' दयानंदांचे चरित्र ' ही पुस्तके त्यांनी याच मासिकातून प्रसिद्ध केली. नंतर १८८३ साली त्यांनी ऐतिहासिक विषयाला वाहिलेले असे स्वतंत्र त्रैमासिक चालू केले. त्याचेही नाव ' लोकहितवादी ' हेच होते.

लोकहितवादींचे बरेचसे लेखन भाषांतर, रूपांतर या स्वरूपाचे आहे. त्यांची ' शतपत्रे ', ' प्रभाकर ' या साप्ताहिकातून १८४८ ते १८५० या दरम्यान प्रसिद्ध झाली. यानंतर इतर वृत्तपत्रांतून त्यांनी बरेच लेखन लिहिले. त्या सर्वांचा संग्रह व ' स्थानिक स्वराज्यव्यवस्था ' व ' पृथ्वीराज चव्हाण ' एवढेच त्यांचे स्वतंत्र लेखन आहे. इतर लेखन इंग्रजी ग्रंथांच्या आधाराने केलेले आहे किंवा सरळ भाषांतरच आहे. या सर्व लेखसंभारापैकी शतपत्रांनीच त्यांची खरी कीर्ती झाली व आजही ' शतपत्रां 'चे लेखक म्हणूनच महाराष्ट्र त्यांना ओळखतो. त्यांचे सर्व क्रांतिकारक मूलगामी विचार प्रामुख्याने शतपत्रांतच आले आहेत. त्यामुळे समाजाने त्यांना दिलेली ही मान्यता वाजवीच आहे.

लोकहितवादींच्यावर त्यांच्या हयातीतच टीकेचा भडिमार झाला. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी त्यांच्यावर फारच कडक टीका केली आणि शास्त्रीबोवांच्या लेखणीचे तेज फार प्रखर असल्यामुळे काही काळ

लोकहितवादींच्या कार्याची उपेक्षा झाली. प्रा. गं. बा. सरदार यांनी ' महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी ' या आपल्या पुस्तकात त्यांचा समावेश केला आहे तो याच अभिप्रायाने. त्यांच्या व त्यांच्यासारख्याच इतर पंडितांच्या प्रयत्नाने लोकहितवादींच्या कार्याचे खरे स्वरूप आज आपणास कळून येत आहे. ही सुदैवाची गोष्ट आहे. नाहीतर हे ' जुने ठेवणे ' आपल्याला आकळले नसते. आज महाराष्ट्रात विष्णुशास्त्री पक्ष व लोकहितवादी पक्ष असे दोन पक्ष दिसतात. त्यांच्यात या दोघांच्या कार्याविषयी तीव्र मतभेद आहेत. प्रत्येक पक्षाची दुसऱ्याच्या कार्याला शून्य लेखावे अशी वृत्ती दिसते. आपणच दोन्ही एकांतिक मते त्याज्य मानून दोघांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास शिकले पाहिजे.

## लोकहितवादींचे विचारधन

' लोकहितवादींचे विचारधन ' या विभागात लोकहितवादींचे भिन्न विषयांवरचे विचार संकलित करून मांडले आहेत. शतपत्रांमध्ये लोकहितवादींनी १०८ पत्रे लिहिली आहेत. त्यांत धर्म, राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र, इतिहास, इंग्रजीविद्या, संस्कृत विद्या इ. अनेक विषयांवरचे त्यांचे विचार आले आहेत. हे लेखन प्रासंगिक असल्यामुळे त्यात वरील विषयांवरचे विचार विखरून असे आलेले आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून त्याचे वर्गीकरण करून भौतिक विद्या, धर्मशास्त्र, जातिभेद, स्त्रीजीवन, इंग्रज आणि राज्यसुधारणा आणि आर्थिक विचारसरणी अशा विभागांत त्या त्या विषयावर विचार संकलित केले आहेत. असे करताना शक्यतो लोकहितवादींच्या शब्दांतच ते देण्याचा प्रयत्न केला आहे, पण विस्तारभयास्तव काही ठिकाणी संक्षेप करावा लागला, काही ठिकाणी दोन-तीन पत्रांतील विचार मांडताना मध्ये निराळी वाक्ये घालून जोडणी करावी लागली. त्या ठिकाणी संपादकीय भाषा आलेली आहे. लोकहितवादींची मूळ भाषा असेल तेथे त्यांचे उद्‌गार अवतरणात दिले आहेत. पण त्यातही काटछाट करताना कोठे कोठे भाषा बदलली आहे, पण मूळ विचारसरणीला कोठे धक्का लागणार नाही हे धोरण कटाक्षाने संभाळलेले आहे. याशिवाय मधून मधून संपादकीय विवरण आले आहे ते लोकहितवादींच्या विचारधनाचे स्वरूप नीट कळावे म्हणून. लोकहितवादींच्या आधीच्या काळचे मतप्रवाह, पन्नास वर्षांनंतरचे मतप्रवाह, त्यांच्या काळची परिस्थिती, हे सर्व उद्‌बोधनासाठी आलेले. संपादनातील हे धोरण ध्यानात ठेवूनच विद्यार्थ्यांनी शतपत्रांचा अभ्यास करावा.

**नवभारताची निर्मिती** – इ. स. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला. मराठ्यांचे साम्राज्य बुडाले. याला आता जवळजवळ दीडशे वर्षं होत आली. या दीड शतकाच्या काळात भारतात एक अभूतपूर्व क्रांती घडून येऊन नवभारताचा जन्म झाला आहे. त्याच्या आधीच्या हजार दीड हजार वर्षांत एवढे मोठे परिवर्तन भारतात कधीच झाले नव्हते. मुसलमानी आक्रमण, पाश्चात्त्यांमधील डच, फ्रेंच, पोर्तुगीज यांचे आक्रमण याच काळात झाले. इंग्रजही याच काळात येथे व्यापार करीत होते व मुलूख आक्रमीत होते. या आक्रमणामुळे भारतातील प्रत्येक प्रदेशाला, तेथील राज्यव्यवस्थेला, समाजरचनेला, अर्थव्यवस्थेला सारखे हादरे बसत होते. तरी एकंदर समाजव्यवस्थेच्या तत्त्वात फारसा फरक पडला नव्हता. श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माने बद्ध असे जे त्याचे स्वरूप या आक्रमणांच्या आधी होते ते बव्हंशी तसेच कायम होते. पण पेशवाई बुडाली आणि त्यानंतर जी पाश्चात्त्य विद्या येथे प्रसृत होऊ लागली, तिच्या प्रभावाने हा समाज शंभर वर्षांत इतका पालटला की, तत्पूर्वीच्या व या समाजात काही नातेच नसावे असे पाहणाऱ्याला वाटावे. ही जी क्रांती झाली ती भारताला अत्यंत हितावह अशीच झाली. आगरकरांनी म्हटल्याप्रमाणे पूर्वीच्या हजार वर्षांच्या काळात भारताला सतत पाण्यात पडून राहिलेल्या लाकडाचे व हाडकाचे रूप प्राप्त झाले होते. त्याच्यात चैतन्य असे कसलेच राहिलेले नव्हते. त्याचे चलनवलन सर्व थांबले होते. या जुनाट पुरुषाच्या देहात रुधिराभिसरण होतच नव्हते. पण पाश्चात्त्य विद्येमुळे नवी दृष्टी येथल्या धुरीणांना प्राप्त होताच हा समाज पुन्हा जिवंत होऊ लागला. आणि एका शतकाच्या आतच त्याचा कायाकल्प झाला; या सनातन भूमीत नवभारताची निर्मिती झाली.

या नवनिर्मितीचे महाकार्य करणारे जे थोर पुरुष गेल्या काही शतकांत महाराष्ट्रात होऊन गेले त्यात **लोकहितवादी** तथा गोपाळ हरी देशमुख यांचे स्थान फार मोठे आहे. दादाभाई, रानडे, विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक हे नवभारताचे व नव्या महाराष्ट्राचे प्रमुख शिल्पकार होत हे खरे आहे, पण भाऊ महाजन, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, ज्योतिबा फुले व लोकहितवादी यांनी त्यांच्या आधी क्रांतीची जी पूर्वतयारी करून ठेवली होती तिलाही त्यांच्या कार्याइतकेच महत्त्व आहे हे विसरून चालणार नाही. कोणत्याही क्रांतीला नव्या तत्त्वज्ञानाची, समाजरचनेच्या नव्या मूलतत्त्वांची आवश्यकता असते. त्या तत्त्वांचा मनाशी निश्चय करून समाजात त्यांच्या प्रसाराचे काम धैर्याने, दृढनिश्चयाने व फार चिकाटीने अखंड करावे लागते; तेव्हाच नव्या निर्मितीचा पाया भरला जातो.

या पायाभरणीच्या कार्याचे श्रेय बव्हंशी लोकहितवादींना व त्यांच्या **शतपत्रांनाच** द्यावे लागेल. अर्वाचीन महाराष्ट्राच्या जीवनात ' शतपत्रां 'ना असे अनन्यसाधारण स्थान आहे.

इंग्रजांचे राज्य येथे प्रस्थापित झाले त्या वेळी येथल्या समाजाचे नेतृत्व ज्यांच्याकडे होते ते लोक म्हणजे ब्राह्मण व सरदार, जहागीरदार हे होत. त्यांना त्या प्रारंभीच्या अव्वल इंग्रजी काळात फार वाईट दिवस आले होते. त्यांची सत्ता, त्यांचे वर्चस्व व त्यांची प्रतिष्ठा ही तर नष्ट झालीच होती, पण त्यांच्यातील बहुतेकांना दारिद्र्य, दैन्य प्राप्त झाले होते. पण हे सर्व काय घडत आहे, कशामुळे घडत आहे याची खरी कारणमीमांसा करण्याचे सामर्थ्य त्यांच्या बुद्धीला नव्हते. कलियुगामुळे, पापाचरणामुळे, ईश्वरी क्षोभामुळे हे झाले आहे, असे त्यांना वाटत होते. आणि पूर्वी रावण माजला होता पण रामाने त्याचा नाश केला, यादव माजले होते त्यांचा ब्राह्मणशापाने संहार झाला तसाच आताही होईल, असाच कोणी अवतारी पुरुष जन्माला येऊन साधूंचा प्रतिपाळ करील व दुष्कृत्यांचा विनाश करील, अशी भाबडी श्रद्धा मनात बाळगून ते बसले होते. इतिहासाच्या अभ्यासाने, तर्काने, बुद्धीने या घटनांची चिकित्सा करावी, समाजाच्या उत्कर्षापकर्षाच्या नियमांच्या आधारे या अवदशेचे विवेचन करावे, भौतिक दृष्टीने कार्यकारणभावाचा विचार करून आपल्यावर आलेल्या या घोर संकटाचे स्वरूप निश्चित करावे ही ऐपतच त्या नेत्यांना नव्हती. कारण तशी परंपराच या देशात नव्हती. त्यांची सर्व मीमांसापद्धती पौराणिक होती, आध्यात्मिक होती. लोकहितवादींचे असामान्यत्व हे की त्यांनी भौतिक कार्यकारणभावाच्या दृष्टीने प्राप्त परिस्थितीचे निदान करण्याची नवी परंपरा या देशात सुरू केली. एखाद्या अत्यंत विद्वान, निष्णात, अनुभवी, आपल्या विद्येत पारंगत असलेल्या वैद्यराजाने अंथरुणाला खिळून गेलेल्या रोग्याची तपासणी करावी व सूक्ष्म चिकित्सा करून रोगनिदान करावे आणि मग त्याला रोगमुक्त करण्यासाठी प्रभावी औषधयोजना करावी त्याचप्रमाणे रुग्ण अशा भारतपुरुषाच्या बाबतीत लोकहितवादींनी केले. त्यांनी शतपत्रे लिहिली त्या वेळी ते अवघे २५ वर्षांचे होते, पण त्या वयातही समाजाच्या आयुर्वेदात ते पारंगत झाले होते. इतिहास, राज्यशास्त्र, अर्थकारण, यांच्या अभ्यासानेच त्यांना ही पारंगतता प्राप्त झाली होती आणि या अपूर्व विद्येच्या साह्यानेच त्यांनी आपल्या समाजाची नाडी पाहून, त्याच्या शरीरातील नसन् नस तपासून त्याच्या रोगाबरोबर निदान केले आणि तितकीच अचूक उपाययोजनाही सांगून टाकली. ते रोगनिदान व ती उपाययोजना हाच

‘ शतपत्रां ’चा विषय आहे.

## १. भौतिक विद्या

**१. अज्ञान –** थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्राच्या देहाची तपासणी करताना तो देह अनेक व्याधींनी ग्रस्त झाला आहे, असे लोकहितवादींच्या ध्यानात आले. त्यातील पहिली व्याधी, महाव्याधी म्हणजे ‘ अज्ञान ’ ही होय. प्राचीनकाळी विद्येचे माहेर, सरस्वतीचे मंदिर अशी या भूमीची कीर्ती होती, पण आज अज्ञानाच्या महारोगाने ती जर्जर झाली होती. हे अज्ञान अत्यंत केविलवाणे होते, घृणास्पद होते; करुणास्पद होते. त्याचे स्वरूप पाहता आजही शिसारी येते. मग प्रत्यक्ष त्यातच वावरणाऱ्या लोकहितवादींना काय होत असेल याची सहज कल्पना येईल. येथल्या ब्राह्मणांना, शास्त्रीपंडितांना ही शुद्ध जनावरे आहेत, बैल आहेत, हे टोणपे आहेत असे पत्रोपत्री त्यांनी म्हटले आहे. पण त्या वेळच्या या पंडितांच्या अज्ञानाची आपल्याला जर कल्पना आली तर लोकहितवादींच्या या तीव्र संतापाचे आपल्याला नवल वाटणार नाही.

इंग्रज येथे आल्याला शे-दीडशे वर्षं त्या वेळी होऊन गेली होती, पण हे लोक कोण, ते कोठून आले, त्यांची राज्यव्यवस्था काय, त्यांची शस्त्रास्त्रे काय, त्यांची विद्या काय याचे लवमात्र ज्ञान हिंदु लोकांना - ब्राह्मणांना किंवा सरदारांना नव्हते. लोकहितवादी म्हणतात, ‘ कोणास खोटे वाटेल तर त्याने स्वदेशीय राजधानीतील लोकांकडे पहावे आणि त्यास पुसावे की, “ इंग्रज हिंदुस्थानात कोठे कोठे राज्य करतात ? ” ते म्हणतील की, “ छी! इंग्रज कोठे आहेत ? आमचे संस्थानात तो एक ताम्रमुखी मात्र असतो.” याचप्रमाणे पेशवाईत अवस्था होती. (पत्र क्रमांक ४८) ’ ‘ ब्राह्मणांना अजूनही वाटते की पृथ्वी शेषावर आहे, ग्रहणात राहू चंद्रास ग्रासतो. हिंदुस्थानाएवढीच पृथ्वी. पलीकडे गतीच नाही. ब्राह्मण सर्व जगात श्रेष्ठ, वेदांचा अर्थ करू नये.’ (पत्र क्रमांक ६२). ‘ कोणी म्हणतो पेशव्यांचे राज्य कसे बुडाले हो ? ’ दुसरा उत्तर करतो, ‘ अहो, ते अवतारी पुरुष होऊन गेले. जे होणार ते झाले. त्यास उपाय काय ? सद्दी फिरली म्हणजे क्षण लागत नाही. देव देणार त्याला देतो. त्याचे मनात आले म्हणजे पाहिजे तसे घडते.’ (पत्र क्र. ५५) ‘ ज्ञान म्हणजे काय हेच लोकांस ठाऊक नाही. इंग्लंडातील थोरली सनद, पार्लमेंट, फराशीस यांची राज्यक्रांती, रूमचे राज्याचा नाश, अमेरिका खंडात युरोपियन लोकांची वस्ती. लोकसत्ताक राज्य, या शब्दांचा अर्थही बहुत हिंदु मनुष्यांस ठाऊक नसेल. पृथ्वीवर काय

आहे व लोक कसे आहेत, याविषयी त्यांस काही कळत नाही. पुराणिक एक पोथी सोडून बसला म्हणजे सर्व आनंदाने डोलतात. व रावणास दहा डोकी, सहस्रार्जुनास हजार हात, दुधाचा समुद्र, दह्याचा समुद्र इ. गोष्टी ऐकल्या की बायका फार खूष होतात व पुरुष म्हणतात आम्ही आज फार मोठे ज्ञान संपादन केले. हे पहिले जुने लोक आहेत ते शुद्ध बैल आहेत. त्यांस खाण्यापिण्याचे मात्र ज्ञान आहे व ते जनावरासारखे कर्म करतात.' (पत्र क्र. ३०) 'हे शास्त्री, भट व संपूर्ण हिंदू लोक अजून मागल्या गोष्टींचे भरात आहेत. त्यांस अजून सांप्रतचे काही सुचत नाही. त्यामुळे कित्येक लाक पोरासारखे बोलतात की, विलायत बेट लहान दोनचार कोसांचे आहे. कोणी म्हणतो टोपकर हे पाण्यातले राहणारे, कोणी म्हणतो कंपनी सरकार बायको आहे. इंग्रजांस राज्य करू लागण्यास दोनशे वर्षे झाली आणि या लोकांच्या डोकीवरचे केसदेखील त्यांनी मोजले. पण या लोकांस त्यांचे डोळेही ठाऊक नाहीत.' (पत्र क्र. ३४)

**२. अज्ञानातच भूषण –** या अज्ञानाचा तर लोकहितवादींना उद्वेग येत असेच; पण आपण अज्ञानी लोक आहो हे जाणून नव्या ज्ञानाच्या अभ्यासास उद्युक्त व्हावे यासाठी ब्राह्मणांची व शास्त्रीपंडितांची तयारी नव्हती, याचे त्यांना पराकाष्ठेचे दु:ख होत असे. 'पुण्यात लायब्ररीची स्थापना' या पत्रात ते म्हणतात की, 'आपले लोक ज्ञान संपादन करणे हे लहान मुलांचे काम असे समजतात आणि शिकत नाहीत. ते केवळ अडणीवरचे किंवा सांबापुढचे असून विद्येस तुच्छ मानतात व थोडे खावयास मिळू लागले म्हणजे आपली अप्रतिष्ठा होईल असे समजून वाचणे व अभ्यास करणे सोडून देतात. याबद्दल वाईट वाटून त्यांचा फार राग येतो. ज्याच्याजवळ द्रव्य आहे ते मदान्ध. त्यांस वाटते विद्या काय आहे? विद्येचे सार जे द्रव्य ते आम्हाजवळ आहे, असे त्यांस वाटते व ते आपल्याला चंद्रसूर्याइतके उंच समजतात.' (पत्र क्र. ३). 'सांप्रत कोणत्याही ब्राह्मणास पुसा की, इंग्रज शहाणे आहेत काय? तर ते म्हणतील की, छी छी, शहाणे कशाने? त्यांस काय येत आहे? त्यांची विद्या, शास्त्रे व ज्ञाने सर्व आमच्याहून कमी आहेत. ब्राह्मणांना आपलेहून वरिष्ठ कोणीच वाटत नाही. कोणाचाही ग्रंथ त्यांचे हातात द्याल तर ते म्हणतील की, 'दगड आहे यात?' नावदेखील वाचून पाहावयाचे नाहीत. तसेच शास्त्री-पंडित यांस सर्व तुच्छ वाटते. आपले ठिकाणी गर्व करून ते बसतात. अलीकडे नवे ग्रंथ बहुत झाले आहेत, रसायनशास्त्र, यंत्रज्ञान, शिल्प इत्यादिक. परंतु त्यांतील गोष्ट कोणी एकही पहात नाही.' (पत्र क्र. ९५). 'लोकांमध्ये समजूत अशी आहे की ज्ञान मिळणे हे

संसारसुख आहे. याजकरिता किती एक जण इंग्रजी शिकतात. त्यांस लोक पुसतात की, तुम्हांस रोजगार लागला. आता विद्या शिकता कशाला? शहाणपण व ज्ञान म्हणजे काय याचा अर्थच त्यांस कळत नाही.' (पत्र क्र. ६९).

**३. पाठांतर हीच विद्या –** स्वत: असे अडाणी असूनही ब्राह्मणांना गर्व कशाचा वाटत असे? तर त्यांच्या संस्कृत विद्येचा. पण संस्कृत विद्येत ते पारंगत होते असेही नाही, तर त्यांस जुने संस्कृत ग्रंथ पाठ येत असत आणि या पाठांतरासच ते 'विद्या', 'ज्ञान' असे मानत असत. 'विद्या' याचा अर्थ असा व्हावा याची लोकहितवादींना अगदी चीड येत असे. ते म्हणतात, 'अहो, पाठ म्हणणे ही विद्या केली कोणी? यात फळ काय? हा मूर्खपणा उत्पन्न कसा झाला असेल तो असो. परंतु एवढा मूर्खपणा कधी कोणत्याही देशात झाला नसेल.' (पत्र क्र. ७७). लोकहितवादींच्या मते व्याकरण ग्रंथ केवळ पाठ म्हणून दाखविणे ही विद्याच नव्हे. मनुष्यास लाकडे तोडण्याचे कसब शिकविले तरी बरे. परंतु ही पाठांतरी विद्या नको, असे ते स्पष्ट म्हणतात, 'जांस अर्थ परिज्ञान नाही, नुसती अक्षरे वाचून पाठ म्हणतात त्यांचे ते शब्द जसे जनावरांचे ध्वनी तद्वत् आहेत. बैलाच्या पाठीवर साखरेच्या गोण्या घातल्या तर त्याला जसा त्याचा उपयोग नाही, तद्वत् ब्राह्मणांनी पुष्कळ पाठ केले, पण अर्थ ठाऊक नाही व ज्ञान नाही; तर काही उपयोग नाही.' (पत्र क्र. २०). याप्रमाणे केवळ अज्ञान नव्हे तर विपरीत ज्ञान हे भारताच्या अध:पाताचे पहिले कारण होय असे लोकहितवादी यांस दिसून आले.

**४. पुराणांचे वर्चस्व –** भट, ब्राह्मण व शास्त्रीपंडित यांची अशी विपरीत बुद्धी होण्याचे मुख्य कारण म्हणजे पुराणग्रंथ हे होय, असे लोकहितवादींचे मत होते. भारतामध्ये आज हजारो वर्षे लोक पुराणश्रवण करीत आहेत. या कारणाने जगाचे सत्य ज्ञान करून घेण्याचे त्यांच्या ठायीचे सामर्थ्यच नष्ठ झाले आहे. 'पुराणातील सर्व गोष्टी प्रारब्धावर व देवाचे सामर्थ्यावर रचल्या आहेत. गजेंद्रास शाप होता म्हणून नक्र झाला. अहिल्येस वर होता म्हणून उद्धरली. रावणास वानरांनी मारला, दुर्योधनास मारून भूभार कमी करावा म्हणून (श्रीकृष्णाने) युद्ध केले, हिरण्यकश्यपूस मारावयास खांबातून देव निघाला. वामनाने गयातळी बळीस पाताळी घातला. या गोष्टी व अस्त्रयुद्ध, रथवाहन, धर्मयुद्ध, प्रतिज्ञा, शाप, वरदान, तत्काळ ईश्वराची प्राप्ती या गोष्टी आता लागू करणे यांसारखा मूर्खपणा कोठे आहे?' (पत्र क्र. ५५). 'कोणास म्हटले की, लंकेत कोलंबो शहर आहे तर तो म्हणतो की, लंका कोणास सापडावयाची नाही, तिच्या भोवती सुदर्शन

फिरत आहे. त्यास विचारले की, तापी नदीचा उगम कोठे आहे तर म्हणतो की, ती यमाची बहीण असे पुराणांत लिहिलेच आहे. याप्रमाणे पुराणे वाचून त्याचे मनात अनेक कल्पित कादंबऱ्या भरून त्याला हल्ली सृष्टी आहे त्याहून वेगळी दिसते. संक्रान्त हे सूर्याचे राशिक्रमण आहे हे तो जाणतच नाही. ती रेड्यावर बसून दक्षिणेस जाते, ती दीडशे कोस लांब आहे. तिचे मागे किंक्रान्त आहे असेच तो मानतो. त्यास वाटते की हे अलौकिक ज्ञान जे कोणास ठाऊक नाही ते मला पुराणामुळे ठाऊक झाले. या अभिमानात तो असतो. वास्तविक पाहिले तर त्याचे ज्ञान एक कपर्दिकेच्या किंमतीचे नसून त्याचे व इतर लोकांच्या नाशास कारण झाले.' (पत्र क्र. ८४).

**५. नव्या भौतिक विद्या –** हिंदू लोकांची सुधारणा व्हावयाची तर त्यांना मुख्य म्हणजे विद्या हव्या होत्या, पण त्या विद्या पुराणातल्या नव्हे तर सत्यप्रतिपादक! 'ज्या नव्या विद्या त्या काळी प्रकट झाल्या होत्या, ज्या वास्तविक व्यवहार व जग यांच्या दर्शक होत्या' त्या विद्या हव्या होत्या. लोकहितवादींच्या मते संस्कृत विद्या अगदी उपयोगी नव्हती, कारण त्यात असत्य फार भरले होते. मुलांना अठराही पुराणे शिकविली तरी त्यांना ज्ञान काय प्राप्त होणार ? तर दूध, तूप, मध यांचे समुद्र आहेत. स्त्रिया या कपटी, मूर्ख, निर्दय अशा असतात. ब्राह्मणांच्या पायाचे तीर्थ नित्य प्यावे, असल्या विद्या जितक्या वाढतील तितके अज्ञान दृढ होईल व हा देश मग कधीही सुधारणार नाही, असे त्यांचे निश्चित मत होते.

**६. शब्दप्रामाण्य –** त्या वेळी लोकांत, शास्त्रीपंडितांतही अत्यंत गाढ, घोर अज्ञान पसरले होते. त्यांचे मुख्य कारण म्हणजे पुराणश्रवण हेच होय, हे आपले मत लोकहितवादींनी अनेक ठिकाणी सांगितले आहे. या पुराणांमुळे भारताला आणखी एक रोग जडला व तो म्हणजे **शब्दप्रामाण्याचा**. वेदात, पुराणात व इतर कोणत्याही ग्रंथात जे लिहिले असेल ते आंधळेपणाने खरे मानावयाचे ही जी प्रामाण्यबुद्धी ती या समाजाच्या अध:पाताला कारण झाली होती. स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याचे या समाजाला, त्यातील भटभिक्षुकांना, शास्त्रीपंडितांना वावडेच होते. ते फार मोठे पातक होय असे त्यांना वाटत असे. प्रत्येक ठिकाणी शास्त्र हे प्रमाण मानलेच पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होती. लोकहितवादींनी या शब्दप्रामाण्यावर, शास्त्रावरील या अंधनिष्ठेवर फार प्रखर टीका केली आहे. ही अंधश्रद्धा म्हणजे समाजाच्या पायातली बेडीच होय असे ते म्हणतात. 'अलीकडे किती एक मूर्खपणाचे समजुतीमुळे लोक कैदेत आहेत.

म्हणजे त्यांच्या पायात बेड्या आहेत. त्यास इकडचे तिकडे हलवत नाही. जागच्या जागी श्रमी होतात आणि बेड्या तोडावयाजोग्या असूनही ते स्वस्थ दु:ख भोगतात हे आश्चर्य आहे.' (पत्र क्र. २४). आज स्वातंत्र्यवीर सावरकर हा विचार पुन:पुन्हा मांडत आहेत. रोटीबंदी, बेटीबंदी, सिंधुबंदी इ. सप्तशृंखला हिंदू लोकांच्या पायात आहेत व त्या तोडल्यावाचून भारताला स्वातंत्र्य मिळावयाचे नाही व मिळाले तरी ते टिकविता येणार नाही, असे आपले मत त्यांनी 'जात्युच्छेदक' निबंधातून मांडले आहे. साठ-पासष्ठ वर्षांपूर्वी आगरकरांनी या शृंखलांवर घणाचे घाव घातले होते. पण त्यांच्याही आधी पन्नास वर्षे लोकहितवादींनी याच कार्याला प्रारंभ केला होता, यातच त्यांचे असामान्य मनोधैर्य दिसून येते, 'मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो. ब्रह्मदेवाचे का असेना; 'बुद्धिरेव बलीयसी' असे आहे. तुम्ही उघड जे पाहता त्याचा बंदोबस्त, शास्त्रात नाही, म्हणून करीत नाही, हे योग्य नाही. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा, विचार करून पहा.' असा उपदेश त्यांनी पुनर्विवाहाचा पुरस्कार करताना केला आहे. (पत्र क्र. ७०). परदेशगमनाविषयी लिहितानाही त्यांनी हाच विचार सांगितला आहे. 'दुसरे मुलखात जाऊ नये असा शास्त्राचा अर्थ नसेल असे वाटते आणि जर कदाचित् असला तर ती शास्त्राज्ञा मानण्याची जरूर नाही' असे निर्भयपणे त्यांनी सांगितले आहे. (पत्र क्र. ९९). 'चांगली व्यवस्था होईल तो नियम करावा; आणि जे पूर्वी शास्त्र लिहिले तेच सर्व काळ चालले पाहिजे असे म्हणणे मूर्खपणा आहे.' (पत्र क्र. १०६). 'शास्त्र म्हणजे लोकांस सुख होण्याकरता रीत घातली आहे, त्यातून जर विपरीत काही असेल तर ते एकीकडे ठेविल्यास चिंता काय? शास्त्र असो की नसो परंतु हित जाणून शास्त्र एकीकडे ठेवून ही रूढी (पुनर्विवाहाची) घालावी.' (पत्र क्र. १०७). असे विचार त्यांनी ठायी ठायी प्रगट केले आहेत.

## २. धर्मशास्त्र

**१. धर्म समाजासाठी आहे –** ही सर्वस्वी नवी अशी दृष्टी आहे. इंग्रजी ग्रंथांच्या अध्ययनाने लोकहितवादींना ती प्राप्त झाली होती, हे महाराष्ट्राचे मोठे सुदैव समजले पाहिजे. धर्म हा समाजासाठी असतो, समाज धर्मासाठी नसतो हा विचार उदारमतवादी जगात आत सर्वमान्य झाला आहे. पण भारतात इंग्रजांपूर्वीच्या हजार वर्षांच्या काळात लोकांना त्याचा गंधही नव्हता. समाजाचे काहीही होवो, धर्माज्ञा पाळल्याच पाहिजेत. अशीच त्या वेळी शास्त्री-पंडितांची वृत्ती होती. आणि समाज अंधपणे त्यांच्या मागून चालला होता. ग्रीक विद्येच्या

पुनरुज्जीवनापूर्वी युरोपात धर्मधुरीणांची व समाजाची हीच श्रद्धा होती. धर्मनियम दुर्लंघ्य आहेत, समाजाच्या उत्कर्षापकर्षावरून त्यांची पारख करणे हे पातक होय. कारण धर्मनियम म्हणजे परमेश्वराची नि:श्वसिते होत, असे मत तेथे रूढ होते. जो समाज धर्मनियमांकडे या दृष्टीने पाहतो त्याचा अध:पात झाल्यावाचून राहत नाही. महाभारतकाळी भारतात असली अधोगामी विपरीत दृष्टी नव्हती. समाजाच्या उत्कर्षासाठीच धर्मनियम केले आहेत, ज्याने उत्कर्ष साधतो त्यालाच धर्म म्हणावे, लोकांचेसाठीच धर्म आहे; अशी अनेक व्यासवचने, श्रीकृष्णवचने महाभारतात आहेत. पण या वचनांचा भारताला विसर पडला. म्हणूनच सर्व प्रकारची संकटे त्यावर ओढवली. नवी दृष्टी प्राप्त होताच लोकहितवादींनी समाजाच्या नेमक्या याच व्याधीवर बोट ठेविले आणि ' बुद्धिरेव बलीयसी ' असे मानणे हा त्यावर उपाय सांगितला. ' नियमन मनुजासाठी, मानव नसे नियमांसाठी जाणा ' अशी पद्यपंक्ती रचून केशवसुतांनी धर्मविषयक हाच विचार भावनेच्या माध्यमातून लोकमानसात रूढ करण्याचा प्रयत्न केला होता.

**२. कर्मकांड हा रोग :–** समाजाचा उत्कर्ष, त्याची धारणा, त्याची प्रगती, त्याचे वैभव हा खरा धर्माचा हेतू. याचा एकदा विसर पडला म्हणजे धर्माला केवळ कर्मकांडाचे रूप येते आणि भारतीय महाराष्ट्रीय समाजाला जडलेला सर्वांत भयंकर रोग हाच होय असे लोकहितवादींचे मत होते. ते म्हणतात, ' सांप्रत काळचे लोक इतके मूर्ख आहेत की, त्यांस ' चाल ' म्हणजे काय असे कोणी पुसले तर ते म्हणतात, अरे, चाल म्हणजे धर्म. परंतु त्यांस कळत नाही की, धर्म, चाल व शास्त्र ही वेगवेगळी आहेत. परंतु हे लोक विद्वान असते तर मूर्खपणाने स्वत:चे घातास का प्रवर्तक होते ? ' (पत्र क्र. १६) ' हिंदू लोकांत सांप्रत आचार फार माजला आहे. म्हणजे किरकोळ निरर्थक कर्मे आणि ढोंगे फार होऊन, त्यातील बीजरूप जी नीती ती भ्रष्ट झाली आहे. ब्राह्मणांचे घरात जाऊन पाहिले तर आचार किती दिसतात. पिठास पाणी लागले म्हणजे ओवळे झाले, खरकटे, शिळे व उष्टे यांविषयी हजारो नेम आहेत.' असे सांगून मुकटा, धाबळ, भाजके, कच्चे, उष्टे, विटाळ, पन्नास वेळा हात धुणे, याचे तपशीलवार वर्णन लोकहितवादींनी केले आहे. आणि यालाच लोक धर्म समजतात याबद्दल खेद व्यक्त केला आहे. (पत्र क्र. ५८) ते म्हणतात, ' घरात लहान मुलामुलींना सदाचार शिकवावा, नीती शिकवावी, ते न करता पोरींना वाती लावाव्या, निरांजन लावून तूप जाळावे, तीळतांदूळ वहावे, नाना प्रकारची मूर्खपणाची व्रते करावी, याबाबतच्या कहाण्या तिला शिकवितात. नीती व सदाचरण याविषयी लोक

अगदी आंधळे आहेत. पुरुषांत जे लाचखाऊ, चोर, इंद्रियभ्रष्ट, पण त्यांचे सोवळे सर्वांहून अधिक, जेवताना बोलत नाहीत, त्यांना लोक मान देतात. त्यांचे आचरण पहात नाहीत.' (पत्र क्र. ५८) यावरून लोकहितवादी रीत, चाल, आचार कशाला म्हणतात ते ध्यानात येईल. नीती, परोपकार, भूतदया, क्षमा, शांती, ज्ञानदान, मनोनिग्रह याला ते खरा धर्म मानतात. ''कोणी म्हणतो की, मी कार्तिकमासी निरांजने दिली, कोणी म्हणतो की, मी वैशाखात मडकी दिली, आवळे दिले. हा धर्म कशाचा? हा मूर्खपणा आहे.'' मग धर्म कोणता? ''आंधळ्यास जेवावयास घातले काय? दीन, गरिबांना (ब्राह्मणांस नव्हे) वस्त्रे दिली काय? अज्ञानांस ज्ञानी केले काय? दुर्जनांस सुजन केले काय? कोणता परोपकार आपले लोकांमध्ये त्यांनी केला? धर्म त्यावरून ठरतो.'' (पत्र क्र. ३५)

**व्रतवैकल्ये :–** व्रतवैकल्यांचा, उपास-तापासांचा, मंत्रतंत्राचा हा धर्म पुराणांनी प्रसृत केला असा लोकहितवादींचा आक्षेप आहे. 'अज्ञान फार वाढले व त्यांस साधन मुख्य पुराणे आणि महात्म्ये लिहावयास हाच पंडितांचा रोजगार होता' असे ते म्हणतात. 'कोणी कावेरीमाहात्म्य, कोणी नाशिकमाहात्म्य, कोणी करवीर माहात्म्य, कोणी गणपतिपुराण अशी लिहिली, प्रत्येकात हेतू हाच की, ब्राह्मणास पैसा मिळण्याची तजवीज पहावी. वर्षात तीनशे साठ दिवस व त्याहून अधिक व्रते आहेत. पुराणात नित्यकर्म पाहिले तर सगळा एक दिवस पुरणार नाही. इतके धर्म त्यात आहेत पण त्यात काही नीती आहे असेही नाही. कासोटा कसा घालावा, गंध कसे लावावे, शौचास अमुक कोस जावे, हेच फार आहे. लोकांचे सुख व ज्ञान वाढवावयाची त्यात एकदेखील गोष्ट नाही. मूर्खपणा वाढवावयाच्या गोष्टी आहेत. अज्ञान्यांस अजरामर करण्याकरिता या पोथ्या आहेत असे मला वाटते. हे सर्व सोडून दिल्याखेरीज यांची बरी गत मला दिसत नाही. मग ईश्वराची इच्छा!' (पत्र क्र. ६१)

**४. खरा धर्म :–** रूढ धर्मावर याप्रमाणे प्रखर टीका केल्यावर काही पत्रांतून लोकहितवादींनी आपल्या मते खरा धर्म कोणता त्याचे विवेचन केले आहे. 'नीतिप्रशंसा' या पत्रात ते म्हणतात, 'आता जो धर्म चालला आहे हा धर्म नव्हे. हा बेबंद गोंधळ आहे. यात काही नाही. नीती नाहीशी झाली व धर्म बुडाला. मला तर धर्म कोठे दिसत नाही. म्हणून धर्माची स्थापना करण्याचा माझा प्रयत्न आहे.' (पत्र क्र. ६५). धर्मस्थापनेच्या ह्या प्रयत्नाचे स्वरूप त्यांनी 'धर्म सुधारणा' या पत्रात स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते हे कार्य एकट्या-दुकट्याने न करता ज्यांच्या मनात देशाचे कल्याण आहे त्यांनी एकत्र

येऊन करावे. असे केल्याने भीतीचे कारण राहणार नाही. 'चार टोणपे शास्त्री या लोकांना फार तर जातीबाहेर ठेवतील, पण एकटच्या दुकटच्याला बहिष्काराची भीती असते. मोठा समुदाय झाला की त्यास भीती नाही. त्याचीच जात होते. मग बहिष्काराचे त्याला भय कसले?' असे सांगून नंतर या पत्रात त्यांनी धर्मसुधारणेची अनेक कलमे दिली आहेत; 'सर्वांनी ईश्वराचे भजन अंत:करणपूर्वक करावे, जे कर्म करणे ते स्वभाषेत अर्थ समजेल असे करावे, भजन, पूजन, संस्कार सर्व ज्याचे त्याचे भाषेत करावे. प्रत्येकास आपले विचाराप्रमाणे आचार करण्याची व बोलण्या-लिहिण्याची मोकळीक असावी. त्यास प्रतिबंध असू नये. स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मसंबंधी कामात व संसारात एकसारखे असावेत. म्हणजे जे रयतेच्या हिताचे फायदे आहेत ते सरकारशी भांडून घेत जावे, विद्यावृद्धीकरता सर्वांनी मेहनत करावी, शेवटचे कलम असे आहे की, सत्याने सर्वांशी चालावे.''

हा लोकहितवादीप्रणीत 'धर्म' पाहिला तर प्राचीन काळचा व्यासभीष्मश्रीकृष्णप्रणीत धर्म व हा धर्म यांत काही फरक नाही. असे आपल्या ध्यानात येईल. धर्म हा समाजाच्या हितासाठी आहे व तो बुद्धिप्रणीत असला पाहिजे हा आग्रह दोन्हीकडे सारखाच आहे. या धर्माचं स्वरूप अत्यंत व्यापक असे आहे. मानवी जीवनाचे कोणतेही अंग त्याच्या दृष्टीतून सुटलेले नाही. स्वभाषेचा, देशाचा अभिमान, स्त्रीपुरुषसमता, गुणनिष्ठ जातिभेद, रयतेचे सरकारहून श्रेष्ठत्व इ. अर्वाचीन काळातील राजकारण, समाजकारण या विषयांतील सर्व नवे विचार त्यात आले आहेत, हे पाहिल्यावर हिंदुलोकांचे या धर्मानेच कल्याण होईल, या लोकहितवादींच्या म्हणण्यात मुळीच अतिशयोक्ती नाही हे कोणालाही पटेल.

अज्ञान, दुरभिमान, शब्दप्रामाण्य, कर्मकांड, धर्माविषयी विपरीत कल्पना या हिंदुसमाजाच्या व्याधींचा विचार झाल्यावर लोकहितवादींनी त्यावर उपाय म्हणून या धर्माची स्थापना करण्याचा प्रयत्न आरंभिला होता. त्या धर्मात वर म्हटल्याप्रमाणे विद्योपासना, बुद्धिप्रामाण्य, राष्ट्राभिमान, समता, व्यक्तिस्वातंत्र्य या अर्वाचीन समाजरचनेच्या सर्वच मूलभूत तत्त्वांचा अंतर्भाव झालेला आहे. लोकहितवादींच्या बुद्धीचा व्याप केवढा मोठा होता, समाजाच्या उत्कर्षापकर्षाचा ते कसा सर्वांगीण विचार करीत असत. एकही समाजांग त्यांच्या दृष्टीतून कसे सुटले नव्हते. हे यावरून दिसून येईल. आज शंभर वर्षांनी ज्या ज्या सुधारणा आपल्या देशात व्हाव्या असे आपण म्हणतो, त्या सर्वांचे प्रतिपादन

लोकहितवादींनी केलेले आहे, आणि आपली प्रगती इतकी मंद आहे की अजून शंभर वर्षे तरी त्यांनी प्रतिपादलेली तत्त्वेच आपणास पुरत राहतील. असे असल्यामुळे त्यांनी सांगितलेली ही सुधारणेची तत्त्वे कोणती ते पाहणे अगत्याचे आहे.

**५. इंग्रजी विद्या :–** अज्ञान ही जर आपली पहिली व्याधी आहे तर विद्येची उपासना, ज्ञानासाठी तपश्चर्या हा त्यावर पहिला उपाय होय, हे ओघानेच आले; मात्र ज्या विद्येची उपासना, करावयाची ती विद्या म्हणजे लोकहितवादींच्या मते इंग्रजी विद्या होय. त्यांच्या मते त्या काळी जुन्या संस्कृत विद्येचा कसलाही उपयोग नव्हता. 'याप्रमाणे कोणतेही भागात जरी पाहिले तरी संस्कृत विद्या निरुपयोगी व नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न करणारी व संसारावरील चित्त उडवून आळशी करणारी व निरुपयोगी कर्मे करणारी आहे. सांप्रत काळी जे ज्ञान पाहिजे ते त्यात मुळीच नाही. सांप्रत काळचे देश, तेथील राज्ये व फौजा व व्यापार, इत्यादिकांची माहिती, यंत्राची उत्पत्ती, कायदेकानू कसे असावेत, गैरचाली कोणत्या आहेत, टाकाव्या कोणत्या, ठेवाव्या कोणत्या हे त्यांस माहीत नसते.' असे त्या विद्येविषयी त्यांनी आपले मत अनेक ठिकाणी सांगितले आहे. (पत्रे क्र. ७७, ८२, ८४) आणि आज इंग्रजी विद्याच आपल्याला सर्वतोपरी तारक होईल हे मत अत्यंत हिरीरीने मांडले आहे.

ते म्हणतात, 'आमचे काळी इंग्रजांसारखे शहाणे, पराक्रमी, ऐश्वर्यवान व विद्वान कोठे नाहीत व त्यांच्या विद्या हिंदूंस अश्रुत आहेत. याजकरिता सर्वांनी त्यातील ज्ञान घ्यावे व त्याचा धिक्कार करू नये. सांप्रत इंग्रजीत ज्या विद्या, भूभोल, खगोल, राज्यनीती, इत्यादिक आहेत, त्यांचा विचार करावा, म्हणजे तुम्हास फार संतोष होईल. असे केल्याशिवाय लोकांस कोणतेही कार्य नीट करता येणार नाही.' (पत्र क्र. ६९). लोकहितवादींचे हे मत पुढे सर्वमान्य झाले हे आपण पाहतोच आहोत. त्यांच्यावर प्रखर टीका करणारे विष्णुशास्त्री यांनी तर इंग्रजी विद्येस वाघिणीचे दूध म्हटले आहे आणि 'आमच्या देशाची स्थिती' या आपल्या निबंधाचा समारोप करताना 'ज्ञानसाधना' हा आपल्या देशाला एकच तरणोपाय आहे असे सांगितले आहे. अखिल भारतात पुढच्या पन्नाससाठ वर्षांत अत्यंत निष्ठेने सर्व प्रांतात लोकांनी सर्व मतभेद विसरून जर एकच कोणते कार्य केले असेल तर ते म्हणजे इंग्रजी विद्येच्या प्रसाराचे. शाळा, महाविद्यालये व वृत्तपत्रे ही साधनत्रयी त्यांनी या कार्यासाठी वापरली आणि भावी उत्कर्षाचा पाया घातला.

गेल्या शंभर वर्षांतले या देशातील सर्व क्षेत्रांतील थोर पुरुष, नेते, तत्त्ववेत्ते, राजकारणी, वक्ते, धर्मप्रवक्ते, इतिहासकार, गणिती, कवी, कादंबरीकार, कलाकार हे बहुतेक सर्व इंग्रजीविद्याविभूषित होते. त्यावाचून त्यांना या पदाला जाणे शक्यच नव्हते, ही एकच गोष्ट आपण ध्यानात घेतली तरी इंग्रजी विद्येचा इतक्या तळमळीने पुरस्कार केल्याबद्दल लोकहितवादींना आपण शतशः धन्यवाद देऊ. आणि त्यांच्या लेखनातील अत्युक्ती मनाला बोचू न देता तिचा भावार्थ समजून घेण्याचा प्रयत्न करू.

'इंग्रजी विद्या' या आपल्या पत्रात लोकहितवादी म्हणतात, 'आम्हास ठाऊक आहे की, एक इंग्रजीतील विद्वान् आणि शंभर संस्कृतमधील पंडित आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखेच कदाचित होणार नाहीत. ज्याने चार शास्त्रे अध्ययन केली आहेत त्यांचीदेखील योग्यता इंग्रजीतील पंडितांशी बरोबर नाही; कारण की, आधी संस्कृत भाषेत ग्रंथ किती आहेत! ग्रंथांच्या संख्येवरून विद्येची तुलना होते हा नेम आहे. इंग्रजीमध्ये कोटच्यवधी ग्रंथ आहेत. त्यात अनेक विद्या आहेत, तितक्या संस्कृतांत नाहीत. जसे हिंदू लोक व्यासांचे वेळी विद्याप्रविण होते तद्वत् इंग्रज आज आहेत. त्यांचे चित्त विद्येवर फार व ते ज्ञानी बहुत झाले.'

**६. ग्रंथमाहात्म्य :–** ग्रंथ लिहिणे ही लोकहितवादी विद्वत्तेची खरी कसोटी मानतात व ती अगदी योग्य आहे याविषयी दुमत होईल असे वाटत नाही. पाश्चात्त्य देशात एकेका ग्रंथाने समाजात क्रांती करून टाकली आहे व शंभर शंभर वर्षे लोकांवर आपली सत्ता चालविली आहे हे विद्वानांना ठाऊक आहेच. बेकन, गॅलिलिओ, देकार्त, कोपरनिकस, केप्लर यांना अर्वाचीन युरोपचे जनक म्हणतात. हे सर्व ग्रंथकार होते. लोकहितवादींना असलेच ग्रंथकार मनात अभिप्रेत आहेत. दीर्घ अवलोकन करून, संशोधन करून, जे या भौतिक सृष्टीचे ज्ञान प्राप्त करून घेतात व त्यावरून निघणारे सिद्धान्त निर्भयपणे जगापुढे मांडतात तेच खरे **ग्रंथकार** होत. 'छापण्याची कला' या पत्रात लोकहितवादी म्हणतात, 'वृत्तपत्रे म्हणजे बृहत्तर जिव्हा असे समजले पाहिजे. याचा उपयोग इंग्रज लोक जसा करतात तसा आपले लोक करून शहाणपणा वाढवितील तर फार चांगले होईल. आणि हा समय असा आहे की, आत आपले मनातील गोष्ट उघडपणे व निर्भयपणे सांगता व कळवता येते असे पूर्वी नव्हते.' (पत्र क्र. ७). असा निर्भय माणूसच ग्रंथकार होऊ शकतो. आज आपण व्यक्तिस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य या नावांनी याच

विचारांचा उद्घोष करतो. या नव्या सामर्थ्याची महती लोकहितवादींनी शंभर वर्षांपूर्वीच ओळखली हा त्यांचा विशेष. प्रत्येक इंगजी ग्रंथामध्ये त्यांना या सामर्थ्याची प्रतीती येत होती. म्हणून आपल्या लोकांनी ग्रंथ लिहावे असे त्यांनी सारखा उपदेश चालविला होता. आणि अनेक ग्रंथ रचून आपल्या उपदेशाला कृतीची भक्कम साथ दिली होती. इंग्रज विद्वानांचा गौरव करताना लोकहितवादी म्हणतात, 'त्यांची योग्यता अशी आहे की, त्यांस कोणताही विषय सांगा, त्या दिवशी तो ग्रंथ लिहू शकेल. कोणत्याही विषयावर बोलू शकेल. जे जे या पृथ्वीवर आणि आकाशात आहे ते सर्व त्यास ठाकठीक दिसते. आणि चंद्र फिरतो याचे त्यास आश्चर्य वाटत नाही. दगड वरती उडविला म्हणजे खाली पडतो याचेदेखील कारण त्यास माहीत आहे. तात्पर्य त्यास कोणत्याही विषयी आश्चर्य वाटत नाही.' हे शेवटचे वाक्य फारच मार्मिक आहे. पाश्चात्त्य व पौर्वात्य जगातला भेद लोकहितवादींनी या एका वाक्यात फार सुंदर रीतीने व्यक्त केला आहे. भारतीयांना सृष्टिघटनांचे ज्ञान मुळीच नव्हते. त्यामुळे त्यांना त्या घटना म्हणजे सर्व चमत्कार वाटत. ईश्वरी करणी वाटत, म्हणूनच त्यांना त्याचे आश्चर्य वाटे. या ज्ञानाच्या बळावरच त्यांनी आगगाडी, तारायंत्रे इ. शोध लावले होते. पण भारतीयांना त्या सर्व ईश्वरी करणी वाटत. चमत्कार वाटत. म्हणून ते ती यंत्रे पाहून आश्चर्यमूढ होऊन गेले होते. माणूस आश्चर्यमूढ झाला की तो हतबल झालाच म्हणून समजावे. लोकहितवादींच्या त्या वाक्यात एवढा अर्थ सामावलेला आहे. ग्रंथांचे महत्त्व त्यांना का वाटत होते, ते आता स्पष्ट होईल. ग्रंथ जसजसे निर्माण होतील, तसतसे आपण आश्चर्यमुक्त होऊ व म्हणूनच समर्थ होऊ.

**७. संस्कृतातले प्राचीन ग्रंथ :–** संस्कृत विद्येवर लोकहितवादींचा आक्षेप हाच होता की, तीत ग्रंथ नाहीत. त्यांच्या मते प्राचीन काळी, व्यासांच्या काळी या भूमीत असे ग्रंथ होत असत. " प्राचीन काळी म्हणजे तीन हजार वर्षांपूर्वी मोठे मोठे ऋषिवर्य विचारशील होते. त्यांनी रानात बसून ग्रंथ लिहिले. आकाशात नक्षत्रे पाहून त्यांचे नियम लक्षात आणले. रानातील औषधे शोधून त्यांचे गुण लक्षात आणले. आणि त्याविषयी शेकडो ग्रंथ लिहिले. या प्रकारे नाना प्रकारचे ग्रंथ पूर्वी नवीन बुद्धिबळाने उत्पन्न झाले. त्यानंतर या लोकांस पुढे अवदशेचा पाया येणार म्हणून अशी समजूत पडली की, पहिले ऋषी ज्यांनी हे ग्रंथ लिहिले ते सर्व देवअवतारच होते व त्यांनी केले तसे मनुष्य जातीच्याने होणार नाही. आपला धर्म इतकाच की, पूर्वीज्यांनी जे करून ठेविले तितके मात्र शिकावे.

त्याजवर काही नवीन कल्पना काढू नये. काढली तर देवाचा अपमान होतो व जे काय आहे ते त्यात आहे, अशी समजूत पडून लोक अगदी मूर्ख झाले.' (पत्र क्र. ८२).

**८. संशोधन संपले :–** संस्कृत विद्येला अवकळा येण्याचे लोकहितवादींच्या मते हे मुख्य कारण आहे. त्यामुळे आजच्या संस्कृत विद्येतील सर्व ज्ञान मृतावस्थेत आहे. पाच हजार वर्षांपूर्वीचे वैद्यकशास्त्र आज कसे चालणार ? त्यात नित्य संशोधन झाले पाहिजे तरच ती विद्या जिवंत राहील, पण शब्दप्रामाण्य असल्यामुळे संशोधन थांबले आणि सर्व विद्या साचलेल्या पाण्यासारख्या होऊन बसल्या. 'धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, ही सर्व प्राचीन काळी लिहिली गेली, आणि सांप्रत कालास फरक पडला आहे, त्यामुळे आज प्रत्यक्षात व शास्त्रात मेळ पडत नाही. प्रत्येक वेळी लोकस्थिती पाहून धर्मशास्त्रात परिवर्तन केले पाहिजे. पण असे न झाल्यामुळे आमचे धर्मशास्त्र व त्याचबरोबर इतर शास्त्रे अगदी निरुपयोगी झाली आहेत.' (पत्र क्र. ३०, ५९) आणि हे फक्त मोठ्या शास्त्रग्रंथांत झाले असे नाही तर सर्व जीवनातच हा प्रकार घडला. 'सर्व कसबी लोक, लोहार, सुतार, तांबट हे बापाच्या विद्येच्या पलीकडे जातच नाहीत. त्यामुळे त्यांची कारागिरीसुद्धा तीन हजार वर्षांपूर्वी जशी होती तशीच आज आहे. तीत अणुमात्र प्रगती झालेली दिसत नाही. नवीन कल्पना त्यांना सुचतच नाहीत. तांबट पूर्वी जसा तांब्या करीत होते तसाच आजही करतात. पोथी जशी पूर्वी लिहीत होते तशीच आता लिहितात. छापणे, यंत्रे करणे ही विद्या येथे आलीच नाही. नवीन गणित नाही, भूगोल नाही, नवीन कायदा नाही. फार काय ज्या वस्तऱ्याने आज हजामत करतात तो पाच हजार वर्षांपूर्वीचा आहे. काही अधिक कल्पना कोणी चालविली नाही. (पत्र क्र ८२). हे सांगून लोकहितवादी म्हरतात की, प्राचीन काळाविरुद्ध अशी टीका केली की त्यास अधर्म म्हणतात !

**९. भ्रांत संस्कृत विद्या :–** संस्कृतातल्या प्राचीन विद्या जुनाट, जीण झाल्या, त्यामुळे त्यांचा उपयोग नाही आणि आर्वाचीन काळात काल्पनिक भ्रांतिष्ट लिखाणाखेरीज तिच्यात दुसरे काही झालेच नाही. 'संस्कृतात इतिहास नाही. भारतात राज्ये किती होती, कोणाची होती, ती बुडाली केव्हा, कशामुळ बुडाली, मुसलमान केव्हा आले, पाश्चात्त्य केव्हा आले याविषयी संस्कृत पंडितांचे ज्ञान, नांगरहाक्याइतकेच असते. कलियुगास पाच हजार वर्षे होत आली असे सांगतात. तर त्याचा इतिहास कोठे आहे ? याचे उत्तर पंडित काय देणार ? दुसरे, संस्कृतात

भूगोल नाही. रूस कोठे आहे, अरबस्थान कोठे आहे, हिंदुस्थानचे क्षेत्रफळ काय, हे संस्कृत पंडित सांगू शकतील काय ? त्यांना एवढेच माहीत आहे की, मेरूपर्वत भूगोलच्या मध्ये आहे. तो लक्ष योजने उंच आहे. स्वर्गाची वाट हिमालयातून आहे. गंगा, यमुना या देवता आहेत. संस्कृतात यंत्रज्ञान तर मुळीच नाही. कोण्या पंडिताने कधी यंत्र केले आहे काय ? यंत्राची सुधारणा तरी केली आहे काय ? जे जाते व्यासांचे वेळेस होते तेच आत आहे. पंडितांनी कागद कधी केला आहे काय ? रामराज्यापासून ताडपत्रावर लिहितात तसेच अजून लिहितात.' संस्कृत विद्येची अशी स्थिती असल्यामुळे लोकहितवादी निक्षून सांगतात की, ' संस्कृतचा इतकाच उपयोग आहे की, लोकांमध्ये भ्रांती उत्पन्न व्हावी. जो जो मनुष्य त्यात प्रवीण होतो तो तो अज्ञानसमुद्रात तो खोल खोल जात असतो. (पत्र क्र. १०१). म्हणून ज्ञानप्राप्ती करून घ्यावयाची असेल तर इंग्रजी विद्येचाच आश्रय केला पाहिजे आणि त्या भाषेतल्याप्रमाणे मराठीत ग्रंथ लिहिले पाहिजेत. याच अर्थाने लोकहितवादींनी म्हटले आहे की, ' इंग्रजी विद्वान पूर्वी हिंदुस्थानात एक असता तर राज्य न जाते ? याचा भावार्थ हाच की ती विद्या येथे असती तर आम्ही इतिहास, भूगोल, गणित, रसायन, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांत प्रवीण झालो असतो आणि मग आम्ही पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारानंतर गेल्या शंभर वर्षांत जसे संघटित व समर्थ झालो, तसे आधीच झालो असतो व मग अर्थातच आपले राज्य गेले नसते. पण हे भट, कारकून, मूर्ख जमा झाले म्हणूनच राज्य बुडाले. जर विद्या पहिल्यासारखी असती तर हिंदू लोकांची अशी अवस्था न होती. परंतु ही जनावरे पाहिजे तेथे दोरीने बांधावी अशी गरीब, म्हणून असे झाले. पुढे जरी हिंदू लोकांचे कल्याण झाले, तर इंग्रजी पंडितांचे हातून होईल, यात संशय नाही. कारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे व इंग्रजी विद्या वृद्धिंगत झाली म्हणजे हिंदू लोकांना पूर्वस्थितीवर येण्यास उशीर लागणार नाही.' (पत्र क्र. ३१). लोकहितवादींची ही भविष्यवाणी आज अक्षरश: खरी ठरली आहे. गेल्या शंभर वर्षांत भारताचे यच्चयावत सर्व नेते, रानडे, विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, महात्मा गांधी, पंडित नेहरू हे, इंग्रजी पंडित - पाश्चात्त्यविद्याविभूषित - होते. शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, इतिहासतज्ज्ञ, अर्थवेत्ते, धर्मशास्त्रवेत्ते सर्व इंग्रजी पंडित होते. त्यांनी आपल्या रसनेने व लेखणीने या देशात राष्ट्रनिष्ठा, लोकसत्ता, विज्ञाननिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादी पाश्चात्त्य समाजरचनेची मूलतत्त्वे रुजविली. त्यामुळेच हा समाज संघटित होऊन स्वातंत्र्यप्राप्तीला समर्थ झाला.

# ३. जातिभेद

अज्ञान हा ज्याप्रमाणे हिंदू समाजाचा एक रोग आहे, त्याचप्रमाणे जातिभेद हा दुसरा तितकाच घातक व चिकट रोग होय हे लोकहितवादींनी जाणले होते. त्या विषयावरचे आपले विचारही तितक्याच निर्भयपणे त्यांनी शतपत्रांतून मांडले आहेत. फार प्राचीन काळापासून हिंदू समाजात चातुर्वर्ण्यव्यवस्था रूढ झालेली आहे. उत्तर काळात या चार वर्णांतूनच अनेक जाती, पोटजाती निर्माण झाल्या व त्या सर्व जन्मनिष्ठ व बेटीबंद अशा झाल्या. त्यामुळे या समाजाची शकले होऊन तो दुबळा झाला. समाज असे रूप त्याला राहिलेच नाही. लोकहितवादी म्हणतात की, 'यास उत्तम मार्ग हाच की, कर्मे करून जातीचा आणि वर्णाचा निश्चय करावा. ब्राह्मण असून नीच कर्म करील तर ब्राह्मण नव्हे. तसेच क्षत्रियाने ब्राह्मणकर्म केले तर तो ब्राह्मण व्हावा. असे केले नाही तर कित्येक अयोग्य लोक ब्राह्मणाचे नावाने मिरवतील आणि कित्येक वास्तविक ब्राह्मण शूद्राचे नावाने आच्छादित राहतील. आज जर कोणी राजाने नियम केला की, आजचे अधिकारी आहेत त्यांच्याकडे त्यांचे अधिकार वंशपरंपरा चालवावयाचे तर जोपर्यंत हे अधिकारी आहेत तोपर्यंत कामे ठीक चालतील. पण त्यांची मुले मूर्ख निघतील. कारण बापाप्रमाणे मुलगा निघतो असा निश्चय नाही. यास्तव ज्याचे त्याचे स्वयमेव गुण पाहून त्याची योजना करावी हा उत्तम पक्ष.' (पत्र क्र. २२).

**१. प्राचीन काळी वर्ण गुणनिष्ठ :–** लोकहितवादींच्या मते प्राचीन काळी अशीच व्यवस्था असली पाहिजे. शास्त्रात सर्व वर्ण कुळपरंपरा चालावे असे लिहिले आहे. जो ब्राह्मण त्याचा वंशही ब्राह्मणच. जो शूद्र त्याचा वंशही शूद्रच. असा नियम धर्मशास्त्रात आहे हे खरे, पण प्रत्यक्ष व्यवहारात असे घडत नसावे असे लोकहितवादी म्हणतात व आपल्या या अनुमानाला पुढीलप्रमाणे आधार देतात. 'वाल्मिकी हा प्रथम कोळी होता व नंतर ऋषी झाला. तो अर्थातच आपल्या पुण्यकर्मामुळे झाला. गाधिराजा प्रथम क्षत्रिय होता, पण तपश्चर्या करून तो ब्राह्मण झाला. पराशर ऋषीने शूद्र स्त्री केली. (मत्स्यगंधा. तिचाच मुलगा व्यास) हरिश्चंद्राने काशीस जाऊन महाराचे कर्म पत्करले. त्या काळी कित्येक राजे क्षत्रिय असता ब्राह्मण होत व कित्येक ब्राह्मण असता क्षत्रिय होत. पुराणात अशी वर्णने विपुल आहेत. तेव्हा त्या काळी गुणकर्मावरून वर्ण किंवा जाती ठरवाव्या अशीच चाल असेल. त्या काळचा इतिहास लिहिलेला नाही म्हणून पक्के सांगता येत नाही. पण विचार करून तशी चाल पुष्कळ होती, असे सिद्ध

होते. तेव्हा आपणही तोच मार्ग अनुसरावा हे हितावह होय.' (पत्र क्र. २२).

**२. इतर देशांत वर्ण गुणनिष्ठ :–** हिंदुस्थानात समाजात भेद आहेत तसे इतर देशांतही आहेत. प्रत्येक मुलखात चार वर्ण आहेतच. पंडित, शिपाई, सावकार आणि चाकर असे भेद सर्वत्र आहेत आणि त्यावाचून चालावयाचे नाही, पण इतर देशांत हे वर्ण वंशपरंपरा नाहीत. हिंदुस्थानात तसे आहेत, हेच आपल्या अध:पाताचे कारण होय. इतर मुलखात वाण्याचा मुलगा मूर्ख निघाला तर चाकरात जातो, पण हिंदुस्थानात त्यांची कुळे वेगळाली झाली आहेत. पण ही चाल अलीकडली असावी. पूर्वी नसावी. रावण ब्राह्मणाचा मुलगा, पण तो महादुष्ट होता म्हणून दैत्य झाला. याजवर कित्येक लोक म्हणतात, की ते मागले युगातले लोक. त्यांची उदाहरणे आता घ्यावयाची नाहीत. लोकहितवादींना हे मान्य नाही. कारण, 'वर्ण, व्यापार, जात हे मागल्या युगात होतेच. देवाचे अवतार झाले तरी ती मनुष्येच होती. प्रत्येक जीव देव नव्हता. सामान्य लोक तेव्हाही आतासारखेच होते. म्हणजे दुष्टही होते, सुष्टही होते. फरक इतकाच की तेव्हा ते विचार करीत असत व काही दोष दिसल्यास तो काढून टाकीत असत. आता विचार करीत नाहीत. बहुधा चालीवरून (रूढीवरून) चालतात.' (पत्र क्र. २२).

**३. तत्कालीन ब्राह्मण :–** जातिभेदाविषयीचे आपले विचार याप्रमाणे सांगून नंतर लोकहितवादींनी त्यांच्या काळच्या ब्राह्मण व क्षत्रिय या जातींच्या गुणांचा व कर्तृत्वाचा हिशेब घेतला आहे. त्यातही ब्राह्मण समाजाचे त्यांनी अंतर्मुख होऊन फार कठोरपणे परीक्षण केले आहे. तसे करताना ब्राह्मण समाजाचे अत्यंत घृणास्पद असे अनेक दोष दाखवून त्यांनी भट, भिक्षुक, शास्त्री, पंडित यांच्यावर फार प्रखर, अगदी मर्मभेदक अशी टीका केली आहे. त्यासाठी त्या वेळी त्यांच्यावर फार गहजब झाला आजही ही टीका अन्यायमूलक व द्वेषमूलक आहे, असे कोणी म्हणतात, पण अशा प्रखर टीकेवाचून या समाजाला जाग आली असे वाटत नाही. अज्ञान, अनाचार, हेकटपणा, दुराग्रह, अंधता, लाचारी यांमुळे त्या काळी नवविद्येला पारखा असलेला ब्राह्मण समाज अत्यंत अधोगामी झाला होता, आणि तरीही 'वर्णानां ब्राह्मणो गुरु: ।' ही त्याची अहंता कायम होती. काहीही ज्ञान नसताना आपण भूदेव, आपण सर्वज्ञ, हा त्याचा मूढ गर्व पाश्चात्त्य विद्याविभूषितांना अत्यंत संतापजनक वाटे. त्या संतापाचाच आविष्कार लोकहितवादींच्या शतपत्रांतून झाला आहे.

**४. अर्थशत्रू ब्राह्मण :–** लोकहितवादी यांचा ब्राह्मणांवर पहिला आक्षेप

हा की, हे ब्राह्मण पाठांतरालाच विद्या समजतात. वैदिक, शास्त्री, पंडित, दशग्रंथी ब्राह्मण कोणीही घ्या, त्यांचे भूषण काय तर त्यांनी अनेक ग्रंथ पाठ केले आहेत. लोकांत ज्ञानशून्यता झाली त्याचे हेच कारण आहे. ब्राह्मण लोक वेद पाठ करतात पण अर्थशत्रू असतात. ही सर्व तोंडाची मजुरी झाली. यात मनाचा उपयोग काहीच नाही. लोकहितवादी म्हणतात, 'सांप्रतचे ब्राह्मण विद्येविषयी केवळ जनावरे आहेत. त्यांस अर्थज्ञान नाही. त्यामुळे धर्मावरील भाव व आस्तिकबुद्धी भ्रष्ट झाली आणि वेद, शास्त्र, पुराणे ही मुलांचा परवचा किंवा लमाणांचे गाणे यांसारखी झाली. देवाचे प्रार्थनेस बसले म्हणजे जी मर्यादा, निष्ठा, मनाची तत्परता असावी ती नाही. कारण हे सर्व गुण ध्वनीपासून येत नाहीत. अर्थज्ञानापासून येतात. पण जे पाठ म्हणतात ते अर्थ जाणीत नाहीत. त्यासारखे मूर्ख व व्यर्थ आयुष्य घालविणारे पृथ्वीत थोडेच असतील. मागील युगात असे वेडे ब्राह्मण नव्हते. ते सार्थ म्हणत होते. सार्थ म्हणण्याची पद्धती ज्या दिवसापासून बुडाली, तोच दुर्भाग्याचा फेरा या लोकांस खचित आला.' (पत्र क्र. ३३) व्याकरण, ज्योतिष ही खरे म्हणजे शास्त्रे आहेत. ती नुसती पाठ करण्यात काय फायदा! वेद किंवा पुराणे यांच्या पठणात पुण्य तरी असेल, पण व्याकरणाचे पठण कशाला? पण शास्त्रीपंडित व्याकरणही पाठ करतात. बारा बारा वर्षं हे पाठांतर चालू असते. ही विद्या काही उपयोगी नाही. म्हणून लोकहितवादी म्हणतात की, 'मनुष्यास लाकडे तोडावयाचे कसब शिकविले तरी बरे. परंतु हे व्याकरण नको. ही केवळ मूर्ख होण्याची विद्या आहे. त्याचप्रमाणे मीमांसा, अलंकार या शास्त्रांची व्यवस्था आहे. (पत्र क्र. ८६). ज्यास अर्थ परिज्ञान नाही, जे नुसती अक्षरे वाचून पाठ म्हणतात, त्यांचे शब्द जशी जनावरांची ध्वनी तद्वत् आहेत. कारण जनावरांची व मनुष्यांची ध्वनी सारखीच आहे. मनुष्यामध्ये जास्ती इतकेच की ते जे ध्वनी करतात तिचा अर्थ समजतात व दुसऱ्यास कळवितात. हे मनुष्याचे लक्षण अलीकडील ब्राह्मणांत दिसत नाही.' (पत्र क्र. १७).

**५. पोटभरू विद्या :–** केवळ पाठांतराला ज्ञान समजणे ही एक गोष्ट झाली. दुसरी त्यापेक्षा खेदजनक गोष्ट अशी की ब्राह्मणांची सर्व विद्या पोटभरू झाली आहे. लोकांना अज्ञानात ठेवून त्या अज्ञानावर ब्राह्मणवर्ग जगत आहे. लोक आंधळे आहेत, त्यांस डोळे द्यावे, ज्ञान शिकवावे व सुखी होण्याचे मार्ग दाखवावे हे ब्राह्मण मनातदेखील आणीत नाहीत. (पत्र क्र. ९६). लोकहितवादी म्हणतात की, 'मी पंडितास प्रार्थना करून सांगतो की, लोकांचे हित तुमच्याने होणार नाही;

कारण त्यांचे हित तुमच्या वतनवृद्धीस विरुद्ध आहे. लोक जितके मूर्खपणात असतील व बायका जितक्या वेडया असतील तितके तुमचे पीक अधिक. तेव्हा लोकांचे हित तुमचेकडून होईल कसे ? लोक खरा धर्म करू लागले तर तुमची उपजीविका कशी चालेल ?' (पत्र क्र. १०७) 'कोणी गरीब, आंधळे यांना उद्योगास लावण्यास खर्च करू लागला, कोणी शाळा काढू लागला तर ब्राह्मण पंडित त्यास सांगतील की, अरे शाळा कशाला ? तेथे पैसा देऊन काय पुण्य आहे ? ब्राह्मणाचे मुखी घातले तर पुण्य आहे. पुस्तके कशाला ? यातील ज्ञान काय उपयोगी आहे ? ब्राह्मण बोलावून त्यास दाने करावी. केळीचे दान सुवर्णासहित केले म्हणजे पुत्र होतो. ब्राह्मणास भोजन दिले की राज्य चिरकाल टिकते. भट असे सांगतील तरच त्यांचे पोट भरेल.'

**६. ब्राह्मण माहात्म्य :–** 'आपली वृत्ती अशी अविच्छिन्न चालावी यासाठीच ब्राह्मणांनी आपले माहात्म्य अतोनात वाढवून ठेवले आहे. आणि दुर्दैव हे की, हिंदुधर्मातील सर्व जातींची त्यावर श्रद्धा आहे. पुराणात म्हटले आहे की, ब्राह्मणाच्या केवळ दर्शनाने अनंत पापे भस्म होतात. त्यांना वंदन करून पूजा केली की मोक्ष प्राप्त होतो. विप्रांच्या चरणांच्या धुळीने आधिव्याधी नष्ट होतात. सागरात जी जी तीर्थे आहेत ती सर्व ब्राह्मणांच्या उजव्या चरणात आहेत. हे सर्व वर्णन खरे मानून लोक ब्राह्मराच्या पायाचे तीर्थ पितात. प्राचीन राजे, प्रत्यक्ष श्रीकृष्ण, ब्राह्मणांची सेवा करीत असत, उष्टी काढीत असत, ही उदाहरणे पुराणात आहेतच. वास्तविक खरा धर्म म्हणजे मन शुद्ध पाहिजे. ईश्वर शरीरात पहात नाही, मनास पाहतो. परंतु हल्लीचे ब्राह्मण पैसा काढण्यासाठी हे सांगत नाहीत. फक्त आचार, जेणे करून पैसा मिळवावयाचा, तेच सांगतात. सर्व धर्म आता पैशावर आला आहे. पैसा दिला म्हणजे पाप जाते, प्रायश्चित्त होते, ईश्वर प्रसन्न होतो; असे ब्राह्मण सांगतात पण हे सांगणारे सर्व मूर्ख आहेत. याजवर भरंवसा ठेवू नये.' (पत्र क्र. ८८)

**७. ब्राह्मण इतरांसारखेच :–** लोकहितवादींना हे ब्राह्मणमाहात्म्य मुळीच मान्य नाही. इतर जातीत व ब्राह्मणात ते मुळीच फरक मानीत नाहीत. केव्हा केव्हा इतर जातीचे हीन समजले गेलेले लोकच त्यांच्या मते श्रेष्ठ होत. कारण ब्राह्मणांना विद्या नसून गर्व आहे, म्हणून ते सुधारण्याची आशा नाही. इतर अज्ञ असल्यामुळे सुधारणे तरी शक्य आहे. लोकहितवादी म्हणतात, 'भटांत व अतिशूद्रांत मला इतकेच अंतर दिसते की, एक बोलता राघू व एक न बोलता

राघू. परंतु ज्ञान एकच. ब्राह्मण वेद पाठ म्हणतात. पण अर्थज्ञतेविषयी उभयतांची योग्यता समान आहे. अतिशूद्र गरीब. ते आपला लहानपणा जाणतात पण भट मूर्ख असून ज्ञानी समजतात व गर्व करतात. हा त्यामध्ये दुर्गुण अधिक आहे.' (पत्र क्र. ७१). 'मला ब्राह्मणांचे व इतर लोकांमध्ये भिन्नपणा काहीच दिसत नाही. ब्राह्मण मरतात, जन्मतात व हातपाय त्यांस इतरांसारखेच असतात. मग इतरांपेक्षा त्यांमध्ये काय फरक आहे? व ब्राह्मणाला गर्व कशाकरता असावा? त्यांचा मुख्य गुण काय ती विद्या. तिचे तर त्यांचेमध्ये शून्य पडून काळे झाले आहे. आणि त्यांचा आचार तरी काय? कोणी जेवावयास किंवा वसंतपूजेस बोलाविले म्हणजे एका हातात तंबाखू व दुसरे हातात चुना आणि तोंडात वेदपठण. हे तरी उत्तम आहे काय? तेव्हा असे भ्रष्ट झाले ते ब्राह्मण म्हणावे किंवा त्यास दुसरे काही म्हणावे?' (पत्र क्र. २०) 'जसे इतर जातीचे सुतार, न्हावी, माळी तसेच हे मूर्ख राघूसारखे पढणारे वेदविक्रय करून पोट भरणारे व निर्लज्जपणे भीक श्रम काम न करता खाणारे आहेत. ब्राह्मणांस ब्रह्मदेवाने फुकट खाते, अशी सनद करून दिली आहे काय? बाजीरावाने ब्राह्मणांस पुष्कळ खावयास दिले, त्याचे ब्राह्मणांच्या आशीर्वादाचे काय झाले? अन्न मात्र वाया गेले. आणि नाश व्हावयाचा तो झालाच. तर ब्राह्मणाच्याने काही होणार नाही हे मला पक्के ठाऊक आहे.' (पत्र क्र. २१). 'इंग्रजी राज्य झाले हे एक ब्राह्मणांचे महत्त्व नाहीसे होण्यास मूळ झाले आहे यात शंका नाही. ब्राह्मणांनी बहुत वर्षेपर्यंत थोरपणा व अधिकार भोगला. परंतु तो काळ आता गेला. बरे झाले की लोक आता पाहू लागले.' (पत्र क्र. ७७) याप्रमाणे इतर जाती ब्राह्मणांच्या अधोगामी वर्चस्वातून आता सुटणार याचे लोकहितवादींना समाधान वाटत आहे.

**८. विपरीत, हीन धर्मबुद्धी :–** ब्राह्मणांची, शास्त्रीपंडितांची धर्मबुद्धी अत्यंत विपरीत होती. त्यांच्या धर्मात नीती, सत्य, सदाचार यांना कसलीच किंमत नव्हती. एखादा मनुष्य अत्यंत नीच असला, त्याने अत्यंत हीन व अमंगळ कृत्ये केली असली तरी, तो जर ब्राह्मणांना भरपूर दानधर्म करील, भोजने घालील तर ते ब्राह्मण त्याला धर्मावतार मानण्यास तयार! त्यांची एक-दोन उदाहरणे लोकहितवादींनी दिली आहेत. 'दुसरा बाजीराव पेशवा अत्यंत व्यभिचारी, अधम व अशुचि होता. कसलेही कर्तृत्व त्याचे ठायी नव्हते. पण त्याने पुण्यात ब्राह्मणांचे मनोरथाप्रमाणे दाने केली व बहुत शास्त्रीपंडितांना जवळ बाळगले. त्या वेळी हे पंडित निःस्पृह असते, त्यांना खऱ्या धर्माची चाड असती तर त्यांनी त्याला

परखडपणे सांगितले असते की, 'श्रीमंत, तुम्ही नीतिभ्रष्ट, धर्मभ्रष्ट आहात.' पण हे ब्राह्मण त्याची स्तुतीच करीत गेले. महाराज सर्वत्र विजयी होतील असा ते त्याला आशीर्वाद देत. 'आपण ब्राह्मण प्रभू, आपले तेज सर्वांहून अधिक.' असेच ते म्हणत. असा मूर्खपणा त्यांनी केला व शेवटी आपण व तो दोघेही भीक मागत गेले. यास्तव हे पंडित जरी पुष्कळ पढलेले असले तरी ते मूर्ख समजावे. कारण लोकहितकारक ज्ञान त्यांना नाही. त्यांचे ज्ञानापासून मोक्ष व्हावयाचा नाही व इहलोकीही सुखोत्पत्ती व्हावयाची नाही.' (पत्र क्र. ८६). 'बाजीरावाचा भाऊ अमृतराव पेशवा याच्या उदाहरणावरून हेच दिसते. त्याने पुणे शहर लुटले. मुले, बायादेखील ठार मारल्या व कित्येक बायांनी जीव दिले, पैशासाठी त्याने अनेकांना राखेचे तोबरे दिले, धुऱ्या दिल्या, तापल्या तव्यावर माणसांना उभे केले. तेल तापवून पोरांच्या डोक्यावर ओतले. अशा रीतीने अत्यंत हीन, भ्रष्ट, अधर्म्य मार्गांनी पैसा मिळवून तो काशीस गेला. त्या वेळी तेथील धर्मवेडच्या ब्राह्मणांनी त्याला काही शासन केले काय ? मुळीच नाही. त्यांनी प्रथम त्याला बहिष्कार घालण्याची धमकी दिली व मागाहून त्यास सांगितले की, तुम्ही जे द्रव्य आणले आहे त्यापैकी निम्मे ब्राह्मणांना धर्मादाय करावे. म्हणजे तुम्ही जातीत याल. त्याप्रमाणे त्याने अन्नछत्रे, ब्राह्मणभोजने, यज्ञयाग सर्व केले. लगेच ब्राह्मणांनी त्यास जातीत घेतले व ते त्याची स्तुती करू लागले. याच्या उलट उदाहरण एक बाबा भिडे यांचे आहे. हा गृहस्थ त्या वेळी प्रिन्सिपाल सदर अमीन या जागेवर होता. पण तो अत्यंत नि:स्पृह होता. लाच मुळीच खात नसे, पण तो ब्राह्मणभोजनेही घालीत नसे. तेव्हा ब्राह्मण त्याची निंदा करीत.' (पत्र क्र. ७५). ही ज्या ब्राह्मणांची धर्मबुद्धी त्यांच्यावर लोकहितवादींनी अगदी कटू अशी टीका केली तर त्यात वावगे काय झाले ?

**९. ब्राह्मणांचे नेतृत्व हे दुर्भाग्य :–** अशा या ब्राह्मणांकडे हिंदुसमाजाचे नेतृत्व शतकानुशतके होते, हे हिंदू लोकांचे परम दुर्भाग्य होय, असे लोकहितवादींना वाटते. 'लोक समजतात की, हे धर्मरक्षक आहेत. परंतु हे अधर्म वृद्धी करणारे होत. समाजाचे नेतृत्व करण्यास आवश्यक असा एकही गुण त्यांच्या अंगी नाही. एकास लाथ मारली तर दुसरा का म्हणावयाचा नाही. इतके हे भित्रे, रांडचे व निर्बल आहेत. यांच्यामध्ये साहस, धैर्य आणि खरेपणा प्रायश: नाहीत. गोड खाण्यास मिळाले की सर्व ब्राह्मण एकत्र डोंगळ्याप्रमाणे जमतात व मग त्यांचे अवधान फार लागते. पण राज्यकारभाराची किंवा ज्ञानवृद्धीची सभा असेल तर

हालणार नाहीत.' (पत्र क्र. ४८). 'आमचे लोकांत ब्राह्मण पुढारी झाले याजमुळे फार घात झाला. जर कुळंबी, क्षत्रिय पुढारी असते तर बरे झाले असते. कारण ब्राह्मणांच्या हातापायांत बिडच्या आहेत. ते परदेशात जाणार नाहीत, परभाषा शिकून ज्ञान मिळवणार नाहीत. असे ब्राह्मण लोक प्रतिबंधात पडले व त्यांच्यामुळे इतर जातींचे लोक सर्व प्रतिबंधात पडून आंधळे झाले, हे मोठे वाईट झाले.' (पत्र क्र. ९६).

लोकहितवादींनी स्वकालीन ब्राह्मणांवर जी कठोर टीका केली ती त्यांच्या अज्ञान, विपरीत ज्ञान, अहंता, लोक, लाचारी या अवगुणांबद्दल होती आणि ती प्राधान्याने भट, भिक्षुक, शास्त्रीपंडित, वैदिक यांच्यावर होती, पण त्यात जातिद्वेषाचा अंशही नव्हता. कारण गुणसंपन्न, विद्वान ब्राह्मणांबद्दल त्यांनी अनेक ठिकाणी आदर व्यक्त केला आहे. प्रशंसोद्‌गार काढले आहेत. ते म्हणतात, 'ब्राह्मणांचा स्वधर्म असा की आपली सद्‌वर्तणूक आणि पवित्रपणा बाळगून विचार करीत अरण्यात स्वस्थ बसावे. म्हणजे तेच ऋषी व मुनी होत, व असे त्यांचे कर्म पवित्र व वागणूक निर्दोष म्हणून राजे त्या ब्राह्मणांस थरथर कापत होते व सर्व लोक त्यांचे भय बाळगीत होते. ते ब्राह्मण आपल्या सत्कर्मेकरून सर्वांस सुशिक्षा लावीत होते व धर्मसुधारणेचा व लोकहिताचा विचार करीत होते. पण त्या प्रकारचा एक तरी ब्राह्मण काशीपासून रामेश्वरापर्यंत आता आहे काय?' (पत्र क्र. २२). याच पत्रात प्रसिद्ध रामशास्त्री प्रभुणे यांचे उदाहरण देऊन ते म्हणतात, 'पेशवाईत एकच ब्राह्मण होता आणि तो जोपर्यंत होता तोपर्यंत राज्य कृतयुगाप्रमाणे चालले. त्या ब्राह्मणाचे नाव रामशास्त्री. आपले अकलेस आले ते श्रीमंतांसही सांगण्यास त्याने भीड धरली नाही. तोच धन्य!' इतरही अनेक पत्रांत प्राचीन कालच्या ब्राह्मणांविषयी त्यांनी असाच आदर प्रकट केला आहे व पुढील ब्राह्मणांवर टीका केली आहे. 'प्राचीन काळी हिंदू लोकांनी विद्या बहुत केल्या. पुढे ब्राह्मण लोकांनी नवीन विद्या करण्याचे सोडून दिले व वेदपाठ करू लागले. त्यांनी अर्थ सोडून दिला आणि धर्मशास्त्रात असे आहे की, आपला कुलाचार रक्षावा. त्याप्रमाणे जे बापाने केले तेच मुलाने करावे अशी समजूत पडली आणि जो जो हे मूर्ख होत चालले तो तो मागले लोक त्यांस देवासारखे दिसू लागले.' (पत्र क्र. ६१). त्यांच्या मते साधारण शंकराचार्यांच्या काळापर्यंत म्हणजे इसवी सनाच्या सातव्या आठव्या शतकापर्यंत ब्राह्मण खऱ्या विद्येची आराधना करीत, तप करीत. म्हणून त्यांना नेतृत्व करण्याचे सामर्थ्य होते. पुढे विद्योपासना संपली व त्यामुळे त्यांचा व त्यांच्याबरोबर समाजाचाही अध:पात झाला.

**१०. जसे ब्राह्मण तसे सरदार :–** लोकहितवादींनी ब्राह्मण, शास्त्रीपंडित, भटभिक्षुक यांवर टीका केली तशी सरदार, राजे लोकांच्यावरही शतपत्रांतून प्रखर टीका केली आहे. शास्त्रीपंडितांना विद्येची आवड नव्हती आणि सरदारांना होती असे मुळीच नाही. त्यांना लोकहिताची चिंता नव्हती आणि त्यांना होती असेही नाही. स्वार्थ, लाचारी ब्राह्मणांना सुटली नव्हती तशीच त्यांनाही सुटली नव्हती. त्यामुळे समाजाचे नेतृत्व करण्यास ते तितकेच नालायक होते. लोकहितवादी म्हणतात, 'आमचे राजे किती मूर्ख असतात ते बाजीराव पेशवा, सातारचा राजा व दौलतराव शिंदे यांची उदाहरणे घ्या म्हणजे समजेल. सातारचा राजा एखादे चित्र सजवून न्यावे तसा रेसिडेंटाकडे जातो. काही न्यायकारभार करीत नाही. बसला असता तेथून लोकांनी हात धरून उचलले पाहिजे ही त्याची शक्ती! राज्यात खबर काय आहे त्यास ठाऊक नाही. रयतेकरवी विद्या करविणे ठाऊक नाही. किती एक सरदार इतके मूर्ख आहेत की, ते साहेबलोकांना म्हणतात, तुम्ही देवांप्रमाणे आम्हांस आहां. तुम्ही जे कराल ते होईल.' (पत्र क्र. ७८). 'पुण्यात लायब्ररी केली पण ग्रंथ वाचावयास सरदार लोक येत नाहीत. त्याविषयी मला असे वाटते की, आम्ही थोर, चार शिपाई, घोडे, अबदागीर, बरोबर घेतल्यावाचून कधी बाहेर पडत नाही. तेव्हा या लायब्ररीतून मुलासारखे शिकावयास जावयाची त्यांस लज्जा वाटत असेल. अज्ञानामुळे व अनश्रुतपणामुळे त्यांची अशी अवस्था झाली. तत्रापि तिचा परिहारोपाय ते ग्रहण करीत नाहीत, हे आश्चर्य आहे.' (पत्र क्र. ३). 'पन्नास कुळंबी गावातील नांगर धरून मेहनत करतात आणि एक जहागीरदार किंवा इनामदार त्यांस फक्त कोंडा ठेवून त्यांचे दाणे घेतो व आपण रेशीमकाठी धोतरे नेसतो व कामकाज काही करीत नाही. एका राजाचे पोर क्षयी असते, परंतु त्याचे सर्व लोक आर्जव करतात आणि त्यास सर्व दौलत देतात व आपण उपाशी मरतात. बरे, त्याने स्वत: काही काम केले आहे काय ? नाही! तत्रापि लोक आंधळ्यासारखे त्यास बलिष्ठ मानतात!'

## ४. स्त्रीजीवन

जातिभेद, चातुर्वर्ण्य, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व या सर्वांच्या बुडाशी जी जन्मनिष्ठ उच्चनीचता असते ती समाजाला जशी अत्यंत घातक असते तशीच स्त्रीपुरुषातील विषमताही असते. स्त्रीला समाजात पुरुषासारखी प्रतिष्ठा प्राप्त झाल्यावाचून तिच्या जीवनाचा विकास होणे शक्य नाही आणि तो समाजही तुलनेने पंगूच राहणार. हे जाणूनच लोकहितवादींनी स्त्रीपुरुष समतेचा सर्व वर्णांच्या व जातींच्या समतेइतकाच आग्रह धरलेला दिसतो. स्त्रीकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अतिशय

सहानुभूतीची, उदार व आजही अद्ययावत वाटावी अशी आहे, हे शतपत्रे वाचीत असताना पदोपदी प्रत्ययास येत असते.

**१. स्त्रीची प्रतिष्ठा :–** 'ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत, त्या देशात लोकांची स्थिती वाईट असते.' असे आपले मत लोकहितवादींनी स्पष्टपणे सांगितले आहे. ते म्हणतात. 'सांप्रत हिंदुलोकांत फारच मूर्खपणा आहे. यास्तव स्त्रियांची दुर्दशा फार आहे. प्राचीन काळी असे नव्हते. मागील काळचे कथेवरून पाहता असे दिसते की, पूर्वी हिंदू लोकांत स्त्रियांचा मान फार होता. पुण्याहवाचन वगैरे धर्मसंबंधी काही एक कर्म स्त्री बरोबर असल्यावाचून होत नाही. राज्याभिषेकातही राणीस फार मान असे. यावरून स्त्रियांचा प्रमुखपणा मानला आहे असे दिसते. पुढे मुसलमानांच्या अनुकरणाने त्यांच्या रानटी चाली हिंदू लोकांस लागल्या. धर्मातही त्यांचे अनुकरण होऊ लागले. हिंदू लोक ताबूत करू लागले, फकीर होऊ लागले, धर्मभ्रष्ट झाले. त्यामुळे हिंदू लोक स्त्रियांचा अपमान करून त्यांस जनावराप्रमाणे मानू लागले. पूर्वी रामाबरोबर सीता सभेत बसत होती. पांडव द्रौपदीसह बसत होते. पण लोकांची मने आता इतकी बिघडली आहेत की, जर त्यांस हे सांगितले तर ते देव होते, असा जबाब देतात. परंतु असे लक्षात आणीत नाहीत की ती माणसेच होती.' (पत्र क्र. ३०).

**२. सध्याचा दृष्टिकोन :–** 'अशा वृत्तीमुळे सांप्रत काळी ब्राह्मण लोकांत स्त्रियांचे हाल व विपत्ती बहुत होतात. कन्या झाली म्हरजे लोक नाक मुरडतात. त्यांना वाटते की माझे घरात ही अवदसाच शिरली.' (पत्र क्र. १५). 'हे हाल व विपत्ती, ही जनावरासारखी अवस्था, ही ज्ञानशून्यता व पुरुषांची क्रूरता प्राचीन शास्त्राधारे बहुत दिवस चालली. पण आता तरी हा ईश्वरी क्षोभ जावो व जसे पुरुष तशा स्त्रिया आहेत, असे आंधळ्या हिंदू लोकांस समजो. ही माझी अतिशय तीव्र इच्छा आहे; तर जे सुधारक हिंदू असतील त्यांनी या कामास निर्भयपणे प्रारंभ करावा.' (पत्र क्र. १६).

स्त्रियांच्या सुधारणेविषयीची आपली तळमळ लोकहितवादींनी याप्रमाणे अनेक पत्रांत व्यक्त केली आहे आणि त्याप्रमाणे त्यांच्या दु:स्थितीच्या कारणांनी, हीन दुष्ट रूढीची चर्चा करून त्यावर उपाययोजनाही सांगितली आहे. सतीची चाल, बालविवाहपद्धती, विधवाविवाहाची बंदी आणि स्त्रीला अज्ञानात ठेवण्याची प्रथा या सर्व रूढींवर व त्यांना आधारभूत असलेल्या शस्त्रांवर लोकहितवादींनी अतिशय कडक टीका केली आहे. ही पत्रे लिहीत असताना स्वत:च्या

कन्येविषयीच्या वात्सल्याने उमाळा येऊन लिहावे तसं लोकहितवादींनी लिहिले आहे.

**३. बालविवाह :–** बालविवाहाच्या चालीने आपल्या समाजाचे सर्व कर्तृत्व मारले गेले आहे व आपला अनेक प्रकारे नाश झाला आहे असे लोकहितवादींचे निश्चित मत झाले होते. शतपत्रांतून त्यांनी ते अनेक ठिकाणी मांडले आहे. 'लोक डोळेझाक करून आपल्या पोरांची व पोरींची त्वरित लग्ने करतात. येणेकरून दोघांचे दु:ख वाढते. बापास लहानपणी पोरे व सुना चांगल्या दिसतात परंतु त्याचे पाठीमागे त्यांचे हाल कुत्रा खात नाही. याचा विचार लोक करीत नाहीत व लग्नाची घाई करतात. येणे करून लोक अल्पजीवी, पराक्रमहीन व मूर्ख झाले आहेत. पंधरावीस वर्षांचा मुलगा झाला नाही तोच लोक म्हणतात की, लग्न का झाले नाही ? आणि मग आईबापांचा अगदी प्राण जाऊ लागतो. या मूर्खपणास काय म्हणावे ?' (पत्र क्र. ५३). लोकहितवादी म्हणतात की, आईबापांनी मुलांना शहाणे करण्याची फक्त जबाबदारी घ्यावी. पुढे त्यांचे लग्न ती स्वसामर्थ्याने करतील. त्याची काळजी आईबापांनी करू नये. परंतु रोजगारधंदा नाही, शहाणपण नाही व पुढे कसा निघतो याचा अंकूर नाही, तोच त्याचे गळ्यात मुलगी बांधून जोखिमात घालावा व त्याची विद्या, आयुष्य सर्व बुडवावे यात काय लाभ होतो ? लग्न बापाने केले म्हणजे त्यात काय मोक्षसाधन आहे ? ज्याचा तो आपले पराक्रमाने करील तर फार चांगले.' (पत्र क्र. २) लग्ने आपण करावी असा त्याहीपेक्षा क्रांतिकारक विचार त्यांनी मांडला आहे आणि तोही आगरकरांच्या आधी पन्नास वर्षे. 'लग्नाविषयी विचार' या पत्रात ते म्हणतात, 'मुलीचे लहानपण विद्या शिकविण्यात घालावे व पुढे सरासरी वीस वर्षांचे आत तिला कळू लागले म्हणजे तिचे व आईबापांचे संमतीने लग्न करावे. येणेकरून बहुत फायदे होतील.' यापुढे बालावृद्धविवाहाचा निषेध करून ते विचारतात, 'जर स्त्रियांना स्वसत्तेत लग्न करून दिले तर, अशा प्रेतरूप पुरुषास त्या वरतील काय ? तेव्हा या चालीचे फार वाईट वाटले होते. जे विद्या करण्याचे वय ते सासऱ्यास राहण्यात व हाल सोसण्यात जाते व लवकरच लग्नाचा संबंध झाल्यामुळे कोणतेही प्रकारे सुखावह होत नाही.' (पत्र क्र. १५)

विवाहाचे स्वातंत्र्य फक्त पुरुषांनाच असावे असे नाही, तर लोकहितवादींच्या मते ते स्त्रियांनाही असावे. आज आपण स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाची भाषा बोलतो. प्रत्येक व्यक्ती ही स्वतंत्र स्वयंपूर्ण आहे, दुसऱ्या कोणाच्या सुखाच्या अपेक्षेने तिने जगावे असे नसून तिचे व्यक्तित्व हे अंतिम

मूल्य आहे, हे मत आज सर्वमान्य झाले आहे. लोकहितवादींनी आजचे शब्द, आजची भाषा वापरली नसली तरी त्यांचा आशय तोच आहे, हे वरील पत्रांवरून व पुढे दिलेल्या अनेक उताऱ्यांवरून ध्यानात येईल.

४. **विधवाविवाह :–** स्त्रियांच्या पुनर्विवाहासंबंधी लिहिताना लोकहितवादी अंतर्बाह्य संतप्त झालेले दिसतात. स्त्रियांवरील घोर अन्याय पाहून त्यांचे काळीज तिळतिळ तुटते व तो घोर अन्याय करणाऱ्या शास्त्रकारांना, ब्राह्मणांना कोणतीही शिक्षा केली तरी ती अपुरीच आहे असे त्यांना वाटते. ते म्हणतात, 'सांप्रत आपले लोकांमध्ये हा केवढा अनर्थ आहे की, स्त्रियांस पती वारल्यानंतर पुनरपि लग्ने करू देत नाहीत! ईश्वराने स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत; असे असता पुरुषांस पुन्हा विवाहाची आज्ञा, स्त्रियांस मात्र मनाई, हा केवढा जुलूम आहे ?' जे शास्त्री, दशग्रंथी ब्राह्मण विधवाविवाहास विरोध करतात ते विद्वान कशाचे ?' जे गृहस्थ आपल्या कन्यांच्या पुनर्विवाहास संमती देत नाहीत त्यांना लोकहितवादी मांग, खाटीक, कन्यांचे वध करणारे अशा शब्दांनी संबोधितात. त्यांच्या मते हे कलियुगातील राक्षसच होत. त्यांना माणसे खाणारेच समजावे. 'जेव्हा पूर्वी हिंदू लोक भोळसर होते व पंडितांचे ऐकणारे होते, तेव्हा त्यांनी विधवांनी सती जावे म्हणून सांगितले व तेच लोकांनी कबूल करून आपल्या सुना, मुली, बहिणी जिवंत जाळल्या. हे राक्षस नव्हेत तर काय ?' (पत्र क्र. १०२)

**५. अनाथ विधवा :–** 'ब्राह्मण लोकांत लग्नाची घाई फार करतात. त्यामुळे कित्येक मुलामुलींची लग्ने आठव्या वर्षाच्या आतच होतात. आणि पुढे दोनचार वर्षांत विपरीत गोष्ट घडून भर्ता निधन पावतो. त्या काळी वास्तविक पाहिले तर त्या मुलीस आपली जाती किंवा नाते कळत नाही. केवळ बाला, अज्ञान आणि परस्वाधीन अशी अवस्था तिची असते. परंतु पुनरपि तिचा विवाह करीत नाहीत. आणि मायबाप आपले मन क्रूर, निर्दय करून तिची विपत्ती पाहतात. ती विपत्ती एक पर्यायाची नाही. परंतु अनेक पर्याय त्यात असतात.' (पत्र क्र. ९९). 'सासू-सासरे म्हणतात ही करंटी अवदसा नवऱ्यास मारून आम्हास तोंड कशास दाखविते ?' माहेरी भाऊ-बहिणी म्हणतात, 'आमचे घरी तुझे काय आहे ? इथे कशास येतेस ?' बरे, रस्त्यात फिरले तर लोक म्हणतात, 'बोडकी पुढे आली, पाऊल कसे टाकावे ? बरे, कोणाचा आश्रय करावा तर तेथे टीका होते की, रंडकी मुंडकीस तूप-दही कशास हवे ? गादी निजावयास कशाला हवी ? तेव्हा तिला बैराग्यासारखे संसारात राहून दिवस काढावे लागतात.

याप्रमाणे खाटकाचे घरी मेंढराचीही दुर्दशा होत नाही. तो त्यास एक वेळ सुरी लावतो त्या वेळेस मात्र काय दुःख होत असेल तेवढेच!' (पत्र क्र. ९०)

**६. वपन :–** ही एवढीच आपत्ती नाही. याच्या भरीला वपन ही घोर आपत्ती आहे. ती मनात येताच लोकहितवादींचा तर तोल अगदी सुटतो. ते म्हणतात, 'प्रत्येक ब्राह्मणाच्या घरात विधवा नाही असे नाही. आणि कित्येकांच्या कन्या अशा लहानपणी विधवा झालेल्या की त्यास नवरा म्हणजे काय ते ठाऊकदेखील नाही. आणि त्यांचे पुन्हा लग्न नाही; हा केवढा जुलूम आहे! यामुळे किती पोरी व्यभिचारी बनतात, पोरे मारतात! हजारे जीव मरतात आणि दुःखी होतात. म्हणून मुलगी विधवा झाली की तिला विद्रूप करून टाकावयाची. जरी तारुण्य व लावण्य असेल तरी बळेच वेडेविदरे स्वरूप करून बसतात आणि शास्त्रीपंडित म्हणतात की, त्या बाईने पूर्वजन्मी वाईट तपश्चर्या केली म्हणून हे फळ प्राप्त झाले. ईश्वराने उन्हात उभी केली. हे पूर्वजन्माचे दुष्कृत्याचे फळ. म्हणून आता व्रते करा आणि आमचे पोट जाळा. म्हणजे सुकृत होऊन सात जन्म वैधव्य प्राप्त होणार नाही. असे म्हणून गरीब व भोळे जिवास फसवितात.' (पत्र क्र. १०४).

**७. मनू जर ईश्वर असता :–** विधवाविवाहाच्या निषेधाचे समर्थन करताना शास्त्रीपंडित म्हणतात, की असे शास्त्र आहे व मनूने असे स्मृतीत लिहिले आहे. त्यावर लोकहितवादी विचारतात की, 'मनू हा जर ईश्वरांश होता तर त्याने अशीही सत्ता पृथ्वीवर का प्रकट केली नाही की जर आपण शास्त्र केले तर असेही करू की कोणे एकेही ब्राह्मण स्त्रीचा नवरा मरणार नाही. प्रथम स्त्री मरावी, नंतर नवरा मरावा. असा क्रम जर पृथ्वीवर घातला असता तर मी म्हटले असते की, मनू हा ईश्वर होता व ब्राह्मण हे ठीक करतात. पण स्त्रियांवरील या आपत्तीचा बंदोबस्त मनूच्याने होत नाही तर त्याचे शास्त्र फिरविण्यास काय चिंता आहे?' (पत्र क्र. १५). मनूप्रमाणेच लोकहितवादींनी शंकराचार्यांचीही याच पत्रात संभावना केली आहे. 'वंशवृद्धी व्हावयाची तिचा नाश व किती एक जिवांस दुःख, याचे कारण कोणाचे लक्षात न येऊन शंकराचार्यांस मोठे धर्माचे अध्यक्ष म्हणवितात.'

**८. धर्मपरिवर्तन अवश्य :–** भावार्थ असा की ज्यांना स्त्रियांच्या आपत्तीचा विचार करावयाचा आहे, त्यांनी शास्त्राची गुलामगिरी प्रथम नष्ट केली पाहिजे व आपल्या बुद्धीने विचार केला पाहिजे. 'पुनर्विवाहाची चाल पाडणे हे शास्त्राविरुद्ध म्हणतात. परंतु लोकांचे हिताकरिता करावे, हेच माझे म्हणणे आहे.

चांगली व्यवस्था होईल तो नियम करावा. जे पूर्वी शास्त्र लिहिले तेच सर्व काळ चालले पाहिजे असे म्हणणे हा मूर्खपणा आहे. जसे पूर्वीचे वैद्यक होते; परंतु त्यात आता जी सुधारणा झाली असेल ती घेतली पाहिजे. तसेच ज्योतिष, तसेच धर्मशास्त्र यात फेरफार केले पाहिजेत व त्यातील नियम सुधारले पाहिजेत. जे सुखास आडवे येईल ते दूर करावे. लग्नाचा नियम हा धर्म नव्हे, ही रीत आहे. लोकांमध्ये व्यवस्था होण्याकरिता ती केली. ती जर वाईट असेल तर दुसरे नियम करण्यास चिंता नाही. ज्या काळी ऋषींनी लिहिले त्या काळी त्यांचे सर्व नियम लोकांचे सुखवृद्धीकरता व व्यवस्थेकरता लिहिले. त्यांनी लोकांचे घात व्हावे, असे जाणून लिहिले नाही. परंतु पुनर्विवाहाचा दुष्ट परिणाम सर्वांस समजला आहे तरी अंधपरंपरेस सर्व भितात इतकेच. यास्तव जितकी त्वरा होईल तितकी अशा समयी करावी, कारण एक घटका उशीर झाला तर हजारे स्त्रियांस समुद्रात लोटून दिल्याचे पातक डोकीवर बसते.'

**९. सुधारणेसाठी कटाव करावा :–** विधवांच्या पुनर्विवाहाची प्रथा रूढ करण्यास उपाय सांगताना लोकहितवादी सांगतात की, 'या कामी एकट्यादुकट्याने खर्ची पडू नये. या सुधारणेला संमती देणाऱ्या लोकांचा एक गट करावा म्हणजे ही गोष्ट सुलभ होईल. त्यांच्या मते असे होते की, प्रथम सभा घेतली तर चारपाचशे संमती सहज पडतील आणि इतके लोक एकत्र आल्यावर त्यास प्रतिबंध करणार कोण ? येऊन जाऊन शास्त्रीपंडितांच्या बहिष्काराचे भय. पण हजार दोन हजार लोक एकत्र झाले की ती एक प्रजाच होईल. एवढ्यांना जातीबाहेर टाकले तरी काय चिंता आहे ? ब्राह्मणांनी इंग्रजांना जातीबाहेर ठेवले तर त्यांचे काय कमी झाले ? ' यावरून लोकहितवादी म्हणतात की, 'सुधारणा सामुदायिकरीत्या केली की शास्त्रीपंडितांच्या बहिष्काराचे भय नाही आणि अशा रीतीने, धिटाईने एका मोठ्या गटाने पायंडा पाडला की ज्या हिंदू गृहस्थाला सुधारणा करण्याची इच्छा होईल तो त्यांच्यात येईल आणि मग हळूहळू सर्व हिंदू लोक पुन्हा एकत्र येतील.' (पत्र क्र. १६). पुढे 'पुनर्विवाह' या पत्रात ब्राह्मणांनी एक कटाव करावा असे लोकहितवादींनी म्हटले आहे. त्याचा अर्थ हाच. 'परंतु मला असे वाटते की, सर्व ब्राह्मण जातीने निश्चय करून पुनर्विवाह चालू करण्याचा शिरस्ता घालावा व पंडितांचे ऐकू नये. दोन-चारशे लोकांनी असा एक कटाव केला म्हणजे पंडित उगीच राहतील किंवा सामील होतील. परंतु त्यांच्याने द्वेष होणार नाही व काही उपद्रव होणार नाही. पंडितांस सामर्थ्यहीन करण्यास एक कटाव मात्र पाहिजे.' (पत्र क्र. ९९). चाळीस वर्षांनी टिळकांनी सुधारणा करण्यास

'मंडळ स्थापणे' हाच उपाय सांगितला व तो अंमलात आणण्याचा काहीसा प्रयत्नही केला.

**१०. स्त्रीशिक्षण हा उपाय :–** स्त्रियांवरील आपत्तीचे निवारण करण्यासाठी रूढींच्या जाचातून त्यांची मुक्तता करण्यासाठी पुरुषांच्या दयाबुद्धीला आवाहन, शास्त्रीपंडितांनीची निर्भर्त्सना, सुधारकांचे मंडळ स्थापणे, इत्यादी उपाय लोकहितवादींनी सांगितले, पण त्यांच्या मते खरा उपाय म्हणजे शिक्षण देऊन स्त्रियांना शहाण्या करणे हा होय. हा उपाय जितका प्रभावी होईल तितका दुसरा कोणताच होणार नाही. ते म्हणतात, 'नवरा मरणे ही प्रारब्धाची गोष्ट आहे. व तत्संबंधी जुलूम फक्त हिंदू लोकांच्या अज्ञानी व गरीब बायकांनीच सोसला आहे. जेव्हा या स्त्रिया विद्वान होतील तेव्हा या पंडितास चरणसंपुष्टांनी पूजा अर्पण करतील यात संशय नाही. परंतु याच कारणास्तव ब्राह्मण लोक स्त्रियांस शहाण्या करण्यास असे प्रतिकूल आहेत. जुलमाने शास्त्र जेथे चालू आहे तेथे जरूरच आहे की, बायका जनावरांप्रमाणे नीच अवस्थेत राखल्या पाहिजेत. स्त्रिया सुशिक्षित होतील तेव्हा आपला अधिकार स्थापतील आणि संसारसुखास हानी करणारे पंडितांपासून असा तहनामाच करून घेतील. परंतु सांप्रत बायका अगदी जनावरे पडल्या म्हणून पंडितांस संधी सापडली आहे.' (पत्र क्र. १०५) दुसऱ्या एका पत्रात आपद्ग्रस्त स्त्रियांच्या आप्तजनांस आवाहन करून ते म्हणतात, 'तुम्ही शहाणे, विचार करणारे असून एवढा तुमच्या घरातील अनर्थ तुमच्याने दूर कसा होत नाही. तुम्ही आपल्या स्त्रिया व कन्या मूर्खपणाचे अवस्थेत जन्मापासून बाळगल्या आहेत. म्हणूनच हा जुलूम त्यांजवर चालतो व त्या सोसतात. जर त्यास थोडे ज्ञान असते, तर त्यांनी त्याचा विचार काढून जे पुनर्विवाह करू नये म्हणतात त्यांचे श्रीमुखात दिली असती, यात शंका नाही. परंतु अज्ञान व भोळसटपणामुळेच सर्वत्र जुलूम चालतो असा नेम आहे. त्याचप्रमाणे हे झाले आहेत. जर आपल्या देशात दहा स्त्रिया विद्वान असल्या आणि त्या जर विधवा झाल्या असत्या तर त्यांनी आपला पुनर्विवाह करण्याचे ठरविले असते. आणि दुष्ट ब्राम्हणांचे तंत्रात त्या कधी राहिल्या नसत्या, यात संशय नाही.' (पत्र क्र. १०)

या पत्रातील 'अज्ञान व भोळसटपणामुळे सर्वत्र जुलूम चालतो असा नेम आहे.' हे वाक्य रत्नाच्या मोलाचे आहे. भारताच्या गेल्या हजार वर्षांच्या इतिहासाचे हे सूत्र आहे. येथे अस्पृश्यांवर, शूद्रांवर, स्त्रियांवर जुलूम झाला त्याला कारण हेच अज्ञान! या भूमीवर सारखी आक्रमणे झाली. त्यांना आपल्याला तोंड

देता आले नाही. याला कारण तेच— ब्रिटिशांचे राज्य येथे दीर्घकाल टिकले यालाही हेच कारण. लोकहितवादींनी शंभर वर्षांपूर्वी हे जाणले यातच त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो. समाजाच्या उन्नति-अवनतीचे सर्व रहस्यच त्यांनी या एका वाक्यात सांगितले आहे.

सतीच्या चालीविषयी लिहिताना लोकहितवादींनी हेच लिहिले आहे. 'आमच्या बायका अंधारात. त्यांस जसे सांगितले तसे वर्ततात. याजमुळे सती जाण्याचा पाठ पडला. जर बायका शहाण्या असत्या व त्यांस विद्या वगैरे शिकविण्याची चाल असती तर ज्यांनी त्यास प्रथम सती जाण्यास सांगितले त्यांच्या त्यांनी शेंड्या उपटून टाकल्या असत्या. अजूनही जर स्त्रियांस विद्या शिकविल्या तर त्या आपला पुनर्विवाह करतील आणि शास्त्री वगैरे जे आडवे येतील त्यांस पुसतील की, पुरुषांनी पाहिजे तितकी लग्ने करावी मग स्त्रीने नवरा मेल्यावरही दुसरा नवरा का करू नये ? आणि आपणच शास्त्रार्थ देऊन चालू करतील.' (पत्र क्र. ५५)

लोकहितवादींची विद्येच्या सामर्थ्यावर अशी नितान्त श्रद्धा असल्यामुळेच स्त्रियांचे दु:ख निवारण्यासाठी त्यांनी हा उपाय आग्रहाने आपल्या लोकांना सांगितला आहे. 'स्त्रियांस विद्या शिकविण्याचा लोकांनी जरूर विचार करावा. स्त्रिया वाईट, असे पुष्कळ लोक म्हणतात. कोणी म्हणतात, 'स्त्रीबुद्धी प्रलयं गत: ' परंतु यांसारखे शतमूर्ख पृथ्वीत नाहीत. जसे पुरुष तशाच बायका स्वभावाने व बुद्धीने आहेत. जे लोक स्त्रियांना वाईट म्हणतात त्यांनी पक्के समजावे की ही मूर्खपणाची समजूत आहे.'

## ५. इंग्रज आणि राज्यसुधारणा

हिंदूंच्या धर्मशास्त्रात, समाजरचनेत, त्यांच्या विद्येमध्ये आणि त्यांच्या जीवनाच्या इतर अंगोपांगांमध्ये कोणते दोष आहेत, वैगुण्ये आहेत ते सांगून लोकहितवादींनी त्यावर काही उपाययोजनाही सांगितली. शब्दप्रामाण्य जाऊन येथे बुद्धिप्रामाण्य आले पाहिजे, ब्राह्मणांचे व पुराणांचे वर्चस्व नष्ट झाले पाहिजे, धर्मकल्पना बदलल्या पाहिजेत, जातीजातींत व स्त्रीपुरुषांत समता प्रस्थापिली पाहिजे, स्त्रियांना व सर्व जातींना विद्या सुलभ करून दिली पाहिजे, इत्यादी अनेक उपाय त्यांनी सांगितले. पण त्या काळी एक मोठा प्रश्न होता. हे सर्व कोणी घडवून आणावयाचे ? धर्मसुधारणा झाली पाहिजे. समाजसुधारणा झाली पाहिजे. हिंदू समाजात आमूलाग्र परिवर्तन झाले पाहिजे. सगळे खरे, पण हे कोणी करवयाचे ? समाजाचे नेतृत्व ब्राह्मणांकडे व सरदार लोकांकडे. त्यांच्या कर्तृत्वाचा व विद्येचा

हिशेब वर दिलाच आहे. त्यांच्या नेतृत्वामुळेच तर या समाजाचा नाश झाला. त्यांचे नेतृत्व हे मोठे दुर्भाग्य ठरले! मग या समाजाचे आता नेतृत्व कोणी करावयाचे ?

**१. इंग्रज उद्धारकर्ते :–** हे नेतृत्व इंग्रजांनी करावयाचे, तेच या देशाचा उद्धार करण्यास समर्थ आहेत असे लोकहितवादींचे या प्रश्नास उत्तर आहे. इंग्रज लोक हे हिंदू लोकांपेक्षा शतपट शहाणे आहेत, कर्तबगार आहेत, प्रामाणिक आहेत, राज्यकर्त्यांत जे गुण असावयास हवेत ते त्यांचे ठायी आहेत. पूर्वी पेशवाईत अगदी मोठा शहाणा म्हणजे नाना फडणीस. पण आता इंग्रजांमध्ये नानापेक्षा सहस्रशः शहाणे असे अनेक लोक आहेत. त्यांच्यातील कारभारी यांची बुद्धी विशाल, मसलत खोल, अनेक देशींचे वृत्तान्त त्यास माहीत व त्यांचे आपसांत एकमत. इंग्रजांत एक मेला कीं दुसरा तयार असतो. हा क्रम मराठी राज्यात नव्हता. तेव्हा आपली सध्याची दुरवस्था नष्ट करून आपली उन्नती साधण्याचे कार्य पार पाडण्यास इंग्रज हेच लायक आहेत, असे लोकहितवादींचे निश्चित मत होते. (पत्र. क्र. ३८, ४१)

**२. ईश्वरी योजना :–** आपला उद्धार इंग्रजांच्या हातून होईल असे लोकहितवादींचे नुसते मत होते असे नाही. तशी ईश्वरी योजनाच आहे अशी त्यांची श्रद्धा होती. ते म्हणतात, ‘ईश्वर सर्वज्ञ आहे. तो असा की जसे जसे योजावयाचे तसे तो योजतो. त्याने क्षुधा केली आहे तर अन्नही तो योजतो. म्हणून एक राज्य जाते व दुसरे होते. अशा मोठाल्या घालमेली होतात त्या भगवंताचे प्रेरणेशिवाय घडत नाहीत. तेव्हा हिंदू लोकांचे मूळचे राज्य मुसलमानांनी घेतले व त्याज कडे चारपाचशे वर्षे राहून आता सर्व भरतखंड इंग्रजांचे अंमलात गेले. या गोष्टी ईश्वराने चांगलेपणाकरिताच योजिल्या आहेत असे मला वाटते. पूर्वी हिंदू लोक शहाणे होते. आता त्यांचे शहाणपण नाहीसे झाले आहे. ते शहाणपण हिंदू लोकांस पुन्हा प्राप्त व्हावे एतदर्थ ईश्वराने हा मुलूख इंग्रजांचे ताब्यात दिला आहे. कारण सांप्रत इंग्रज लोक हिंदूंपेक्षा शंभरपट शहाणे झाले आहेत.’ (पत्र क्र. १२) ‘इंग्लिश राज्याची आवश्यकता’ या पत्रात पुन्हा हाच विचार त्यांनी मांडला आहे. ‘इंग्रज लोक याणी इकडे राज्य संपादन केले याचे कारण काय ? याचा विचार करता असे दिसते की, हिंदू लोकांमध्ये मूर्खपणा फार वाढला, तो दूर होण्याकरिताच गुरू दूर देशातून इकडे ईश्वराने पाठविले आहेत. हिंदू लोकांस आता जागृती आली, पृथ्वीवर कोठे काय आहे हे कळू लागले. हे सर्व इंग्रजांमुळे झाले. ईश्वराने ही शहाणपणानेच योजना केली आहे. लोकांची झोप जाण्यास दुसरा

इलाज नव्हता. सती जाणे, पोरे मारणे, जगन्नाथाचा रथ उरावर घेणे, इत्यादी अघोरी व लज्जास्पद चालींमुळे ईश्वराचा क्षोभ अत्यंत जहाला. तेव्हा दुष्ट लोकांस ताळ्यावर आणण्यास ईश्वराने इंग्रज सरकारची योजना केली.' (पत्र क्र. ४६) ' मुख्य आमचे बोलण्याचा येथून प्रारंभ आहे की, ज्या गोष्टी ईश्वर घडवून आणतो त्या वाईटाकरिता नसतात. मनुष्याचे ज्ञान थोडे म्हणून त्या वाईट, असा प्रथम भास होतो. तरी शेवटी त्यापासून मोठा उपयोग असतो. हिंदुस्थानचे लोक हे फार मूर्ख व धर्मकर्म सोडून अनाचारास प्रवर्तले. यास्तव ईश्वराने या देशात इंग्रजांची प्रेरणा केली आहे.' (पत्र क्र. ५४)

**३. पूर्वीच्या राज्याशी तुलना (इंग्रजी राज्यापासून लाभ) :–** त्या काळी पुष्कळ शास्त्री-पंडित त्याप्रमाणे ब्राह्मण व मराठा सरदार आपले राज्य गेले व इंग्रजांचे राज्य आले, म्हणून हळहळत असत, संतापत असत. परमेश्वराने अवतार घेऊन पूर्वी रावणास, दुर्योधनस, जरासंधास जसे मारिले तसेच आता व्हावे, अशी इच्छा व्यक्त करीत असत. आपले राज्य पुन्हा आले तर आपण सुखी होऊ असे त्यांस वाटत असे. त्यांचा हा भ्रम नाहीसा व्हावा म्हणून लोकहितवादींनी पूर्वीच्या राज्यांचे वर्णन करून तेथे कशी अंदाधुंदी होती, पेंढारशाही होती, तशी राज्ये पुन्हा झाली, तर काय अनर्थ घडतील, ते अनेक पत्रांतून तपशिलाने सांगितले आहे व परोपरीने इंग्रजांचे राज्यच या देशात आज कसे हितावह आहे, ते पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ' इंग्रज सरकार या देशात आहेत याविषयी, लोक उघड नाही तरी मनातले मनात कुरकूर पुष्कळ करतात, व मुख्यत्वेकरून भट, पंडित, शास्त्री हे तर फार हैराण आहेत; परंतु माझे मत असे आहे की, या देशास हेच सरकार ठीक आहे. मागले सरकार वाईट व मूर्ख होते. जिकडे तिकडे जुलूम होता. त्याने देशाची सुधारणा व विद्यावृद्धी काहीच केली नाही. फक्त भट, वैदिक व मूर्ख लोकांचे पोषण करून रक्षिले. तसेच पेंढारी, रामोशी, ठक, डाकवदे इत्यादी लोकांस रक्षिले आणि देशात लूट, सांड पुष्कळ करीत असत. हल्ली आमचे लोकांस राज्य मिळाले तर तीच अवस्था करतील.' (पत्र क्र. ९४). ' जेव्हा मराठे लोक शिंदे, होळकर, परमुलखात (म्हणजे त्यांचे समजुतीप्रमाणे परमुलख – परंतु वास्तविक पाहिले तर मुलूख एकच.) गेले तेव्हा त्यांची वर्तणूक कशी होती ? ते किती गावं जाळीत होते ? शहरे व सावकार किती लुटीत होते ? या गोष्टीचे स्मरण ठेविले तर इंग्रज बरे आहेत हे लक्षात येईल. इथले लोक सुधारून मूर्खपणाचे शृंखलेपासून मुक्त व्हावे, याजकरिता त्यांचा उद्योग बहुत चालला आहे. शिंदे, होळकर लक्ष्मीचे अंधकारात होते तेव्हा त्यांनी

५०,००० पेंढारी लुटावयाचे कामावर ठेवले होते. त्यांचे निर्मूळ इंग्रजांनी केले. जे राज्य करतात तेच लुटारू लोकांस बाळगतात, हे कधी कोणी ऐकले होते काय ? जे राजे चोरांचे रक्षण करतात आणि लुटारू लोकांस बाळगतात, त्यांचे वर्णन काय करावे! किती काळ ब्राह्मणी राज्य चालते तरी सती बंद होती ना. पेंढार मोडते ना, व बालहत्या बुडती ना. त्या वेळी कोणी स्त्रियांस जाळून टाकीत, कोणी जिवंत पुरत, कोणी गळ्यात दगड बांधून बुडवीत. हे सर्व मूर्खपण कधी तरी हिंदू लोकांच्याने बंद करवले असते काय ? नाही.' (पत्र क्र. ३८) 'तेव्हा इंग्रजांचा अंमल हा हंगाम बरा आहे. पेशव्याचे राज्यात कोणी काही सुख भोगिले. परंतु विचार केला नाही, खाल्ले मात्र, शेवटी दुसऱ्याने तोंडात मारून नेले, तेव्हा डोळे उघडले. तस्मात् इंग्रजांचे अंमलाचा परिणाम चांगला, पण लोक शहाणे होण्यास खुशी नाहीत. तरी ईश्वर जबरीने करवितो आहे. तुम्ही नको म्हणाल तरी तो ऐकणार नाही. ही त्याची दया मानावी. ईश्वर दयाळू आहे.'(पत्र क्र. १२). पूर्वीची राज्ये अशी लुटारू होती पण आता आमच्या लोकांत सुधारणा झाली आहे. असे कोणी म्हणेल तर त्यांना लोकहितवादी सांगतात, 'अजूनही राज्यकर्त्यांचे गुण आमच्या ठायी नाहीत. स्वदेशीय राज्ये हल्ली आहेत. त्यात काय गर्दी आहे ती पाहावी म्हणजे बाजीरावाचे मूर्तिमंत राज्य डोळ्यांपुढे उभे राहते. मामलेदार मक्ते चढ करून रयत लुटतात. जमा येते ती रांडा, गोंधळी, भट, आर्जवी, ढोंगी वगैरे खाऊन जातात. हेच बाजीरावाने केले व अद्याप मराठी राज्यात हेच आहे. उजाडले किंवा मावळले, याची त्यास खबर नसते. फक्त जनावराप्रमाणे खाणे, निजणे एवढ्यापुरती काळजी.' (पत्र क्र. ४६). अशी सर्व तुलना करून लोकहितवादी आपल्या लोकांस विनवून सांगतात की, 'हिंदू लोकांनी याचा विचार पाहावा. या साक्षात् शहाणे लोकांची गाठ पडून हिंदू लोकांच्या वाईट चाली बहुत सुटल्या व आणखीही किती एक सुटतील आणि त्यांची मने शुद्ध होऊन त्यास राज्यकारभार, व्यापारधंदा कसा करावा हे ज्ञान येईल. देशसुधारणा क्षणात होत नाही. तीस पुष्कळ विलंब लागतो. लहान मुलास हुशार होण्यास दहावीस वर्षं लागतात; मग देश चांगला होण्यास अर्थातच दोनशे-चारशे वर्षं लागतील. तापर्यंत या लोकांस दु:ख आहे. परंतु त्यास उपाय नाही. जशी शाळेमध्ये मुलांनी शिक्षा घेतली पाहिजे, तद्वत् हे आहे. याचे उत्तम फळ पुढे येईल.' (पत्र क्र. ५४).

**४. राज्यसुधारणेस २०० वर्षे लागतील :–** इंग्रजांचे हाताखाली शिक्षण घेतल्यावर आपण शहाणे होणार, पण यास किती काल लागेल ?

लोकहितवादींच्या मते सुमारे दोनशे वर्षे लागतील. वरील पत्रात त्यांनी दोनशे-चारशे वर्षं म्हटले आहे. अन्यत्र एके ठिकाणी ५०० वर्षं म्हटले आहे. पण या वरील पत्रातच शेवटी समारोप करताना यास दोनशे वर्षे तरी पाहिजे असे म्हटले आहे. त्यांचे मत असे की, आपल्या लोकांच्या पायातील शृंखला तुटल्या की ते शहाणे होतील, त्यांना राज्यकारभाराचे कर्तृत्व लाभेल. व्यापारात, नव्या विद्येत ते निपुण होतील व मग आपणच इंग्रजांस सांगतील की, आता तुम्ही आपले देशास जावे. आता आम्हास तुमचे गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरते इकडे येत जा. आमचे प्रजेचे आम्ही रक्षण करतो तसे तुमचेही करू. परंतु तुमचे वर्चस्व नको. याप्रमाणे या देशाची गती होईल आणि नवीन राज्यस्थिती चांगले रीतीची होईल. पण यास दोनशे वर्षे तरी पाहिजेत. (पत्र क्र. ५४). 'आपले लोक इंग्रजांस आपण जावे म्हणून सांगतील.' असे या पत्रात म्हटले आहे. दुसऱ्या एका पत्रात 'हिंदू लोकांचा मूर्खपणा जाईल तेव्हा ईश्वर इंग्रजांस या देशातून जाण्याची आज्ञा करील.' असे म्हटले आहे. तेव्हा 'ईश्वरी योजना' या कल्पनेचा पगडा त्यांच्या मनावर बराच होता असे दिसते.

**५. देश ही मातोश्री :–** इंग्रजांच्या राज्यात, त्यांच्या शिक्षेखाली आपण राहिलो म्हणजे आपले अज्ञान, आपला मूर्खपणा सर्व नाहीसा होऊन आपण आपला राज्यकारभार करण्यास समर्थ होऊ, असे अनेक वार सांगून इंग्रजांचे हाताखाली आपण कोणते शिक्षण घ्यावयाचे, त्याचे स्वरूपही लोकहितवादींनी स्पष्ट केले आहे. राष्ट्रनिष्ठा व लोकशाही या पाश्चात्त्य देशातील महाशक्ती होत. त्यांच्या बळावरच ती राष्ट्रे उन्नत झाली, समर्थ झाली, हे इतिहास तज्ज्ञांस माहीत आहेच. लोकहितवादींनी नेमक्या याच शक्तीची उपासना करण्यास आपल्या लोकांना सांगितले आहे. नव्या परिस्थितीचे त्यांना किती अचूक आकलन झाले होते ते यावरून दिसून येते. 'स्वदेशप्रीती' या पत्रात ते म्हणतात, 'जसे आपण मातोश्रींस वंद्य मानतो व तिच्या पोटी जे आले ते सर्व बंधुप्रीतीने वागतात, तद्वत् या जमिनीवर जे आपण आहोत ते सर्व एकमेकांचे बंधू आहोत व हा देश आपणा सर्वांची मातोश्री आहे. याजकरिता कोणी सुखी व द्रव्यवान असतील, त्यांनी बहुत लोक उपाशी मरतात व दरिद्री आहेत त्यांचे रक्षणाचा प्रयत्न करावा. आपण सर्वांनी आज दोन हजार वर्षेपर्यंत यथेच्छ सुखाने झोप घेतली व काही उद्योग केला नाही म्हणून आता तरी जागृत होऊन काय आहे ते पाहू व बुद्धीचा उपयोग करू.' 'स्वदेशाचे हितास झटावे,' हीच लोकहितवादींच्या मते मुख्य धर्मसुधारणा आहे. (पत्र क्र. ६७). युरोप याच सुधारणेमुळे उन्नत झाला हे सांगताना ते म्हणतात,

'आपले देशाचे हित करावे हा मुख्य धर्म युरोपात समजतात.' (पत्र क्र. १४).

**६. भारतात राजा विष्णूचा अवतार :–** राजनिष्ठा ही जशी एक शक्ती तशीच लोकशाही ही दुसरी शक्ती होय. ' हिंदू लोक मूर्ख आहेत. राज्यसुधारणा म्हणजे काय हे त्यांस कळत नाही. कारण राजसत्तेवाचून दुसरी सत्ता त्यास माहीत नाही. एशिया खंडातील देशात बहुधा एक राजा असून स्वैर अंमल करतो. त्याची रयत त्याचे गुलामाप्रमाणे व तिचा नाश-नफा करण्याविषयी संपूर्ण मुखत्यारी राजास असते. युरोपात जर काही अपाय किंवा वाईट वर्तणूक राजाकडून किंवा त्याचे प्रधानाकडून होईल तर लोक त्यास बडतर्फ करतात. ही गोष्ट आपले इकडील लोकांस फार अशक्य व चमत्कारिक वाटेल. कारण की इकडील लोकांस राजा म्हणजे विष्णूचा अवतार व प्रधान म्हणजे ब्रह्मदेव वाटतो. त्यांनी अन्याय केला तरी म्हणतात की, राजाने सर्वस्व लुटले तर तेथे दुःख करून काय करावयाचे ? तेव्हा या लोकांस सुधारणा माहीत नाही. मी जाणतो की लोक मूर्ख आहेत, त्यांस विचार करण्यास शक्ती नाही. तत्राप मला एक उपाय सुचला आहे तो मी लिहून प्रगट करतो.' (पत्रे क्र. १४ व २५). अशी सर्व प्रस्तावना करून लोकहितवादींनी आपली पार्लमेंट किंवा लोकसभा याबद्दलची कल्पना मांडली आहे, ती अशी :

**७. लोकांची सभा :–** हल्ली येथे कंपनीसरकारचे राज्य आहे. त्यात लोकांस काही अखत्यार नाही. इंग्रजांचे स्वदेशी राज्यात तसे नाही. तेथील लोकांस राज्यात हात घालण्याचा व कायदे करण्याचा अधिकार आहे. तेथील राजा जडजाचे नाझराप्रमाणे आहे. लोकांची सभा म्हणजे पार्लमेंट हे कायदे फर्मावतात व राजा त्याबरहुकूम वहिवाट करतो. येणे करून लोकांस पाहिजे तसे राज्य चालते. एक राजा स्व-इच्छेने राज्य करतो त्यापेक्षा ही युक्ती खरी आहे व याप्रमाणे हिंदुस्थानात राज्य चालेल तर फार चांगले होईल. जे सूज्ञ लोक असतील, त्यास मोठे जाग्यावर व अधिकारावर नेमता येईल, असे इकडे राज्य असावे.

१८३४ साली ईस्ट इंडिया कंपनीला इंग्रज सरकारने हिंदुस्थानात २० वर्षे राज्य करण्याची सनद दिली होती. तिची मुदत १८५४ साली भरणार होती. त्या वेळी विलायतेतील राणीसाहेबांस आमचे देशात पार्लमेंट ठेवावे असा अर्ज करावा, असे या पत्रात लोकहितवादींनी सुचविले होते. १८३४ साली काही इंग्लिश लोकांनी इंग्लंडच्या पद्धतीने हिंदुस्थानात राज्य चालविले, म्हणजे लोकांना स्वायत्तता द्यावी अशी सूचना केली होती. पण कंपनी सरकारने ते नाकारले. कारण कंपनीच्या मते हिंदू लोक स्वायत्त कारभाराला अगदी नालायक होते. तसे केल्यास हिंदुस्थानात बखेडा होईल. सर्वत्र बेबंद होईल, असे कंपनीने सांगितले.

लोकहितवादी म्हणतात की, या गोष्टीला आता १८ वर्षे झाली. (हे पत्र १८४८ सालचे आहे.) व सनद पुन्हा देण्यास अजून सहा वर्षे अवधी आहे. इतक्या अवधीत कित्येक लोक शहाणे होतील व आपला कारभार करण्यास लायक होतील म्हणून राणीसाहेबांकडे अर्ज करण्यास काहीच हरकत नाही.

**८. पार्लमेंटचे स्वरूप :—** लोकहितवादी म्हणतात, 'त्या अर्जात लिहावे की, हल्ली राज्यपद्धती आहे तीपासून आमचा फायदा नाही व आमचे राज्यासंबंधी हक्क चालत नाहीत व हिंदू लोक जसे तसे इंग्रज लोक मनुष्ये आहेत. याकरता इन्साफ बरोबर होण्याकरिता इंग्रज व नेटिव यांत सांप्रत जो भेद आहे तो मोडून एकसारखे होण्याकरिता हिंदुस्थानचे देशात पार्लमेंट ठेवावी व ही सभा मुंबईस भरवावी. या सभेत दर शहरातून एक व दर जिल्ह्यातून दोन अशी माणसे बसवावी. हे लोक सर्व जातीतील सारखे असावे. त्यात भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादी जे शहाणे असतील ते नेमावे व त्यांनी राज्य चालवावे. म्हणजे लोकांचा फार फायदा होईल. यास्तव लोकांचे हित पाहणारे आहेत त्यांनी हा बेत केला पाहिजे.' (पत्र क्र. २५).

लोकहितवादींनी त्यांच्या मनातील लोकसभेचे जे रूप वर्णिले ते थेट आजच्या लोकसभेसारखे आहे हे पाहून मन विस्मित होते. लोकांनी आपले मुखत्यार नेमावयाचे! ते सर्व जातींतून निवडायचे, सर्व धर्माचे लोकांना अधिकार द्यावयाचा व त्यांनी राज्य चालवावयाचे! ते सर्व लोक शहाणे असले पाहिजेत ही जी लोकहितवादींनी अट घातली आहे तेवढीच फक्त आज नाही.

**९. या पद्धतीचे फायदे :—** 'या पद्धतीने राज्य चालले म्हणजे दारिद्र्य वगैरे बोभाट लोक सांगतात. हे त्वरित दूर होतील आणि इंग्रज लोक इकडील लोकांस मूर्ख समजतात, ते मत मोडेल आणि राज्याची उत्तम सुधारणा होऊन एके राजाचे अंमलात सुख काय व लोकसत्तात्मक राज्यात सुख काय, हे सहज दृष्टोत्पत्तीस येईल आणि मग शिंद्यांचे किंवा हैद्राबादचे राज्य चांगले की काय ते त्वरित ध्यानात येऊन राज्य चालविण्याचे रीतीची लोकांना माहितगारी होईल व एका राजाचे ताब्यात राहून त्याचा जुलूम सोसावयाची हिंदू लोकांस खोड लागली आहे ती ते विसरून जातील. त्याचप्रमाणे राज्य करण्यास गरीब व मातबर, नीच जातीचे व उच्च जातीचे लोक समान मानावे हे सर्वांस कळू लागेल. मात्र अशा सभेस जातीवर निवड होऊ नये. जे फार विद्वान व चांगले चालीचे लोक आहेत तेच नेमले पाहिजेत. मग त्यांची जात कोणतीही असो.' (पत्र क्र. २५)

**१०. क्रान्ती (रिवोल्यूशन) :—** देशप्रीती, लोकसभा यांच्याप्रमाणेच

एका पत्रात लोकहितवादींनी राज्यसुधारणा, किंवा रिवोल्यूशन किंवा क्रांती याविषयी आपले विचार मांडले आहेत. त्या वेळी फ्रान्समध्ये १८४८ ची क्रांती झाली होती. तिच्या बातम्या इकडे आल्या होत्या. त्या अनुरोधाने हे पत्र (पत्र क्र. १४ - राज्यसुधारणा) त्यांनी लिहिले आहे. त्यांच्या मते दंगा, बंड म्हणजे रिवोल्यूशन किंवा राज्यसुधारणा नव्हे. राज्यात बंदोबस्त कमी असला म्हणजे ठगपेंढाऱ्यांसारखे लोक जमा होतात व गरीब रयतेस लुटण्याकरता जागोजाग हल्ले करतात. त्यांचे नाव बंड. तोतया, चतुरसिंग, राघुभराऱ्या, पेंढारी यांनी दंगे केले त्यास बंडे म्हणावे, परंतु राज्यसुधारणा हे या रीतीचे बंड नव्हे. ज्या देशात लोक शहाणे व ज्ञानी व एकमेकांचे सहोदर बंधूंप्रमाणे हित पाहणारे असे आहेत, त्या देशात मात्र अशी राज्यसुधारणा होते. हिंदुस्थानसारख्या देशात ती व्हावयाची नाही. सांप्रत टोपकर लोक शहाणे आहेत व त्यांच्यामध्ये कित्येक चांगल्या व हितावह गोष्टी आहेत. त्या आपले लोकास अद्याप माहीत नाहीत. इंग्लंडात जॉन राजाकडून अन्याय झाले. तेव्हा सर्व रयतेने उठून त्याजकडून करार करून घेतला. तो करार म्हणजे तिकडील सर्व कायद्यांचे मूळ असून तो हल्लीपर्यंत चालू आहे. पुढे चार्लस राजाने पुनरपि अन्याय केले. तेव्हा लोकांनी न्यायसभा भरवून त्याचा गुन्हा शाबीत केला व त्यास शिरच्छेदाची सजा दिली. अशा गोष्टी तिकडे घडतात. त्या इकडे अनश्रुत आहेत.

लोकहितवादींच्या मते हिंदुस्थानच्या इतिहासात अशी राज्यसुधारणा - जिला रिवोल्यूशन म्हणता येईल अशी - पूर्वी कधी झाली नाही. मात्र अपवाद त्यांनी केला आहे. तो म्हणजे शिवाजीराजाचा. मराठ्यांचे व सर्व हिंदू लोकांचे राज्यासंबंधी माहात्म्य सरकारी पाचशे वर्षेपर्यंत मुसलमानांनी बळकाविले होते ते पुनरपि हिंदू लोकांचे हिंदू लोकांकडे शिवाजीचे कृत्यामुळे आले, तस्मात ती राज्यसुधारणा होय. शिवाजीचे मागे तसा सद्बुद्धिमान पुरुष झाला नाही. त्यामुळे ते कार्य तसेच राहिले. पण शिवाजी राज्यसुधारक म्हणावयास योग्य आहे, यात शंका नाही.

पण ही गोष्ट लोकहितवादींच्या मते अपवादात्मक होय. एकंदरीत पाहता हिंदू लोकांना राज्यसुधारणेचे सामर्थ्य नाही. यासाठी ईश्वराने इंग्रजांची योजना केली आहे. असे त्यांचे मत होते.

## ६. आर्थिक विचारसरणी

**१. बंगाली पंडित व लोकहितवादी :–** अगदी प्रारंभी म्हटले आहे

की एखाद्या निष्णात वैद्याने रोग्याची परीक्षा करून अचूक निदान करावे व औषधयोजना करावी त्याप्रमाणे भारतीय राष्ट्रपुरुषाच्या बाबतीत लोकहितवादींनी केले. अज्ञान, शब्दप्रामाण्य, धर्मशास्त्र, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व, जातिभेद, स्त्रीजीवन, राजकारण या क्षेत्रात त्यांनी जी चिकित्सा केली तिचा ऊहापोह येथवर केला. आर्थिक क्षेत्राकडे आपण पाहिले तरी लोकहितवादींची प्रज्ञा तेथेही अशीच अकुंठित होती असे दिसून येईल. इंग्रजांचे सर्व वैभव हे त्यांचा व्यापार व त्यांची कारखानदारी आणि याच्या जोडीला त्यांचा विश्वसंचार, साहसी वृत्ती, उद्योगशीलता यांवर अवलंबून आहे हे लोकहितवादींनी जाणले होते. आज ती गोष्ट अगदी नित्याची झाली आहे. शाळकरी मुलांनासुद्धा या गोष्टी पाठ असतात. पण शंभर वर्षांपूर्वीचा काळ ध्यानी आणावा. त्या वेळी सर्व लोक सामान्य रयत, शास्त्रीपंडित व सरदार लोक इंग्रजांच्या अपूर्व वैभवाने, त्यांच्या पराक्रमाने, कर्तबगारीने विस्मित होऊन गेले होते व दिङ्मूढ झाले होते. आपला पराभव का झाला, पारतंत्र्य का आले, इंग्रज विजयी का झाले, याची काडीमात्र कल्पना त्यांना नव्हती. हे सर्व परमेश्वरी कृपेचे किंवा प्रारब्धाचे खेळ आहेत असे त्यास वाटत होते. आर्थिक व्यवहाराची, व्यापार, भांडवलसंचय, कारखानदारी, याची त्यांना कसलीही कल्पना नव्हती. पाश्चात्त्य विद्या नसणाऱ्या, अज्ञ व जुनाट जगात राहणाऱ्या लोकांचीच अशी स्थिती होती असे नव्हे, तर बंगालमधील राम मोहन रॉय यांच्यासारख्या नवविद्याविभूषित महाप्रज्ञावंतांचीही या आर्थिक उलाढालींच्या बाबतीत दिशाभूल झाली होती. ब्रिटिश भांडवलवाले, मळेवाले, इकडे येतात त्यामुळे आपला देश हळूहळू सधन होत आहे अशी त्यांची भ्रांत समजूत होती. मजुराला पूर्वी दरमहा दोन रुपये मिळत त्या ठिकाणी आता चार रुपये मिळू लागले, याचेच त्यांना कौतुक वाटत असे. युरोपातील व्यापाऱ्यांना येथे अनिर्बंधपणे येऊ द्यावे, ते व्यापारी व भांडवलदार सर्व देशभर पसरावे, त्यामुळे येथील कनिष्ठ व मध्यमवर्गाची स्थिती सुधारेल, असे राम मोहन रॉय व इतर बंगाली पुढारी यांना वाटत असे. पगारदार मध्यमवर्गाची स्थिती थोडी सुधारली होती. बाजारात कापड पूर्वीपेक्षा बरेच स्वस्त मिळू लागले होते हे खरे, पण यावरून सर्व देश सधन व सुखी होत आहे, असा भ्रामक निष्कर्ष बंगाली नेत्यांनी केला होता, तो भ्रांत होता. आचार्य शं. द. जावडेकर यांनी आपल्या ' आधुनिक भारत ' या ग्रंथात बंगाली पुढाऱ्यांच्या या भ्रामक मतांचे विवेचन करून पुढे म्हटले आहे की, बंगालमधील तत्कालीन (१८२८) पुढाऱ्यांनी ही अर्थशास्त्रीय मते वाचली असता यानंतर वीस वर्षांच्या आतच स्वदेशी बहिष्काराचा पुकार करणाऱ्या लोकहितवादींच्या

राष्ट्राभिमानाचे व दूरदर्शी व आर्थिक विचारसरणीचे कौतुक वाटू लागते. हिंदुस्थान सधन होत आहे. हे १८३० च्या सुमाराचे बंगाली पुढाऱ्यांचे मत आणि हिंदुस्थान निर्धन व बेकार होत आहे अशी लोकहितवादींनी प्रतिपादलेली विचारसरणी यांतील अंतर बऱ्याच दृष्टींनी बोधप्रत आहे, असे आम्हास वाटते. (आधुनिक भारत - पृष्ठ क्र. ६४ - ६८); लोकहितवादींच्या आर्थिक विचारसरणीचे महत्त्व कसे अनन्यसामान्य आहे, ते वरील उताऱ्यावरून ध्यानात येईल.

**२. स्वदेशी व बहिष्कार :–** हिंदू लोक दरिद्री का झाले याची कारणे सांगताना ते म्हणतात की, या लोकांना उद्योग करावयास नको. ते पराकाष्ठेचे आळशी आहेत. अनेक भट लोकांना त्यांनी सांगून पाहिले की, तुम्ही नुसती कारकुनी करता किंवा जेवण्यासाठी आगंतुकी करता त्यापेक्षा दुसरा काही व्यापार करावा. त्यावर ते म्हणाले की, पेशवाईत आमचे यथास्थित चालले होते. आता चालत नाही. हे इंग्रजांचे पायगुणाने झाले. या सर्व मूर्खपणाची लोकहितवादींना चीड येत असे. म्हणून आपल्या लोकांना ते तळमळून उपदेश करीत असत. ‘ हिंदू लोकांनी काय करावे ? ’ या पत्रात ते म्हणतात, ‘ तूर्त दरिद्र मोडण्यास उपाय असा की, ब्राह्मण लोकांनी आपल्या मूर्खपणाच्या समजुती सोडाव्या व केवळ कारकून आणि भट हे दोनच रोजगार आम्ही करू असे म्हणू नये. मग कोणते रोजगार करावे म्हणाल तर कांच, कापड, सुरी, कात्री, लाकडी सामान, घडयाळे, चाबूक, यंत्रे इत्यादी पुष्कळ इंग्रज इकडे खपवतात. ही सर्व आपले लोकांनी करावयास शिकावे व येथे जो माल खपणार नाही तो दुसऱ्या देशास घेऊन जावा आणि तेथे विकावा. पुष्कळ देश आहेत; या गोष्टीचा शोध करावा व इंग्रजांचे देशचे सामान बंद करावे. किंबहुना आपले सामान त्यास द्यावे, परंतु त्यांचे आपण घेऊ नये. यास्तव आपल्यास जाडी, मोठी, कापडे नेसावयास लागली तर काय चिंता आहे ? परंतु आपले देशाचे रक्षण करावे. असे झाले म्हणजे बहुत रोजगार राहतील.’ (पत्र क्र. ६०)

या शतकाच्या आरंभी राजकीय चळवळीत स्वदेशी व बहिष्कार (विलायती मालावरील बहिष्कार) यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. कारण इंग्रजांच्या राज्याचे लक्षण म्हरजे आर्थिक शोषण, धनाची लूट हे होय, हे त्या वेळच्या नेत्यांनी जाणले होते. हे जाणून त्याप्रमाणे चळवळ केल्याबद्दल आपण आज त्यांना धन्यवाद देतो. मग त्यांच्या आधी पन्नाससाठ वर्षे तोच विचार, जवळजवळ त्याच शब्दात, लोकहितवादींनी मांडला यासाठी त्यांना किती धन्यवाद द्यावेत !

**३. व्यापार बुडाला :–** 'स्वदेशी बहिष्कारा 'विषयीचा हाच विचार 'हिंदू लोकांचा व्यापार' या पत्रात त्यांनी जास्त स्पष्टपणे मांडला आहे. 'सांप्रत हिंदू लोक फार भिकारी होत चालले आहेत, व त्यांस रोजगार धंदा नाही. याचे कारण मला असे दिसते की, या लोकांचा व्यापार अगदी बुडला. इंग्रज व दुसऱ्या देशाचे लोक फार शहाणे होऊन या लोकांस सर्व जिनसा पुरवितात. आणि हे मुकाट्याने स्वस्ताईमुळे खरेदी करतात. म्हणून आपले लोकांनी कट करावा की, दुसरे मुलखाचा जिन्नस घ्यावयाचा नाही. आपले देशात पिकेल तेवढाच माल घ्यावा. आपले लोक कापडे जाडी करतात, परंतु तीच नेसावी. इकडे छत्र्या करतात त्याच घ्याव्या म्हणजे या लोकांत व्यापार राहून इकडे सुख होईल. परंतु हे लोक असे करीत नाहीत. आणि थोडी किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. अजून दाणे (धान्य) परदेशातील येऊ लागले नाहीत. बाकी सर्व पाहावे ते परदेशाचे आहे. आमचे कपर्डे, आमची छत्री, आमची चाकू-कात्री, आमचे घड्याळ, आमची गाडी, आमची बुके, सर्व परदेशातील आहेत. यामुळे व्यापार बुडाला. उदमी, मजूर, कसबी, कारागीर घरी बसले. याजकरिता सर्वांनी कट करावा की, जे आपल्या देशात पिकेल तेच नेसू, तेच वापरू. ते कसेही असो आणि तितक्याच चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयाच्या विद्या शिकू. कापूस विणकरांनी असा बेत करावा की इंग्रजास इकडे तयार केलेली कापडे द्यावी, परंतु कापूस देऊ नये. मग हजारो खंडी कापूस (कच्चा माल) इकडून विलायतेस कशास जाईल ? असे झाले म्हणजे हे लोक सुखी होतील. सध्या परदेशाच्या भुलावणीने हाहा:कार झाला आहे. जो तो शेत करू लागला. दुसरा व्यापार नाही. पैसा दुसऱ्या देशात चालला. लाखोपती आहेत ते विलायती जिनसा घेतात. ते धान्य घेतात त्याची किंमत फक्त येथल्या रयतेकडे जाते. बाकी हजारो रुपये थेट विलायतेस जातात. याप्रमाणे हमेशा चालले आहे. तेव्हा कसा कट करणे वगैरे उपयोगी गोष्टी आहेत त्या पुराणिक, हरदास यांनी लोकांस सांगाव्या, त्या टाकून दुसऱ्या गोष्टी सांगतात आणि यांजकडे लक्ष देत नाहीत.' (पत्र क्र. ५७).

**४. द्रव्याचा योग्य उपयोग :–** व्यापार, कारखानदारी, स्वदेशी, बहिष्कार यांचे विवरण लोकहितवादींनी केले आहेच. पण याही पलीकडे जाऊन, अगदी मूलगामी चिंतन करून हिंदू लोकांच्या मन:प्रवृत्तीच याला कशा विरोधी आहेत त्याचेही विवेचन ते करतात. ते म्हणतात, 'मागील पत्रात विद्येचा उपयोग या देशात विद्वान लोक करीत नाहीत म्हणून लिहिले. आता एक गोष्ट आम्हास सुचली आहे की, द्रव्यवान लोक द्रव्याचाही उपयोग करीत नाहीत. द्रव्य कोणत्या

दुर्भाग्याचा होय. त्या शास्त्राने भारताच्या वैभवाचा नाश केला आहे. इसवीसनाच्या आठव्या-नवव्या शतकापर्यंत हिंदु लोक धर्मप्रसारासाठी, साम्राज्यासाठी व व्यापारासाठी त्रिखंडात संचार करीत होते आणि या तीनही क्षेत्रांतले आपले वैभव त्यांनी अगदी कळसाला नेले होते. (संस्कृती-संगम, द. के. केळकर, प्रकरण ७ वे व ९ वे पाहा.) असे असून पुढे जातिभेदाची बंधने कडक झाल्यामुळे परदेशगमन करील त्याला लोक वाळीत टाकू लागले, तो जातिबहिष्कृत होऊ लागला आणि धर्माच्या या विपरीत व अमंगळ कल्पनेमुळे आपला विश्वसंचार थांबला व त्याबरोबरच धर्मप्रसार, साम्राज्यविस्तार व व्यापारही थांबला. हे सर्व सोवळ्यामुळे झाले, यालाच उद्देशून सावरकरांनी म्हटले आहे की, ' आम्ही मुकटयासाठी मुकुट घालविले.' हाच विचार लोकहितवादींनी वरील पत्रांतून मांडला आहे.

हिंदूंनी परदेशगमन केले, युरोपातील अर्थव्यवस्था पाहिली तर द्रव्याचा उपयोग भांडवलासाठी करावा हे त्यांना कळेल. त्यांना प्रयत्नवादाचे महत्त्व समजून येईल आणि मग ते व्यापार, कारखानदारी या क्षेत्रात लक्ष घालू लागतील. असे झाले तरच हिंदुस्थानचे दारिद्र्य नष्ट होईल असा लोकहितवादींच्या आर्थिक विचारसरणीचा सारार्थ आहे.

## ७. मूल्यमापन

लोकहितवादींच्या विचारधनाचे स्वरूप येथवर आपण पाहिले. धर्म, राजकारण, समाजकारण, अर्थव्यवस्था, इंग्रजीविद्या, संस्कृतविद्या, परदेशगमन इत्यादी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र चिंतन करून आपले मूलगामी विचार शतपत्रांतून मांडले आहेत. ' शतपत्रे ' हे त्यांचे अगदी आरंभीचे लेखन. त्या वेळी त्यांचे वय केवळ २५ वर्षांचे होते. एवढ्या वयात समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगाचे एवढे आकलन व्हावे, पाश्चात्त्य व पौर्वात्य संस्कृतीतील भेद इतक्या स्पष्टपणे कळावा आणि त्यावर उपाययोजना काय करावी हेही स्पष्टपणे ध्यानात यावे इतकी भेदक प्रज्ञा लोकहितवादींना लाभली होती. त्यांचे लेखन वाचीत असताना त्यांचे वय लक्षात येऊन पदोपदी वाचकाला विस्मय वाटत असतो.

**१. शतपत्रांनंतरचं लेखन :–** पुढल्या काळातही लोकहितवादींनी आपले समाजाच्या मार्गदर्शनाचे कार्य अखंड चालू ठेवले होते. १८७६ साली त्यांनी ' हिंदुस्थानास दरिद्र येण्याची कारणे ' हे पुस्तक प्रसिद्ध केले. दादाभाई

नौरोजी यांच्या ‘ पाव्हर्टी इन इंडिया ’ या निबंधाच्या आधारे त्यांनी ‘ इंदुप्रकाश ’ या प्रत्रात आठ लेख लिहिले. तेच या पुस्तकात एकत्र छापलेले आहेत. लॉर्ड रिपन यांनी हिंदुस्थानात स्थानिक स्वराज्याची स्थापना केल्यानंतर याविषयी लोकांना माहितगारी करून देण्यासाठी ‘ स्थानिक राज्यव्यवस्था ’ हा एक छोटासा प्रबंध लोकहितवादींनी १८८३ साली लिहिला. त्यात त्यांनी शासनसंस्थेच्या स्वरूपाचे दिग्दर्शन करून प्रजेच्या मूलभूत हक्कांचे विवेचन केले आहे. १८८३ साली त्यांनी ‘ ग्रामरचना, त्यातील व्यवस्था आणि त्यांची हल्लीची स्थिती ’ या विषयावर एक निबंध लिहिला. ‘ प्रभाकर ’ या पत्रात त्यांनी शतपत्रे लिहिली. त्याचप्रमाणे ‘ वृत्तवैभवा ’त अनेक निबंध लिहिले. या सर्व लेखांचा एक संग्रह ‘ निबंध-संग्रह ’ या नावाने त्यांनी १८६६ साली प्रसिद्ध केला. हा सुमारे १,१०० पृष्ठांचा ग्रंथ आहे. या ग्रंथावरून आपल्या समाजाच्या भवितव्याची लोकहितवादी कशी अखंड चिंता करीत असत ते ध्यानी येते. इतिहास हा तर लोकहितवादींचा अत्यंत आवडीचा विषय होता. भारतीयांची प्राचीन काळापासूनची या महत्त्वाच्या विषयासंबंधीची अनास्था पाहून त्यांना फार खेद वाटे. १८५१ सालीच त्यांनी ‘ भरतखंड पर्व ’ या नावाने हिंदुस्थानचा एक संक्षिप्त इतिहास लिहून इतिहासलेखनाची परंपरा महाराष्ट्रात सुरू केली. आणि त्यानंतर सुराष्ट्र, गुजराथ, राजस्थान, लंका या देशांच्या इतिहासांची मराठीत भाषांतरे केली. हे सर्व ग्रंथ पाहता ‘ आमच्या देशाच्या माहितीच्या संबंधाने लोकहितवादी हे केवळ समुद्र आहेत ही त्यांच्याविषयीची उक्ती सार्थ आहे असेच कोणाचेही मत होईल. ’

**२. टीकांचा परामर्श :–** लोकहितवादींचे बुद्धिवैभव; त्यांचा व्यासंग, त्यांची स्वदेशहिताविषयीची कळकळ, वार्धक्यातही त्यांच्या ठायी तरुणांना लाजवील असा दिसणारा उत्साह या सर्व गोष्टी आज वादातीत आहेत. असे असताना त्यांच्यावर त्या काळी अनेक पंडितांनी फार कडक टीका केली, यांचे कारण काय याचा विचार केला पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमालेत लेखावर लेख लिहून लोकहितवादींवर फार भयंकर टीका केली आणि लोकांच्या डोळ्यांपुढे प्रामुख्याने तीच टीका आहे, पण त्यांच्यावर फक्त शास्त्रीबुवांनीच अशी टीका केली असे नव्हे. ‘ इंदुप्रकाश ’, ‘ नेटिव्ह ओपिनियन ’, ‘ विविध ज्ञानविस्तार ’ अशांसारख्या इतरही अत्यंत जबाबदार व भारदस्त पत्रांनी त्यांच्यावर इतकीच, क्वचित जास्तच कडक टीका केलेली आहे. म्हणून या टीकांचा थोडा परामर्श घेणे अवश्य आहे.

**३. उपदेश व कृती यांतील विसंगती :–** लोकहितवादींवर टीका

प्रामुख्याने झाली ती त्यांचे लेखन व त्यांचे आचरण यांतील विसंगतीमुळे. विधवा पुनर्विवाहाचा त्यांनी किती हिरीरीने पुरस्कार केला होता, ते वर आपण पाहिलेच आहे. जे या सुधारणेस विरोधी होते त्यांना ते मांग, खाटीक, कसाई असे म्हणत. असे असून प्रत्यक्षात १८६९ साली एक विधवा स्त्रीच्या पुनर्विवाहास पाठिंबा देण्याचा प्रसंग आला तेव्हा लोकहितवादींनी पळ काढला. या विवाहाला पाठिंबा द्यावा अशा आशयाचे जे पत्रक निघाले होते त्यावर लोकहितवादींनी सही केली होती. या विवाहसमारंभास कुटुंबासह उपस्थित राहावे; वधूवरांबरोबर अन्नव्यवहार करावा किंवा निदान ज्यांनी अन्नव्यवहार केला त्यांना आपल्या पंगतीला घ्यावे व अशा रीतीने आपला पाठिंबा सक्रिय व्यक्त करावा असे लोकांना त्यांनीच प्रार्थिले होते, तरी स्वत: लोकहितवादींनी यातले काहीच केले नाही. त्यामुळेच हे नामर्द आहेत, दंगेखोर आहेत अशी टीका त्यांच्यावर 'इंदुप्रकाश'ने केली. 'लोकहितवादींनी आपला जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात केवळ राजकीय भांडवलबाजी केली.' असे 'नेटिव्ह ओपिनियन' या पत्राने म्हटले. 'विविधज्ञानविस्तार'नेही तीन लेख लिहून त्यांचा दंभस्फोट केला.

**परदेशगमनाच्या बाबतीत हाच प्रकार झाला :–** हिंदुस्थानची उन्नती होण्यास तो एक प्रमुख उपाय आहे. सिंधुबंदीची ही चाल मूर्खपणाची आहे अशी मते लोकहितवादींनी मांडलेली होती, पण त्यांचे चिरंजीव कृष्णराव विलायतेहून बॅरिस्टर होऊन परत आले तेव्हा त्यांनी त्यांना घरी उतरवून न घेता त्यांची निराळ्या बंगल्यात राहण्याची सोय केली व मग रीतसर प्रायश्चित्त देऊन त्यांना पावन करून घेतले. पुढे पार्लमेंटरी फायनॉन्स कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी सरकारने त्यांना विलायतेस धाडण्याचा विचार केला तेव्हा 'धर्माच्या व जातीच्या अडचणीमुळे मला विलायतेस जाणे शक्य नाही' असे त्यांनी जाहीर रीतीने उत्तर दिले.

**मूर्तिपूजेवर लोकहितवादींचा मुळीच विश्वास नव्हता :–** मूर्तिपूजेच्या रूढीवर त्यांनी शतपत्रांतून टीका केली आहे. पण अहमदाबादेस सेशन्स जज्ज असताना नदीकाठच्या प्रत्येक देवालयात जाऊन दर्शन, पूजन ते करीत, देवाला गंधफुले वाहात आणि हे सर्व मुलाबाळांना घेऊन करीत. ब्राह्मणांच्या कर्मकांडावर त्यांनी शतपत्रांतून अगदी भडिमार केला आहे. पण स्वत: स्नानसंध्यादी सर्व कर्मठपणा ते रोज आचरीत. तो इतका की कृष्णभट पुराणिक हे पुण्याचे वेदविद्यासंपन्न वैदिक ब्राह्मण त्यांना एकदा म्हणालेसुद्धा की, 'अरे गोपाळराव, तुला रे कोण सुधारक म्हणतात? असे म्हणणारे शतमूर्ख आहेत. त्यांनी आधी येऊन तुझे पाय धरावे अशीच तुझी योग्यता आहे.' 'दंभासाठी करी

उपदेश लोकां' अशी टीका मराठी वृत्तपत्रांनी केली ती यामुळेच.

**४. ईश्वरी योजना आक्षेपार्ह :–** यापेक्षाही जास्त महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांची इंग्रजांच्या राज्याविषयीची मते. त्यातील दोन मते कोणत्याही दृष्टीने पाहिली तरी आजही आक्षेपार्ह वाटतील अशी आहेत. 'इंग्रजांचे राज्य येथे आले ते परमेश्वरी योजनेने आले.' असे लोकहितवादींनी अनेक ठिकाणी म्हटले आहे, ही गोष्ट अत्यंत विस्मयकारक होय. सर्व घटनांची कार्यकारणभावाच्या दृष्टीने मीमांसा करणाऱ्या या इतिहासपंडिताने 'ईश्वरी योजने'चा विचार मांडावा हे फार खेदजनक आहे. पण जुन्या शास्त्रीपंडितांवर, भटभिक्षुकांवर एवढा गहजब करण्याचे काय कारण होते? तेही हेच म्हणत होते. 'रावण मत्त झाला तेव्हा परमेश्वराने त्याचा नाश केला. तसेच आता होईल.' ही त्यांची श्रद्धा व 'हिंदू लोकांना ज्ञान देण्यासाठी व शहाणे करण्यासाठी परमेश्वराने इंग्रजांना धाडले व येथले कार्य झाल्यावर तो त्यांना जाण्याची आज्ञा देईल.' ही लोकहितवादींची श्रद्धा यात मुळीच फरक नाही. हिंदू लोकांना शहाणे करावे, असे परमेश्वराच्या मनात होते तर त्याने त्यांनाच बुद्धी का दिली नाही? इंग्रजांना येथे आणण्याची काय गरज होती, असा प्रश्न कोणाही सुबुद्ध माणसाच्या मनात आला असता, पण लोकहितवादींच्या मनात तो आला नाही, अशा स्थितीत समकालीनांच्या मनात त्यांच्याविषयी शंका येणे अगदी साहजिक होते.

**५. इंग्रज न्यायी, सत्यप्रिय :–** यापेक्षाही आक्षेपार्ह गोष्ट म्हणजे इंग्रजांनी हिंदुस्थानचे राज्य न्यायाने घेतले असे त्यांनी त्या राज्याचे केलेले समर्थन ही होय. भारतातील इंग्रजांच्या राज्याच्या प्रस्थापनेचा इतिहास अन्याय, जुलूम, अत्याचार, खोटेपणा, लूटमार, दरोडेखोरी यांनी भरलेला आहे हे आज लहान पोरालाही माहीतआहे. लोकहितवादी त्या काळचे इतिहासपंडित! आणि 'त्या राज्यस्थापनेचा इतिहास पाहूनच इंग्रजांनी यथान्याय राज्य घेतले आणि ईश्वराने हे राज्य त्यास अशा प्रकाराने दिले की त्यास कोणी दोष ठेवणार नाही, असे माझे मत झाले आहे.' असे ते सांगू शकतात. (पत्र क्र. ४६). हे पाहिल्यावर कोणालाही खेद वाटल्यावाचून राहणार नाही. इतिहासाचा अभ्यास करून हे मत दिल्यावर समकालीन पंडितांनी त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी सुद्धा शंका घेतली तर त्यांना दोष कसा देता येईल? इकडील देशाचे लोकांत वचनाचा प्रामाणिकपणा, खरेपणा, शूरत्व कमी, द्रव्याचा लोभ फार म्हणून इंग्रजांना हे राज्य ताब्यात घ्यावे लागले, असे लोकहितवादी म्हणतात. वॉरन हेस्टिंग्ज, क्लाईव्ह यांची चरित्रे या माहितीच्या समुद्राने वाचली नव्हती काय? अप्रामाणिकपणा,

वचनभंग, पिसाट लोभ यांनी ती चरित्रे बरबटलेली आहेत हे लोकहितवादींना माहीत नव्हते काय ? आणि माहीत असूनही त्यांनी जर इंग्रजांची अनन्वित स्तुती केली असेल व त्यांना ' ईश्वरी योजनेत ' बसविले असेल तर त्याचा अर्थ काय करावयाचा ?

**६. शिवराळ भाषा :–** लोकहितवादींची शतपत्रांतील भाषा हीही लोकांना चीड येण्यास कारणीभूत झाली. मूर्ख, टोणपे, बैल, जनावरे, पोळ अशा शिव्या त्यांनी ब्राह्मणांना व एकंदर हिंदू समाजाला प्रत्येक पत्रात दिल्या आहेत. काही ठिकाणी तर ग्राम्य शिव्याही दिल्या आहेत. भाषेतला हा प्रखरपणा, हे धैर्य त्यांनी प्रत्यक्ष कृतीत दाखविले असते तर लोकांनी ही भाषा खपवून घेतली असती. कधी कधी तिचे कौतुकही केले असते. पण कृतीची वेळ येताच प्रत्येक आघाडीवर त्यांनी माघार घेतली. त्यामुळे या प्रखर भाषेने लोकांना चेतना मिळण्याऐवजी त्यांचा तेजोभंग मात्र झाला. आणि आधीच पराभूत झालेल्या समाजाचा तेजोभंग करणे हे फार मोठे पाप होय. विष्णुशास्त्री यांनी त्यांच्यावर भयंकर भडिमार केला तो या कारणासाठी.

**७. दूषण वगळूनी :–** पण आज शंभर वर्षांनी मूल्यमापन करताना आपण हे सर्व दोष दृष्टीआड केले पाहिजेत. ' दूषण वगळुनि भूषण घेऊनि प्रभुपूजन करि काळ असे ' असे गोविंदाग्रजांनी म्हटले आहे, तेच खरे आहे आणि अशा वृत्तीने आपण लोकहितवादींच्या कार्याकडे पाहू लागलो, त्यांचे लेख वाचू लागलो, की आपण त्यांचे शतशः ऋणी आहोत आणि अनेक पिढ्या असेच ऋणी राहू याविषयी दुमत होणार नाही. समाजाचा सर्वांगीण विचार करून प्रत्येक क्षेत्रातले नेमके दोष आकळून नव्या युगाचे मार्गदर्शन करणे हे सामान्य प्रतिभेचे काम नाही. लोकहितवादींनी चाळीस वर्षे हे कार्य सतत चालविले आणि त्यामुळेच महाराष्ट्र समाजात आमूलाग्र क्रांती घडवून आणण्याचे पुढील नेत्यांचे काम जास्त सुकर झाले, यात शंका नाही.

वर त्यांच्या इतर ग्रंथांचा उल्लेख केला आहे. त्यात त्यांनी सांगितलेले विचार पाहिले म्हणजे तर आपल्या मनात याविषयी कसलीच शंका राहणार नाही. त्यांच्याविषयी समकालीन लोक साशंक होणे साहजिक आहे असे वर म्हटले आहे, पण नंतरचे त्यांचे निबंध-प्रबंध आपण वाचले म्हणजे मग तसल्या शंकांना आपल्या मनात मुळीच थारा मिळणार नाही.

**८. इंग्रज लुटारू :–** ' हिंदुस्थानास दरिद्र येण्याची कारणे ' या आपल्या पुस्तकात ज्या ब्रिटिश राज्यपद्धतींचे त्यांनी शतपत्रात गोडवे गाईले आहेत

तिच्यावर अगदी प्रखर टीका केली आहे. ‘ अदालतीचे कर लुटारूसारखे आहेत ’, ‘ या देशातील लक्ष्मी वाढण्याचा यत्न सरकार करीत नाही ’, ‘ भाड्याचा उंट, त्याजवर लादता लादता नाळी पडल्या तरी कोणी मनास आणीत नाही. एकतर्फी काम चालते ’, ‘ दिवाळखोर सरदारांचा धूर्त कारभारी जसा कारभार पाहतो, तसे इंग्रज सरकार या देशाचे राज्य चालवीत आहे.’ अशा तऱ्हेचे कडवट विचार या पुस्तकात अनेक ठिकाणी आढळतात. “ इंग्रजांनी राज्य बलात्काराने घेतले असे क्षणभर मान्य केले तरी व्यापार तर बलात्काराने घेतला नाही ना ? मग तो येथल्या लोकांना ताब्यात घेण्यास काय हरकत आहे ? ” असे एका पत्रात त्यांनी म्हटले आहे. पण व्यापार बलात्काराने घेतला नाही, हे मत भ्रामक आहे हे त्यांच्याच पुढे ध्यानात आले. ‘ येथील उदीम वाढवावे व येथे खाणी काढाव्या ते एकीकडे राहून जकातीचा कायदा ठरविण्याचे वेळी होपसाहेबांनी जे भाषण केले त्यावरून तेथील उद्योग कमी व्हावा व सुताचे कारखान्यावर कर घालून त्यास जेर करावे, उंच प्रतीचा कापूस येऊ देऊ नये. बारीक कापड येथे करतील त्यास अडचणी घालाव्या, असेच सरकारी धोरण सरकारने अवलंबिले आहे असे दिसते.’ असे त्यांनी वरील पुस्तकात म्हटले आहे व ‘ हे धोरण सर्वथैव अयोग्य आहे. परिणामी विषासारखे आहे. लोभामुळे अशी बुद्धी धरण्यात काही फायदा नाही.’ असा सरकारला इशाराही दिला आहे.

**९. ग्रामीण जनता :–** ‘ ग्रामरचना ’ ह्या निबंधात लोकहितवादींच्या मूलगामी दृष्टीचा वारंवार प्रत्यय येतो. हिंदुस्थान हा खरा खेड्यांतच आहे व त्याचे दु:खही खेड्यात आहे, हे त्यांनी जाणले होते. गरीब, कष्टाळू जनतेच्या जीवनाशी ते समरस होऊ शकत होते, हे या निबंधावरून सहज ध्यानात येते.

“ रयतेला दुसरा धंदा व दुसऱ्या कोणाचे रक्षण नसल्यामुळे सुनेला ज्याप्रमाणे कशीही सासू द्राष्ट व खाष्ट असली तरी तिच्या हाताखालीच नांदावे लागते, तद्वत् सरकारने कसेही वागविले व तरवारीच्या धारेवर धरले तरी खाली मान घालून सरकारचा अधिकार व कबजा रयतेला मानावा लागतो, पण रयत नादान व सर्वांशी परावलंबी झाली म्हणून तिच्या सौख्याकडे इतके दुर्लक्ष करणे किंवा तिच्या ओरडण्याकडे इतके उदासीनतेने पाहणे चांगले नाही. रयत जी आज गांजल्यासारखी व त्रस्त झाली आहे याचे कारण आहे की, सारे, धारे व करपट्ट्या यांचे ओझे रयतेला उचलेना इतके जड झाले असल्यामुळे ती त्या ओझ्याखालीच गारद होत आहे.” या उद्गारावरून जनतेचे दु:ख त्यांच्या किती जिव्हारी लागले होते हे कळून येईल.

इंग्रजी सत्ताधाऱ्यांची लुटारू वृत्ती, येथला व्यापार, येथली कारखानदारी नष्ट करून हा देश स्मशानवत करून टाकण्याचे सरकारी धोरण व खेड्यांतही जनतेची इंग्रजांनी चालविलेली पिळवणूक, ही जनतेच्या ध्यानी आणून देऊन तिच्या ठायी भयंकर असंतोष निर्माण करावयाचा हे धोरण अवलंबूनच विष्णुशास्त्री, टिळक यांच्या राष्ट्रीय पक्षाने स्वातंत्र्याच्या लढ्याची मुहूर्तमेढ रोविली होती. लोकहितवादी आपल्या उत्तरवयात का होईना कृतीने नाही पण निदान विचाराने तरी याच राष्ट्रीय वृत्तीशी येऊन ठेपले होते हे त्यांच्या या प्रबंधावरून दिसून येते. (हा प्रबंध त्यांनी १८८३ साली लिहिला. लोकमान्य टिळकांनी हे विचार सांगण्यास १८८१ सालीच प्रारंभ केला होता.)

## सारार्थ

लोकहितवादी यांच्या समाजजीवनाच्या भिन्न अंगांविषयीच्या मतांचा येथवर परामर्श घेतला. त्यांच्या सर्व तत्त्वज्ञानाचा सारार्थ आता सांगावयाचा, पण तो त्यांनीच एका पत्रात मांडला आहे. तेव्हा तोच येथे देणे सयुक्तिक होईल. ‘ हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे ’ या पत्रात त्यांनी त्याविषयीची आपली मते मांडली आहेत. आणि त्याला ‘ हिंदुनाशाष्टक ’ असे नाव दिले आहे.

**हिंदुनाशाष्टक :–** त्यांच्या मते पांडवांच्या काळी हिंदू लोक फार ऐश्वर्यास चढले होते. अनेक विद्या, कला त्यांनी हस्तगत केल्या होत्या. त्या समाजात व्यास, वाल्मीकी, कपिल, नारद, अर्जुन यांसारखे थोर पुरुष उदयास आले होते. त्या काळी संपूर्ण जगतात ऐश्वर्यवान असा देश एवढाच होता. पण पुढल्या काळात या ऐश्वर्यामुळेच लोक आळशी झाले आणि त्यांनी विद्येची उपासना सोडून दिली. त्यामुळे संस्कृत भाषाही मागे पडली. प्राकृत भाषा उदयास आल्या. (१) पण या प्राकृत भाषांत संस्कृतसारखे ग्रंथ नाहीत, आणि हेच हिंदू लोकांच्या नाशाचे पहिले कारण होय. (२) दुसरे कारण असे की कालेकरून लोकांत असा समज रूढ झाला की, ज्यांनी संस्कृत ग्रंथ लिहिले ते देव होते आणि तसे ग्रंथ लिहिणे हे मनुष्याचे काम नव्हे. (३) तिसरे कारण असे की ब्राह्मणत्व हे विद्येवर न ठरता कुळावर ठरू लागले. त्यामुळे ब्राह्मणांच्या कुळात जन्मला त्याला, विद्या केली नाही तर नीचत्व येईल, हे भय राहिले नाही. जन्म ब्राह्मणकुळात झाला तेव्हा विद्या शिकलो न शिकलो तरी सारखेच असे त्याला वाटू लागले. इतर जातीचे लोक कुळामुळेच मला पूज्य मानून माझ्या पायाचे तीर्थ घेतील. (४) चवथे कारण म्हणजे परदेशगमनाचा निषेध. देशातच राहिले पाहिजे, बाह्यदेशी जाऊ नये असा

प्रतिबंध पूर्वीच्या लोकांनी काही कारणांनी घातला असेल, पण त्याचा हेतू न समजून पुढचे लोक त्यालाच धर्म समजू लागले. (५) पाचवे कारण म्हणजे कलियुग कल्पना. या कलियुगात समाजाचा नाशच व्हावयाचा. दुर्गुण प्रवृत्ती वाढावयाचीच. ईश्वरी संकेत तसाच आहे, असे भय शास्त्रकारांनी घातले व ते खरे मानून लोक हाय खाऊन बसले. (६) सहावे कारण म्हणजे प्रारब्धवाद किंवा दैववाद हे होय. परमेश्वर प्रत्येकाचे नशीब त्याच्या जन्माबरोबर लिहून ठेवतो. काही केले तरी ते फिरावयाचे नाही, अशीच लोकांची बुद्धी होऊन बसली. त्यामुळे उद्योगाचा उत्साह नष्ट झाला. (७) सातवे कारण असे की पूर्वीचे शास्त्रकार हे देव असल्यामुळे त्यांनी लिहिलेले प्रमाण मानले पाहिजे असा समज रूढ झाला. त्यामुळे नवीन मार्ग निघेनासा झाला. (८) धर्माविषयी विपरीत कल्पना हे आठवे कारण होय. चालरीत यालाच लोक धर्म समजू लागले. ईश्वरभक्ती हाही धर्म आणि पागोटे, अंगरखा, धोतर हाही धर्मच.

या कारणामुळे हिंदू लोकांतील जागृती नष्ट झाली. आपल्या देशावर राज्य कोण करतो याचीही खबर त्यांस नसे. त्यामुळे मुसलमानांनी हा देश जिंकला आणि शास्त्री, पंडित, भट हे त्यांचीच खुशामत करून पोट भरू लागले. ब्राह्मण लोक घरात पुष्कळ सोवळे करतात. यवनांचा विटाळ मानतात, पण त्यांना राज्य करावयास त्यांनी हरकत केली नाही. उलट राज्य करणे, पराक्रम करणे हे काम मुसलमानांचेच होय, हिंदूंना ते जमणार नाही असे ते म्हणू लागले. घरात त्यांनी सोवळे केले पण देश सोवळा राखावयालाच ते विसरले. जो तो आपला स्वार्थ पाहू लागला. अशामुळे मुसलमानांचे राज्य चालले. त्यानंतर इंग्रज आले, पण ते कोठले कोण याचा अजूनही या लोकांस पत्ता नाही. अशा विपरीत बुद्धीमुळे या समाजाचा नाश झाला यात नवल काय ? (पत्र क्र. ४५) या सारखेच विचार लोकहितवादींनी ‘ जुन्या समजुती ’ (पत्र क्र.८) व ‘ स्वदेशप्रीती ’ (पत्र क्र. ६७) या पत्रात मांडले आहेत. यात हिंदूंच्या अवनतीची कारणे त्यांनी मांडली आहेत. आणि ‘ ज्ञान हाच पराक्रम ’ (पत्र क्र. ८५). ‘ नवीन ग्रंथांची आवश्यकता ’ (पत्र क्र. ९३), ‘ धर्म सुधारणा ’ (पत्र क्र. ६४), ‘ लग्नाविषयी विचार ’(पत्र क्र. १५), ‘ राज्यसुधारणा ’ (पत्र क्र. २५), ‘ हिंदू लोकांनी काय करावे (पत्र क्र. ६०) या पत्रात ही अवनती थांबवून या समाजाची सुधारणा करण्याचे जे उपाय ते त्यांनी सांगितले आहेत.

लोकहितवादींच्या विचारधनाचा प्रपंच येथवर केला. आता त्यांच्या लेखनशैलीचा विचार करून हे प्रदीर्घ विवेचन संपवू.

## लोकहितवादींची लेखनशैली

**१. स्वतंत्र चिंतन करण्याचे सामर्थ्य :–** लोकहितवादींची ' शतपत्रे ' सहज वरवर चाळली तरी भारतात कित्येक शतके दुर्मिळ असलेले स्वतंत्र चिंतन करण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले होते, हे दिसून येते. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे हिंदू लोक शतकानुशतके एक प्रकारच्या बौद्धिक कैदेत होते. स्वातंत्र्य गेले, नाना देशचे लोक येथे राज्य करू लागले, व्यापार हातचा गेला, देश दरिद्री झाला, धर्माला ग्लानी आली, लक्षावधी लोक परधर्मात गेले तरी या काय घटना घडत आहेत, याचा अन्वयार्थ काय, यातून निष्पन्न काय होणार याविषयी विचार करण्याची व देशाच्या परिस्थितीचे निदान करण्याची ऐपतच येथे कोणाच्या बुद्धीला नव्हती. सद्दी, नशीब, परमेश्वरी क्षोभ यापलीकडे या अवनतीला काही कारणे असू शकतील हे कोणाच्या स्वप्नातही आले नाही. लोकहितवादींना परिस्थितीचे नव्या दृष्टीने आकलन करताआले याचे कारण म्हणजे त्यांनी उपासिलेली इंग्रजी विद्या हे होय. ती सरस्वती प्रसन्न होताच त्यांच्या बुद्धीवरच्या शृंखला तुटून पडल्या व प्रत्येक गोष्टीकडे भौतिक कार्यकारणाच्या दृष्टीने ते पाहू लागले आणि राजसत्ता ही देशाला घातक आहे, लोकांची सत्ता ही उपकारक आहे, आपला उत्कर्ष तिच्यामुळेच होईल, चातुर्वर्ण्य, जातिभेद यामागील तत्त्वे भ्रामक असून इतर जातींनी विद्या केल्यास त्यांची योग्यता ब्राह्मणांइतकीच ठरेल. विद्या ही सर्वांना हक्काने मिळाली पाहिजे, एकट्या ब्राह्मणांचीच ती मक्तेदारी असता कामा नये, स्त्रियांची प्रतिष्ठा संसारातल्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषाइतकीच मानली पाहिजे, जे लोक स्त्रियांना शहाण्या करीत नाहीत त्यांचा अध:पात होतो इत्यादी अनेक क्रांतिकारक विचार त्यांच्या मनात येऊ लागले. आपल्या देशाचा अध:पात झाला तो शब्दप्रामाण्यामुळे, धर्माविषयीच्या विपरीत कल्पनांमुळे, जातीय विषमतेमुळे, उद्योगहीनतेमुळे अशी स्वतंत्र मीमांसा ते करू शकले, यातच त्यांचे स्वतंत्र विचार करण्याचे सामर्थ्य दिसून येते.

**२. निर्भय प्रतिपादन :–** याच्या जोडीला हे स्वतंत्र विचार निर्भयपणे मांडण्याचे मनोधैर्य त्यांच्याजवळ होते, हे आपण आपले मोठे भाग्य मानले पाहिजे. आपल्या विचाराप्रमाणे कृती करण्याचे धैर्य त्यांच्या ठायी नव्हते. त्यामुळे त्यांचे नवे विचार अत्यंत हितकारक असूनही त्यांची उपेक्षा होऊन समाजाचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे ते विचार लोकांपुढे मांडण्याचे धैर्यही त्यांनी दाखविले नसते तर एवढ्या क्रांतिकारक विचारधनाला समाज मुकला असता, पण तसे झाले

नाही. तो निर्भयपणा लोकहितवादींच्या ठायी होता त्यामुळेच वेद, पुराणे, स्मृती यांचे प्रामाण्य झुगारून द्या व स्वत: विचार करा असा उपदेश ते समाजाला करू शकले. बालविवाह, पुनर्विवाह, अस्पृश्यता, परदेशगमन असल्या विषयांवर त्यांनी रूढीच्या सर्वस्वी विरुद्ध असे विचार मांडले आहेत. ‘शास्त्रार्थ हा लोकांच्या हिताच्या विरुद्ध असला तर शास्त्राज्ञा मानण्याची जरुरी नाही. शास्त्र म्हरजे लोकांस सुख होण्याकरिता रीत घातली आहे. त्यातून जर काही विपरीत असेल तर एकीकडे ठेवल्यास चिंता नाही, साक्षात ब्रह्मदेव विरुद्ध असला तरी डगमगू नये’ असे अत्यंत नास्तिक वाटणारे विचार त्यांनी अनेक पत्रांतून मांडले आहेत. ब्राह्मणांची विद्या म्हणजे केवळ तोंडाची मजुरी आहे. ब्राह्मणांना दान देण्यापेक्षा चार मजूर लावून लाकडे तोडून घ्यावी, ते बरे. त्यांची विद्या ही अज्ञान अमर करण्यासाठीच निघालेली आहे, अशी मते शंभर वर्षांपूर्वी मांडणे फार कठीण होते. पण लोकहितवादी ती मांडताना कचरले नाहीत. शास्त्रीपंडितांची निंदा, त्यांच्यावरची प्रखर टीका एक वेळ खपून गेली असती, पण त्याबरोबरच महाराची योग्यता असेल तर त्यालादेखील नमस्कार करावा, कैकाडी, कातोडी यांनाही लोकसभेत स्थान द्यावे, असे सांगितल्यामुळे त्या काळी सवर्ण समाजाचा किती संताप झाला असेल याची आपल्याला सहज कल्पना येईल. आज कायद्याने अस्पृश्यता नष्ट झालेली असतानाही अस्पृश्यांची कोठलीच तक्रार निर्मूलन झालेली नाही इतका त्या रूढीचा प्रभाव आहे. शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी तो याच्या शतपट सहज असेल. पण लोकहितवादींनी त्याला भीक घातली नाही व साहसीपणाने आपले त्या विषयावरचे विचार मांडले हे आपले मोठे सुदैव होय.

**३. गाढ व्यासंग :–** स्वतंत्र चिंतन करण्याचे सामर्थ्य व त्या चिंतनातून निघणारे निष्कर्ष समाजापुढे मांडण्याचे नीतिधैर्य लोकहितवादींना प्राप्त झाले ते त्यांच्या गाढ व्यासंगामुळेच होय. अशा तऱ्हेची विद्येची अभिरुची हीही त्या काळी आपल्या समाजात दुर्मिळ होती. विष्णुशास्त्री यांनीसुद्धा म्हटले आहे की, जुन्या काळच्या पंडितांस विद्येची अभिरुची म्हणजे काय याची कल्पनाच नव्हती. पण लोकहितवादी इंग्रजी पंडित होते. जगातील घडामोडींविषयीची, त्यांच्या मागल्या कारणपरंपरेविषयीची, तत्त्वज्ञानाविषयीची तीव्र जिज्ञासा लोकहितवादींच्या ठायी होती. इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, संस्कृत विद्या इत्यादी विषयांचा त्यांनी फार सखोल अभ्यास केला होता. कोणत्याही विषयावर मत देण्यापूर्वी ते त्याचा सांगोपांग अभ्यास करीत असत. आणि इतिहास, अर्थशास्त्रादी शास्त्रे, थोरांची चरित्रे यांच्या आधारेच स्वमताची मांडणी करीत असत. इंग्रज पूर्व काळी रानटी

अवस्थेत होते, रूम देशात त्यांना गुलाम म्हणून फुकट घेण्यासही कोणी तयार नसत, अशी स्थिती असताना आज ज्ञानाच्या व उद्योगाच्या बलावर ते एवढ्या उन्नत दशेस येऊन पोचले, हे सांगताना त्या देशाच्या इतिहासाचा समग्र चित्रपट त्यांच्या डोळ्यांसमोर उभा असलाच पाहिजे. आपल्याकडील प्राचीन इतिहासाचा आढावाही ते असाच सहज दोन-चार वाक्यांत घेतात. पांडवांच्या काळी हा देश ऐश्वर्यसंपन्न होता असे त्यांचे मत होते. त्यानंतर विद्येची अभिरुची लोपत चालली व सर्व अंधार झाला, हे सांगताना हे कसकसे घडत आले याचे त्यांनी जे वर्णन केले आहे ते त्यांच्या या विषयाच्या अभ्यासाची साक्ष देईल. अर्थशास्त्राविषयीचा त्यांचा अभ्यास तर फारच सूक्ष्म होता. त्यांच्या आधीच्या बंगाली पंडितांनाही ब्रिटिश भांडवलशाहीचे जे भयाण रक्तशोषक रूप कळले नव्हते ते यांनी बरोबर आकळले होते आणि स्वदेशी व बहिष्कार हाच त्यावर उपाय आहे हेही बरोबर जाणले होते. युरोपीय देशांतील गेल्या शतकातील आर्थिक घडामोडींचे सूक्ष्म ज्ञान आल्यावाचून असे अचूक निष्कर्ष काढणे कोणालाच शक्य झाले नसते. संस्कृत विद्येची त्यांनी फारच हेटाळणी केली आहे. पण ती उत्तर काळच्या संस्कृत विद्येची. प्राचीन काळची संस्कृत विद्या कशी जिवंत होती, ज्योतिष, वैद्यक, गणित, धर्म, इत्यादी शास्त्रांत त्यावेळी मौलिक संशोधन कसे चालत असे त्याचे यथायोग्य मूल्यमापन लोकहितवादींनी केलेले आहे. त्यावरून त्या विद्येच्या अभ्यासाची त्यांनी हेळसांड मुळीच केली नव्हती, हे स्पष्ट दिसून येते.

**४. मतपरिवर्तनाचा मार्ग :–** लोकहितवादींची मते अत्यंत क्रांतिकारक अशी होती. प्रत्येक क्षेत्रात रूढ मतात व त्यांच्या मतात दोन ध्रुवांइतके अंतर होते, तरी लोकांची सुधारणा करावयाची ती लोकांच्या मनाची खात्री करून देऊन, त्यांचे मतपरिवर्तन घडवून करावयाची, हेच धोरण, यांना मान्य होते, आणि तेच त्यांनी अवलंबिले होते, हे शतपत्रांतील पानापानांवर दिसून येते. ते म्हणतात, 'केवळ जबरदस्तीने लोकांकडून पूर्वीपासून चालत आलेली चाल मोडवून नवी रीत काढणे हे योग्य नाही. अशा गोष्टी लोकांच्या समजुतीने मोडाव्या हे बरे. कोणी म्हणतील की, हिंदू लोक इतके शहाणे नाहीत. तरी काय चिंता आहे ? आजचे उद्या होईल, पण आणखी आणखी सरकारचे हातात जाणे (कायद्याने सरकारी साह्याने सुधारणा घडविणे) हे त्या उशिरापेक्षा वाईट व जे जबरीने चालू झाले त्याचा खचितपणा नाही. ज्या काळी जबरी एकीकडे होईल तेव्हा लोक पुन्हा पूर्वीप्रमाणेच करू लागतील. तेव्हा उत्तम मार्ग हाच की ही गोष्ट लोकांच्या मनात अनेक तऱ्हेने भरवून द्यावी. स्वसंतोषाने लोक समजू लागले म्हणजे पहिली चाल

मोडून नवी करतील. हे काम समंजस पंडित आहेत त्यांचे आहे.' (पत्र क्र. ७). सुधारणा करण्याचे काम सरकारचे नव्हे, पंडितांचे आहे, ही जाणीव ठेवूनच लोकहितवादींनी 'शतपत्रे' लिहिली आहेत. या पत्रांत ते इतिहासाच्या आधारे बोलतात. तर्कबुद्धीला आवाहन करतात. लोकांच्या भावनांना जागृत करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना हात जोडून विनवितात आणि फारच उद्वेग आला तर त्यांना शिव्याशापांची लाखोली वाहतात, पण सुधारणा दंडबलाने घडवून आणाव्या असे त्यांनी चुकूनसुद्धा कोठे म्हटलेले नाही. या देशात पार्लमेंट हवे, येथला कारभार लोकांच्या संमतीने चालावा व तो लोकांनीच जास्तीत जास्त अंगावर घ्यावा, अशी मते त्यांनी अन्यत्र मांडली आहेत; त्यांशी सुसंगत अशाच मतपरिवर्तनाच्या मार्गाचा त्यांनीही आपल्या लेखनात अवलंब केला आहे.

**५. प्रखर, जहरी, कडवट भाषा :–** असे लेखन करीत असताना अनेक ठिकाणी त्यांनी अत्यंत जहरी व प्रखर भाषा वापरली आहे हे खरे. ब्राह्मण म्हणजे शुद्ध बैल आहेत. शास्त्रीपंडित, भटभिक्षुक ही केवळ जनावरे आहेत, हिंदू लोक अगदी मूर्ख, भेकड आहेत, सरदार हे मोकाट सोडलेल्या पोळासारखे आहेत, असे दर पत्रात ते लिहितात. स्वकालीन ब्राह्मणांबद्दल लिहिताना किती खालच्या पातळीवर जाऊन लिहावे याचा त्यांना सुमारच राहात नाही. हे शास्त्री-पंडित सर्व मेल्यावाचून समाजाची सुधारणा होणार नाही, असे त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. ते पोटभरू आहेत, बहुरूपी सोंगाडी आहेत, चित्रकथी त्याहून बरे, हिंदू लोकांचे दुर्भाग्य म्हणून ते शास्त्रीपंडित यांचे पुढारी झाले, लोकांत भ्रांती उत्पन्न करावी एवढाच त्याचा उद्योग, या तर नित्याच्याच शिव्या आहेत. लोकहितवादींच्या विचारधनाची पातळी इतकी उंच आहे की, त्याचा आविष्कार करताना त्यांनी या तऱ्हेची भाषा वापरावयास नको होती, असे शतपत्रे वाचताना वारंवार मनात येते. काही ठिकाणी त्यांनी जे अगदी ग्राम्य शब्द वापरले आहेत ते तर अगदी निषेधार्ह वाटतात. पर समाजाच्या उन्नतीची त्यांना जी तळमळ वाटत होती, तीच त्याच्या बुडाशी आहे हे जाणून आपण हा दोष दृष्टीआड केला पाहिजे. केव्हा केव्हा असेही वाटते की असे मर्माघाती वाग्बाण लोकहितवादींनी सोडले ते अवश्यच होते. त्यावाचून अजगरासारखा घोर निद्रेत पडलेला हा समाज जागा झाला नसता; पण असा मर्माघात करणाऱ्या मनुष्याच्या लेखनाला जी प्रतिष्ठा प्राप्त व्हावयाची ती लोकहितवादींनी कृतीचा प्रसंग येताच जी माघार घेतली तिच्यामुळे झाली नाही. नाहीतर त्यांच्या याच लेखनाला एक भास्करदीप्ती येऊन समाजाने त्यांची प्रशंसा केली असती.

**६. तळमळ :–** पण लोकहितवादींचे हे लेखन समाजाविषयीच्या तळमळीतून निर्माण झालेले आहे हे मात्र आपण क्षणमात्रही विसरू शकत नाही. बालविवाह, विधवाविवाहबंदी, सती या दुष्ट रूढींनी गांजून गेलेल्या स्त्रीवर्गाविषयी त्यांना जी अपार सहानुभूती वाटते, वैधव्याच्या खाईत जन्म काढणाऱ्या दीन कन्यकांविषयी त्यांच्या चित्तात जे वात्सल्य ओसंडून येते ते याविषयीच्या प्रत्येक पत्रात व्यक्त होते. विधवांचे ते नरकसम जिणे पाहून ते अगदी आक्रोश करून सांगतात की, 'अहो, लोकांनो, तुम्ही आपल्या कन्यांचे वध करणारे आहेत. तुमची ही कृती खाटकासारखी आहे. आपल्या लहान, अर्भक बालाविषयी तुम्ही आपल्या मनात निष्ठुरपणा का आणता? स्त्रियांना ज्ञान असते तर त्यांनी या शास्त्रीपंडितांच्या श्रीमुखात दिली असती. सती जावयास सांगणाऱ्यांच्या त्यांनी शेंड्याच उपटल्या असत्या. पूर्वी दैत्य व राक्षस होते ते असेच असतील!' स्त्रियांचे हाल पाहून त्यांना संताप येतो आणि मग ते शंकराचार्यांनाही भीत नाहीत की मनूचीही प्रतिष्ठा ठेवीत नाहीत. 'मनू जर ईश्वरांश असता तर स्त्रीचा नवरा तिच्या तरुणपणी मरू नये अशी व्यवस्था त्याने का केली नाही?' असा प्रश्न ते विचारतात. व्यापार, उद्योगधंदे, कारागिरी हे सर्व नष्ट झाल्यामुळे या देशातील जनतेला जे दैन्य आले, ते पाहूनही त्यांचे हृदय तिळतिळ तुटते. येथे इंग्रजी राज्यच काही काळ राहावे, येथल्या लोकांचे राज्य लवकर होऊ नये, असे ते म्हणतात त्यामागे हीच भावना आहे. येथल्या राजांचे, सरदारांचे राज्य झाले की, ते पुन्हा गरीब रयतेचे काळ होतील. ठग, पेंढारी बाळगून तिला लुटतील हीच भीती त्यांना वाटे. इंग्रजांनी ही पेंढारशाही नष्ट केली होती. अंदाधुंदी मोडून काढली होती. म्हणून त्यांचे राज्य हितावह असे त्यांना वाटे. लोक शहाणे होऊन राज्यकारभार करण्यास लायक झाले म्हणजे तेच इंग्रजांस जावयास सांगतील व तेव्हा ते न गेले तर येथे क्रांती होईल असे लोकहितवादींनी बजाविले आहे. तेव्हा लोकांच्या, दीनदलितांच्या, गरीब रयतेच्या, हतभागी स्त्रियांच्या उन्नतीची चिंता हीच त्यांच्या 'शतपत्रां'च्या मागची प्रेरणा आहेत, याबद्दल शंका घेण्यास जागा नाही.

**७. पहिले निबंधकार :–** या सर्व दृष्टींनी पाहता मराठीतले पहिले निबंधकार हे मानाचे पद लोकहितवादींना द्यावे असेच कोणालाही वाटेल. आणि भौतिक कार्यकारणमीमांसा, तर्कशुद्ध प्रतिपादन, इतिहास, चरित्र व इतर शास्त्रे यांतून आधार - प्रमाणे देण्याची वृत्ती, लोकशिक्षणास अवश्य तो आत्मविश्वास, हे सर्व गुण असल्यामुळे निबंधकार ही पदवी त्यांना द्यावयास पाहिजे यात शंका नाही; पण यात एक न्यून आहे आणि ते फार मोठे आहे. ते म्हणजे शतपत्रांतील

त्यांचे पुष्कळसे लेखन सूत्ररूपाचे, त्रुटित स्वरूपाचे आहे. विषयाचा विस्तार करावा, त्याचा सर्वांगीण प्रपंच करावा, शाखापल्लवांनी, पुष्पफळांनी वृक्ष डवरतो तसा विचार डंवरून आणावा; तुलना, खंडन, मंडन, आक्षेपनिरसन, नाना प्रकारचे कोटिक्रम, भिन्न दृष्टिकोनांतून एकाच विचाराकडे पाहणे, तो पिंजून काढणे यांनी निबंध खरा सिद्ध होत असतो. तो प्रकार शतपत्रांत अगदी अपवादाने दिसतो. विधान करणे, सिद्धान्त मांडणे व फार तर स्पष्टीकरण करणे यापलीकडे लोकहितवादी जात नाहीत. विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर, राजवाडे यांनी विषयाचा जो प्रपंच केलेल आहे तसा शतपत्रांत मुळीच दिसत नाही. म्हणून पहिले निबंधकार ही पदवी विष्णुशास्त्र्यांना देतात, लोकहितवादींना देत नाहीत. निबंधवाङ्मयाची सर्व बीजे त्यांच्या लेखनात आहेत, पण बीज रुजून त्यातील गुणांचा भव्य आविष्कार झाल्यावाचून त्याला वृक्ष म्हणत नाहीत.

या आविष्कारात भाषेच्या वैभवालाही महत्त्वाचे स्थान आहे. शुद्ध, प्रौढ, पल्लेदार, प्रवाही, ओघवती भाषा हे निबंधाचे मोठे वैभव असते. लोकहितवादींच्या शतपत्रांत त्याची फार उणीव आहे आणि ती पदोपदी भासते. व्याकरणशुद्ध भाषा लिहिण्याचीसुद्धा ते कसोशी करीत नाहीत. कर्ता-कर्म-क्रियापदाचा मेळ घालण्याचीही ते फारशी काळजी घेत नाहीत. मग एका मागोमाग एक प्रौढ, पल्लेदार वाक्ये फेकून वाचकाला त्याच्या मोहिनीत पकडून आपल्या मताच्या पायाशी आणून उभे करणे हे त्यांना कसे जमणार ? व्याजोक्ती, वक्रोक्ती, उपहास, विनोद, व्यंजना, समर्पक उपमा, दृष्टांतादी अलंकार, यांनी प्रतिपादनाची शोभा वाढविण्याचे व त्यातील तर्काची पकड घट्ट करण्याचे सामर्थ्य लोकहितवादींच्या ठायी नाही. मनातला अर्थ सरासरी व्यक्त करावा एवढाच त्यांच्या शतपत्रांतील भाषेचा मगदूर आहे. त्यामुळे मराठीतील आद्य निबंधकार ही प्रतिष्ठा त्यांना दिली जात नाही. पण नवयुगप्रवर्तनाच्या कार्यात पुढील थोर तत्त्ववेत्त्यांचे हे जसे पूर्वगामी आहेत त्याचप्रमाणे निबंधरचनेच्या कार्यातही आहेत यात शंका मात्र नाही.

# १. विद्या

## शतपत्रांचा इत्यर्थ

■

**पत्र नंबर : १००**

मी आपले श्रम या पत्रांत संपूर्ण करणार. यास्तव या लिखित पत्रशतकाविषयी काही सुचवतो.

आज दोन वर्षे मी लोकांस त्यांची स्थिती, रीती कशी आहे ती अगदी भीड न धरितां उघड करून सुचविली. त्यात एखादे अक्षर अधिकउणे, शुद्ध-अशुद्ध, कोणास वाटले तर त्यांनी क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे की, जो कोणी पत्रांचे अवलोकन करील आणि विचार करून पाहील, त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असे वाटेल. लोकहितवादीने कोणाची मजुरी पत्करली नाही, कशाची अपेक्षा; आशा किंवा इच्छा धरली नाही. कोणाचे सांगण्यावरून किंवा शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केले नाही. लाभावर किंवा द्रव्यावर नजर ठेवून कीर्ती व्हावी या हेतूने लिहिले नाही. इतके श्रम जे केले ते लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी. त्यांनी सुधारावे, त्यास इहलोकी सुखवृद्धी व्हावी. परलोकाचे साधन घडावे, व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत यांपैकी काही अविचाराने व काही मूर्खपणाने जडलेले आहेत ते कमी व्हावे; किंवा नाहीसे व्हावे, इतक्याच हेतूने मी यथामतीने व स्वइच्छेने वेतनावाचून श्रम केले आहेत व जितके लिहिले आहे तितके अक्षरशः खरे खरे निवडून विचार करून काळजीने लिहिले आहे. हे सर्व लोकांस नजर आहे.

हे लिखित शतक कोणी बाळबोध अथवा मोडी छापून मुलास लिखितासारखे वाचनास दिले तर बहुत नफा होईल. यास्तव या ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाही. पाहिजे त्यांनी ही पत्रे छापून प्रगट करावी. किती एक प्राचीन काळचे लोकांस किती एक लोकहितवादीची मते विपरीत व हिंदुधर्मास विरुद्ध भासतील, परंतु हा त्यांचा मिथ्या भास आहे;

कारण की, त्यात हिंदुधर्मास काही विपरीत नाही. फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे. याविषयी विचार केला तर खात्री होईल. यापुढे काही दिवसांनी लोकहितवादी दुसऱ्या शतकास आरंभ करील; परंतु ही गोष्ट ईश्वराचे स्वाधीन आहे. मला वारंवार इतकेच लोकांस सुचवावयाचे की, मी काही व्यर्थ, मिथ्या किंवा असत्य, लिहिले नाही. जे लिहिले ते यथार्थ आहे, असे मला तर खचित वाटते. जे सारासार विचार करणारे, व ज्यांची मने पंडितांसारखी कुत्सित नसून विस्तीर्ण झाली आहेत त्यांस हे समजेल.

माझी सर्व जनांस एवढीच विनंती आहे की, तुम्ही सर्व जण विचार करण्यास लागा, वाचावयास लागा, नवीन ग्रंथ व वर्तमानपत्रे वाचा व तुमचे शेजारी काय होत आहे याचा विचार करा. इंग्रजांमध्ये किती एक चांगले गुण आहेत व ते तुम्हांस प्राप्त व्हावे म्हणून ईश्वराने त्यांची तुमची संगत घातली आहे हे लक्षात आणा. सारासार पहा, परंपरा आंधळ्याची माळ लावली म्हणून तीच चालवू नका, धर्मशील ईश्वरतत्पर व्हा. या गुणांवाचून सर्व व्यर्थ आहे. सत्य बोला, दुष्ट वासना सोडा, धर्मसुधारणा करा, म्हणजे धर्म टाकू नका. परंतु त्याचा अर्थ घ्यावयाचा तसा काळ पाहून घ्या. व ईश्वरासंबंधी व जगासंबंधी ज्ञान सर्व लोकांस वृद्धिंगत करा. आळस सोडा, तुमच्यामध्ये वास्तविक बुद्धिमान असेल त्यांस पुढारी करा. त्याचे अनुमताने चाला. सर्व लोकांची जूट असू द्या, आपसांत फूट नसावी हे ध्यानात वागवा. विद्या अधिक होऊन तुमचे पाऊल पुढे पडू द्या. सर्व देशाची काळजी प्रत्येक जणाने करावी. राज्य कसे चालले आहे व राजा कोण, त्याची वर्तणूक कशी हे पाहत जा. माहीतगार व्हा.

तुमच्या प्राचीन काळच्या विद्या, ग्रंथ, तर्क व कल्पना यांचे शंभरपट आता चांगल्या विद्या व अधिक कल्पना निघालेल्या आहेत, त्या सर्व पहा. तुमचे संपत्तीवर तुम्ही लक्ष देऊन आळसात राहू नका. भट व पंडित हे केवळ मूर्ख हे पक्के समजा. खरी नीती कोणती ते पहा. पैसा खाऊ नका, रांडबाजी करू नका. प्रपंच, संसार भलाईने करा, आपले शत्रूसदेखील वाईट इच्छू नका, शरीराने व मनानेदेखील पाप करू नका. प्राणिमात्रावर दया करा, अपराध क्षमा होतील तितके करा, परंतु क्षमा न करण्याचा प्रसंग येईल तेथे क्षमा करू नका, एकमेकांवर प्रीती करा, नित्य उठून ईश्वराचे भजन व प्रातःकाळी चिंतन करीत जा, त्याजवळ क्षमा मागा, आपले हातून पापे व अपराध बहुत घडतात. त्यांची क्षमा भगवंताशिवाय करणार समर्थ कोणी नाही. ढोंग, सोंग करू नका, लबाडी सर्वदा ईश्वरास दिसती, यास्तव कदापि करू नका. कोणचेही पाप

करू नये, ते फार वाईट, इहलोकी क्षणभर सुख वाटेल, परंतु त्याचा झाडा द्यावा लागेल. मरावयाचे आहे, हे नित्य मनात आणा.

तुम्ही आपले मुलांची काळजी करून त्यास शहाणी करा, व सर्व लोकांची काळजी करा. नित्य काही तरी सर्व देशाचे कल्याण केल्याशिवाय एक दिवस जाऊ देऊ नका. मुख्य ईश्वरभजन करण्याचा मार्गच आहे की, कोणास दुःख देऊ नये, व सर्व लोकांचे हित करावे, स्वदेशाचे हित इच्छावे, आणि परदेशाची हानि इच्छावी असे नाही. परंतु सांप्रत आपले लोक फार वाईट अवस्थेत आहेत, सबब फार खबरदारी ठेवली की, या लोकांचे कल्याण होईल, तुम्ही आपल्यास योग्य करा, अब्रू वाढवा. पैका मिळाला तर अब्रू वाढते, असे नाही. अब्रू, खरेपणा व निर्मळपणा यापासून उत्पन्न होते.

विद्या केली तर त्याप्रमाणे वागणूक पाहिजे. नाही तर विद्या व्यर्थ आहे. विद्येचे सार्थक रोजगार नव्हे. ज्यांस विद्येचा अर्थ ठाऊक नाही, ते असे म्हणतात. परंतु फक्त पोटच भरणारी विद्या नव्हे, ती मजुरी आहे. विद्या म्हणजे ज्ञान, जेणेकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो; उनाड जे लोक आहेत ते विद्येचे तात्पर्य द्रव्य मिळविण्याचे असे समजतात, परंतु विद्येपासून द्रव्यलाभही होतो व दुसरे अनेक लाभ होतात.

याप्रमाणे तात्पर्य मी निरूपण केले. याप्रमाणे सर्वांनी चालावे आणि असे होण्यास माझे श्रम काही उपयोगी पडले असे दृष्टोत्पत्तीत आल्यास माझे श्रम परिहार होतील. माझे मागणे सर्व लोकांस आहे की, मी जे लिहिले आहे त्याचा विचार करून पहा. तुमच्या चांगल्यावाचून त्या लिहिण्याचा हेतू नाही. तुमचे कल्याण व्हावे म्हणून मी झटतो व तुमच्या चुका वगैरे उघड करून दाखविण्यात तुम्हास रागरोष येईल हे मी मनात आणले नाही. कारण की, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे फार आहे. माझे अंतःकरण सर्व तिकडे आहे. यास्तव मी जे लिहिले आहे, त्याचा तुम्ही विचार करावा. कारण की, जाणे तुमची सेवा एकनिष्ठेने व निष्कपटपणाने केली त्याजवर तुमची इतराजी नसावी. किंबहुना तो काय बोलतो, हे तरी मनन करावे. अस्तु. तुमची आमची गाठ आज दोन वर्षे सतत होती याचा मला मोठा आनंद सर्व काळ वाटेल. सर्वांनी कृपा लोभ असो द्यावा, ही विनंती.

## पुण्यात लायब्ररीची स्थापना

■

**पत्र नंबर ३ : २६ मार्च १८४८**

पुणे येथील पुस्तकगृहाविषयी वर्तमान आपल्यास लिहितो.

पुण्यासारखे शहरात विद्याशाळा वगैरे बऱ्याच आहेत. परंतु ग्रंथ वाचण्याची जागा अद्याप लोकांस माहीत नव्हती व तिचा उपयोग कोणा नेटीव लोकांस माहीत नव्हता; परंतु सांप्रतचे गवरनरसाहेब सर जार्ज क्लार्क यांनी लोकांचे सुधारणेकडे लक्ष देऊन जड्ज साहेब हेनरी ब्रौन यास सुचविले की, पुण्यात लायब्ररी स्थापण्याचा बेत करावा. त्याजवरून त्यांनी तारीख २८ जानेवारी, साल मजकुरी सर्व लोकांची सभा जमवून त्यास हा मजकूर निवेदन केला. तेव्हा बुधवारचे वाड्यातील इंग्रजी शाळेतील अभ्यासी लोकही पुष्कळ हजर होते, त्या सर्वांनी अनुमोदन दिले व अदालतीकडील चाकरमंडळी व सरदार लोक यांनीही बरे आहे, असे म्हटले. पुण्यातील किती एक आळशी लोकांनी उदारपणाने पैसा दिला नाही. तथापि अजमासे दीड हजार रुपये जमले आहेत.

सभेपैकी दहा असामी कमिटीत नेमून लायब्ररीचे कायदे ठरविल्यानंतर पुनरपि तारीख ४ थी फेब्रुवारीस दुसरी सभा भरली. त्यावेळेस कमिटीपैकी एके गृहस्थाने विद्येचे उपयोगाविषयी महाराष्ट्रभाषेत एक निबंध केला होता तो वाचून दाखविला. पुण्यातील बहुत गृहस्थांस सांप्रत काळी विद्या आणि ज्ञान काय आहे, याविषयी समजूत नाही व ते आज बहुत वर्षे स्वस्थ घरी बसून इंग्रज सरकारची देणगी खात आहेत. याजमुळे अशा कामात ते झटून पडत नाहीत व त्यांस कितीही समजून सांगितले, तरी त्यांच्या ज्या जुन्या व पोकळ समजुती आहेत, त्याच ते खऱ्या धरतात व त्या बदलण्यास बहुत दिवस पाहिजेत. याच कारणाने दुसरे सभेत आणखी जास्त पैसा जमला नाही; परंतु असे ठरविले की, लायब्ररीचे काम पाहण्यास एक धाकटी कमिटी असावी व तिची नावे त्याच वेळेस लिहिली आणि लायब्ररीयन एक असामी नेमून बुधवारचे वाड्यात कलेक्टरसाहेब यांनी कृपा करून जागा दिली आहे, त्या ठिकाणी तारीख ७ फेब्रुवारीपासून लायब्ररी सुरू झाली.

अद्याप गृहस्थांपैकी कोणी ग्रंथ वाचावयास व ज्ञान संपादन करावयास येत नाहीत. शाळेतील विद्वान मंडळी, ज्ञानेच्छू व विद्याभ्यासी मात्र येतात. सरदार लोक येत नाहीत. त्याविषयी मला असे वाटते की, आम्ही थोर, चार

शिपाई, घोडे, अबदागरी बरोबर घेतल्याशिवाय बाहेर कधी पडत नाही. तेव्हा या लायब्ररीत मुलांसारखे शिकण्यास जावयाची त्यांस लज्जा वाटत असेल; परंतु अज्ञानामुळे आणि अनश्रुतपणामुळे त्यांची अशी अवस्था जहाली. तथापि तिचा परिहारोपाय ते ग्रहण करीत नाहीत, हे आश्चर्य आहे. ज्यांस अन्नवस्त्र मिळते, ते म्हणतात की, आम्हास विद्येची काय गरज आहे व ज्यांस मिळत नाही ते पोटापाठीमागे लागतात. तात्पर्य, अक्कल वाढविण्याचे काम कोणाच्याने होत नाही. असो. या अडचणी काही दिवसांनी दूर होतील व ज्ञानाचे संपादन नेटीव लोकांत चालू होईल.

सांप्रत काळी तर आपले शास्त्रात व देशात काय आहे व इंग्रज लोक हे कोठून येऊन राज्य करतात व याची व्यवस्था काय आहे, हे कोणास माहीत आहे का? म्हणून विचारले, तर नाही म्हणून बहुतेक शपथ करतील; तेव्हा कोणाचे अमलात आपण आहो. हे ज्यांस कळत नाही; त्यांचे अज्ञान काय वर्णावे? परंतु हे दूर होण्याचे साधन गवरनरसाहेबांनी लायब्ररी चालू केली, याबद्दल त्यांची कीर्ती बहुत काळपर्यंत राहील आणि आज नेटीव लोक तिचा लाभ समजत नाहीत, तरी पुढे कधी काळी समजून स्तुती करतील व पुणे येथे मेहरबान ब्रौनसाहेब जड्ज होते, त्यांनी या कामास फार आश्रय दिला, त्यांचे योगाने हे काम सिद्धीस गेले; असे लोक आठवतील, अशी आशा आहे.

गवरनरसाहेब यांनी हिंदू लोकांचे अज्ञान दूर होण्याचा उपाय पुण्यात केला असे नाही; परंतु नगरासही केला आहे. व इतर ठिकाणी जागोजागचे रेसिडेंट वगैरे अधिकारी यास तसेच करण्याविषयी हुकूम पाठविले आहेत. गवरनरसाहेबांचे प्राइव्हेट सेक्रेटरी कप्तान फ्रेंच यांनी ही प्रवृत्ती चालू करविली, याबद्दल त्यांचेही मोठे उपकार समजले पाहिजेत; परंतु मला फार दुःख वाटते की, आपले लोक ज्ञान संपादन करणे, हे लहान मुलांचे काम असे समजतात, आणि शिकत नाहीत. आता जे असे म्हणणारे आहेत, ते काही जाणतात, असे असते, तर मी क्षमा केली असती; परंतु ते केवळ अडणीवरचे किंवा सांबापुढचे असून, विद्येस असे तुच्छ मानितात व थोडे खावयास मिळू लागले, म्हणजे आपली अप्रतिष्ठा होईल, असे समजून वाचणे व अभ्यास करणे सोडून देतात, याबद्दल वाईट वाटून त्यांचा फार राग येतो. दुसरे, ज्याच्याजवळ द्रव्य आहे, ते मदांध; त्यांस असे वाटते की, आम्हासारखे कोणीच नाहीत. विद्या काय आहे? विद्येचे सार जे द्रव्य ते आम्हाजवळ आहे, असे त्यांस वाटते व ते आपल्यास सूर्यचंद्राइतके उंच समजतात. ही खोडी नेटीव लोक लवकर

टाकतील, तर बरे आहे; पूर्वी यांची हीच खोडी होती; परंतु ती बाहेर व्यंगोर्मीसारखी दिसत नव्हती. कारण पुण्यात पेशव्यांचे राज्य होते व त्यामुळे किती एक प्रतिष्ठेने पैका मिळवीत होते, म्हणून त्यांचे ज्ञान व अज्ञान आजपर्यंत दिसले नाही.

परंतु आता तो समय नाही. आता बाहेर काय आहे, हे समजून आपली नीट अवस्था कशाने होईल, हे पाहण्याची वेळ आहे. म्हणून नेटीव लोक आळस व गर्व न करतील, तर फार चांगले होईल. अस्तु. हल्ली लायब्रीत ३०० बुके आहेत व अखबारा चार आहेत. बरेच चालले आहे व पुढे सुधारेल, अशी आशा आहे.

✧ ✧

## छापण्याची कला आणि म्हातारपणी लग्न

पत्र नंबर : ७

छापण्याचे कलेचा उपयोग आता बहुत लोकांस कळू लागला आहे व तेणेकरून बहुत लोकांचे डोळे उघडू लागले आहेत. जसे दोन मनुष्य जवळ जवळ बसून भाषण करतात, त्याचप्रमाणे सांप्रत सर्व देशांतील मनुष्ये, स्नेह असो अथवा नसो; परंतु त्यांचे मनोभाव बहुत अंतरावर दृष्टीस पडतात व आपले पत्रद्वारे लोकांची संभाषणे उघडपणी चालतात.

आमचे मुखांतील ही लघुजिव्हा व आपले पत्र हे बृहत्तर जिव्हा असे समजले पाहिजे. कारण की, त्यांचे द्वारे दूर देशीचे भाषण ऐकावयास येते व प्रतिउत्तर देता येते. असे हे परस्परे मनातील अन्वय कळविण्याचे द्वार आहे. याचा उपयोग जसा इंग्रज लोक करतात, तसा आपले लोक करून शहाणपणा वाढवतील तर फार चांगले होईल. आणि हा समय असा आहे की, आता आपले मनातील गोष्ट उघडपणी निर्भयपणाने सांगता व कळवता येते. असे पूर्वी नव्हते. मागील राजे असे लोकांचे भाषणास मोकळीक देत नव्हते; परंतु राज्याविषयी, धर्माविषयी व आणखी किती एक प्रकरणांविषयी लोकांस बोलण्याचा प्रतिबंध होता. कितीकांच्या जिव्हा व हात तोडले जात होते. पेशवाई कारकीर्दीत कोकणात एक मामलेदार होता; त्याचे कर्म असे ऐकण्यात आहे की, एक स्त्री त्याचा जुलूम पाहून, तुझे अमलाला आग लागो, असे म्हणाली.

तेव्हा त्या ब्राह्मण सुभेदाराने त्या स्त्रीचे अंगास लोकर वैगैरे जळावयाजोगे पदार्थ बांधून त्याला आग लावली. अशी क्षुल्लक अपराधाकरिता स्त्री-हत्या केली. ही एकच गोष्ट नाही. अशा मी किती एक सांगेन; परंतु सांगण्याचे प्रयोजन नाही. आपल्या लोकांस त्या चाली माहीत आहेत. तेव्हा त्या दृष्टान्तावरून हल्ली छापखान्याचा किती फायदा आहे की, त्या द्वाराने वाजवी गोष्ट पाहिजे त्याने लिहून कळवावी, वाईट चालीची निंदा करावी, चांगल्या गोष्टी सुचवाव्या. सरकारविषयी व इतर कारभाराविषयी सुलभपणाने व मोकळिकेने बोलावे. अशी मोकळीक मागे कधी तरी होती काय ?

पूर्व सर्व गोष्टी चोरीने व गुप्तपणाने होत होत्या व सरकारच्या गोष्टीविषयी कोणी बोलता कामास नये. बाजीराव पेशव्याचे अमलात दप्तरातील काही बातमी फुटली, म्हणून तीस कारकून एकदा किल्ल्यावर टाकले. असा प्रतिबंध होता. तेव्हा आता लोकांचे हिताचा समय आहे, परंतु सर्वांनी असे मनात आणिले पाहिजे की, 'तापी-तीरवासी' यांने तारीख १९ वी मार्च रविवारचे पत्रांत मजकूर कळविला, तो पाहून मला वाटते की, याने जे लिहिले आहे, ते सर्व यथास्थित आहे. लग्नासारखे स्वसत्तेतील कामात सरकारचा उपद्रव येणे, हे अगदी ठीक नाही. पूर्वीपासून लग्नाविषयी जो मजकूर आपले पत्रात छापत आहे, त्याजवरून लोकांची खात्री होईल व पुढेही खात्री करण्याकरिता उद्योग चालवून स्वइच्छेने अशा सुधारणा व्हाव्या, हे चांगले. केवळ जबरदस्तीने लोकांकडून पूर्वीपासून चालत आलेली चाल मोडवून नवी रीती काढणे, हे योग्य नाही, अशा गोष्टी लोकांनी समजुतीने मोडाव्या हेच बरे; परंतु कोणी असे म्हणतील की, हिंदु लोक इतके शहाणे नाहीत. तर काय चिंता आहे ? आजचे उद्या होईल; पण आणखी आणखी सरकारचे हातात जाणे, हे त्या उशिरापेक्षा वाईट व जे जबरीने चालू झाले, त्याचा खचितपणा नाही. जा काळी जबरी एकीकडे होईल, तेव्हा पुन्हा लोक पूर्वीप्रमाणेच करू लागतील. तेव्हा उत्तम मार्ग हाच आहे की, ही गोष्ट लोकांच्या मनात अनेक तऱ्हेने भरवून द्यावी आणि हे काम समंजस पंडित आहेत, त्यांचे आहे आणि स्वसंतोषाने लोक समजू लागले, म्हणजे पहिली चाल मोडून नवी चालू करतील. आणि किती एक देशांत असे झाले नाही काय ? पुष्कळ ठिकाणी झाले आहे.

असे करण्याविषयी मी एक सूचना अशी करतो की, मोठे मोठे शास्त्री अगदी सुज्ञ नाहीत, असे नाही. त्यांनी बरे ही गोष्ट डोकीवर घेऊन सभा जमवून ठरवावी. लग्नकार्य झाले म्हणजे दोन पैशाचे आशेने शेकडो ब्राह्मण जमतात व उड्या घालतात. मग असे लोकहिताकरिता द्रव्याशा सोडून वर्षात एक

दिवस का जमत नाहीत ? जर असे चार सभ्य जमतील, तर अशी गोष्ट ठरावात सहज येईल; परंतु मला वाटते की, सांप्रत काळी धैर्यवान लोक थोडे आहेत. सर्व आपले पोटाचा विचार पाहतात. हल्ली पुण्यात किती एक लग्ने होत आहेत, त्यात असे पाहण्यात येते की, पन्नास साठ वर्षांचे पुरुष मरणोन्मुख व गंतुकाम झाले तरी तरुण स्त्री करावयाची इच्छा करतात, व आर्जवी जोशी त्यांस सांगतात की, अमकी मुलगी करा, तिचे जातकात वैधव्य नाही व तुमचे आयुष्य शहाण्णव वर्षे आहे. असे हे जोशी नादी लावून मुलीचा घात करतात. असल्या कर्मास काय म्हणावे ? त्या लग्न करणाऱ्यास, मुलीचा विक्रय करणाऱ्यांस व भटास धिक्कार असो. मागाहून आणखी लिहिण्यात येईल.

## जुन्या समजुती

■

**पत्र नंबर ८ : ७ मे १८६३ (?) १८४८**

आमचे लोकांच्या पुष्कळ मूर्खपणाच्या समजुती आहेत व इतकी ज्ञानाची प्रसृती झाली आहे, तरी लोकांचा वेडेपणा अद्यापि दूर झाला नाही. माझे आढळण्यात ज्या समजुती आल्या आहेत, त्यांची आपले पत्रद्वारे एक यादी प्रसिद्ध करून असे इच्छितो की, कोणी समजदार मनुष्य असेल, त्याने त्याविषयी प्रतिपादन किंवा निषेध करावा. मला वाटते की, या समजुती मूर्खपणाच्या आहेत, किंवा शहाणपणाच्या आहेत, याचा निश्चय झाला म्हणजे संशय जाईल.

(१) ब्राह्मणाशिवाय अन्य वर्णाने विद्या करू नये. संस्कृत विद्या एकीकडेच आहे. परंतु एकादा मराठा किंवा इतर जातीचा कारकून ब्राह्मणांनी पाहिला म्हणजे त्यांचे अंगाचे तिळपापड होतात, हे काय ?

(२) ज्ञान व विद्या वाढवू नये. कारण शहाणे व वेडे एका दराने विकतील असे भय बाळगतात.

(३) जरी कोणी अपराध करूनही ब्राह्मणांची घरे भरली, तरी त्यांस पुण्यवान असे जाणतात, याचे उदाहरण बाजीराव पेशवे यांचे अपराध कोणी मनात आणीत नाहीत. व ब्राह्मण प्रजा त्यांस योग्य मानितात.

(४) देव ब्राह्मणांकरिता कशीही कर्मे केली तरी चिंता नाही. यास उदाहरणे,

कबीराने साधूस जेवण देण्याकरिता चोरी केली, इत्यादि.

(५) ज्या यंत्राने बहुत लोकांचे काम थोडे माणसांचे हातून करतात, ते चालू करू नये. म्हणजे डाक, छापखाना, टंकसाळ हे कारखाने लोकांचे पोटिस्त बुडविणारे म्हणून त्यांना द्वेष करतात.

(६)सरकार करील ते करील, सत्तेपुढे शहाणपण नाही.

(७) सर्व गोष्टी नशिबाने घडतात. शहाणपण व उद्योग यांचा उपयोग नाही.

(८) सर्व सुख द्रव्यापासून आहे. त्यापलीकडे सुख नाही व सर्व गुणांचेही अधिष्ठान तेच आहे.

(९) विद्या पोट भरावयाकरिता शिकावी व ती श्रीमंतांनी शिकणे जरूर नाही.

(१०) देशाचार, वृद्धाचार, शिष्टाचार इत्यादिक जुन्या चालीविरुद्ध आचरण करू नये. मागील चाल चालत आली ती चालवावी. याविषयी आग्रह धरितात.

(११) वाईट गोष्ट असेल आणि ती चार लोकांचे पोट भरण्याचे साधन असेल तर मोडू नये.

(१२) घर सोडून बाहेर जात नाहीत व मुलांस वगैरे घरी बाळगण्याविषयी फार उत्कंठा धरितात.

(१३) मुले, नातवंडे झाली म्हणजे जन्माचे सार्थक झाले, असे वडिलांस वाटते. यास्तव मुलांची लवकर लग्ने करतात.

(१४) इंग्रजांचे राज्यात पैशास बरकत नाही. पाऊस कमी व जरीमरी फार म्हणतात. व याचे कारण देवताक्षोभ झाला आहे व इंग्रजांचे कायदे व रीती वाईट आहेत म्हणून समजतात.

(१५) ब्राह्मणाने अपराध केला तरी त्यांस शासन करू नये व त्याचे सर्वस्वी चालविण्यात महापुण्य आहे, असे मानतात.

(१६) धष्टपुष्ट ब्राह्मणास केला तरी तो धर्म; परंतु आंधळ्या कुळंब्यास किंवा लंगड्या महारास दिले तर तो धर्म नव्हे.

(१७) पहिल्या लढाया व दंगे वगैरे होते, तेव्हा शिपायांचे पोट भरत होते. आता जिकडे पहावे तिकडे सामसूम झाले आहे, हे वाईट, असे कित्येकांस वाटते. कुळंबी माजले व ब्राह्मण त्यांचेबरोबर झाले, हे वाईट वाटते.

(१८) उद्योग न करावा, हे थोरपणाचे चिन्ह व थोरांनी वेडे, भोळसर असावे; द्रव्याचा उपयोग इतकाच की, चार लोकांचे चालवावे. स्वस्थ खावे

व निजण्यात व स्नान-संध्येत आयुष्य घालवावे हाच थोरपणा असे समजतात.

(१९) संस्कृत विद्येखेरीज बाकीच्या विद्या व भाषा नरकाचे साधन आहेत.

(२०) स्नान-संध्येचा डामडौल करील तो धर्मशील आणि पुण्यवान; मग त्याची वर्तणूक कशीही असो.

(२१) स्त्रियांना विद्या शिकवू नये; कारण व्यभिचार अधिक वाढेल.

(२२) थोडा पराक्रम व थोडीसी ब्राह्मणावर भक्ती केली की, ईश्वराचा अवतार म्हणोन त्यांची लोकांत प्रसिद्धी होते. जसे शिवाजी भवानीचा अवतार, माधवराव पेशवे विष्णूचा अवतार, इत्यादी.

(२३) मुलगा झाला संतोष, मुलीचा संतोष नाही, अशी रूढी आहे.

(२४) स्त्रियांचा पुनर्विवाह करू नये. कारण की, जिच्या पारब्धी सुख असेल तिचा नवरा मरणार नाही. जी अभागी तिचा मरतो.

(२५) नवसाने देव पावतो. व मनुष्याचे सुखदुःखावर नवग्रहाचा अमल चालतो; म्हणून त्याचे नावाने ब्राह्मणास दाने वगैरे केली म्हणजे पीडा दूर होते. तसेच दुःशकुन मानणे इत्यादी.

(२६) स्वार्थ पहावा. लोकांची काळजी करू नये. या अर्थाची म्हण आहे की, ‘ लष्कराच्या भाकऱ्या कोण भाजतो ? ’ राजाची लेकरे काय खातात, त्यांची चौकशी कशास? या समजुतीत हिंदु लोक सांप्रत परदेशातील व स्वदेशातील वर्तमानास गैर माहीत. पलीकडचे घरी काय होते, त्याची काळजी शेजारी करीत नाही.

(२७) आपल्या पाठीमागे कसे होईल, याची काळजी करू नये. ‘ आपण मेला जग बुडाला ’ इत्यादी म्हणी आहेत.

(२८) पुष्कळ पैसा उधळला म्हणजे लोकांत कीर्ती होते मग तो पैसा कोठूनही येवो.

(२९) यत्किंचित कारणाकरिता खळवाद करतात; आणि भिकारी होतात; पण त्यांस सोडीत नाहीत.

(३०) परक्याजवळ हात जोडून राहतात; पण आपले स्वकीयाशी लढाई करतात; अशी चाल आपले लोकांची आहे. आपसांत प्राण देऊन भांडतात, पण परक्याच्या लाथा सोसून नम्र राहतात.

एकूण तीस प्रश्न मी घातले आहेत. हे ज्यांस अमान्य असतील त्याने लिहून कळविल्यास मला फार संतोष होईल. परंतु या समयी मूर्खपणाच्या समजुती इतक्या दृढ आहेत की, त्यांस असे वाटेल की, काय हे प्रश्न ? यांची

उत्तरे काय द्यावयाची आहेत? पण तसे नव्हे. या गोष्टी मोठ्या आहेत व लोकाच्या गैर समजुती जाव्या व त्यांनी सुज्ञ व्हावे अशी इच्छा ज्यांस असेल त्यासच हे पत्र आहे. इतर जे लक्ष्मीचे बंधू आहेत, त्यांचा हिशेब व गणना आमचे मनात मुळीच नाही. ते बोलले सारखे, न बोलले सारखे.

## हिंदु लोकांचा आळशी स्वभाव

**पत्र नंबर १९ : २ जुलाई १८४८**

पूर्वी इंग्रज लोक रूमचे बादशाहाचे अमलात होते, त्या वेळेस हे फार दरिद्री व हल्ली हिंदु लोक दिसतात याहूनही मूर्ख होते. यांस राज्यनीती, कायदा, शास्त्र, नेमधर्म काही चांगले नव्हते. व ते रूमचे लोक इंग्रजांची बेटे घेऊन जेव्हा तेथे राज्य करीत होते, तेव्हा गुलाम खरेदी करण्याची चाल होती; परंतु रूम शहरात गुलाम विकावयास आणले म्हणजे लोकांनी पुसावे की, 'हा मुलगा कोणाचा आहे?' आणि जर विकणाराने सांगितले की, हा इंग्रजाचे बेटातील, तर घेणारे म्हणत, 'अरे छीः! फुकट दिला तरी नको.' कारण इंग्रज लोक जसे मूर्ख व कुबुद्ध आहेत, तसे कोणत्याही देशातील लोक नाहीत, असे हे लोक म्हणत होते. अशा गोष्टी ग्रंथांतरी वाचितो.

परंतु आता इंग्रज लोकांकडे पाहिले, म्हणजे ईश्वराचा मोठा चमत्कारिक खेळ आहे, असे वाटते. दोन हजार वर्षांपूर्वी इतक्या मूर्खपणाचे स्थितीत जे लोक होते, ते हल्ली केवढे शहाणपणाचे स्थितीत आहेत? व हिंदुस्थानातील लोक दोन हजार वर्षांपूर्वी मोठे पराक्रमी होते, त्यांची अवस्था काय झाली आहे? तेव्हा या दोन्ही गोष्टींचा शोध करणे अवश्य आहे. असे असून आपले लोक किती भ्रांतीत आहेत?

दिवसेंदिवस आपले लोकांतील थोरपणा जात चालला आहे. शहाणपण पूर्वीच गेले; नंतर द्रव्यही गेले. म्हण आहे की, 'आधीं शहाणपण जाते, मग भांडवल जाते.' तसेच या लोकांचे झाले आहे. अद्यापि या लोकांस कोण कोठे आहे. पृथ्वीवर रचना कशी आहे, किती प्रकारचे लोक आहेत व राष्ट्रे किती आहेत, याविषयी काही कळत नाही. लिहिणे आणि वाचणे झाले म्हणजे

मोठी विद्या झाली, असा सांप्रत काळचा घाट आहे; परंतु लिहिणे व वाचणे हे विद्येचे द्वार मात्र आहे, विद्या नव्हे, विद्या पुढेच आहे. परंतु लोकांच्या समजुती इतक्या आखूड झाल्या आहेत की, ते अंधेरात गर्क आहेत.

इंग्रज लोक इकडे येऊन राज्य करतात व त्यांजकडे आमचे लोक तोंडात बोट घालून चमत्काराने पाहत राहतात. आणि खावयास मिळत नाही, म्हणून चरफडतात. ऐश्वर्य गेले, असे त्यांस वाटते; परंतु याचे कारण काय ? आपले देशाची अवस्था अशी कशाने झाली ? इंग्रज कोठून आले ? त्यांचे राज्य कसे आहे व आपण चांगले होण्यास काय उपाय करावा ? या गोष्टींचा विचार कोणी करीत नाहीत. केवळ जनावरांप्रमाणे मारले तर लागते; परंतु पुढे बुद्धी चालत नाही. तद्वत् हे लोक शुद्ध बैल व विचारशून्य आहेत, गर्वाने आपले ब्राह्मण लोक जळतात व इतर लोकांस तर ज्ञानच नाही. व हे असे होणे, तरी ब्राह्मणांचेच कपट आहे, तेव्हा आता इतकाच उपाय आहे की, यांणीं आपले राजे इंग्रज यांचा शोध करावा व त्यांचे देशात जावयाचे नाही, वगैरे ज्या समजुती आहेत, त्या सोडाव्या, म्हणजे त्यांचे शहाणपण यांस येईल.

एक गोष्ट आठवली आहे, ती अशी– कोणी एक ब्राह्मण आताचे मूर्ख ब्राह्मणांसारिखा होता. त्याचे घरात एक चोर शिरून दागिने उचलून घेऊन चालला; तो ब्राह्मणाचे बायकोने त्यांस पाहून, नवऱ्यास हाक मारून सांगितले की, 'चोरास धरा.' तेव्हा तो म्हणू लागला की, "मी ब्राह्मण आहे, व चोराची जात कोण आहे, याचा मला ठिकाण नाही. तेव्हा मी त्यांस शिवू कसा ? त्याणें कांही नेले तरी चिंता नाही." असे म्हणून त्या ब्राह्मणाने आपले सर्वस्व गमावले, व चोराने ते भाषण ऐकून सावधगिरीने अधिक लाभ करून घेतला.

आता पहा, या भटाप्रमाणे आमचे लोकांची अवस्था आहे. परदेशचे लोक येऊन इकडे राज्य करतात. आणि हिंदू लोकांचे सारथी ब्राह्मण लोक, ते म्हणतात की, आमचा धर्म अरबांचे व इंग्रजांचे देशांत जावयाचा नाही; व त्याविषयी आम्ही मनात आणणार नाही. सारांश, ते अपवित्र असे म्हणून परकी लोकांस मात्र स्वस्थपणे राज्य करावयास सापडते व आमचा सर्व व्यापार त्यांचे हस्तगत झाला आहे. जर आपले लोक विलायतेत जाऊन तेथील माहितगारी करून घेते, तर आता जसे इंग्रजास भित तसे न भिते. सामान्यतः इंग्रज लोक इकडे आले, म्हणजे स्वर्गाहून इंद्र खाली आल्याप्रमाणे लोकांस वाटून, त्यांजविषयी भय उत्पन्न होते. असा हिंदू लोकांचा गरीब स्वभाव, यामुळे ते हतवीर्य झाले आहेत. त्यांच्यामध्ये सामर्थ्य नाही व मूर्खपणा फार वाढला आहे.

सगळे लोक आपले ठिकाणी शहाणे म्हणवितात; परंतु यांस इंजिनियर इंग्रज पाहिजेत, प्रोफेसर इंग्रज पाहिजेत. डॉक्टर इंग्रजच पाहिजेत, जड्ज (जज्ज) व बारिस्टर तेच पाहिजेत, सर्व कारखाने त्यांचेच हाती. आमचे लोक त्यांचे दास्यत्व करण्यास देखील योग्य नाहीत. हे काय ? पाचशे वर्षे मुसलमानांची गुलामगिरी केली व आता शंभर-दीडशे वर्षे इंग्रजांची गुलामगिरी करतात, परंतु अद्यापि आमचे लोकांस काही ठाऊक झाले नाही.

तथापि इंग्रजांनी आपली विद्या प्रगट केली, हा त्यांचा मोठा उपकार आहे. व येणे करून लोक शहाणे होतील. हिंदू लोक इतके मूर्ख आहेत की, इराण, तुर्कस्तान व अरबस्तान येथून मुसलमान लोक हिंदुस्थानात येऊन घरे बांधून राहिले, परंतु हिंदू लोकांस त्यांचे काही वर्तमान ठाऊक नाही व हिंदू दुसरे एखादे मुलखात गेले आहेत, असे कधी आढळणार नाही. परमुलखाचे लोक येऊन हिंदू लोकांचे हातचे हिसकावून घेऊन खातात व मानेवर जोखड ठेवून राज्य करतात; पण हे इतके सर्व सहन करून आहेत. यांच्या मध्ये बळ, शूरत्व किवा शक्ती कमी आहे असे नाही; पहिल्याने याणीं सर्व हिंदुस्थान जिंकले होते; परंतु यांस राखावयाचे शहाणपण नाही; याजमुळे हे गमावून बसले.

शास्त्रात अटक, गंड व पापनाशी इतक्या नद्यांविषयी असे लिहिले आहे की, पापनाशी नदीस स्पर्श करू नये; गंडकीत चालू नये; व अटक नदी उतरून पलीकडे जाऊ नये व याचा हेतू इतकाच दिसतो की, त्या नद्या अवघड व जरा भयंकर आहेत. याजमुळे कोणी धीर करून त्यात जाईल आणि मरेल तर ते न व्हावे. यास्तव त्याणीं हे शास्त्रार्थ लिहिले; परंतु दुसरे मुलखात जाऊ नये, असा त्याचा अर्थ नसेल असे वाटते. आणि जर कदाचित असला, तर ती शास्त्राज्ञा मानण्याची काही जरूर नाही. ज्या वेळेस ते शास्त्र झाले, त्या वेळेस दुसरे लोक इकडे आले नव्हते, याजमुळे ते शास्त्र योग्य, पण आताचे अवस्थेत ते मानून मूर्खाप्रमाणे उगेच बसणे, याचे कारण काय ?

जेव्हा ही मते मोडून हिंदू लोक परदेशात जाण्यास सिद्ध होऊन मूर्खपणाचे कायद्यातून खुले होतील, तेव्हाच त्यांचे हातून काही पराक्रम होईल. युगपरत्वे करून शास्त्रही फिरले, असे समजले पाहिजे. आणि सर्व शास्त्रांचा मतलब हाच की, धर्म रक्षावा. सिंधू नदीपलीकडे जाऊ नये, हे कशाकरिता ? धर्म रक्षावा आणि म्लेंच्छांचा स्पर्श होऊ नये म्हणून; परंतु म्लेंच्छच इकडे आले, तेव्हा आपण पलीकडे जाण्याचे कामी शास्त्र एकीकडे ठेवले, तरी चिंता नाही, असे मला वाटते.

# नशिबावर हवाला

■

**पत्र नंबर २४ : ३० जुलाई १८४८**

जे सोंगट्या व बुदबळे खेळतात त्यांस माहीत असेल की, सोंगट्याचे खेळात काही बुद्धी नाही. फाशास दान पडेल त्याप्रमाणे जय किंवा अपजय होतो. खेळणार मोठा बुद्धिमान असला तरी त्याचे बुद्धीचा काही उपयोग नाही. फाशाचे स्वाधीन तो असतो. तसे बुदबळाचे खेळात नाही. त्यात बुद्धीचा उपयोग आहे. जो शहाणा असेल, तो जिंकील, असा निश्चय करता येतो. सोंगट्यात कोणाचा निश्चय होत नाही.

तद्वत् ज्या देशांत लोक शहाणे व राज्य शहाणपणाने चाललेले असते तेथे शहाणपणा वाढेल, असा निश्चय आहे. क्वचित न होईल तर ती गोष्ट खेरीज आहे. अस्तु. बहुधा नियम असा आहे की, जे लोक शहाणे आहेत ते उद्योगवादी असतात. व मूर्ख आहेत ते प्रारब्धवादी असतात. कारण उद्योगाने सिद्धी होते, हे ते जाणत नाहीत. हिंदू लोक जेव्हा तेव्हा नशीब व प्रारब्ध म्हणतात. आणि हे वास्तविक पाहिले तर खरेच आहे. कारण लोक मूर्ख असले म्हणजे तेथे शहाण्याने अशी उभेद धरू नये की, माझी अब्रू वाढेल व वेड्याने असे म्हणू नये की, मी नेहमी वेड्याचे योग्यतेनेच राहीन. एका पुरुषास दोन स्त्रिया असल्या म्हणजे त्या स्त्रिया आपल्या युक्तीने त्याचे अंतःकरण हरण करतात. परंतु तो जर वेडा असेल तर गुणी स्त्री असेल तिजवर प्रीती करीलच याचा नेम नाही. तो आपले अंतःकरण मूर्ख स्त्रीकडूनही वश करून घेईल, सांप्रत काळी हैदराबाद मुसलमानांची राजधानी आहे व पुणे ही ब्राह्मणांची राजधानी होती. परंतु दोहो ठिकाणी असे होते की, कोणाची चहा होईल आणि कोणाला लोक चांगले म्हणतील याचा नेम नाही. चांगल्या-वाईटाची परीक्षा नाही. ज्याचे प्रारब्ध उघडेल त्याची अब्रू एकदम वाढेल. तेव्हा कोण कोणास लुटतील व कोण कोणाची अब्रू घेतील, याचा भरवसा नाही. शहाणपणा व वेडेपणा याचा काही उपयोग नसे. फक्त नशिबावर हवाला.

बाजीराव पुण्यात होता, त्यावेळी अशी अवस्था होती की, जे आज भाकऱ्या भाजीत होते, ते उद्या पालखीत बसले आणि आज पालखीत होते ते उद्या भिकेस लागले. तसेच ब्राह्मण व भट यांना दानधर्म करण्यास तो कर्णाचा अवतार होता. परंतु सत्पात्राचा विचार नाही. म्हणून ज्याचे नशीब उघडे त्यांस

मिळत होते. तस्मात् अशा अनियमित राज्यांत राहणे मोठे दुर्भाग्य होय. व यावरून असे दिसे की मुख्य नशीब म्हणण्यास कारण हेच आहे. जर व्यवस्था सारखी होईल व योग्यतेनुरूप प्रतिष्ठा वाढेल तर नेम झाला. मग कोणी प्रारब्ध म्हणणार नाही. जोपर्यंत राज्य बेबंद आहे तोपर्यंत नशीब हा शब्द लोक उच्चारतील. कारण त्यांस त्याचा दाखला प्रत्यक्ष येतो की, शहाण्याचा वेडा आणि वेड्याचा शहाणा घटकेत होतो. यास्तव असे होऊ नये म्हणून कायदे व शास्त्र असले पाहिजे. मनुष्याचा धर्म हाच आहे की, जोपर्यंत आपली अक्कल चालेल तोपर्यंत त्याने चांगले होण्याचा मार्ग स्थापन करावा. उद्योग सोडू नये. उद्योगाने फळ येत नाही, असे होण्यास कारण मनुष्यच आहेत. राजा चांगला असेल तर वाईट कोण, चांगला कोण, याची निवड होईल.

वर्तमानपत्रे असावी, याचे कारण हेच आहे की, सरकारांनी किंवा कोणीही अन्याय केला तर तो प्रकट होतो व येणेकरून त्याचा काही बंदोबस्त होतो. ज्याची चूक त्यांस कळली म्हणजे तो दुसऱ्याने ती करीत नाही. याजकरिता लोकांचे मत प्रगट व्हावे, हा उत्तम मार्ग आहे. ज्यांस थोरपणा मिळतो त्यांस असे वाटत नाही की मी कमी शहाणा आहे. त्यांस सगळा शहाणा मी व अर्धे शहाणे बाकीचे सर्व जग आहे, असे वाटते. याजमुळे लोकांची स्तुती तो पसंत करतो. यास्तव वर्तमानपत्र असले म्हणजे तसे न होता मोठी सुधारणा होते.

तात्पर्य, नशिबाचे कारण लोकच आहेत. व ही घालमेल त्याचे मूर्खपणामुळे होते. गहू आणि जोंधळे सारखे विकू लागले म्हणजे अर्थातच लोक नशिब म्हणू लागतात. आणि यापासून आळस उत्पन्न होतो व उमेद खचते. व कोणी योग्यता मिळविण्याची काळजी ठेवीत नाही. त्यांस असे वाटते की, मी व्यर्थ इतकी विद्या केली व शहाणपण शिकलो. येथे सकट घोडे बारा टक्के आहेत. त्यापेक्षा कोणी काही शिकू नये व विद्या करू नये, असे मनात येते. आणि मग यत्नाची अशी प्रवृत्ती पडते की, कोणाचे आर्जव, कोणाची गुलामगिरी करावी, म्हणजे काही पोटाची सोय होईल. वास्तविक थोरपणा मिळवावयाचा जो यत्न तो सोडून नीच कर्मास निर्वाहाकरिता लोक लागतात. याप्रमाणे हा सर्व अनर्थ लोकांचे अज्ञानामुळे किंवा राजाचे मूर्खपणाने होतो, याचा निश्चय होत नाही.

तथापि आमचा अभिप्राय असा आहे की, याचे कारण लोकांचे अज्ञानच आहे. जर लोक शहाणे आहेत, तेच राज्यावर बसतात, हा निश्चय आहे. कसेही लोक मूर्ख असोत परंतु जे राज्यावर बसतात ते त्या वेड्यातील शहाणे असतात. पहिल्याने जो राज्य मिळवतो तो शहाणा व मग त्याचे वंशात मूर्ख निपजतात आणि राजवंशातील म्हणून लोक त्यांस मानितात; हा त्यांचा मूर्खपणा आहे.

प्रथम राज्य संपादन होणे ते त्या राष्ट्रातील जे शहाणे असतात त्यांसच होते. संपादकांस काही तरी विशेष शहाणपण असल्याशिवाय राज्य मिळावयाचे नाही. लोक शहाणे असतील तर बहुतेक अनर्थ टळतील.

परंतु हिंदुस्थानातील लोक अगदी गयाळी आहेत. त्यांस काही कळत नाही. अद्याप हे झोपेत आहेत. वास्तविक पाहिले तर लोकांमध्ये गुणावरून किंवा विद्येवरून कोणाची योग्यता व मान्यता नसते. जो अमलावर आहे किंवा मोठ्या द्रव्याचे मालकीवर आहे, त्यांस लोक शहाणा समजतात. कवीने वास्तविकच म्हटले आहे की, ‘ सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते। ’ हे उदाहरण या लोकांस बरोबर लागू आहे. जर मोठे विद्वान असले आणि गरीब असले तर त्यांस कोणी विद्वान म्हणत नाही. मध्यम असला तरी चिंता नाही, त्याजवळ द्रव्य किंवा अधिकार असला म्हणजे त्याएवढा मोठा कोणी नाही. व त्याची प्रशंसा लोक करतात. असा संप्रदाय आहे. या इतक्या अज्ञानास कारण पाहिले तर मला एक असे दिसते की संस्कृत भाषेत जे ग्रंथ आहेत ते सर्वांस कळत नाहीत. आता संस्कृत भाषेत पाहिजे ते सर्व आहे असे नाहीच. पण आहे तितके कळले तरी लोक शहाणे असते.

संस्कृत भाषेत ग्रंथ थोडे, भूगोल आणि इतिहास हे मुळीच नाहीत. पुराणात किती एक ठिकाणी असे लिहिले आहे की, हिमालयाचे पलीकडेस किती एक देश आहेत. तेथे अमुक अमुक लोक आहेत. याजवरून तेव्हाचे लोक आताचे सारखे कैदेत नव्हते असे समजते. जरी या ग्रंथास बहुत दिवस झाले व त्यात लिहिले आहे त्याशी आता किती एक गोष्टी मिळत नाहीत, तत्रापि ही गोष्ट खरी आहे की, त्या वेळेस हिंदू लोक सर्वत्र जाऊन विद्या, वाढवीत होते. विद्या म्हणजे स्वदेशात व जे इतर देशात आहे ते सर्व आपल्यास कळावे, याचेच नाव विद्या. अलीकडे किती एक मूर्खपणाचे समजुतीमुळे लोक कैदेत आहेत. म्हणजे त्यांच्या पायात बिड्या आहेत. त्यांस इकडचे इकडे हलवत नाही. जागच्या जागी श्रमी होतात आणि बिड्या तोडावयाजोग्या असूनही ते स्वस्थ दुःख भोगितात, हे आश्चर्य आहे. तात्पर्य बहुत दिवस एखादी गोष्ट चालली, म्हणजे ती सोडवत नाही. विचार असला तरी अंध होतात. आपली सुधारणा कोणते रीतीने होईल, याचा विचार करीत नाहीत. त्यात एकमेकांचे द्वेष व मत्सर फार; याजमुळे कोणी कोणास पुसत नाही. व अशी स्थिती जोपर्यंत आहे, तोपर्यंत यांचे कल्याण होणे दिसत नाही. जोपर्यंत उत्तर देशचे लोक इकडे येत नव्हते. तोपर्यंत हे चालले. आता चालणार नाही.

✦ ✦

# इंग्रजी विद्या

◘

**पत्र नंबर ३१ : १५ ऑगस्ट १८४८**

पुणे शहरात प्रथम १८३२ साली इंग्रजी शाळा घातली, तेव्हा लोकांची अशी समजूत होती की, इंग्रजांचा स्पर्श झाला तर स्नान करावे व इंग्रजांची भाषा शिकली, तर ब्राह्मणपणा जातो. याजमुळे त्या समयी रॉबर्टसनसाहेब कलेक्टर यांनी आर्जवाने गृहस्थांची मुले थोडीशी जमविली. नंतर काही दिवसांनी पुष्कळ लोकांच्या समजुती बदलल्या आणि खुषीने मुले पाठवू लागले; परंतु पहिल्या समजुतीचे ब्राह्मण अद्यापि बहुत आहेत. त्यांच्याने लोकांस इंग्रजी शिकण्यापासून तर बंद करवत नाही; परंतु आपल्या मंडळींत ते असे बोलतात की, जे इंग्रजी शिकले आहेत, ते नास्तिक, निर्दय, अधर्मी, अमर्याद आहेत. परंतु त्यांची योग्यता पाहिली, तर ते केवळ मूर्खांचे शिरोमणी आहेत. जरी त्यांस लिहिता वाचता येते, तरी ते पंडित नाहीत. त्यांची समजूत इतकी क्षुद्र आहे की, लिहिणे आणि वाचणे ही तमाम विद्या, यापुढे त्यांस काही कळत नाही. तत्रापि त्यांस वाटते की, आम्ही सर्वज्ञ आहो. आता असे गर्विष्ट मूर्ख लोक आहेत, त्यांना उत्तर देणे योग्य नाही. कारण की, शुद्ध वेड्यांशी वाद करणे निर्फळ आहे. जरी माझे म्हणणे असे नाही की, केवळ इंग्रजी लिहितात आणि बोलतात ते विद्वान, असे मी म्हणत नाही. कारण की जे कुलकर्णी असतात ते लिहितात. त्यांस पंडित कोणी म्हणावे ? तसेच जे केवळ ‘ रायटर ’च आहेत त्यांस विद्वान म्हणणे अयोग्य आहे; परंतु ज्यांनी विद्येचे रहस्य जाणले आहे व बहुश्रुत आहेत, त्यांचा मात्र पक्ष आम्ही घेतो. आणि आम्हांस ठाऊक आहे की, एक इंग्रजीतील विद्वान आणि शंभर संस्कृतांतील पंडित आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखे कदाचित होणार नाहीत. भटांचे वर्णन आम्ही एके ठिकाणी केले आहे. हल्ली कारकुनांचे थोडेसे करितो.

ब्राह्मण लोक कारकुनीचा धंदा फार करतात, आणि गृहस्थ म्हणवितात. परंतु वास्तविक पाहिले, तर त्यांस कळते काय ? संध्येची अक्षरे साळुंखीसारखी किंवा राघूसारखी पाठ करतात. मोडीचे लिहितात, वाचतात. साधारण कामकाज कारकुनीचे करता येते. परंतु हे मोठे प्रतीचे मजूरदार, जसे सुतार, न्हावी, धोबी तसेच ब्राह्मण कारकून; यांत त्यांचा विद्वानपणा काहीच नाही. हजारो कारकून आहेत; परंतु एकाने एक ग्रंथ तरी जन्मादारभ्य रचला आहे ? शहाणपणाची

गोष्ट बोलण्यास एक क्षण घालविला आहे? असे शुभ जे आहेत, त्यांची योग्यता किती? ज्यांनी चार शास्त्रे अध्ययन केली आहेत. त्यांचीदेखील योग्यता इंग्रजीतील पंडिताशी बरोबर नाही. कारण की, मुळी आधी संस्कृत भाषेत ग्रंथ आहेत किती? ग्रंथांचे संख्येवरून विद्येची तुलना होते, हा नेम आहे. सर्व पुस्तके जर जमा केली, तर फार झाले तर एक कोठडी भरेल. तेव्हा तितकी वाचली किंवा अवलोकन केली, त्याचे शहाणपण सारखे कसे होईल? जितके बीज तितके पीक. ज्याने पायलीभर दाणे पेरले आणि ज्याने खंडीभर पेरले, त्याचे उत्पन्न सारखे कसे होईल?

इंग्रजीमध्ये तर कोट्यवधी ग्रंथ आहेत. त्यांत अनेक विद्या आहेत. तितक्या संस्कृतात नाहीत. चौदा विद्या आणि चौसष्ट कला इतकी संख्या जेव्हा हिंदू लोक फार शहाणे व पराक्रमी व विद्येवर लक्ष देणारे होते व जेव्हा व्यासवाल्मीकी होते, तेव्हा इतकी गणना झाली आहे. परंतु इंग्रजीत एक हजार विद्या आहेत. प्रत्येक विद्येवर हजारोंच ग्रंथ आहेत. संस्कृतात काही विद्या इतक्या सूक्ष्म आहेत की, एक विद्येवर एक ग्रंथ, जसा युद्धविद्येवर धनुर्वेद. दुसरा ग्रंथ नाही व धनुर्वेदही नाहीसा झाला. कोणी वाचीन म्हणेल, तर मिळावयाचा नाही. आणि इंग्रजीत जसे म्हटले तसे आहेत.

याचे कारण संस्कृतातील विद्येचे चाहाणारे ब्राह्मण होऊन गेल्यास दोन तीन हजार वर्षे झाली. तेव्हापासून ब्राह्मण मूर्ख झाले. विद्या म्हणजे काय, हे देखील विसरले. त्या शब्दाचा अर्थही त्यांस कळत नाही आणि जसे हिंदू लोक व्यासाचे वेळी विद्याप्रवीण होते, तद्वत इंग्रज आता आहेत. त्यांचे चित्त विद्येवर फार व ते ज्ञानी बहुत झाले व त्यांचे ग्रंथ फार उपयोगी आहेत. हिंदू लोकांचे ग्रंथ जेवणावळीचे आहेत. तर इंग्रजी पंडित तो संस्कृतातील पंडितांशी सारखा कसा होईल? अशी जेव्हा पंडितांची गती, तेव्हा कारकून आणि भट हे काय पदार्थ? हे तर कसपटे दिसतात. जो इंग्रजीतील पंडित आहे, त्यांस किती विद्येचे ज्ञान असते? त्याची समजूत केवढी विस्तीर्ण? आणि त्याचा विद्वानपणा केवढा? त्याची योग्यता लोक समजत नाहीत. त्यांस दूषण लावितात. इंग्रजीतील विद्वानांची अशी योग्यता आहे की, त्यांस कोणताही विषय सांगा, त्याविशी तो ग्रंथ लिहू शकेल, कोणत्याही विषयावर बोलू शकेल. जे जे या पृथ्वीत आणि आकाशांत आले, ते सर्व त्यांस ठाकठीक दिसते. आणि चंद्र फिरतो; याचे आश्चर्य त्यांस वाटत नाही. दगड वरती उडविला, म्हणजे खाली पडतो, याचेदेखील कारण त्यांस माहीत आहे. तात्पर्य त्यांस कोणत्याही विषयी आश्चर्य वाटत नाही.

कारकून हे भटाचे पंक्तीचे आहेत. मूळ हिंदू लोकांमध्ये विद्येचे मान इतके कमी आहे की, त्यांस विद्या म्हणजे काय, हे अश्रुत आहे. जर कोणाची विद्या वर्णन करणे झाल्यास म्हणतात की, अमका केवढा शहाणा! पत्र लिहितो! मजकूर जुळून लिहितो. अक्षण चांगले सुंदर. आता हे काही विद्वानाचे वर्णन झाले नाही, विद्वान म्हणजे काय, ज्याची बुद्धी विशाल, ज्याने नवीन ग्रंथ ऋषीसारखे लिहावे, ते विद्वान. हल्ली गृहस्थास यातील काही ज्ञान नाही. त्यांस धर्म म्हणजे काय, याचा अर्थ पाच हजार कारकून गोळा केले आणि पुसला तर सांगू शकणार नाहीत व संध्या कश..करित. करतात, हेही कोणास ठाऊक नाही. असे अंधारात जे लोक आहेत, त्यांस विद्येचे मूळ काय ठाऊक?

इंग्रजी विद्वान पूर्वी हिंदुस्थानात एक असता, तर राज्य न गते. हे भट कारकून असे मूर्ख जमा झाले. म्हणूनच हे राज्य बुडाले. विद्या पहिल्यासारखी असती, तर हिंदू लोकांची अशी अवस्था न होती; परंतु ही जनावरे पाहिजे तेथे दोरीने बांधावी अशी गरीब, म्हणून असे झाले. पुढे जरी हिंदू लोकांचे कल्याण झाले, तर इंग्रजी पंडितांचे हातून होईल,. यात संशय नाही. कारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे इंग्रजी विद्या वृद्धिंगत झाली म्हणजे हिंदू लोक पूर्वस्थितीवर येण्यास उशीर नाही. हल्लीचे गृहस्थ व इंग्रजी शिकणारे विद्वान यांचे वैमनस्य असण्याचे कारण असे आहे की, त्यांची यांची मते मिळत नाहीत. कारकुनास असे वाटते की, अंगरखा घालणे व गंध लावणे व आणीचा जोडा घालणे, हाच आमचा धर्म. तसे इंग्रजी विद्वानास वाटत नाही. कारण की, हे ज्ञानी आहेत. तेव्हा त्यांची मते वास्तविक आहेत. ते म्हणतील डावे हाताने गरिबास पैसा दिला, तरी सारखाच, उजवे हाताने दिला तरी सारखाच; परंतु कारकुनास वाटते की, ज्या हल्ली चाली आहेत, तोच धर्म. चाली व रीती आणि धर्म यांचा भेद त्यांस कळत नाही. चालीस व रीतीस व धर्मास सारखेच मानतात; कारण ते अक्षरशत्रू आहेत व चालीविरुद्ध कोणी बोलेल, तर त्यांस नास्तिक म्हणतात. नास्तिक म्हणजे काय, हेही त्यांस कळत नाही, परंतु ऐकीव शब्द माहीत आहेत. तसेच निर्दय म्हणण्याचे कारण असे आहे की, गरिबास व विद्वानास धर्म करावा, ते जाऊन दुसऱ्यास देणे यास धर्म समजतात. शहाणे आहेत ते तसे करीत नाहीत. म्हणून त्यांस असे वाटते की, हे निर्दय आहेत. जो विद्वान आहे, तो गरिबास धर्म करितो; परंतु ब्राह्मण, कारकून व भट यांच्या अशा समजुती आहेत की, दांडग्या व मूर्ख भटास धर्म करावा. अधर्मी म्हणतात की, यांचे कारण असे आहे की, धर्म म्हणजे काय, हे यांस ठाऊक नाही, म्हणून असे म्हणतात.

वास्तविक पाहिले, तर इंग्रजी विद्वानांप्रमाणे मला धर्मिष्ट कोणीच दिसत नाही. तो अनुभवेकरून व ज्ञानेकरून ईश्वराचे प्रतिपादन करितो. सर्वत्र तो आहे असे त्यांस वाटते. त्यांस सर्वत्र ईश्वर दिसतो. ते त्याचे भजनात तत्पर असतात, व जे कर्म करतात, ते सर्व ईश्वरार्पण करतात व त्याची स्तुती करून कायावाचामनेकरून ईश्वरास भजतात. कारण की, इंग्रजीत ईश्वराविषयी अनेक ग्रंथ आहेत. व इतर देशांतील जे सर्व ईश्वरी ज्ञान आहे ते सर्व इंग्रजीत आहे, व त्या ग्रंथांचे तर्जुमे त्या भाषेत आहेत. याजमुळे शंभरपट जास्ती ज्ञान इंग्रजीत आहे. आणि अमर्याद म्हणण्याचे कारण असे आहे की, हिंदू लोकांची त्यात कारकून व भट यांची मुख्यत्वेकरून अशी चाल आहे की, गुलामगिरी करावी. तोंडदेखले बोलावे. खुशामत करावी. दुसऱ्यास बुडवावे. उगाच या-बसा इत्यादी फसविण्याकरिता मानपान करतात, आणि त्यांस मर्यादा असे म्हणतात; परंतु ही मर्यादा नव्हे. वास्तविक ज्ञानी आहेत, ते लबाडीचा व्यवहार करणार नाहीत, व गुलामाप्रमाणे कोणाची मर्यादा करणार नाहीत. ते खरेपणानेच चालणारे. त्यांस हे कपट कशास पाहिजे?

कारकून हे बहुधा भडवेपणात असतात. जसा वरिष्ठ असेल व बोलेल तसे बोलावे. कोणीकडून तरी आपले पोट भरावे. लाज राहू न राहू! ईश्वराचे नाव तर त्याचे मनात मुळीच नाही. ईश्वर आहे याची खात्री असेल, तर त्याचे भय मानतील. बहुधा हिंदू लोकांमध्ये मर्यादा हा गुण नाहीच. कपटाशिवाय कोणाची कोणी मर्यादा करीत नाहीत. एखादा मोठे कामावर असला, म्हणजे त्यांस पुष्कळ लोक चांगले म्हणतात. मेजवान्या करतात; परंतु ते सर्व मायावी. मनापासून नाही, परंतु जे विद्वान आहेत, त्यांचा स्नेह, मर्यादा आणि मायाही अशी नसते. ते निष्कपटाने, निर्मळ अंतःकरणाने वागणारे असतात. यामुळे लोकांस अमर्यादा वाटते. त्यांची अशी समजूत आहे की, कोणी लबाडलुच्चा असला, तर त्याचा मान करावा, त्यांस थोर म्हणावे; परंतु विद्वान हे कसे करील? तसल्या थोरास तर लाथ मारणार. म्हणून अमर्याद म्हणतात, परंतु तसे नाही. आपण गर्दभ असले तरी घोड्यास ओळखावे, हे चांगले.

तात्पर्य, पुण्यातील व बाहेर ठिकाणच्या ब्राह्मणाच्या मूढपणाच्या समजुती लवकर जातील, तर बरे होईल. सारांश, इंग्रजी विद्वान यांचा पक्ष आम्ही सिद्ध केला आहे. आणि तो वास्तविक आहे, परंतु ब्राह्मणाच्या मूर्ख समजुती, याजमुळे ते भलतेच समजतात.

# अर्थशून्य ब्राह्मणविद्या

■

पत्र नंबर ३३ : २९ आक्टोबर १८४८

आपले लोकांत ज्ञानशून्यता जहाली आहे. तिचे प्रबळ कारण असे आहे की, लोक अर्थाखेरीज विद्या शिकवतात. ब्राह्मण लोक वेद पाठ करतात. परंतु अर्थशत्रू असतात. तसेच गृहस्थ सहस्रनामे, स्तोत्रे इत्यादी म्हणणारे पुष्कळ आहेत, परंतु अर्थाविषयी शून्य. येणेकरून फक्त तोंडाची मात्र मजुरी करतात आणि मनाचा काही उपयोग करीत नाहीत.

कोठे कीर्तन व पुराण असले म्हणजे लोक जातात; परंतु कोणी मौज पहावयास जातो, कोणी उगाच दिवे पहावयास जातो, कोणी तंबाखू खात बसतो; कोणी अवाच्य भाषणे बोलत असतो; परंतु देवालय पवित्र जागा हे कोणाचे लक्षातच नसते. तसेच भट वेदपाठास जमले, म्हणजे याचप्रमाणे अवस्था होते. व स्वतः म्हणणारे तेही आपले लक्ष देवाकडे लावीत नाहीत. तंबाखू व भांग ओढीत असतात. तसेच लोक पूजा व संध्या करतात; परंतु पुष्कळ गृहस्थांचे येथेही मी असे पाहिले की, पूजेची खटपट रूप्याचे देव्हारे शोभेकरिता मांडतात व ढोंगाकरिता रुद्राक्षाच्या माळा व सोंगाकरिता भस्म लावितात; परंतु मनात तर काही एक नाही; आणि संपूर्ण दरबार कारभार तो रिकामा वेळ समजून करतात. तेव्हा सांप्रत काळचे लोकांमध्ये वास्तविक देवाचे भजन नाही. अक्षरे मात्र पाठ म्हणतात; परंतु अक्षरांनी काही उपयोग आहे काय? नुसते पाठ म्हणण्याने पुण्य आहे. असे समजतात हेच सर्व धर्म बुडवावयास, व अज्ञानास मूळ झाले आहे. ब्राह्मण मोठा दशग्रंथी म्हणवितो, परंतु त्यांस एका शब्दाचा अर्थ समजत नाही. ज्योतिष, छंद व व्याकरणाचे सूत्र इत्यादी पाठ म्हणतो. आता यासारखा मूर्खपणा कोठे आहे? व्याकरण, अष्टाध्यायी पाठ म्हणून त्याचा काही उपयोग नाही. जर समजले तर त्याचा उपयोग. ते न होता फक्त पाठ म्हणतात आणि आम्ही विद्वान ब्राह्मण म्हणवितात. त्यांची विद्या कोठे आहे? जर मनुष्य अर्थ समजणार नाही आणि शब्दांची ध्वनी मात्र करील तर म्हैस रेकली तद्वत मनुष्याने आक्रोश केला, इतकेच झाले. मनुष्याचा भाषणाचा गौरव काय तो अर्थावर आहे. तो अर्थ समजला नाही तर पशु, पक्षी ध्वनी करतात, तसाच तो मनुष्य ओरडतो. परंतु ज्ञानाने बोलत

नाही.

सांप्रतचे ब्राह्मण विद्येविषयी केवळ जनावरे आहेत. त्यांस अर्थज्ञान नाही. येणेकरून धर्मावरील भाव व आस्तिक बुद्धी भ्रष्ट झाली. आणि वेद, शास्त्र, पुराणे ही परवाच किंवा लमाणाचे गाणे यासारखी झाली. देवाचे प्रार्थनेस बसले, म्हणजे जी मर्यादा, निष्ठा व मनाची तत्परता असावी ती नाही, कारण की, हे सर्व गुण ध्वनीपासून येत नाही. अर्थज्ञानापासून येतात व देवांचे महत्त्व हृदयात वागले, म्हणजे सहजच तशी वर्तणूक होते. ज्या शब्दांनी ईश्वराचे वर्णन झाले, ते शब्द जर आपल्यास कळले, तर मात्र त्यासारखी वर्तणूक उत्पन्न होईल. आणि ते शब्द जर अर्थविरहित ऐकले तर तसे होणार नाही. ब्राह्मणांची पढणी आमचे कानी पडतात. त्यांचा अर्थ म्हणणारास कळत नाही व ऐकणारास कळत नाही. उभयता शंख आणि एक मान डोलवितो, व वाः वाः म्हणतो आणि भटांना शाबासकी देतो. जे पाठ म्हणतात आणि अर्थ जाणत नाहीत, त्यांच्यासारखे मूर्ख व व्यर्थ आयुष्य घालविणारे पृथ्वीत थोडेच असतील. मागील युगांत असे वेडे ब्राह्मण नव्हते. ते म्हणत होते. सार्थ म्हणण्याची पद्धती ज्या दिवसापासून बुडाली, तोच दुर्भाग्याचा फेरा, या लोकांस खचित आला. कारण की, याजमुळे ब्राह्मणांचे तेज गेले. भट मूर्ख झाले व त्यांजपासून गृहस्थ असेच करू लागले. जो उठला तो पाठ म्हणतो. 'अरे मूर्खा, पाठ म्हणून फळ काय ?' असे सांगणारा कोणीच नाहीसा झाला.

मला वाटते की, पहिले ब्राह्मण ज्ञानी होते. परंतु पुढे काही काळाने त्यांची प्रजा ही मूर्ख झाली. पूर्वी सर्व ब्राह्मण पोथीवरून म्हणत असत. आणि पोथीशिवाय म्हणू नये, असे शास्त्र आहे. पुढे ईर्ष्येने म्हणता म्हणता पोथीशिवाय किरकोळ अनुष्ठाने करू लागले. नंतर कोणी त्यांजवर चढ करून सर्व वेद पाठ म्हणू लागले. मग भट वेगळे व श्रौतकर्म चालविणारे ब्राह्मण वेगळे, असे दोन पर्याय झाले; परंतु दोघेही अर्थशून्य, संस्कृत भाषेत पाठ म्हणतात. नमस्कार करावा, विष्णुस्मरण करावे, तांब्यात पाणी ओता, हे देखील शब्द मंत्रात मोडतात. ब्राह्मण संस्कार पाठ करतात. हा मूर्खपणा पाहून चमत्कार वाटतो की, अर्थ जाऊन हे ज्ञानशून्य म्हणणे आले कसे ? आणि हे लोकांस इतके प्रिय झाले कसे ?

अर्थ म्हणजे शब्दामध्ये जसा जीव. तो जर नाही तर ते शब्द प्रेतवत आहेत. छत्तीस अक्षरांवर हजारो भाषा आणि हजारो शास्त्रे झाली आहेत. म्हणून अक्षरांची मातबरी नाही; परंतु भटमंडळी हे मनात आणीत नाहीत. त्यांनी आता विरखडे ठेवावी, आणि पाठ म्हणावयाचा गर्व सोडून द्यावा व

चौसष्टी उलटण्यात काही अर्थ नाही, हे खचित जाणावे. पोथी घेणे यात लज्जा नाही; परंतु सार्थ वेद म्हणावा. येणेकरून फार चांगले आहे. मनाची सुधारणा होईल, ते करावे. स्मृतीची सुधारणा हे पोपटाचे कर्म. तशीच सहस्रनामे, स्तोत्रे व पूजा ही सार्थ म्हणावी. उगीच मजुरी करू नये. म्हणजे त्यातील अर्थ कळून त्याप्रमाणे वागणूक होईल. बाहेरचे ढोंग दाखवून उपयोग काय ? देवपूजा कंठाळभर मांडली आणि मनात काही नाही, तर ती व्यर्थ आहे.

## स्वराज्यातील विद्वान

■

**पत्र नंबर ५० : ४ मार्च १८४९**

हिंदू लोकांचे राजधानीत काही विद्या वाढविण्याचा प्रयत्न होत नाही. पेशव्यांचे राज्य दक्षिणेत होते; परंतु काही विद्यावृद्धी झाली नाही व विद्यावृद्धी करणे, हा सरकारचा धर्म आहे, असे इकडील लोक मानीत नाहीत.

जेथे जेथे हिंदू लोकांच्या व मुसलमान लोकांच्या राजधान्या आहेत, तेथे शास्त्री, पंडित, वैदिक, गवई इत्यादी विद्वानांचा समुच्चय असतो; परंतु त्यांच्या विद्येचा लोकांमध्ये काही उपयोग होण्यासारखी तजवीज होत नाही. कशी म्हणाल तर शास्त्री चार शास्त्रपारंगत विद्वान असला, म्हणजे राजाने त्यांस गाव वर्षासने द्यावी, आणि मग शास्त्रीबाची गाठदेखील पडायची मुष्कील. सर्व दिवस घरात बसून असावयाचे आणि सरकारचे वेतन खाऊन स्नान, संध्या, देवपूजा करावयाची. तीत सकाळपासून दोन प्रहरपावेतो सोवळे व दुपारून निद्रा आणि संध्याकाळी क्षणभर बाहेर पडले तर पडले. वर्षासहामासी जेव्हा कचेरीत बोलवणे येईल, तेव्हा मात्र त्यांची विद्या बाहेर पडावयाची; पण तीही नेमलेल्या लोकांतच. तेथे भलत्याचा प्रवेश व्हायचा नाही. असे करून त्यांनी आपले आयुष्य घालविले.

तसेच वैद्यबाबा. मोठे कीर्तिमान पण गरिबाचे घरी औषध द्यावयास जावयाचे नाहीत व त्यांची गाठ पडावयाची नाही. त्यात दूतचिन्हे वगैरे पाहून वार, तिथी इत्यादी सुलक्षणे मिळतील, तेव्हा वैद्याची पुडी सुटावयाची. तोपर्यंत रोगी मरून जाईल. परंतु वैद्य बाहेर पडणार नाही. त्यांस असे वाटते की;

मला सरकारातून पैसा मिळतो, तितक्यापुरते मी राजास मात्र औषध देईन. इतरांस काय म्हणून देऊ ? इत्यादी गर्वाच्या समजुती व निर्दयपणा त्यांचे अंगी आहे. तसाच गवई मोठा प्रख्यात जो आहे तो राज्याचे येथे पाचशे रुपये दर महा खात असतो; परंतु कधी प्राण गेला, तरी तो लोकांस शिकवावयाचा नाही. दोन शेर भांग ओढून घरी बसलेला असेल. आणि राजाचे बलावणे येईल, तेव्हा मात्र त्याकडे जाईल नाही तर तो कोणाजवळ कधी आपला गुण दाखवील, असे होत नाही. व त्यांस असे वाटते की, गरीब लोकांपुढे मी काय गाऊ ? माझी योग्यता केवढी ? मी महान थोर व हे भिकारी. यांचा हिशोब काय ? असे त्यांस वाटते; परंतु विद्वानांचे अंगी इतके दुर्गुण लागण्याचे कारण, जे त्यांस खावयास देतात, ते होत. जर करता राजांनी त्यांस मार्गास लाविले, तर ते लागतील; परंतु राजे त्यांस बळेच मूर्ख व गर्विष्ठ करतात.

जो कोणी विद्वान आहे, त्यांस राजाने सांगावे की, तुम्हांस दोनशे रुपये (किवा किती त्याची योग्यता असेल तो) दर महा पावत जाईल; परंतु घरी आळसात बसून पावावयाचा नाही, काही शिष्य मिळवा, त्यांस तयार करा, नवीन ग्रंथ लिहा; व ज्यास संस्कृत भाषा येत नाही, त्यासही शास्त्राचे मर्म समजावे, यास्तव संस्कृत ग्रंथाची भाषांतरे करून लोकांस ज्ञानी करा, तरच तुम्हास पगार मिळेल. असे जर सांगतील तर विद्यावृद्धी होईल. तेवढ्याच खर्चात लोकांचा फायदा होईल,ज्ञान वाढेल, जे विद्वान आहेत, त्यांचे गुण सर्वांचे दृष्टीस पडतील व त्यांचे हातून शिष्य तयार होतील, व येणेकरून विद्वानास गर्व राहणार नाही. व हल्ली जसे विद्वान आहेत, तितक्यास काही तरी लांच्छन असते, तसे असणार नाही.

परंतु ही गोष्ट राजे वगैरे अमीर लोक आहेत, त्यांस कळत नाही. विद्वानांचे पोषण करावयाचे इच्छेने लाखो रुपये ते खर्च करतात; परंतु ते मातीत टाकीतात. जो विद्वान व थोर असेल, त्यांस पुष्कळ पैसा देऊन राजाने आश्रित करावे; परंतु त्यांस ताकीद असावी की, जे कोणी येतील त्यांस फुकट शिकवीत जावे, औषध देत जावे. त्यास खर्च लागेल तो आम्ही देऊ. आणखी त्याजकडे काही कारखाना सांगावा की, जेणेकरून गरिबांचे हित होईल व विद्वानांचा सर्वांस उपयोग होईल; परंतु हिंदुस्थानांतील राजे बहुधा मूर्ख आहेत. व राजा हा शब्द नेहमी म्हणीत मूर्ख या अर्थावर योजिलेला आहे. याचे कारण असे की, राजे बहुधा मूर्ख असतात. रयतेपासून वसूल करून पैसा घेतात, त्याचा त्यांस बरोबर व्यय करता येत नाही त्यांस असे वाटते की, उत्तम माणसे आमच्या मात्र उपयोगी पडावी व इतर लोकांस त्यांचा काही फायदा नसावा; परंतु राजाने

किंवा त्यांचा पिता किंवा प्रपितामहाने द्रव्य आणिले नसते. जे राजाजवळ द्रव्य, ते रयतेपासून सर्व घेतलेले असते. याजकरिता त्या द्रव्याचा उपयोग असे दांडगाईने न करावा, परंतु हे मर्म राजे विसरतात आणि विद्वानही विसरतात.

राजाचे आश्रयाचे विद्वान जे असतात, ते शतमूर्ख होतात आणि विद्या बळेच लपवितात. त्यांस ती बाहेर काढावयाची लाज वाटते. मग इतिहासांत कथा आहे की, शिकंदर बादशाहास जो गुरू होता, त्यांस त्याची अशी प्रार्थना होती की, जी विद्या त्यांस सांगितली, ती त्याने लोकांत प्रकट करू नये. कारण की तेणेकरून राजाचा अपमान होईल. म्हणून त्याचे गुरूने आपली पुस्तके ठेविली आणि प्रकट केली नाही. याच समजुती इकडील लोकांच्या आहेत.

आता प्रत्यक्ष पहा की, जे विद्वान आहेत, त्याणी विद्या उघड जहाली, असे पाहिले, म्हणजे त्यांचे अंगाची लाही होते. कोणी शास्त्र्यास दाखवा की हा धर्मशास्त्राचा मराठीत तर्जुमा केला आहे. म्हणजे लागलाच तो म्हणेल की, अरेरे! विद्वानांचा थोरपणा गेला! इंग्रजांनी हे ग्रंथ प्रगट केले. आता शास्त्री व उपाध्ये कशास पाहिजेत! असे त्यांस वाटते.

याचप्रमाणे गवईलोक यास म्हणावे की, आपली थोडी विद्या अमक्याला शिकवा. म्हणजे त्याचे घर बुडाले. कोणी म्हणतो, अरे, गुरूचे आर्जव करावे तेव्हा विद्या प्राप्त होते ? विद्या फुकटची नाही. इतका विद्वानांस गर्व आणण्यास व विद्या बुडविण्यास कारण राजे आहेत. त्यांस विद्वानास कोणत्या रीतीने आश्रित करावे, हे समजत नाही. सर्व मूर्खपणा करतात. त्याचा परिणाम असा जहाला आहे की, जे प्राचीन ग्रंथ आहेत, त्याजवर लोक भरवसा ठेवतात, नवीन कल्पना सर्व राहिल्या.

जी जी औषधे पाच हजार वर्षांचे पाठीमागे लिहून ठेवली आहेत, तीच आज घ्यावयाची. याचे कारण कोणी पुसले, तर शास्त्रांत आहे, म्हणून सांगतात. तशी गायनकलाही बुडाली. राग म्हणजे काय, हेही कोणास समजत नाही, आणि नवीन राग कोणी करीत नाहीत. जे एकदा ग्रंथात मागील काळी ऋषींनी शोध करून ठरविले आहेत, तितकेच. त्याजवर काही एक नाही. सर्व विद्येचा ओघ अटकावला आहे. कोणी विचार करीत नाहीत. काही झाले म्हणजे ही गोष्ट वाजवी किंवा अयोग्य, असे कोणी म्हणत नाही; परंतु शास्त्रांत आहे इतकेच म्हणतात आणि विचार वाढवीत नाहीत. अस्तु.

हा काळ लवकरच क्षीण होत चालला आहे. लोक शुद्धीवर येतील, तेव्हा याचा विचार बरोबर करतील. सांप्रतकाली ते मूर्ख आहेत. यास्तव त्यांस

एखादी गोष्ट सांगितली, तर तिचा अर्थही करता येत नाही. मग वर्तणूक दूरच आहे.

✦ ✦

## पुराणातील ज्ञान

■

**पत्र नंबर ५५ : ८ मे १८४९**

हरएक कोणतेही गोष्टीचे गुणदोष पहावे लागतात. छापखान्याचे हुन्नरापासून किती एक गोष्टी चांगल्या व किती एक वाईट झाल्या आहेत. तसेच दारूपासूनही झाले आहे. तसेच जर कोणते पुस्तक लिहिले गेले, म्हणजे त्यापासून काही गोष्टी चांगल्या व काही वाईट होत असतात. याचा विचार करून चांगली मात्र घ्यावी. हे वाचणाराकडे आहे.

यावरून मी विचार करितो की, व्यासांनी पुराणे लिहिली, त्यांचे गुणदोष काय आहेत ? व त्यापासून लोकांचा फायदा काय झाला ? ज्या काळी हे ग्रंथ लिहिले त्या काळी हे ग्रंथ लिहिणारास असे वाटले नसेल की, असे आता लोक त्यांस समजतात, तसे समजतील व लोक त्यांची पूजा करतील व घरोघर ते ग्रंथ होतील. त्या वेळी छापखानाही नव्हता. याजमुळे हे ग्रंथ प्रसिद्ध व्हावयास बहुत काळ लागला. आज पाच हजार वर्षे झाली. तरी किती एक पुराणे मिळत नाहीत; कारण त्यांच्या प्रती झाल्या नाहीत. एक प्रत करावयास एक वर्ष पाहिजे. त्याची प्रत दुसरी व्हावयास तसाच पुष्कळ काळ लागतो. अस्तु.

पुराणे ही माझे मते काव्ये आहेत. त्यांचा आधार बहुतकरून वास्तविक गोष्टीवरून धरला आहे; परंतु त्यात कर्मे आणि बहूक्ती फार केली आहे. कोठे १० श्लोक देवांच्या स्तुतीचे लिहिले, म्हणजे लागलीच त्याची फलश्रुति व त्यांचा न्यास, ध्यान, कवच, छंद, दगड, धोंडे असे पुष्कळ आणून जोडले आहे. मुख्य पुराण करणारांची इतकीच बुद्धी होती की, रमणीय कथा आश्चर्य वाटावयाजोग्या लिहून, त्यात भक्तिज्ञान जागोजाग मिळवून ग्रंथ सुलभ व मौजेचे करावे; परंतु त्या काळी भूगोल, खगोल या विद्या पुरतेपणी वृद्धिंगत झाल्या नव्हत्या. म्हणून भूगोलाविषयी त्यात पुष्कळ चुका आहेत व पृथ्वीची वर्णने मनास येतील तशी कवींनी केली आहेत. भारत, भागवत यातील दृष्टांत लोक

फार देतात; परंतु संपूर्ण ठिकाणी ते यथास्थित लागत नाहीत. कारण की, वास्तविक इतिहास जर असेल, तर त्याजपासून ते राज्य कशाने गेले व लोक शहाण्याचे वेडे कसे झाले व वेड्याचे शहाणे कसे झाले हे कळते व ते दृष्टान्त आपणास लागू करता येतात.

परंतु पुराणातील तसे लागू करता येत नाहीत; कारण की, पुराणातील सर्व गोष्टी प्रारब्धावर आणि देवाचे सामर्थ्यावर रचिल्या आहेत. असा गजेंद्रास शाप होता म्हणून नक्र झाला; अहिल्येस वर होता, म्हणून उद्धरली. रावणास वानरांनी मारला. दुर्योधनास मारून भूभार कमी करावा, म्हणून युद्ध केले. हिरण्यकश्यपूस मारावयास खांबातून देव निघाला. वामनाने पायाने बळीस पाताळी घातला. या गोष्टी व अस्त्रयुद्ध, रथ-वाहन, धर्मयुद्ध, प्रतिज्ञा, शाप, वरदान, तात्काळ ईश्वराची प्राप्ती, या गोष्टीस आता लागू करणे यासारखा मूर्खपणा, कोठे आहे ? कोण म्हणतो, 'पेशव्यांचे राज्य कसे बुडाले हो ?' दुसरा उत्तर देतो, 'अहो, ते अवतारी पुरुष होऊन गेले. जे होणार ते झाले. त्यांस उपाय काय ? सद्दी फिरली म्हणजे क्षण लागत नाही. देव देणार त्याला देतो. त्याचे मनात आले, म्हणजे पाहिजे तसे घडते.' या प्रकारच्या समजुती लोकांच्या आहेत.

वास्तविक इतिहास पाहत नाहीत व कारण लक्ष्यांत आणीत नाहीत. कोणी म्हणतात प्रारब्ध, कोणी म्हणतात सद्दी; दुसरे म्हणतात ईश्वर करील तसे होईल. म्हणून उद्योग करण्याची गरज नाही. अशा समजुती या सर्व पुराणांतील आहेत. पुराणे यांस मूळ आहेत तसेच व्रतमहात्म्ये व क्षेत्रमहात्म्ये, येणेकरून पुष्कळ वाईट समजुती झाल्या आहेत. पुराणिक व्रत सांगत बसला, म्हणजे अडाणी बायका व चार मूर्ख पुरुष बसलेले असतात. त्यांस व जनावरास काही फरक नाही. यांजमुळे जे पुराणिक सांगतो ते त्यांस खरे वाटते आणि पुराणिक म्हणतो, दोन हजार वाती करून देवापुढे जाळल्या असता महापुण्य आहे; म्हणजे लागल्याच बायका घरी येऊन नवऱ्यासह तगादा करतात की, आमची तुपाची व कापसाची तयारी करावी. आम्हांस पुराणिकबाबांनी सांगितले की, कापूर, वाती व तूप जाळले असता फार पुण्य आहे. मग दोनचार रुपयांचा जिन्नस व दोन महिन्यांची मेहनत खरीखुरीच जाळतात. पुराणिक व भट यांचे सांगितल्यावरूनच बायका आपल्या नवऱ्याच्या प्रेताशी जिवंत जाळून घेत, त्या दोन-चार रुपयांचा जिन्नस जाळावयास कमी करतील काय ?

याचे कारण काय म्हणाल, तर अज्ञान फार. आम्ही जर आता कोणास सांगितले की, तुमची बायको मेली, तिच्याशी तुम्ही जाळून घ्यावे, तर कोणी

ऐकेल काय ? पुरुष कोणी ऐकणार नाहीत. कारण की, त्यांना बायकांपेक्षा काही तरी थोडेसे अधिक कळते. परंतु बायका अंधकारात. त्यांस जसे सांगितले तसे वर्ततात. याजमुळे सती जाण्याचा पाठ पडला. जर बायका शहाण्या व त्यांस विद्या वगैरे शिकवावयाची चाल असती, तर ज्यांनी त्यांस प्रथम सती जाण्यास सांगितले त्यांच्या त्यांनी शेंड्या उपटून टाकल्या असत्या. अजूनही जर स्त्रियांस विद्या वगैरे शिकविल्या तर त्या आपला पुनर्विवाह करतील आणि शास्त्री वगैरे जे त्यांस आडवे येतील, त्यांस पुसतील की, पुरुषांनी पाहिजे तितकी लग्ने करावी. मग स्त्रीने नवरा मेल्यावरही दुसरा नवरा का करू नये ? आणि आपण शास्त्रार्थ देऊन चालू करतील.

परंतु असे होत नाही, कारण की, स्त्रियांस फार अज्ञानात ठेविल्या आहेत यास्तव जे पुराणिक सांगतो, ते त्यांस खरे वाटते. परंतु पुराणात चुका काय आहेत याचा विचार करता येत नाही व लाक्षणिक अर्थ काय आहे व बहूक्ती कोठे काय आहे हे काहीच समजत नाही. परंतु हल्ली म्हणतात की; ज्यांनी पुराणे केली ते देव होते. वास्तविक पाहिले तर ते मनुष्यच होते. व त्यासही वाटले असेल की, आणखी पाच हजार वर्षांनी आमची योग्यता देवासारखी होईल व आम्ही जे जे लिहिले ते त्यातील अर्थ मनात न आणता सर्वच खरे म्हणतील. हे त्यांसही ठाऊक नाही. हिंदू लोक खराखुरा इतिहास एखादे देशाचा वाचून व्यवस्था मनात आणतील तर बरे होईल. म्हणजे त्यांस हे सर्व कळेल, पुराणे ही केवळ कवींची काव्ये आहेत. जो जो संस्कृत भाषा बुडाली, तो तो त्याचे स्तोम वाढत चालले; नाही तर तसे तुकारामाचे अभंग, दोहोरे वगैरे आहेत तद्वतच पुराणांची योग्यता असती. यास्तव पुराणातील मतांमुळे लोक फार मूर्ख व सुस्त झाले आहेत, हे त्यांस अद्याप कळत नाही.

## नादविद्या

**पत्र नंबर ५६ : १५ एप्रिल १८४९**

हिंदू लोकांमध्ये नादविद्या व तिच्या शाखा गायन, वाद्य, नृत्य इत्यादीक यास वाईट म्हणतात. याचे कारण मला दुसरे काही दिसत नाही. परंतु या लोकांमध्ये शहाणपण नाहीसे झाले आहे. व विद्या अगदी बुडाली आहे. नाही

तर नादविद्येस असे सदोष न मानते.

वास्तविक पाहिले तर नादविद्या बहुधा निर्दोष आहे व या विद्येपासून जे सुख म्हणजे इंद्रियसुख होते, ते ज्ञानसुखाचे जवळ जवळ आहे. विद्वान यांनी असे म्हटले आहे की, ज्ञानसुखापुढे सर्व इंद्रियसुखे तुच्छ आहेत. ते खरे; परंतु नादविद्येचे सुख ज्ञानसुखासारखे आहे. कारण हे विकाररहित आहे. यात दोष नाहीत व येणेकरून चित्ताचे समाधान, मनाचा संतोष, इंद्रियात उल्हास आणि जिवास विश्रांती होऊन कंटाळा जातो. व पूर्वी याचा अंगीकार नारदासारखे देवऋषी, शंकरासारखे अवतारी यांनी केला होता. तस्मात् या विद्येचे वर्णन काय करावयाचे आहे? या विद्येने दया, प्रीती, भक्ती इत्यादीकांचा उत्कर्ष करता येतो व ''गायनः पंचमो वेदः'' असे व्यासांनी म्हटले आहे. कोणी स्वर्गसुखाची प्रतिमा म्हटले आहे व मुसलमान लोक तर गायनविद्येकरून मृत प्राणी जिवंत झाले आहेत, असे म्हणतात व हिंदू लोक गायनाचे वर्णन करण्यात कमी नाहीत.

भागवतात गोष्ट आहे की नारदास गर्व फार होता, तेव्हा तो गर्व हरण करण्याकरिता सांगितले की, तुम्ही जाऊन एक जांबुवंत नामे अस्वल श्रीरामाचा सेवक आहे, त्यांस भेटावे. याजवरून नारद तेथे गेले. तो जांबुवंत गात बसला आहे. आणि दगड पाषाण आसमंतांत भागी विरघळून रस झाले आहेत. नारदांनी आपला वीणा ठेवला. तो त्या रसात पडला आणि गायन बंद होताच पूर्ववत पाषाण झाले, आणि वीणा आत अडकला. तेव्हा जांबुवंताने नारदास सांगितले की, तुम्ही गावयास बसावे आणि दगडाचे पाणी करून वीणा काढावा. ते नारदाच्याने होईना; तेव्हा तो जांबुवंतास शरण गेला अशी पुराणात कथा आहे. अस्तु.

गायनेकरून निर्जीव पदार्थ द्रवतील, हे खरे म्हणवत नाही. परंतु सजीव प्राणी द्रवतात हे खरे. जे क्रोधी असतांत, त्यांचा क्रोध जातो. निर्दय दयाळू होतात व भांडखोर शांत होतात. हे खरे आहे. याचा अनुभव मनुष्यांस आहे. असेच नाही; परंतु इतर जनावरांसही आहे. मोर, हरणे, सर्प इत्यादी गायन ऐकतात. येविषयी गोष्टी या देशात पुष्कळ आहेत. व तानसेन गवई गाऊन दिवे लावी, असे म्हणतात. अशा गोष्टी चमत्कारिक या विद्येच्या आहेत. व प्राचीन काळी रावणादिक राक्षसांनी गायनेकरून शिवाची प्रसन्नता केली असेही आहे व संस्कृत भाषेत पुष्कळ पुस्तके याजवर आहेत. परंतु ती सर्व आता लोकांनी बांधून ठेवली आहेत. व जयदेवासारखे पंडित यांनी ग्रंथ केले आहेत व कवने केली आहेत.

परंतु सांप्रत काळी हिंदू लोक म्हणतात की, गायनाची विद्या मुसलमान लोकांची. परंतु त्यांचे लक्षात असे येत नाही की, हिंदू लोकांच्या विद्या मुसलमान शिकले आणि हिंदू लोक विसरले, म्हणून ती विद्या त्यांची झाली असे नाही. परंतु सांप्रत काळी दोन लांच्छने या विद्येस प्राप्त झाली आहेत. एक जे गाणार व नादविद्येत प्रवीण असतात, ते मूर्ख व्यसनी, व भांगे असतात. लोकांस शिकवीत नाहीत, ग्रंथ पहात नाहीत. व मदोन्मत्त होऊन थोडकेसे आले, म्हणजे स्वच्छंद होतात. आणि (दुसरे) दुर्जनांनी या विद्येचा अंगीकार केला आहे व व्यभिचारिणी बहुधा या विद्येस लोकांस लुब्ध करून नादी लावण्याकरिता अंगीकारितात. याजमुळे या विद्येचा हलकेपणा लोकांस झाला आहे. आणि गाणी वाजविणे म्हटले की, लागलेच म्हणतात की अरेरे! छंद वाईट व हलका आहे. सारंगी हातात घेतली किंवा मृदंग हातात घेतला, म्हणजे साजिंदेपणा ठरतो व वीणा घेतला म्हणजे गोसावीपणा ठरतो.

याप्रमाणे लोकांच्या मूर्ख समजुती पडल्या आहेत. परंतु जर गणित-विद्या चोरटे लोक शिकले किंवा बंडवाले युद्धविद्या शिकले, तर विद्या वाईट झाल्या की काय? व त्या त्याग करण्यास योग्य आहेत की काय? स्वर्गसुखाची प्रतिमा नादविद्या आहे, असा असता भांगट लोक व दुष्ट स्त्रिया यांणी तिचा अंगीकार करून चांगल्या लोकांनी त्याग करून, विद्या वाईट असे ठरविले आहे. परंतु हा मूर्खपणा आहे. जर्मन देशांत नादविद्या सरकारी शाळेत शिकवितात. फ्रेंच व इंग्रज म्हणतात की, संभावित गृहस्थ याणीं ही विद्या शिकल्याशिवाय त्यांची विद्या परिपूर्ण होत नाही. जसे देशाटण हा विद्याभ्यासाचा भाग आहे, तद्वत् ही विद्या आहे. व बायकांस अवश्य शिकवितात. संभावित गृहस्थांचे स्त्रियांस नादविद्येत प्रवीणता नाही, असे आढळत नाही. अशा शहाणे लोकांच्या चाली आहेत व याप्रमाणे हिंदू लोकांच्या युगांतरी होत्या. कारण की विराट राजाचे कन्येस गायन व नृत्य शिकविण्यास अर्जुन बृहन्नडा या वेषाने राहिला, ही कथा भारती प्रसिद्ध आहे. तेव्हा याविषयी संशय नाही.

परंतु आताचे हिंदू लोक फार रानटी झाले आहेत. त्यांस निर्मळ ज्ञान, सुख, याचा अनुभव नाही. व त्यांच्या स्त्रियांस ते कुत्र्याप्रमाणेही मान देत नाहीत. मग त्यांस या रमणीय विद्या कोठून शिकविणार? नवरा म्हणतो माझी बायको कुळंबिणीपेक्षा अधिक. मी मेलो तर इणे जाळून घ्यावे. व माझे पायाचे तीर्थ घ्यावे व माझी पूजा करावी. इला दुसरा देव नाही. याप्रमाणे वर्तणूक करतात. यांस सुधारावयास बहुत दिवस पाहिजेत. घरून उठून गाणे ऐकावयास कसबिणीच्या इथे बहुत लोक सांप्रत जातात. व गाण्याचे, वाद्याचे बहुत लोक

इष्की म्हणवितात. यांनी जर आपल्या स्त्रियांस विद्वान केल्या, तर असे अनाचार करण्याची जरुरी नाही. परंतु हे त्यांस मोठे विरुद्ध वाटते. कारण हे लोक अगदी वेडे झाले आहेत. व त्यांस नीट गोष्ट सांगणारा देशात एकही राहिला नही. सर्व एका राशीचे झाले आहेत.

सर्व देशांत जितके लोक आहेत, तितके विद्वान नसतात. परंतु काही असतात व त्यांचे आधाराने इतर लोक चालतात. परंतु देशांत दोनशे चारशे तरी शहाणे व लोकांचे हितकर्ते पाहिजेत. मग बाकीचे अडाणी लोक असले तरी चिंता नाही. परंतु जे विद्वान आहेत त्यांस विद्वान समजून त्यांचे मार्गाने वागण्याची इतरांस बुद्धी पाहिजे. सांप्रत हिंदू लोकांमध्ये वास्तविक विद्वान किती एक होत चालले आहेत. परंतु पुष्कळ लोक यांचे सांगितले ऐकावे, असे मानीत नाहीत. यास्तव त्या विद्वानांचा बुद्धिचा उपयोग होत नाही. परंतु मोत्यांची हेळणा कावळे करीतात. त्या दृष्टांताप्रमाणे हे आहे. हल्ली जे विद्या शिकून विद्वान झाले आहेत, त्यांचे सांगितल्याप्रमाणे लोकांनी चालावे. अशी लोकांस बुद्धी देण्यास अवकाश आहे.

ही गोष्ट ज्या दिवशी होईल, त्या दिवसापासून पंचवीस वर्षांत हिंदुस्थानाचा रंग फिरेल. सर्व लोकांस उत्कंठा अशी झाली पाहिजे, की, आम्हांमध्ये विद्वान कोण आहे ? चला त्याची बोलणी ऐकू, त्याचा बुद्धिवाद घेऊ; हे लोकांच्या दुर्भाग्यामुळे झाले नाही; परंतु होईल, यात संशय नाही. परंतु हे होण्यास ब्राह्मणांचा गर्व अगदी निस्तोष गेला पाहिजे. ते अद्याप आपले धुंदीत आहेत. आणि मूर्खपणा आपले जवळ असून, वास्तविक विद्वानांची बोलणी ऐकत नाहीत. प्राचीन काळी आम्हांस देव असे लोक मानीत होते. तसेच आता मानावे असे ते इच्छितात. परंतु आता ते लौकर माणसांसारखे होण्याचा समय आला आहे. आता लोक अज्ञानात नाहीत, हे त्यांणी पुरते समजावे.

# लोकांची समजूत व पुराणादिकांचे सौरस्य

■

**पत्र नंबर ५९ : ६ मे १८४९**

हिंदू लोकांमध्ये स्वधर्माचा विचार कोणी करीत नाहीत. देवळात अमर्यादा करतात.

पुणे येथे व इतर ठिकाणी देवांची नावे लोकांनी भाग्या मारुती, छिनाल बालाजी, खुन्या मुरलीधर, चिमण्या गणपती इत्यादी ठेविली आहेत. याजवरून असे वाटते की, देवाचा मान करावा आणि देवास भीत जावे, हा भाव अगदी नाहीसा झाला. देवळे ही पवित्र जागा; त्यात अनाचार असू नये, हे लोक अगदी जाणत नाहीत.

मला वाटते की इंग्रजांचा धर्म कसाही असो, परंतु त्यांस देव आणि त्याचा मान करणे हे समजते. पहा की आठ दिवसांनी देवळात ते जातात परंतु भक्तीने व मर्यादेने भजन करून माघारे येतात. आणि हिंदू लोकांचे देवळात पहा. कसबिणी बिराडास असतात; सोदे, लुच्चे, संध्याकाळी तमाशे, पहावयास वगैरे येऊन बसतात. त्यांचे मनात देवळांचा मान अगदी नसतो आणि तसे चावडीवर तमाशांत लोक जमतात, किंवा चौथऱ्यांवर पान सुपारी खात बसतात, घरच्या कारभाराच्या गोष्टी सांगत बसतात; तद्वत व्यवस्था आहे. पुण्यात तुळशीबागेत गेले किंवा हिंदू लोकांचे कोणतेही जत्रेस गेले, म्हणजे हेच सर्व दृष्टीस पडते. देवाकरिता भक्तीने येऊन मर्यादेने व पवित्रपणाने वागतात, असा शंभरांत एक मनुष्य असतो.

स्वधर्म म्हणजे काय, तो या लोकांस अवश्य सांगितला पाहिजे. कित्येक मूर्खांस असे वाटते की, पुराणांत जितक्या गोष्टी लिहिल्या आहेत, तितक्या खऱ्या आहेत; परंतु व्यासांनी असेच लिहिले आहे की, स्त्री, शूद्र, वैश्य इत्यादी मूर्ख जनांकरिता पुराणे लिहिली आहेत. ज्ञानी यांस कर्मे व पुराणे यांची गरज नाही, ही गोष्ट खरी आहे.

कारण पुराणांत कित्येक गोष्टी केवळ मूर्खांचे शासनार्थच सांगितल्या आहेत. जसे वाती करून लावाव्या, याचा वास्तविक अर्थ इतकाच की, अंधेरात उजेड करावा; परंतु ही सोपी गोष्ट सांगण्याकरिता पुराण लिहिणाराने नाना प्रकारच्या गोष्टी लिहिल्या आहेत की, जसा एक उंदीर होता, त्याचे शेपूट एक बाई वाती करीत असता चातीस लागून, त्याने चाती फिरून एक वात झाली.

ती जेव्हा देवळात जळाली, तेव्हात त्या उंदरास न्यावयास विमान आले. त्याने पुसले का ? तेव्हा देवदूत म्हणाले की, तुझ्या पुच्छाने धाग्याने एक वात झाली; ती आज देवळात जळाली; त्याचे श्रेय तुला आले. म्हणून हे विमान तुला आणले आहे. याजकरिता वाती लावतील त्यांस मोक्ष होतो.

तसेच वांग्याचे धुराने विमान पडल्याची कथा आहे. इत्यादी लक्षावधि कथा आहेत; परंतु त्यांचा खरा अर्थ सोडून लोकांनी त्या गोष्टीच खऱ्या मानिल्या आहेत. आणि बायका ऐशी वर्षेपर्यंत वाती करतात; आणि जाळितात. दुसरा काही उद्योगच नाही. हा मूर्खपणा पुराणांचे गोष्टींनी शिरला. जर पुराणे करणारांनी खूळ लावावयाच्या गोष्टी न लिहिता साधेपणाने सांगितले असते की, गरिबांस धर्म करावा; अंधेर असेल तेथे दिवा लावावा; परंतु असे न सांगता त्यांनी दर एक कलमास मोक्ष आणि स्वर्ग सांगितला आहे.

त्यांस असे दिसते की, या गोष्टी लिहिणारास पुढे लोक मूर्ख होतील व या गोष्टी सर्व खऱ्या म्हणतील, असे वाटले नव्हते; परंतु तशी गोष्ट झाली. आता पुराणिकबाबांच्या गोष्टी ऐकणारे ज्ञानी पुरुष नाहीत; परंतु बायका व पुरुष खुळे, वेडे, अज्ञान, मूर्ख ज्यांस काहीच समजत नाही, असे बसतात आणि सर्व गोष्टी खऱ्या म्हणतात. येणेकरून लोक मूर्ख झाले आहेत.

' याजकरिता या सर्व पुराणांतील कोणी रहस्य काढून नवीन ग्रंथ लिहिला तर फार हित होईल. उनाड गोष्टींनी लोकांस भ्रांतीत घालणे हे योग्य नाही. आणि वास्तविक पाहिले तर धर्मशास्त्र, वैद्यशास्त्र व ज्योतिषशास्त्र ही सर्व प्राचीन काळी लिहिली गेली, आणि सांप्रत काळास फरक पडला आहे, त्याजमुळे धर्मशास्त्र जे फेरफार करावयाचे ते केले पाहिजेत. जसे ज्योतिष काळेकरून चाळावे लागते, तेव्हा त्यांस मेळ पडतो; आणि वैद्यक ही शास्त्रांत एक आहे आणि कृतीत वेगळेच असते. वैद्य चार रोगांची औषधे जाणतो; परंतु जर एका मनुष्यास चार रोग झाले, तर त्याने कल्पना बसवून योजना केली पाहिजे. आणि हजार औषधे एका रोगास लिहितात; परंतु वैद्याने प्रसंग पाहून दिले पाहिजे.

तसेच धर्मशास्त्र अनेक मते आहेत व पुराणांत अनेक गोष्टी आहेत; परंतु लोकांची स्थिती पाहून व तारतम्य पाहून त्यांचे रहस्य जाणावे. केवळ अर्थाचा अनर्थ करू नये; परंतु हे लोक शुद्धीवर नाहीत. अगदी भकले आहेत. त्यांस शिकवणारा शंकराचार्य कोण ? ईश्वर करील ते करो, परंतु लोक फारच अज्ञान झाले. धर्म म्हणजे काय, विद्या म्हणजे काय, हे अगदीच जाणत नाहीत. मोडक्या घराचे कुजके वासे राहतात, तसे हिंदू धर्म शास्त्र व विद्प्राचीन काळचे

शब्द लोकांचे तोंडात मात्र आहेत; परंतु अर्थ ठाऊक नाही. आणि काही विद्या फारच मूर्खपणास नेऊन पोचविल्या आहेत. त्या कोणत्या म्हणाल तर ऐका.

एक वैद्यकी. रसायनशास्त्र हे चांगले शास्त्र आहे; परंतु त्यामध्ये या लोकांनी किमया काढली आहे. तसेच ज्योतिषशास्त्र चांगले; परंतु त्याजवरून भविष्ये पाहण्याची रीती व नियम काढले आहेत, ते अगदी खोटे. आकाशातील जे तारे, त्याच्याने पृथ्वीवरचे मनुष्याचे नशिबाचा फेरफार कसा होईल ? शनी पाहिजे तिकडे गेला व गुरु कोणत्याही राशीस आला, तरी मी पृथ्वीवर राहणारा माझे तो काय करील ? व माझ्याशी व त्याशी संबंध काय ? परंतु प्राचीन काळचे भटांनी अडाणी लोकांवर कर बसविण्याकरिता ही युक्ती केली आहे. तसेच नीतिशास्त्र याचे पर्यवसान तप आणि योगशास्त्राकडे गेले आहे; परंतु त्यातही काही अर्थ नाही. शास्त्रकारांनी नीती सांगण्याकरिता ही युक्ती केली आहे. म्हणजे पुरुषास तीन वेळा स्नान वगैरे सांगितले. येणेकरून शास्त्रकाराचा हा हेतू की, त्या पुरुषाचा काळ त्या खटपटीत जाऊन त्याकडून काही दुराचार घडू नये.

ब्राह्मण चोरी करतील, म्हणून मुळीच द्रव्य बाळगू नये, असे सांगितले. संन्याशी स्त्रीशी जातील, म्हणून त्यांस सांगितले की, तुम्ही घरी राहू नये व दूध वगैरे खाऊ नये. तात्पर्य, त्यांची नीती रक्षण होण्याकरिता इतक्या युक्ती सांगितल्या. तसेच विधवा स्त्रियांचे हाल त्यानिमित्तच आहेत. परंतु नीती स्पष्ट करून सांगते, तर बरे होते. ही इतकी बहूक्ती केली, त्याने लोक मूर्ख झाले. गायनविद्या आहेत. त्यांचा राग अमका चांगला आहे, असे म्हणावयाचे सोडून, या रागाने पाऊस पडतो, त्या रागाने दिवे लागतात, इत्यादी अतिशयोक्ती केली आहे. ती न समजता लोक आता खरेच म्हणतात, आणि म्हणतात की, तशी विद्या कोठेच नाही. आणि मंत्राचे सामर्थ्य गेले; परंतु होते कधी ? कधी नव्हते. ही बहूक्ती आहे. याजवर भरवसा ठेवू नये.

तसेच, योगशास्त्राची अवस्था आहे. मला असे वाटत नाही की, मनुष्य योगाने हजार वर्षे वाचेल, किंवा प्राण ब्रह्मांडी नेईल आणि सुखदुःखांचा त्याग करील. मग त्यांस तोडला तरी सारखा, मारला तरी सारखा. अशा स्थितीचे वर्णन पुराणात बहुत आहे; परंतु ही स्थिती पुराणांतील इतर गोष्टीसारखीच मला अमानुष व अशक्य दिसते. किंबहुना अतिशयोक्ती असेल. म्हणजे मनुष्याने सुखदुःखाविषयी शांती धरावी, म्हणजे चित्त स्थिर रहाते, हे स्पष्ट लिहिल्यावाचून बळेच अवघड रीतीने लिहिले असेल, हेच अनुमान दिसते.

जर योगशास्त्र खरे असते, तर नाहीसे का होते? लोक अवश्य योग करते. कारण ते मोठे सुख आहे; परंतु ही गोष्ट किमयेप्रमाणे व्यर्थ आहे. म्हणून या अशा वक्त्यावर भरवसा ठेवू नये. नीट अर्थ करीत जावा आणि विद्येचे दुसरे भाग मात्र घ्यावे आणि भविष्य ज्योतिष टाकून द्यावे. हिशेबांचे मात्र ज्योतिष घ्यावे, हे बरे. यथानीती वर्तणूक केली, म्हणजे त्यात मोक्ष आहे. हजार आचारांच्या खटपटी केल्या, तरी त्यात काही नाही आणि शास्त्राचा अर्थ युक्तीने घेतला पाहिजे. याविषयी वाक्य –

श्रुतिस्मृतिविरोधे तु युक्तिरेव बलीयसी।

या वाक्याने ह्याचा निर्णय होतो. परंतु ज्या दिवशी हिंदू लोक आपल्या बुद्धीचा उपयोग करू लागतील, त्या दिवशी त्यांस हा भेद समजेल.

## संस्कृत आणि इंग्रजी विद्या

**पत्र नंबर ६९ : २९ जुलाई १८४९**

लोकांमध्ये अशी समजूत आहे की, शहाणपण हे अंगस्वभावाने येते. परंतु ही जरी थोडीशी खरी गोष्ट आहे; तत्रापि सर्व शहाणपण अंगस्वभावात असते, असे नाही.

शहाणपण पुष्कळ मिळवावे लागते. लोकांमध्ये समजूत अशी आहे व ज्ञान मिळणे हे संसारकृत्य आहे; याजकरिता किती एक जण इंग्रजी शिकतात. त्यांस लोक पुसतात की, तुम्हांस रोजगार लागला. आता विद्या शिकता कशाला? शहाणपणा व ज्ञान म्हणजे काय, याचा अर्थच त्यांस कळत नाही. मनुष्याने ग्रंथ वाचले पाहिजेत; पुष्कळ विद्या व भाषा शिकल्या पाहिजेत; म्हणजे बहुत गोष्टी कानावर पडून माहितगारी होते; केवळ संस्कृत वाचूनच होणार नाही. मला निश्चयेकरून वाटते की, ज्यास शहाणपण व ज्ञान मिळवावयाचे असेल, त्याने इंग्रजी भाषा किंवा त्या भाषेतील ग्रंथांचे तर्जुमे तरी वाचावे, म्हणजे त्यांस पुष्कळ गोष्टी कळतील.

आता इंग्रजी विद्या फार सुधारली आहे. याजमुळे त्यातील भूगोलावर

एक ग्रंथ पढलेला आणि जितके संस्कृत किंवा इतर भाषेत ग्रंथ आहेत, ते सर्व जमा केले, तर त्या एकाची बरोबरी व्हायची नाही, असे आहे; कारण इंग्रज लोकांनी विद्या फार सुधारल्या, याजमुळे त्या शुद्ध आहेत, आणि पूर्वीच्या काळी शोध कमी होते. याजमुळे विद्या अर्धवट झाल्या, तितक्या राहिल्या आहेत, केवळ संस्कृतानेच मनुष्य शहाणा व ज्ञानी होईल, असे नाही. शास्त्रे इत्यादीक पढले आहेत, त्यांच्या बहुत वाकड्या समजुती आहेत. व हे एक संस्कृताचे धोरण आहे. आणखी बहुधा पाहण्यात आहे की, संस्कृत पढलेले भ्रमिष्ट, मताभिमानी, अर्थाचे अनर्थ करणारे आणि वाकड्या रीतीने भलतेच दृष्टांत देऊन विचार करणारे असे असतात. जुन्या काळच्या विचाराच्या रीती अलीकडे अगदी काढून टाकल्या आहेत. व सुमार्गाने विचार करण्याच्या पद्धती व नेम लावून शास्त्रे केली आहेत. ती इंग्रजीत आहेत; पण ती संस्कृतापेक्षा हजारपट चांगली आहेत. हे मी निष्पक्षपाताने सांगतो.

आता आमचा स्वधर्म संस्कृतात आहे, याजकरिता त्याचे ज्ञान असणे जरूर आहे. परंतु तितक्यापुरतेच संस्कृत शिकावे. त्यातील शास्त्रे पाहणे किंवा त्याजवर फार विश्वास ठेवणे, उपयोगी नाही. बुद्धीस विपर्यास येतो. त्यापेक्षा एखादा इंग्रजी ग्रंथाचा तर्जुमा पाहून विचार केला, तर कार्य होईल व ते संस्कृतद्वारा पाचपट आयुष्य खर्च करून होणार नाही. शहाणपण ही फार दुर्लभ वस्तू आहे. बहुत वाचले पाहिजे, बहुत गोष्टींचा विचार केला पाहिजे, व बहुत ऐकले पाहिजे.

अलीकडेस माझ्या पाहण्यात काही पोरे आली आहेत. त्यातील कितीएकांस इंग्रजी जरा वाचता लिहिता येऊन पोट भरू लागले, म्हणजे त्यांस वाटते की, आम्ही परिपूर्ण झालो. तसेच संस्कृत पढलेले पुष्कळ आहेत. त्यांच्या तर विलक्षण समजुती असतात. मुख्य त्यांचे मनाची अशी स्थिती असते की, ज्या ज्या मूर्खपणाच्या समजुती म्हणजे प्रारब्धावर विश्वास व ज्योतिषावरून दैव पाहणे व मंत्रांचे सामर्थ्य वगैरे त्यांस खरे वाटते. हा सर्व मूर्खपणा संस्कृत विद्येत भरला आहे. जो पढतो त्यांस त्या पिशाच्चाप्रमाणे लागतात. याजकरिता ही मोठी सावधगिरी ठेवली पाहिजे.

आजचे काळी इंग्रजांसारखे शहाणे, पराक्रमी, ऐश्वर्यवान व विद्वान कोठे नाहीत. व त्यांच्या विद्या हिंदूंस अश्रुत आहेत. याजकरिता सर्वांनी त्यातील ज्ञान घ्यावे व त्याचा धिक्कार करू नये. आम्ही ब्राह्मण सर्वांहून श्रेष्ठ, आम्ही भूदेव, या म्लेंच्छांनी आम्हापुढे काय शेखी मिरवावयाची आहे? व यांचा पदार्थ काय? आमचे नशीब अनुकूल होईल, तेव्हा आम्हास विद्या लागणार

नाही. जे चिंतू ते मिळेल, ही समजूत विसरावी. असे मागे कधी झाले नाही व पुढेही होणार नाही. पुराणांतल्या गोष्टी पुराणांत ठेवाव्या. भलतेच अर्थ मूर्ख पुराणिक असतात ते करतात, व भलतीच समजूत पाडितात.

याजकरिता सांप्रत इंग्रजीत ज्या ज्या विद्या भूगोल, खगोल, राज्यनीती इत्यादीक आहेत, त्यांचा विचार करावा व त्यातील समजुती करून घ्याव्यात, म्हणजे तुम्हास फार संतोष होईल. असे केल्याशिवाय लोकांस कोणतेही कार्य नीट करता येणार नाही. सरकारने लोकांस मोठी कामे दिली, तर ते अनर्थ व जुलूम करतील, लाच खातील, डौल करतील व लोकांचे कल्याणार्थ झटावयाचे नाहीत. याचे प्रत्यंतर सांप्रत जे लोक रोजगारावर आहेत, त्यांजकडे पाहिले म्हणजे मिळेल.

तात्पर्य, ज्यांस ईश्वराचे भय नाही व विद्या काय हे ज्यांनी ऐकलेही नाही, त्यांस नीती येईल कोठून? व शहाणपणही कसे येईल? बहुत लोक संध्या झाल्यावर स्तोत्रपठण करतात, परंतु केवळ सडकेवर माती वाहण्याची मजुरी आणि स्तोत्रपाठ सारखाच आहे; कारण की त्यात अर्थ नाही. पाठ करण्याने पुण्य होते, असे समजून व्यर्थ आयुष्य कशास घालवितात?

## पाठ करण्याची चाल

■

**पत्र नंबर ७७ : ३० सप्टेंबर १८४९**

श्रीमंत आणि विद्वान या दोन लोकांच्या हातून लोकांचे व देशाचे सुधारणेकरिता प्रयत्न व्हावयाचे. या दोघांशिवाय कोणी करणार नाही. एक श्रीकडून बलवान आणि दुसरे ज्ञानेकरून बलवान.

परंतु आमचे देशांत या दोघांची अवस्था पाहून मला फार शोक होतो. पूर्वीचे श्रीमंत आणि विद्वान असे नव्हते, असे मागील पुस्तकी पाहता समजते. त्याकाळी त्यांनी चांगली व उत्तम प्रकारची पुस्तके लिहिली असे नाही; परंतु त्या लोकांचा जिकडे बुद्धिप्रवाह होता, तिकडे त्यांनी लिहिण्यास कमी केले नाही. पूर्वी ग्रंथ मोठाले झाले आहेत. याजवरून विद्येस उत्तेजन आणि बक्षिसी मोठी मिळत असेलसे ठरत आहे.

संस्कृतांत ग्रंथ बहुत आहेत. पहा की, एकट्या व्यास कवीने अठरा पुराणे व अठरा उपपुराणे, शिवाय सूत्रे लिहिली. तेव्हा हजारो व लक्षावधी श्लोकांचे एक पुराण अशी किती एक लिहिली. तेव्हा एवढे काव्य करण्यास त्याने केवढी मेहनत केली असेल ? आणि किती एक वर्षे घालविली असतील ? तसेच अलीकडे व्याकरणावर व धर्मशास्त्रावर निर्णयसिंधू, मनोरमा, कौमुदी इत्यादीक मोठाले ग्रंथ ज्या पंडितांनी लिहिले, ते पंडित आतांचासारखे असते, तर न लिहिते, हे उघड आहे व आता विद्येची माती होत आहे. हेच अनुमान खरे की प्राचीन राजे हे विद्वानांस मोठा आश्रय देत होते, म्हणजे ते आपला जन्म त्यात घालवून योग्यता मिळविण्याकरिता श्रम करीत होते. अस्तु.

तो काळ आज पाहिजे होता व इंग्रज लोकांची विद्या तशात यावयाची होती. म्हणजे फारच चमत्कार होऊन त्या विद्येची कदर सर्व लोकांनी केली असती; परंतु जे गेले ते येत नाही. यास्तव सांप्रत आहे त्याजविषयीच आपण नजर पुरवावी हे बरे. हल्ली श्रीमंत लोक व विद्वान लोक विद्येचे शत्रू झालेले आहेत व विद्येशी अपरिचित होऊन भलत्याच कामास विद्या म्हणून आणि वेद पाठ करणारे मूर्ख भट यांस विद्वान असे समजतात. इतका अंधार या देशांत झाला आहे. सांप्रत काळी फक्त वेद पाठ करतात आणि तो उलटासुलटा म्हणतात. क्रमपाठी तीन तीन वेळा तीच अक्षरे म्हणतात; परंतु या कार्यास विद्या कोण म्हणेल ? यापेक्षा रस्त्यावर मजुरी करतात ते लोक बरे.

पण भट फार अमंगळ व अनर्थास विद्या म्हणतात. अहो, विद्या या शब्दाचा अर्थ तरी काय होतो, तो पहा ! पाठ म्हणणे ही विद्या केली कोणी ? यात फळ काय ? हा मूर्खपणा उत्पन्न कसा झाला असेल तो असो ! परंतु एवढा मूर्खपणा कधी कोणत्याही देशांत झाला नसेल. लोक असे समजतात की, श्राद्ध, पक्ष, हव्य, कव्य, श्रावणी, लग्न, मुंज, संस्कार इत्यादी कर्मांत भट पाहिजेत; परंतु भट जर विद्वान होतील व हे पाठ म्हणणे सोडून देतील, तर त्यांच्याने श्राद्धे होणार नाहीत काय ? पाठ म्हणणारे मूर्ख, यांस धर्मादाय करावा. ते वेद म्हणतात आणि जाग्रणे करतात परंतु जसे गुजराथी लोकांत मजूरदारांकरवी शोक करवितात, तद्वत हे भट मजूरदार अक्षरे मात्र म्हणतात. यांचे अंतःकरणास काही भेद होत नाही. परकी ढोंग करून रडतात, ते रडणे कोणी मायेचे म्हणेल काय ? तद्वत् पाठ म्हणतात, यास कोणी देवांची स्तुती करतात, असे म्हणावे की काय ?

परंतु किती एक लोक मूर्ख असे आहेत की, वेदपाठास पैसा देतात व म्हणणारास आणि ऐकणारास काही समजले नाही तरी धन्य मानून धर्म

झाला असे समजतात. असो. याप्रमाणे भट आहेत. आणि शास्त्री, पंडित पाहिले, तर हे भटांपेक्षा मूर्ख व गर्विष्ठ असतात; परंतु यांस काही समजते खरे; समजत नाही असे नाही. तथापि त्यांच्या वाकड्या समजुती व अज्ञान जे प्राचीन काळचे संस्कृत ग्रंथांत भरले आहे. ते त्यांचे मनात येऊन दृढ निश्चय असा झाला असतो की, यापलीकडे विद्या नाही. सर्व जातीचे लोक ब्राह्मणांहून कमी व त्यांच्या भूगोलाविषयी अनर्थकारक समजुती असतात व त्यांचा इतका दृढ निश्चय असतो की, ते बरी गोष्ट ऐकत देखील नाहीत. व त्यांस आणखी विद्या पुष्कळ आहे म्हटले, तर खोटे वाटते. मागील सर्व ग्रंथकर्ते देव होते; म्हणून आता ग्रंथ करणे प्रशस्त नाही, असे त्यांस वाटते.

नवीन रीती व नवीन विद्या पढणे याचे ते शत्रू असतात. पहा की, पाच हजार वर्षांमागे जी रीती, आणि जे ग्रंथ संस्कृत पढावयाचे असतील, तेच आता आहेत. त्यांची सुधारणा त्याजला नको व अक्कल तर्क आणि शहाणपण ही त्यांस कमी असतात व प्राकृत भाषा त्यांस तुच्छ वाटून प्राकृतात हे काही कधी लेखणी उचलीत नाहीत. पोथ्याची वेष्टणे प्राचीन काळाप्रमाणेच आहेत, ती आवडतात. प्राकृत भाषा सर्व लोकांची आहे. याजकरिता प्राकृत ग्रंथ असल्याखेरीज उपयोग नाही, हे मनांत आणीत नाहीत व शूद्र व इंग्रज वाचतील, हे त्यांस भय असते. व्याकरण हे कोणी वाचू नये, वेद कोणी नीच जातीने वाचू नयेत, असे वचन आहे, त्याजवर सर्व आणतात. भारतही वाचू नये म्हणतात; कारण की, "भारतः पंचमो वेदः" अशी नाना प्रकारची कुत्सित वाक्ये बोलून विद्येची दुर्दशा करतात.

आणखी एक शास्त्री लोकांस सांगा की, कैकाडी वगैरे नीच जातीचे लोक आहेत, त्यांस चांगले लोक करण्याकरिता अमुक एक तजवीज चालवावी, म्हणजे त्यांचा प्राण जाईल, आणि ते म्हणतील की, जे तुम्हांस द्यावयाचे असेल, ते ब्राह्मणांस द्या. यात मोक्ष आहे. नीचास धर्म करणे अशास्त्र आहे. त्यांस ईश्वराने नीच जातीत जन्म दिला. त्यांनी त्यातच रहावे असे सांगून कधी चांगले कामास मदत करावयाचे नाहीत व ब्राह्मणांचा मान वाढवतील. इंग्रजी राज्य झाले, हे एक ब्राह्मणांचे महत्त्व नाहीसे होण्यास मूळ झाले आहे, यात संशय नाही. ब्राह्मणांनी बहुत वर्षेपर्यंत थोरपणा व अधिकार भोगिला. ब्राह्मणांचा मंत्राने मुक्ती व वचनाने शुद्धी होत होती. तेच लोक खरे मानीत होते; परंतु तो काळ गेला. बरे झाले की, लोक आता पाहू लागले.

ब्राह्मण व आपण कोण, यात अंतर काय ? ब्राह्मणास वीस हात आहेत की काय ? किंवा आपल्यास काही कमी आहेत काय ? अशा समयी ब्राह्मणांनी

आपल्या मूर्ख समजुती सोडून द्याव्या आणि सर्व लोकांस सारखे मानून विद्या शिकण्याचा सर्वांचा हक्क आहे, हे कबूल करावे. उगेच भांडू नये. अस्तु. 'याप्रमाणे विद्वानांची अवस्था झाली. दुसरे श्रीमंत जर पाहिले तर, शुद्ध पशूप्रमाणे आहेत. पहा मोठमोठाले लोक किती मूर्ख आहेत, व त्यांस द्रव्य मिळाले म्हणजे असा अभिमान होतो की, मी आपले बापाचे श्राद्ध मोठे करीन, हजारो रुपये उडवीन व मुलाचे लग्न मोठे करीन, याप्रमाणे पैसा श्रीमंत लोक उधळतात. मग त्यांचे पाऊल कसे पुढे पडेल ?

वर्षश्राद्धास लाखो रुपये खर्च केलेले लोक आहेत. तशीच कार्येही करतात व अहिल्याबाईने सोळा कोट रुपये धर्मादाय केला, तो कोठे आहे ? तो जर इतका पैसा शहाणपणाने सार्थकी लावला असता, तर लोक किती शहाणे झाले असते ? व किती आबादानी झाली असती ? या धर्मकृत्याने मूर्खपणा वृद्धिंगत आला, आळस वाढला. मृत्यू चार दिवसांनी यावयाचा असतो. परंतु कुपथ्य केले तर दुसरेच दिवशी येतो. तस्मात् या धर्मकृत्याने सर्वांस वेड लावून मूर्ख केले व श्रीमंत दीनवाणे होऊन रोगी व अविद्वान झाले आणि उद्या बुडाले असते, ते आजच बुडून गेले. अद्यापि लोकांस काय तजवीज करावी, ते समजत नाही. पहिल्याच मार्गाने ते चालत आहेत. ईश्वर जरी प्रतिकूल झाला, तरी अजून हट्ट करतात; परंतु ईश्वरेच्छा प्रमाण.

✦ ✦

## कमती कशाची ?

■

**पत्र नंबर ८० : ४ नोवेंबर १८४९**

आमचे लोकांची अद्याप अशी खात्री झाली नाही की, आम्ही मूर्ख आहो, आम्हास विद्या नाही, आम्हास काही कळत नाही, आम्ही गुणाने रिकामे झालो, आपल्या समजुती फार वाकड्या आहेत.

आम्हास स्वदेशाची, पृथ्वीची, व्यापाराची व कलाकौशल्याची माहितगारी नाही, आम्हास सावधपणा नाही; आमच्या समजुती प्राचीन काळचे ग्रंथाचे आधाराने ज्या पडल्या आहेत, त्या उपयोगी नाहीत; पुराणे वगैरे पोथ्यांत वेड लागावयाच्या गोष्टी पुष्कळ आहेत, त्यापासून भलतीच मते उत्पन्न झाली.

आमच्या रीती व चाली वाईट आहेत, आमच्या स्त्रिया अज्ञान आहेत. जोपर्यंत आम्ही आपल्या देशात बायकांस शहाण्या करणार नाही, तोपर्यंत आम्ही मूर्ख राहू. कारण की, बायकांचे हाती प्रथम मुलास रीतभात लावणे आहे. तेथेच जर बिबा पडला, तर पुढे सुधारत नाही, लहानपणी जी बुद्धी ती शेवटपर्यंत राहते. याजकरिता बायका शहाण्या पाहिजेत. म्हणजे मुलेही नीट होतात. आणि नवऱ्यास वगैरे स्वकीयांस सुख होते. आणि आळशी खोड्या सोडल्या पाहिजेत.

भट वगैरे मूर्ख लोकांस फारसा आधार देऊ नये. भट हे जरी अज्ञान आणि मूर्ख आहेत, तरी त्यांस एकदम अन्न घालू नये; असे मी इच्छीत नाही. परंतु त्यांस त्याचे अज्ञान माहीत करावे. भटाची उत्पत्ती मोडावी, वाचण्याकडे लक्ष द्यावे, विद्येचे मूळ वाचणे आहे, याचा विचार करावा. गर्विष्ठपणाने ब्राह्मण लोक बहुधा फुगलेले असतात, तसे असू नयेत. या सर्व गोष्टी जरी खऱ्या आहेत, तरी अद्याप हिंदू लोकांत या गोष्टी खऱ्या म्हणणारे व मानणारे मूर्ख व त्यांस सुधारणे हे अगदीच उपयोगी नाही. ते मेल्याशिवाय त्यांची हरकत दूर व्हावयाची नाही.

परंतु जे पुढे होतकरू लोक आहेत याणी मनात आणावे की, वृद्ध व म्हातारे यांच्या समजुती आपण घेऊ नयेत. आपण विद्येचे शोधास लागून खरे कोणते व खोटे कोणते ते काढावे; पृथ्वीचा शोध करावा; राज्याचा शोध करावा. ते सोडून ब्राह्मण लोक वगैरे असे आळशी आहेत की, ते विपरीत व विलक्षण गोष्टी सांगत बसतात. कोणी रूमच्या, कोणी स्त्रीराज्याच्या, कोणी रावणाचे तपश्चर्येच्या, कोणी कृष्णाच्या, कोणी शुंभनिशुंभ दैत्यांच्या सांगतात. पण अशा गोष्टींपासून काय फायदा होणार आहे?

ज्या कल्याणाच्या गोष्टी आहेत, त्या पाहून नंतर ही पुराणे वाचून टाकीली तर चिंता नाही. परंतु सर्व काळ त्यात काय आहे? खोट्या गोष्टी म्हणजे चवदा रत्ने व सात समुद्र असे मानणे, केवळ मूर्खपणा आहे. मूर्खपणात दिवस घालवून परिणाम काय? या गोष्टी इसापनीतीतील गोष्टीप्रमाणे समजून, वाचल्या तर वाचल्या, नाही तर नाही. मुख्य व वास्तविक जे ज्ञान त्याचा शोध करून ते शिकले पाहिजे. पंचम स्कंदांतील भूगोल काढून काय उपयोग? पुराणिकास तांदूळ मिळतात, म्हणून तो काढतो. परंतु आता या चुका पुरे झाल्या. या चुकांनी लोकांस भ्रांती पडून लोक पृथ्वीचे खरे वर्णन ऐकत नाहीत इतकी दृढ भ्रांती पडली आहे.

याजकरिता या भ्रांतीतून काढण्यास प्रयत्न करावा व खरी पृथ्वी कशी आहे हे पहावे, व देशांतर करावे, बखरी लिहून आणून त्या छापून लोकांत

प्रसिद्ध कराव्या. म्हणजे पाहून आलेल्यांचे वर्तमान लोक खरे मानून पुराणांत खोटे लिहिले आहे, असे समजतील. या प्रकारचा यत्न श्रीमंत लोकांनी करून या लोकांस अज्ञानांधकारातून काढले पाहिजे. आपले लोक केवळ मूर्ख झाले आहेत. राज्यरीती, धर्मनीती व कर्मनीती ही काहीच समजत नाहीत. भट, पंडित व ब्राह्मण हे त्यांचे पदरी मूर्खशिरोमणि असतात; ते नाना प्रकारचे वेडेचार समजावितात. फक्त पुराणांवर भरवसा ठेवून खरे मानतात, याजकरिता प्रत्यक्ष शोध पहावा.

या लोकांनी असे केल्याशिवाय व ब्राह्मणांचा नाद सोडल्याशिवाय यास धडगती लागणार नाही. श्राद्ध केले म्हणजे बाप तृप्त होतो म्हणून मनापासून खपतात व बायकांस तर असे वाटते की, ब्राह्मण जेवतात हे प्रत्यक्ष पितरच आहेत. वृषोत्सर्ग केला म्हणजे मोक्ष होतो. उसाची नाव केली म्हणजे जो मरतो त्याचे ती उपयोगी पडते. या प्रकारची ब्राह्मणांची फायद्याची कर्मे आहेत. ब्राह्मणांनी जे लिहून ठेविले आहे त्यांत एकही खरे नाही. हा सर्व लबाड नाद आहे. यज्ञयागदेखील ब्राह्मणांनीच निर्माण केले आहेत. अडाणी मनुष्य असला आणि त्याचे पिंडास कावळा शिवला नाही तर त्याचे मनास केवढी खवखव वाटते, आणि किती दुःख होते? याप्रमाणे मूर्खपण भरले आहे.

पहा, जर ब्राह्मणांनी असा नियम केला की, जितके पोथीत लिहिले आहे तितके तसेच आचरण करावयाचे, तर त्या ब्राह्मणांची वर्तणूक कशी होईल की, सर्व दिवस त्यांस उद्योग व खटपट पुरवेल. दर्भ व समिधा तोडून आणाव्या आणि होम करावे. तर्पण, दगड,. धोंडे नाना प्रकारच्या खटपटी संध्याकाळपर्यंत करता करता त्यांचा जीव थकून तो शेवटी निजतो. याप्रमाणे जन्म घालविणारे ब्राह्मणात अद्यापि आहेत. ते ओवळे होत नाहीत आणि असले ब्राह्मण चांगले म्हणून त्यांस लोक समजतात.

परंतु मी तर त्यांस मूर्ख समजतो. त्याचे जन्माचा उपयोग काय झाला? आणि त्याणी सार्थक काय केले? या खटपटीपासून फायदा ईश्वरही देईल, असे वाटत नाही. दया, धर्म, लोकहित व क्षमा केली, तर मात्र सार्थक होईल. नाही तर तांदूळ शिजविले आणि भात करून तो जाळला व दोन घटका मेहनत करून दर्भाची दोरी केली व ती जाळून होम केला आणि समिधा जाळून यज्ञ केला, तर फायदा कोणत्याही लौकी होणार नाही. मला वाटते की, ही खटपट सर्व ब्राह्मणांनी आपले महत्त्वाकरिता व लोकांस सोंगढोंग दिसण्याकरता लिहिली आहे, किंवा मूर्खपणाने एकाने केली त्याजवर आणखी दोन गोष्टी चढवून दुसऱ्याने लिहिल्या. असे वाढत वाढत आजपर्यंत आले

व त्यांस मोडणारा कोणी मिळाला नाही.

क्षत्रिय वगैरे राजे होते, ते ब्राह्मणास थोर मानीत, म्हणून ब्राह्मण पाहिजे तसे लिहीत गेले. परंतु त्याजमुळे त्यांचा व लोकांचाही नाश झाला; आणि मूर्खपणा वाढला व विद्या वाढवावयाची राहिली. या लोकांनी जास्ती वाद करू नये, म्हणून प्रयत्न करून ग्रंथ लिहिले. खोटे असले तरी विचार केल्याशिवाय भाव ठेवावा म्हणजे धर्म, असा मूर्खपणा सांगतात. परंतु यातून लवकर सुटतील, तर बरे होईल.

❖ ❖

## प्राचीन ग्रंथांचे अर्थ

■

**पत्र नंबर ८१ : ११ नवंबर १८४९**

पुण्यातील तारीख २२ आक्टोबरचे 'ज्ञानप्रकाश' पत्रांत 'यथार्थवादी' याणीं एक पत्र प्रसिद्ध केले आहे. त्यात त्याणी इकडील पत्रांचे उत्तर देण्याचा अनुक्रम चालविला आहे. त्यात ज्या ज्या गोष्टी उत्तर लिहिण्यासारख्या आहेत, त्या खाली कलमवार लिहितो.

(१) प्रथम 'यथार्थवादी' आपले पत्राचे प्रस्तावनेत लिहितात की, ब्राह्मण जातीचे सर्व लोक मूर्ख नाहीत, किती एक सूज्ञ आहेत. या मतास आम्ही कबूल आहो. व आम्ही कधी असे लिहिले नाही की, सर्व मूर्ख आहेत; परंतु कोठे सर्व असा शब्द योजला असेल, तरी त्याचा अर्थ हाच की, बहुतकरून शंभरांत किंवा हजारांत एकदोन क्वचित शहाणे असले, तत्रापि इतरांस बोध करू नये, असे होत नाही. ज्यास बोध करावयाचा असतो, त्याने बहुत जण मूर्ख पाहिले, म्हणजे त्यांस सर्व असे म्हणावे लागते. हा एक भाषणाचा अलंकार आहे. तत्रापि एक सूज्ञ असला, म्हणजे बहुत लोकांचे दुर्गुण असतील. ते एक सूज्ञ त्यामध्ये आहे, म्हणून झाकावे असा अर्थ यथार्थवादीचा नसेल, असे वाटते.

(२) 'यथार्थवादी' एक वाक्याचा आम्ही संग्रह केला, म्हणून त्याविषयी तक्रार करतात; परंतु आम्ही पंडितांसारखे चुकवाचुकव करणारे नव्हे, हे त्याणी समजावे. एक वाक्याचे दोन अर्थ तर काय, परंतु जितके पंडित असतील

तितके विलक्षणपणे अर्थाचे अनर्थ करून दाखवतील व त्यात सद्विचार लक्षात न ठेवता मनास येईल तशी पदे पाडून सरासरी मिळवून देतील; परंतु ही रीती योग्य नाही, कारण जो वाक्य लिहितो त्याचा हेतू असा नसतो. एकाच अर्थाविषयी तो बोध करितो. पंडितांचे विलक्षण अर्थ उपयोगी नाहीत, आणि ते आम्ही मानीत नाही; कारण की, आम्ही लोकांशी बोलतो, तेव्हा सरळ अर्थ असेल तोच दाखवावा. जेव्हा आम्हास पंडितांशी व्याकरण, काव्य, अलंकार यासंबंधी बोलावयाचे असेल, तेव्हा त्याचे अर्थ अमुक होतात, याविषयी वाद करू.

तूर्त आमचा हा प्रसंग नाही. जसे एकाने एकास मूर्ख असे दुरुत्तर केले आणि तो पुरुष फौजदाराकडे फिर्याद घेऊन गेला, तर फौजदाराने मूर्ख या शब्दाचा कपटी अर्थ किंवा पदे फिरवून किती अर्थ निघतात, ते पहाणे योग्य नाही. ज्या अर्थाने तो शब्द लोकांत प्रसिद्ध आहे, आणि ज्या अर्थाने तो शब्द उच्चारला, तोच अर्थ मनांत आणून शिक्षा करावी. यास्तव ' लोकहितवादी ' याने संस्कृत वाक्याचा सरळ व प्रसिद्ध आहे, तोच अर्थ केला. ब्राह्मण लोकांमध्ये क्वचित सूज्ञ आहेत, असे आम्ही समजतो व ' यथार्थवादीत ' त्यातीलच एक सूज्ञ आहेत असे आम्ही समजतो, परंतु रीतीचा वाद सोडून त्यांनी पंडिताच्या कोट्या घेऊन वाकडे रस्त्यात शिरू नये.

(३) रे कलमांत ते लिहितात की, ब्राह्मण जन्मात मात्र मोक्ष आहे व ब्राह्मण या शब्दाचा अर्थ फिरवून लिहितात, त्यासही सदर्हू कलम लागू आहे. ' यथार्थवादी 'ने हे पहावे की, सांप्रत गुण, कर्म, स्वभाव येणेकरून युक्त असे ब्राह्मण किती आहेत ? आणि जर बहुतांमध्ये हे नाही, तर त्यांस पूर्वापार जे महत्त्व दिले आहे, ते भोगण्यास ते योग्य आहेत की काय ?

(४) ' यथार्थवादी ' यांचे म्हणणे की, पुराणांतील बाष्कळ कथा कल्पभेदाने समजाव्या व विषयपर वचने ज्ञानपर आहेत, परंतु हे ओढूनताणून जबरदस्तीने, सरळ अर्थ सोडून उलटा अर्थ करणे प्रशस्त नाही. एखादी असंभाव्य कथा कल्पांतरीची म्हणून मानिली, तर त्याच अध्यायांत विधिनिषेध येतात, तेही कल्पांतरीचे असे मानले पाहिजे. आणि या प्रमाणे सर्व उडविले म्हणजे या कल्पांतील कोणते विधी याचा मुळीच ठिकाण नाहीसा होईल. त्याप्रमाणे भागवतातील विषयपर कथा असता ज्ञानपर लाविल्या. तर कथेचा ओघ फिरेल आणि संजोग बिघडेल. यास्तव या कोट्या व्यर्थ आहेत, जे उघड अर्थ दिसतात, ते खरे, असे सर्व प्रामाणिक व सूज्ञ कबूल करतील.

(५) पुराणांत पुष्कळ म्हणी चांगल्या आहेत, हे आम्ही जाणतो; परंतु सर्व निर्बाध आहेत, असे प्रतिपादन करणे ' यथार्थवादी 'स योग्य नाही, असे

वाटते. यास्तव त्याणीं विचार करून याविषयीचा जबाब वास्तविकपणाने द्यावा.

## प्राचीन ग्रंथांचे महत्त्व

**पत्र नंबर ८२ : १८ नवंबर १८४९**

सांप्रत हिंदुस्थानातील लोकांचे जे नियम, शास्त्र व समजुती आहेत, त्यांचा गुण असा आहे की, या लोकांचे पाऊल पुढे पडू नये, विद्या होऊ नये व कलाकसबे वाढू नयेत. या प्रकारचे सर्वांचे तात्पर्य आहे. आणि यामुळे आजपर्यंत तीन हजार वर्षांत तसेच झाले आहे. जे सुज्ञ असतील त्याणी विचार करून पहावा की, प्राचीन काळी म्हणजे तीन हजार वर्षांचे पूर्वी मोठे मोठे ऋषिवर्य विचारशील होते. त्यांनी रानात बसून ग्रंथ लिहिले. आकाशात नक्षत्रे पाहून त्यांचे नियम लक्षात आणिले; रानातील औषधी शोधून त्यांचे गुण लक्षात आणले; आणि त्याविषयी शेकडे ग्रंथ लिहिले. तसेच त्याणी भाषेसंबंधी विचार करून व्याकरण लिहिले. स्वयंपाक कसा करतात ते देखील लक्षांत आणून नळपाक व भीमपाक लिहिला. या प्रकारे नाना प्रकारचे ग्रंथ पूर्वी नवीन बुद्धिबळाने उत्पन्न झाले. तत्रापि भूगोलविद्या वगैरे यात त्यांनी बहुत चुका केल्या. अस्तु.

शोध जे करतात ते चुकले म्हणून त्यात त्यांचा अपराध नाही. त्याप्रमाणे शास्त्र लिहिणारे यांनी पाहिजे तशी न्यायमीमांसा इत्यादी मते वेगळाली लिहिली. त्यानंतर या लोकांस पुढे अवदशेचा पाया येणार म्हणून अशी समजूत पडली की, पहिले ऋषि जाणी हे ग्रंथ लिहिले, ते सर्व देवअवतारच होते व त्याणीं केले तसे मनुष्यजातीच्याने होणार नाही. व आपला धर्म इतकाच की, पूर्वीच्यांनी जे करून ठेवले, तितके मात्र शिकावे; त्याजवर काही नवीन कल्पना काढू नये. काढली तर देवांचा अपमान होतो. व जे काय पाहिजे, ते त्यात सर्व आहे. अशी समजूत पडून लोक अगदी मूर्ख झाले.

अशी समजूत का पडावी, याची कारणे शोधिली असता अशी सांपडतात की, पहिले पांडवांचे अखेरीपर्यंत ब्राह्मण आपले धर्माचे ठायी रत होते, विद्येविषयी मेहनत करीत होते व उद्योगी होते. आणि दुसरे जातीचे लोक जो विद्वान असेल त्यांस मात्र द्रव्य देत होते. पुढे ब्राह्मणांची विद्या वाढली. ते ग्रहणे

सांगू लागले, हिशेब करू लागले, ज्योतिषभविष्ये सांगू लागले, यामुळे लोक त्यांस देवासारखे मानू लागले आणि त्या वेळेस राज्य चांगले होते व खावयास पुष्कळ होते, यामुळे ब्राह्मण लोकांस पुष्कळ मिळत होते. पुढे काही राजे बाजीरावासारखे मनास येईल तसे ब्राह्मणांस द्रव्य देऊ लागले, योग्यता पहावयाची सोडली व ब्राह्मणांचे पायाचे तीर्थ घेऊन त्यांस अगदी ईश्वर मानू लागले.

तेव्हा ब्राह्मणांनी अशी तजवीज केली हीच समजूत लोकांची रहावी व ब्राह्मणांचा अधिकार कधीही मोडू नये, अशी पुराणे व महात्म्ये लिहिली. त्यात येऊन जाऊन गोष्टी, अमुक राजाने अमुक क्षेत्री ब्राह्मणांस अशी तशी दाने केली आणि तो स्वर्गास गेला; म्हणून ब्राह्मणांस अमुक द्यावे, सहस्रभोजन घालावे, त्याच्या मुखांत पडले म्हणजे देवास पोचते. ब्राह्मण काय ते मुख्य; सर्वांनी त्यांस मानावे; हीच मते पुढे प्रबळ झाली; आणि ब्राह्मण वंशपरंपरेचे झाले. लोक म्हणू लागले की, मूर्ख जरी असला, तरी ब्राह्मण जातीचा व ब्राह्मणाचे पोटचा तस्मात त्यांस धर्म करावा. परंतु पहिले असे होते की, मूर्ख ब्राह्मणांची गणना शूद्रांत होती; व उत्तम शूद्र ब्राह्मणांत येत होता. ते जाऊन सर्व ब्राह्मण वंशाचा मान वाढला. तेव्हा अर्थातच ब्राह्मणांनी पाहिले की, आम्हांस मृत्युलोकांचे देवत्व आले, आता विद्या कशास करावी ? नवीन कल्पना कशास काढाव्या ? प्राचीन काळचे देव होते, त्यांचे वंशिक आम्ही, इतकेच म्हणावे म्हणजे पुरे. याप्रमाणे ते बेत करून गावात येऊन राहू लागले, सुख भोगू लागले व फक्त ग्रंथ पाठ करू लागले.

तत्रापि लोक ही गोष्ट मनात न आणता त्यांस विद्वान मानू लागले; शास्त्री, पंडित व भट हे याप्रमाणे विद्या पाठ करण्यात वेळ घालवू लागले; कोणी व्याकरणी जो होता, तो इतकेच करू लागला की, अष्टाध्यायी सूत्र पाठ म्हणावे व त्यांची टीकाही पाठ करावी. हीच रीती चांगली असे वाटू लागले. जे नवीन ग्रंथ क्वचित काही करणारे झाले, त्यांस तरी असे वाटते की, प्राचीन काळच्या ग्रंथांच्या आधाराने ग्रंथ केले तर चांगले. प्राचीन काळच्या ग्रंथांतीलच गोष्टी कायम ठेवाव्या. नवीन सर्व गोष्टी अपवित्र व पहिल्या सर्व गोष्टी पवित्र व ग्रंथही पवित्र; याप्रमाणे समजूत पडून कोणी विचार करीतनासे झाले.

यामुळे लोक होते तसे राहिले व नुसते पंडितच राहिले, असे नाही. सर्व कसबी लोक, लोहार, सुतार, तांबट, वगैरेसुद्धा आपले बापाचे कसबात मात्र हात घालतात आणि त्यांचे इतकीच विद्या शिकतात. यामुळे नवीन कल्पना वगैरे काही होत नाहीत. जी रीती पूर्वी तीन हजार वर्षांमागे होती, तीच आहे.

जसा तांब्या पूर्वी करीत होते, तसाच आता करतात. पोथी जशी पूर्वी लिहीत होते, तशीच आता लिहितात. नवीन युक्ती वगैरे काही नाही. यामुळे छापणे, यंत्रे करणे, तारवे बांधणे वगैरे अनेक विद्या आहेत. त्याचे ज्ञान या लोकांस नाही. त्याणीं काही अधिक कल्पना चालविली नाही. जी पूर्वी बुद्धी चालली, तितकीच चालून स्थिर झाली. पूर्वीच्या इतकेच वैद्यशास्त्र, तितकेच गणित, तितकाच भूगोल, तितकाच खगोल याप्रमाणे सर्व तितकेच राहिले, पुढे चालले नाही. मला वाटते फार तर काय, ज्या वस्तऱ्याने हल्ली हजामत करतात, तोच वस्तरा पूर्वी चारपाच हजार वर्षांमागे होता. जसे आज धोतर नेसतो, तेच धोतर पाच हजार वर्षांपूर्वी नेसत होते. नवीन कायदा किंवा राज्यरीती व बंदोबस्त काही एक नाही. सांप्रत फार तर काय परंतु प्राचीन काळाविरुद्ध काही गोष्ट बोलले तर त्यांस अधर्म म्हणतात. ज्या रस्त्याने मागे लोक गेले, त्याच रस्त्याने पुढे जावे, अशी रीती पडून तीस धर्म असे म्हणतात. त्यात काही नवीन कल्पना नको.

यास्तव ही समजूत मोडून सर्व लोकांस अशी इच्छा उत्पन्न झाली पाहिजे की आम्ही आणखी शोध करू, पूर्वीचे लोकांनी शोध केला. तो पक्का नाही. त्यातील चुका सर्व काढून आपली शास्त्रे शुद्ध करावी हे चांगले. मूर्खपणाने त्यासच चांगले म्हणून त्याचेंच प्रतिपादन करावे हे नीट नाही; परंतु हे सांप्रतचे लोकांचे मनात येत नाही आणि प्राचीन कालचे लोकांचे शोधापेक्षा आणखी पुष्कळ शोध लागावयाचा आहे तो लावू, अशी इच्छा उत्पन्न झाली, म्हणजे शास्त्री, पंडित, भट जे आता निरुपयोगी आहेत, तेच पुढे उपयोगी होतील; परंतु ही मूर्खपणाची दृढ समजूत लोकांची सोडविण्याची युक्ती व प्रयत्न काय करावा याचा विचार मोठा अवघड आहे. तथापि तो सर्वांनी केला पाहिजे.

सांप्रत ब्राह्मण लोक भ्रमात आहेत. याजकरिता त्यांची समजूत पाडणे फार अवघड आहे; परंतु कालेकरून पुढची प्रजा जी आहे, तिजमध्ये ज्ञानवृद्धी अधिक होत आहे, त्या योगाने काही समजूत सुटून मोकळे मन करून विचार करतील आणि विचारास प्रतिबंध आहेत, ते मानणार नाहीत. याप्रमाणे हे लोक सुधारल्यावाचून सुखी होण्याचा रस्ता मला दिसत नाही, तेथपर्यंत हे अधिक अधिक भिकारी होतील आणि द्रव्यहीन होतील. हे पुष्कळ मूर्खपणाचे कामास द्रव्य लावतात.

आमचे श्रीमंत लोक वगैरे अद्याप पुष्कळ आहेत; परंतु त्यांचे या कामात चित्त नाही. ते येथून उठून काशीस जातात आणि शेकडो रुपये धर्मास बरोबर नेतात व देवळे बांधतात; परंतु त्या रुपयांनी जर एखादे कापड किंवा कापूस

किंवा काच करण्याची यंत्रे आणून कारखाना घातला, तर हजारो माणसांचा रोजगार उत्पन्न होऊन खावयास मिळेल आणि सुख होईल. नंतर काशीयात्रेपेक्षा ते रुपये सार्थकी गेले, असे म्हणावे की नाही? परंतु हे लोकांस कळत नाही. मनास येईल तसे खर्च करीतात. यात्रा वगैरे कराव्या; परंतु जिवंत लोकांस सुखी करण्याचे टाकून यात्रा कराव्या, हे उचित नाही व याने काही हित होत नाही. फक्त मूर्खपणा, आळस व अनुद्योगीपणा मात्र वाढतो. यास्तव ही गोष्ट सर्वांनी मनात आणून लोकांचे हिताचे धोरणास लागावे, हे चांगले. आजपर्यंत मागील वहिवाट होती, म्हणून जरी खचित आहे, तरी या काळास हे लागू नाही. आजपर्यंत जरी कसेही झाले, तरी त्याचा उपयोग नाही. काळ पाहून कालमानाने व्यवहार चालवावा, हे उत्तम आहे; परंतु या विचारावर लोक येतील तो किती एक काळ पाहिजे व भट भिक्षुक वगैरे यांस विचार व विद्या काय आहे, याचा अर्थ कळणे हे अवघड काम आहे व प्राकृत भाषा सुधारून त्या भाषेत ग्रंथ बहुत होऊन सर्व लोकांस कळले पाहिजेत.

यास्तव जे लोक या देशाचे कल्याण इच्छिणारे असतील, त्यांनी लोकांची सदरील समजूत दूर करण्याची मेहनत केली पाहिजे व स्त्रियांस शहाण्या केल्या पाहिजेत, म्हणजे लोक ज्ञानचक्षूने पाहू लागतील.

✦ ✦

## संस्कृत विद्या

■

**पत्र नंबर ८४ : १ डिसेंबर १८४९**

संस्कृत विद्या मोठी गहन आहे व तिचा उपयोग मोठा आहे, असे लोकांस वाटते. याजमुळे शास्त्री, पंडित वगैरे संस्कृतचे विद्वान यांस लोक मानतात. व वैदिक हे जरी ग्रंथ नुसते पाठ करीतात, तरी निदान पक्ष ते ग्रंथाचे रक्षण तरी करतात. म्हणून त्यांस लोक मानतात.

परंतु संस्कृत विद्येचे तात्पर्य पाहिले तर त्यात व्यावहारिक उपयोग काहीच नाही, संस्कृत भाषा फार प्राचीन आहे; आणि देव म्हणजे जुने हिंदू त्यांची ती भाषा आहे. व तिजला बहुतांनी शोधून संस्कार देऊन सुधारली आहे, म्हणून तीस संस्कृत म्हणतात, हे खरे; परंतु तिजमध्ये जे ज्ञान वाढले, ते

कोणाचेही उपयोगी नसोन तिचा विद्यार्थी केवळ भट होईल किंवा विलक्षण तऱ्हेचा मनुष्य होईल. याचे कारण त्यातील ग्रंथात फारसे ज्ञान मुळीच नाही. जे आहे ते केवळ जुन्या काळचे. त्याचा आता उपयोग काहीही नाही.

प्रथम या भाषेतील ग्रंथाचे अनुक्रमाने निवेदन करू. प्रथम वेदांतील मंत्रसंहिता आहेत. त्यात पाहिले तर अग्नी, मित्र, वरुण यांच्या प्रार्थनेची सूक्ते म्हणजे प्रबंध आहेत. ते नाना प्रकारचे छंदांनी रचले आहेत. पुढे ब्राह्मणे म्हणून बखरीसारखे ग्रंथ आहेत, त्यात या मंत्राचा उपयोग कसा करावा, या मंत्राने जनावरे मारून यज्ञ कसे करावे, कोणता मंत्र म्हटला तर काय फळ होते, हे सांगितले आहे. या ग्रंथाचे आधाराने ब्राह्मण हे मोठे योग्यतेस पावले. कित्येक काळपर्यंत त्यांचे आशीर्वाद, त्यांचे शाप, त्यांची अनुष्ठाने ही मोठी सामर्थ्यवान आहेत, असे लोकांत प्रसिद्ध झाले होते. याजमुळे ब्राह्मण हे हल्ली जसे पंचाक्षरी, औसर अंगास आणणारे, देवाचे साक्षात्कारी, मंत्री, जादूगार, करामती करणारे, अवलिया वगैरे ढोंगी यास लोक मानतात व भितात, त्याप्रमाणे सर्व लोक ब्राह्मणास भीत आहेत.

राजे राज्य घेण्याकरिता, निपुत्रिक पुत्र होण्याकरिता, गरीब धनप्राप्तीकरिता, रोगनाशनार्थ, शत्रुनाशनार्थ, ब्राह्मणास बोलावून त्यांस अनुष्ठाने, जप, तप, मंत्रसाधने करावयास सांगत. ' लोकांस असे वाटत होते की, ब्राह्मणाचे हाती सर्व आहे व वेदाचे मंत्रास सामर्थ्य आहे. देवांपेक्षा ब्राह्मणांचे मंत्र जबरदस्त. ब्राह्मण हाक मारतील, तेव्हा देव हात जोडून येतात; राक्षस मंत्रांनी पळतात. ही समजूत अद्यापि लोकांमध्ये आहे.

परंतु ब्राह्मणांनी पूर्वीचे तापसस्वरूप व जटा, व्याघ्रांबरे, दाढ्या, भस्म, दर्भ, वनवास इत्यादी भयंकर प्रकरणे सोडल्यामुळे त्यांचे तेज कमी झाले. लोकांस असे वाटू लागले की, हे आपल्यासारखेच आहेत; परंतु पहिले हे मोठे उग्र होते. आताही असे उग्र कोणी आहेत, त्यांस अडाणी लोक भितात याप्रमाणे हे जादू प्रकरण माजले. पुढे तो काळ जाऊन शास्त्रे उत्पन्न झाली. त्यात वेदान्त मत निघाले. त्याणे हे पूर्वीचे ढोंग सर्व खोटे असे ठरविले. अनेक देवांची अनुष्ठाने खोटी, असे प्रसिद्ध केले. एकच परमेश्वर व त्याचे मनन करणे हेच श्रेयस्कर, असे सांगितले.

त्याजवर बौद्ध मत झाले, त्याणे तर वेदाचा अगदीच उपहास केला व त्यातील उग्र म्हणजे हिंसा, वपा, याग इत्यादिक कर्मांची निर्भर्त्सना करून दयाधर्माची प्रसिद्धी केली. त्यानंतर ते मत रद्द होऊन पुनः ब्राह्मण-मत उभारले. ते पूर्वीप्रमाणे तर कोठून होईल ? त्यांस जखमा फार लागल्या म्हणून थोडेसे

उभे राहिले. त्याची भर जवानी गेली. पुराणे म्हणून ग्रंथ झाले. त्यात काही वेदान्त, काही भक्ती, काही वैदिक कर्मे, काही नवीन देवता, नवीन व्रते, दाने वगैरे लिहिली. या पुराणकर्त्यांचा हेतू असा होता की सर्व वाद तोडून कोणी कोणत्याही मताने वागला, तरी चिंता नाही. यास्तव सर्व मतांचा संग्रह त्याणीं केला.

त्यानंतर काही काळ गेल्यावर निबंधग्रंथ झाले. त्याने पूर्वीचे सर्वच ग्रंथ ईश्वरी असे मानून, सर्व ओझे डोकीवर घेतले. तेव्हा आता संस्कृत शिकणाऱ्याचे हाती कोणते ज्ञान येते, हे पाहिले पाहिजे. तर हा विचार या ज्ञानाने तीनचार हजार वर्षांचा जुना होता, त्याचा हल्लीचे काळात जन्मलेलेपणा जातो. कसा म्हणाल तर त्यांस म्हटले की, लंकेत कोलंबो शहर आहे, तर हा म्हणतो की, लंका कोणास सापडावयाची नाही. तिच्या सभोवते सुदर्शन फिरत आहे. त्यांस विचारले की, तापी नदीचा उगम कोठे आहे? तर तो म्हणतो की, ती यमाची बहीण असे पुराणांत लिहिलेच आहे. याप्रमाणे पुराणे वाचून त्याचे मनात अनेक कल्पित कादंबऱ्या भरून, त्यांस हल्ली सृष्टी आहे, त्याहून वेगळी दिसते. संक्रांत हे सूर्याचे राशिक्रमण हे तो जाणतच नाही. एक म्हणतो ती रेड्यावर बसून दक्षिणेस जाते आहे. आणि ती दीडशे कोस लांब आहे. आणि तिच्या पाठीमागे एक दुसरी बाई किंकरान्त आहे. तेव्हा या मनुष्यास असे वाटते की, अलौकिक ज्ञान जे कोणास ठाऊक नाही, ते मला या पुराणामुळे ठाऊक झाले आहे. या अभिमानात तो असतो. वास्तविक पाहिले, तर त्याचे ज्ञान एक कपर्दिकेच्या किंमतीचे नसोन त्याचे व इतर लोकांच्या नाशास कारण झाले.

त्यानंतर दुसरा भाग म्हणजे मंत्रशास्त्र. हे जर त्याणें पाहिले, तर नाना प्रकारची अनुष्ठाने, नरसिंह, शरभ, वेताळ, योगेश्वरी इत्यादी देवता व त्यांस बोलावण्याची रीत व त्यांस प्रसन्न करण्याचे जप, त्यांस माहीत होतात. आणि तो आपले अंगी असा ताठा आणितो की, मी काय तो मोठा, मजमध्ये मोठे सामर्थ्य आहे. मी पाहिजे त्यांस पुत्र देईन, दौलत देईन, शत्रू मारीन; पण त्याचे हाती काही नसते. हा स्वप्नासारखा भ्रमात असतो. ते ग्रंथ वाचून त्यांस भ्रम पडतो. करावयास जातो, तो त्यात काही नाही! बरे, आणखी संस्कृतविद्येच्या दुसऱ्या भागात जाऊ. जर तिचा अभ्यासी याज्ञिक झाला तर त्यांस असे वाटते की, मला अमुक शास्त्र म्हणता येते, तमुक शास्त्र म्हणता येते, पशू मारावे कसे, त्यांची अंगे कशी काढावी, हा खाटिकपणा येतो. यज्ञाचे मंडप कसे घालावे, त्याचे मागेपुढे मंत्र कसे ओरडून म्हणावे, हे ठाऊक आहे. त्याचे

प्रमाणास हा ग्रंथ, तो ग्रंथ, प्रत्यक्ष श्रुति, स्मृती अशा तो काढून दाखवितो व यज्ञ करणारास थेट स्वर्गात नेऊन पोचविणारा तो मीच असे मानतो.

बरे, आता संस्कृताचे चौथे भागात जाऊ. कोरी धर्मशास्त्र पढला. तर त्यात शंभर ग्रंथ श्राद्धाबद्दल, पन्नास ग्रंथ शौचनिर्णयाबद्दल, पंचवीस ग्रंथ संस्काराबद्दल, असे अनेक निरुपयोगी विषयांविषयी वादविवाद पाहून, त्यात तो आपणांस मोठा धन्य मानितो. श्राद्धास पदार्थ किती असावे नसावे, कोणते भट किती असावे, दक्षणा किती असावी, तीथ कोणती, काळ कोणता, तीळ किंवा तांदूळ असावे, दर्भ किंवा दुर्वा, द्रोण पालथा ठेवावा की उताणा, कोणत्या दिशेस बसावे, आधी देवास की आधी पितरांस गंध लावावे ही सर्व कवाईत त्यांस पाठ होते. आणि त्यातील वाद त्यांस ठाऊक होतात. त्याविषयी बोलण्यास तो मोठा उत्सुक होतो, त्याची त्यांस मोठी हौस येते. कोठे श्राद्ध असले तर तेथे आपली तो शेखी मिरवितो आणि दोनचार आणे मिळवून घरास आणितो.

बरे, संस्कृतविद्येच्या पाचवे भागात आपण शिरू, विद्यार्थी न्याय, व्याकरण, मीमांसा पढला तर मग हे जग दिसते हे खरे किंवा खोटे, याचीच भ्रांती त्यांस पडून त्याविषयी तो वाद घालीत बसतो. कोणी म्हणतो, दहा पदार्थांनी सृष्टी घडली तर कोणी म्हणतो चोवीस, कोणी म्हणतो सात; कोणी म्हणतो मी आणि ईश्वर एकच जातीचे, मध्ये भाषा मात्र आहे. कोणी म्हणतो सुखदुःख हे मनातही आणू नये, आळसात बसावे. प्रारब्धी आहे ते घडतच आहे. या मानसिक कल्पनेच्या जालात तो सापडून वेडा होतो.

बरे, सहावे भागात पाहू. जर तो ज्योतिष शिकला, तर म्हणू लागतो, अमुक ग्रह आला तो पीडा करील. मंगळास अमुक दान पाहिजे. शनी सूर्याचा मुलगा, परंतु मोठा द्वाड ग्रह, त्याचा जप केला असता शांती होते. त्याचे डोकीवर तेल ओतावे किंवा ब्राह्मणास लोखंड द्यावे; परंतु हे मोठे उग्र दान आहे. कोणी घेणार नाही. प्रश्न सांगतो, पुढले भविष्य, आयुष्य, रोग, शत्रुसंप्रदायाविषयी नाना प्रकारचे भ्रम लावितो.

याप्रमाणे कोणतेही भागात जरी पाहिले. तरी संस्कृतविद्या निरुपयोगी व नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न करणारी व संसारावरील चित्त उडवून आळशी करणारी, निरुपयोगी कर्मे करणारी आहे. सांप्रत काळी जे ज्ञान पाहिजे, ते त्यात मुळीच नाही. सांप्रत काळचे देश, तेथील राज्ये व फौजा व व्यापारी इत्यादिकांची माहिती, यंत्राची उत्पत्ती, कायदेकानू कसे असावे, गैरचाली कोणत्या आहेत, टाकाव्या कोणत्या, ठेवाव्या कोणत्या, हे त्यांस माहीत नसते. दोनचार हजार वर्षांपाठीमागे पिकलेले वेड वगैरे समजुती व वाकडे तर्क हेच आता

काढून त्यांची वाटाघाट करीत आयुष्य घालवितात. जोपर्यंत बाहेरचे देशांतील वर्तमान लोकांस ठाऊक नव्हते, तोपर्यंत याच ज्ञानाचा थोरपणा होता व हे ज्ञान ज्यापाशी होते, त्यांस थोर मानून त्याचे पायाचे तीर्थ घ्यावे, येथपर्यंत मजल आली.

परंतु आता बाहेरचे ज्ञान या देशात शिरले. त्याचे पुराने हे जुने ज्ञान वाहून गेले. त्याची तुच्छता अगदी स्पष्ट झाली. पाठीमागून हे पोकळ ढोंग चालत आले. त्याचा पोकळपणा उघडकीस येऊन त्या ढोंगावर पोट भरणारे त्यांचे महात्म्य कमी झाले. तर आता ज्यांस थोरपणा पाहिजे असेल, त्यांणीं सांप्रत काळचे ज्ञानाची संपदा मिळविण्याचा प्रयत्न करावा. ज्या ज्ञानाने आपल्यावर इतर लोकांनी सरशी केली, ते ज्ञान आपण धिक्कारू नये; कारण की, त्याचा आपणास अनुभवच आला आहे. याजकरिता सावधगिरीचे लक्षण हेच की, काळास ओळखून त्याप्रमाणे चालावे. असे न केले तर फार फजीत होऊन दुर्दशा झाली आहे, त्यापेक्षा अधिक होण्याचा संभव आहे. पूर्वी जुन्या काळचे ब्राह्मण म्हणजे ऋषी वगैरे यांनी अपुरती कामे ठेविली ती आपण पुरती करावी. त्यांनी वैद्यकत्व पूर्णत्वास आणले नाही. तर आता आपण अनेक देशच्या कल्पना एके ठाई करून ते सुधारावे म्हणजे खरा थोरपणा मिळेल. व लोकांचे हित होईल. असे न होईल तर लोक वैद्यास सोडून नवे डॉक्टर व नवीन इस्पितळे यांचा आश्रय करतील; आणि पुराणे वैद्य बिचारे उपाशी मरतील. याप्रमाणे सर्व विद्येचे आहे.

✦ ✦

## ज्ञान हाच पराक्रम

■

**पत्र नंबर ८५ : ९ डिसेंबर १८४९**

सांप्रत काळी हिंदू लोक गरीब आहेत व अज्ञानी आहेत, ,तद्विषयी मी सिद्धान्त लिहितो की, संपदा आणि ज्ञान ही दोन्ही, जोपर्यंत यास आपली स्थिती कळली नाही तोपर्यंत प्राप्त होणार नाहीत. जरी हा देश उत्तम प्रकारचे उत्पन्न करणारा व धनधान्यसमृद्धिकर्ता आहे, तरी या लोकांस त्याचे फळ नाही.

आता पृथ्वीवर दुसरे अनेक देश आहेत. त्याची अवस्थाही फार वाईट आहे. रयत लोक इकडल्यापेक्षा तेथे दरिद्री आहेत; परंतु हे उदाहरण या देशास उपयोगी नाही. कारण की, हा देश पूर्वी कसा होता व हल्ली कसा आहे, ते पाहून विचार केला पाहिजे. किती एक लोक असे आहेत की, मुसलमानांचे राज्यास नाव ठेवीत नाहीत; परंतु इंग्रजांचे राज्य विशेषेकरून दरिद्रास कारण समजातात व त्यांस काही नवीन शहाणपणाची युक्ती सांगितली, तर ऐकत नाहीत आणि म्हणतात की, आम्हास आजपर्यंत या युक्ती कोठे होत्या? आजपर्यंत आम्ही दुःखी नव्हतो; आता मात्र झालो, ते इंग्रजांमुळे झालो. यास्तव या युक्तीने आमचे दरिद्र जाणार नाही, इंग्रज जातील तर मात्र जाईल, असे समजून युक्तीस बहुत लोक अगदी मानीत नाहीत. फक्त हे राज्य वाईट, असे म्हणून संध्याकाळपासून उजाडेपर्यंत आणि उजाडल्यापासून सारा दिवसभर जप करतात.

या प्रकारचे लोक आम्ही नित्य पाहतो. तेव्हा अशा लोकांची समजूत पाडणे हे सर्वांहून अवघड आहे. परंतु पहा की, असा विचार करीत बसणे मूर्खपणाचे आहे. उद्योगास झटणे हा शहाणपणा आहे. दरिद्र आहे खरे व ते पदोपदी वृद्धिंगत होत चालले आहे. द्रव्याचे साधन कमी होत चालले आहे; परंतु अशा जपाने उपाय होणार नाही. जर विद्या व ज्ञान येणेकरून आपले दरिद्र कमी केले, तरच होईल. ज्ञान जेथे आहे, तेथे सर्व पराक्रम आहे. परंतु हिंदू लोकांमध्ये एकमत असेल तर या गोष्टी घडतील. आपलेपासून आपली कंठाळ एखादा घेऊन गेला, तर जाग्यावर बसून शिव्या दिल्या तर कंठाळ येईल की काय? यास्तव जे नेणारे आहेत, ते परत देण्यास अनुकूल करण्याचे जे प्रयत्न असतील, ते करावे. ते तरी शहाणपणाखेरीज कसे सापडतील, यास्तव शहाणपण मुख्य पाहिजे. त्याचे योगाने दरिद्र कमी होईल.

या देशातील लोकांनी विलायतेस जावे, तेथे वस्ती करावी. विद्या शिकावी. जे श्रीमान आहेत, त्याणीं या कामात द्रव्य खर्चावे, तिकडील ज्ञानाची वृद्धी करावी. तिकडील कलाकौशल्य इकडे आणावे; आपल्या दुष्ट चाली सोडाव्या, हेच शहाणपण आहे. या शहाणपणाने या लोकांस समर्थता येईल. आणि समर्थतेनंतर दरिद्र जाईल. मुख्य ज्ञानापासून सर्व पराक्रम आहेत. कधी कधी ज्ञानाबरोबर लागलेच पराक्रम दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. कारण की, किती एक मूर्ख असून, अधिकार पावतात, तेव्हा त्यास अधिकार कसा मिळाला? हा प्रश्न बहुतेक हिंदू लोक करतात; परंतु हा केवळ पोरकट प्रश्न आहे. पराक्रमाची रीती अशी आहे की, जो कोणी घरात प्रमुख शहाणा असतो, तो बहुत द्रव्य

संपादन करतो. नंतर त्याचे विभाग पश्चात किंवा केव्हा तरी होतात. तेव्हा त्यातील एक विभाग अयोग्य पुरुषाच्या हाती लागतो, म्हणून कोणी जर असे म्हटले की, हे सर्व मूर्खपणाने संपादन केले आहे, तर ही गोष्ट सत्य नाही.

कारण की वाटणीत ही चूक आहे; परंतु संपादनात मूर्खपणा नाही. मिळविणाराने शहाणपणानेच मिळविले आहे. तसे इंग्रज लोकांनी सर्वांनीच पराक्रम केला असे नाही किंवा सर्व शहाणे आहेत, असेही नाही; परंतु त्यांच्यातून जे शहाणे निघाले, त्याणीं पुढारी होऊन कवाईत व युद्धविद्या काढली आणि पुढे हिंदुस्थानात आले. त्यात जे शहाणे पुरुष एलफिस्तनसाहेबाप्रमाणे किंवा हेस्टिंगसाहेबाप्रमाणे झाले, त्याणीं पराक्रम केला. आणि जातेसमयी आपले लोकांचे हाती अधिकार दिला आणि सांगितले की, तुम्ही आता याची वहिवाट करा. त्या वहिवाटीवर कोर्ट डैरेक्टर व गवरनरादिक आहेत ते त्या पराक्रमाचे फलाचे लोकांस हिस्से देत आहेत. कोणास जड्ज, कोणास कलेक्टर नेमतात. त्यांनी एखादा हिस्सा भिडेने मूर्खास दिला. म्हणून मूर्खपणाने हा पराक्रम मिळविला, असे सिद्ध होत नाही. याजकरिता ही समजूत आमचे लोकांची मुख्य पडली पाहिजे. शहाणपणाशिवाय काही पराक्रम नाही.

यास्तव हिंदुस्थानात असे कोणी लोक प्रमुख होऊन त्याणीं सर्व आपले लोकांस बलवान व शहाणे करून ठेविले पाहिजेत. त्यांस नवीन द्रव्योत्पत्तीचे मार्ग दाखविले पाहिजेत. इंग्रजांनी राज्य बलात्काराने घेतले, असे असले तर असो; परंतु व्यापार तर बलात्काराने घेतला नाही? त्यातच हे लोक का शहाणे होत नाहीत? इकडे काच करता येईल व तारवे करता येतील. लोखंडाचा रस करता येइल. भूमीतला कोळसा सापडेल. कापड करिता येईल. इतक्या गोष्टी समजून आल्या म्हणजे किती कार्य झाले? व हे लोक किती बलवान होतील? याप्रमाणे प्रथम असेच होऊ द्या की, सर्व व्यापाराचा माल इकडेच व्हावा. विलायती नको. इंग्रजास इकडील कच्चा माल खरेदी केल्याशिवाय निर्वाह नाही. यास्तव अशी गोष्ट केल्यानंतर राज्य मात्र त्यांचे हाती राहील. राहिले तर काय चिंता आहे? जो पैसा तिकडे नेतील तो आपण जिन्नस देऊन खरेदी करून परत आणू; परंतु या गोष्टीस शहाणपण असून सर्व लोकांचे काम डोकीवर घेणारे पाहिजेत. असे लोकांचा फार तोटा आहे.

✦ ✦

# सांप्रतचे पंडितांचे ज्ञान

■

पत्र नंबर ८६

सांप्रत काळचे पंडितांचे ज्ञान असे असते की, त्याचा जिवास, शरीरास, प्रपंचास काहीच उपयोग पडत नाही, केवळ वादविवादच करण्यास व लोकांस तमाशा दाखविण्यास मात्र उपयोगी आहे.

यास्तव मला हे पंडित बहुरूपी, सोंगाडी व चित्रकथी याहून बरे दिसत नाहीत. बारा-पंधरा वर्षेपर्यंत व्याकरण किंवा न्याय यांचे अध्ययन करतात. म्हणजे त्यांस पंडितपणा प्राप्त होतो. परंतु त्यांची विद्या अशी असते की, एकाने म्हणावे या शब्दाचे अंती 'च' असावा; दुसऱ्याने म्हणावे 'चा' असावा. याजविषयींचा वाद शेकडो प्रमाणे दाखवून सर्व दिवसभर करतात. शेवटी निश्चय एकाचाही होत नाही. तसेच नैय्यायिक हेही भांडतात. एक म्हणतो ईश्वर आणि जीव एक आहे. दुसरा म्हणतो, दोन्ही विभक्त आहेत. तिसरा म्हणतो, ईश्वर गुणी आहे. चवथा म्हणतो निराकार आहे. याप्रमाणे रिकामा वाद चालविण्यात जन्म घालवितात आणि त्यांस वादातील सत्य काय आहे, हे समजण्याची इच्छा नसते. परंतु परस्परांपेक्षा श्रेष्ठ कोण होतो, हे पाहण्याकरिता भांडतात आणि मग त्या वादात सत्यानेच भाषण करतात, असे नाही. मनास येईल तशी कल्पना, कपट, युक्ती, मूर्खपणा इत्यादी योजून सरासरी फार बोललेसे करतात. त्यांस कोणी म्हणतात, असे निर्फळ वाद घालण्याच्या ज्या ज्या विद्या हे शास्त्री शिकतात, त्यापासून इहलोकी व परलोकी हित नाही. आपले जिवाचेही कल्याण नाही व दुसऱ्याचे जिवाचेही नाही.

एक व्याकरण म्हणावयास बारा-चवदा वर्षे लागतात. त्याचे कारण हेच आहे की, त्या प्रकरणी वाद करण्यास शिकतात; ग्रंथ पाठ करतात व प्रतिष्ठेकरिता वाद करतात. हे सर्व शास्त्री, पंडित या प्रकारचे आहेत. त्यांस व्यावहारिक ज्ञान नाही. त्यांस मोडीचे लिहितादेखील येत नाही व कोणतेही काम करावयाचे हे उपयोगी नाहीत. बरे, इतके असून यांची वर्तणूक पाहिली तर फारच वाईट. सामान्यतः हे गोंधळी, भट याप्रमाणेच व्याजस्तुती करून गृहस्थास भुलवून पैका काढणारे लोक आहेत. प्रातःकाळी उठले, म्हणजे यांचा प्रथम उद्योग हाच आहे की, गृहस्थाचे घरी जाऊन त्यांची स्तुती करावी. त्यामध्ये त्याचे जसे वर्णन पाहिजे तसे करून दोन पैसे निघाले, म्हणजे त्यांचे कार्य

झाले, पैशाकरिता महापातकी असला तरी त्यांस शुद्ध म्हणतील, महा नीच असला, तरी त्यांस सन्मान देतील. पापाने द्रव्य मिळविले तरी, त्यांस दिले म्हणजे तो सद्व्यय झाला अशी समजूत करून आणखी तसेच मिळीव, म्हणून सांगतील.

याचे उदाहरणास फार लांब जावयास नको. बाजीराव पेशव्याने पुण्यात ब्राह्मणांचे मनोरथाप्रमाणे दाने केली व बहुत शास्त्री, पंडित जवळ बाळगिले; परंतु त्याणीं त्यांस सत्कर्मास किंवा आपले राज्य रक्षिण्यास किंवा नीतीने चालविण्यास समजूत दिली नाही. ते त्याणें केले, त्याजविषयी त्याची स्तुतीच करीत गेले व महाराज सर्वत्र विजयी होतील, असे आशीर्वाद देत गेले. आपण ब्राह्मण परभू आपले तेज सर्वांहून अधिक; आपलेकडून एक शिपाई गेला तर सर्वांचा पराजय होईल, याप्रमाणे बोलून, त्याजकडून राज्यकारभार सोडून देववून त्यांस पंडितांचे आर्जव करणारा असा मूर्ख केला व शेवटी आपण आणि तो असे दोघेही भीक मागत गेले. यास्तव हे पंडित जरी पुष्कळ पढलेले असले तरी ते मूर्ख समजावे; कारण ही लोकहितकारक ज्ञान त्यांस नाही. त्यांचे ज्ञान भाटांचे व तमासगिरांचे बोलण्याप्रमाणे आहे. त्यापासून मोक्ष व्हावयाचा नाही व इहलोकी सुखोत्पत्तीही व्हावयाची नाही.

सारांश, हल्लीचे पंडित हे महामूर्ख असे मी म्हणतो. हे नाना प्रकारचे अर्थ फिरवितात. नानाप्रकारचे असत्य सिद्धान्त करतात आणि क्षणांत मुक्तीचा मार्ग, क्षणात नरकात जाण्याचा मार्ग दाखवितात. यांस मुख्य ज्या गोष्टी त्याचे ज्ञान नसते. मनुष्य जन्मला कशाकरिता? त्याचे सार्थक काय? व आपले कर्तव्य काय? याचा विचार त्याचे मनात क्षणभरही वसत नाही. द्रव्याचा व मानाचा लोभ धरून हे असतात. यांचा आश्रय जो कोणी करील, त्यांस वेड लागेल यात संशय नाही व त्यांची बुद्धी स्थिर नाही.

अमुक सत्य, अमुक असत्य, हेही त्यांस भासत नाही. सत्याचा व असत्याचा भाव यांस समजत नाही. धर्माचा, अधर्माचा भेद त्यांस ठाऊक नाही. जो पाहिजे तो शास्त्रार्थ काढून देतील; जे पाहिजे ते प्रायश्चित्त देतील. फक्त पैसा मिळाला म्हणजे झाले. अशा पंडितांचा संग्रह करून कोणास काय फायदा होणार आहे? राजास होणार नाही व प्रजेसही होणार नाही. व ज्या प्रजेचे पुढारी असले लोक विनाकारण आपल्यास विद्वान म्हणवितात, त्या प्रजेचा सर्वस्वी नाशच होईल याप्रमाणे हिंदू लोकांची व्यवस्था झाली आहे. या लोकांस शास्त्रीपंडितांखेरीज दुसरे कोणी पुढारी मिळतील, तेव्हा या लोकांमध्ये व्यवस्था चांगली होईल व शास्त्री, पंडित पुष्कळ असावे, अशी जे इच्छा

धरतात, ते महामूर्ख समजावे. या लोकांपासून या देशाचे किमपि हित होणार नाही; अधिक मूर्खपणा मात्र वाढेल व भ्रांती वृद्धिंगत होईल. आणि ती ज्यांचे मनात शिरेल, त्यांचा प्राण गेल्यावाचून निघणार नाही. यास्तव हे शास्त्री, पंडित अगदी निरुपयोगी आहेत, हा सिद्धान्त होतो.

ही विद्या काही उपयोगी नाही. जर असे नसेल, तर मला कोणी उत्तर द्यावे की, व्याकरणाचे पंधरा वर्षे अध्ययन केले, त्यापासून अमुक उपयोग होतो. असे मला दाखवून द्यावे, म्हणजे मी वास्तविक म्हणेन; परंतु मी शोध केला आहे, त्याजवरून मला तर वाटते की, मनुष्यास लाकडे तोडावयाचे कसब शिकविले तर बरे; परंतु हे व्याकरण नको. यात काहीच अर्थ नाही. केवळ मूर्ख होण्याची विद्या आहे. आणि इतकेही असून ज्याचा त्यांस असा गर्व असतो की, मी केवढा विद्वान, माझ्यासारखा विद्वान त्रैलोक्यात नाही पाहिला तर तो सर्वांहून मूर्ख असतो.

याप्रमाणेच ज्ञान, मीमांसा, अलंकार या शास्त्रांची व्यवस्था आहे. केवळ असत्य सिद्धान्ताचे प्रतिपादन करून, विलक्षण कुतर्क करून भलतेच अविचार लोकांत स्थापन करतात. आणि वास्तविक पाहिले तर ब्राह्मणांमध्ये चार रोजगार आहेत. सराफ, भट, पंडित व हरदास. या सर्वांपेक्षा पंडित हे महामूर्ख होत. सराफ, भट, हरदास हे बरे. हे यत्किंचित पढलेले असतात. याजमुळे हे दुराग्रही नसतात व यांस अभिमान नसतो. सांगितलेली गोष्ट ऐकतात व ह्यांचे लक्ष व्यावहारिक मार्गावर फार असते. याजकरिता काही सुधारण्याचा रस्ता यात आहे. परंतु हे विधिज आहेत, म्हणून पंडित यांची समजूत फार दृढ होती की आमचे मत खरे आहे व इतर सर्व मूर्ख आहेत. याजकरिता यांचा दुराग्रह फार होतो, तो हे सोडीत नाहीत, अतिशय आग्रह धरितात. याजमुळे हे लोक अगदीच उपयोगी नाहीत.

हिंदू लोक यांचे महान दुर्भाग्य म्हणून हे पंडित व शास्त्री या लोकांचे पुढारी झाले व यांस लोक समजतात की, हे धर्मरक्षक आहेत; परंतु हे अधर्मवृद्धी करणारे होत. व हे सोनार, परभू, ब्राह्मण वगैरे यांचा यत्किंचित निमित्ताने वाद लावून दोहोंकडून पैसा खाणार व खोटी मते आणि नाना प्रकारची खोटी कर्मे प्रसिद्ध करून भोळ्या लोकांस ठकविणार; यास्तव त्यांस आवडतही नाही की, आपली शास्त्रे बहुत लोकांस ठाऊक व्हावी; कारण तेणे करून आपली उघडीक होते व दगाबाजी व लबाड्या बाहेर पडतात. हे त्यांस फार भय आहे. जोपर्यंत आच्छादित आहे, तोपर्यंत यांच्या प्रतिष्ठेचे आयुष्य आहे. मग किरकोळ लोक यांस पुसतील की तुम्ही आम्हास सांगता; परंतु ही सर्व लबाडी

आहे. तुम्ही लबाडीवरच पोट भरता, तस्मात् आम्ही तुमचा त्याग करितो. अशी अवस्था होईल, यात संशय नाही.

हा मूर्खपणा बहुत काळपर्यंत निभला, कारण की गौप्य होते. आजपर्यंत महान प्रयत्नाने झाकून झाकून चालविले; परंतु आता चालणार नाही. अडाणी लोकांकडे एखादी पंचाईत न्या, तर ते लागलाच न्याय सांगतील. बरे तीच पंचाईत चार पंडिताकडे न्या, म्हणजे अतोनात वाद करतील आणि नाना प्रकारच्या मसलती काढून असत्य प्रतिपादन करतील, अशी त्यांची अवस्था आहे. त्यांची मने बिघडून जातात आणि भ्रांती उत्पन्न होऊन त्यांस विवेचन करता येत नाही. खोट्यांस स्थापन करण्याकरिता प्रमाणे दाखवितील आणि त्याचा पक्ष धरून भांडत बसतील. याचा अनुभव, कोणीही विचार करून, त्याची वर्तणूक पाहिली तर लक्षात येईल.

जेथे बहुत पंडित, तेथे मूर्खपणा वाढून भ्रष्टाकार होतो. अधर्मप्रवृत्ती होते व इतर लोकांवर दया करणे, हे त्याजपासून घडत नाही. त्यांची समजूत अशी आहे की सर्वांनी दुःख भोगिले, तर चिंता नाही; परंतु आम्ही मात्र सुखी असावे. तदनुसार उदाहरण पहा. शास्त्री यांचे मताने ज्या ज्या गृहस्थांनी अन्नछत्रे घातली तेथे शूद्र गेला तर त्यांस अन्न मिळत नाही आणि ब्राह्मण श्रीमंत झाला, तरी त्यांस जेवावयांस बोलावितात! असाच चमत्कार आहे.

अस्तु. सर्व लोकांस ज्ञानप्राप्ती होईल, तेव्हा हे सर्व पंडितांचे गुण बाहेर पडतील.

## नवीन ग्रंथांची आवश्यकता

**पत्र नंबर ९३**

आमचे लोकांस विचार अगदी नाही. विद्या वाढवणे व बुद्धी वाढवणे हे तर त्यांस माहीत नाही. सांप्रत सुधारलेले लोक विद्यावृद्धी करण्याकरिता पुष्कळ झटत आहेत; परंतु हे इतर कोणाचे मनात देखील येत नाही. मराठी भाषेत ग्रंथ अनेक छापिले आहेत व आणखीही वरचेवर छापत आहेत. वर्तमानपत्रात अनेक तऱ्हेचे मजकूर व माहितगारी लिहून छापतात; परंतु त्यांचा

कोणी वाचणारा नाही. जे आहेत ते गरीब आहेत. श्रीमंत व थोर जुन्या काळचे. यांस असे वाटते की, हा कागद व्यर्थ खर्च कशाकरिता करतात? व यात उपयोग काय?

परंतु त्यांचे लक्षात असे येत नाही की, आम्ही केवळ मूर्ख आहो व आम्हांस काही समजत नाही. पहा की, या लोकांस आमचा देश कोठे आहे व आणखी देश कोठे आहेत, व तेथे कोण आहेत, व या देशात सुधारणा काय पाहिजेत, व जर कोणी करू लागला, तर त्यांस अनुकूल व्हावे, हे समजत नाही. नाना प्रकारच्या विद्या आहेत, त्यापासून लाभ बहुत आहेत. समुद्रात नावा चालविण्याची विद्या आमच्या लोकांत कोठे आहे? रसायन शास्त्र व त्यापासून लाभ होतात, हे कोठे माहीत आहे? यंत्रज्ञान कोठे समजते? निदान चांगले कोणते व वाईट कोणते, याचा देखील भेद समजत नाही. जर कोणी चांगल्या कामास आरंभ केला, तर त्यांस वाईट म्हणतात. कोणी वाईटास केला, तर त्यांस चांगले म्हणतात. असे विलक्षण लोक आहेत.

कोणी उपयोगी ग्रंथ केला, तर तो कोणी घेत नाहीत, व त्यात काय आहे, हे देखील पहात नाहीत. त्यांस असे कळत नाही की, ज्या मनुष्याने ग्रंथ लिहिला, त्याचा काही तरी हेतू असेल, व त्यांस असे वाटत असेल की, लोकांस ज्ञान नाही, तेव्हा ते या ग्रंथाच्या द्वारे त्यांस मिळावे; परंतु लोक ही गोष्ट समजत नाहीत. ग्रंथात काही असो, कोणी काही म्हणो, ते जुन्या रीतीने सर्व गोष्टी घडाव्या असे पाहतात. त्यांस अद्यापि इतके देखील समजत नाही की, आमचे लोकांस काही कळत नाही. त्यांस बहुत ग्रंथ झाले असता उपयोग होईल, व देशातील लोक शहाणे होतील.

त्यांची समजूत अशी आहे की, संक्रांत आली तर चार आणे खर्चून, एक तांब्याची तबकडी घेऊन, आत तीळ घालून दक्षणेसहित एखाद्या मूर्ख ब्राह्मणाच्या हाती देतील. आणि आम्ही धर्म केला, धन्य झालो, असे म्हणतील; परंतु हेच चार आणे देऊन अमुक एक नवीन ग्रंथ झाला आहे, तो घेणार नाहीत. बरे, तिळपात्र दिले, त्यात दोन आणे ब्राह्मणाच्या पदरी पडतात व दोन आणे तांबटास मिळतात, तद्वत् चार आण्याचे एक पुस्तक घेतले तर दोन आणे कागदाबद्दल जातील व दोन आणे मजुरीबद्दल ब्राह्मणास मिळतील, तेव्हा हाही त्याचे रीतीप्रमाणे धर्मच झाला.

वामन द्वादशीचे व्रत करतात; त्यांस बारा लहान पोरे मुंज जहालेली आणून त्यांस दोन तीन रुपयांचा विषय देतात; परंतु तो विषय असा असतो की, त्याचा उपयोग काही पडत नाही. परंतु लोकांस असे वाटते की, हे पुराणात

सांगितले आहे, त्याप्रमाणे आहे. म्हणून हेच पुण्य; परंतु त्या रुपयांची पुस्तके आणून मुलांस दिली किंवा त्या रुपयांत ब्राह्मणाचे मुलास एखादी विद्या शिकविली, शाळेत आठचार आणे देऊन त्यांस पाठविले, तर त्यांस फायदा होईल. सोन्याच्या प्रतिमा करून ऊस, मडके यात पूजा करून द्याव्या, त्यापेक्षा ग्रंथ दिले तर मुले जन्मपर्यंत वाचतील; शहाणी होतील, आणि उपयोग फार पडेल.

तसेच लोक मरतेसमयी तुला करतात. त्यात पाच-चार हजार रुपये भरतात व मग ते मनास येईल तसे उडवितात; त्यांस काही अनुक्रम नसतो. त्या पाच हजार रुपयांचे काही तरी चिरकाल राहण्याजोगे काम केले, तर किती लोक शहाणे होतील? लोक असे म्हणतात की, पुष्कळ ग्रंथ लिहितात परंतु पैसा कोणापाशी आहे? विकत घ्यावे कोणी? आणि इकडे तर असा अनिर्वाच्य खर्च करीतात. आणि जे उपयोगी ते करीत नाहीत.

आता वृद्ध लोक जे आहेत, ते तर सुधरतील, हे घडतच नाही. कारण की, जो मनुष्य पंचवीस वर्षांवर जहाला, त्याची समजूत लहानपणी जी पडते, तीच त्याची कायम होते व त्यांस असे वाटते की, मी शहाणा, मला शिकवितात काय? याच शहाणपणावर मी पैसा मिळविला, संसार केला. आता जरी दरिद्र आले, तरी मी वेडा आहे, हे त्याला कदापि वाटत नाही, यास्तव त्याची सुधारणा व्हावयाची नाही. म्हणून या देशात जितके पंचवीस वर्षांवरचे जुने काळच्या समजुतीचे माणूस आहेत, त्यांची आशा अगदी नको. ते जातील तेव्हा पक्की सुधारणा होईल.

परंतु जे लहान आहेत व ज्यांस शहाणपण मिळवावयाचे आहे, त्यांजवर आमची आशा आहे. आणि त्यांचे हातून काही सुधारणा झाली, तर होईल; याजकरिता विद्याभ्यास जो करविणे, तो चांगली समजूत पडेल, लोक विचार करणारे होतील, अशा प्रकारचे त्यांस पंतोजी व शाळा पाहिजेत. व जी भाषा व जे ग्रंथ प्रथम मुलांचे हाती पडतात व ज्या मनुष्याची संगत त्यांस असते, तशी त्याची समजूत होते. जर संस्कृत भाषा प्रथम मुलास समजाविली, तर त्याच्या समजुती तशाच होतील. जर इंग्रजी शिकविले तर तशा होतील. जर मराठी शिकविले तर तशाच होतील. यास्तव मुलास ग्रंथ वाचावयास द्यावयाचे ते प्रथम चांगले पाहिजेत. त्यांस सुबुद्धी होऊन त्यांची समजूत चांगली पडावी व त्याणीं बहुत वाचण्यावर लक्ष द्यावे व त्यांच्या मनातून जुन्या काळच्या भटांकडून ज्या समजुती येतात त्या सर्व खोट्या, असे त्यांस भासले पाहिजे व त्यांस ग्रंथांची गोडी लागून ग्रंथ वाचावे असे वाटले पाहिजेत.

आमचे लोक सांप्रत काळी अगदी अज्ञानी आहेत. त्यांस ग्रंथ म्हणजे

काय हेही समजत नाही व कोणी वाचीत नाहीत व विकतही घेत नाहीत. जर कोणी म्हटले की, मी ग्रंथ करण्यावर पोट भरीन, तर त्यांस काही मिळावयाचे नाही; व कोणी शास्त्री, पंडित, भटे जरी मूर्खशिरोमणि असली, तरी त्यांस लोक चार रुपये देतील; परंतु ग्रंथकर्ता, वर्तमानपत्र छापणारा व छापखाना घालणारा विचारशीलही असला, तरी त्यांस कोणी पैसा देणार नाहीत व त्याचा माल अगदी घेणार नाहीत. शिवाय त्यांस मूर्ख म्हणतील. हाच काय शहाणा ? जनावरांची वर्णने व इतर देशांची वर्णने यात काय आहे ? असे उपहास करतील.

केवढे आश्चर्य आहे की, या लोकांस इतकी भ्रांत अजून आहे ? ग्रंथ करणाऱ्यास खप नाही. ग्रंथ करून त्यांस विकत घेणारे मिळविणे म्हणजे मोठा प्रयत्न पडतो. जुलुमाने व भिडेने ते लोकांचे गळी बांधावे लागतात, त्याजबद्दल किंमत देणे म्हणजे लोकांस असे वाटते की, हा पैसा व्यर्थ आहे. यात पुण्य नाही व धर्मही नाही. वैदिक ब्राह्मणाचे घरी जात नाही, हा धर्म कशाचा ? हे व्रत नाही, दान नाही. तेव्हा ग्रंथ घेण्यास पैसा कशाचा द्यावा ? याप्रमाणे हे लोक दुर्भाग्य आहेत. याचा काळ विपरीत, म्हणून यांस अशी बुद्धी झाली आहे, हे तर उघड आहे.

परंतु लोक असे समजतील तर बरे - ग्रंथ छापणारे यांस पैसा द्यावा हे सर्वांपेक्षा उत्तम आहे व या देशांत तर अति उत्कृष्ट हाच धर्म आहे. हे मूर्खास शहाणे करण्याचे काम आहे; म्हणून हाच धर्म सर्वांहून श्रेष्ठ आहे. अशी समजूत यांची पडेल तर त्वरित लोक सुधारतील, यात संशय नाही. व असे झाल्यावाचून ग्रंथही पुष्कळ होणार नाहीत; परंतु ईश्वरी इच्छा प्रमाण.

## अभिमान

■

पत्र नंबर ९५

एका पत्रात सरकारास मदत मिळत नाही, म्हणून लोकांच्या वेडेपणाचा स्वभाव वर्णन केला; परंतु आणखीही लिहितो की, आमचे लोक सरकारास मदत कोठून देणार ? आमच्या पैकी एक शहाणा होऊन पुढारी झाला, तर त्याणे जे काही सांगितले, ते देखील ऐकावयाचे नाहीत. व त्यांस शहाणा

असे मानणार नाहीत. दुसऱ्यास शहाणा म्हणणे हे मोठे अपमानाचे कारण आहे, असे सर्व लोक समजतात. ब्राह्मण तर मुख्यत्वेकरून असे समजतातच.

जर एक पंडित दुसऱ्यापेक्षा शहाणा असेल, तर त्याशी शत्रुत्व करून व त्याजवर कुतर्क करून, त्यांस सभेत निरुत्तर करावे म्हणजे त्याचा अपमान करण्यात आपला मान वृद्धिंगत झाला असे समजतात. दुसऱ्यास प्राण गेला तरी शहाणा म्हणत नाहीत. सांप्रत कोणत्याही ब्राह्मणास पुसा की, इंग्रज शहाणे आहेत की काय? तर ते म्हणतील 'छिः छिः' शहाणे कशाने? त्यांस काय येत आहे? त्याची विद्या व शास्त्रे, ज्ञाने सर्व आमच्याहून कमी आहेत, परंतु ते श्रीमान आहेत म्हणून त्यांचे शहाणपणाचे प्रगटीकरण होते आणि आमचे शहाणपणाचे प्रगटीकरण होत नाही.' साधारण वैद्यास पुसा की, इंग्रजांचे वैद्यक व शारीर तुमच्यापेक्षा अधिक आहे की काय? तर मूर्ख वैद्यही म्हणेल की 'छिः! कशाचे वैद्यक व कशाचे शारीर? आमच्यामध्ये सर्व आहे. किंबहुना जास्ती आहे. परंतु हे सांगण्यास त्याने इंग्रजी वैद्यक पहावयास नको. ते पाहिल्याशिवाय व अनुभव घेतल्याशिवाय तो म्हणेल की, छिः! यात काही नाही. हा त्याचा स्वभावच.

ब्राह्मणास आपलेहून वरिष्ठ कोणीच वाटत नाही. व कोणाचाही ग्रंथ त्याचे हातात द्याल तर ते म्हणतील की, 'दगड आहे यात.' नाव देखील वाचून पहावयाचे नाहीत. आणि म्हणतील की, यात गोष्टी आहेत. जळल्या त्या गोष्टी. ही बुके आपली उगाच छापतात. त्यात काही नाही. प्राण गेला तरी त्या बुकात काय आहे, ते पाहणार नाहीत; व त्याचे एक पानही उलटून पाहणार नाहीत. भट वैदिक हे सगळे संहिता पाठ करतील, पण वर्तमानपत्राची एक ओळ वाचणार नाहीत.

तसेच शास्त्री, पंडित यांस तर सर्व तुच्छ वाटते. आपले ठिकाणी गर्व करून ते बसतात आणि आपल्यास ते व्याकरणी म्हणवितात. परंतु त्यांस साधारण गोष्टीचे देखील ज्ञान नसते. पुणे शहर येथील मोठे कामदार व मोठे पंडित यांस आणून पुसा की, येथे लष्कर किती आहे? व साहेब व मुख्य कोण आहे? तर त्यांस समजणार नाही. आणि पाहिले तर साठ हजार कौमुदी पाठ करतात व साधारण नित्यातील ज्या जरुरीच्या गोष्टी त्याविषयी मूर्ख असतात. जर कोणी शहाणे मनुष्याने त्यांचे बोलणे ऐकले, तर त्यांस असे वाटेल की, हा काय वेडा आहे? किंवा मूर्ख आहे? किंवा भ्रांतिवट आहे? असे मूर्ख असोन आणखी प्रतिष्ठा लोकांत मिरवितात आणि लोकांस तर कोणाची प्रतिष्ठा करावी, हे समजत नाही. असे असोन मोठ्या शालजोड्या अंगावर घेऊन

आचार्यबुवा, भटजीबुवा म्हणवितात. परंतु ही सर्व ढोंगे आहेत हे लोक जाणत नाहीत. आणि त्यांचे नादी लागून त्यांस पैसा देतात. परंतु स्वतः विचार पहात नाहीत. बरे-वाईट दुसऱ्याने दाखविले तरी पहात नाहीत. त्यांस मूर्ख म्हणून त्याची फजिती करतात.

अलीकडे नवे ग्रंथ बहुत झाले आहेत. रसायनशास्त्र, यंत्रज्ञान, शिल्प इत्यादिक. परंतु त्यांतील गोष्ट कोणी एकही पहात नाही व लोकांचे स्वभाव असे विलक्षण आहेत की पुढारी होईल त्यांस पाडाव करीतात. त्याचे रक्षण कोणी करीत नाही. त्याचा एकत्रपणा मुळीच नाही. जर त्यांस लग्नास, मुंजीस वगैरे बोलाविले तर पाच हजार लोक येऊन चार घटिका उगेच बसतात; परंतु अमुक विचार करावयाचा आहे तेथे या म्हणून बोलाविले तर येणार नाहीत; व आले तरी त्यांस बोलता येणार नाही. त्यांच्याने विचार करवत नाही. त्यांची चित्ते विचाराकडे नाहीत. मागील चाल पडली आहे, म्हणून लग्नास वगैरे तरी जमतात. परंतु चालीविरुद्ध अमुक एक तळे नीट करावयाचे आहे, त्यांस पट्टी करण्यास बोलाविले. तर कदापि येत नाहीत.

बरे, हे पैसा देण्याचे काम आहे, म्हणून असो. परंतु लोक दारू पितात, त्यांचा बंदोबस्त कोणत्या रीतीने करावा. याजकरिता फुकट बोलाविले तरीही बहुत करून जमणार नाहीत व शास्त्री, पंडित त्यात असले तर एकही गोष्ट सिद्धीस जावयाची नाही. कोणी कुतर्क करील. दुसरा पंडित बोलला म्हणजे त्यांस उगेच उत्तर करावे, म्हणजे श्रेष्ठत्व झाले, भलतेच बोलतात या प्रकारची यांची व्यवस्था आहे. मग मोठाले विचार करणार कोठून? यांस माहितगारी नाही. बरे, जे दुसरे सांगतात ते तरी ऐकावे; तेही करीत नाहीत. ग्रहण चंद्राच्या छायेने पडते, हे कदापि खरे मानीत नाहीत. व त्याचा पुरावा पहात नाहीत. पुराणातील वेड मनात भरलेले असते, ते जातच नाही. या प्रकारचे लोक मूर्ख आहेत, आणि सरकारास मदत करणारे लोक पारशी मात्र आहेत. त्यामध्येच मात्र काही सुधारणा झाल्या आहेत.

ग्रंथाचे तर्जुमे स्वभाषेत करावे, त्यांस पैसा द्यावा, गरिबांकरिता धर्मशाळा कराव्या व गरिबांकरिता औषधपाणी देण्याकरिता वैद्यखाने, दवाखाने करावे, ही धर्मकृत्ये आहेत असे ते जाणतात. व सरकारने एकाही एक कामात पैसा दिला, तर आपण बाकीचा देऊन सरकारचा मनोदय पुरता करीतात. व लग्नकार्यास पैसा उडवीत नाहीत. ज्याचे घरी लग्न होईल, तो पन्नास रुपये धर्म करावयाचा तो कारखान्यास देतो. जर ब्राह्मणांमध्ये ही गोष्ट कोणी पुढे काढील आणि लग्नप्रयोजनातील दक्षणा बंद करील, तर ब्राह्मणांचे मोठे शत्रुत्व होईल. त्यांस

असाच पैसा उडवावा, गरीब, आंधळे यांनी औषधाशिवाय, घराशिवाय मरावे, हेच बरे वाटते. व उद्धट, दांडगे, आगंतुक यांस पैसा मिळाला, म्हणजे मोठे कार्य झाले असे वाटते. यास्तव जसे पारशी लोक आपले जातीत व्यापारवृद्धीचे व विद्यावृद्धीचे उदाहरण दाखवीत आहेत, तसे ब्राह्मणांनी करून सरकारास मदत करावी. म्हणजे सरकार सर्व बेत सिद्धीस नेईल. ते न करून रडत बसतात. आणि सरकारास नाव ठेवितात. हे मूर्ख आहेत की नाही, याचा हे पत्र वाचणारे याणी विचार करावा.

## सुशिक्षा व पंतोजी आणि संस्कृत व इंग्रजी भाषा

**पत्र नंबर ९७**

आमचे लोकांस सांप्रत काळी ही मोठी कुदशा प्राप्त झाली आहे. त्याचे मनात सुधारणा येत नाही. त्यांस पूर्वीच्या चाली ज्या आहेत त्या तशा रहाव्या हे फार चांगले वाटते. व बाजीरावासारखा धनी भटांची समृद्धी करण्याकरिता यावा असे वाटते.

परंतु त्यांस अजून असा बोध झाला नाही की, या मागील चालीपैकी बहुतेक चाली वाईट आहेत; येणे करून लोक बुडाले. त्यांस काही कळत नाही. साधारण गोष्टीविषयी देखील त्याचे अज्ञान जात नाही. त्यांस मुळी शिक्षा नाही व सुसंगत नाही. ज्या संगतीत माणूस असते, तसे तयार होते, परंतु आमचे लोकांस खरी गोष्ट सांगणारे देखील जवळ नसतात. घरात भट असतो, तो पोरांस अगदी मूर्ख करतो. मूर्खपणाच्या गोष्टी लहानपणी मनात आल्या, म्हणजे त्या जात नाहीत. याकरिता लोकांनी प्रथम सुशिक्षा लागावी, याजकरिता चांगला बेत केला पाहिजे.

सरकारी शाळा आहेत, त्यादेखील अजून चांगल्या झाल्या नाहीत, कारण पंतोजी जुनेच आहेत, ते भटाहून शहाणे नाहीत. याजकरिता मुख्य पंतोजी चांगले सुधारलेले व ज्ञानी पाहिजेत, तेव्हा सरकारच्या शाळा दुरुस्त चालतील. हल्ली जुने पंतोजी आहेत, ते केवळ अज्ञानाच्या राशी आहेत. त्यापासून कदापि लाभ होणार नाही. याकरिता मुख्य पंतोजी व ग्रंथ हे तयार झाले पाहिजेत.

ज्याकडे विद्यावृद्धीचे काम आहे. त्याणीं म्हणजे बोर्ड ऑफ एज्युकेशन याणीं मराठी पंतोजी तयार होण्याची एक शाळा केली पाहिजे व चांगले ग्रंथ तयार करण्याकरिता तर्जुमे करणाऱ्याची एक मंडळी बसविली पाहिजे.

आता पहा की, केवळ पगाराकरिता पंतोजी बुके उघडितात; परंतु त्यांस पुसले की, पृथ्वीची छाया पडून ग्रहण होते की काय? तर म्हणतात, 'छिः! हे आपले उगाच इंग्रजांचे मत आहे. हे आम्ही पोटाकरिता शिकवतो. दुसरा काही रोजगार नाही; मग करावे काय?' ही अवस्था पंतोजीची आहे. मग मुले तरबेज कशी होतील? या जुन्या पंतोजीच्या हाती रसायनविद्या दिली तर काय उपयोग? त्यांस त्यांतील एक अक्षरदेखील समजत नाही; म्हणून पोरांकडून परीक्षेस हजरी देण्याकरिता उत्तर पाठ करून मात्र ठेवितात; परंतु स्वतः समजून देण्याचे ज्ञान नाही. नवीन निबंध करण्याचे ज्ञान नाही व बुकातील गोष्टी समजून देण्याचे कळत नाही.

नवे बुक छापून आले, म्हणजे म्हणतात की, 'आली ही पीडा, यात काय आहे?' असा कंटाळा करून पोरांस शिकविणारे जे लोक त्यांच्या हातून ज्ञान कसे मिळेल? व्यर्थ पोरांना मात्र मेहनत पडते. वास्तव जशी बुके तयार होतात, तसे पंतोजी तयार झाले पाहिजेत. हे प्रथम काम आहे. ज्याचे मन मुळापासून संस्कृत भाषेतील ग्रंथ वाचून विपरीत ज्ञानाने भरले आहे. ते लोक तर अगदीच उपयोगी नाहीत. त्यांचे हातून फारच अनर्थ होईल. एकदा या विपरीत ज्ञानाची प्रथम समजूत झाली, म्हणजे मन बिघडून जाते, ते ताळ्यावर येणे कठीण पडते. यास्तव त्यापेक्षा अडाणी मनुष्य बरा.

यास्तव प्रथम जो इंग्रजी शिकलेला विद्यार्थी असेल, तोच पंतोजीचे उपयोगी पडेल. असे तयार होण्याकरिता एक नवीन शाळा व त्याजवर यथायोग्य शिकणारे पाहिजेत, तेव्हा असे लोक तयार होतील. जे संस्कृतचा अभिमान धरतात ते अगदी अज्ञानात आहेत. ते सुधारणेस हरकत मात्र करतील. दुसरी गोष्ट त्यांच्याने व्हावयाची नाही. यास्तव असे पंतोजी तयार करून जुने असतील त्यांस पेनशिने देऊन मुक्त करावे, हे बरे. संस्कृत आजच्या काळी काही उपयोगी नाही व त्यांतील ग्रंथही उपयोगी नाहीत. तेणेकरून लोक अधिक मूर्ख होतील. संस्कृतची योग्यता इतकीच आहे की, ती भाषा सुधारलेली आहे. याजकरिता पंतोजीस ती यावी, हे चांगले.

परंतु भाषा येऊन अज्ञानवृद्धी झाली, तर उपयोग काय? याजकरिता हे ना होईल तितके बरे. भाषा चांगली न आली; आणि मन साफ असून समजूत चांगली असली, तर ती पतकरेल व त्याचा उपयोग अधिक पडेल.

चांगल्या समजुतीने भाषादेखील सुधारेल; परंतु मुळी एकदा संस्कृताच्या झऱ्याचे पाणी जो प्याला, त्यांची भ्रांती जावयास नव्वद वर्षे शिकविले, तरी उपयोग नाही, हे निश्चित आहे. याविषयी कोणी भ्रांतीच धरू नये. सुधारलेल्या संस्कृत भाषेचा मात्र उपयोग पडावा इतके करावे, अधिक नको. त्यांतील ज्ञान अगदी उपयोगी नाही. जी भाषा प्रथम मुलास शिकवावी, त्या भाषेतील ग्रंथाप्रमाणे त्याचे मन होते.

याकरिता फार सुधारलेली इंग्रजी भाषा किंवा तीतील ग्रंथ शिकलेला माणूस ठेवून, त्याचे हातून इंग्रजी ग्रंथाचे ज्ञान मुलास शिकवून तसे पंतोजी तयार करावे, म्हणजे फार उपयोग होईल. संस्कृताने आधी अनर्थ केला आहे. व याने आणखी अधिक अनर्थ होईल, हे पक्के मनात वागवावे आणि खोटा अभिमान धरू नये. संस्कृत भाषेतील ग्रंथ व इंग्रजी भाषेतील ग्रंथ यांची तुलना करून पाहावी, म्हणजे संस्कृताचा अभिमान जाईल.

## संस्कृत विद्या

■

**पत्र नंबर १०१**

पुण्यातील 'कल्याणोन्नायक मंडळी'त लोक आहेत, व त्याचे ज्ञान कसे आहे, हे मला आजपर्यंत ऐकून ठाऊक होते, व मला फार आशा होती की, हे लोक आपली योग्यता जाणून आपले उत्कृष्ट ज्ञान बाहेर काढणार नाहीत; परंतु आपली फजिती करून घेण्यास तेच प्रथम प्रवर्तले, यास्तव त्यांस उत्तर दिले पाहिजे. नाही तर ते असे समजतील की, पृथ्वी निःक्षत्रिय झाली आणि जरी त्याचे लिहिणे उघड वेडेपणाचे आहे, तत्रापि सूज्ञ जनांनी त्याचा धिक्कार करू नये.

(२) 'कल्याणोन्नायक मंडळी'तील सभासद संस्कृत विद्येचा पक्ष घेतात; परंतु हा पक्ष व्यर्थ आहे. कारण की, संस्कृतात फार विद्या आहे. असा सांगून लोकांस पंडित प्राचीन काळी फसवीत होते; परंतु आजचा काळ असा आहे की, संस्कृताची उघडीक होऊन पंडितांचे सर्व ज्ञान बाहेर पडले आहे. असे असता हे सभासद बापडे सर्व पाठशाळेतील पंडित आहेत; परंतु त्यांस वास्तविक

ज्ञान काही नाही. संस्कृत भाषेतील खुळे याचे मनात भरली आहेत. ती झाकून ठेवतील तर फार बरे होईल.

(३) संस्कृताचा इतकाच उपयोग आहे की, लोकांमध्ये भ्रांती उत्पन्न व्हावी. व जो जो मनुष्य त्यात प्रवीण होतो, तो तो अज्ञानसमुद्रात खोल खोल जात असतो; असे अजून कोणी म्हणेल, पाठशाळा सरकारने कशास चालविली आहे? तर शाळेपासून जे फळ आता दृष्टीस पडू लागले आहे, तेच येईल, असे पूर्वी वाटले नवते. तेवहा असे वाटत होते की, कोणीकडून तरी विद्येची गोडी या लोकांस लागेल, नंतर लोकांस जी विद्या म्हणून वाटते, त्यातच अनुपान करून चांगली विद्या शिकवावी. अशा बुद्धीने हे बीज घातले. त्यांस दक्षिणादिककरून जलसिंचन केले. परंतु या वृक्षास इच्छिले फळ आले नाही. उलटे आणखी अज्ञान वाढले. अस्तु. साधारण संस्कृताविषयी बोलण्याचा प्रसंग आहे, यात इतर गोष्ट नको.

(४) संस्कृतात चांगली विद्या नाही व उपयुक्त ज्ञान नाही, हे सर्व विद्वानांनी ठरविले आहे. परंतु सभासदांची खातरजमा करण्याकरिता लिहिणे जरूर आहे. प्रथम संस्कृतात इतिहास नाही. मागाहून राज्ये कशी झाली? व ती बुडाली कोणत्या कारणाने? राज्ये किती होती? मुसलमान आले कधी? त्याचे पूर्वी राज्य कोणी केले? येविषयी पंडितांचे ज्ञान व नांगरहाक्याचे ज्ञान सारखे आहे. कलियुगास पाच हजार वर्षे सरासरी होत आला. त्याचा इतिहास आहे कोठे? याचे उत्तर पंडित काय देतील?

दुसरे, संस्कृतात भूगोल नाही. पंडितास पुसा की, रूम कोठे आहे? व अरबस्तान कोठे आहे? व हिंदुस्थानची हद्द कशी व लोक किती? व लांबीरुंदी किती? तर तो हातच जोडील, आणि ठाऊक नाही म्हणेल. पंडितांचे ज्ञान इतकेच की, मेरू भूमीच्यामध्ये आहे. लक्ष योजने उंच आहे. सिद्धपूर आहे. स्वर्गाची वाट हिमालयावर आहे. गंगा ही देवना जिवंत आहे, तशीच यमुनाही आहे. हे त्याचे भूगोलसंबंधी ज्ञान आहे.

तिसरे, संस्कृतात यंत्रज्ञान नाही. आजपर्यंत कालिदासासारिखे पंडित झाले, मग या 'कल्याणोन्नायक' गरिबाची कथा काय? परंतु कोणी पंडिताने यंत्र कधी केले आहे? यंत्राची सुधारणा केली आहे? जे जाते व्यासाचे वेळेस होते, तेच आता आहे. जो नांगर पांडवांचे राज्यात होता, तोच आता आहे. पंडितांनी कोणता ग्रंथ यंत्रावर विचार करून लिहिला आहे? पंडितांनी कधी ग्रंथ छापले आहेत? कागद करीतात, त्यापेक्षा चांगले करण्याची युक्ती लोकांस दाखविली आहे? कर्नाटकात ताडपत्रावर रामराज्यापासून लिहीत आले, तसेच

आजपर्यंत लिहितात.

कोणत्या दशग्रंथी ब्राह्मणाने व कोणत्या षड्शास्त्री पंडिताने यंत्राविषयी विचार केला आहे? फार झाले तर शिल्पाविषयी एक जुने पुस्तक काढतील आणि म्हणतील की, हे पहा आमचे यंत्रज्ञान. आत पाहिले तर दुसरे काही नसते. परंतु मंगळवारी घर बांधू नये, बुधवारी मोरी उकरू नये, त्रिकोण आला तर जागा टाकावी, जेथे समभाग येईल, तेथे घर बांधावे, रोहिणी नक्षत्रावर लाकडे तोडावी, हेच ज्ञान त्यात सापडेल. त्या ज्ञानाप्रमाणे त्यांनी लोकांस वेड लावून दिले आहे व जो तो मुहूर्त पहाता पहात दमतो. मुलास बायको कशी का असेना, परंतु मुहूर्त चांगला पाहिजे. जे अज्ञान लोकांत पंडितांनी पसरून दिले आहे.

चवथे, राज्यप्रकरणी ज्ञान पाहिले तर मनास येईल तसे राज्य करावे. या नियमावाचून कोणता नियम त्यांस ठाऊक आहे? लोकांमध्ये बंदोबस्त व उद्योग कसा होतो व त्यांची वृद्धि, उत्पत्ती व नाश कोणत्या कारणाने होतात व फौजेचे नियम कसे असावे, येविषयी ज्ञान कोणत्या पंडितास आहे? हे ज्ञान नाही म्हणून पंडित उद्योग करावयास प्रतिकूल आहेत, व विचार करावयासही प्रतिकूल आहेत व देशात द्रव्य कसे येईल, याविषयी तर त्यांस धुळाक्षर शिकविले पाहिजे. कोणत्या पंडिताने राज्याविषयी ग्रंथ लिहिला आहे? व राज्य करण्याची युक्ती अमुक चांगली, असे दाखविले आहे? फक्त पंडितांनी इतकेच लिहिले आहे की, जे जे राजे झाले; त्यांची खुशामत करून त्यांस आकाशांत नेले आहे.

या गोष्टीची प्रचीत पहावयास दूर जावयास नको. बाजीराव याने पुण्यात शास्त्रांचा एक मोठा कळप बाळगिला होता; परंतु त्याने कोणते कल्याण केले? द्वादशीचे ब्राह्मणभोजन वाढविले. कोणतेही पाप केले, तर पैका घेऊन निर्मळ म्हणून सांगत होते. "सर्वत्र विजयी भव" म्हणून आशीर्वाद देत होते. त्याणी कांठाळे बसले. रोज पाच-चार स्नाने घालीत होते. एवढीच गोष्ट त्याणीं केली, धर्म सांगितला नाही. राज्यव्यवहार सांगितला नाही, विद्या सांगितली नाही, लोकांस लुटून त्यांस शालजोड्या द्याव्या, म्हणजे खंडीभर आशीर्वाद व दोन लाख कोट्या करून वाद करीत होते.

पाचवी गोष्ट, परदेशात प्रवास करून, तेथील खबर लोकांत प्रसिद्ध केली पाहिजे, तर लोकांचे ज्ञान वाढते. याविषयी लक्षावधी ग्रंथ इंग्रजीत आहेत. त्यांपैकी एखादा तरी त्यासारखा संस्कतात आहे की काय? पंडितांस फार झाले तर शे-पन्नास कोसांतील प्रवास घडला असतो. बाकी त्यांच्या डोळ्यांपुढे

अंधकार असतो. पृथ्वीविषयी व समुद्राविषयी हे पंडित लोक बोलत असले, म्हणजे जसे इस्पितळातील लोक बडबडतात, त्याप्रमाणे त्यांचे ज्ञान नजरेस येते.

सहावे पदार्थज्ञानही बराबर संस्कृतात नाही. भलत्याचा गुण भलताच व भलतीच उत्पत्ती सांगितली आहे. सोने जंबुनद आहे, म्हणून सांगितले, ते कोठे आहे? पंडितांनी त्यांची आंगठी कधी केली आहे काय? तसेच सिंह, शार्दूल, शरभ या जनावरांची वर्णने मनास येईल तशी केली आहेत; परंतु ती पंडितास खरी वाटून खरा शोध करण्यास देखील ते प्रतिकूल आहेत. याप्रमाणेच ज्योतिष, वैद्यक, रसायन या सर्व ज्ञानाची व्यवस्था आहे. फक्त संस्कृतात शब्दशास्त्र मात्र आहे. म्हणजे व्याकरण, अ़लंकार, न्याय इत्यादी.

परंतु जे इंग्रजी भाषेत ज्ञान व विद्या आहे त्यातला या भाषेत एक गुंजदेखील अंश नाही आणि या शब्दज्ञानाचा उपयोग कोणता की, पंडित सभेत जमून बडबड करतात. त्यापासून लोकांस काही उपयोग नाही, अर्थ नाही, धर्म नाही, हा वितंडवाद. परंतु पंडितास हीच मोठी विद्या वाटते व तिजवर ते मिरवितात. परंतु त्यांस असे वाटत नाही की, आमचे ज्ञान निरुपयुक्त व पोकळ आहे, व याजवर लोकांस आता फसवू नये. लोकांस आपले कल्याणाकरिता उपयुक्त ज्ञान मिळवू द्यावे, असे वाटत नाही. बुडत्याबरोबर काठावरच्यानेही आत पडावे, असा त्यांचा बेत आहे.

परंतु हा वेडेपणा सोडून द्यावा व पुनर्विवाहादि विषयावर मूर्खासारखे बरळू नये. पंडितांनी या हिंदू लोकांचे आजपर्यंत इतके खाऊन त्यांचे कल्याण काय केले? राहू चंद्रास खातो. ब्राह्मणास दिले म्हणजे पुण्य, ब्राह्मण हेच देव, हेच त्यांस सांगून आपल्यासारखे मूर्ख केले.

# २. हिंदूंचे धार्मिक जीवन

# शिमग्याचा दुराचार

■

पत्र नंबर ४ : ९ एप्रिल १८४८

लोकांत वाईट गोष्टीचा परिचार त्वरित पडतो, व चांगले गोष्टींचे ग्रहण होण्यास बहुत उशीर लागतो, हा एक साधारण नियम आहे. व दुसरा एक नियम असा आहे की, जी एखादी चाल काही कारणावरून एक वेळ पडते, तीच पुढे काही काळाने अंधपरंपरा चालू लागते. तसेच हे होळीचे माहात्म्य आम्हास दिसते. हल्ली हे पाच दिवस होळीचे आहेत, हे प्रत्येक ठिकाणी लोक अधर्माने क्रमीत आहेत. व त्यात मूर्ख आणि उनाड लोकच आहेत असे नाही. बहुत संभावित, शहाणे व थोर लोक अंशतः त्यात मिसळून आपला अपमान करिताहेत. तेव्हा त्यांस संभावित हे नाव शोभते काय ? नाही; सगळे सारखेच योग्यतेचे असे म्हटले पाहिजे.

परंतु हा दोष त्याजकडेस आहे असेच केवळ नाही. हा संगतिदोष लहानपणापासून आसमंतात भागी ही दुष्कृत्ये पाहिल्याने प्राप्त होतो. आणि एकदा निर्लज्जपणाच्या भावना मनात ठसल्या म्हणजे त्या जात नाहीत. उलट्या इतक्या सुदृढ होतात की, आम्ही आता लिहितो आहो, हे किती थोड्यांस आवडेल आणि किती बहुतांस आवडणार नाही, हे आमच्याने सांगवत नाही; परंतु जर त्यांनी विचार केला तर त्यांस आम्ही म्हणतो, हे खरे वाटेल यात संशय नाही. वाचणाराने असे म्हणू नये की, माझा बाप, माझा आजा, माझे शेजारी, हे सर्व असे कर्म प्राचीन काळापासून करीत आले व मीही लहानपणापासून त्यातच वाढलो; तेव्हा त्याचे विरुद्ध जे हे भाषण ते उपयोगी काय ? तर आमची त्यांस अशी प्रार्थना आहे की, तुम्हास ईश्वराने विचारशक्ती दिली आहे. तेणेकरून सारासार पहा. यद्यपि शास्त्राचा आधार थोडासा असेल तरी शास्त्रात आणखी बहुत सत्कर्मे लिहिली आहेत ती सर्व तुम्ही करता काय ? आणि जर करीत नाही, तर मग भ्रष्टपणास मात्र शास्त्राचा आधार तुम्ही कशाकशाकरिता धरता ? सार कोणते व असार कोणते, हे पहाणे तुम्हाकडे आहे.

ईश्वराने तुम्हास जिव्हा दिली आहे. तिचे योगाने कुत्सित, बीभत्स व निंदायुक्त भाषणे करिता आणि लज्जास्पद मूर्खपणाचे स्वर काढिता हा थोरपणा काय ? आम्ही तर याला मनुष्यपणाही म्हणणार नाही. मग थोरपणा म्हणू कोठून ? रानात जनावरे फिरतात व त्यासारखे हे लोक फिरतात. त्यांस लज्जा कशी

वाटत नाही ? बापाचे श्राद्ध किंवा कपिलाषष्ठीचा पुण्यकाल आला तर आनंदाने गरिबास त्यांच्याने दोन पैसे धर्म करवत नाही. आणि शिमग्यात दुष्ट स्त्रियांचे पोषणाकरिता उल्हासाने हे द्रव्य देतात. तेव्हा साजिंदे व भडवे हे पूर्वजन्मीचे ऋणी असतील असे वाटते. जितके देऊळ पवित्र तितकेच हे व्यभिचारगृह अपवित्र असे असून त्यात पापाचा साठा करीतात, हे नरकाचे साधन करीतात, की नाही बरे ?

आमचे हे पुणे शहर आहे, तत्रापि आपल्या लग्नाच्या स्त्रिया व सख्ख्या आया यांस पोटास घालावयाची किती एकास भ्रांती असली, तरी त्यांनी कर्ज काढून कसबिणीच्या हातात दोन रुपये दिले नाहीत तर त्यांस असे वाटते की, आमची मंडळी ( ज्याचे सोबतीत फिरतो ती) आम्हास हसेल. ही लज्जा बाळगून हरेक प्रकारे करून चार रुपये ते मिळवितात आणि त्यांचा पातकात व्यय करीतात. जे भले मनुष्य असतात, त्यासही ते पिशाच्चरूप स्नेही नरकात ओढितात. आणि आपल्यास शाबास मानून असे समजतात की, यंदाचा शिमगा चांगला केला. आम्ही धन्य आहो. चोरांचे मंडळींत जो चोरी शिताफीने करितो, त्यांस इतर चोर वाहवा म्हणतात, तशीच ही अवस्था आहे.

याप्रमाणे पुणे शहरात आमचे पाहण्यात पुष्कळ आहे. पुणे द्रव्याने हलके आहे खरे, परंतु दुष्कर्मात तेथील लोक द्रव्यवान शहरापेक्षा अधिक आहेत. व बहुत लोक आपले सामर्थ्याची पराकाष्ठा करून रांडांचे ताफे बाळगण्याचा खर्च जीवादारभ्य करीतात. त्यात लहान मुले पाहून त्यांची मला फार करुणा येते. कारण की, हे भ्रष्ट झालेले लोक आपले उदाहरण त्यांस देऊन त्यासही आपले शाळेत विद्वान करीतात. नंतर ते वाढल्यावर कसे होतील, याचे लक्षण सहज ध्यानात येईल. मला वाटते की, पाच दिवस हे लोक नर्कवास करीतात. कारण की, त्यांचे कानी, मुखी, मनी व चित्ती पातकाशिवाय दुसरे काहीही नसते. ‘कुरीयर’ नामक इंग्रजी पत्रात असे लिहिले आहे की, सरकारने हा सण बंद करण्याचा बेत करावा. तो असा की, दरबारात या सणाबद्दल सुट्या आहेत, त्या बंद कराव्या व पुण्यास रात्रीच्या तोफा बंद करता त्या करू नयेत. व माजिस्त्रेट साहेब यांणी कोणी दांडगाई किंवा वाईट भाषण अगर दंगा करील त्यांस मोठे शासन करावे.

हे सर्व बेत सरकारने केले तर चांगले आहेत. लोकांस वाईट मार्गातून काढल्यासारखे होईल. परंतु सरकार प्रस्तुत असे करीलसे दिसत नाही. कारण सरकार स्वतंत्र नाही. त्यांस विलायतेहून अधिकाऱ्यांची पत्रे वारंवार येतात की, हिंदू लोकांचे रिवाजास व चालीस व धर्मास अगदी अटकाव करू नये.

आमचे लोकांचे माहात्म्य इकडे काही नाही, तरी विलायतेस मोठे आहे असे दिसते. व ही मसलतीची व राजकारणी गोष्ट आहे. इंग्रजांस असे वाटते की, जर आपण लोकांचे चालीविरुद्ध काही केले, तर हिंदुस्थानचे राज्य आपले बुडेल व लोक आपल्यास हाकून देतील? यास्तव ते जपून चालतात. अशी त्यांची मसलत आहे.

परंतु ते कसेही असो, दुसऱ्यांनी करू नको म्हटल्यावर मग करू नये, हे शहाणपण नव्हे. चांगली गोष्ट असेल ती स्वयमेव अंगीकारावी. होळी अगदी बंद झाली तर फार चांगले आहे. व या दुराचारास शास्त्राची आज्ञा आहे, असे आम्हास वाटत नाही. येविषयी आमचे मत खरे आहे किंवा नाही, हे कोणी विद्वान मनुष्य आम्हास लिहून उत्तरी कळवितील तर आम्ही फार खुशी आहो. परंतु ते कसेही असो. होळीचा मूर्खपणा इतका उघड आहे की, त्याविषयी लिहिणे हे वृथा श्रम आहेत. परंतु लोकांस मूर्खपणा फार, याजमुळे त्यांचे ध्यानात येत नाही. व दुसरे असे आहे की, मूर्ख लोक यांचे हाती द्रव्य व अधिकार फार आहेत. याजमुळे त्यांचे उत्तेजन दुष्कर्मास फार आहे. म्हणून ते सुधारणा करण्यास तुच्छ मानतात. परंतु आम्हास धीर पुष्कळ आहे.

## शाक्त मार्ग

**पत्र नंबर ६ : २३ एप्रिल १८४८**

हिंदू धर्मात बहुत ग्रंथ आहेत. मला वाटते की, सरासरी शंभर एक असावे. असेच दुसरे धर्मातही आहेत. परंतु या पंथांपैकी एक दुर्घट पंथ तंत्राचा आहे. म्हणजे रुद्र, यामल व योनीतील तंत्र वगैरे ग्रंथ आहेत. त्यात शक्ती-उपासना करण्याचा मार्ग लिहिला आहे. तो बंगाल देशात व गौड व उडीसा (ओरिसा) प्रांतात पूर्वीपासून चालतो. तेथील लोक शक्ती-उपासना तंत्राधाराने करीतात. म्हणून या देशात ते लोक मंत्री व सामर्थ्यवान आहेत. अशा गप्पा फार आहेत.

त्याचे खरेपण किंवा खोटेपणा काय असेल ते असो. त्याचा विचार मी सांप्रत करीत नाही. परंतु मला बहुत खेद होतो की, तो पंथ अलीकडे दक्षिणेत पुणे इत्यादी ठिकाणी बहुत चालू लागला आहे. त्याचे कारण पाहिले

असता लक्ष्मी प्राप्त व्हावी, पुत्रकामना इत्यादिक वासना तृप्त व्हाव्या, म्हणून उपासना करीतात, असे शाक्त सांगतात; परंतु मला वाटते की, ते काही नाही; त्यांची मद्य मांस खाण्याची व्यसनेच प्रमुख आहेत. ती पुरती होण्याकरिता निमित्त करून किती एक निर्लज्जपणाने आपले घरी दारूचे कारखाने करून मद्य तयार करीतात. व किती एक विकत घेतात व ते जरी गुप्तपणाने असे करतात तरी त्याचे श्रीमुखाची दुर्गंधी जेथे बसतील तेथे प्रगट होऊन हे शाक्त आहेत, असे सर्वांस समजते व किती एक मस्त होऊन घरी व रस्त्यात सापडतात. या गोष्टी प्रसिद्ध आहेत, परंतु त्यांच्या प्रतिबंधाचा उपाय कोणी लोक समजून करीत नाहीत. किंबहुना त्याजवर झाकण घालून जो तो म्हणतो की, हे अपेश डोकीवर कोणी घ्यावे! हे कलियुग आहे. मी तुम्हास थोडासा या प्रकरणाचा इतिहास कळवितो. तो मी श्रमेकरून समजून घेतला आहे. यास्तव हा दुष्ट पंथ सुटण्याकरिता प्रगट व्हावा.

या पंथांतील लोक आहेत त्यांस वाममार्गी किंवा वामाचारी असे म्हणतात आणि शाक्त हेही नाव त्याचे प्रसिद्ध आहे. प्रथमतः ज्यांस मद्यमांस खावे अशी बुद्धी होते, तो जो दुसरे वाममार्गी आहेत याचे भजनास लागतो. नंतर ते एक दिवस बहुधा अमावास्या किंवा अंधारी रात्र अशी योजतात आणि त्या दिवशी त्या उमेदवारास आपले धर्मात घेण्याचा संस्कार करीतात, तो असा की, त्या दिवशी मध्यरात्रीस आठ असामी वाममार्गी आणि आठ स्त्रिया एक एक वेगळाले जातीची असावी, म्हणजे विधवा, ब्राह्मणी, परटीण, न्हावीण, कळावंतीण, गौळीण, कोष्टीण, सोनारीण, सुवाशीण एकूण आठ, त्या गुरूच्या घरी मिळोन येतात; आणि तेथे स्थंडिल घालून आठ कलश मद्याचे व मांस असे मांडतात. अग्नि पेटवितात आणि त्याजवळ काली म्हणजे देवीची मूर्ति मांडितात. नंतर प्रत्येक पुरुष स्त्रीचे शेजारी बसतो आणि पूजा करीतात. नंतर प्रतिज्ञा करवीतात की, ‘मी आजपासून जातिनिषेध मानणार नाही व मद्य-मांस भक्षीन व स्त्री स्वकीय किंवा परकीय यांचे ठायी निषेध किंवा व्यभिचार मानणार नाही, मला सर्व सारखे आहे. येणेकरून मला भगवती मेल्यावर मोक्षास नेवो. आणि या जन्मी सुखसंपदा देवो.’ अशी प्रार्थना व प्रतिज्ञा करतात.

नंतर पूजा संपूर्ण झाली म्हणजे तंत्र-शास्त्रांतील काही उपदेश करीतात. आणि नित्य पूजेचा मार्ग सांगतात. यानंतर तो वामाचारी दीक्षित झाला. मग त्याने पुनरपि अंधेरी रात्रीस पूजेचा बेत केला म्हणजे तशा स्त्रिया जमवून ते सोबती जमवून बसावे; आणि स्त्रियांस ते भैरवी म्हणतात व आपल्यास भैरव म्हणतात व दारूस सिद्ध म्हणतात; अशी विलक्षण नावे घेऊन कोणी नग्न

होऊन नग्न स्त्रियांची पूजा करीतात आणि तिचे ठायी देवीचे स्तापन करतात. किती एक व्यभिचार करीतात आणि एक महार किंवा मांग यांचे हातचे जेवतात. शिवरात्रीस व एकादशीस देखील अशी कर्मे करीतात आणि त्यांचे आणखी पुष्कळ विधी आहेत. कोणी आपले कपाळी कुंकू लावून तांत्रिक टिळकाची खूण बाळगतात. कोणाची खूण तोंडाची घाण असत्ये; मग ते आपल्या मंडळीत आपल्यास मोठे सामर्थ्यवान म्हणवितात. कोणी म्हणतात आम्ही ज्यास शाप देऊ त्यांस मारू; कोणी म्हणतात की आम्हास देवी दिसते; कोणी म्हणतात की, आम्ही जे चिंतू ते कार्य करू. अशी अनेक प्रकारची कर्मे ते आपल्या अंगी भासवितात, परंतु वागवीत नाहीत; तेणेकरून लोकांत निंदेस मात्र पात्र होतात.

असे भ्रष्टाचार हल्ली ब्राह्मण लोकांत चालू लागले आहेत. त्यांनी वैदिक मार्ग, अग्निहोत्र, ज्ञानप्राप्ती, वेदपारायण, पुराण-मार्ग, शालिग्राम-पूजा इत्यादिक धरून स्वस्थपणाने भगवंताचे भजन करावयाचे, ते सोडून या नरकवासरूप पंथात पडून राहिले आहेत. मला तर वाटते की, याचे साधन नरक मात्र आहे. असे जे दुष्ट लोक नीतिभ्रष्ट करतात, त्यांस ईश्वर शासन केल्याशिवाय राहणार नाही. पेशव्यांचे राज्यात ब्राह्मण धर्माचा काहीसा बंद होता, कारण की ते नियंते होते; परंतु हल्ली तर ब्राह्मण अतिशूद्रापेक्षाही वाईट कर्मे करीतात. त्यांस कोणी शासन करणार नाहीसा झाला आहे. जे चार गरीब आहेत ते भितात की कोणी अब्रूची अर्जी कोडतात करील. मग हुकूमनामा होईल. हे कष्ट कोणी भोगावे? परंतु, मला वाटते की, अद्यापि वाममार्गी ब्राह्मण फार नाहीत. दक्षिणमार्गी जर सगळे जमले, तर त्यांस ताळ्यावर आणावयास उशीर नाही. किती एक लोकांनी जेवावयास जाणे सोडले व किती एक घरात बसतात, कोणाच्या घरी जात नाहीत, असे त्रासले आहेत. परंतु कोणामध्ये असा धीर होत नाही की, सर्वांस बोलावून याचा निर्बंध करून बंदोबस्त करावा आणि मूळचे पवित्र स्थितीवर ब्राह्मण धर्म आणावा, म्हणजे शुद्ध ज्ञान-मार्ग, शास्त्रविचार, परमेश्वराचे आराधन करणे इत्यादीक मार्ग स्थापावे आणि मंत्रतंत्र व जारणमारण इत्यादिक गोष्टी किमयासारख्या अशक्य, परंतु अडाणी लोकांस भुलविण्याकरिता ब्राह्मण लोक प्रतिष्ठा दाखवून दुष्ट कर्मे करीतात. ही एकदम बंद होतील तर चांगले आहे.

पूर्वी इराण देशात असा एक मजदाद (मेहदी?) नामक खोटा पैगंबर होऊन व्यभिचार नाही, असे मत चालू करीत होता. परंतु नशरिवात राजाने त्यांस फाशी दिले, तेव्हा ते मत आटपले. तसे या दुष्ट वाममार्गी लोकांस

मोठे शासन झाले पाहिजे. व यांची घरे व रात्रीच्या बैठका यांचा पत्ता लावून नीतीचे रक्षण करावे हे चांगले. नाही तर काय होईल ते ईश्वर जाणे. मनुष्याची कल्पना चालत नाही. आणखी याविषयी पुढे मजकूर लिहू.

## वाईट चालीचे प्रकार

**पत्र नंबर १३**

आपले लोकांच्या मूर्खपणाच्या समजुती चालतात. त्यांपैकी ३० प्रसिद्ध झाल्या. त्यांची पुरवणी आणखी खाली लिहिली आहे, ती प्रसिद्ध व्हावी –

(३१) स्त्रियांनी केला तो व्यभिचार; पुरुषाचा व्यभिचार करण्याचा पुरुषधर्म आहे, असे समजतात.

(३२) सोदा तो शहाणा.

(३३) सालसपणाने व खरेपणाने द्रव्य मिळत नाही.

(३४) ज्याची सद्दी त्याचे राज्य; ज्यास काळ अनुकूल त्यांस सर्व भाळतात. मुलींचा व जनावरांचा पायगुण चांगला-वाईट असतो, असे समजतात.

(३५) महार हिंदू आहेत व आपले देवाची पूजा करतात व धर्म मानतात; तरी म्लेंच्छांपेक्षा नीच कसे?

(३६) कार्यापुरती मैत्री व कारणापुरते आर्जव; तसाच रोगापुरता वैद्य.

(३७) संसार सोडल्यावाचून ईश्वरप्राप्ती नाही.

(३८) स्त्रियांचा पुनर्विवाह केला तर धर्म बुडेल व ब्राह्मणांची अब्रू जाईल.

(३९) बैरागी वगैरे लोक घरेदारे, रोजगारधंदा सोडून फिरतात, त्यांस खाण्यास दिले तर पुण्य आहे.

(४०) अब्रू गुणावर नाही, परंतु द्रव्यावर व मोठे कामावर आहे. बहुधा कोणाचे द्रव्य किंवा काम अपराधाखेरीज गेले, तर अब्रू गेली म्हणतात. हे कसे?

याचा विचार करून जे उत्तर देतील, त्यांचे आम्ही उपकार मानू. खरे असेल त्याचा स्वीकार व लबाड असेल त्याचा अनादर करावा, इतकीच आशा आहे.

# वैराग्य

■

**पत्र नंबर २६ : १३ ऑगस्ट १८४८**

मनुष्यमात्राने आपले परलोकांचा विचार करावा, एक हे सर्व गोष्टीहून उत्तम आहे; असे असता किती एक सांसारिक जन लौकिक विचार मात्र करीतात. एक क्षणभरदेखील ईश्वराचे स्मरण करीत नाहीत. याहून मोठे आश्चर्य काय आहे? मनुष्यास ईश्वराने बुद्धी दिली आहे, तिचा उपयोग इतकाच की, इतर सर्व जनावरांपेक्षा हे जनावर श्रेष्ठत्व पावून आपले कर्त्याचे उपकार जाणून त्याची कीर्ती आणि दया वर्णन करील; परंतु हा सन्मार्ग सोडून किती एक गैर रस्त्याने जात आहेत. आणि क्षणभंगुर देहाचे पोषणाकडे सर्व लक्ष देऊन आपले जे महत्कल्याण, ते करून घेत नाहीत.

पहा, कित्येक मेहनतीचे कामात पडले आहेत. किती एक चाबूकस्वार, किती एक कारकून, कित्येक मजूर, किती एक शास्त्री व कित्येक वैदिक आहेत. कित्येक सूर्यादयादारभ्य नाचतात व संत म्हणवितात; परंतु हे सर्व देवास जाणत नाहीत. केवळ पोटाकरिता उद्योग संपादून असतात. याचा दाखला असा आहे की, गोसावीबोवास जर बिदागी कमी पोचली, तर त्यांस राग येतो. पुराणिकास तांदूळ मिळाले नाहीत, तर त्यांस संताप येतो. भटास दक्षणा मिळाली नाही, तर तो रागावतो. असेच बहुतेक लोक आहेत. तेव्हा कोणी धर्मसंबंधी किंवा प्रपंचासंबंधी द्रव्याचे आशेवाचून काम करीत नाहीत, हे स्पष्ट आहे. यास्तव यापैकी कोणी साधूचे अभिधान पावण्यास योग्य नाहीत.

मला असे वाटते की, संसार आणि परमार्थ ही दोन कामे पृथक आहेत. त्याची मिसळ करू नये. परंतु किती एक लोक फक्त संसाराकरिता काही कामे करीतात आणि ती देवाकरिता केली असे म्हणतात. मला एक साधू असा ठाऊक आहे की, त्याची पूजा व भजन किंचित होते; तत्रापि त्याजकडे लोक फार येऊ लागले, तेव्हा त्याची पूजा वाढली. म्हणजे, दांभिकपणाने तो चार घटिका अधिक बसू लागला व तेच लोक कमी होताच पुन्हा मूळचे प्रमाणे झाला. हा केवढा नीचपणा आहे!

देवाने सर्वदा माझे भजन करा, म्हणून मनुष्यावर ओझे घातले नाही. तो इतकेच भजन मागतो की, जे आपले आणि आपले कुटुंबाचे व इतर जनांचे काम आहे, ते सर्व चांगले रीतीने करून नंतर जी वेळ सापडेल, ती

क्षणभर असो अगर घटकाभर असो, स्नान संध्येत किंवा प्रार्थनेत आणि नामस्मरणात घालवा. म्हणजे त्यातच अनंत वर्षे तपश्चर्या केल्याचे पुण्य आहे. संपूर्ण जग ईश्वराने निर्माण केले आहे व त्याची व्यवस्था होण्याकरिता सूर्य-चंद्र, रात्र-दिवस, प्रत्येक जिवाचा भक्ष, रोगास औषध व मनुष्यास विचार आणि थोरपणा इतकी दिली आहेत. त्याचे कारण असे आहे की, ज्या ज्या ठिकाणी जे जे व्हावयाचे; ते यथास्थित होऊन मनुष्याने सर्वदा ईश्वराचे उपकार, शहाणपण, नेम व रचना यांची आश्चर्यकारक स्तुती करून रमत असावे. सूर्य उगवला असता निद्रा करावी किंवा रोग झाला असता औषध घेऊ नये, अगर मनुष्य झाला असता विचार टाकून देऊन जनावरांसारखे फिरावे, असे विचारास योग्य दिसत नाही. यास्तव उत्तम हेच की मनुष्याने आपले कर्म करावे.

श्रीकृष्णाने गीतेच्या ठाई हाच अभिप्राय अर्जुनास सांगितला आहे. अर्जुन विषाद पावून वैराग्य घेत होता. तेव्हा कृष्णाने त्याची समजूत केली की, 'अरे षंढा, तू भित्र्यासारखा वैराग्य काय घेतोस? जे आपले कर्तव्य आहे, ते कधीही टाकू नको. त्याचे आचरण कर. आणि सुखदुःख मात्र मानू नको. वैराग्य हे मूर्खपण आहे. आशा व दुःख जे लाभालाभापासून होते ते मात्र सोडावे. परंतु संसारी जे आपले कर्म लोकांस प्रगट होऊन चालत आले आहे, ते टाकू नये.' या उपदेशावरून जन्माचे सार्थक कसे होईल, याचे उत्तर सहज निघत आहे. आपण काय करितो, वस्त्रप्रावर्ण नेसतो, खातो, पितो व कुटुंबाचे पोषण करितो. हे सर्व व्यर्थ आहे, येणेकरून ईश्वरप्रीति होत नाही, असे जे म्हणतात, त्याचे मत ईश्वरी वचनास विरुद्ध व विचारासही विपरीत आहे, कारण पृथ्वीवर अनेक मनुष्ये निर्माण झाली आहेत, अनेक देश आहेत, त्यात आपण एक मनुष्य आहो. तेव्हा या जगत्समुदायात आपल्यास अनेक प्रकारचे संबंध प्राप्त झाले आहेत. त्यांचा त्याग करणे ठीक नाही व हा केवळ भित्रेपणाच होय, ज्यास संसार चालवावयास धैर्य नाही, तो पुढे काय करणार? संसार म्हणजे यत्किंचित गोष्ट आहे व या आयुष्यात थोड्याचा विचार ज्यास होत नाही, त्यांस अगम्य ईश्वराचा विचार कसा समजेल? ज्या देशात ईश्वराने आपणास घातले आहे, त्या देशात आपली योग्यता व बुद्धी येणेकरून आपण काय करावे, याचा विचार करावा आणि योग्य असेल, ते करावे.

वैराग्यापेक्षा संसार सुयुक्त रीतीने चालविला असता बरा. कारण जर ईश्वराचे मनात आपल्यास रानटी व अविचारी करण्याचे असते, तर त्याने वाघाच्या किंवा दुसऱ्या काही रानवट जनावराच्या जन्मास घालून डोंगरात राहणारे केले असते.

परंतु जापेक्षा मनुष्याचे जन्मास घातले आहे, त्यापेक्षा असे दिसते की, आपण विवाह करावा, स्त्री करावी व स्त्री असली तर तिने भ्रतार करावा. प्रजा होईल, तिचे संरक्षण करावे. अतिगरीब यांचे पोषण करावे. मनुष्यासारखे वागावे विचाराने चालावे. जे उत्तम आहे, ते करावे. इतर लोकांस उपकारांनी मैत्र करावे. जे आपले हातून यथाशक्ती होईल ते कल्याण करावे. लोकांचे व आपले कुटुंबाचे हित करावे. सदाचरणाने वागावे. अनीतीने वागू नये, नम्रता धरावी. राग, लोभ, मूर्खपणा करू नये. विनाकारण कोणाला उपद्रव करू नये. प्रपंचसंबंधी नानाप्रकाराची दुःखे व सुखे आली तर तेणेकरून प्रमाद किंवा ग्लानी होऊ नये. अशा रीतीने वागून यथाशास्त्रसुख अनुभवावे. अशा मनुष्यास आम्हास वाटते की, वैराग्यापेक्षा अधिक श्रेय आहे.

वैराग्य हे मूर्खपणा आणि ईश्वराने जे दिले व ज्याकरिता मनुष्य-देह केला, त्यांस टाकून जनावराप्रमाणे रानात फिरणे आहे; कारण जे कर्म आपणास सांगितले आहे, ते न केले तर आपले जन्माचे सार्थक होत नाही. जन्माचे सार्थक म्हणजे ज्याकरिता जन्म घेतला, त्याचे सर्व अर्थ म्हणजे हेतू परिपूर्ण करणे. आता प्रथम प्रथम हेतू हाच की; ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये या सर्वांचे यथास्थित व्यापार करणे व शास्त्रयुक्त चालणे व आश्रमाप्रमाणे व वर्णाप्रमाणे वागणूक करणे. थंडी लागू नये म्हणून ईश्वराने कापूस निर्माण केला आहे. आणि आम्ही जर आपले शेतात पिकवून, त्याचे वस्त्र करून, त्यांस अनुभवविले तर आम्ही काही पातक केले, असे होईल काय? इतके खरे आहे की, चोरी करून दुसऱ्याचा कापूस आणू नये व लोभाने कोणाचे वस्त्रहरण करू नये; कारण जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा आहे. जशी तुम्हास तुमचे मालाची चोरी आवडत नाही, तशी दुसऱ्यास आवडत नाही. दुसऱ्यास काय आवडत नाही, ते करू नये. जमिनीची चाकरी करून जे मिळेल, ते खाण्यास आपल्यास सर्वोपरी अधिकार आहे. आणि त्यात दोषही नाही. यात जे दोष मानतात, ते आपल्या विचाराचा उपयोग करीत नाहीत; म्हणून त्यांस मूर्खपणाने 'जर तुम्हास मी पाहिजे असेन, तर तुम्ही सर्व सोडा' अशी ईश्वराची आज्ञा आहे, असे वाटते.

ज्या नवऱ्याने आपले स्त्रीस दागिने दिले आहेत, तो नवरा तिला असे म्हणणार की नाही, 'जर तुला माझी आवड असेल, तर आपले हातातील बांगड्या देखील फोडून टाक.' शहाणा नवरा असे म्हणेल काय? नाही. तिला जे दागिने आपण दिले, ते घालताना पाहून तो फार संतोष पावेल. कारण दागिने देण्याचे कारण तेच होते. तद्वत् मनुष्यास आपले कर्माचे व नीतीचे

ठाई निष्ठा पाहून ईश्वर आनंद पावेल, यात संशय नाही. त्याने जी पदवी आपल्यास दिली आहे, तिचा त्याग करण्याचा हेतू काय? ईश्वर असा क्रूरपणा आपण निर्माण केलेल्या प्राण्याजवळ करणार नाही. कारण असे जर असते, तर मनुष्यास इतकी जास्ती अक्कल त्याने कशास दिली असती? सर्व सारखेच केले असते. परंतु त्याचा हेतू हाच की, त्या अकलेचा उपयोग कसा करतो आणि जी जी कर्मे मी त्याच्या वृत्तीवरून व बुद्धीवरून त्यांस सुचविली आहेत, ती ती तो यथास्थित करतो की नाही! हेच ईश्वर पहात असेल, असे अनुमान सिद्ध आहे.

वैराग्यास काही आधार नाही. आणि तेणेकरून ईश्वरप्राप्तीही नाही, किंबहुना ईश्वरक्षोभ मात्र होईल, असे दिसते. याप्रमाणे बुद्धीकरून परलोकासंबंधी जो विचार झाला आहे, तो लिहिला आहे.

## नाना पंथ

■

**पत्र नंबर २७ : २७ आगस्ट १८४८**

सांप्रत हिंदुस्थानात अनेक मतांचे व जातीचे लोक आहेत. त्यांतील काहींचा इतिहास लिहितो.

हिंदू लोकांस तर आपले देशातील वर्तमानाची खबर नाही, परंतु बाहेरील पुष्कळ लोक येथे येऊन राहिले आहेत. प्राचीन काळी हिंदू लोक आता आहेत, तसे नव्हते. ते परदेशांत जात-येत होते. अलीकडे मात्र त्यांचे असे झाले की, जसा एखादा धाव घेता घेता थकून पुराण प्रसिद्ध मुचकुंदाप्रमाणे निद्रा करितो, तसे या लोकांचे झाले आहे. बहुत काळपर्यंत सर्व देशाहून हिंदुस्थान प्रमुख आणि पराक्रमी, असा मान पावून हल्ली निद्रिस्त झाले. आता या दीर्घ निद्रेतून ते दुसरे कोणतेही उपायेकरून जागृत झाले नाही. तरी दरिद्राजनें करून तरी जागृत होतील. यात संशय नाही.

(१) एक हजार वर्षांच्या पूर्वी क्रिस्तियन धर्म युरोपखंडात वृद्धिंगत झाला. व बहुत लोक तो धर्म अंगीकारून देशोदेशी गेले. तेव्हा किती एक किरिस्ताव हिंदुस्थानातही मलबारदेशी आले व त्यांनी आपले धर्मात किती एक लोक आणले. ते अद्यापि मलबारात आहे. त्यांचे नाव सेंट वेमी किरिस्ताव.

त्यांची चाल व वर्तणूक बहुत करून हिंदूंप्रमाणेच आहे. म्हणजे त्यामध्ये ब्राह्मण, शूद्र अशा जाती आहेत व परस्पर लग्ने होत नाहीत. धर्म मात्र हिंदूंचा नाही. पुढे पोतुगीज लोक इकडे येऊन त्यांनी गोव्यात ठाणे बसविले. त्यानंतर त्यांनी गरीबगुरीब लोकांस जबरीने व द्रव्याने आपले धर्मात आणिले, व ते बहुतकरून युरोपियन लोकांप्रमाणे वागतात. असे किरिस्तावांचे दोन इतिहास आहेत.

(२) अरबस्तानात महमदी धर्म चालू होऊन मुसलमान झाले, तेव्हा किती एक बादशहाही मुसलमान झाले आणि आपले रयतेस मुसलमान होण्याकरिता इजा देऊ लागले. त्याकाळी इराण देशात जरदस्ताचा अग्निपूजेचा धर्म चालत होता. तेथील बादशहा मुसलमान होऊन रयतेस उपद्रव करू लागला. तेव्हा तेथील जे धर्मतत्पर लोक होते, ते जहाजात बसून हिंदुस्थानात सुरतेस आले; तेथील राजा हा समुदाय पाहून भयभीत झाला व पुढे त्याने त्याजपासून तरवार धरणार नाही, म्हणून करार लिहून घेऊन आपले प्रांतात राहू दिले. त्यांस सरासरी आठ-नऊशे वर्षे झाली. ते पारशी लोक हल्ली आपली पहिली भाषा सोडून गुजराथी भाषा बोलून इकडील लोकांप्रमाणे राहतात. व त्यांनी किती एक इकडील चालीही धरल्या आहेत. त्यांचे धर्मपुस्तक जेंद अवेस्ता हे मात्र मूळचे भाषेत आहे.

(३) जेव्हा मुसलमानी धर्म चालू झाला, तेव्हा त्या धर्मातील पुष्कळ लोक इकडे येऊन धर्म शिकवू लागले, त्यात एक मौलवी अरबस्तानातून गुजराथेत आला व आपली जाती व धर्म छपवून एका स्वामीजवळ शिष्यात राहिला. व तेथे त्याने हिंदू धर्माचा अभ्यास केला. आणि मग त्या स्वामीस बोध करण्यास आरंभ केला. व आपला धर्म प्रतिपादन केला. तेव्हा स्वामीने तो धर्म खरा समजून आपले शिष्यासहित स्वीकारला ते लोक बोहारी झाले. या गोष्टीस पाचशे वर्षे झाली. गुजराथी भाषेत बोहारी या शब्दाचा अर्थ व्यापारी असा आहे. हे मूळचे गुजराथेतील हिंदूच होते. पुढे बाटून मुसलमान झाले.

(४) हिंदुस्थानात पूर्वी एकही मुसलमान नव्हता. परंतु मुसलमानांनी स्वारी करून हा मुलूख काबीज केल्यावर ते लोक हा देश चांगला पाहून इकडून गेले नाहीत. येथेच आपल्या सैन्यासहित राहिले. ते लोक हल्ली सर्व हिंदुस्थानात इकडील लोकांत मिसळले आहेत. रोहिले व पठाण हैद्राबादेस राहिले व लखनौ आणि दिल्ली या ठिकाणी मोगल राहिले.

(५) कोळी, गोंडवनातील गोंड व भिल्ल हे लोक बाहेरील देशातून इकडे आले नाहीत. हे या देशाचे मूळचे मिराशी आहेत, असे दिसते; कारण संस्कृत भाषेचा यांचे भाषेत लेशही नाही. व हिंदू धर्माची गोष्ट त्यांस काही

मान्य नाही. त्या लोकांस सांप्रत जे आपणांस हिंदू लोक म्हणवितात त्यांनी जिंकले आहे. पूर्वी हिंदू लोक हे पंजाबकडून आले व त्यांनी उत्तरेस अंमल बसविला, आणि देशाचे नाव पुण्यभूमी असे ठेविले. महाराष्ट्र व कर्नाटक हे देश हिंदुस्थानचे राजाकडे बहुत काळ नव्हते. तेथील लोकांस ते घडशी, राक्षस व रावणाचे सेवक असे म्हणत होते. पुढे हिंदू लोकांनी जिंकीत जिंकीत सर्व देश जिंकला. तेव्हा ते मूळचे लोक डोंगरात व रानात जाऊन राहिले. ते अद्यापि तेथेच राहतात. असे या लोकांचे मूळ आहे.

आता किती एक स्वदेशीय लोक असून, ते नाना प्रकारचे पंथांस लागले आहेत. त्याविषयी थोडासा इतिहास लिहितो. तेणेकरून हिंदू धर्म प्रमुख असता, त्यापासून दुसरे पंथ कसकसे निघाले आहेत, त्यांची गोष्ट समजेल.

(१) हिंदू लोकांचे येण्यापूर्वी हिंदुस्थानात कोणता धर्म असेल तो असो. हल्ली जे या देशात राहणारे लोक, यांचा मुख्य धर्म वेदशास्त्राचे आधारे करून आहे व त्यासी विपरीत एक बुद्ध धर्म म्हणून आहे. गयेस एक पंडित झाला. त्याने हा धर्म स्थापिला आहे. तो पंडितच बौद्ध अवतार. त्याचे ठिकाण अद्यापि गयेस आहे. त्याचा धर्म वेदांशी विरुद्ध आहे, यास्तव ब्राह्मणांनी महाप्रयत्न करून तो बुडविला. तत्रापि बंगाल्याचे पलीकडे व ब्रह्मदेशांत तो अद्यापि चालत आहे. लंकेतही तोच धर्म चालतो, पण त्यात काही काही फरक आहेत. तथापि मूळ एकच.

(२) त्यानंतर दुसरा जैन पंथ. हा धर्म देशांत आहे, व याचे धर्माधिकारी स्वामी जागोजाग आहेत. हे मत काही वर्षांपूर्वी फार चालले होते. परंतु कुमारिल भटाने बहुतकरून ते मोडिले व त्या मताचे लोकांनी ग्रंथ केले होते, तेही बुडविले. एक अमरकोश मात्र ठेविला आहे. जैनांचे मत असे आहे की, ही सृष्टी अविनाशी आहे. यज्ञ व श्राद्धादि करणे जरूर नाही. अद्यापि त्यांचे मत जागोजाग चालत आहे.

(३) नानक व गुरू गोविंद हे पंजाबचे मुलखात झाले. त्यांनी आपण स्वतः ग्रंथ लिहून एक नवीन धर्म चालू केला. त्यात जैनमताचे लोक, मुसलमान व हिंदू या जातीचे लोक आहेत. त्यांचे नाव शीख म्हणजे शिष्यार्थी शब्द आहे. नानक याचे जन्मास दोनशेपन्नास वर्षे झाली. तो पहिल्याने हिंदू होता. नंतर मुसलमान होऊन मक्केस गेला व संन्यासी बहिरागी यांचे मेळ्यात फिरला. नंतर त्याने आपणांस ईश्वराची अशी आज्ञा झाल्याचे प्रगट केले की, यवन व हिंदू हे मूर्खपणाने उगीच भांडतात. ईश्वर एकच आहे. त्यांस सर्वांनी भजावे व परस्पर कलह मोडून उत्तम धर्म लोकांस शिकवावा. याप्रमाणे त्याने ग्रंथ

लिहून लोकांस आपले धर्मांत आणले. या धर्माचे दोहीही धर्माशी विरुद्ध नाही. पुढे दिल्लीचे बादशहा औरंगजेब वगैरे झाले, त्यांनी त्या लोकांस उपद्रव दिला, याजमुळे त्या लोकांनी जमून आपले संरक्षणाकरिता मुलूख बळकाविला व अलीकडे रणजितसिंग वगैरे यांनी पुष्कळ मुलूख मिळविला आहे आणि स्वतंत्र राज्य केले आहे. असे शीख लोकांचे मूळ आहे. आता त्या धर्मात कोणीही जातो. त्यांस निषेध नाही.

(४) हिंदुस्थानात कबीर म्हणून एक कवि व साधू झाला होता. त्याचे पंथात वागणारे लोकही पुष्कळ आहेत. त्यांस कबीरपंथी म्हणतात. कबीराचे मतही असेच होते की मुसलमान व हिंदू हे आपसांत धर्माचे विरुद्ध भावाने व्यर्थ भांडतात. मुख्य धर्म हाच की, कोणाचे वाईट करू नये व परमेश्वराची भक्ती करावी. लोकांस उपद्रव करीतात ते धर्म बुडवितात.

(५) शंकराचार्य स्वामीपासून संन्याशी व गोसावी मत झाले. शंकराचार्य हे मुख्यत्वेकरून वेदान्तशास्त्राचे प्रतिपादक होते. यास्तव त्यांनी कलियुगात शास्त्राप्रमाणे संन्यास निषिद्ध असतानाही चालू केला व त्यांचे फार शिष्य होते, त्यांनी शूद्रासदेखील संन्यास देऊन गोसावी केले. संसार सोडला पाहिजे, हा त्यांचा मुख्य अभिप्राय आहे; परंतु हल्लीचे गोसावी वेदान्ताप्रमाणे किती चालतात, हे लोकांस ठाऊकच आहे.

(६) मध्व स्वामींनी कर्नाटकात वैष्णव मत स्थापिले. तसेच वल्लभाचार्य म्हणून एक गुजराथेत होता, त्याने वैष्णव मतच परंतु एक वेगळ्या तऱ्हेचे काढिले. सांप्रत वैष्णवांचा व शैवांचा बहुत विपर्यास आहे. कर्नाटक प्रांती असे वैष्णव आहेत की, ते शैवाचे पंक्तीसदेखील जेवीत नाहीत. परंतु शैव आपल्यास स्मार्त म्हणवितात आणि वैष्णवास पाखांडी म्हणतात. वैष्णव अद्वैत-वेदान्तास मानीत नाहीत.

(७) महाराष्ट्र देशात एक रामदासस्वामीचा पंथ आहे. परंतु त्याचे कोणाशी विरुद्ध नाही. तसेच तुकाराम, ज्ञानेश्वर हे साधू झाले. त्यांचे मत बहुतकरून शूद्र लोकांत चालू आहे व किती एक ब्राह्मणही त्यात आहेत; परंतु विद्वान ब्राह्मण बहुधा त्यात नसतात. याचेही मत साधूपणाचे आहे. यांचे शत्रुत्व कोणाशी नाही. हे मत हल्ली दोनशे वर्षांपासून चालू आहे. यांचे मुख्य मत असे आहे की, नीतीचे आचरण, सारासार विचार आणि कीर्तन करावे.

(८) बंगाल्यात एक चैतन्य म्हणून मनुष्य होता. त्याचे मत बहिरागी लोक धरितात. व चैतन्याचे मताचे लोक सांप्रत पुष्कळ आहेत, ते गोसावी यासारखेच आहेत.

(९) तंत्र-शास्त्राचे आधाराने चालणारे एक शाक्त मत आहे. यातील लोक फार दुष्ट आहेत. हे बंगाल्यात पुष्कळ आहेत व हल्ली महाराष्ट्र देशात यांचा पर्वकाळ पुष्कळ झाला आहे. यामल इत्यादि ग्रंथ आहेत. त्यात रुधिराध्याय म्हणून आहे. त्यात शक्तीस भक्ष कसकशाचा द्यावा, हे लिहिले आहे. ते जर कोणी वाचून पाहिले, तर तो आश्चर्य करील व त्याचा लिहिणारा खाटिकाहूनही निर्दय आणि लोकांस मूर्ख करणारा होता असे म्हणेल. वारुणीप्राशनाचा त्यांस किमपि निषेध नाही व अंगपूजा म्हणजे स्त्रीचे आराधन त्यात श्रेष्ठ धरिले आहे. याहून ईश्वरास क्रोधकारक दुसरे काय असावे? हे मत कोणी खरे मानणार नाही. मनुष्याचे बुद्धीस इतकी काळिमा येऊन ते ईश्वरास सोडून तंत्रांत लिहिल्या मार्गास लागले. आणि इतक्या निर्लज्जपणास व ईश्वरास क्षोभकारक अशा वर्तणुकीस लागले, हे पाहून दुःख वाटते. अस्तु.

असे हे पृथक् पृथक् धर्म आहेत व याशिवाय आणखीही किती एक आहेत. परंतु हिंदुस्थानात जगन्नाथास व गिरीस सर्व जातीचे लोक सर्व धर्मविचार सोडून खातात व पितात. गिरीस देवळात मात्र असे चालते आणि जगन्नाथात सर्व गावांत याप्रमाणे वर्णसंकर करीतात. जगन्नाथाचे मूळ असे आहे की, श्रीकृष्णांनी देह ठेविल्यानंतर तो देह जगन्नाथास आणिला. व मूर्ती करून त्यात त्या देहातील अस्थी भरल्या आणि त्या मूर्तीस देवळात ठेविले. कोणी म्हणतात की, प्राचीन हिंदू राजे यांनी ही मूर्ती बसविली आहे. असो. याचे मूळ काय असेल ते असो, परंतु जातीचा विचार त्या ठिकाणी नाही. हे जगप्रसिद्ध आहे.

## विधिनिषेधरूप धर्माचे मूळ

**पत्र नंबर २८ : ३ सप्टेंबर १८४८**

धर्मशास्त्राचे व नीतिशास्त्राचे मूळ काय आहे, याचा विचार करता दिसते की, प्रथमतः ईश्वराने पृथ्वी निर्माण केली व सर्व सृष्टीतील पदार्थ, सूर्य, चंद्र इत्यादी केले आणि नंतर मनुष्य उत्पन्न केला. तेव्हा प्रथम जो मनुष्य होता, तो सुखी असेल; कारण त्याचे कुटुंब एकटेच. सर्व सृष्टीचा धनी तोच. नद्या, जमीन, झाडे या सर्वांचा अधिकारी तो एकच. तेव्हा तो पाहिजे तेथे रहात असेल. जेथे पाहिजे तेथे बसत असेल. जेथे पाहिजे तेथे पेरीत असेल. त्या

काळी त्या॰ कोणी मुजाईम नव्हता. याजमुळे तो अर्थात सुखी असेल.

असे काही दिवस चालल्यानंतर त्याचे कुटुंब वाढले आणि एका घरात रहात होते, तेच लोक फार होऊन त्यांचा गाव झाला. तेव्हा एकाने जमीन लागवडीस आणली. ती चांगली पाहून त्याचे भावांस लोभ उत्पन्न झाला; कारण लोभ, क्रोध, मोह हे मनुष्याचे मनात आहेतच; परंतु त्यांस प्रसंग आल्याशिवाय ते दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. सांप्रत ही मनुष्ये किती एक चोर व किती एक लबाड असे गुप्त रूपाने आहेत. जे चोर आहेत ते श्रीमंत असले म्हणजे त्यांस चोरी करावयाचे अगत्य असत नाही, हे पुष्कळांचे पाहण्यात आहे. एका मनुष्याने स्त्री केली म्हणजे तिचा स्वभाव भिन्न असल्यामुळे तिचा भ्रतार वारंवार क्रोधाविष्ट होतो आणि तिचे व त्याचे पटत नाही. पुढे ती स्त्री मेली म्हणजे दुसरी करतो. आणि ती सहनशील व नम्र असली म्हणजे तिचा भ्रतार पहिल्याने भांडत होता, तोच सुखाने तिजजवळ रहातो. याचे कारण काय की, क्रोध येण्याचे कारण कमी होते. आणि असेच जर सर्व मनुष्यास जसे पाहिजे तसे प्राप्त होईल, तर कोणी कोणास उपद्रव करणार नाही.

परंतु ईश्वरी संकेत असा आहे की, जसजसे पदार्थ मनुष्यास पाहिजेत, तसतसे त्याने ते निर्माण केले पाहिजेत. ते जर फुकट मिळतील तर कोणी दुराचरण करणार नाही. परंतु या लोकी भ्रांती व अज्ञान फार आहे. तेणेकरून ईश्वराने मनुष्यास जे पदार्थ उद्योगाने शोधून काढण्यास सांगितले आहेत, त्यातून किती एक सांपडावयाचे आहेत, त्याचा अंत नाही. परंतु जर सर्व सापडतील तर सर्व लोक सुखी होतील; परंतु असा काळ कधी येईल हे तर्कानेही समजणे अशक्य आहे. यास्तव मनुष्यमात्राचा धर्म असा असावा की, हे पदार्थ शोधण्याचा उद्योग सर्वदा करावा. कवीने म्हटले आहे की,

> अनर्थमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम्।
> अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः।

असा सर्वज्ञ मनुष्य कोठे आहे की, योग्यायोग्य जाणून विचार करील आणि असा वैद्य कोठे आहे की, ज्यास सर्व वनस्पतींचा निर्णय कळेल, आणि असा शब्दाचा अर्थ जाणणारा कोठे आहे की, प्रत्येक शब्दाचा अर्थ कोणत्या भाषेत, कसा होतो हे समजेल? ही गोष्ट घडत नाही. तत्रापि मनुष्याने असा उद्योग करावा की, जितके समजेल तितके शिकत जावे. असे करता करता मरणानंतर तरी ईश्वर सर्व आपला खजिना त्यांस दाखवील व मग त्यांस अत्यंत सुख होईल. आणि सर्वज्ञ मनुष्य झाला, तर मग त्याचे हातून काही विपरीत

घडावयाचे नाही. आणि इतकाच भेद स्वर्गास व मृत्युलोकास आहे. येथे भ्रांती आहे म्हणून दुःख आणि तेथे भ्रांती नाही व ज्ञान आहे, म्हणून सुख. असो.

परंतु ईश्वर संकेताने झाले ते कोणाच्याने फिरवत नाही. याजकरिता ईश्वराने अक्कल दिली आहे. त्या अक्कलेच्या जोराने मनुष्याने एकमेकांचा बुद्धिबळे करुन ज्ञानाचा पाठलाग करावा. म्हणजे त्याचे पोटी सुख आहे, ही गोष्ट सिद्ध आहे. परंतु पूर्वी सांगितले की, मनुष्यास प्रसंग आल्याखेरीज त्याचे गुण दृष्टीस पडत नाहीत आणि प्रसंग दैववशात् कोणास मिळतात व कोणास मिळत नाहीत. तेव्हा जगाचे आरंभी जेव्हा लोकांची वृद्धी होत चालली होती, तेव्हा हे प्रसंग वाढत चालले. एकाची संपत्ति पाहून दुसऱ्यास लोभ झाला व त्याने ती दिली नाही; म्हणजे त्यांस राग यावा. एकाने एक जमिनीचा तुकडा घेतला व तो नीट केला. त्याजवर दुसरा उगाच दावा करू लागला, म्हणजे त्या उभयतांचे भांडण व्हावे. तसेच एक सुंदर स्त्री झाली, तिचे एकाने परिग्रहण केले व तिच्यावर दुसऱ्याने नजर ठेवली. तेव्हा एक म्हणू लागला की, ही माझी स्त्री. हिचे मी परिपालन केले आणि आता हिला हा कोण नेणार ? तेव्हा अर्थातच कज्जा झाला. अशाच स्थितीत काही काळपर्यंत लोक समाईक होते.

पाहिजे ती जमीन घ्यावी. पाहिजे त्याने स्त्री घ्यावी. धर्म मुळी काही नसेल आणि असण्याची त्या काळी गरज नव्हती. कारण जोपर्यंत दुसऱ्यास दुःख होत नाही, तोपर्यंत पाप नाही. आणि स्वर्गास इच्छित पदार्थ प्राप्त आहेत. तेथे कोणी माझी अप्सरा म्हणत नाही, पाहिजे तेथे राहतात व पाहिजे त्याचा स्वइच्छ उपभोग करतात; परंतु अज्ञान आणि भ्रांती मृत्युलोकांत फार. येथे चालेना व लोकांत कलह फार उत्पन्न होऊ लागले.

तेव्हा जे लोक होते, त्यांतील जो प्रमुख बळवान होता, त्याने नेम करून दिले की, जी जमीन ज्याने घेतली, तीच त्याने वहिवाटावी; दुसऱ्याची घेऊ नये. तसेच जाणे जी स्त्री वरिली ती त्याची झाली. तिजवर कोणी दावा करील, तर त्यांस शासन होईल. तसे स्त्री जाणे वरिली, त्याने परस्त्रीचा लोभ करू नये. कारण तेणेकरून त्याचे स्वस्त्रीस दुःख होते. आणि असे ठरले की, ज्याने स्त्री केली. त्याने तिचे पालन करावे. आणि तिला पुत्र होतील ते त्याचे वारीस समजावे. असे परस्परांचे दुःख टाळण्याकरिता अनेक नियम केले.

तेव्हा लोकांत पद्धत पडली आणि जो बळकट होता, तोच त्यांचा राजा झाला. त्याचे आज्ञेत इतर लोक राहू लागले; परंतु पहिल्याने लोक भाषा बोलू लागले, ह्या वेळेसच ते अक्षरे लिहू लागले नसतील; कारण भाषेच्या मागील हे प्रकरण आहे. पहिल्याने लोक एकमेकांस निरोप सांगून पाठवीत

असतील व जेव्हा लोक दूर दूर गेले आणि दोन कोश वस्ती होती, ती पन्नास कोश झाली, तेव्हा सांगून पाठविणे अवघड पडू लागले. तेव्हा मग लोकांनी लेखनविद्या काढली असेल; परंतु लेखनविद्या निघण्यापूर्वी बहुत काळ गेला असेल, आणि लेखनाचे पूर्वी हे शास्त्र व राजाने सांगितलेले नियम साधारण भाषेत व कविता-प्रबंधात स्मरण राहण्याकरिता पाठ करून ठेवीत असतील आणि जागोजाग नाना प्रकारचे नियम चालत असतील.

असे होताना काही दिवस गुदरल्यावर मागील नियम रद्द करून दुसरे राजे झाले. त्यांनी दुसरे त्यांस जे नीट दिसले ते नियम केले असतील. असे होता होता बहुत नियम झाल्यानंतर जाति झाल्या असतील. पहिला धंदा शेतकीखेरीज दुसरा नसेल. कारण पिकविणे व खाणे हे मनुष्यास मुख्य कर्म जगण्याकरिता जरूर पाहिजे. हे जर लोक न करतील, तर जीव जगणार नाहीत व पिकवावयाचा उद्योग हाच ईश्वराने लोकांस लावून दिला असेल; कारण त्याएवढा धंदा दुसरा कोणताही नाही. परंतु पुढे असे झाले की, दोनशे चारशे लोक शेत करणार झाले. तेव्हा चारशे नांगर तयार करणे, हे एका मनुष्याचे काम झाले. तेव्हा सुतारकाम ज्याचे त्याने घरोघर करावे, त्यात सुख नाही, याजकरिता एकाने ते पत्करिले. मग तो लोकांपासून चरितार्थास दाणे घेऊन नांगर पुरवावे. असे काम करू लागला, तेव्हा तो सुतार झाला.

पुढे इतकी पुष्कळ लाकडे रानातून तोडून आणावयास व नांगर करावयास त्यांस फावेना, म्हणून दुसरा एक मनुष्य लक्कडवाला झाला. तसेच इतके लोक घरे बांधून राहू लागले, तेव्हा गवंडी झाला व नेम व शास्त्रार्थ पुष्कळ झाले. तेव्हा ते पढून इतर लोकांस सांगावयास जरूर पडली, तेव्हा ब्राह्मण झाले. त्यांनी सर्व नेम व धर्म शिकून लोकांचे दाण्यावर उपजीविका करावी, असे ठरले. कोणी कज्जा करील तर त्याने ब्राह्मणास पुसावे व त्याने शास्त्रार्थ सांगावा असे झाले. असे होता होता लोक देशोदेशी राहिले. तेव्हा एका देशात लोक चांगले सुखी आहेत, असे पाहून दुसरे देशातले लोक गरीब होते ते इकडे येऊन त्यांस लुटावयास त्यांनी आरंभ केला. तेव्हा या देशातील लोक किती एक क्षत्रिय झाले. म्हणजे त्यांनी दुसरे उद्योग सोडून शिपाईगिरी पत्करली आणि कबूल केले की; सर्व लोकांचे आम्ही परराष्ट्रापासून पालन करू. कोणास उपद्रव लागू देणार नाही. आम्हास घरी खावयास द्यावे. ते लोकांनी कबूल केले. पुढे जो शेतकरी त्याने दाणे घेऊन बाजारात जावे ही गैरसोय पडू लागली. तेव्हा एकाने व्यापार आरंभिला. म्हणजे तो दाणे घेऊन इतरांस देऊ लागला. अशाच व्यापारावर आपले पोट भरू लागला.

असे एकमेकांचे सोईकरिता ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण प्राचीन काळी उत्पन्न झाले; तेव्हा प्रत्येक लबाडी करू लागले. म्हणून प्रत्येक वर्णाने कसे वागावे, याचा निर्बंध होण्याकरिता कोणी शास्त्र लिहिले, त्याजवरून त्याचा बंदोबस्त करू लागले; परंतु शास्त्रासही लोक मानीनात. तेव्हा राजास नेमणे जरूर झाले. आणि राजाच्यानेही कारभार नीट चालेना, म्हणून राजाने कसे चालावे इत्यादीसंबंधी राजनीती झाली व क्रमाक्रमाने राजाचे अमलदार, मंत्री, प्रधान आणि सैन्य हे त्याचे ताब्यात लोकांचे सुखाकरिता आले.

पुढे दाणे घरोघर पोचवावयाचे अडचण पडू लागली, म्हणून सुवर्ण व रुपे या धातू बहुतमेहनतीने तयार होतात, त्याचे तुकडे करून ते द्रव्य चालू लागले. येणेकरून अशी सोय झाली की, ज्या ठिकाणी आपल्यास काही खरेदी करावयाचे असेल, तेथे ते तुकडे घेऊन गेले म्हणजे त्याचे बदला जो पाहिजे तो जिन्नस मिळावा. घरोघर गाड्यांवर घालून दाणे नेणे जरूर नाही. पुढे हे सोन्याचे तुकडे लोक खोटे करून आणू लागले. तेव्हा राजाने वरती शिक्का करावा असे ठरले; तेव्हा रुपये व मोहरा चालू झाल्या. याप्रमाणे धर्मशास्त्रे व नीतिशास्त्राचे मूळ आहे.

ईश्वराने विचार दिला आहे, तेणेकरून जे वाईट दिसले, ते सर्वसंमतीने काढून टाकले व जे चांगले होते, ते ग्रहण केले. शास्त्र लोकांचे सुखाकरिता केले आहे. शास्त्राचा मुख्य हेतू हाच आहे की, लोकांमध्ये व्यवस्था व्हावी, ज्याचे त्यांस मिळावे. कोणाची जबरी कोणावर होऊ नये. मालकी कायम रहावी. प्रजेने नीट वागावे. राजाने प्रजेचे सुखावर नजर देऊन वसूल घ्यावा; जास्ती घेऊ नये. व खर्च बेताने करावा. कारण लोकांचे मेहनतीचा पैसा घेऊन राजाने आपले सुखाकरिता व हिंताकरिता व डामडौलाकरिता निरर्थक शिपाई व अंमलदार बाळगणे यांजकडे खर्च करणे उचित नाही; व अयोग्य मनुष्यास कामावर न ठेवणे हाही राजाचा मुख्य धर्म होय, तर धर्म म्हणजे नियम लोकांकरिता केले आहेत ते व जी आपली योग्यता त्या योग्यतेप्रमाणे व्यापार करणे म्हणजे ब्राह्मण असल्यास विद्या व शूद्र असल्यास कृषिकर्म करणे हाच धर्म आहे. याप्रमाणे बरोबर चालून प्रतारणा न करणे व कोणास दुःख न देणे हा मुख्यार्थ आहे. आणि धर्माचे मूळ व शास्त्राचे मूळ विचाराने हेच कळते.

## बुद्धीने ईश्वर किती कळतो त्याविषयी

■

**पत्र नंबर २९ : १० सप्टेंबर १८४८**

ईश्वराने मनुष्यास ज्ञान दिले आहे. तेणेकरून मनुष्याची व जनावराची स्थिती वेगळी दिसते. कारण, जनावरे व मनुष्ये एकदम उत्पन्न झाली असता जनावरे आहेत तशी आहेत. कोणी जनावर असे नाही की ते पहिल्याने रानात रहात होते व आता त्याने गाव वसविला आहे किंवा कापड विकू लागले आहे. परंतु मनुष्य मात्र दररोज अधिक शहाणे होत आहे. आणि मनुष्याचा मोठेपणा सर्व अकलेवर आहे. जर विचार नसता तर पहिल्याने जो मनुष्य झाला, त्याचप्रमाणे अजूनपर्यंत लोक असते. परंतु तसे नाही.

पूर्वी पाण्याने काळ मोजीत होते. आता घड्याळे झाली. प्राचीन काळी निरोप पाठवीत होते, आता लिहू लागले. नाना प्रकारची शास्त्रे लिहिली, पत्र पाठविण्यास पहिली मुजरद माणसे पाठवीत होते. आता डाक बसली. आणि डाकेचाही उशीर समजून वाफेची गाडी ही सुलभ रीती काढली. अशी मनुष्य दिवसेंदिवस आपले सुखाची वृद्धी करीत आहेत. हा स्वभाव मनुष्याचा आहे. इतर जनावरांचा नाही. याचे कारण त्यांस वाचा नाही, हेच बहुतकरून असावे. किंवा त्याचे मन मनुष्याहून वेगळे रीतीचे असेल. मनुष्य बरेवाईट याचा विचार करणारे जनावर आहे, इतकेच या जनावराचे लक्षण अधिक आहे. बाकी धर्म इतर जनावरांहून यामधे अधिक नाहीत. मरण, जन्म, भक्षण सर्व इतर जीवजंतूप्रमाणे आहे, तेव्हा मनुष्याचे ठाई अक्कल एवढी मात्र अधिक दिसते. हे देणे ईश्वराचे आहे. येणेकरूनच हे जनावर आपल्या उत्पन्नकर्त्यास जाणते आणि सृष्टीकडे पाहून विचार केला तर ईश्वर आहे हे जाणण्यास अवघड नाही.

कारण मनुष्याचे ज्ञानास साधने दोन आहेत. एक इंद्रिय णि दुसरे मन. इंद्रियाचे धर्म शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श याही करून जड किंवा अजड यांचे ज्ञान होते. जड म्हणजे पृथ्वी इत्यादिक. ज्ञान नेत्रांनी होते. परंतु वायू हा दृष्टीस पडत नाही. कारण तो फार पातळ आहे. यास्तव त्याचे ज्ञान स्पर्शेकरून समजते, तसेच उजेडाचे ज्ञान पाहून होते. कारण त्यांस धरावयास शरीर नाही; परंतु रूप आहे. तसेच एक विण्याची तार वाजविली, तिचा जोराने वायूचा भंग होतो आणि नाद उत्पन्न होतो. तो नेत्रास व शरीरास समजत नाही. कारण रूप नाही व जडत्व नाही. तेव्हा त्याचे ज्ञान कर्णेकरून होते. अशी पांच ज्ञानेंद्रिये आहेत. मला वाटते की, ही पांच इंद्रिये आपणास आहेत, म्हणून

पाच विषयांचे ज्ञान होते. परंतु आणखी कित्येक इंद्रिये जर असती तर दुसरे कित्येक विषयांचे ज्ञान झाले असते, कारण जितकी इंद्रिये तितकेच ज्ञान.

जो बहिरा किंवा आंधळा आहे, त्याला चार विषयांचे ज्ञान मात्र होते; रूपाचे किंवा नादाचे ज्ञान होत नाही. कदाचित एक सहावे इंद्रिय मस्तकास किंवा आणखी कोठे असते तर कोणत्या पदार्थाचे किती वजन आहे हे किंवा दुसरे काही पाहिल्याने व त्याचे चलनाने कळले असते. असे कित्येक चमत्कार या सृष्टीत आच्छादित असतील; परंतु पंचेद्रिय मनुष्यास ते ठाऊक नाहीत. असो. तेव्हा हे पांच विषय पांच इंदियेंकरून कळतात, हे उघड दिसते.

या पांच इंद्रियांचा राजा मन आहे. त्याचा विषय काय, याचा विचार केला असता असे दिसते की, अनुमान करणे हे त्याचा विषय आहे. जसे आपण व्याघ्राची वाणी ऐकली म्हणजे कानांनी शब्दांचा मात्र ग्रह झाला. परंतु हा शब्द कोणाचा याची कल्पना मन करते आणि मागील गोष्टी ज्या पाहिलेल्या आहेत, त्या एकत्र करून तर्क करते की, हा व्याघ्राचा शब्द आहे, हा तर्क चालविणे मनाचा व्यापार आहे. परंतु हा मनाचा तर्क चालण्यास काही तरी दरम्यान पदार्थ पाहिजे, तेणेवरून तर्क चालतो. जर मध्ये काही पदार्थ नसेल तर मनाचा व्यापार बंद होतो. कारण मन जरी विशाळ व अती शीघ्रगती आहे, तत्रापि ते देहामध्ये कैदेत आहे. मनुष्याने देह टाकल्यावर त्याचे मनास जसा व्यासंग असेल आणि कर्माचा अभ्यास असेल तशी गती होईल. पिशाच्च इत्यादिक होतात, हे तरी पापकर्मे करून आपले मनास दूषित करीतात.

देह हा मनास आणि जिवास तुरुंग आहे. स्थूलाचे कारणाने त्याच्या शक्ती आखडत्या आहेत. मनावाचून इंद्रियांचे विषय ग्रहण होत नाहीत व इंद्रियावाचून मनाचे विषय ग्रहण होत नाहीत. जेव्हा इंद्रिये पदार्थ पाहतात तेव्हा पुढे मनाचा तर्क चालतो. ईश्वर आहे किंवा नाही, याचा सिद्धान्त करण्यास मन उपयोगी पडते. या अद्‌भुत जगाकडे पाहिले म्हणजे तर्क चालू लागतो. परंतु तर्क इंद्रियांचे पाठीमागून चालतो. इंद्रिये जेथपर्यंत जातात त्याचे पलीकडे मनाची उडी पडते. जेव्हा मनुष्य सृष्टी पाहतो तेव्हा त्याचे दृष्टीस एक शेत पडले, अशी कल्पना केली, तर रंगरूप इंद्रियांनी व्यक्त झाली. आणि मनाने इतके सुचविले की, इतका क्रम कर्त्याविना झाला नाही. तेव्हा शोध केला तो एक मनुष्य सांपडला. त्यांस पुसले की, हे शेत कसे झाले ? त्याने सांगितले, बी पेरले होते, त्याजमुळे झाले. तेव्हा आम्ही बी पेरून पाहिले, तो बी पेरले असता उगवते, हा नेम सृष्टीचा आहे. हे संयोगाचे फळ आहे, असे कळले.

पण एक कल्पना राहिली की, मृत्तिका आणि बीज या जड पदार्थांचा

योग झाला असता उगवण्याचे कारण काय? यास उगवितो कोण? जर त्यांस कर्ता नाही तर बी, पाणी आणि मृत्तिका एकत्र राहावी, त्यांस अंकुर फुटू नये, असे आहे. हे तिन्ही पदार्थ स्वस्थ का राहू नयेत? जर त्यांस काही चौथे कारण नाही, तर त्यांनी स्वस्थ असावे. जर सृष्टीस कर्ता कोणी नसता, तर हे पदार्थ न उगवते. जसे एक घड्याळ आहे; त्याचे आतील सर्व भाग वेगळाले काढून एका भांड्यात ठेविले, तर त्याच संयोग करणारा असल्याखेरीज त्याचे घड्याळ व्हावयाचे नाही, असे हे जगाचे महान घड्याळ कर्त्यावाचून मृत शरीरासारखे नासले, कुजले असते. परंतु तसे नाही. त्याचा क्रम आणि जीवजंतूच्या आयुष्याच्या मर्यादा इत्यादी कार्यास सुचवितात आणि प्रत्येक पदार्थ पाहिला म्हणजे ईश्वराची मूर्ती दिसते आणि त्याची युक्ती आणि पराक्रम विदित होतात. आणि हे व्यक्त पदार्थ पाहून त्यांचे कारण तोच ईश्वर आहे, असे दिसते.

परंतु ईश्वर हा निष्कारण आहे; कारण तो अव्यक्त आहे. जर व्यक्त होऊन त्याचे स्वरूप कळले, तर त्याविषयी आम्ही कल्पना करू; परंतु ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाही; ज्ञाने करून मात्र गम्य आहे. तेव्हा त्याचे कारणाचा तर्क होत नाही. कारण पदार्थ व्यक्त असल्यावाचून तर्क व बुद्धी चालत नाही. जसा एक चितारी आहे, त्याने कलम हातात घेतले आणि तो चित्र काढू लागणार; तेव्हा त्याचे मनात आले की, मी आता चित्र काढीन; परंतु ते कसे येईल आणि त्यानंतर त्याजहून आणखी चांगले येईल की नाही? ही जर कोणी कल्पना करू लागला तर चालणार नाही. कारण एक चित्रापर्यंत तर्क त्या कलमावरून आणि चितारी याजवरून चालेल की, हा संयोग झाला आहे; म्हणजे येथे रंग आहे, शाई आहे. त्यापेक्षा चित्र काढणार, हे तर्कास आले व रंग चांगले व कलमे चांगली, यांजवरून उत्तम चित्र काढावयाचा हेतू आहे असे समजलो; परंतु जर कोणी म्हणेल की पहिल्याने चित्र काढील त्याच्याहून दुसरे चांगले येईल की नाही? तर कोणाचा तर्क चालेल काय? जेव्हा पहिले चित्र पाहिले, तेव्हा त्या व्यक्त पदार्थावरून दुसऱ्याचा तर्क होईल. परंतु अव्यक्त पदार्थाविषयी तर्क करण्यास मनास शक्ती नाही. यास्तव ईश्वराचे कारण नाही, असे झाले.

मनुष्यास तो अनादि आहे. आता त्याची शक्ती पाहिली, तर हा सर्व जगाचा कारखाना त्याचा आहे, तेव्हा सूर्य, चंद्र, पृथ्वी, पाणी, विस्तव इतक्याचा कर्ता तो आणि जागोजाग त्याची युक्ती पाहता मनुष्याच्या मनाला शक्ती आहे का त्याबाहेर ईश्वराची शक्ती आहे? कारण मनुष्याच्याने मोजवणार नाही.

जेव्हा ईश्वर आहे, हे कळले व तो पराक्रमी आहे इतके ज्ञान अल्पमती मनुष्यास झाले, त्याजवरून त्याचे पूजन आणि भजन इत्यादी निघाले. धर्ममार्ग निघाला. त्याचे भय उत्पन्न झाले. परंतु ईश्वर आहे. आणि तो महान पराक्रमी आहे. त्याचे शक्तीस दुसरे काही तुल्य नाही, असे मात्र कळते, यापलीकडे काही कळत नाही. जे कोणी भयाकरिता व लोकांस नीतीने वागण्याकरिता सांगतात की एकवीस नरक आहेत. ते सर्व भयाकरिता आहेत. तथापि खोटे म्हणवत नाही. जे जे ईश्वरास म्हणावे ते त्यांस योग्य दिसते. कोणी म्हणेल की, ईश्वर असे करितो, तर ते खरे म्हटले पाहिजे. कारण की, तो अत्यंत पराक्रमी व अनादी आहे. तेव्हा त्याचे माहात्म्य तसेच आहे. परंतु जे विचारास येत नाही. ते मात्र मत मान्य करू नये. नाही तर ईश्वरास सर्व शोभते. मग कोणाची जिव्हा व कोणाची बुद्धी ही कशीही वदो, परंतु चांगले मात्र असावे.

आणि ईश्वराचे अगम्य बुद्धीपासून सर्व धर्म उत्पन्न झाले; याहून जास्ती ईश्वराचे काही एक कळत नाही. वेदांत व शास्त्रांत दोन शब्दांनी ईश्वराचे वर्णन केले आहे. 'तत् सत्' या शब्देकरून सृष्टीहून वेगळा असे दर्शविले. म्हणून दूरदर्शित सर्वनाम घातले आणि दुसरा शब्द 'सत्' आहे. म्हणजे आस्तिक्य वाक्य भाव. हे वर्णन बरोबर, खरे आणि विचारयुक्त आहे. यावरून हजारो पुराणिक, कोणी म्हणतो नारायण क्षीरसागरात होता, कोणी म्हणतो वैकुंठात होता, अशी नाना प्रकारची वर्णने आहेत ती खरी आहेत आणि खोटी आहेत कारण ईश्वर सर्वत्रच आहे. परंतु या सर्वांहून त्या दोन शब्दांनी जसे ईश्वराचे सत्य स्वरूप वर्णन झाले, तसे कोठेही नाही. बाकीची वर्णने ज्याची मने अडाणी आहेत त्यांस उपयोगी. परंतु वास्तविक ते आहे, म्हणजे सृष्टीहून महत्कारण वेगळे आहे, इतके जाणतो. कसे आहे? काय आहे? त्याचे वर्णन पुराणात सांगितले आहे की, ब्रह्मदेव प्रथम पुरुष निर्माण झाला आणि विचार करू लागला तो गडप झाले. तेव्हा ते आहे. ही श्रुती म्हटली येणेकरून तात्पर्यार्थ सांगितला.

मला वाटते की, ब्रह्मदेव म्हणजे विचार, हा ईश्वराचा शोध करता करता घोटाळ्यात पडला आणि ईश्वर तर सर्वत्र आहे. एक गोष्ट आहे की, नानक, शीख लोकांचा गुरू, हा एके दिवशी पश्चिमेस पाय करून निजला होता, तो फकीर लोक तेथे आले. त्यांनी पुसले की, "अरे, पश्चिमेस ईश्वराचे स्थान मक्का आहे. तिकडे तू पाय का ठेवितोस?" त्याने उत्तर दिले की, "मी हिंदू नाही व मुसलमानही नाही. मी विचाराने, धर्माने चालतो. तुम्हास जिकडे देव नाही असे दिसत असेल तिकडे माझे पाय उचलून ठेवा. तुमचा शास्त्रार्थ

मला समजत नाही." असे बोलताच फकीर विरस झाले आणि नानकाचा धर्म कबूल करते झाले.

✦ ✦

## मानास व दानास पात्र

■

**पत्र नंबर ३५ : १९ नोव्हेंबर १८४८**

एक मनुष्य दुसरे मनुष्याचा मान करतो, यास दोन कारणे आहेत. एक त्याचे आर्जव म्हणजे लाभदृष्टी व दुसरा कृतोपकार. आता इंग्रज लोकांस हिंदू लोक मानितात. आणि ज्यांचे त्यांजवळ काम नाही, तेदेखील त्यांस नरमतात. याचे कारण पाहू गेले तर मला वाटते की, अज्ञानी जर दोन इंग्रज लहान मोठे पदवीचेही एका जागी मिळाले तरी ते इतके लवणभंजन करीत नाहीत. पण हिंदू म्हटला म्हणजे फारच करितो. एकादा साहेब आला म्हणजे रस्त्यातील माणसे पैस होतात. मामलेदार व मुनसफ यांचे घशास कोरड पडते व किती एक घेरी येऊन डोळे पांढरे करतात, अशाही गोष्टी ऐकण्यात आहेत. याचे कारण काय ? जर हिंदू लोक विलायतेस जाऊन त्यांची सर्व प्रकरणे ध्यानात आणतील, तर मग मला वाटते की, इतके अज्ञान, मोह आणि अतिशय मान राहणार नाही.

मागे एलफिस्तन साहेब वगैरे यांनी आपले ग्रंथात असे लिहिले आहे की, जोपर्यंत हिंदू लोक आमचा मान देवाप्रमाणे अज्ञानाने करतात, तोपर्यंत आम्ही त्यांचे मुलखात राहू. पुढे राहणे कठीण आहे. जसे एखादे मोठे जनावर एखाद्याचे दृष्टीस पडले म्हणजे चपापतात. तसेच इंग्रज लोकांपुढे हिंदू लोकांचे होते. त्यांचे स्थान, कर्म, रीत, व्यवहार काही एक हे लोक जाणत नाहीत. याजमुळे इंग्रजांचा फार नफा आहे. या अवस्थेत हिंदू लोक जितके दिवस राहतील तितके दिवस त्यांची येथे वस्ती होईल, हा नेम आहे. जोपर्यंत जुने लोक आहेत, तोपर्यंत ही व्यवस्था अशीच चालेल, पुढची उत्पत्ति ज्ञानात श्रेष्ठ होईल, यात संशय नाही.

पहा, इंग्रजांनी आपले शहाणपणाने या लोकांस किती घेरले आहे! व्यवहार व राज्य सर्व त्यांचे हाती गेले आहे. याचे कारण अक्कल आहे. अक्कल

कशापासून ? तर विद्येची प्रसृती व विचार इंग्रजांमध्ये फार आहेत. हिंदू लोकांमध्ये एकही नाही. मोठा धर्म आणि दान करावयाचे झाले म्हणजे दोन हजार भटांस जेवण घालतात. कोणी पाच हजार खर्च लावून देऊळ बांधतात. कोणी मनास येईल तसा पैसा टाकतात. त्यांस योजना नीट कळत नाही. आमचे लक्षात एक गृहस्थ येतो. त्याने दोन लक्ष रुपये धर्मादायास काढले. त्यापैकी देवळास पन्नास हजार गेले. पंचवीस हजार ब्राह्मणभोज़न, दहा हजार खर्च देऊन लग्ने केली, असा व्यय केला. हे पाहून मला वाटते की मूर्खपणाची हिंदू लोकांपुढे हद्द झाली. हे दोन लाख रुपये जर नीट खर्च केले असते, तर किती उपयोगाची कामे झाली असती बरे ? किती दरिद्राचा ऱ्हास होता. किती ज्ञान व शहाणपण पढवावयास येते ?

परंतु मातीत पैसा कितीही घातला तरी त्याचा काही फायदा आहे काय ? माणसे ही जिवंत माती. त्यांस काही सुखाचा उपयोग व्हावा, हे टाकून मातीचा शोभेत द्रव्य खर्च करून काय उपयोग ? जर हिंदू लोकांस वास्तविक धर्म करावयाचा असेल तर इतकाच करावा की, जेणेकरून लोकांचे अज्ञान दूर होईल. पुस्तके व विद्या वाढतील व जेव्हा हे लोक मूर्खपणाच्या मार्गातून सुटतील, तेव्हाच सुखवृद्धी होईल.

किती एक लोकांस हा चमत्कार वाटला आहे की, आम्ही शहाणेसुरते लोक आहो आणि आम्हास 'लोकहितवादी' वेडे व मूर्ख म्हणतात, याचे कारण काय ? आम्ही त्यांस सांगतो की, जेव्हा आम्ही तुम्हांस ज्ञानी इंग्रजाशी मिळवून पाहतो तेव्हा खरेच वेडे व शहाणे लोकांमध्ये जितका फरक दिसतो तितका फरक तुम्हामध्ये दिसतो. रोगापासून तुम्ही वेडे नाहीत, परंतु ज्ञानाचे तुळणेत वेडेच आहात. आयुष्याचा उपयोग कसा करावा ? आपला जन्म लोकांस कोणत्या प्रकाराने उपयोगी करावा ? आपण पृथ्वीवर होतो याची मागे स्मृती रहावी, याविषयी उपाय करावा. सारासार विचार करून ईश्वराचे भय बाळगावे व खरेपणा धरावा, हे कोणी पाहत नाही.

धर्मात्मे लोक पुष्कळ आहेत व आम्ही धर्म फार केला, असे म्हणतात. परंतु आंधळ्यास त्यांनी जेवावयास घातले काय ? दीनगरिबांस वस्त्रे दिली काय ? अज्ञान्यांस ज्ञानी केले काय ? दुर्जनास सुजन केले काय ? कोणता परोपकार आपले लोकांमध्ये त्यांनी केला ?

हल्ली इंग्रज लोक सर्व जिन्नस विलायतेतून आणतात व इकडील व्यापारी कोष्टी वगैरे उपाशी मरतात. तर त्या विद्या इकडे आणून लक्षावधी जिवांचे हित करण्याचा उद्योग कोणी केला आहे काय ? नाही.

कोणी म्हणतो, मी कार्तिकमासी निरांजने दिली; कोणी म्हणतो, मी वैशाखात मडकी दिली, आवळे दिले, हा धर्म कशाचा? हा मूर्खपणा आहे. भटांनी वेड लावावे आणि गृहस्थांनी त्याचप्रमाणे नाचावे. यजमानास सांगावे की, उष्णकाळी क्षीरभोजन करावे, म्हणजे यजमान पुण्य जाणून तसे करितो. पण वास्तविक यामध्ये पुण्य कशाचे? आळशी लोक द्रव्य खाऊन जातात. आणि मालकास पुण्य पुण्य म्हणून ठकवितात, इतकेच आहे. वास्तविक पुण्य हेच की, यथायोग्य पात्र पाहून धर्म करावा. तान्हेला आहे त्यांस पाणी द्यावे. कुंभ भरून ब्राह्मणास दिला व त्याने तो जाताना टाकून दिला, कारण त्याचे घरी हौद आहे व विहीर आहे. मग त्याला यजमानाच्या कुंभातील पाण्याचे काय करावयाचे आहे? अर्थातच तो ते मडके ओतून टाकतो. तेव्हा हा धर्म कसा? परंतु हाच धर्म आहे, असे जे म्हणतात ते मूर्ख नव्हत काय?

## स्नान-संध्या

**पत्र नंबर ३६ : २६ नोव्हेंबर १८४८**

वास्तविक धर्म सोडून व ईश्वराची भक्ती सोडून हिंदू लोक विलक्षण मार्गास लागले आहेत. ते असे की, किती एक लोक स्नानसंध्यादि कर्मे करतात. त्यांस वाटते की, मोक्षाचे साधन हेच आहे. प्रातःकाळी उठून स्नानसंध्या करावयास बसून, डोकीस रुद्राक्षांच्या माळा घालून, भस्मलेपन करून, ढोंग करून, चार घटका बसावे म्हणजे त्यात ईश्वराची भक्ती झाली. मग सर्व दिवस वाईट कर्मे व असत्य भाषणे करून, लोकांच्या माना मुरगाळाव्या, तरी चिंता नाही. परंतु आम्हास असे वाटते की, हे स्नानसंध्या करणारे आपले आयुष्य व्यर्थ घालवितात, त्यात काही ईश्वरप्राप्ति नाही. ते बकध्यानी, मूर्ख व ढोंगी आहेत. असे म्हटले आहे की,

यं मां सेवेत सततं न नित्यं नियमान्बुधः।
यं मान्यतत्त्वं कुर्वाणो नियमान् केवलान् भजन्॥
(मनु. अध्याय ४ श्लोक २०४)

परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्।
(व्यास)

या वचनेकरून असे ठरते की, नीती आणि सदाचरण हे लोकांचे कल्याण करण्यामध्ये आहे. याशिवाय पुण्य नाही. केवळ जे कर्माचे भजन करतात, ते ढोंगी आहेत. नीतिपर वर्तणूक असावी, हे प्रथम कर्म होय. नंतर कर्माची खटपट केली सारखी, न केली सारखी. याशिवाय कबीर म्हणतात, ' मन चंगा तो खाथोटमें गंगा. '

याप्रमाणेच कलियुगी साधु झाले त्यांचे मत आहे. तस्मात् ढोंग करणारास पुण्यवान् जाणतात हे खोटे आहे. एका फारशी ग्रंथात पाहण्यात आले आहे की, एका अन्यायी राजाने एका पुण्यपुरुषास विचारले की, ' मी ईश्वराचे भजन कोणत्या रीतीने करावे ? ' तेव्हा त्या साधूस त्याची वर्तणूक ठाऊक होती म्हणून त्याने उत्तर केले की, ' ईश्वराचे भजन तुला उत्तम हेच आहे की, तू सर्व दिवसभर आणि रात्री निजत जा. ' तेव्हा राजाने पुसले, ' असे का ' तेव्हा त्याने उत्तर दिले की, ' याचे कारण ईश्वराचे मुख्य भजन करणे म्हणजे त्याने जे जीव उत्पन्न केले, त्यातील ज्ञानी जीव जो मनुष्य त्याचे कल्याण करावे. आणि ही गोष्ट तुला निद्रा लागल्याखेरीज होणार नाही. कारण तुझ्या जागृतीने किती एक मेले जातील व अन्याय होतील. याजकरिता दुष्टास झोप हीच ईश्वरभक्ती आहे. ' तेव्हा तो राजा त्या साधूस शरण गेला व त्याने जुलूम सोडून दिला.

या दृष्टान्तावरून असे ठरते की, कर्माची खटपट करण्यामध्ये ईश्वरभजन नाही. ईश्वराचे भयाने वर्तणूक केली म्हणजे तीच भक्ती आणि तेच पूजन. तत्रापि जो अशी खटपट व ढोंग करितो त्यांस लोक पुण्यवान म्हणतात, हे आश्चर्य आहे. अमका गृहस्थ त्याचे कर्म इतर कसेही असो, परंतु प्रातःकाळी उठल्यापासून प्रहरभर स्नानसंध्या करण्याचा त्याचा नेम मोठा सदृढ आहे. असो. त्याने पूर्वजन्मी असेच केले. त्याचे फळ या जन्मी त्यांस आले आहे. या जन्मी स्नानसंध्या करतो. त्याचे फळ त्यांस पुढले जन्मी येईल, असे म्हणतात आणि त्याचे वाईट कामावर पडदा घालितात. हा मूर्खपणा आहे. ज्याचे कर्म वाईट असते आणि ज्याने जन्मभर दगडावर पाणी ओतले आणि झाडाची फुले तोडून रास केली. तरी देव त्याजवर कृपा करील काय ? नाही, सद्धर्माची मुख्य खूण हीच की, मनुष्याचे कल्याणाकडे लक्ष असावे. परंतु मनुष्याचे कल्याण करणे म्हणजे लुच्चे, सोदे यांचे रक्षण करणे किंवा फुकट जेवणारे लोक यांची पंगत माजविणे नव्हे. पात्रापात्र पाहून अज्ञान जे आहेत त्यांस शहाणे करण्याची योजना करणे. जे रोगी आहेत, त्यांस औषधपाणी करणे, जे दरिद्री व पीडित आहेत, त्यांस सुख देणे, आईबापांचा प्रतिपाळ व मान करणे हीच नीती व हेच पुण्य. जो देवावर एकही फूल घालीत नाही, परंतु वर्तणुकीने पवित्र व

नीतिमान आहे आणि परक्याचे दुःख जाणतो तो चांगला. जो लाख तुळशी रोज वहातो व आईबाप वा भावाचा शत्रू, इंद्रियभ्रष्ट व लोकांचे उपयोगी किमपि पडावयाचा नाही, तो चांगला नव्हे. नामदेव म्हणतो,

जग चालले उफराटे, कोण जाणे खरें खोटें।
जित्या तुळशी बेला तोडा, पूजां निर्जीव दगडा।
मुष्टी धरुनि मेंढा मारा, ब्राह्मण म्हणती यज्ञ करा।
नामा म्हणे सर्व खोटे, भजन चाललें उफराटें।

याप्रमाणे साधूची भाषणे आहेत. याजवरून उनाड ब्राह्मणास राग येईल, कारण की येणेकरून त्याची फी बुडते, जर कोणी अभिषेक करील किंवा तुळशी वाहील, तर त्यांस पैसा मिळेल. किती एक लोक आपले भजनाची मजुरी ब्राह्मणास सांगतात. ती अशी की, ब्राह्मणांनी उपास करावा व त्यांस दक्षणा द्यावी. हे नफे ब्राह्मणांचे बुडतील. याजकरिता सदरील मत खरे आहे तरी ब्राह्मणांचा व भट मंडळींचा असा अभिप्राय पडतो की, डामडौल केले पाहिजेत. कारण त्याशिवाय त्यांचा निर्वाह नाही; परंतु खरी गोष्ट आहे ती त्यांणी कबूल करावी आणि लोकांचे अज्ञान दूर व्हावे, हेच चांगले. बहुधा जे ढोंगी स्नान-संध्या करणार असतात, ते तर फारच लबाड असतात, असे बहुधा पाहण्यात आहे. त्यांस असे वाटते की, आम्ही ईश्वराची भक्ती फार केली. आता काही केले, तरी चिंता नाही; परंतु हे बातळ आहे. अशा करण्याने ईश्वरप्राप्ति नाही; सत्कर्माने मात्र ईश्वर मिळतो.

किती एक लोक असे आहेत की, हातात माळ घेऊन रोज लाख वेळ राम राम म्हणतात. असे करण्यास त्यांस त्यांच्या गुरूंनी सांगितलेले असते; परंतु अशी बडबड घशास कोरड पडेपर्यंत जरी केली, तरी त्यापासून फळ काहीही होणार नाही. जर लबाडी सोडली, तर मात्र फळ होईल. मग देवाचे नाव घ्या किंवा नको. जर आपण ईश्वराचे प्राणी आहोत, तर त्याचे भजन आपण असे केले पाहिजे की, जेणेकरून त्याची प्रीती आपणणांवर होईल. ज्या गृहस्थाचे आपणास साधन करावयाचे असते, त्याचे नाव जर घेत बसलो, तर काही उपयोग आहे काय? तर त्यांस कृपा येईल, असे केले पाहिजे. त्यांस प्रिय आचरणाने त्याची प्रीती संपादन करावी. जर त्याचे घरी तगाद्यास बसले आणि म्हटले की अमके दे तर जाईन, तर तो मूर्खपणाचा निर्धार होईल. उत्तम पक्ष हाच की, मनुष्याने मनुष्याचे कल्याण करावे. देवाचे भय धरून नीतीने चालावे, म्हणजे ईश्वर प्रसन्न होतो. त्याचे जे प्राणी त्यांस उपद्रव केला

आणि देवाचे नाव घेतले व त्यावर खंडीभर पाला घातला, तर त्यात पुण्य कशाचे? यास्तव लोकांनी जर कोणास चांगलेवाईट म्हणावयाचे असेल तर त्याच्या स्नानसंध्येकडे पाहू नये; त्यांचे वर्तणुकीकडे पहावे. कारण स्नानसंध्या हे केवळ पोकळ आचरण आहे. त्यात काही उपयोग नाही. खरे पुण्य ते वेगळे आहे. याजकरिता पुष्कळ अनुष्ठाने केली, तरी त्यात जीव नाही. ब्राह्मणांकडून मजुरी केली, तरी सारखेच. त्यापेक्षा मजुरांची मजुरी बरी. चार ब्राह्मण लावून अभिषेक करावा, त्यापेक्षा चार मजुरदार लावून रस्ता नीट करावा, हे चांगले; कारण ती लोकहिताची मजुरी आहे. यास्तव स्नानसंध्या करण्यात काही पुण्य नाही.

## देवपूजा

■

**पत्र नंबर ३७ : ३ डिसेंबर १८४८**

शास्त्रामध्ये सर्व धर्मप्रकरणी बहुत मार्ग लिहिले आहेत. कोणी म्हणतात, जिवास भजावे, जीव तोच शिव आहे. व कोणी म्हणतात शिव अधिक आणि कोणी म्हणतात विष्णू, इत्यादी अनेक मते आहेत. तसेच अग्निसेवा, यज्ञ इत्यादिक श्रौत मार्ग आहेत. कोणी सूर्योपासक, कोणी शाक्त व फार अमंगळ आहेत. त्यांची पूजा सर्वांहून मूर्खपणाची आहे. ती केवळ मूर्ख व अविचारी असतील, ते मात्र स्वीकारतील. असे हे अनेक मार्ग आहेत.

परंतु माझे मत सर्व मार्गांतील एक मार्ग खरा आहे, तो कोणता म्हणाल तर ऐका. मी त्यांस शास्त्रातून प्रमाणही काढून देईन. तो असा की, ईश्वर काही मनुष्यास दृष्ट नाही, त्याचे अस्तित्व सृष्टीकडे पाहिल्याने मात्र समजते. याप्रमाणे सर्व लोकही कबूल करीतात. तेव्हा देवाचे भजन करणे योग्य व तो सर्वांहून वरिष्ठ आहे, परंतु त्याचे भजन करावे कसे, हे कळले पाहिजे. ईश्वरास जर आम्ही फुले अर्पण केली, तर पहा बरे, त्याने पृथ्वी निर्माण केली, तेव्हा त्यांस काही कमी आहे काय? तसेच त्यांस नैवेद्य दाखववावा, तर तो उपाशी आहे काय? त्यांस कोणताही उपचार करावयास मनुष्य योग्य नाही, कारण तो परिपूर्ण आहे. याजविषयी पूर्वीचे ऋषींचे मत असेच आहे.

परंतु लोक सामान्यतः मूर्ख आहेत. त्यांस वास्तविक ईश्वर कळत नाही. याजकरिता ते त्यांस बळेच स्वरूप देऊन सगुण करून ठेवितात. त्याचे वर्णन असे करितात की, त्याचे हातात शंख, चक्र, गदा, पद्म आहे. म्हणजे त्याचा अर्थ इतकाच की, तो लोकांस शासन करणारा आहे. चक्रे करून त्याचा अनादिपणा व अनंतपणा प्रगट होतो. ईश्वराची स्वरूपे अनेक प्रकारची वर्णन करतात. मूर्ख लोकांस ईश्वर कळण्याकरिता ही वर्णने केली, परंतु सार इतकेच की ईश्वर एकच आहे. त्यांस ब्राह्मणही नाकबूल नाहीत. परंतु त्या एक ईश्वराचे मनुष्याने मनन करावे. त्याचा विचार केला असता परमात्मा जो भगवान त्यांस मनुष्यांनी मूर्खपणाने भजावे. हेही अयोग्य हे व देवास लहान मानून मूर्ती करतात. याची निंदा गीतेत दोन ठिकाणी केली आहे, ते श्लोक—

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम्॥

(अध्याय ७, श्लोक २४)

या प्रकारे करून ईश्वरास मूर्त मानणे हे मूर्खत्व आहे. ईश्वर अमूर्त हे त्याचे कृत्यावरून समजते; कारण की, त्याणे केलेली सृष्टी ती देखील मापता येत नाही. तेव्हा तिचे कर्त्यास परिमित जाणणे हा केवढा अपमान आहे? यास्तव ईश्वराचे वर्णन आणि भजन करावे. इतकेच त्यांस पुरे. हृदयी त्याचे चिंतन करावे. हेच त्याचे थोरपणास योग्य आहे. आणि इतर उपचार नैवेद्यादिक त्यांस करू नयेत, मनुष्यास करावेत. काही देणे असल्यास देवास देऊ नये, कारण देव उणा व उघडा नाही. यास्तव मनुष्यास दिले तर देवास दिल्याहून अधिक आहे. ईश्वराचे दर्शन होत नाही. तेव्हा त्याचे ध्यान मनेकरून करावे. जे काही कृत्य आणि उपचार करावयाचे ते पात्रापात्र पाहून मनुष्याचे ठायी करावे हे उत्तम. आणि दयाधर्मास पात्र मनुष्य आहे, ईश्वर नाही. ईश्वर वर्णनास मात्र योग्य. जे काही अर्पण करावयाचे आहे, ते मनुष्यास करावे, देवास नको. तो सर्वत्र पूर्ण आहे.

दगडास भजन आणि नैवेद्य कशास पाहिजे? त्यापेक्षा ब्राह्मणास बरा, कारण तो प्रत्यक्ष खाणारा आहे. ईश्वराचे व्यक्त स्वरूप ही सृष्टी आहे. तेव्हा या व्यक्त स्वरूपाचे ठायी काय ते अर्पण करावे. दगड हा काही ईश्वराचे प्रत्यक्ष स्वरूप नाही. दगडापेक्षा जिवंत पदार्थ बरा, त्यांस क्षुधा आहे व तृष्णा आहे. त्यांस सोडून दगडापुढे अन्न ठेवावे, यात काय फळ? एखादा गरीब अंधकारात बसला आहे. दरिद्राने पीडित आहे, ज्यास पैसा मिळत नाही, पैशाचे तेल

आणून देऊन उजेडात बसविले तर बरे किंवा ते सोडून त्यांस अंधारातच ठेवून देवळातील मूर्तीजवळ पैशाचा कापूर नेऊन जाळावा हे बरे? कोणत्याने ईश्वर तृप्त होईल? ईश्वराने जे पदार्थ सजीव निर्माण केले आहेत, त्याचे रक्षण करावे, ते सोडून देवळातील दिवे लावावे तर काय फळ?

मला वाटते की, या गोष्टीचा ईश्वरासही क्षोभ येईल, कारण विचारेकरून असे कळते की, ईश्वराची इच्छा मनुष्याने मनुष्यास सांभाळावे. केवळ देवाची पूजा करावी त्याचा उपयोग काय? जी गावची रयत आहे, तिने पाटलाकडे जाऊन त्याचे आज्ञेत वागावे किंवा गवरनरसाहेबापुढे जाऊन रहावे? गवरनर त्याविषयी काय करू शकेल? तद्वत मनुष्याने चांगला मार्ग सोडून गरिबास उपयोगी पडावयाचे सोडून कापूर देवळात जाळला तर उपयोग काय? या मूर्खपणाने किती एक पैका व्यर्थ खर्च करतात व त्यांस धर्म म्हणतात. आणि त्यापासून लोकांचा काही उपयोग घडत नाही.

असे किती एक लोक व्यर्थ द्रव्य टाकतात; त्यांस जर सांगावयास गेले, तर त्यांचे डोकीत लहानपणापासून वेड भरलेले असते, म्हणून ते ऐकणार नाहीत, आणि विचारही करणार नाहीत. असे दृढ मूर्ख ते आहेत. यास्तव त्याचे अंतःकरणात बोध व्हावा, म्हणून हे पत्र मी लिहिले आहे. वास्तविक धर्म कोणता आहे, ते त्यांणी समजावे, हे उत्तम आहे.

## डोले करण्याची चाल

**पत्र नंबर ४२ : ७ जानेवारी १८४९**

सांप्रत हिंदू लोक धर्माभिमानरहित भ्रष्ट झाले आहेत. हे त्यांचे कृतीवरून समजते पहा, जातीचे हिंदू लोक असून मुसलमानाचा धर्म आचरितात. हल्ली पुण्यात मुसलमानांचे डोले दहा पाच होतात आणि हिंदू लोकांचे शंभर होतात. व हे लोक जसे बापाचे श्राद्धाची व काशीयात्रेची काळजी व तयारी करितात, तसा उद्योग करून डोले करतात, हे हिंदू धर्मास मोठे लांच्छन नाही काय?

जे हिंदू धर्मास जाणत असतील व खरे पंडित असतील त्यांस हा दुराचार पाहून लाज वाटावी, परंतु तेही डोळेझाक करतात, हा केवढा आंधळेपणा

आहे ? अज्ञान फार झाल्यामुळे मुसलमानांपुढे बसून त्यांचा संस्कार आपले देहास करून घेऊन फकीर होतात. यात व ख्रिस्ती धर्माचा बाप्तिस्मा घेण्यात काही अंतर नाही, एक मुसलमान होतो, दुसरा इंग्रज होतो. दोघांचा संस्कार सारखा आहे. परंतु याजविषयी लोकांस अगदी शरम नाही. ते कर्ज काढून ताबूत करतात. व अडाणी लोक त्यांस नवस करतात. तसेच ब्राह्मण लोकही काही काही भ्रष्ट झाले आहेत असे माझ्या ऐकण्यात आहे. ब्राह्मणांच्या बायका ताबूत निघतात त्या दिवशी नवसाच्या घागरी ताबुताचे पुढे ओततात, देवावर अभिषेक करावयाचा सोडून अशी कर्मे करतात, तेव्हा ईश्वराचा क्षोभ या लोकांवर कसा होणार नाही ? व्हावा हेच योग्य. हे लोक अज्ञानाने जनावरांपेक्षादेखील मूर्ख झाले. हिंदू धर्म बुडोन गेला. आता धर्म म्हणून कोणी जाणत नाही. लग्ने, मुंजी या चाली पडल्या म्हणून करतात. त्या धर्म काहीच समजत नाहीत. मुसलमानांची चाल संपूर्ण हिंदू लोकांनी घेतली आहे. जर या देशात कोणी विद्वान असते तर आजपर्यंत यांचा प्रतिबंध करण्यास यत्न करिते.

पण पेशवे व त्यांचे पदरचे मोठमोठे शास्त्री असून त्यांणीदेखील हा विचार केला नाही. हिंदू लोक मुसलमान होत, त्यांस मदत मात्र करीत गेले, परंतु त्याची बंदी करावी, हे त्यांस योग्य होते. जांस हिंदुस्थानात धर्मस्थापना करावयाची असेल त्यांणी शंकराचार्यासारखे सर्व हिंदुस्थानात धर्म सांगत फिरले पाहिजे, तेव्हा हे ताबूत करण्याचे काम बंद होईल; नाही तर मोठा हा अधर्म आहे. यावरून हिंदू लोकांची चित्ते समजतात.

चालीस विरुद्ध काही केले तर मात्र वाईट म्हणतात. अधर्म म्हणजे काय, याचे त्यांस ज्ञान नाही व धर्म याचा अर्थही कळत नाही. घरात चाल चालत आली असते त्याप्रमाणे आंघोळ करतात, भस्म लावतात, फुले आणून पूजा करतात. त्याचा अर्थ त्यांस कळत नाही. डोले करतात, ते मुसलमानांचे अन्न एके ठिकाणी बसून खातात. त्यांस कोणते प्रायश्चित्त असावे ? हिंदू धर्माशी विरुद्ध मुसलमान व ख्रिस्तीयन लोक सारखेच आहेत. आणि ख्रिस्तीयन कोणी झाला तर सर्व लोक त्याविषयी आश्चर्य करतात. परंतु हे हजारो लोक मुसलमान होतात, याविषयी ते स्तुतीच करीतात. त्यापेक्षा जी गोष्ट फार प्रघातात पडली ती नीट दिसते आणि जिचा प्रघात पडला नाही, ती वाईट दिसते, तात्पर्य खरे-खोटे, वाईट-बरे कोणी पहात नाही, चालीवर जातात.

हिंदू लोकांमध्ये दुसरा एक दुर्गुण असा आहे की, त्यांस डौल आणि इतमाम फार आवडतो. जर इंग्रज लोक ताबुतासारखा काही धर्म काढून पुष्कळ पैसा खर्च करतील तर बहुत हिंदू लोक त्यांचे धर्मात जातील. परंतु शुष्काशुष्की

कार्य होत नाही. हिंदू लोक ज्या ठिकाणी डौल असेल त्यांस चांगले व थोर म्हणतील व ती गोष्ट करतील. याचे कारण ज्यांचे ठायी अज्ञान फार, ते डौलाने फसले जातात. जर खरे खरे सांगितले तर त्यांची आवड बसत नाही. पहा की, मुसलमान लोक हिंदुस्थानात परदेशाहून येऊन येथे त्यांणी वास्तव्य केले व धर्म चालू केला व हिंदू लोकांना ती मौज वाटली म्हणून हिंदू लोकही नवस करतात, व त्यांस देव मानतात. जर या डोल्यांमध्ये तमाशा आणि डौल नसता तर कोणी हिंदू लोक त्यांस न स्वीकारते, यात संशय नाही.

हिंदू लोकांची मने फार हलकी आहेत. त्यांस राजाही तसाच पाहिजे. राजाजवळ डौल असला म्हणजे त्याने अन्याय केले तरी चिंता नाही. पहा, बाजीरावाचे वर्णन भट व भडवे पुष्कळ करतात. कोणी म्हणतात की, दोन्ही काळ ते वेळेस संध्या करीत होते. ब्राह्मण भोजन घालीत होते. श्रीमंत असे होते, तसे होते. पण वास्तविक त्यांचे गुण कसे होते, ते काही कोणी बोलत नाही, कारण त्यांच्या संपत्तीने हे लोक भुलले होते आणि या लोकांमध्ये द्रव्य हीच अब्रू आहे. अब्रू आणि द्रव्ये ही निराळी नाहीत.

सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते।

या श्लोकेकरून कवीने लोकांचे मूर्ख समजुतीचे वर्णन केले आहे आणि याप्रमाणे प्रत्यक्षच आहे. इंग्रज लोकांनी हिंदू लोकांस नाव दिले आहे की, "सेमी बार्बरस" म्हणजे "अर्धे रानटी". तसे हे लोक आहेत खरे. हे पूर्ण रानटी म्हणावे तर नागवेउघडे फिरत नाहीत. एवढेच कमी आहे.

परंतु या लोकांस ज्ञान अगदी नाही आणि भोळसर फार. जो लाथ मारावयास योग्य, त्याचे हे पाया पडतील आणि त्याने थोडासा डौल घातला तर त्यांस महाराज म्हणतील आणि भुलतील. असे हे लोक विलक्षण आहेत. वरवर भाषण करावयाची त्यांस फार खोड आहे. कोणतेही गोष्टीचा त्यांस अभिप्राय पुसला, तरी त्यांस उत्तर देता येत नाही व त्यांस काहीच कळत नाही. खाणेपिणे याचे मात्र त्यांस ज्ञान आहे. परंतु ते ज्ञान जनावरांसही स्वभावेकरून असते. मनुष्यास मुख्य सुशिक्षा व नीती यांची मूळ तत्त्वे माहीत पाहिजेत, परंतु ब्राह्मणांस हे काहीच नसते. पूर्वी ब्राह्मण अर्थज्ञ होते. धर्माचा विचार करीत होते, ग्रंथ लिहीत होते. पढवीत होते व धर्मात वाईट असेल ते सुधारीत होते. असे मागील ग्रंथांचे परंपरेवरून दिसते.

हल्ली लहान मुलांस ब्राह्मण लोक मुंज झाली म्हणजे भटाचे स्वाधीन करीतात. परंतु त्याचे ज्ञान गुरूस व शिष्यास काहीच नसते. विद्या या शब्देकरून

ज्ञानाचा अर्थ होतो. ज्यामध्ये ज्ञान नाही ती अक्षरे वाळल्या झाडाप्रमाणे आहेत. याजकरिता ज्ञान असले पाहिजे. परंतु ब्राह्मण लोक अज्ञानी फार आहेत. हे भटांचे काम झाले. नंतर पंतोजी याचे काम असे आहे की, त्याणे लिहावयास व वाचावयास शिकवावे. आणि वेताळपंचविशी आणि शुकबाहात्तरी ही वरवर वाचवावी. या दोन्ही बखरी मूर्खपणाच्या माहेर आहेत. त्यापासून नीती येणार नाही. अशी शिक्षा असल्यावर कोण मूर्ख होणार नाही?

यास्तव मला वाटते की, शास्त्री, पंडित व जे कोणी शहाणे असतील ते असोत. परंतु बहुतकरून पढतमूर्ख फार आहेत. जे लोक-हितेच्छू असतील त्यांणीं शास्त्राधारे एक ग्रंथ करावा की, जेणेकरून सर्व आपले ब्राह्मणांस धर्माचे ज्ञान सुलभ रीतीने होईल. आणि हा ग्रंथ चालते भाषेत असावा, आणि मुंज झाली म्हणजे संध्या वगैरे कर्मानुष्ठान करावयाचे त्याचे अर्थही त्यात असावे. आणि जे जे ब्राह्मण लोक करीतात त्याचे तात्पर्य त्यात असावे. तसला ग्रंथ मुंज होताक्षणी मुलास पढवावा म्हणजे त्यांस आपला धर्म काय हे तरी कळेल. व एणेकरून धर्माचा उद्धार होईल. सार्थ ग्रंथ पढविल्यावाचून काही उपयोग नाही. मुंजीत बहुल्यावर मुलास बसवून उपदेश केला, तर त्यांस आणि डोल्यांत फकीर व्हायचे समयी मुसलमान कलमा पढतो तो उपदेश करून घेणारास फळ सारखेच आहे. याचा किंवा त्याचा त्यांस अर्थ ठाऊक नाही. बापाने मुंज केली आणि पुढे फकीराने फकीर केले, तात्पर्य एकच. एकास वाईट म्हणणे व दुसऱ्यास चांगले म्हणणे, हे ज्ञान झाल्यावाचून होत नाही.

जेव्हा एकाचा अर्थ कळेल आणि हे चांगले असे वाटेल, तेव्हा दुसरे वाईट म्हणेल. नाही तर म्हणणार नाही. सांप्रत हिंदू लोकांस आपला धर्म अमूक व अमूक गोष्ट चांगली आहे, हे समजत नाही. जे ओघास येईल ते चांगले म्हणतात व जसा प्रसंग येईल तसे करीतात. धर्म नाही, कर्म नाही, चांगले काय व सत्य काय याची ओळख नाही व ज्ञानही नाही. याजपासून हे सर्व अनर्थ झाले आहेत.

✦ ✦

## निरुद्योगीपणाच्या चाली

■

**पत्र नंबर ४३ : १४ जानेवारी १८४९**

या काळी लोकांस काही उद्योग नव्हता, पीक फार येत होते व खावयास लोक कमी होते, त्या काळी वेळ जाण्याच्या किती एक युक्ती काढल्या आहेत. जसे आता इंग्रज लोक सक्त मजुरीची शिक्षा देतात, याचे कारण असे आहे की, जे आळशी लोक असतात, ते चोऱ्या करून उपजीवन करतात, त्यांस मेहनत करण्याची सवय लागावी, म्हणून अशी शिक्षा देतात.

तद्वत हिंदुशास्त्रात किती एक कलमे आहेत, त्यांचा उपयोग पाहिला असता काही एक नाही व त्यात नीती किंवा विद्याही नाही. फक्त काळ मात्र जावा अशी कामे त्यात कित्येक आहेत. ती कोणती ते ऐका. पुराणात असे आहे की, एक एक तांदूळ निवडावा आणि लक्ष तांदूळ मोजून देवावर घालावे. माझे पाहण्यात कित्येक धर्मशील अशा स्त्रिया आल्या आहेत की, त्यांनी चातुर्मासात चार महिने आपले डोळ्यांत रक्त उतरून घेऊन पाच लाख तांदूळ आणि गहू मोजले व त्यांच्या पुड्या बांधून मोठ्या प्रयत्नाने त्या देवास वाहिल्या. किती एक स्त्रिया अशा आहेत की, पाच वर्षेपर्यंत वाती करतात, रुद्रवाती, दगडवाती, धोंडेवाती अशा प्रकारच्या कापसाच्या वाती सगळा दिवस त्यात घालून तयार करतात. आणि एका दिवशी त्याजवर दहा रुपयांचे तूप घालून देवळात जाऊन त्या जाळतात, यापलीकडे काही मूर्खपणा राहिला नाही. त्यांस पुसले तर म्हणतात की, उपाध्येबावांनी असे करावयास सांगितले आहे व यामध्ये फार पुण्य आहे!

अहाहा! काय हे पुण्य! इतकी वर्षे जर उपयोगी विद्या वगैरे शिकण्यात खर्च केली तर केवढा लाभ होईल? व केवढी योग्यता होईल? परंतु पुराणिक देवळात बसून ऐकणारास फार वेड लावतात की, मी एक स्त्री पाहिली, तिचा नेम तर फारच विलक्षण होता. तिने गाई दाणे घालावे आणि तिचे शेणात जे दाणे पडतील ते शेण घेऊन गोमूत्रात धुवावे. आणि ते दाणे निवडून दळून त्याची भाकरी करून खावी. याप्रमाणे चार महिने तिने शेणातील दाण्यांवर उपजीविका केली. कधी पसाभर व कधी चार पैसे भार सापडत, तितकेच खाऊन ती राही. आणि भटजीबाबा तिचे व्रत मोठे व ती मोठी पुण्यवान बायको म्हणून स्तुती करीत. आणखी अशीच कित्येक व्रते आहेत. त्यांचा

अर्थ पाहिला तर दुसरा काही नाही, परंतु बायकांचा वेळ जात नाही, तो सुलभपणे जावा आणि त्यांस काही उद्योग, सुख सापडावे, म्हणून या युक्ती केल्या आहेत.

परंतु भोळसर लोक हेतू जाणत नाहीत. दुसरे असे आहे की, कार्तिक मासी लोक दीपदान करीतात व करंड्याफण्याची वायने देतात. हा धर्म अगदी उलटा आहे. कारण दोन पैशांचे टिवळे, त्यात दमडीचे तूप घालून ब्राह्मणास देतात. त्यापासून जो दान घेतो त्याला काही उपयोग नाही. आणि निरुपयोगी पदार्थ करण्यात कारीगरांचा वेळ मात्र जातो. तसेच भटाचे करंड्याफण्या करतात, त्यात काय अर्थ आहे? ते जिन्नस् कोणाचेही उपयोगी नाहीत. व्यर्थ पैसा जातो. दान घेणारास त्याचा उपयोग नाही व लोकांसही नाही आणि देणाराचे मात्र नुकसान. तेव्हा असली मूर्खपणाची दाने हे लोक कशाकरिता करीतात? दान करण्याचा हेतू न जाणून शास्त्रात लिहिले आहे की, दीपदान करावे, म्हणून करीतात. परंतु शास्त्रकारांचा हेतू जाणून दान करीत नाहीत. मला वाटते एक समई गरिबास दिली आणि टिवळी पन्नास वर्षे दिली तरी फळ सारखेच आहे. परंतु लोक मूर्खपणाने जावयाचे गोष्टीसारखे शास्त्र चालवितात.

एक जावई घरून निघून सासऱ्याचे घरी जाऊ लागला. तेव्हा त्याचे बापाने त्यांस सांगितले की, सासरा काही गोष्टी पुसेल तर काहींस होय म्हणावे व काहींस नाही म्हणावे. जावयाने तेवढीच गोष्ट ध्यानात ठेवली आणि हेतू सोडून व आपली बुद्धी चालविण्याची सोडून दिली. पुढे सासऱ्याची गाठ पडली तेव्हा प्रथम प्रश्न त्याने केला की, " केव्हा आताच आला ? " त्याने " होय. " म्हटले. दुसरा प्रश्न " व्याह्याची प्रकृती बरी आहे ? " त्याने " नाही " म्हणून उत्तर दिले. तेव्हा सासऱ्याने पुसले " अहो; फार प्रकृती बिघडली आहे काय ? " जावयाने उत्तर दिले की, " होय. " " आम्ही भेटीस गेलो तर भेट होईल की नाही ? " त्याने " नाही " म्हणून जबाब दिला. तेव्हा व्याही घाबरा झाला आणि जावयास घेऊन व्याह्याचे घरी आला, तो तो यथास्थित आहे. मग चौकशी केली तो जावयाने असे सांगण्याचे कारण समजले.

जसा हा मूर्ख जावई सांगितल्या शब्दाप्रमाणे वागला आणि बुद्धी चालविली नाही, विचार केला नाही तसे हिंदु लोक सांगितल्या शब्दाचे आहेत. त्यांस हेतू समजणे हे ठाऊक नाही. याप्रमाणेच पाठ करणारे लोक आहेत. कोणी गीता पाठ करितो, कोणी विष्णुसहस्रनामाचा पाठ करितो, कोणी सप्तशती वाचतो, कोणी वेद पाठ करतो. परंतु त्यांचा अर्थ त्यांस समजत नाही. पाठ करणारे लोक भारवाहक व वेडे आहेत. पण लोक ते अगदी विसरले आणि पाठ

करणाऱ्या लोकांचे फार दंभ वाढले. मला वाटते की, एक अष्टकच संहिता सार्थ म्हणेल व शास्त्र जाणेल तर तो घनपाठ्यापेक्षा श्रेष्ठ. परंतु पाठ करणारे हे अगदी मूर्ख आणि मुख्य हिंदू लोक या स्थितीवर येण्याचे कारण व विद्या बुडण्याचे कारण मला हेच दिसते की, लोक नुसते पाठ करण्यावर फार प्रीती करू लागले. तेणेकरून अर्थ सुटताच अनर्थ झाला. पाठ करावे म्हणून कोठे कोठे वचने सापडतील. परंतु ती वचने जावयाचे बापाने सांगितलेले बोधाप्रमाणे आहेत. तो हेतू सोडला असता काही उपयोग नाही.

यास्तव लोकांनी या चाली सोडून द्याव्या आणि शास्त्राचे हेतू जाणावे, हेच उत्तम. नाही तर आणखी विद्येचा संहार होऊन लोक अती नीच अवस्थेला पावतील. यास्तव जे जे लोक विद्येचे मित्र असतील त्यांनी सार्थ शिकण्याची पद्धती सुरू करावी म्हणजे विद्येचा व ज्ञानाचा उद्धार होईल. आणि ज्या पुष्कळ मूर्खपणाच्या चाली आहेत त्या पोकळ आहेत, असे समजून लोक टाकतील. अशा चालीतून लोकांस मुक्त करावे, हाच ब्राह्मणाचा मुख्य धर्म. परंतु ब्राह्मण पोटार्थी व परस्वाधीन झाले. याजमुळे धर्मसुधारणेस त्यांस तोंड राहिले नाही व ते ताटाखालची मांजरे झाले.

विद्या पुढे व्हावी, अशी ज्याची इच्छा असेल, त्यांणी यास झटावे. कारण दोन हजार वर्षांत हिंदुस्थानात विद्येचे शून्य झाले आणि फार फार वाईट चाली लोकांत पडल्या. त्यांचा उपमर्द झाला पाहिजे. आणि विद्येचा विचार करणे हिंदू लोकांमध्ये नाहीसे झाले, याजमुळे त्यांस क्षीणपणा फार आला, रांडपणा फार आला, शूरत्वहीन झाले, अभिमानरहित झाले व विचारशून्य व मूर्ख झाले. मागे काय होते, पुढे काय होईल, येविषयींचा तर्क बुडाला. आज आठशे वर्षांपासून हिंदू लोकांच्याने स्वराज्य रक्षवले नाही. आठशे वर्षांत मुसलमान, इंग्रज वगैरे पाळीपाळीने येऊन येथे राज्य करतात व आपलेच लोकांचे सैन्य ठेवून आपलेच लोकांस मारतात याचे कारण 'ज्ञानशून्यता.'

आपले लोकांस राज्यकुशलता असती तर मुसलमान हिंदुस्थानात शिरून हस्तिनापूर व अयोध्या, येथे नबाब बादशहा कशास स्थापन झाले असते? तसेच कित्येक अनर्थपता मुसलमान लोकांनी केले ते झाले नसते. परंतु हिंदू लोक अज्ञानात बुडाले, याजमुळे त्याचे घरचे त्यांस पहावयाची शक्ती नाहीशी झाली. हे राजेरजवाडे आहेत, त्यांचेकडे पाहिले म्हणजे समजते. त्यात मुख्य तर ब्राह्मण हे पढतमूर्ख झाले आहेत. त्यांणी सर्व लोकांच्या विद्या बुडविल्या आणि आपलीही हानी केली.

# दया

पत्र नंबर ४७ : १ फेब्रुवारी १८४९

हिंदू लोकांची अंतःकरणे पराकाष्ठेची थंड आहेत. ही उष्ण करण्यास महान उपाय पाहिजेत. त्यात मुख्यत्वेकरून ब्राह्मण लोक फार निर्दय व शैत्यान्तःकरणी आहेत. असे की जर कोणी मरत असेल, तर किंवा दुखणेकरी असेल तर ते त्याजकडे पाहिल्याशिवाय वाटेने स्वस्थ जातील.

या दुर्गुणाची निंदा पुराणात कोठे कोठे केली आहे. त्यावरून असे सिद्ध होते की, हा दुर्गुण प्राचीन काळापासून या लोकांत आहे. एके ठिकाणी व्यासांनी अलंकारपूर्वक असा दुर्गुण वर्णन केला आहे की, एके समयी श्रीशंकर व पार्वती हे संवादात म्हणाले की, शिवानी काशीक्षेत्र निर्माण केले त्या ठिकाणी जे लोक जातात ते सगळे मोक्षास जातील की काय? असे पार्वतीने पुसले. तेव्हा शंकर म्हणाले की, काशीस जाण्याने सर्वांस मोक्ष होतो, असे नाही. जे सदय अंतःकरणाचे आहेत, ते जरी गेले न गेले तरी मोक्षास पात्र आहेत.

तेव्हा याची प्रचीती दाखवावी, म्हणून उभयता कैलासाहून निघाली. एकाने व्याघ्रस्वरूप व एकीने गायत्रीस्वरूप धारण केले; आणि काशीचे वाटेवर यात्रेमध्ये चिखल होतो, त्यात गाय बुडाली आहे आणि पलीकडे कोरडी जागा आहे. तेथे व्याघ्र उभा आहे व तो गाईवर टपून बसला आहे, असे दाखविले. त्या वाटेने हजारो लोक जात होते. परंतु ते सर्व यात्रेवर नजर देऊन गाईची मोकळीक न करता पुढे गेले. एक ब्राह्मण मात्र दयावान होता त्याच्याने पुढे जाववेना, तेव्हा त्याने व्याघ्रावर शस्त्र धरून त्यांस पळवून लावले, आणि गाईस बाहेर काढले. त्यासमई शिवास पार्वतीने सांगितले की, इतक्या यात्रेमध्ये एवढा मात्र प्राणी मोक्षास पात्र आणि यास मात्र यात्रेचे फळ आहे. कारण की त्याची वासना सत्कर्मावर आहे. बाकीचे लोक सत्कर्मास न जाणून यात्रा मात्र करतात. ती निर्फळ होय.

याजवरून तात्पर्य असे की, दया हे मोठे स्वर्गाचे द्वार आहे; परंतु सांप्रतकाळचे लोक आमचे पाहण्यात असे आले आहेत की, त्यांची अंतःकरणे पाषाणाप्रमाणे कठीण आहेत. ते आपले अंगावर दहा हजारांचे जवाहीर व शंभर रुपयांचा पोषाख वापरतील; परंतु जवळ एक भिकारी चिंध्या पांघरलेला आणि उपाशी दीनवाणीने मागावयास आला, तर त्यांस काही देणार नाहीत.

अशा गोष्टीची त्यांस लज्जा वाटत नाही व दुसऱ्याचे दुःख पाहून मनास कोमलता येत नाही. वास्तविक पाहिले असता जे श्रीमंत आहेत, त्यांणी गरिबांस पाहिले म्हणजे त्यांस लज्जा यावी; आणि अंतःकरण विरघळावे.

कारण की, भिकारी आणि श्रीमंत यांचे शरीरामध्ये किंवा बुद्धीमध्ये काही फरक नसतो. इतकेच की कालेकरून एकाने दुसऱ्याचे हरण करून फार माल जमविला असतो व दुसऱ्याचा तो हरण जहाला म्हणून तो भिकारी असतो. ईश्वराने पृथ्वीवर पदार्थ निर्माण केले. हे सर्वांस सारखे पोचावे हा त्याचा हेतू होय. परंतु मनुष्यामध्ये जितके शहाणपण, तितकाच मूर्खपणा आणि अज्ञान आहे. याजमुळे पन्नास लोकांस लुटून एक श्रीमंत होतो.

पन्नास कुळंबी गावातील नांगर धरून मेहनत करीतात आणि एक जहागिरदार किंवा इनामदार त्यांस कोंडा ठेवून त्याचे दाणे घेतो आणि आपण रेशीमकाठी धोतरे नेसतो व कामकाज काही एक करीत नाही. हे माहात्म्य एकाचे आणि दुसरे गरीब बिचारे इनामदारापेक्षा शहाणे असले तरी आपल्या मेहनतीचा हिस्सा त्यांस देतात, हे आश्चर्य आहे.

आणखी जर एक गोष्ट सांगितली, तर याविषयी पक्की खात्री होईल. प्राचीन काळी एक विचारशील मनुष्य शेतात बसत असे आणि भिक्षा मागून खाई. त्याणे एक दिवस पाहिले की, एक विलक्षण जनावराची टोळी जिचे नाव जाणते पक्षी ते सरासरी दोनशे त्या शेतात आले. तेव्हा दाणे पुष्कळ पडले होते. ते सर्वांनी सारखे खावे, ते सोडून त्यांणी काय केले. त्या पक्ष्यांपैकी एक रोगिष्ट व निर्बल होता त्यांस त्यांनी एका पारावर बसविले आणि बाकीचे सर्व शेतात जाऊन त्यांनी आपले शक्तीप्रमाणे दाणे जमा करून त्या रोगिष्ट पक्ष्याजवळ आणून रास घातली आणि आपण काही न खाता त्या पक्षिराजाच्या सभोवते बसले आणि तो पक्षिराज त्या दाण्याचे राशीवर नाचे आणि उडवी, परंतु कोणास काही देत नसे. आणि कर्मास त्या पक्ष्यांपैकी बलिष्ठ होते, ते सहाय्य होऊन इतर पक्षी जरी क्षुधेने व्याप्त होते तथापि त्यांस काही खाऊ देत ना. जरी त्यांणी ती रास घातली होती, तरी त्या राशीपैकी कोणी खावयास लागला, तर सर्व पक्षी एकत्र जमून या अपराधी पक्ष्यास मारून टाकीत. असे दोनचार पक्षी मारले.

हे त्या पाहणाऱ्या मनुष्यास आश्चर्य वाटून, तो आपले मित्राकडे गेला आणि त्यांस त्याने हे वर्तमान विदित केले. आणि म्हणाला पक्ष्यांची जात काय मूर्ख आहे? आपण उपाशी मरतात आणि रोगिष्टाकडून आपण संचय केलेले धान्य नाशिवतात. तेव्हा तो म्हणू लागला की, "अरे बाबा, याचे

तुला आश्चर्य का वाटले? या गोष्टी तर प्रत्येक दिवशी मनुष्यामध्ये पाहण्यात येतात. एक राजाचे क्षयरोगी पोर असते, परंतु त्याचे सर्व लोक आर्जव करीतात आणि त्यांस दौलत देतात व आपण उपाशी मरतात. बरे, त्याणें स्वतः काही काम केले आहे काय? नाही. तत्रापि लोक आंधळ्यासारखे त्यास बलिष्ठ मानितात. आणि त्यांस किनखापाच्या, मखमलीच्या कापडावर बसवितात व त्याच्याहून हजारपट शहाणे असतात, ते भीक मागतात, चिंध्या देखील त्यांस मिळत नाहीत. आणि राजाचे घरी कोणी एक पैसा चोरला, तर त्यांस फाशी देतात व त्यांस सर्व वहावा म्हणतात. आणि न्याय चांगला झाला म्हणतात.

याणें चोरी का करावी? अशी आश्चर्ये लोकांमध्ये आहेत. त्यावरून जितके श्रीमंत व जितके थोर पदवीस आलेले आहेत. त्यांस असे वाटते की, आम्ही नालायक असून हे आम्हास प्राप्त झाले आहे. याजवर आमचे हक्क. परंतु ही समजूत मूर्खपणाची आहे. आपणाहून लहान लोकांचे सुखाकडे याचा उपयोग करावा, म्हणजे याचे सार्थक जहाले. मला वाटते की, प्राचीन काळचे शास्त्रकारांनी ब्राह्मणास भिक्षा मागावयाचा धर्म लावून दिला आहे. याचे कारण हेच दिसते की भिक्षान्नासारखे दुसरे अन्न पवित्र नाही. ही गोष्ट खरी आहे, परंतु जे श्रीमंत आहेत, त्यांस क्षणभरही पश्चात्ताप होत नाही. जाणी धर्माने द्रव्य संपादन केले आहे, त्यांस हजारात एक सापडेल. बाकी तर लबाडीने द्रव्य मिळविलेले आहेत. त्यात हिंदू लोकांमध्ये तर क्वचितच धर्मवान श्रीमंत आहेत. श्रीमंतास असे वाटते की, आम्ही या मालाचे मालक आहो, आम्हास हे भिकारी त्रास का देतात?

परंतु वास्तविक पाहिले तर त्यांस लाज वाटावी, हेच योग्य, कारण ते जे सुख भोगितात, ते लोकांचे मूर्खपणामुळे भोगितात. तेव्हा त्या मूर्खांवर काही तरी दया करणे योग्य आहे. यास्तव सर्व धर्मांत दान देणे हा मोठा धर्म सांगितला आहे. सर्व धर्म याविषयी मिळतात. मोक्षाचा मार्ग दानधर्म आहे. परंतु हिंदू लोकांस दानधर्म करण्याची सवय आहे, तो दानधर्म नव्हे. वास्तविक धर्म असा की दुसऱ्याचे जे न्यून आहे, ते परिपूर्ण करावे. आणि लोकांस ज्ञानवृद्धी करून शहाणे करावे.

परंतु हा धर्म या लोकांस कळत नाही. हिंदू लोकांमध्ये एकमेकांचा कळकळा अगदी नाही. उलटे एकमेकांचा नाश करून त्यात थोरपणा मानणारे बहुत आहेत. जर अन्यायाने एकाचा नाश जहाला, तर इतर स्वस्थ जाग्यावर बसून त्याचे हाल पाहतील. एकावर अन्याय जाहला तर सर्वांनी त्याचा न्याय होण्याकरिता मदत करावी, हे शहाणपण त्यांस नाही. यास्तव मुसलमानांनी

हिंदुस्थानात प्रवेश केला, इंग्रज लोकही आले व पुढेही किती एक येणार. परंतु या लोकांस दुःख व अन्याय सोसण्याची चाल व सवय पडली आहे. तिची त्यांस लाजच वाटत नाही. व दया नाही म्हणून हे अनर्थ या देशात आहेत. आणि लोक एकमेकांचे अंतःकरण जाणण्याजोगे शहाणे होतील, तोपर्यंत हे अनर्थ दूर होणार नाहीत, असे मला खचित वाटते.

## मन हेच ईश्वरी शास्त्र

■

**पत्र नंबर ५३ : २५ मार्च १८४९**

ईश्वराने जे प्राणी निर्माण केले, त्यामध्ये उत्तम प्राणी मनुष्ये आहेत, कारण की, त्यांस ज्ञान बुद्धी दिली आहे. तेव्हा मनुष्याने या जन्मामध्ये वर्तणूक कशी करावी, याचा नेम काही ईश्वराने त्याचे स्वभावातच दिला आहे किंवा नाही याचा विचार करता असे दिसते की, "मनुष्याचे मन हेच त्याचा नियम आहे." यास प्रमाण भागवतातही असे आहे की, "मनःपूतं समाचरेत्" जे मनास पवित्र वाटेल, त्याप्रमाणे आचरण करावे हेच ठीक.

मला वाटते की, जसे सरकारातून एखादे कामगारास नेमतात आणि सरकारचे हुकूम कसे चालावे याविषयी लेख पाठवितात, याप्रमाणे तो ताकीद देतो. तद्वत् मनुष्यास मन हे ईश्वराने दिले आहे. हा सर्वांचे चित्तास अनुभव आहे आणि जी वाईट गोष्ट ती मनास वाईट वाटते व चांगली ती मनास चांगली वाटते. गैर माहितही असली तरी चांगल्यास चांगला म्हणतो व वाईटास वाईट म्हणतो. याचा अनुभव मूर्ख मनुष्यासही आहे, तेव्हा मन हाच मनुष्याचे वतर्तणुकीचा ईश्वरी नेम आहे. जशी भारती गदापर्वात कथा आहे की, दुर्योधनाने पांडवांची बालके मारीली, परंतु हे ऐकून ऐकणारे म्हणतात, की, 'अरेरे! काय तो दुष्ट होता! चांडाळ होता.' याप्रमाणे मनाची ध्वनी निघते. वास्तविक पाहिले तर त्या गोष्टीस व ऐकणारास काही संबंध नसतो. परंतु वाईटाचा निषेध व चांगल्याचा अंगीकार हे मनाचे धर्म आहेत व ही ईश्वराचीच प्रेरणा आहे.

बरे, असे आहे तर मग मनुष्य याविरुद्ध का चालतात? कोणी म्हणतो की, आमचे बापांनी व वडिलांनी केले आहे. तसेच आम्ही करू. कोणी म्हणतो

की, आमच्या देशाची चाल आहे, कोणी म्हणतात की, आमचे गावातील चाल अशीच आहे. याप्रमाणे मनुष्य मूर्ख होऊन, वास्तविक मार्ग सोडून वाकडी चालू लागली. तसेच मन इतके भ्रष्ट झाले की, दुसऱ्याचा प्राण घेणे, हेही त्यांस बरे वाटते.

किती एक लोक असे निष्ठुर आहेत की, सती जाणे चांगले म्हणतात! परंतु वाईट गोष्टीस चांगले जे म्हणतात, त्यांचे मन साक्षी असते. ते मनापासून म्हणत नाहीत. दुसरे काही कारणाने म्हणतात. कोणी शास्त्राचे ओढीवर जातात. कोणी रूढीवर जातात. आणि त्यांस ही गोष्ट वाईट, असे मनात येते. तरी मनाची ध्वनी दाबून दुष्ट बुद्धिप्रेरित भाषण करीतात, हे मोठे आश्चर्य आहे. मला वाटते की, जे साधु झाले व शास्त्रकार झाले त्यांणी मन शुद्ध करण्याकरिता पुष्कळ ग्रंथ लिहिले व पुष्कळ शिकविले आणि नेमही पुष्कळ केले. परंतु ती गोष्ट साधली नाही. लोकांचे मन वाकडे तिकडे जाते. तर लोकांनी वास्तविक सत्य स्मरून मनात विचार केला, तर त्यांस किती एक गोष्टी ज्या लोकांमध्ये चांगल्या म्हणून चालतात त्या वाईट असे समजेल. परंतु हिंदू लोक अजून आपल्या ठिकाणी विचार करू लागले नाहीत. व मन हेच मोठे शास्त्र आहे व लिहिलेली शास्त्रे सर्व याचे खाली आहेत, असे त्यांस वाटत नाही.

हल्ली वाईट चाली चालतात. त्यांतील एक दोन मी वर्णन करितो. प्रथम मला दुसरी कोणतीही चाल इतकी वाईट वाटत नाही की, जितकी हल्लीची लग्नाची चाल वाईट आहे. हिंदू लोकांमध्ये पहावे तर कोणी ऐंशी वर्षाचा पुरुष रस्त्याने चालला आहे किंवा कामावर आहे असे कोठे आढळत नाही. याचे कारण काय? बहुत लोक असे पाहण्यात येतात की, स्वतः क्षयरोगी व पंचवीस वर्षे झाली नाहीत तो पांचचार रोगिष्ट पोरे उत्पन्न झाली आहेत. स्त्रीस वार्धक्य-दशा प्राप्त होऊन पुरुषाचे केस पिकलेले, अंगात शक्ती नाही, कोठे बाहेर जाण्यास सामर्थ्य नाही, असे आढळतात. मग परमुलखात कशाने जाणे होणार? शिपाईगिरी वगैरे राहिले. परंतु पोटास मिळवून खाण्याची देखील पंचाईत. असे पुरुष दरिद्री बहुत आढळतात. मुख्यत्वेकरून श्रीमंत लोक तर अगदीच नालायक होत चालले आहेत.

याचे मुख्य कारण मला लहानपणाचे लग्नासारखे कोणतेही दिसत नाही. लग्नाने मनुष्य स्वर्गास जातो, म्हणून शास्त्र आहे. परंतु त्याचा हेतू जाणत नाहीत. आणि मला असे पुष्कळ आढळले की, स्वतः भिकारी, अन्नाची पंचाईत, रोगी, अशक्त, परंतु वीस वर्षे झाली नाही तो स्वतः किंवा त्याचे आईबाप लग्नाचे मोठे काळजीत पडतात. आणि लोकांजवळ भीक मागतात. आणि

लोकही त्यांस " त्याचे लग्न पाहिजे कशास ? त्याची प्रकृती नीट झाली आणि रोजगार-धंदा करू लागले व संसार करण्याचे ज्ञान व स्त्रीस खावयास घालावयाचे सामर्थ्य आले म्हणजे ' लग्न करा ' असे म्हणत नाहीत. परंतु उलटे असे म्हणतात की, ब्राह्मणाचे लग्न होत आहे, त्यांस साहित्य केले तर पुण्य आहे; असे म्हणून पैका देतात. आणि अशा मुलग्यास मुलगी कोण देतो ? म्हणून मुलीच्या बापास लाच देऊन त्याची पोरगी याचे गळ्यात बांधतात. मग लग्न झाले की दोघांनी झोळ्या घ्याव्या आणि दारोदार भीक मागत फिरावे. आणि विद्या वगैरे सर्व बुडवून त्याने स्त्रीच्या काळजीत पडावे. अशी अवस्था होऊन तो लवकर मरतो. मग विधवा स्त्री झाली म्हणजे तिचे हाल या लोकांमध्ये कसे आहेत, हे सर्वांस माहीतच आहे.

लोक डोळेझाक करून आपले पोरांची व पोरींची त्वरित लग्ने करतात. येणेकरून दोघांचे दुःख वाढते; व बापास लहानपणी पोरे व सुना चांगल्या दिसतात, परंतु त्यांचे पाठीमागे त्यांचे हाल कुत्रा खात नाही. याचा विचार हे लोक करीत नाहीत व लग्नाची घाई करतात. येणेकरून अल्पजीवी, अशक्त, पराक्रमहीन व मूर्ख झाले आहेत. पंधरावीस वर्षांचा मुलगा झाला नाही; तो लोक म्हणतात की, लग्न का झाले नाही ? आणि त्यांस आईबाप असले तर त्याचा प्राण जाऊ लागतो; त्या वेळेस सांगतात की, कसेही करा, पण याचे लग्न करा. या मूर्खपणास काय म्हणावे ?

याविषयी व स्त्रियांस विद्या शिकविण्याविषयी लोकांनी जरूर विचार करावा. स्त्रिया वाईट म्हणून पुष्कळ लोक म्हणतात. कोणी म्हणतात की, " स्त्रीबुद्धिः प्रलयं गतः " परंतु यांसारखे शतमूर्ख पृथ्वीत नाहीत. जसे पुरुष तशाच बायका स्वभावाने व बुद्धीने आहेत. परंतु ईश्वराने त्या घरचे कामास योजिल्या आहेत व पुरुषास बाहेरचे कामास व रोजगारास वगैरे निर्माण केले आहे. परंतु शहाणपण सारखेच आहे. जे लोक स्त्रियांस वाईट म्हणतात, त्यांणीं पक्के समजावे की, ही मूर्खपणाची समजूत आहे. आणि प्रायशः असे आहे की, जी स्त्री वाईट, तिचा नवरा वाईट असतो आणि नवरा चांगला असला तर त्याची स्त्री कदापि वाईट असावयाची नाही.

स्त्रियांस शहाण्या करणे जरूर आहे. व लग्नाकरिता जे धर्म करितात त्यांणीं विचार करावा. धर्म मागणारे भटात फार थोडे योग्य व गरीब असतात. कोणी म्हणतो की, मी गणपतीच्या देवळात चातुर्मास अनुष्ठान करितो, त्याची समाप्ती करण्याकरिता मला पैका द्या तेव्हा असे लोकांस धर्म करणे हा मूर्खपणा वाढविणे आहे.

## आचार

■

पत्र नंबर ५८ : २९ एप्रिल १८४९

हिंदू लोकांमध्ये सांप्रत आचार फार माजला आहे. म्हणजे किरकोळ निरर्थक कर्मे आणि ढोंगे फार होऊन, त्यांतील बीजरूप जी नीती ती भ्रष्ट झाली आहे.

ब्राह्मणाच्या घरात जाऊन पाहिले म्हणजे आचार किती असतात, ते लक्षात येतात, म्हणजे सोवळेओवळे हे एकच प्रथम; नंतर पुरुषाचे सोवळे, बायकांचे सोवळे, कित्येक ठिकाणी देशस्थ ब्राह्मणाचे हातचे म्हणून कोकणस्थांच्या बायका जेवीत नाहीत. पिठास पाणी लागले, म्हणजे ओवळे झाले; खरकटे, शिळे, उष्टे हजारो नेम आहेत. जेवताना वाढणाराचा स्पर्श झाला, तर पुनः आंघोळ केली पाहिजे; उष्टे-विटाळ म्हणजे आंचवण्यापूर्वी कोणास स्पर्श न करणे; दाणे भाजले म्हणजे ओवळ्यांनी खाण्यास चिंता नाही; परंतु हिरवे दाणे खाऊ नये आणि त्यांस पाणी लागले म्हणजे विटाळ झाला. जेवून उठला, म्हणजे पुनः अन्न खाऊ नये व प्रोक्षण करण्याच्या पूर्वी खाऊ नये. व जेथे जेवले तेथे शेणपाणी लावल्याखेरीज दुसरा जेवावयास बसत नाही. अन्नास जो हात लागला, तो तसाच अंगास लागला, तर अंग धुतले पाहिजे. मुकटा, धाबळ, रेशमी कापडे सोवळी, कापूस ओवळा, म्हणजे धुतल्याशिवाय तो घेऊन जेवीत नाहीत.

परंतु वास्तविक विचार केला. तर रेशीम करण्यात बहुत हिंसा होते. असे असून ते पवित्र व कापूस झाडाचे फूल ते ओवळे, हे कसे असेल? याचा ठराव किंमतीमुळे पूर्वी शास्त्रकर्त्यांनी केला किंवा कसे? याचा ठिकाण लागत नाही. पितांबर पन्नास वर्षे धूत नाहीत; परंतु धोत्रे रोज धुतात आणि धोब्याजवळ दिली, तर ती सर्वदा ओवळी होतात. तेव्हा हे सर्व चमत्कारिक नियम ज्यामध्ये ब्राह्मणांस तीस घटका जातात, त्याचा उपयोग पाहिला, तर काही नाही; परंतु लोक म्हणतात की, जितके ज्यास होईल, तितके त्याणे करावे. म्हणून जे भटभिक्षुक आहेत, ते ढोंग दाखविण्याकरिता फारच करीतात. शंकराचार्यांचे वंशातील शिष्य, जे संस्थानी आहेत, त्यांचे येथे पाहिले, तर आचार इतका आहे की, तो पाहण्यानेदेखील कंटाळा येतो मग त्याचा त्रास कोण सोशील?

पन्नास ठिकाणी पाणी शिंपतात. दोनशे ठिकाणी हात धुतात. तीनशे ठिकाणी पाय व जागोजाग नेत्रस्पर्श आणि जागोजाग मार्जन आणि देवपूजा व सोवळे मनस्वी करतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत असे ढोंग करतात आणि कोणी जेवावयास वगैरे बोलाविले, तर मग फारच लांबलचक करीतात, म्हणजे लोकांस वाटावे की, पुण्यवान प्राणी आहे. मनाची स्थिती पाहिली, तर ज्ञानशून्य. एवढा आचार ब्राह्मणांनी खटपटीचा अंगीकारला आहे.

परंतु हा चौघांत चालवावयाचा नव्हे. याची खात्री ज्या ठिकाणी मोठा समुदाय होतो, तेथे पहावे. चिंचवडचे ब्राह्मण भोजन, निगडीचा उत्साह, तसेच मोठमोठे ठिकाणी जेथे पुष्कळ लोक जमतात किंवा प्रवासास निघतात. तेव्हा आचार निभत नाही. कारण की, उष्ट्यावर, खरकट्यावर पाय देत चालतात. एकमेकांस विटाळ होतो. शेण लावल्याचा शास्त्रार्थ करीतात; परंतु उष्ट्या अन्नावर दुसरी पाने मांडतात आणि लोक त्यावर जेवितात व त्यांस म्हणतात हा देवाचा प्रसाद, येथे काही चिंता नाही. घरी मात्र अनाचार करू नये. याजमुळे ब्राह्मण लोक हे फार नालायक आहेत. यास गावास जाणे, लढाईस जाणे, समुद्रात प्रवास करणे इत्यादिकांचा त्रास. कारण की, त्यांस प्रथम भय, दुसरे काही नसते, पण मी जेवू कसा ? माझे सोवळेओवळे कसे चालेल ? मला भांडी कोण देईल ? माझे शिजवील कोण ? इत्यादी काळजी त्यांस पडतात. याजकरिता ब्राह्मण लोक बहुधा घरी राहणारे लोक व चोरट्यासारखे आपले घरी दडून राहणारे. त्यांस कधी फार करून बाहेर पडावयाची वेळ आली म्हणजे त्यांचा प्राणान्त होतो; परंतु अशा घातकारक चाली सोडून द्यावयास काय अवघड ?

ब्राह्मण लोकांनी सर्व जातींस मूर्ख ठरविले आणि आपण शहाणे झाले; परंतु आपण तरी पराक्रम केला असे नाही. आपल्याभोवती रिकामे घोळ पुष्कळ उत्पन्न करून ठेवले आहेत. येणेकरून ते सर्व लोकांस घेऊन आपण बुडाले, असे झाले आहे. जर इतर लोकांस लिहिण्याची व शास्त्र वाचण्याची परवानगी असून, ते विद्वान असते, तर स्वतःच पराक्रम केला असता; कारण की इतर जातीस आचाराच्या अडचणी नाहीत; परंतु ब्राह्मणांनी सर्वांचा नाश करून आपण बुडाले. आता इतर जातींचे लोक शहाणे होऊन पराक्रम करीत तो फार दिवस पाहिजेत. नाही तर आजपर्यंत इतर जातीचे हिंदू लोकांनी विलायतेस जाऊन पृथ्वी कशी आहे, याचे ज्ञान वगैरे मिळविले असते. मग ब्राह्मण याच देशात आपले घरोघर राहते, तर त्यांची काही फिकीर नव्हती. अस्तु.

सांप्रत ब्राह्मण लोकांनी याचा विचार करावा. आपण पराक्रमी व प्रवास करण्यात व लढाईस वगैरे योग्य होण्यास आपल्यास कोणत्या चाली सोडल्या

पाहिजेत. आणि त्या सोडाव्या हे उत्तम, हे एक आणि दुसरे ब्राह्मण लोकांमध्ये नित्याचा आचार तसाच नैमित्तिक आहे. तोही रद्द करण्याजोगा आहे. म्हणजे पोर जन्मास आले त्या घटकेपासून भटाचे अनुष्ठान व पूजा व सोवळेओवळे सुरू होते. कोणी म्हणतो अन्नप्राशनसंस्कार, कोणी म्हणतो दगडसंस्कार, कोणी म्हणते षष्ठीसंस्कार, त्याची पूजा आणि व्यवधाने फार आहेत. तसेच, लग्न हेही हिंदू लोकांमध्ये मूर्खपणाने होते. लग्नाचे संकल्प, प्रतिज्ञा वगैरे सर्व भट संस्कृत भाषेत आपण पाठ करितो, आणि बडबड करितो. त्यांतील शब्द कोणास समजत नाहीत. त्याचा उपयोग काय ? हे सर्व संस्कार लग्नेसुद्धा मराठी भाषेत वगैरे उतरून त्याप्रमाणे करावे. हे गुह्य कशाकरिता पाहिजेत ? परंतु हे लोकांस कळत नाही.

घरात लहान मुलगा किंवा मुलगी असली, म्हणजे तिला आचार शिकविण्यास प्रारंभ होतो. नीती वगैरे वास्तविक सदाचार शिकवीत नाहीत. पोरीस वाती लावाव्या, निरांजने लावून तूप जाळावे, तीळतांदूळ वहावे. नाना प्रकारची मूर्खपणाची व्रते करावी आणि त्याबाबतचा कहाण्या तिजला शिकवितात. आणि तो दृढ भाव करतात. तसेच, पुरुषाला सोवळेओवळे हे ब्राह्मणाच्या घरी श्रम करून मुलास शिकवितात; परंतु मोठी गोष्ट म्हणजे नीती शिकवावयाची ती रहाते. याजमुळे परिणाम असा झाला आहे की, नीती म्हणजे काय ? हे कोणास ठाऊक नाही. ते अगदी विसरले. आता आचारावरून चांगला-वाईट मनुष्य जाणतात. व असे बहुत ठिकाणी आढळत आहे की, जी स्त्री शिंदळ, लबाड असते, ती तुळशीस प्रदक्षिणा घालण्यात, वाती जाळण्यात प्रमुख असते. नदीतले पाणी दहा-वीस घागरी देवावर ओततात, इत्यादी नेम शिंदळ स्त्रिया भक्तीने करतात आणि शिंदळकी वाईट, हे त्यांस स्वप्नातही माहीत नसते. तसेच पुरुषात जे चोर, लाचखाऊ, लोकांचा माना मोडून पोट भरतात, इंद्रियभ्रष्ट; पण त्यांचे सोवळेओवळे सर्वांहून अधिक; जेवताना बोलत नाहीत, पूजा करताना बोलत नाही, हे असे नेम ते निष्ठेने करीतात; पुष्कळ पैसा खर्च करून तुळशी-फुलांचा संहार करीतात; परंतु आमची वर्तणूक वाईट हे त्यांचा स्वप्नी नसते व लोकही म्हणत नाहीत की, तो आचार कसला करतो ? वर्तणुकीने फार वाईट आहे. याविषयी लोकही आंधळे झाले आहेत. तेही सोवळ्यावर व देवपूजेवर न्याय करतात, नीती आणि सदाचरण याविषयी लोक अगदी आंधळे झाले आहेत.

# धर्मसुधारणा

**पत्र नंबर ६४ : १७ जून १८४९**

कालमहात्मे करून हिंदू धर्माची सुधारणा करणे जरूर आहे. त्याशिवाय या लोकांचा परिणाम लागणार नाही. चार लोक त्याचे मनात स्वदेशाचे कल्याण आहे. त्यांणीं एकत्र होऊन धर्मसुधारणा करावयास आरंभ करावा, हे मला बरे वाटते. व असे करण्यात एक मोठा लाभ आहे तो हा की, सरकार अनुकूल आहे. तेव्हा चार टोणपे शास्त्री पंडित यांस कशास आपण भ्यावे ? याचे हातून फार झाले, तर त्याचे विपरीत जे करीतील त्यांस जातीबाहेर ठेवण्याचे होणार; तर जात म्हणजे काय ? ज्या समुदायामध्ये लोक पुष्कळ जमतात, ती जात होते व एकटा असला म्हणजे तो बहिष्कृत होते, पहिल्याने शीख लोक झाले, तेव्हा ते बहिष्कृत होते व पुढे पुष्कळ झाले तशी तीच स्वतंत्र एक जात झाली.

त्याचप्रमाणे पहिल्याने किरिस्ताव धर्म सुरू झाला. तेव्हा पूर्वीचे धर्माचे जे पंडित होते त्यांणीं काही दिवस त्यांस भ्रष्ट म्हणून ठरविले व पुढे ते पुष्कळ जमले तेव्हा जे भ्रष्ट म्हणत होते तेच उलटे भ्रष्ट झाले. इंग्रजांनी किरिस्ताव धर्म घेतला तेव्हापासून पुढे तो धर्म पुष्कळ भ्रष्ट झाला. याजकरिता त्यांतील कोणी एका पंडिताने धर्मसुधारणा केली, तेव्हा त्यांस लोकांनी पुष्कळ वाईट म्हटले. परंतु चार लोक एक जागी जमले व लग्नसोयरीक आपसांत होईल इतका समुदाय असला म्हणजे कोणी या शास्त्री लोकांस पुसत नाही असे करण्यास आधार आहे. शंकराचार्यांनी किती एक शास्त्रमते रद्द केली; किती एक चालू केली. असे कालकरून शास्त्रास चालन पाहिजे. ईश्वरासंबंधी धर्म आहे तो मात्र अचल आहे. परंतु शास्त्रांतील कायदे जरूर वरचेवर फिरले पाहिजेत. यास्तव स्वदेशाचे हितकर्ते यांणी इतका विचार करावा की, आपले पक्षात पुष्कळ लोक येतील की नाही ? मला वाटते की, या गोष्टीची काळजी नको. धर्मसुधारणा प्रसिद्धपणे चालू केल्यास बहुत लोक आपल्यास येऊन मिळतील. पुष्कळ लोकांच्या मनात आहे, परंतु संधी नाही. यास उपाय नाही. मुख्य धर्मसुधारण्याची कलमे अशी आहेत.

(प्रथम) सर्वांनी ईश्वराचे भजन अंतःकरणापासून करीत जावे. (दुसरे) जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव मानावा. (तिसरे) मुंज, लग्न, प्रेतक्रिया

हे तीन संस्कार ठेवून बाकीचे सर्व रद्द करावे. (चवथे) जे कर्म करणे ते स्वभाषेत अर्थ समजेल असे करावे. भजन, पूजन, संस्कार सर्व ज्यांचे त्यांचे भाषेत करावे. संस्कृत भाषा पाहिजे ते शिकतील; परंतु ज्यांस येत नाही त्यांणी संस्कृत भाषेत कर्म करणे जरूर नाही. (पाचवे) प्रत्येकास आपले विचाराप्रमाणे आचार व बोलण्या-लिहिण्याची मोकळीक असावी. त्यांस प्रतिबंध असू नये.

(सहावे) स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मसंबंधी कामात व संसारात एकसारखे असावे. येणेकरून पुनर्विवाह व मोठेपणी लग्न झाले. (सातवे) आचारापेक्षा नीती प्रमुख असावी. आचाराचे महत्व हल्ली आहे तसे असू नये. आता किती एक बायका लबाड असतात; परंतु पिंपळाच्या प्रदक्षिणा अंतरीत नाहीत; हे काही उपयोगी नाही. (आठवे) अर्थाशिवाय काही एक म्हणू नये. (नववे) मनुष्यमात्रास तुच्छ मानू नये. जाति-अभिमान नसावा. सर्वांशी सारखे दयापूर्वक वर्तावे. सर्वांचे कल्याण करावे. (दहावे) स्वदेशाची प्रीती व त्याचे कल्याण विशेषेकरून मनात वागवावे. (अकरावे) ज्यास जो पाहिजे तो त्याणे रोजगार करावा. (बारावे) गुणेकरून व योग्यतेकरून जातिभेद मानावा. कुलेकरून मानू नये. (तेरावे) सरकारहून प्रजेचे अधिकार अधिक असावे, म्हणजे जे जे रयतेच्या हिताचे कायदे आहेत, ते सरकारशी भांडून घेत जावे. (चवदावे) राजाने जे नियम केले असतील, ते व जे ईश्वरी बुद्धिसूचित नेम आहेत ते मानावे.

(पंधरावे) विद्यावृद्धीकरिता सर्वांनी मेहनत करावी. दुःखितांस सुख, रोग्यास औषध, मूर्खास ज्ञान व दरिद्र्यास द्रव्य शक्त्यनुसार देण्यास अंतर करू नये. (सोळावे) शेवटचे कलम असे आहे की, सत्याने सर्वांनी चालावे. सत्याचे विरुद्ध वर्तणूक करू नये. विद्येमध्ये ज्या ज्या सत्य गोष्टी आहेत, त्यांचाच शोध करण्यास आळस करू नये आणि सापडतील त्या सर्व प्रसिद्ध कराव्या व विद्या व ज्ञान संपादन करण्यास सर्व सारखे, अशी मोकळीक असावी.

या दर एक कलमाविषयी एक ग्रंथ उदाहरणेसहित करावा, असे माझे मनात फार आहे. व इतक्या गोष्टी मी लिहिल्या आहेत. त्यांस काही शास्त्र व हिंदू धर्म प्रतिकूल नाही. सर्व हिंदू धर्मातीलच आहे; परंतु त्याचा शोध मात्र केला पाहिजे. एके ठिकाणी सापडणार नाही. परंतु चहोकडून मिळविले म्हणजे सापडेल.

जसा गीतेत एक ईश्वर आहे; इतर देवता भजू नयेत, अशी स्पष्ट वाक्ये पुष्कळ आहेत; ती घ्यावी. जरी ती पुराणास विरुद्ध असतील तरी पुराणे सोडावी. जे चांगले ते घ्यावे. जातीविषयी वेदाचे मत घ्यावे. कारण की, संस्कृत भाषेत अनंत ग्रंथ आहेत. ज्या ज्या ऋषींच्या जसे मनात आले तसे त्यांणीं लिहिले

आहे. तेव्हा त्यात एकच पुस्तक आपल्या उपयोगी सापडणार नाही. परंतु सर्वांचे ऐक्य केले तर करता येईल. याप्रमाणे एक ग्रंथ करून त्यात शुद्ध नीती प्रतिपादन करावी. आणि हिंदू लोकांचे विशेष नाव ठेवावे. आणि त्यांणी कसे वागावे त्याचे नियम त्यात ल्याहावे. आणि तेच पुस्तक आपले शास्त्र समजून त्याप्रमाणे चालावे.

खचित एकट्या ऋषीने आपल्या अकलेने लिहिलेले शास्त्रापेक्षा चार मते पाहून जे शास्त्र आपण तयार करू, ते सर्वांपेक्षा उत्तम होईल, यात संशय नाही. शे-दोनशे लोकांनी याप्रमाणे नाव धारण करून वेगळी फळी पाडावी. मग आपलेमध्ये हा धर्म चांगला असे पाहून पुष्कळ लोक येतील. ज्या मुलीचा नवरा मरेल ती एखाद्या सोद्याबरोबर जाते, त्यापेक्षा आपले धर्मात येऊन एखाद्याशी लग्न करणार नाही काय ? हजारो करतील. हिंदू धर्मात सांप्रत ज्या ज्यांस अडचणी पडतील ते सर्व तोटा करून या शुद्ध धर्मात मिळतील. मग आपली मंडळी प्रबळ झाली म्हणजे जे पाहिजे ते कार्य करता येईल.

सांप्रत एकमेकांचे विरोध व विभक्तपणे फार आहेत. कोकणस्थ देशस्थांशी सोयरीक करीत नाहीत. या अडचणी मोडून लोक गंगाजळ-निर्मळ होतील आणि त्यांचे एक मत व एक धर्म होईल. आणि जे पाहिजे ते करता येईल. असे केल्यावाचून सांप्रतकाळी हिंदू धर्म भ्रष्ट झाला, त्याचे हातून आम्ही सुटणार नाही. हा धर्म सुधारला पाहिजे. माझे सुधारण्याचे तात्पर्य असे नाही की. सर्वांनी एकजात व्हावे. कारण की हल्ली नीच जातीचे लोक मोठेपणात आले नाहीत. याकरिता त्यांची सोयरीक कोणी अर्थातच करणार नाही. ज्यास पांच रुपये महिना आहे, तो आपले योग्यतेचा गृहस्थ पाहील. केवळ गावाबाहेरच्या महाराशी अथवा भिकाऱ्याशी लग्न करणार नाही, हे उघड आहे.

परंतु माझा हेतू इतकाच की, विरोध मोडावे आणि लोकांनी परस्पर ममतेने वागावे व जसे जसे कालेकरून हे अज्ञानपाश सुटतील तसे तसे सोडवावे, परंतु या कार्यास आरंभ करावा म्हणजे बरे पडेल. बहुत लोक वाट पाहतात. ब्राह्मण महाराची निंदा करतात. त्यांस शिवत नाहीत व इंग्रजांजवळ प्रीतीने बसतात. हे पाहून मला आश्चर्य वाटते. शास्त्राप्रमाणे पाहिले असता महार बरे; परंतु इंग्रजांचे मंडळीत ब्राह्मण असू नयेत. तत्रापि हे ब्राह्मण मूर्ख. त्यांस समजत नाही; म्हणून मी हा उपाय योजिला आहे.

# नीति-प्रशंसा

■

**पत्र नंबर ६५ : २४ जून १८४९**

मी आपले पत्रात ब्राह्मण जातीवर पुष्कळ हल्ला केला आहे. याजकरिता किती एक ब्राह्मणांस वाईट वाटत असेल. त्यांस मी त्यांची क्षमा मागून अशी विनंती करतो की, ब्राह्मणांचे दोषविवेचन मी फार केले आहे. याचे कारण आमचे लोकांत मुख्य ब्राह्मण. ते जे करतील तसे इतर वर्ततात. गाव-खेड्यांत देखील जो कुळकरणी, त्याचे पाया पडतात. म्हणून ब्राह्मणांचे सुधारणुकेस्तव मी झटतो. त्यांची सुधारणा झाली, म्हणजे सर्व हिंदू लोकांची जहाली.

त्यांचे अज्ञान पाहून मला दया येते. राग येत नाही. जे मी लिहिले आहे, ते सर्व त्यांचे हिताकरिता आहे. मला खात्री वाटते की, सांप्रत काळी माझे पत्राचा आक्षरशः अर्थ करून त्यांतील आशय जाणतील. असे ब्राह्मण कोणी नाहीत. कदाचित हजारांत एक असेल. कारण की त्याचे अज्ञान अतिशय आहे. बाळपणापासून जी सवय झाली, ती सवय मोठेपणी कितीही सांगितले तरी जात नाही; परंतु मी आशा करितो की, पुढे जे होतकरू मुलगे आहेत ते ही पत्रे पाहून अज्ञानातून सुटतील आणि माझे अभिप्रायाचा विचार करतील. मग त्यांस जे पसंत वाटेल, ते ती करोत.

आजचे ब्राह्मण असे आहेत की, हे पत्र हाती धरताच टाकून देतील व म्हणतील हे काय? भलतेच लिहिले आहे. असो, त्यांचे अज्ञान त्यांचे कामास दिवसेंदिवस येत आहे. परंतु मला वाटते की, म्हातारे जुने ब्राह्मण आहेत ते असोत; परंतु नवीन उमेदवार त्यांनी आपले अंतःकरण ज्ञानेकरून व विचारेकरून पवित्र करावे, म्हणजे पुष्कळ फायदा होईल. मागील पत्रांत धर्मसुधारणा लिहिली आहे. ही बहुतांस भयंकर व किती एकांस दुर्घट वाटून किती एक पंडित व शास्त्री पुराणातील वाक्ये वर्णसंकर, कली इत्यादी म्हणतील, हे मला कळत आहे; परंतु महाराज, तुम्ही विचार कराल तर हा वर्णसंकर नव्हे. आता जो आहे तो वर्णसंकर खरा. जे ब्राह्मण भडवेपणा करतात, त्यांस तुम्ही पंक्तीस घेता व नीतिमान शूद्रास नीच मानता, हा वर्णसंकर खरा. शास्त्राचा आधार माझे मतास पुष्कळ आहे व तुम्ही विचार केला असता सापडेल. वेडात शिरू नका. ही धर्मसुधारणा झाल्याशिवाय तुमचा बंद खुला होणार नाही.

आता जो धर्म चालला आहे, हा धर्म नव्हे; हा बेबंद, गोंधळ आहे. यात काही नाही. नीती नाहीशी झाली व धर्म बुडाला. मला तर धर्म कोठे दिसत नाही म्हणून धर्माची स्थापना करण्याचा माझा यत्न आहे व असे झाले असता पुष्कळ नीतिवान पुरुष होतील व जे गैरनीतीने चालतील तेच भ्रष्ट म्हणावे, केवळ आचारात जपून वागले, तर उपयोग नाही. आचार हे केवळ सोंग आहे. नीतीचे ज्ञान व्हावे, म्हणून आचार सांगितला आहे, हे तुम्हास क्षणभर विचार केला तर कळेल, पहा की, शास्त्रात असे लिहिले आहे की, ग्रहणास श्राद्ध करावे, म्हणजे बाप मोक्षास जातो. बरे, ग्रहणात जो ब्राह्मण जेवतो, त्यांस जर पाप लागते असे आहे, तर दुसऱ्यास पापात घालून बापास मोक्ष कसा होईल हे सांगा. एकाचे डोके मारल्याने दुसरा जिवंत होतो काय? तात्पर्य, शास्त्र करणाराचे मत असे दिसते की, ग्रहणात जेवले तर पाप मुळीच नाही. हे त्यांस ठाऊक होते. कारण की, ग्रहण छाया पडल्यामुळे होते. त्यात जेवले म्हणून पाप कशाचे? नित्य शुक्ल पक्षात चंद्रावर सावली असते; त्यामुळे अंगुलमात्र चंद्र कमी अधिक होतो, हेही ग्रहणच आहे. कारण की ज्या कारणाने ग्रहण, त्याच कारणाने शुक्ल व कृष्णपक्षींचा अधिक उणा चंद्र होतो. याजमुळे चांदण्यात कोणी जेवीत नाहीत की काय?

तो शास्त्रकर्ता इतके समजत होता, परंतु ग्रहणात ब्राह्मणास जेवावयाचे निमित्ताने त्यांस रुपये मिळवून द्यावयाचे होते; याजकरिता हा धर्म लावून दिला. वस्तुतः पाप नाही, हेच खरे. आणि पुराणकर्त्यांनी लिहिले आहे की, ही पुराणे आम्ही स्त्रिया व क्षूद्र इत्यादी जातीस वाचण्याकरिता केली आहेत, याजमुळे असे दिसते की, इतर जाती अज्ञानात ठेवून ब्राह्मण जातीजवळ मात्र वास्तविक ज्ञान ठेवावे, असा त्यांचा हेतू होता. म्हणून त्यांनी पुराणात ब्राह्मणांचे पाहिजे तसे महात्म्य व नाना प्रकारच्या वेड लावावयाच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्याचा अर्थ लाक्षणिक समजला पाहिजे. जसा चंद्र कमी होतो, म्हणून क्षयरोग आहे, असे कवींनी वर्णन केले आहे व अधिक होतो म्हणून त्यांस बळ अमृत आहे, असे लिहिले आहे.

परंतु खरे नाही; केवळ कवींची कल्पना आहे. इत्यादी गोष्टी अशा असता मला चमत्कार वाटतो की, हल्ली हे मुंबईचे व इतर ठिकाणचे परभू व सोनार ब्रामणात शिरण्याचा हेवा, मत्सर व उद्योग कशाला करतात? त्यापेक्षा आपण सर्व मिळोन एक होण्याचा यत्न केला, तर बरे होईल. किती एक परभू ब्राह्मण व्हावे, अशी इच्छा करतात. ते ब्राह्मणांसारखे गंध लावतात व देवपूजा वाढवतात. परंतु मला तर हे मूर्ख वाटतात. इतका प्रयत्न करून ब्राह्मणांत

येऊन फायदा काय? किती एक नमस्कारासाठी भांडतात, मला वाटते की, महारास देखील नमस्कार करावा. त्यात आहे काय? या किंचित गोष्टीचा वाद कशास पाहिजे? परंतु ब्राह्मणास प्रारंभापासून पैसा काढण्याचे साधन या युक्तीने होते. परभू ब्राह्मणांची संध्या वगैरे मुलांस शिकवितात. त्यापेक्षा एखादे सार्थ नीतीचे अगर धर्माचे पुस्तक का शिकवीत नाहीत? ही भटांची मजुरी कशास शिकवितात? यात काय आहे? मला तर काही वाटत नाही.

परंतु हे दोन्ही जातीचे लोक मूर्ख आहेत. ते ब्राह्मण व्हावयास पाहतात. अशी ही तऱ्हा चालली आहे. तेव्हा आता धर्मसुधारणा निघेल तर हे सर्व तंटे मिटतील. व आपला धर्म शुद्ध आणि सुंदर म्हणून पुष्कळ लोक यास साह्य करतील. यात संशय नाही. हे कोणी तरी मनावर घेणे जरूर आहे.

## देवळे व नेमधर्म

**पत्र नंबर ७४ : ९ सप्टेंबर १८४९**

हिंदू लोकांमध्ये द्रव्याची व्यवस्था चांगली होत नाही. लोक मूर्ख आहेत. याजमुळे किती एक प्रकारे ते खर्च करतात. त्यात काही फायदा होत नाही. द्रव्य व्यापारात असावे किंवा धर्माकडे तरी लागावे. या लोकांस द्रव्याचा व्यय करता येत नाही. लक्षावधी रुपये खर्च करून देवळे बांधितात आणि त्यात मोठे धर्मकृत्य केले, असे समजतात; परंतु बहुधा हे धर्मकृत्य केले असे होत नाही.

आज पुण्यात शेकडो देवळे व हजारो मारुती. मारुतीचे जन्माचे दिवशी कोणतेही रस्त्यास मारुतीचा उत्साह नाही, असे बहुधा होत नाही व किती एक देवळे पडून गेली आहेत. कित्येक अनावस्थेत आहेत. किती एक देवळे कसबिणीकडे भाड्याने आहेत व कित्येक देवळांचा दुर्लौकिक होऊन वाईट नावे पडली आहेत. भांग्या मारुती, खुन्या मुरलीधर, छिनाल बालाजी, मोदीचा गणपती इत्यादी नावे पडली आहेत. येणेकरून असे समजते की हिंदू लोकांत देवांची, देवळांची मर्यादा नाही. बरे, इतकी देवळे असता आणखी बांधावयाची काय गरज? परंतु मूढ लोक अद्यापि आणखी बांधितात. कोणी आपल्या

घरी बांधतो व कोणी वेगळी जागा घेऊन बांधतो व म्हणतो की, हे मोठे धर्मकृत्य आहे.

पुण्यात आणखी देवळे बांधणारासारखे आणखी कोणी या जगात मूर्ख दिसत नाहीत. लाखो रुपये जे अशा मूर्खपणाने खर्च करतात. ते अगदी ज्ञानशून्य व अविचारी म्हणावे; परंतु या लोकांचा वेडेपणा घालविण्याचा प्रयत्न भट व शास्त्री आणि पंडित करीत नाहीत. ते उलटे असे करणारांस जाऊन सांगतात की. अमके पुराणात असे लिहिले आहे की, देऊळ बांधल्याशिवाय जन्माचे सार्थक होत नाही व मागे अहिल्याबाईने नर्मदातीरी अडीचशे देवळे रांगेने बांधली. केवढी ती बाई धन्य होय! असे सांगून त्या मूर्खास फारच चढी देतात. ज्यांचे कर्म लोकांचा मूर्खपणा दूर करावयाचे, तेच त्यांस वृद्धिकर्ते होतात. याचे कारण असे आहे की, ब्राह्मण लोकांची उपजीविका या कामावर आहे. म्हणून ते असा मूर्खपणा वाढवून दोन पैसे आपणांस मिळावे, असा बेत अल्पमती करीतात. त्यांस केवळ नफ्याची बुद्धी आहे. म्हणून ते या अज्ञानाचे सांप्रत पोसिंदे आहेत. आणि ते प्रयत्नपूर्वक अज्ञान वाढवितात व संपूर्ण देशातील लोक विचारहीन आहेत याजकरिता त्यांस कळत नाही. हे जे सांगतात, त्याजवर भरवसा ठेवितात आणि अडाणी जातीचे लोक वगैरे यास ब्राह्मण व भट फार फसवितात, वास्तविक धर्म त्यांस कळत नाही.

वास्तविक धर्मात काही तरी दया आणि शांती या गुणांचे निदर्शन झाले पाहिजे व ती दयाही भलभलत्यावर उपयोगी नाही. जे सुशील, उपयोगी व लोकांची सेवा करतात, त्याजवरच असावी. याखेरीज व्यय करणे मूर्खपणा आहे. अहिल्याबाईने धर्म केला, तो पैसा यथाव्यय उत्तम प्रकारे झाला असता, तर फायदा होता. परंतु तिचा धर्म असा होता की, काशीहून पाणी आणून दक्षिणेत स्नान नित्य करावे; एक बाह्मणाकडून नित्य काशीस जातो, असे म्हणवावे आणि दुसऱ्याकरवी जाऊ नये असे म्हणवावे व त्यात महान पुण्य मानून पैका द्यावा. आता असा धर्म जेथे होतो, तेथे लोक किती आळशी होतील व किती मूर्ख असतील? मेहनती कुळंबी वगैरे लोकांपासून त्यांचे शरीर पिळून, द्रव्य घेऊन, ते आपले आळशी भटांस दिले म्हणजे केवढा राज्यात जुलूम होईल? परंतु असे झाले आहे आणि कोट्यवधी रुपये याप्रमाणे खर्च झाले आहेत. हेच सांप्रतच्या मूर्खपणाचे कारण होय!

निकामी भटांस पोषणार्थ पैका देतात आणि त्यात लोकांस पुण्य वाटते. याजमुळे ब्राह्मण भ्रष्ट होतात, दुसरे काही करीत नाहीत; परंतु ज्या गृहस्थाचे

घरी भट असतो, त्याचा प्रयत्न एवढाच असतो की, भटशस पैका द्यावयाच्या वाटा नाना प्रकाराने यजमानास सुचवाव्या. संक्रांत आली, म्हणजे त्यांस सांगावे की तिळपात्रे द्यावी म्हणजे पुढे फार फळ आहे. दशाहार आला, म्हणजे वायने देववावी. आणि त्यात पाहिले, तर एकही पदार्थ उपयोगाचा नसतो. वीतभर सूप, बोटात जावयाच्या नाहीत अशा दोन बांगड्या; कोणत्याही कामाच्या उपयोगी पडावयाचा नाही, असा एक करंडा आणि चार पैसे, त्या मूर्ख गृहस्थास नाना प्रकारे गोष्टी त्याकडून सांगून देववितात; आणि चार पैसे मिळाले, एवढाच लाभ मानून इतर जिनसा टाकून देतात. याप्रमाणे वर्षांत किती वेळ करतात, याचा ठिकाण नाही व ब्राह्मणांस पुण्यकाळ किंवा व्रताचा दिवस सांपडणार नाही असा कोणताही दिवस वर्षांत नाही. त्याविषयी पुराणात तयारी आहेच. असा व्यर्थ खर्च गृहस्थाकडून करवितात आणि मग त्यांस जी प्राप्ती होते, जीवर हा खर्च व त्याचा जरुरीचा खर्च जातो. मग चांगले कामास खर्च करावयास त्यांस सामर्थ्य कोठून राहणार? भट सर्व मिळून जातो आणि मूर्ख यजमान असला, म्हणजे भटाचे त्याचे फारच जमते.

यजमान वारंवार भटास पुसतो, हे कर्म चांगले सांग झाले ना? भट म्हणतो, " सांग सामर्थ्याप्रमाणे झाले; परंतु आणखी चार आणे जास्ती खर्च करता, तर बरे होते. उदककुंभावर दक्षणा फारच थोडी पडली. " मग भोळसर यजमान असला, म्हणजे त्यांस तेच खरे वाटते आणि भटाचे सांगितल्यावरून चालतो. मुख्यत्वेकरून बायका फारच मूर्ख व अज्ञान असतात. याजमुळे या देशातील स्त्रियांस भट फार फसवितात.

काय काय चमत्कार आहेत, ते लिहिताना पुरणार नाहीत. एखादी विधवा स्त्री झाली, म्हणजे तिच्याजवळ दोन पैसे असले, तर ते हरण करण्यास भट कारण होतात. तिला सांगतात की, बाई तुमचा नवरा मेला; आता मुले कोणाची, आणि बाळे कोणाची? तुम्ही आपले जन्माचे सार्थक करून घ्या. या जन्मी वैधव्य प्राप्त झाले, असे पुढे तरी होऊ नये म्हणून काही प्रयत्न करा. हा पवित्र वैशाख आहे; किंवा कार्तिक आहे; अगर चातुर्मास्य आहे. पुष्कळ नेमधर्म व देवब्राह्मण याजकडे व्यय करीत जा; म्हणजे ईश्वर संतुष्ट होईल. देवाचे तोंड ब्राह्मण आहेत. त्यांस मिळाले म्हणजे देवास पोचले. आणि पहा, देवळात इतके लोक पैसे देतात; परंतु देव घेत नाही. ब्राह्मण घेतात. का की, देवाचे तोंड ब्राह्मणच. अशा गोष्टी सांगून त्यांजकडून दोन पैसे असतील, ते बाहेर काढवितात व स्त्रियांस मूर्खपणामुळे कित्येक गोष्टी ज्या उपहासास कारण,

त्या खऱ्या वाटतात. मग बाई नेम धरते की, रोज नित्य दान किंवा नित्य गोप्रदान करावयाचे आणि भटजीबाबास द्यावयाचे. असे भटजीबाबा स्वस्थ बसून काही उद्योग न करता खातात. याप्रमाणे धर्माची व्यवस्था होती. याजमुळे किती एक हजार गरीब लोक उपाशी मरतात, पण त्यांची दया कोणास येत नाही; आणि हे निरुद्योगी भट अज्ञान व आळस यांचे चौकीदार! सर्व धन खातात.

याप्रमाणे देऊळ बांधण्याचा मूर्खपणा आहे. याजकरिता हल्ली जे गृहस्थ असे म्हणतात की, घरी भट नित्य पंक्तीस असल्याखेरीज अन्न घेऊ नये. त्यांणीं विचार करावा आणि भटासारखे पशू होऊ नये.

## मद्यपान

**पत्र नंबर ७६ : २३ सप्टेंबर १८४९**

अलीकडे इंग्रजी राज्य झाल्यापासून लोकांस सद्‌गुण लागावयाचे, एकीकडे राहून, महान भयंकर व त्वरित वृद्धी पावणारा असा एक दुर्गुण लोकांमध्ये प्रगट झाला आहे. तो कोणता म्हणाल तर दारू पिणे. पहा की, पूर्वीचे राज्यात दारू कोणी पीत नव्हते व उत्पन्नही कोणी करीत नव्हते. ब्राह्मण व मराठे राज्य करणारे. तेव्हा ते दारू उत्पन्न करणारास नीच मानीत आणि आपली झाडे त्यांजला दारू करण्यास दिली तर त्यांस बहिष्कृत करीत. आणि कोकणात अशी चाल होती की, दारू करणारा हातात दारू घेऊन जर अंगावरून गेला, तर दर्शनदोषास्तव स्नान करीत आणि दारू प्यालेला ब्राह्मण कधी आढळत नव्हता. जर कदाचित कधी कोणी पाहिला तर लोक त्यांस निंद्य मानून कधीही जातीत घेत नव्हते व ज्या गावात तो रहात असे, तेथे त्याचे फार हाल होत असत. त्याचे लग्नकार्य व्हावयाचे नाही व कोणी त्याजकडे जेवावयास जात नव्हते. असा त्याचा धिक्कार करीत असत. जर कोणी अतिशूद्रादिकांकरिता दुकान घातले तर एकीकडे छपवून चोरून घाली. परंतु तेथे कोणी बहुतकरून जात नव्हता. व भाविक लोक त्या रस्त्याने जात येत नव्हते व सरकार अशा व्यापाऱ्यापासून उत्पन्नाची आशा करीत नव्हते. म्हणून लोकांस मना करता

येत होते.

परंतु हल्लीचे सरकारची फार विपरीत वर्तणूक आहे. सप्टेंबरचे दहावे तारखेचे पुण्याचे 'ज्ञानप्रकाशात' सरकाराविषयी एक कलम लिहिले आहे व त्यांस दृष्टान्त तेल्याचा दिला आहे, तो खरा दिसतो, पहा की, सरकार लोकांच्या स्थितीकडे किमपि पहात नाही. द्रव्याची आशा धरून दुर्गुणावर उत्पन्न करतात. आणि प्रसिद्धपणे दुर्गुण वाढू देतात. जर त्यांनी उत्पन्न सोडले, तर त्यांस मनाई करण्यास तोंड होईल व जर उत्पन्न करतील तर त्यांस दुर्गुण बंद करण्यास तोंड नाही. कारण की, एका हाताने दारूची विक्रीचिठी देतील, आणि दुसरे हाताने लोकांस पिऊ देऊ नका, म्हणून सांगतील, हे नांदणार नाही. यास्तव त्यांणीं उत्पन्न सोडून दिले पाहिजे; म्हणजे त्यांचा दाब बसेल आणि मनाईकरिता कायदे करता येतील. याप्रमाणे विलायतेतही कायदे झाले आहेत. मग या देशात सरकारने असे करण्याचा हेतू कोणता ?

अद्याप हा दुर्गुण लोकांमध्ये विस्तीर्ण व दृढ झाला नाही, तोपर्यंत सहज मोडता येईल. नाही तर जर सरकारने अशीच वर्तणूक आणखी कित्येक वर्षेपर्यंत चालविली तर अवघड पडेल. यास्तव हे त्वरित झाले पाहिजे. मद्यपान करणे, हे फार वाईट कर्म आहे. येणेकरून द्रव्य, शक्ति, बुद्धी ही नाशाप्रत पावतात, ज्या गावी दारूची दुकाने आहेत तेथील लोक किती खराब झाले असतात व विलायतेतही असेच आहे. ज्या ठिकाणी दारूची दुकाने आहेत त्याचे शेजारी राहणारे लोकांस दुर्गुण लागून ते सर्वस्व घालवून बसतात आणि भिकारपण येते. त्यांची पोरेबाळे उपाशी मरतात. व जे मेहनत करून मिळवितात ते पुरेनासे होते. कारण या दुर्गुणास व्यर्थ पैसा बहुत खर्च करावा लागतो. यास्तव सर्व पैसा इकडे जातो. आणि करमत नाहीसे होते. अखेरीस दारू पिणाराची बुद्धी मंद होते, आळस वाढतो, काम होत नाही; आणि सर्व प्रकारे त्याची हानी होते. याप्रमाणे किती एक लोक हल्ली होत चालले आहेत.

सामान्यतः लक्षात आणा की, इंग्रज लोक मोठे आहेत; परंतु त्यांची बुद्धी हिंदू लोकांइतकी नाही. त्यांस बारीक गोष्ट व अवघड गोष्टी यांची समजूत होत नाही, हे जे इकडे इंग्रज लोक कामावर येतात, त्यांचे वर्तणुकीवरून समजते. आणि हिंदू लोक ब्राह्मण वगैरे यांची बुद्धी बहुत जलद व समज चांगला, परंतु आळसाने व्यर्थ गेला. व सुशिक्षा नाही. येणेकरून चांगली बुद्धी वाईट कामाकडे लावतात. परंतु तसे इंग्रज लोक नाहीत. त्यांस लहानपणापासून शिक्षा चांगली असते. याजकरिता ते विद्येमध्ये निपुण असतात व उद्योगाने परिपूर्ण असतात.

तत्रापि ही गोष्ट खचित आहे की, इंग्रज लोकांचे बुद्धीस मंदपणा असतो, याचे कारण दुसरे काही नाही. दारू वगैरे मादक पदार्थ भक्षण करतात. येणेकरून त्यांचे बुद्धीस जरा येते. आणि जेव्हा एखादा मुकद्दमा सोपा असतो व त्यात काही तक्रार नाही असते, तेव्हा तो त्यांस समजतो. परंतु जो मुकद्दमा तक्रारीचा असतो व ज्यांस बहुत घोटाळा असतो, तो किती जरी समजाविला, तरी समजत नाहीत मग न समजताच हुकूम देतात, हे आम्ही नित्य पहातो व असेच सर्व ठिकाणी आहे. इंग्रज लोक बारीक कज्जे व तक्रारी सर्व बरोबर समजणारे क्वचित आहेत. आणि असले तरी त्यांस बुद्धी नीट ठेवावी लागते. फार श्रम होत नाहीत. दरम्यान हवा बदलून आराम विश्रांती घेतात, तेव्हा पुन्हा बुद्धी ताळ्यावर येते आणि त्यांस कामकाज सुचते.

परंतु हे आमच्या लोकांस नको. हे पन्नास वर्षे सारखे काम करीत असले तरी त्यांस बुद्धी ताळ्यावर आणावी लागत नाही. व नाना फडणीस वगैरे मेहनती लोक होते ते एक दिवसही कामाखेरीज बसले नाहीत. याचे कारण हेच की, आमचे अन्न निर्मळ आणि इंग्रज लोकांचे अन्न बुद्धी मंद करणारे जड आहे. परंतु त्यांचे देशाची हवा शीतळ आहे. याजमुळे ते उद्योगी असतात. आमचे देशात हवा उष्ण येणेकरून लोक आळशी आहेत. ते जर मद्यमांस खाऊ लागले, तर फारच आळशी होतील.

दारूसारखा दुष्ट पदार्थ दुसरा नाही व या पदार्थाचे व्यसन फार बलाढ्य आहे. एकदा लागले, तर सुटत नाही. व सर्वस्वी गेले आणि सर्वांचा नाश झाला, तरी काही सुटत नाही. हे व्यसन मोठे घातकी आहे. यास्तव शासन नेमून याजपासून लोक परावृत्त केले पाहिजेत. परंतु हे दारू पिणारांचेच राज्यात होईल काय ? अस्तु. व्हावे हे चांगले. ते आपण स्वतः दारू पितात. परंतु टाकतील तर त्यासही चांगले आहे. आमचे लोकांस हे व्यसन न लागावे इतके तरी त्यांनी केले पाहिजे. जरी आज ते उत्पन्नावर व लोभावर दृष्टी देत असतील, तरी हे करणे सरकारास योग्य नाही. कारण आज थोडे उत्पन्न होईल. परंतु लोक जर भिकारी झाले आणि दरिद्री होऊन काही उपयोगी नाहीत असे झाले, तर मग सरकार त्याजपासून काय घेईल ? सरकारची मातोश्री लोक आहेत. त्यांस त्यांजला रोगी, आळशी, अशक्त करून मग त्यांचे पोरांचे पोषण कसे होईल ? याजकरिता उत्पन्न सरकारने अगदी सोडून मनाई करावी म्हणजे लोक जगतील. नाही तर या सरकारखाली जी रयत आहे, तीस हे व्यसन कधी सुटावयाचे नाही व इंग्रज लोक या देशातून गेले तरी इकडे या लोकांत हे व्यसन राहून त्यांचे पाय इकडे लागले होते, हे स्मरण इतिहासातच राहील

असे नाही; परंतु प्रत्यक्ष लोकांचे स्थितीत राहील. याजकरिता हा बदलौकिक करणारे उत्पन्नाची बाब सोडून देतील, तर चांगले होईल.

ही गोष्ट आमचे मूर्ख लोक आहेत त्यांस ठाऊक नाही. व त्यांनी दारू पिण्यापासून अनर्थ काय आहेत, ते पाहिले नाही. परंतु हे जर काही दिवस चालले तर लवकरच पहातील. सांप्रत लोक हौसेने दारू पितात व तिचे गुण वर्णितात; ते असे की, ही बळ आणणारी आहे. कोणी म्हणतात की, ही रोगनाशक आहे. कोणी म्हणतात की, यज्ञातदेखील सुरापान आहे. कोणी म्हणतात यंत्रशास्त्राप्रमाणे ही शुद्ध आहे. याप्रमाणे म्हणून हल्लीचे पंडित, शास्त्री व गृहस्थ पुण्यात व इतर ठिकाणी निर्लज्जपणाने दारू पितात. शूद्रादिक पितात हे सोडून द्या. परंतु प्रत्यक्ष ब्राह्मण व शास्त्रीदेखील शाक्त होऊन कुकर्म करतात. दारू व मांस खावयास मिळावे, म्हणून शाक्त होतात आणि पूजेचे निमित्त करून मनास वाटेल तितकी दारू पितात.

ब्राह्मण लोकांचे मुख्य शहर पुणे आहे. तेथे आम्हास पक्केपणी समजले आहे की, शास्त्री, पंडित व गृहस्थ मिळून पाचशे असामी दारू पिणारे आहेत. त्यांतील किती एक मस्त होऊन रस्त्यावर पडतात, किती एक चोरून आपले घरी यंत्रे ठेवून दारू काढतात. गूळ किंवा तांदूळ कुजवून भट्टचा घरी लावतात आणि लाल तांबडे डोळे करून, कपाळी तांबडा शेंदूर किंवा कुंकवाचे टिपके लावून प्रसिद्धपणाने फिरतात व तोंडास घाण येतच असते; तसेच तोंड धरून लोकांत येतात. परंतु कोणी त्यांस बहिष्कृत करीत नाहीत. याजवरून ब्राह्मण लोक अतिशूद्राचे योग्यतेबरोबर आले आहेत किंवा नाहीत, ते पहावे. जे ब्राह्मण अशी कामे करतात, ते ब्राह्मण म्हणावे की काय?

ब्राह्मण लोकांची नीती बुडाली; व त्यांस चांगले कोणते व वाईट कोणते हे कळत नाही; व चांगल्यांचा प्रयत्न करून त्याची स्थापना करावयाची हे त्यांस ज्ञान नाही. यास उदाहरण, बाजीराव राज्यावर होता तेव्हा जे त्याचे अंकित होते, त्यांच्या स्त्रिया त्याने भ्रष्ट करून नाना प्रकारची कुनीती केली. परंतु त्यांस प्रतिकार कोणाच्याने करवला नाही. पुण्यात शास्त्री व पंडित त्या वेळेस बहुत होते परंतु साखरभात खाऊन 'वाहवा' म्हणत गेले. याप्रमाणे त्या मूर्ख, चांडाळ, दुष्ट व अतिशूद्राहूनही नीच प्रभूस राज्यावर भटांनी व गृहस्थांनी रक्षण केला त्याचे परिणाम आज सर्वांस त्यातून बहुधा ब्राह्मणांस प्राप्त झाले आहेत.

त्या वेळेस तो अधिकारी होता, म्हणून कोणाचा उपाय चालला नाही, असे जर म्हणतील, तर हल्ली जे शाक्त पुण्यात आहेत, हे काही अधिकारी नाहीत. कोणी द्रव्यवान आहेत खरे, पण त्यांचे पारिपत्य बाकीचे सर्व ब्राह्मण मिळून का करीत नाहीत ? हा माझा प्रश्न सर्वांस आहे. जे दारू पीत नाहीत, त्यांनी हा विचार करावा. दारू पिणारे प्रसिद्ध आहेत व सर्वांस ठाऊक आहेत व पिणारे आहेत त्यांचे तोंडच साक्ष देईल. ते फार नाहीत. यांचे पंक्तीस जेवणे, त्यांचे घरी जाणे, सोयरगत करणे, हे का चालू देतात ? एकदम त्यांस बहिष्कार घालीत नाहीत. परंतु हतवीर्य हे ब्राह्मण, यांस ज्ञान नाही, शक्ती नाही; नीती कोणती, अनीती कोणती हे जाणत नाहीत. आणि निर्लज्जपणाने दारू पिणारांचा सहवास करतात. कोणी भिक्षुक म्हणून करतात. कोणी चाकर म्हणून, कोणी स्नेही म्हणून, कोणी मित्र म्हणून, कोणी मूर्ख म्हणून करतात.

जर त्यांस जातीचे भय किंवा बहुत लोक नीतिमान आहेत, त्याजपासून भय प्राप्त होईल; तर या सर्वांमध्ये आपण निंद्य आहो, असे वाटेल. स्वस्थपणाने दारू पितात, त्यांचे तोंडाची घाण सर्व लोक घेत फिरतात. हे धर्मशास्त्रात केवढे विपरीत आहे ? तंत्रशास्त्र व शाक्तमत हे नरकाचे द्वार आहेत व या मताचे लोक नरकात जातील, यात संशय नाही.व या मताचा पोथ्या कोणी केल्या असतील त्या असोत, परंतु ते उत्तम पुरुष नव्हते; व त्या सर्व पोथ्या उकिरड्यावर टाकण्याच्या लायक आहेत; यास्तव येविषयी लोकांनी सावध व्हावे.

## दया

पत्र नंबर ७९ : २१ ऑक्टोबर १८४९

श्रीमंतांचा व गरिबांचा या जगात दूरचा संबंध आहे, तरी परलोकात फार जवळचा संबंध आहे. याकरिता दया हा आपला एकमेकांचा प्रथम धर्म आहे. सर्व धर्मांचे सार दया आहे.

गरीब हा श्रीमंतांचे जुलमाने होतो. काही जन्मतः कोणी गरीब नसतो. याकरिता सर्वांवर दया करावी हा उत्तम मार्ग. सर्वदा न्याय दयेच्या अनुषंगाने

करावा. आणि असे मनात वागवावे की, आम्ही मरणानंतर ईश्वरापाशी दया मागू. त्याचे दयेवाचून आमचा परिणाम लागणार नाही. म्हणून जर आपण दुसऱ्यापाशी दया मागण्यास सिद्ध आहो, तर तसेच आपण करून दाखविले पाहिजे. तरच आपले मागणे पसंत होईल. सर्व जीवजंतू ज्ञात-अज्ञात हे दयेस पात्र आहेत. परंतु हिंदू धर्मात यज्ञादिक कर्मे आहेत, ती ईश्वरापासून झाली असतील, असे मला वाटत नाही. दुसऱ्या जनावरांवर आपले पाप ठेवून त्याजला मारावे, म्हणजे त्याचे दुःखाने आपले पाप जाईल; ही गोष्ट विचारास विरुद्ध आहे परंतु याप्रमाणे चाल बहुत दिवसांपासून आहे.

ज्या काळी ईश्वराने माणसे निर्माण केली त्या काळी ती अमक्या कारणाकरिता केली, असे पक्के समजत नाही. परंतु अमुक रीतीने चालावे व अमुक रीतीने न चालावे, ईश्वराने प्रत्येक माणसाचे बुद्धीस प्रेरिले आहे, हे खचित आहे. ईश्वराने आपली बढाई वाढवावी, म्हणून माणसे केली असे नाही. ईश्वरास माणसांच्या कीर्तनाने अधिक थोरपणा येतो, हे मिथ्या आहे. तत्रापि मनुष्यांनी जो आपला निर्माणकर्ता असेल, त्याची सेवा करावी, हाच धर्म योग्य आहे. व नीतीने वागावे म्हणजे सुख होते. परंतु यज्ञ करण्यास सांगितले असेल, असे वाटत नाही. यज्ञ करणे हे अनुचित व अविचारी कर्म आहे. हे बहुधा मनुष्यांनी योजिले असावे. प्रथम मला वाटते, ईश्वराने इतकाच धर्म लावून दिला असेल की, यांनी चांगली वर्तणूक करावी आणि ईश्वरावर भार ठेवून वागावे, एवढाच धर्म होता.

हे अशावरून वाटते की, इतर धर्म सर्व माणसांस लागू पडत नाहीत. जर इंग्रजांचा धर्म खरा म्हणावा तर अलीकडे उत्पन्न झाला. तेव्हा त्याचे मागे व ज्या देशात तो धर्म माहीत पडला नाही त्या देशातील माणसे नरकात गेली की काय ? हे बरोबर नाही. तशीच मुसलमानांचे धर्माची अवस्था आहे. ईश्वरप्रेरित धर्म सर्वांस सारखा कळावा. जशी त्याने लोकांस खाण्यापिण्याची सोय करून दिली, तद्वत धर्माचीही तयारी केली असेल. व जर जनावरांचे यज्ञ यास धर्म म्हणावा तर त्याविषयीही ऐक्यता होणार नाही व जनावरे वेगळाली प्रत्येक देशात आहेत. तेव्हा त्यांपैकी कोणत्या जनावराच्या रक्ताने ईश्वर संतुष्ट होतो, तेही बरोबर कळत नाही व यज्ञ करता करता माणसे माणसांचा यज्ञ करू लागली व जर इतर जनावरांचा यज्ञ देवास पाहिजे, तर मग माणूस, सुंदर जनावर, याचा यज्ञ का नको ? तस्मात् यज्ञाचा धर्म अगदी खोटा आहे. आता हा धर्म खोटा आहे, असे दिसते.

याजवर कोणी अशी तक्रार करतील की, शरण गेल्याने देव पापे सोडतो

असे जर आहे, तर एक दिवस ईश्वरास शरण गेले, म्हणजे पापमुक्त होऊ. तर त्याचे उत्तर आहे असे की, ईश्वर न्यायी आहे व दयाळू आहे. हे दोन्ही गुण ईश्वरास आहेत. म्हणून तो पापाचे शासन करील हेही खचित आहे, परंतु शासन करण्यास तो स्वतः अधिकारी आहे, असे म्हणावे तर न्यायास विपरीत होते; परंतु तसे नाही. न्याय व दया होते, याचा पर्याय असा आहे की, ईश्वराने आपल्यास प्रतिबंधकारक काही नेम केला नाही. तेव्हा पापास दंड हे खचित. परंतु जे पापी शरण येतील, देवाचे भय ठेवतील, व शरण आल्यापासून पुनरपि पाप करणार नाहीत. ते पापी मुक्त होतात. एकीकडे शरण जावे आणि दुसरीकडे पाप करावे, हा अर्थ त्याचा नाही.

यास आधार गीतेत असा आहे, "मामेकं शरणं व्रज"; "मला शरण ये, म्हणजे पापमुक्त होशील आणि तरशील." दुसरे ठिकाणी असे सांगितले आहे की, "ददामि बुद्धियोगं" म्हणजे शरण येतो, तो भावबळाने चांगला होतो. पुनरपि पाप करीत नाही. तेव्हा ईश्वरास जो प्राणी शरण गेला, त्यांस अशी बुद्धी झाली, म्हणजे तो प्रसाद असे समजावे, व त्या प्रसादाचा दाखला असा आहे की त्याने पाप सोडून द्यावे म्हणजे तो शरण गेला हे खचित, व त्याचा भाव बसला हे खचित; आणि ईश्वराची कृपा त्याचे ठिकाणी राहिली हे खचित. नाही तर हातात माळा घेऊन लबाड लोक भजन करतात आणि खोटे बोलतात व पापकर्म सोडीत नाहीत, म्हणून ते शरण झाले असे आम्ही मानीत नाही.

जगात नाना प्रकारच्या युक्ती काढल्या आहेत; परंतु मी वरती धर्माचे मूळ लिहिले आहे, याप्रमाणे एक साधूच्या मुखातून मी ऐकले आहे. परंतु गीतेची वाक्ये त्याने अशी जुळली ती ऐकून मी समजलो, धर्माचे तात्पर्य एकच आहे. ख्रिस्तीयन म्हणतात की, मनुष्यामध्ये आणि ईश्वरामध्ये एक जामीन रदबदलीस पाहिजे. असेच मुसलमानांचे धर्मात आहे, व तो सर्व पापे आपले शिरावर घेतो, असे मत आहे; पण मला वाटते की, मध्यस्थाची योजना धर्म लावून देणारांनी ईश्वरावर भाव बसण्याकरिता जशा मूर्ती हिंदू लोकांनी केल्या, तशी जामिनाची व मध्यस्थाची युक्ती काढली आहे. परंतु मुख्य तात्पर्य हेच आहे की, ईश्वर न्यायी आहे; तथापि दयाळू आहे व शरणागतांस रक्षितो.

जर एखाद्याने असा नेम केला की, मी जितके चोर आढळतील तितक्यास मारीन; परंतु जर कोणी चोर मला शरण येऊन वचन देईल की, पुन्हा चोरी करणार नाही. आजपर्यंत अज्ञानाने झाले ते क्षमा करा, मी पुन्हा करणार नाही तर त्यांस माफी देऊन जे चोर दांडगे असतील त्यांस मात्र मारीन, तर तो

पुरुष न्यायी आणि दयाळू म्हणावा किंवा नाही? त्याने चोरास सुटण्याकरिता एक मध्ये संधी ठेवली म्हणून त्याचे न्यायास विरुद्धता येत नाही. ईश्वर तर दयाळू आहे. त्याणे प्रत्येक जन्मात वारंवार संधी ठेवली आहे. जो जो मनुष्य जन्मास येईल त्यांस संधी आहेच. तरणोपायास मनुष्यजन्म आहे. या जन्मी न केला तर पुन्हा ईश्वर जन्मास घालील तेव्हा तरी करावा. अशा त्याने दयाळूपणाने वाटा ठेविल्या आहेत. म्हणून त्याचे न्यायास विरुद्धता येत नाही. इंग्रजांचे मताप्रमाणे एकच संधी आहे. पण हे बरोबर नाही.

अशक्त जीवावर दया करणे हा मुख्य ईश्वरभजनाचा मार्ग आहे. दयेविना धर्माचे व कर्माचे सार्थक नाही. परंतु किती एक लोकांस आम्ही या जगात मरणार याचे विस्मरण होते व मग ते आपणांस आणि दुसऱ्यास एक नजरेने पहात नाहीत. जो घोड्यावरून जातो, त्यांस पायांनी कोण चालतो हे दिसत नाही आणि आमचे लोकांस दया फार कमी आहे. मूर्खपणास दया समजतात, म्हणजे अपराध्यास सोडणे हे दया नाही. न्यायास विरुद्ध न येता सोडणे ही मात्र दया. असेच दया म्हणजे अज्ञानास ज्ञान द्यावे; गरिबास द्रव्य, रोग्यास औषध, निराधारास व भुकेल्यास अन्न इत्यादी स्वभावाने द्यावे व त्यात संतोष मानावा. गरिबास पहाताच कळवळा यावा, असे सत्पुरुष थोडे आहेत परंतु जन्माचा हाच उपयोग आहे.

## भक्ती, कर्म आणि ज्ञान

पत्र नंबर ८३ : २५ नोवेंबर १८४९

हिंदू लोकांचा धर्म वास्तविक विचाराने पाहिला तर फक्त इतकाच आहे की, परमेश्वर जो एक, त्याचे भजन करावे; आणि त्यावर भाव बसण्याकरिता काही तरी मध्यस्थासारखे दगडाची मूर्ती, गुरू किंवा नदी काही तरी घेऊन त्याचे आश्रयाने भक्ती दृढ करावी. आणि भाव पक्का ठरला म्हणजे त्या मध्यस्थाचीही गरज नाही व कोणत्याही कर्माची गरज नाही. आणि वेदशास्त्र यांच्याही आज्ञा त्यांस मानावयास नकोत.

जे पुरुष संसारात आहेत त्यांस मात्र वेदशास्त्र शासन करते; परंतु परमार्थावर

लक्ष देऊन जे संसार सोडितात त्यांस त्यांचे शासन नको, ही गोष्ट सर्व कबूल करतात. जरी ते म्हणतात की, शास्त्र ईश्वरापासून निर्माण झाले तथापि ते असे म्हणतात की, व्यवहार नीट चालण्याकरिता मात्र ते कले, मोक्षाचे साधन शास्त्र नाही. तसेच ज्ञान म्हणजे मनुष्याने सारासार विचार पाहून परमेश्वराशी ऐक्यता पावून रहावे म्हणजे त्यांस शास्त्राची गरज नाही. यावरून ज्ञान हे सर्व कर्ममार्गाहून व शास्त्राहून अधिक आहे. व ज्ञान हे फक्त मनुष्याचे अकलेपासून फळ आहे, तेव्हा अक्कल हीच मोक्षाचे साधन आहे आणि अकलेपासून जो ज्ञानधर्म उत्पन्न झाला, त्याने मोक्षाचे साधन होते.

व्यवहार व संसार यथास्थित होण्याकरिता पूर्वपार अनुभवावरून किंवा मनुष्यांनी व्यवस्था लक्षात आणून जे नियम ठरविले ते शास्त्र; व यज्ञ, पूजा इत्यादी जे धर्म आहेत तेही त्याप्रमाणे होत. ते काही ज्ञान नाही मग मनुष्यांनी केले असता अथवा शुद्ध समुदाय मताने झाले असता सर्वांनी मानावे म्हणून ईश्वरप्रणीत असे ठरवून ग्रंथांची योग्यता वाढविली. ज्ञानावाचून मोक्ष नाही व प्राण्यामध्ये धन्य वसिष्ठ व ब्रह्मदेव हे देखील ज्ञानी होऊनच मुक्ती पावतात; परंतु प्रजेस व्यवहार समजण्याकरिता नियम बांधले की, दारू पिऊ नये, सोने चोरू नये. या गोष्टी सर्वांस अनुभवावरून वाईट वाटून हे नियम ठरविले असतील, हे उघड आहे. किंवा ईश्वराने सांगितले किंवा प्रेरणा केली, असे म्हटले तरी शोभेल. धर्म म्हणजे व्यवहार व ज्ञान म्हणजे मोक्षाचे साधन.

एका राजाची गोष्ट आहे की, त्याने आपली स्त्री एकास अर्पण केली. त्याविषयी दुसऱ्याने पुसले की, तुझ्या मनात काही राग आला होता की नाही ? त्याने सांगितले की, नाही. तेव्हा त्यांस पाप लागले नाही. याप्रमाणे त्या व्यवहारामध्ये महान पातकाच्या गोष्टी, त्याही ज्ञानी यांचे ठायी निर्दोष होतात. कारण की त्यांचे ठायी मनास विकृती नाही. मन शुद्ध असले म्हणजे त्यांस धर्मांचा प्रतिबंध नाही. मनास विकृती असल्यास त्याने धर्माप्रमाणे वागले पाहिजे असे आहे.

तात्पर्य इतकेच की, हिंदू धर्मात कोणतेही मत नाही असे नाही. भजन करण्याचे मार्ग दुष्ट तंत्रापासून तो संन्यासापर्यंत आहेत. नाना प्रकारचे देवाचे भजन करणे हे सर्व आहे. संस्कृत भाषेत कोणताही शब्द असला तरी अर्थ करतात व कोणतेही भाषेतील शब्द असो, अक्षरे असली म्हणजे अर्थ करतात, तद्वत् हिंदुशास्त्र आहे. त्यात काही व्यंग नाही. जे मत म्हटले ते आणि जो शास्त्रार्थ पाहिजे तो त्यात आहे. परंतु सर्वांचे तात्पर्य काढले तर इतके निघते की, या धर्मांमध्ये मुख्य तीन मार्ग आहेत, ते असे. एक ज्ञानमार्ग, दुसरा

भक्तिमार्ग, तिसरा कर्ममार्ग/ यांचा इतिहास खाली संक्षेपाने लिहितो.

(१) ज्ञानमार्ग – यास आधार उपनिषदे, काही पुराणे व प्राकृत ज्ञानेश्वरी, दासबोध यांसारिखे ग्रंथ आहेत व त्यांचे आचरणारे तूर्त बैरागी किंवा विरागी किंवा संन्यासी व परमहंस गोसावी इत्यादी लोक आहेत. ज्ञानमार्गांनी संसार बाह्यात्कारी नव्हे, परंतु अंतर्यामापासून सोडिला पाहिजे. कदाचित संसारात असले तर अलिप्त असले पाहिजे, वांछना, इच्छा व आशा नसाव्या व ईश्वर व मी एकच आहे, असे म्हणून ईश्वराचे एकत्रपणाचे चिंतनात असावे, भोग नसावा, कर्म नसावे, शरीराची, मिळकतीची काळजी, खबरदारी नसावी, अद्वैत-मत सोडावे; पूजन व पूज्यभाव सोडावा; परंतु मायागुणाने व्याकुळ होऊन आपणास देही मानले होते. परंतु ही माझी भ्रांती गेली. असे कल्पून त्यात राहावे म्हणजे मरणान्ती सायुज्य पद प्राप्त होते. म्हणजे जशी कल्पना तशीच सिद्धी होते. या मतास अनुसरणारे श्रीशंकराचार्य व ज्ञानेश्वर हे कलियुगी व पूर्वी श्रीकृष्ण, जनकराजा, शुकस्वामी इत्यादी झाले आहेत.

(२) भक्तिमार्ग – यास आधारी शांडिल्याची स्मृती आहे व यास भक्तिशास्त्र असे नाव आहे. तसे भागवत व गीता इत्यादिक आधार आहेत व त्या मार्गाचे प्राचीन काळी आचरणारे प्रल्हाद, उद्धव, हनुमान इत्यादिक; यांनी भक्ती केली व अलीकडे तुकाराम, नामदेव हे सर्व साधू याच मार्गातील होते. या मार्गात असे आहे की, द्वैतमत धरावे. मी वेगळा, ईश्वर वेगळा असे मानावे. मी सेवक, तो यजमान असे जाणावे आणि भक्ती करावी, क्षमा मागावी, समीपता मरणानंतर इच्छावी; प्राणी वेगळा, ईश्वर वेगळा, असे समजावे. किरकोळ शास्त्रातील कर्मे काही करू नयेत. फक्त सगुण देवावर भक्ती ठेवून असावे; जेथे कर्म करावयाचे येथे त्याचीच उपासना करावी व ही भक्ती एका परमेश्वराची असावी किंवा त्याचा अवतार किंवा तत्प्रतिमा मूर्ती असून त्या मार्गाने भगवंताचे सेवन करावे. हा मार्ग बहुत लोकांस आवडतो व वैष्णव यांचे मत हेच आहे. विशिष्टाद्वैत, रामानुज, राघवाचार्य वगैरे यांचे हेच मत आहे. ते म्हणतात की, माया ईश्वरकृपेवाचून दूर व्हावयाची नाही. याजकरिता सेवक-भावाने भजावे हेच उत्तम. परंतु वेदान्ती म्हणजे ज्ञानमार्गी यांचे हिशेबाने भक्तिमार्ग खालची पायरी आहे.

(३) कर्ममार्ग – त्यांस आधार स्मृती, श्रुती व पुराणे आहेत. पूर्वी वसिष्ठ वगैरे ऋषी जांणी यज्ञ, याग, तप, अग्निहोत्रे वगैरे केली ते सर्व कर्ममार्गी होते व जे व्यवहारांत गृहस्थ आहेंत, लग्ने करतात व घरात राहतात, ते सर्व कर्ममार्गी होते. कर्ममार्गांत एका देवाची भक्ती नाही व ज्ञानही नाही. याजकरिता ही कनिष्ठ पायरी पण प्रथमची आहे. यामध्ये पंच तत्त्वांचे भजन आहे व स्नान,

संध्यादिक कर्मे, व्यवहार इत्यादिक आहेत. त्यामध्ये ईश्वराचे विशेष ज्ञान नाही, अनेक देवता आहेत, त्यांस संतुष्ट करून स्वर्ग इच्छा करावी, इतकेच यात आहे व इंद्रिये दमन वगैरे करावे यात काही कर्ममार्गी ऋषीदेखील मोठे रागीट असत व शाप देत. हे प्रकरण मांत्रिक आहे.

एकूण हे तीन मार्ग प्रसिद्ध आहेत. सर्व हिंदू लोक या तिहींतील एका मार्गात बहुधा असतात. आमचे मत असे आहे की, तिन्ही मार्गामध्ये चांगल्या गोष्टी आहेत. त्या घेऊन जे शहाणे असतील त्यांनी परमेश्वराची भक्ती करावी, जगात दया करावी; यांत सर्व आले. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांत घोटाळा दिसतो.

## नीति-प्रशंसा

पत्र नंबर ८८ : १३ जानवारी १८५०

आमचे लोकांची सुधारणा व्हावयास मुख्य काय पाहिजे, याचा विचार केला असता असे दिसते की, मुख्य त्यांस विद्या पाहिजेत. विद्या कोणत्या म्हणाल तर हल्ली ज्या विद्या सत्यप्रतिपादक व वास्तविक जे व्यवहार आणि राज्यनाती यांचा दर्शक आहेत, त्या विद्या प्रगट झाल्या पाहिजेत.

पूर्वीच्या विद्या ज्या संस्कृतद्वारा येतात, त्या उपयोगी नाहीत. कारण त्यात असत्य गोष्टी फार आहेत व मूर्खपणाच्या समजुती फार आहेत. त्या विद्या प्राचीन काळच्या लोकांच्या, इतकेच जाणून त्या आता एकीकडेच ठेवून द्याव्या पाहिजेत व नूतन ज्या कळा, शिल्प इत्यादी निघाल्या आहेत, त्या ग्रहण केल्या पाहिजेत. पूर्वीच्या चुकांनी ज्या भरलेल्या विद्या आहेत, त्या उपयोगी नाहीत. लहान मुलांस अठराही पुराणे पढविली तरी त्यांस काय ज्ञान येईल बरे? याचा विचार पहा; त्यांतील असत्सिद्धान्त तेही आता दाखवितो.

क्षारइक्षुसुरासर्पीदधिक्षीरजलार्णवः ।।

हे सागराचे ज्ञान होईल. स्त्रियांचे गुण कसे आहेत, हे वृद्ध चाणक्यात दुसरे अध्यायात एका श्लोकात दाखविले आहे की,

"अनृतं साहसं माया, मूर्खत्वमतिलोभता
अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः"

हे तो समजेल. आणखी,

"विप्रपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम्"

हे समजेल आणि,

"यथा नयंति रागास्ते न गंगा न सरस्वती"

म्हणजे गाईल तो मोक्षास जाईल, हे समजेल इत्यादिक अज्ञानभरित वाक्यांचा संग्रह होऊन तेणेकरून मूढमती मात्र होईल. यास्तव या प्राचीन काळच्या विद्या काही उपयोगी नाहीत. या विद्या जितक्या वाढतील तितके अज्ञान दृढ होईल. आणि हा देश कधी सुधारणार नाही.

याप्रमाणेच शास्त्रे आहेत. व्याकरणशास्त्रात शब्द हाच ईश्वर असे प्रतिपादन आहे. मीमांसांत वेद हाच ईश्वर असे प्रतिपादन आहे. धर्मशास्त्रात यज्ञादिक खटपट केली म्हणजे मोक्ष होतो. बापास पिंड दिला म्हणजे मोक्ष होतो; पुत्र असला म्हणजे २१ पिढ्या स्वर्गास जातात, इत्यादिक प्रतिपादन केले आहे. तसेच दर एक पुराणांत देवता, विशेष उपासना लिहिल्या आहेत. त्यात तंत्रे वगैरे आहेत. त्यात तर अतिशय मूर्ख मते प्रतिपादन केली आहेत. तशात ही शास्त्रे व पुराणे प्राचीन काळची ज्ञाने आहेत. इतक्याकरिता पढावी; परंतु त्याप्रमाणे व्यवहारात वर्तणूक केली तर अशुद्ध होईल यात संशय नाही. यास्तव या पढण्याचा संशय होऊन वास्तविक विद्या वृद्धिंगत झाल्या पाहिजेत, असे लिहिले म्हणून धर्माविरुद्ध होत नाही.

हिंदु लोकांचा धर्म केवळ समुद्राचे वर्णनातही नाही व स्त्रियांचे वर्णनातही नाही. धर्म हा ईश्वराचे वर्णन आहे. त्यात दुसरे अधर्म मिश्र झाले आहेत. ते मात्र जातील व केवळ भक्तिज्ञान हे धर्म रहातील. कर्ममार्ग कमी होईल, व मूर्ख समजुती कमी होतील. व वास्तविक धर्म लोकांत प्रकट होईल. ईश्वरभक्तीचा भाग राहून बाकीचा भाग सुधारेल. या सर्व समजुतीसच धर्म म्हणणारे आहेत. ते मूर्ख व या पृथ्वीचे वगैरे ज्ञानविषयी शास्त्राविरुद्ध लिहिले तर धर्माविरुद्ध होत नाही. परंतु बहुत लोकांस असे वाटत नाही याचे कारण अज्ञान आहे व या प्राचीन ग्रंथकारांनी व्यवहाराची व धर्माची पुस्तके वेगळाली लिहिली नाहीत म्हणून व्यवहाराचा व धर्माचा भेद राहिला नाही. अस्तु. हा भेद आता

लोकांस समजेल. शास्त्राचे प्रमेय लोक समजत नाहीत. शास्त्री, पंडित अर्थांचा अनर्थ करीतात व काही काही गोष्टी ज्या आहेत, त्यांचा यथार्थ अर्थ समजत नाहीत. आता पहा की, एका ठिकाणी पुराणात असे लिहिले आहे की,

> विप्रौवदर्शनात् क्षिप्रं क्षीयन्ते पापराशयः ।
> वंदनान्मंगलावाप्तिरर्चनादच्युतं पदम् ॥१॥
> आधिव्याधिहरं नृणां मृत्युदारिद्र्यनाशनम् ।
> श्रीपुष्टिः कीर्तिदं वन्दे विप्रश्रीपादपंकजम् ॥२॥
> सागरे सर्वतीर्थानि पदे विप्रस्य दक्षिणे ॥३॥

याप्रमाणे ब्राह्मणांचे वर्णन केले आहे, ते खरे समजून लोक ब्राह्मणांच्या पायाचे तीर्थ पितात. सदावर्ते ब्राह्मणाकरिताच घालतात. ब्राह्मणांची पूजा केली, तर मोक्ष होतो, असे समजतात. यास प्रमाण पुराणांचे दाखवितात. की, प्राचीन राजे व श्रीकृष्णदेखील ब्राह्मणांची उष्टी काढीत होते. याप्रमाणे ब्राह्मणांस चढवून दिले आहेत. तेव्हा अशा गोष्टींवर किती विश्वास ठेवावा, याचे प्रमाण लोकांस समजत नाही व पुराणिक आणि हरिदास असाच उपदेश करून लोकांस वेड लावितात. याचा विचार लोकांनी करावा. ब्राह्मण हे मनुष्य. यांचे पायांचे पूजन केले म्हणजे मोक्ष कसा होईल ? हे विलक्षण मत आहे.

याप्रमाणे लक्षावधी गोष्टी आहेत, याचप्रमाणे लोक क्षुल्लक धर्म व महान् धर्म यांचा भेद जाणत नाहीत. महान व परम धर्म असे की, सत्य बोलणे, दया करणे, क्रोध न धरणे, शांती धरणे, चोरी, अभिलाषा न करणे, व्यभिचार न करणे इत्यादी नीतीचे धर्म याविषयी अभिमान सोडून क्षुल्लक धर्म सांगतात. ते असे की, तुम्ही तुळशी वहाव्या, बेल वहावा, चंदनाची खोडे झिजवावी, वाती जाळाव्या, काळे वस्त्राने विटाळ होतो; काडी मोडली म्हणजे ब्राह्मणहत्या होते, शंखोदक घेतले म्हणजे पाप जाते, वाती तुपात घालाव्या, डबीत मंगळसूत्र द्यावे. सारांश, इत्यादी मूर्खपणाच्या गोष्टीस धर्म असे माझ्याने म्हणवत नाही. याविषयी लोकांस वेड लावून हे करवितात; परंतु परम धर्म कोणास सांगत नाहीत.

पहा की, कामदार मोठाले असतात; त्यास कोणी असे सांगत नाही की तुम्ही लाच खाऊ नका, खरे काम करा, लबाड बोलू नका. हे सांगायचे सोडून त्यांचे पूजन करावयाचे ढोंग, देवपूजेची भांडी, ढोल व देव्हारे वाढवितात आणि त्यास दुनीतीचे मार्ग शिकवितात. ब्राह्मणांची मते अशी आहेत की, चोऱ्या केल्या तरी चिंता नाही. ब्राह्मणांस भोजने घातली, म्हणजे मग त्याचे

पाप नाही. किती एक लोक गळ्यात शालीग्राम बांधतात व खांद्यावर तुळशीची झाडे घेतात, आणि पंढरपूरची यात्रा करतात, परंतु हे लोक अशा कर्माने तरतील काय? जो मनुष्य जन्मात लोकांचे कल्याणाची गोष्ट मनात आणीत नाही, दया करीत नाही व ईश्वराचे भजनपूजन ज्ञानाने करीत नाही, तो शालीग्राम दगड गळ्यात बांधून ईश्वरापाशी कसा जाईल? तसेच ज्या स्त्रीने व्यभिचारकर्म केले, तिने तांदूळ निवडून लाखोल्या वाहिल्या व पुष्कळ वायने दिली, तर ईश्वरास ती प्रिय होईल काय? परंतु ब्राह्मण आळशी यांस पैसा मिळाला पाहिजे, म्हणून ते नानाप्रकारची वेडे लोकांस लावून पैसा काढितात.

तसेच शास्त्री, पुराणिक हे लोकांस अनर्थ सांगून भ्रष्ट करतात. हे सर्व पोटाकरितां आहे व हे माझेच मत आहे असे नाही. पूर्वी तुकाराम इत्यादी साधू होते. त्यांनीही ब्राह्मणांची लबाडी जाणून अभंग केले आहेत की,

पोटासाठीं केलें ढोंग, तेथें कैचा पांडुरंग?।
द्रव्यलोभाचें कीर्तन, तेथें कैचा नारायण?॥

इत्यादीक. बहुत साधूंनी ब्राह्मणांच्या लबाडीविषयी वर्णन केले. ज्ञानेश्वर म्हणतात की,

जपतपक्रियाधर्म, वाउगाची व्यर्थ नेम।

तसेच रामदास म्हणतात की,

नको कंठ शोषूं बहू वेदपाठीं,
नको तूं पडूं साधनांचे कपाटीं।

तेव्हा याजवरून असे सिद्ध होते की, हे किरकोळ नेमधर्म जे आहेत, त्यात काही नाही; हे सर्व व्यर्थ आहेत. ईश्वराचे मनाने भजन, पूजन करावे व मन शुद्ध ठेवावे हाच धर्म. स्नान केले नाही, तर दुःख वाटू नये आणि लबाड बोलले तर दुःख वाटावे. परंतु ही भावना आमचे लोकांची नाही, हे लोक आचाराकरिता प्राण देतात आणि विचार मुळीच करीत नाहीत. भस्म लावले म्हणजे शुद्धी होते, असे समजतात. परंतु पन्नास वेळ भस्म लावले व दोनशे वेळ अंग धुतले तर मनाचे मळ जातील काय?

ईश्वर शरीरास पहात नाही; मनास पाहतो. मुख्य मन शुद्ध पाहिजे; परंतु हल्लीचे ब्राह्मण पैसा काढण्याकरिता हे सांगत नाहीत. फक्त आचार, जेणेकरून पैसा मिळावयाचा, तेच सांगतात, सर्व धर्म आता लोकांच्या पैशावर आला आहे, पैसा दिला म्हणजे पाप जाते, प्रायश्चित्त होते, ईश्वर प्रसन्न होतो, असे ब्राह्मण सांगतात; याचकरिता हे असे सांगणारे सर्व मूर्ख आहेत. याजवर भरवसा

ठेवू नये. धर्म कोणता, याचा विचार करावा, केवळ क्षुल्लक धर्मावर भरवसा ठेवू नये. त्यात काही नाही; परंतु जर कोणी शास्त्राचे प्रमेय न पाहतील व मूर्खपणाने भलतेच अर्थ काढतील आणि ब्राह्मण लोकांच्या बुद्धी ऐकतील तर त्याचा परिणाम लागणार नाही. आजपर्यंत ही दशा ब्राह्मणांच्या बुद्धीने झाली आहे. पंडित व शास्त्रे मूर्ख आहेत, त्यास अर्थ नीट करता येत नाही. ते फक्त मूर्खपणा वाढवितात व लोकांस वेडे करीतात. यास्तव यात काही खऱ्या गोष्टी नाहीत; केवळ निर्फळ आहेत.

## दान-धर्म करणे

**पत्र नंबर ९१ : १० मार्च १९५०**

सांप्रत काळीच आमचे लोक मतिभ्रष्ट फार झाले आहेत, असे नाही. हे मुळापासून असेच आहेत; परंतु आता त्यांचा मूर्खपणा व मतिभ्रष्टपणा विशेष प्रगट मात्र झाला आहे.

पूर्वी हे लोक स्वसत्तेत होते व आता ते परसत्तेत गेले आहेत. पूर्वी त्यांस परदेशाचे लोक भेटले नव्हते. व विशेष विद्वान व विशेष युक्तिवान अशा लोकांशी त्यांची गाठ पडली नव्हती, म्हणून या देशाचा मूर्खपणा विशेष उघड झाला नव्हता. जरी हे मूर्ख होते, तरी यास हसावयास दुसरा कोणी नव्हता. एकाने ग्रहणात चंद्रास राहू खातो असे म्हटले तर दुसरा म्हणत असे की, त्याचे भोवती लोकालोक पर्वत आहेत. यास्तव मूर्खपणा आपसांत झाकून जात होता.

पहिले काळचे राजेदेखील असे मूर्ख होते की, त्यांनी सनंदा घेऊन इनाम गाव करून दिले आहेत; परंतु त्याविषयी असे त्यांचे मनात येत नव्हते की या ब्राह्मणांचे चालवावे कशाकरिता ? हा करितो काय ? आळसात वय घालविण्याने राजास अभीष्ट व कल्याण कसे होईल ? हे किमपि मनात आणीत नव्हते. याप्रमाणे अन्नछत्रे, दक्षिणा व खिचडी वगैरे नाना प्रकारची धर्मकृत्ये करीत.

परंतु त्यांचा हेतू इतकाच की, ब्राह्मणांचे चालवावे. यामुळे ब्राह्मणांनी

विद्या करणे सोडून दिले. फुकट मिळाल्यावर श्रम कोण करितो? जुने ग्रंथ पाहून निर्वाह करू लागले. जुने ज्योतिष, जुने वैद्यक, जुने धर्मशास्त्र, हेच संपूर्ण आहे, असे त्यांस वाटू लागले. राजांनी तीच प्रवृत्ती घातली आणि ब्राह्मणांस आळशी केले. जेवणापलीकडे त्यास कर्तव्य राहिलेच नाही. ब्राह्मणाचे हातून विद्यावृद्धी व्हावी व लोकांची सुधारणा व्हावी व जो वतन खातो, त्याचे हातून काम व्हावे, हे कोणाचे लक्ष्यातच नाहीसे झाले. त्यास सुखी ठेवावे आणि त्यांनी आशीर्वाद द्यावा, म्हणजे त्यात सर्व आहे असे समजू लागले व अद्यापि बहुतकरून अडाणी लोक हेच समजतात. आणि या प्रकारचा धर्म करीतात. उद्योगवृद्धी होण्याचा धर्म करीत नाहीत.

कोणी असा नाही की शाळेकरिता किंवा तारवांत बसून, किंवा देशांतरास जाऊन नाना प्रकारचे पदार्थांचा व लोकांचा शोध करण्याकरिता, किंवा ग्रंथ करण्याकरितां अमुक एक वस्त्र करण्याची वगैरे रीत आहे, ही सुधारण्याकरितां रुपये खर्च केले आहेत. असा एकही पुरुष आढळत नाही; परंतु ब्राह्मणांची लक्षभोजने व सहस्रभोजने तशीच दक्षिणा, तशीच यात्रा, इत्यादिकांत पैसा उधळलेले लोक गावोगाव आहेत. वास्तविक पाहिले, तर, जन्मापासून भट हे धर्माचे खातात; पण करतात काय? याचा हिशेब कोणी पुसला, तर उत्तर नाही. पूर्वी अहिल्याबाईसारखी धर्मकृत्ये करणारी झाली, तरी तिणे धर्म केला तो व्यर्थ गेला. तिने आपले ज्ञानाप्रमाणे उत्तम केले आणि तिला जे चांगले वाटत होते व तिच्या देशात जे मोठे शहाणे होते, त्यांचे अनुमत पडावयाजोगे तिने सर्व केले. जे तिला ठाऊक नाही, ते होईल कोठून? असो.

आम्ही तिला शब्द लावीत नाही, परंतु आजपासून पुढे धर्म करावयाचा तो असाच की काय? एवढे आम्हास तात्पर्य कळविले पाहिजे. हे लोक समजावयास लागतील तर बरे. व जितके लवकर समजतील तितके चांगले. जो तो धर्म करण्याची इच्छा बाळगितो व हिंदू लोकांप्रमाणे धर्मावर दुसरे लोकांचे चित्त नाही. यास्तव विशेषकरून आम्हास त्यांचे लक्ष्यात ही गोष्ट आणून दिली पाहिजे की ते ज्या गोष्टीस धर्म म्हणतात, तो धर्म खरा आहे की नाही? अशा प्रकारचा दानधर्म केल्यास ईश्वराजवळ पसंत पडेल की काय?

आम्हास वाटते की मूर्खपणाचा धर्म कदापि भगवंतास मान्य होणार नाही.धर्मच्या रीती दोन आहेत. एक गरिबास त्याचे शरीराचे रक्षणार्थ व सुखाकरिता धर्म द्यावा. दुसरा, ज्ञानवृद्धी होण्याकरिता व लोकांस बोध होऊन मन सुधारण्याकरिता धर्म द्यावा. या दोन प्रकारांहून हिंदूचा कोणत्या प्रकारात धर्म आहे बरे? कोणी म्हणतील की भटास आम्ही जेवावयास घातले, तर

त्याचे शरीरास सुख होते. म्हणून हा पहिल्या प्रकारचा धर्म झाला; परंतु तसे नाही. पहिल्या प्रकारच्या धर्मास पात्र कोण, याचा विचार केला पाहिजे. शरीराचे पोषणाकरिता धर्म करणे याजवर गरीब व व्यंग यावाचून कोणाचा दावा नाही व त्यामध्ये जाति, नियम वगैरे काही अडचण असू नये. व दुसरे प्रकारचा धर्म जो आहे, जो विद्वानांस मात्र करावा व त्यास कोणतेही प्रकारची काळजी न ठेवता त्यांनी लोकांस ज्ञान सांगावे व लोकांस शहाणे करावे. या प्रकारचे पंतोजी वगैरे धर्माध्यक्ष व उपदेश वगैरे सर्व यास पात्र आहेत. तेव्हा असा धर्म करण्यास भट व पंडित हे पात्र आहेत की काय ? यांस पहिल्या प्रकारचा धर्म करावा, तर हे आंधळे, लंगडे, पांगळे नाहीत. व दुसऱ्या प्रकारचा धर्म करावा, तर यांची योग्यता दुसऱ्यांस शहाणे करण्याची नाही. व यांस काही स्वतः समजत नाही; हे दुसऱ्यांस कसे शिकवतील ? यांस धर्म कळतच नाही. सोदे, लबाड, भडवे, आर्जवी, कुटाळ असतात, त्यांच्याहूनही यांची वर्तणूक बरी नसते, हे सर्वांस प्रसिद्ध आहे. भट हे गृहस्थांचे घरी सर्व वाईट कर्म करतातच. तसेच शास्त्री पंडित आहेत. यांच्या वर्तणुकी बाजीरावाने वाईट कर्म करून उघड केल्या. तेव्हा त्यास धर्म केल्याने हा धर्म कोणत्या प्रकारचा होईल ? अलीकडे एकाने काशीयात्रेस जाताना लाख रुपयांचे जिन्नस, पवित्रके, नथा वगैरे सुवासिनींस व भटास वाटावयाकरिता खरेदी करून बरोबर नेले, व याप्रमाणे सर्व धनवान करतात व लाखो रुपये विष्णुपदावर घालतात व गयावळांस देतात, परंतु हा धर्म होतो की काय ? आळसाची मात्र वृद्धी होते. यापासून फळ काय होते, ते मला समजत नाही. जन्मापासून असे मूर्ख व अज्ञानाने आंधळे लोकांपासून पैसा काढून त्याजवर निर्वाह, काही एक काम न करता, करणारे हे भट व शास्त्री यांस आणखी पैका दिला, तरी त्यांच्या पूर्वीच्या खोडी जातील काय ? त्यांनी काम करावे, उद्योग, प्रयत्न व लोकांची सुधारणा करावी, हे जरूर आहे. हे कदापि समजणार नाहीत. इंग्रजी राज्यात असा धर्म बहुत श्रीमंत लोक कमी झाल्यामुळे बंद जहाला; यास्तव इंग्रज लोकांस ब्राह्मण लोक वाईट म्हणतात; त्यांस दुसरे काही समजत नाही.

स्वसत्ता गेली व स्वराज्य गेले. हे आपले देशांतील सर्व लोकांस अनिष्ट आहे; इत्यादि स्वदेशाभिमानाच्या गोष्टी त्यांस ठाऊक नाहीत. त्यांस जेवावयास मिळाले, म्हणजे कोणीही राज्य करीत असले, तरी चिंता नाही; त्याची स्तुती करतील; असे हे ब्राह्मण स्वार्थतत्पर आहेत. स्वदेशाचे व इतर जातीचे लोकांविषयी त्यांचे मनात काही येत नाही. फक्त आपले जेवण व मान कमी जहाला, एवढ्याचेच त्यांस दुःख आहे व बाजीरावाने इतके वाईट केले, तरी त्यांस ते अद्याप चांगला

म्हणतात, त्याची स्तुती करतात व त्यांस धर्मप्रभू म्हणतात. तस्मात् या ब्राह्मणांच्या समजुती किती बदलल्या पाहिजेत! अस्तु.

आमची सर्व लोकांस विनंती आहे की, आपली प्रतिष्ठा या श्वानरूपी भटांमध्ये मिरवण्याकरिता त्यांस कदापि धर्म करू नये.जो धर्म कराल, त्यांस सत्पात्र आहे, असे पूर्वी लक्षात आणा. एक अगदी भिकारी, दरिद्री. लंगडा, पांगळा, रोगादिक प्रारब्धाचे योगाने भिकारी झालेला आणि जर त्याचा काही उपाय चालत नाही, तर त्यांस आसरा द्या. आणि दुसरे, जे पुस्तके लिहितील व लोकांस शहाणे करण्यास मेहनत करतीलव जे वर्तमानपत्रे व ग्रंथ इत्यादी उपयोगी वस्तू छापून प्रगट करतील, त्यांस तुम्ही मोठे विद्वान् व लोकांचे हितकर्ते समजून त्यांस सत्पात्र जाणून धर्म करा; व त्यांचे ग्रंथ घेऊन लोकांमध्ये वाटा व हीच वायने समजा;तीच संक्रांतीची तिळपात्रे, श्रावणीची दीपदाने, माघस्नानाची संपूर्णे, चातुर्मासाची संपूर्णे व तुळशी आणि लाखोल्या त्याच समजा. ज्ञानवृद्धीत पुण्य आहे, असे माना. लाखो लोक अज्ञानी स्थितीत आहेत, त्यांस काहीही कळत नाही. त्यांस ज्ञानी करण्यापेक्षा दुसरा योग्य धर्म कोणता ? यास्तव मरतेसमयी देऊळ बांधावयास सांगू नका; पण नवे छापखाने व नवी पुस्तके करण्यास सांगा. देवळे पुष्कळ आहेत, तितकी पुरेत. हे समजा.

## भिकारी

**पत्र नंबर : ९२**

आमचे लोकांत सोवळ्याओवळ्यामुळे अनेक अडचणी पडल्या आहेत. जर ब्राह्मणास एका गावाहून उठून दुसऱ्या गावास जावयाचे आहे, तर किती खटपट केली पाहिजे की, बरोबर भांडी व वस्त्रे घेतली पाहिजेत. कारण की, दुसऱ्या जातीचे येथे जाऊन त्यांचे भांड्यात खाता येत नाही. बरे आणखी कोठे कोठे धर्मशाळा वगैरे नाहीत, म्हणून कोठे जाऊन उतरावे, तर आपला जिन्नस चोरीस जाईल की काय, याचे भय पडते. सर्व गावात फिरून एका ठिकाणाहून लाकडे, दुसरे ठिकाणाहून पीठ असे जमवून आणावे लागते. जर कोणाचे घरी उतरले आणि त्याची जात भिन्न असली, तर त्याचे पाणी उपयोगी

नाही. व त्याची मदत उपयोगी नाही. व त्याचा स्पर्शही उपयोगी नाही. तेव्हा स्वतः पाणी नदीवरून आणावे व पुनः लागले, तर आणखी हेलपाटा द्यावा, असे तापत्रय घडतात. यास्तव ब्राह्मणांकरिता अन्नछत्रे घालतात. तेणेकरून हे ब्राह्मणांचे श्रम जावे इतकाच त्याचा हेतू आहे.

या देशात ब्राह्मणास बाहेर प्रवास करणे म्हणजे अतिशय दुःखकारक आहे. याजकरिता जर दर एक गावी एक घर बांधून, त्यात सर्व सोयी केल्या, तर फार चांगले होईल. परंतु जातीमुळे अडचणी फार आहेत. तत्रापि प्रवासी लोक जातीचा विधिनिषेध फारसा बाळगीत नाहीत. बरोबर शिजलेले अन्न घेतात. त्यांस कोणी शिवले, तरी तेच खातात, त्यांचे रीतीप्रमाणे एक घर सर्व जातीस बांधले, तरी त्यात सर्व प्रवासी लोक राहतील. यात संशय नाही. आणि सुख फार होईल. पहा, आता पुण्यात असे नाही म्हणून प्रवासी कोणी आला, तर त्याला उतरावयास जागा बहुधा मिळत नाही, कदाचित् मिळाली तर ती देवळात किंवा धर्मशाळेत. व त्यांस कोणी सामान देणार नाही. हात धुवावयास नदीवर गेले पाहिजे. लाकडे शोधून आणली पाहिजेत. याजकरिता जरूर आहे की, एका माणसाने अशा धर्मशाळेचे मुखत्यार होऊन त्याने पैसा घेऊन सर्व पुरवावे व जातीप्रमाणे प्रत्येकाचा धर्म राखावा, इतकी तजवीज झाली तर बरे पडेल.

मुंबईचे वाटेने असे ब्राह्मण लोक आहेत. परंतु जेथे ब्राह्मण लोक आहेत, तेथे कुळंबी जावयाचा नाही. जेथे कुळंबी जातो, तेथे महार जाणार नाही. या अडचणी अतिशय आहेत. या युक्तीनेच दूर केल्या तर होतील. नंतर ब्राह्मण लोक प्रवास करू लागतील. सांप्रत ब्राह्मणास जर चौफट नफा जाहला, तर घराबाहेर जाणार नाहीत. ते म्हणतात पुण्यात दहा रुपये नफा बरा; पण मुंबईस पन्नास रुपये नको. ते म्हणतात की, या विटाळात कोण जातो ? येथून जाण्याचे तापत्रय, आपला ब्राह्मणी विचार व आचार कसा चालेल ? कोठे प्रवासाला जावे ? इत्यादी विचार करून ब्राह्मण लोक बहुतकरून घराबाहेर पडत नाहीत. जर कदाचित् उपाय नाहीसा झाला, तर मात्र पडतील. तरी त्यांस फार अमंगळ वाटेल. त्यांस वाटेल की आज पंधरा दिवस मुंबईत मी राहिलो खरा, परंतु जरी दोन पैसा नफा झाला, तरी धर्म बुडाला, पाणी विटाळाचे प्यालो, शिवाशिवी जहाली; निर्मळपणा काही राहिला नाही. सोनार, परभू यांचा संपर्क जाहला. आणि याप्रमाणे हजारो ब्राह्मण म्हणतात. ब्राह्मणांची रीत अशी की, घरात सोवळे-ओवळे माजवावे व पुढे पाणी शिंपून मागे चालावे. ग्रहण पडले म्हणजे सर्व घरांतील टाकून द्यावे. आंघोळी कराव्या कुळंब्यांचा शब्द कानी पडू देऊ

नये. हे त्यांस गोड वाटते, म्हणून बाहेर पडावयाचा कंटाळा आणि त्रास करतात.

दुसरे आणखी बहुत प्रकार गैरशिस्त या देशात आहेत. त्यांपैकी काही खाली लिहितो. भिकारी लोक जे आहेत, त्यांचा कर सर्वांवर आहे. धर्माप्रमाणे त्यांस देणे योग्य आहे. परंतु पहा की, भिकारी लोकांच्या अव्यवस्था आमचे लोकांमध्ये किती आहेत? भिकारी लोकांमध्ये दोन पक्ष समजले पाहिजेत. एक पक्ष धर्माध्यक्ष भिकारी, आणि दुसरा पक्ष अशक्त भिकारी. आता पहिले पक्षात शास्त्री, पंडित, हरिदास, पुराणिक, वैदिक, जोशी, भट, तपस्वी हे सर्व जाणावे. दुसरे पक्षात हर एक जातीचे आंधळे, पांगळे, लंगडे, व्याधिष्ठ, दरिद्री. वयाने लहान, अज्ञान इत्यादी सर्व जाणावे. आता पहा की, दुसरे पक्षाचे भिकारी लोकांकरिता कोणी काहीच धर्म करीत नाही. हिंदू लोक अज्ञान दूर करण्याकरिता आणि रोग जाण्याकरिता आणि विद्या होण्याकरिता काही धर्म करतील,हे तर होणार नाही. कोणी मेला व त्यांचे पोराचे रक्षण करण्याकरिता कोणी नाही. तर त्याजकरिता कोणी धर्म करणार नाही.

जात पाहून धर्म करतात. तैलंग ब्राह्मण भिक्षेकरी असला तर त्यांस तांदूळ घालतात, तोच गुजराथी असला तर जोंधळे घालतात, बहिरागी असला तर कदाचित् पीठ घालतात. माधुकरी मागणारा जर ब्राह्मण असला तर आत येऊ देतील, नाही तर मधुकरी कदापि घालणार नाहीत. जेवताना दुसरे जातीचा शब्द कानावर पडला असता विटाळ जहाला म्हणतील. जर रकतपिती होऊन वृद्धापकाळाने व रोगाने उद्या मरणार, असा मनुष्य परजातीचा रस्त्यावर पडला असेल व त्यांस अन्न चार दिवस खावयास मिळाले नसेल, तर त्याजकडेस कोणी पाहणार नाहीत. शेकडो ब्राह्मण लोक घोड्यावर जातील, परंतु त्या गरिबाकडे डोळादेखील करावयाचे नाहीत. आणि तो जर महाराचे जातीचा असला तर त्यांस शिवणार नाहीत व पाणी देणार नाहीत. तो तेथे अन्नावाचून मरेल. असे किती एक नित्य मरत आहेत. त्यात गाव खेडे असले तर काही तरी सांभाळ होईल; परंतु शहरात लोक अगदीच पुसणार नाहीत. जर गाय बैल मरत असेल तर त्यांस कोणी तरी ब्राह्मण जपतील; परंतु अन्य जातीच्याच अगदीच पाहणार नाहीत. याप्रमाणे गरिबांच्या धर्माची व्यवस्था आहे.

शिवाय आणखी चाल अशी आहे की, पुण्यासारख्या शहरात आगांतुक ब्राह्मण आहेत; ते लोकांस उपद्रव करून पोट भरतात व असेच जेथे तेथे ब्राह्मणांची वस्ती आहे, तेथे आगांतुक आहेत. तैलंग देशांतून ब्राह्मण पोट भरावयास इकडे देशांतरास येतात, परंतु ते रोजगार धंदा किंवा शेतकी काही करीत नाहीत; फक्त आगांतुकी करतात. याप्रमाणे आळशी ब्राह्मण शेकडो

आहेत. त्यांस कामकाज, विद्या व उद्योग न करिता लोक संरक्षण करतात. आणि गरीब धर्मास पात्र जे आहेत, त्यांस कोणी पुसत नाही. आणि लग्नकार्य जहाले म्हणजे कोणी पाचशे रुपये दक्षणा, कोणी हजार रुपये दक्षणा वाटतात. ती वाटण्याची रीती अशी आहे की, जो बळकट व दांडगा असेल, त्यांस मात्र ती दक्षणा पोचेल. रोगी, अशक्त, लहान असला तर त्यांस कदापि पैसा मिळावयाचा नाही. याप्रकारे दक्षणा वाटतात व जेवावयासही याप्रमाणेच घालतात.

आता पहिल्या पक्षाचे म्हणजे धर्माध्यक्ष मिकारी यास पैका दैण्याची रीती तरी चांगली नाही. त्यांस पैसा देणे, तो त्यांजपासून लोकांचा काही फायदा व्हावा ही त्याची बुद्धी नाही. फक्त त्यांस दिले म्हणजे पुण्य होते, ही समजूत आहे. याजकरिता उपयोग कोणीच पहात नाही. कोणी अनुष्ठाने करतो. म्हणजे शिवरात्रीचा अतिरुद्र म्हणजे एक दोन तीनशे ब्राह्मण जमा करावे, एकेकास दोन रुपये द्यावेआणि त्यांस आणून स्वस्थ बसवावे. एक तिळाचा होम करितो. बाकीचे सर्व त्याजकडे पहातात. असे अकरा हजार होम झाले म्हणजे अतिरुद्र झाला. याबद्दल खर्च दोन-तीन हजार होतो, तो ब्राह्मणांस पोचतो. आता त्याचा उपयोग पाहिला तर पांच हजार ब्राह्मणांचा वेळ व्यर्थ गेला. दोन-तीन हजार रुपये खर्च जहाले; त्यापासून विद्या वाढली नाही, शहाणपण वाढले नाही, उद्योग झाला नाही, विचार झाला नाही; काही एक नाही. एक मूर्खाचे समजुतीप्रमाणे खर्च जहाला इतकेच फळ.

याप्रमाणे हजारो अनुष्ठाने आहेत. कोणी म्हणतो, शतचंडी; कोणी म्हणतो अभिषेक. याप्रमाणे आळशी लोक स्वस्थ जेवण, दक्षणा घेतात आणि बसतात.धर्माचे रक्षण करीत नाहीत; गोरगरिबाची तजवीज करीत नाहीत; लोकांस धर्मार्थी व धर्मतत्पर करावे ते नाही. फक्त आपले पोट आणि यजमानाची स्तुती, अशी मात्र ते आळशी लोक कामे करतात.व त्यांस जो पैका देतात, तो काही उपयोगाकरिता देत नाहीत. असा धर्म करणे हे फक्त आळशीपणाची वृद्धी करणे आहे, याप्रमाणे अनुष्ठाने, जप वगैरे जितक्या ब्राह्मणांचा मिळकती आहेत, त्या सर्व अशाच आहेत. व प्राचीन काळापासून चालत आलेल्या दक्षिणा, खिचडी, सभा, देवस्थाने या प्रकारची आहेत. त्यांची सुधारणा लोकांशिवाय होणार नाही. लोक सुधारले म्हणजे अर्थातच सर्व त्यांचे पुढारी सुधारतील, किंवा त्यांचे पुढारी सुधारतील. तेव्हा लोक सुधारतील. परंतु सांप्रतचे धर्मात सर्वांचे कल्याण होणे, हे अगदी होत नाही.

# ३. आमचे वर्णगुरू

# कन्याहत्या, गवरनरसाहेबांची बदली व ब्राह्मण लोकांचे अज्ञान

■

पत्र नंबर ५

हिंदुस्थानातील वाईट चाली बहुतेक बंद होत चालल्या आहेत. इंग्रजांचे अमलातील मुलखात हत्या व खून, हिंदू लोक धर्म जाणून हमेश करीत होते, ते त्यांनी बंद केले.

तत्रापि अद्याप गुप्तरूपेकरून गुजराथेत कन्याहत्या झाऊज लोक करतात. तेथील बंदोबस्त करण्याकरिता बडोद्याचे रेसिडेंट व पूर्वीचे गवरनर डंकिनसाहेब वगैरे यांनी बहुत मेहनत केली; तेव्हा काही मनाई झाली, तत्रापि अद्यापि पोरे मारतात. त्याचे कारण असे की, रजपूत लोकांचे राज्य एके कन्येचे हातून जाईल, असे त्यांस कोणी ब्राह्मणाने भविष्य सांगितले आहे. जसे कंसास नारदाने सांगितले होते, तसे हे आहे. यास्तव ते मुळी ठेवीत नाहीत. हा मूर्खपणाचा परिचार बंद व्हावा, म्हणून पेशजीप्रमाणे हल्लीचे साली इंग्रजी व गुजराथी भाषेत २ ग्रंथ करावे व जो चांगले करील, त्यांस ६०० व ४०० रुपये बक्षीस मिळतील, म्हणूस सरकारने जाहीरनामा लाविला आहे.

आनरबल क्लार्कसाहेब गवरनर जाऊन त्याचे कामावर लॉर्ड फॉकलंड गवरनर येणार म्हणून वर्तमान ऐकिले आहे. त्या लॉर्डास हिंदुस्थान प्रकरणी माहिती नाही म्हणून ऐकण्यात आहे; परंतु तो कुलीन, थोर व विलियम फोर्थ– माजीराजा याचा जावई आहे, असे म्हणतात. हल्लीच्या गवरनरास गुणावरून नेमिले होते. व त्यांनी थोडके दिवसात सत्कीर्ती चांगली संपादन केली. आता हे जातात, येणेकरून लोकांस जे सुख होते, तितके पुढे होणार नाही, असे दिसते.

हिंदू लोक जे आजकालपर्यंत गाढ निद्रेत आहेत. ती जाण्यास बहुत ग्रंथ व बहुत ज्ञान पसरले पाहिजे व असे होण्यास बहुत काळ पाहिजे. व त्यांस मुख्य अडचण अशी आहे की, सांप्रत काळचे द्रव्यवान ब्राह्मण लोक हे यास आडवे येतात; म्हणून हे लोक जाऊन नवी प्रज्ञा होईल तोपर्यंत हिंदू लोकांची सुधारणा होईल, असे दिसत नाही. इतर जातीचे लोक तर सांगितलेले ज्ञान ग्रहण करावयास सिद्ध आहेत. परंतु ब्राह्मण लोक तसे नाहीत. पूर्वीपासून त्यांची समजूत अशी पडलेली आहे की, आम्ही पृथ्वीवर देव आहो; व देवही आमचे हाती आहेत व आमचे आशीर्वादाने व श्रापाने पाहिजे तसे होईल;

व पृथ्वीवर लोक आमच्याइतके शहाणे कोणी नाहीत व देशाशिवाय पृथ्वीवर काही देश नाहीत; इंग्रज लोक हे समुद्रांतील बेटांतील माकडांसारखी मनुष्य इकडे आली आहेत; व रामासारखा विजयी अवतार होईल तेव्हा त्यांचे सैन्य त्यांस घालवील; व कंपनी सरकार ही कोणी एक स्त्री आहे, इत्यादी वेडगळपणाच्या समजुती बहुतेक ब्राह्मणांच्या हाती आहेत. व जो जो ब्राह्मण लोक श्रीमंत होतात, तो तो ज्ञान कमी होते. जे मोठाले सरदार व जहागिरदार आहेत, त्यांस पृथ्वीवर काय होते याची खबर नाही. झोपेत, निशेत व स्त्रियांच्या संगतीत ते निमग्न असतात; परंतु येणेकरून काय उपयोग ?

बाजीराव पेशव्यांचे शाळेतील शिष्य बहुत जहाले आहेत; त्यांस अतिशय गरिबी आल्याशिवाय भ्रांती जाईल, असे दिसत नाही. जशी नवज्वरास बहुत लंघने पाहिजेत, तसे आहे. विद्येचा उपयोग पोटास मिळवावयाचा इतके मात्र लोक समजतात; पण ते मनात असे आणीत नाहीत की, सांगून इतके ग्रंथ व व्यासांनी अठरा पुराणे लिहिली हे काय ? यांस वेतन कोणी ठरविले होते ? विद्यावृद्धीची चाल ब्राह्मणांसी सोडली, म्हणून त्यांची अशी अवस्था झाली आहे. पुढले पत्री आणखी याविषयी लिहून पाठवू.

## ब्राह्मणांचे आचार

**पत्र नंबर ११**

पूर्वी ब्राह्मण लोकांचा काय पवित्रपणा व धर्मनिष्ठपणा असेल, तो असो; परंतु हल्ली तर तो आम्हास काही दिसत नाही.

थोडे दिवसांमागे एक दिवस पुण्यातून रात्रीस जात असताना पाहिले, तो रामजीचे देऊळ आहे, तेथे बहुत लोक जमा झाले होते आणि बहुत कलावंतिणी येऊन बसल्या होत्या. तेव्हा शोध लाविला तो अस समजले की, त्या देवळात दरसाल एक मनुष्य ब्राह्मण जातीचा आहे, तो प्रयत्नेकरून नाच, गाणे इत्यादी समारंभ करून देवाचा उत्साह करितो. हे ऐकून मला असा चमत्कार वाटला की, देवाचे देऊळ ही पवित्र जागा; त्या ठिकाणी असा भ्रष्टाचार जे करतात. ते स्वधर्माप्रमाणे चालतात, असे कसे म्हणावे ? हिंदुस्थानप्रांताची खबर ऐकली

आहे की, तिकडे देवळात कसबिणीस येऊ देत नाही; व जेथे गरती स्त्रिया बसतात, तेथे रांडांस बसू देत नाहीत; परंतु पुण्यात हा बंद काहीच नाही. कुळीण स्त्रिया आणि कसबिणी एके जागी मिळतात. आणि देऊळ म्हणजे भजन, पूजन, चिंतन यांची जागा; तेथे पवित्र अंतःकरणाने देवाचे सान्निध्य व्हावे, असा पश्चात्ताप व्हावा व पापबुद्धी जावी, म्हणून देऊळ बांधतात आणि यास्तव सहस्र घरे बांधली आणि एक देऊळ बांधले. याचे पुण्य सारखे, असे शास्त्र म्हणते. त्याचे कारण हेच की, भगवंताचे सेवेकरिता ते स्थान. तेथे लोकांनी जाऊन परलोकसाधनाचा विचार करावा; म्हणून त्यांचे माहात्म्य अधिक.जर तेथे तमाशे, नाच, लावण्या म्हणावयाच्या असल्या, तर देऊळ बांधले आणि गावची चावडी बांधली सारखेच आहे.

परंतु एका चांगल्या उद्देशाने देऊळ बांधतात, आणि त्याचा उपयोग असा भलता होतो, हे केवढे लोकांचे निर्लज्जपण आणि अज्ञान आहे! ब्राह्मण जे आपले वर्तणुकीने लोकांस नीती लावणारे, ते प्रमुखत्वें करून अशा कर्मांत पडतात. पुण्यात किती एक ठिकाणी आणखी असे पाहिले आहे की, कसबिणीच्या घरांत देवळे स्थापिली आहेत. आणि तेथे ब्राह्मण जाऊन अभिषेक, पूजा वगैरे करतात. ज्या घरात पाऊल ठेवले, तर ब्राह्मण पतित व्हावयाचे, त्या ठिकाणी धर्माची शोभा आणि त्यांस उत्तेजन आणणारी देवालये ती बांधली जातात, आणि तेथे ब्राह्मण जपानुष्ठाने करतात; तेव्हा हे कर्म कसे? अद्यापि पुण्यात किती एक धर्मनिष्ठ ब्राह्मण आहेत. ते अशा देवळास देऊळ असे मानीत नाहीत आणि तेथे जातही नाहीत.

एका गृहस्थाने एका कसबिणीचा पैका वहिवाटीस घेऊन ती मेल्यावर देऊळ बांधले व त्या ठिकाणी एक पुराणिक मोठा वक्ता आहे, त्यांस आणावयाकरिता तो गृहस्थ प्रयत्न करीत होता; परंतु त्याने कबूल केले नाही.मागे श्रीशंकराचार्यस्वामी येथे आले होते, तेव्हा एक गृहस्थ बहिष्कृत आहे, त्याने अशी मसलत केली, स्वामीचे चरण आपले घरास लागून अन्न, जलप्राशन झाले म्हणजे, ते ब्राह्मणांचे गुरू, तेणेकरून आपण सहज ब्राह्मणांत आल्याप्रमाणे होईल, असे मनांत आणून त्याने स्वामीस काही पैका देण्याचे कबूल करून आपले घरी आणले, परंतु तीच मेजवानी त्यांची शेवटची झाली. म्हणजे कोणी एक मनुष्याने ज्या जेवणास जाण्याचे निंद्यकर्म स्वामींनी केले, असे तपशीलवार लिहून, त्याचे दरवाजास एक जाहीरनामा लाविला.असा सर्व लोकांचा आवेश जाणून स्वामींनी त्याच दिवशी कूच केला. जर काही दिवस अधिक राहिले असते, तर स्वामींनी लोकांची धर्म विचक्षणा करण्याचे एकीकडे राहून त्याचेच

वर्तणुकीची विचक्षणा, आमचे शहरात पूर्वापार धर्मसभेची जागा आहे, तेथे झाली असती; परंतु ही गोष्ट चुकली,हे बरे झाले.

तात्पर्य, ब्राह्मणांनी लोभ फार अंगीकारिला. आता ब्राह्मणांचा संतोष किंमतीने विकत घ्यावयाचा आहे. दुसरे काही करावयास नको. जे म्हटले ते कर्म ब्राह्मण करतील व आळसामध्ये आपले पोषण व्हावे, अशी तजवीज काढतील. त्यांस जेवावयास व दक्षिणा मिळाली, म्हणजे झाले. धर्म, अधर्म, अनुशासन, यांचा विचार ते करीत नाहीत. मला वाटते की, आता कुळंबी धर्मात्मे निघतील; परंतु ब्राह्मण निघणार नाहीत. सर्व जातीपेक्षां ते नीचपणास उतरले आहेत. त्यांच्यामध्ये आता गर्व मात्र शेष राहिला आहे. ज्ञान, न्याय, नीती व गुण काही नाही. किती एक ब्राह्मण हल्ली तुकाराम व ज्ञानेश्वरपंथी झाले आहेत व गळ्यात माळा व वीणा घेऊन रस्त्यावर नाचतात. ज्यांस वैराग्य साधन करावयाचे, ते असे करतील काय? दररोज नवीन संत होतात व मग पैका जमल्यावर त्याची भांडणे लागतात. किती एक शिष्य त्यांस सोडून जातात व बावांना शिव्या देतात. व बावांची कर्मे पाहिली, तर उच्चार करवत नाही. कोणी व्यभिचारी, कोणी चोर, कोणी लबाड असे आहेत; सारांश, ते साधू नव्हत. परंतु भोंदू साधू आहेत. ते द्रव्याच्या लोभाकरिता जेथे पुष्कळ लोक जमतात तेथे कथा, भजन करतात व लोक जमत नाहीसे झाले, म्हणजे चालते होतात. असे लोकांना ठकवीत फिरतात. आणि आपण काही उद्योग न करता भीक मागून यथास्थित पोट भरितात व लोक तरी किती आंधळे आहेत पहा! असे लबाड ठगास साधू म्हणून कबूल करतात. साधूने कसे राहावे याविषयी तुकारामाचा अभंग कसा आहे—

हरिभक्त जे म्हणवीती, हीना दीना का मागती।
देखुनी सभेचा समुदाय, दावी भक्तीचा हा भाव।
कथेमध्ये हालवी ढोंग, संत नव्हे तो बेसंग।
पाहुनि स्त्रियांचा तो मेळा, काढि सुस्वर तो गळा।
तुका म्हणे नव्हे योग, पोटासाठी केले ढोंग॥१॥
जेथे कीर्तन करावे, तेथे अन्न व सेवावे।
तट्टू बैलांशी दाणा, तेथे मागू नये जाणा।
बुका लावू नये भाळा, गळा घालू नये माळा।
तुका म्हणे तेचि संत, बाकी सगळे ते हो जंत॥२॥

याप्रमाणे असून वेदशास्त्र सोडून तुकारामपंथ धरतात. मग त्यासारखे

तरी का आचरण करीत नाहीत? त्यांचे चित्त सर्व काळ लोकांस लुटण्याकडे असते. त्यांस आणखी उद्योग काही नाहीत. गंध म्होरकीदार, मुद्रा चक्रीदार व शेंड्या घेरेदार राखाव्या व ढोंग माजवावे; यांत फळ काय होणार? असे खोटे साधू इतर ढोंगी लोकांपेक्षा शासनास अधिक पात्र आहेत असे मला वाटते.

## ब्राह्मणां अज्ञानचे

**पत्र नंबर १७ : ११ जून १८४८**

या देशाचे लोकांचे असे मत आहे की, ईश्वराचे सृष्टीत स्त्रिया थोड्या आणि पुरुष फार निर्माण केले आहेत व याचे उदाहरण ते असे दाखवितात की, किती एक पुरुष लग्न झाल्याखेरीज असतात आणि स्त्रिया लग्न झाल्याखेरीज असत नाहीत.

याजवरून बहुत पुरुषांस स्त्रिया मिळत नाहीत; असे अनुमान ते करतात; परंतु मला वाटते की, हा मूर्खपणा आहे; कारण स्त्रियांस एकदा विवाह करण्याचा व पुरुषांस दोन तीन वेळ विवाह करण्याचा अधिकार आहे. यास्तव स्त्रिया तिकडे जास्त जातात आणि इकडे कमती येतात, तर करिता स्त्रियांस पुनरपि लग्न करण्याचा अधिकार मिळेल, तर पुरुषांस कधी कमती येणार नाही. व स्त्री-पुरुष सृष्टीत समसमान आहेत, तेव्हा पुरुष लग्नाशिवाय रहावे व स्त्रिया न रहाव्या, याचे काही कारण दिसत नाही; परंतु मनुष्याच्या रीतीत व नियमात व वर्तणुकीत याचे कारण आहे. म्हणजे ब्राह्मण लोकांनी हा मोठा अनर्थ मांडला आहे की, स्त्रियांस पुनः लग्न का करू देत नाहीत! ही गोष्ट त्यांस इतकी बरी वाटते की, त्याविषयी जर कोणी भाषण केले, तर त्यांस मनापासून वाईट वाटते व अतिशय दुःख होते ते म्हणत की येणेकरून आमचा पूर्वापार धर्म वसिष्ठापासून चालत आलता त्यांस अपाय होईल व सर्व लौकिक बुडेल आणि आपण सारे या पापामुळे नरकात जाऊ, असे मोठमोठे विद्वान आहेत, त्यांचे देखील मनात येते. व जे गृहस्थ भट वगैरे अडाणी लोक आहेत ते तर लौकिकावाचून दुसरी गोष्ट जाणतच नाहीत.

परंतु मला वाटते की, ही समजूत अगदी खोटी आहे. पुनर्विवाहापासून धर्मास, कर्मास व लौकिकास अपाय नाही. सर्व चांगले आहे. मनात जे मिथ्या आहे ते खरे वाटते. ईश्वरास भजावे हा मात्र धर्म आहे. लग्न इत्यादी रीतिभातीशी धर्माचा काही संबंध नाही. पूर्वी देवरोत्पत्ती होती. ऋषी मांस खात होते व इतर जातीचे लोक ब्राह्मण होत असत. असे वाल्मिक व व्यास यांचे उदाहरणावरून समजते व असे दिसते की, त्या वेळचे ब्राह्मण ज्ञानी होते. आताचे सारखे मूढ नव्हते व आमचे जातीने आमचे शास्त्राचे बाहेर चालू नये, असे म्हणत नव्हते. सारासार विचार पहात होते व जर काही एक अनर्थ वाटला, तर तो बंद करून दुसरी रीती स्थापीत होते. असे अनेक स्मृती आहेत त्या पाहिल्यावरून वाटते. दर एक स्मृतिरूप ग्रंथात वेगळाली मते आहेत; याजवरून असे दिसते की, प्रत्येक स्मृतिकार एकेक राजाचा आश्रित असेल व त्याने आपापले राजास लागू पडतील तसतसे कायदे केले. याजवरून ते शहाणे होते, असे दिसते.

एका गृहस्थाने एक बाग केला. तेथे झाडे लावीत; ती मेली तर तो पुनः दुसरी झाडे लावी. तेणेकरून त्याचा बाग चांगला रहात होता. हा दृष्टांत ब्राह्मणाचे शास्त्रांस लावू. यांच्या शास्त्राच्या बागेत पूर्वी झाडे लावली. ती वाळून गेली, तरी लोक त्या झाडांशी बांधून घेऊन हित-अनहितावर हल्ली काही लक्ष्य देत नाहीत. सरासरी लक्ष्य देण्याचा विचार शंकराचार्यांपर्यंत चालला; परंतु अलीकडे सुमारे दोन हजार वर्षांत लोक आंधळे झाले, विचार करीत नाहीत व ब्राह्मण पूर्वी पोथीपुस्तक पाहणारे व रानात राहणारे, ते जाऊन आताचे ब्राह्मण मजूरदार व घरंदाज झाले; व ते, कोण श्रीमंत आहेत ? फुकट जेवावयास कोण घालील ? आणि दक्षणा कोण वाटील ? अशी वाट पहातात त्यांची योग्यता पाहिली, तर दोन ओळी पाठ म्हणतात इतकीच, परंतु अर्थाचे नावाने शून्य ! तेव्हा त्यांस विद्वान म्हणावे किंवा नाही, याचा संशय येतो.

कारण जास अर्थपरिज्ञान नाही, नुसती अक्षरे वाचून पाठ म्हणतात, त्याचे ते शब्द, जशी जनावरांची ध्वनी तद्वत आहेत. कारण जनावरांची आणि मनुष्यांची ध्वनी सारखीच आहे. मनुष्यामध्ये जास्ती इतकेच आहे की, ते जी ध्वनी करतात, तिचा अर्थ करून समजतात व दुसऱ्यास कळवितात. हे मनुष्याचे विशेष लक्षण आहे, ते लक्षण अलीकडील ब्राह्मणांचे ठायी आढळत नाही. तेव्हा हे आपणांस बुद्धी, विचार, ज्ञान, शक्ती, मन, चित्त इतकी असून ती बंद करून पोटे भरण्याकरिता मात्र पाठ करतात. तेव्हा त्यांस विद्वान कोण म्हणेल ? व ब्राह्मणांची मते बहुधा नीट असत नाहीत. त्यांचे चित्त जेवणावर व पैशावर असते. मूर्ख लोकांत प्रतिष्ठा मिरवावी व फुकट पोट भरावे, म्हणून

ते चार अक्षरे पाठ करतात, परंतु त्यांस ज्ञानी आणि विचारी कोण म्हणेल? ते भारवाहक असे आहेत. मग त्यांची वर्तणूक तरी चांगली कोठून असणार! अलीकडे पुण्यात एक दशग्रंथी विद्वान ब्राह्मण सदरी लिहिले प्रकारचा होता; त्यांस मॅजिस्ट्रेटाकडून चोरीबद्दल एक वर्षाची शिक्षा झाली. याजवरून या सर्व गोष्टी मनात आल्या, त्या कळविल्या आहेत.

मला वाटते की, बहुत वैदिक व शास्त्री हे वाकड्या समजुतीचे लोक आहेत. व हिंदुस्थानचे विद्येचा स्वभाव असा दिसतो की, त्यातील विद्वान् बहुधा मोठा मूर्ख आणि भलतेच समजुतीचा असतो. मनुष्याहून पृथक् बुद्धी त्यास येती, अडाणी मते वगैरे त्यांस फार भासतात, यांचे काय कारण असेल ते असो. त्याचा पुढे विचार करू.

इंग्रज लोकांनी जगातील बहुत गोष्टींचा शोध केला आहे व त्याचे खालोखाल मुसलमान लोक आहेत; कारण फारशी भागवत, भारत व वैदिक ग्रंथ अकबर बादशाह वगैरे यांचे हुकुमावरून ब्राह्मण धर्म प्रसिद्ध होण्याकरिता लिहिले आहे, तेव्हा इंग्रजांचे खाली शोधक व उद्योगी हे लोक दिसतात. ब्राह्मण लोक व मराठे लोक यांनी शंभर दीडशे वर्षे राज्य केले, परंतु असे काही केले नाही व त्या काळी इंग्रज व मुसलमान हे लोक हिंदुस्थानात होते. परंतु त्याजविषयी कोणी शोध किंवा पुस्तक केले नाही. यावरून हिंदू लोक निद्रिस्थ आहेत, असे दिसते. यांचे शहाणपण, अक्कल, विद्या व कला बाहेर गेली व बाहेरची आणावयास यांस संकट पडले, हा केवढा चमत्कार!

पेशवाईत ब्राह्मण लोकांनी फक्त जेवणाचे पदार्थ नवे काय काय होतील व रेशमी व भरगच्ची पोशाख अंगावर कुत्री भोकावयाजोगे काय काय तयार होतील, याचा विचार करण्यात मात्र वेळ घालविला. काही विद्येपासून हित, मनाची सुधारणा व राज्याचा बंदोबस्त केला नाही, हे उघड आहे. जे हिंदुस्थानात पहिले प्रतीचे ब्राह्मण त्यांजवाचून दुसरे कोणी वाचू नये, असे नेम आहेत. त्या ब्राह्मणांचा मूर्खपणा आहे. तेव्हा इतर जातींची व्यवस्था सहजच समजेल तस्मात् हे लोक मूर्खपणात आहेत, हाच निश्चय खरा व त्यांस जागृत करण्याकरिता इंग्रजांस पाठविण्याची योजना ईश्वराने केली आहे, हाही निश्चय खरा आणि त्याप्रमाणे हा बेत सिद्धीस जाऊन हे लोक ज्ञानी व सावध होऊन सुखी व्हावे, हीच आता आशा आहे.

## ब्राह्मणांचे महत्त्व

■

**पत्र नंबर २० : ९ जुलई १८४८**

म॰ॱ एक संशय आहे की, हल्लीचे काळी कोणी वास्तविक ब्राह्मण आहेत किंवा नाहीत. माझ्या मताने म्हणाल तर कोणीही नाहीत, असे मला वाटते. आता ब्राह्मण जसे इतर रोजगारी व मजदूर लोक, तसेच आहेत. पढावयाचा त्यांचा व्यापार आहे; परंतु त्यांस अर्थज्ञान पाहिजे ते नाही. आपल्याला असे म्हणवितात की –

देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनं च दैवतम् ।
ते मंत्रा ब्राह्मणाधीनं ब्राह्मणो मम दैवतम् ॥१॥

अर्थ – देवाचे स्वाधीन सर्व जग आहे व देव मंत्राचे स्वाधीन आहेत; पण ते मंत्र ब्राह्मणांचे स्वाधीन; म्हणून ब्राह्मण हे माझे स्वतःचे दैवत आहे असे खुद्ध परमेश्वर म्हणतो.

आता याजवरून ब्राह्मण हे देवाक्षाही जास्ती आहेत, असे झाले; परंतु असले मत मूर्खांशिवाय कोणी ऐकेल काय ? जेव्हा लोक अनाडी होते, तेव्हा ब्राह्मणांनी आपला शक पराकाष्ठेचा चालविला. इतर लोक ज्ञानी होतील आणि त्यांचा नफा व फुकट जेवण बुडेल, याजकरिता त्यांनी असा नेम केला की, दुसरे जातीने शिकू नये. जे काय वाचणे ते ब्राह्मणांचे तोंडून इतर लोकांनी ऐकावे. येणेकरून पुराणिकांचे तांदूळ, भटांची दक्षिणा, श्राद्धाची क्षीर व लग्नाच्या पोळ्या ब्राह्मणांनी आपल्याकडे पुष्कळ पिकविल्या व त्याप्रमाणे हे आजपर्यंत निभावले, परंतु आता निभणे मला दिसत नाही; कारण आता चारी जातीचे लोक हुशार झाले आहेत. आणि जे ब्राह्मणांनी आपल्या नफ्याकरिता ठरविलेले होते, ते अलीकडे मोडले आहे.

विद्येचा सर्वांस सारखा उपयोग होत आहे व विद्याही चौपट वाढली आणि कृत्रिमपणाचा थोरपणा बुडत चालला. विद्या झाकलेली होती, तोपर्यंत तिचा मोठा बाऊ वाटत होता; पण आता उघड झाली, तेव्हा सर्व न्यायच होईल. मला वाटते की, ब्राह्मणासारखा गर्विष्ठ पृथ्वीवर दुसरा कोणी नसेल; कारण त्यांनी जरी आपला धर्म व कर्म सोडिले, किती एक लबाड लुच्चे आहेत, किती एक मूर्ख आहेत, किती एक भडवेपणाचे रोजगार करतात,

किती एक रांडांचे मागे तबले वाजवितात, असे असे निर्लज्ज झाले आहेत, तरी त्यांस असे वाटते की, आम्ही इतके केले, तरी उत्तम कुळंब्यापेक्षा आम्ही चांगले व श्रेष्ठ आहो. यास प्रमाण –

दुःशीलोऽपि द्विजः पूज्यो न च शूद्रो जितेन्द्रियः।
दुःशीलापि दुहेद् गावो न खरीं शीलवर्तिनीम्॥१॥

अर्थ – चांगल्या शीलाचा नसला तरी ब्राह्मण पूज्य आहे. मोठा जितेंद्रिय झाला, तरी शूद्र पूज्य नाही. यास उदाहरण, गाय लाथाळ असली, तरी तीच दुधास योग्य, गाढवी गरीब असली तरी ती योग्य नाही.

मला ब्राह्मणांचे व इतर लोकांमध्ये भिन्नपणा काहीच दिसत नाही. ब्राह्मण मरतात, जन्मतात व हातपाय त्यांस इतरांसारखेच असतात. मग इतरांपेक्षा त्यांचे मध्ये काय फरक आहे? व ब्राह्मणाला गर्व कशाकरिता असावा? त्याचा मुख्य गुण काय ती विद्या; तिचे तर त्यांचेमध्ये शून्य पडून काळे झाले आहे, तेव्हा आता कोणी काही पाठ करील, तर त्याला तेवढ्यावरून थोर म्हणावे काय? त्याचा उपयोग काय? बैलाच्या पाठीवर साखरेच्या गोण्या घातल्या तर त्याला जसा त्याचा उपयोग नाही, तद्वत ब्राह्मणांनी पुष्कळ पाठ केले, पण अर्थ ठाऊक नाही व ज्ञान नाही, तर हातात तंबाकू व दुसरे हातात चुना आणि तोंडात वेदपठण, हे तरी उत्तम आहे काय? तेव्हा असे भ्रष्ट झाले ते ब्राह्मण म्हणावे किंवा त्यांस दुसरे काही म्हणावे?

वास्तविक म्हटले तर इतर जातीचे मनुष्यास जातीचा गर्व नसतो वा आपले हलके जातीचे समजुतीमुळे तो नम्रपणाने वागतो आणि ब्राह्मण मूळचा भिकारी असला तरी मी हिऱ्याचे जातीचा आहे, असे समजून जरी कोळसा असला तरी गर्वी असतो व मी सर्वांहून थोर, अशी त्याची समजूत असते. तशात त्यांस पैसा मिळाला किंवा काही सोय झाली म्हणजे तर त्याएवढा गर्विष्ठ कोणी नाही. मग तो कोणास मोजीत नाही. आपला मीपणा मिरवितो.

आता वास्तविक पाहिले तर कोणत्याही युगात ब्राह्मणास राज्यावर किंवा अधिकारावर कोणी बसविले होते असे नाही. जे विद्वान ब्राह्मण असतील, त्यांचा राजाने सन्मान करून त्यांस संग्रहास बाळगावे, असे आहे; परंतु अधिकाराचे उपयोगी ते नाहीत. हे तर स्पष्ट आहे. ब्राह्मणाकडे राज्य असेल तर इतर जातीचा काय परिणाम होईल? व ब्राह्मण किती माजोरीपणा करतील? मला वाटते की, स्वभावेकरून किंवा विद्येचे जोराने जे निर्मळ असतील, ज्यांनी आपला गर्व टाकला असेल व आपण आणि इतर जातीचे लोक सारखे आहेत

असे ज्यांस वाटेल, त्यांस मात्र अधिकारावर ठेवावे. इतर ब्राह्मणांस ठेवू नये. कारण इतर जातींपेक्षा महत्त्वाचे गैरसमजुतीमुळे ते वाईट आहेत; पण हल्ली बहुधा सर्व रोजगार ब्राह्मणांनी बळकाविले आहेत. म्हणजे एकीकडे भटांनी धर्म व दुसरीकडे गृहस्थांनी रोजगार अशा दोन्ही बाजू धरून इतर लोकांस आत येऊ देऊ नये, अशी शक्कल केली होती.

परंतु ईश्वरास हे कसे आवडेल? त्याने जी उत्तम योजना करावयाची ती केली. यास्तव आता सर्व जातींचे अधिकारी होतात, हे ठीक आहे. कारण ब्राह्मणांचा गर्व व आढ्यता फार. तेव्हा इतर जात त्यापेक्षा बरी. तसेच ब्राह्मणांचा स्वार्थ पाहण्याचा स्वभाव इतका आहे की, त्यांस आपला नफा मात्र दिसतो. दुसरे काही दिसत नाही. पहा की, शिंदे, होळकर, गायकवाड या सर्वांस पेशव्यांबरोबर राज्ये मिळाली. त्यांची ती अद्यापि कायम आहेत व पेशव्यांचेच बुडाले, याची कारणे काय? तर यास जी कारणे आहेत ती अशी –

(१) ब्राह्मण कोणाचे ऐकावयाचे नाहीत. (२) ब्राह्मणांस गर्व फार, याजमुळे ते सर्वांस तुच्छ मानतात व म्हणतात की, आमच्यापेक्षा शहाणा कोण आहे? (३) देवब्राह्मण यांचे जवळ जवळ नाते आहे. तेव्हा देव आपले रक्षण करील, असे म्हणून ब्राह्मण भलतेच करतात. (४) ब्राह्मणांकडून इतर वर्णांचा द्वेष होतो. (५) ब्राह्मणांस रयत राजी होत नाही. (६) ब्राह्मणांची स्नानसंध्या माजली, म्हणजे राजकीय काम व पराक्रम होत नाही. (७) ब्राह्मणांस अडचणी फार, त्यामुळे प्रवासात हे निभत नाहीत. (८) ब्राह्मणांस सोवळे फार; (९) ब्राह्मण आपल्या लोकांशी द्वेष करतात व परक्यांचे गुलाम होतात, (१०) ब्राह्मण स्वार्थ फार पाहतात आणि त्रास आणतात. (११) यास असे वाटते की, आम्ही ब्राह्मण आहो; कोणी काही दिले तरी त्याचा धर्म झाला म्हणून ते लोकांस नागवितात.

## गृहस्थ आणि भिक्षुक यांचा भेद

पत्र नंबर २१ : १६ जुलई १८४८

मागील अंकात एक पत्र आहे. त्यात ब्राह्मणांचे शापापासून नाश होतो व ब्राह्मण स्वधर्माप्रमाणे चालतात, असे वर्णन केले आहे. त्याचे उत्तर लिहितो

ते असे—

जर ब्राह्मण लोक आपल्या धर्माप्रमाणे चालावयाचा उद्योग करीत आहेत तर मग मुळी ब्राह्मणवर्णाच्या दोन जाती, एक गृहस्थ व एक भट अशा बहुत दिवस चालू आहेत, याचे कारण काय? ब्राह्मणांनी विद्याभ्यास करावा हा धर्म सोडून ते गृहस्थ कसे झाले? याचे कारण मला इतकेच वाटते की, ब्राह्मणवर्ग पहिला थोडा होता, तेव्हा लोकांस त्याचे सहज पालन करता येत होते व पुष्कळ वाढला तेव्हा तितक्यांचे पालन कसे होईल? बरे, इतके ब्राह्मण अधिक झाले, म्हणून काही आंधळे, पांगळे, लंगडे, रोगी, वृद्ध, बाळ हे कमी झाले नाहीत व त्यांचे पोषणही केले पाहिजे. तेव्हा हे वास्तविक गरीब लोक व शिवाय ब्राह्मण, इतक्यांचे पोषण लोकांच्याने होईना, याजमुळे ब्राह्मणांनी गृहस्थपणा धरून इतर जातीचे रोजगार म्हणजे क्षत्रियांची शिपाईगिरी, वैश्यांचा व्यापार व शूद्राची चाकरी ही सर्व पत्करली व तेणेकरून ब्राह्मणांचे धर्मापासून पतन आपल्या आपण झाले. हे काही नीच लोकांनी केले, असे नाही.

हल्ली ब्राह्मण लोक तर धर्माप्रमाणे वागण्याचा उद्योग करीत नाहीत; परंतु त्यांचा मोठा उद्योग इतकाच आहे की, कोठे तरी उद्योगावाचून फुकट जेवण मिळावे, असे स्थळ पाहून तेथे शिरावे. धर्माविषयी आपणास काय कळते, याविषयी जर कोणीही ब्राह्मण आपले अंतःकरणात विचार करून पाहील तर त्याचे सहज ध्यानात येईल. ब्राह्मणात फारसे विद्वान व नीतिवान आहेत, असे दिसत नाही. जसे इतर वर्णांचे लोक आहेत, त्याचप्रमाणे हेही आहेत. यांचे अंगी काही ज्ञानाचा थोरपणा नाही व भट तर बहुधा भोजनभाऊ आहेत. आणि गृहस्थ चाकरी व व्यापार करून पोट भरितात. तेव्हा धर्मप्रवर्तक ब्राह्मण आता कोठे आहेत? कोठेच नाहीत. म्हणून हल्लीचे ब्राह्मणांस इतर जातीचे लोकांपेक्षा अधिक मान देणे योग्य नाही. जर कोणी देईल, तर तो अज्ञानी व आंधळा असावा, यात संशय नाही. ब्राह्मणांची बुद्धी अशी आहे की, सर्व अधिकार व द्रव्य आपल्यास असावे व विद्येचा थोरपणा घालवून ते द्रव्याचा थोरपणा पाहू लागले आहेत. आता जर कोणी शूद्र जातीचा कारकून झाला, तर सर्व ब्राह्मण लोक त्याजकडे डोळे वटारून पाहतात. त्यांस असे वाटते की, आमचा धर्म लिहिणे-पुसणे करावयाचा असून कुणबी आमचा वृत्तिच्छेद करतात.

सारांश, त्यांस धर्मात थोरपणा आहे, तसाच सांसारिक थोरपणा असावा म्हणजे आपण सर्वांहून मुख्य होऊन बसावे, असे वाटते. आपण राजाप्रमाणे राहू, सर्व रयत काम करील. आम्ही मांडीवर मांडी चढवून खात जाऊ, पोटावर

हात फिरवू व यजमानाची स्तुती करू. असे त्यांचे मनात येते, परंतु त्यांस वाटत नाही की, आपण फुकट खाण्याची इच्छा करितो, तशी फुकट खाण्यायोग्य लोकांची चाकरी कोणती करितो ? धर्म कोणास शिकवतो ? व कोणती विद्या वाढवितो ? जसा एखादा अमीर असतो, त्यांस वाटते की, गुलामांनी सर्व प्रकारे सेवा करावी, तद्वत् ब्राह्मणांस वाटते की, आम्ही मोठे आहो. आमची सेवा सर्व लोकांनी करावी, आम्हाकरिता शेते पिकवावी, आम्हाकरिता घरे बांधावी, अन्नछत्र घातले, तरी तेथे फक्त आम्हा ब्राह्मण जातीस मात्र जेवावयास घालावे, इतर जातींस घालू नये, असे त्यांस वाटते.

ब्राह्मणांनी अन्नछत्रे घातली आहेत, तेथे कोणी ब्राह्मणांखेरीज दुसरा वर्ग जेवील काय ? जरी अत्यंत पीडित, रोगी, थकलेला व शूद्र येईल, तरी ते निर्दयपणाने त्यांस नाही म्हणतील. आणि श्रीमंत, धट्टाकट्टा व मूर्खांचा राजा असा ब्राह्मण आला, तरी त्यांस जेवावयास घालतील. तेव्हा हा धर्म कशाचा ? त्यांच्या दुष्ट स्वभावाने एकमेकांत वितुष्टे मात्र पडली आहेत. आणि प्रत्येक जातीचे लोक जसे वेगळाले देशाचे लोक जसे आपसांत भांडतात तसे हे एक देशचे लोक असून, आपल्यात वेगवेगळे देशचे शत्रूप्रमाणे भांडतात, येणेकरून सर्वांची चित्ते फुटली आहेत व कोणामध्ये ऐक्य नाही. हा इतका या देशाचा फायदा ब्राह्मणांनी केला आहे.

ब्राह्मणांचा धर्म काय, हा प्रश्न जरी पाच हजार ब्राह्मणांचे सभेत केला, तरी त्याचे उत्तर कोणी एकही देणार नाही, परंतु दक्षणा सर्व मागतील. तेव्हा हे भट कशाचे ? जसे इतर जातीचे सुतार, न्हावी, माळी तसेच हे मूर्ख राघूसारखे पढणारे, वेदविक्रयेकरून पोट भरणारे व निर्लज्जपणाने भीक मागून काम न करिता खाणारे आहेत. हे लोकांस सांगत फिरतात की ब्राह्मणांस द्यावे, म्हणजे मोठा धर्म आहे. कुळंब्यास काही देऊ नये. कुळंबी जरी म्हातारा व आंधळा असला तरी चिंता नाही. त्याने मेहनत करावी, हाच त्याचा धर्म आहे. अहाहा ! काय हा आपलपोटेपणा ! ब्राह्मणांस ब्रह्मदेवाने फुकट खावे म्हणून सनद करून दिली आहे काय ? बाजीरावाने ब्राह्मणांस पुष्कळ खावयास दिले. त्याचे ब्राह्मणांच्या आशीर्वादाने काय झाले ? अन्न मात्र व्यर्थ गेले आणि त्याचा नाश व्हावयाचा तो झालाच; तर ब्राह्मणांनी याचा विचार करावा. ब्राह्मणांच्या आशीर्वादाने होणार काय ? जे ईश्वर इच्छील ते घडेल. ब्राह्मणांच्याने काही होणार नाही हे मला पक्के ठाऊक आहे आणि आजपर्यंत ब्राह्मणांनी अज्ञानी लोकांस फसवून जे खाल्ले, ते आता सर्व उघड व्हावयाची वेळ आली आहे.

## ब्राह्मण लोकांचा स्वभाव

पत्र नंबर ४८ : १८ फेब्रुवारी १८४९

हिंदू लोकांमध्ये निर्लज्जपणा हे एक त्यांच्या दुःखास मोठे कारण आहे. पहा, एक जण लाच खातो व त्यांस सरकारातून शासन होऊन त्याची धिंड काढतात, हे पाहून लोकांस दहशत पडावी; परंतु ते काही नाही. जे त्याचे कामावर बसतात, ते लागलीच लाच खाऊ लागतात. तसेच इतर सर्व गोष्टींमध्ये दुर्गुणास लोक भीत नाहीत.

याचे कारण असे की, या लोकांमध्ये छापखाने व वर्तमानपत्रे वगैरे फार नाहीत; याजमुळे त्यांस निर्लज्जपणाचे भय वाटत नाही. छापखान्यामध्ये जितके अधिक ग्रंथ छापतात, तितकी लोकांची सुधारणा होते; कारण कोणी काही अपराध केला तर तो छापला जातो आणि प्रसिद्धीस येतो, याजमुळे त्यांस असे भय प्राप्त होते की, माझी अपकीर्ती सर्व जगात होईल; आणि माझे स्नेही, मित्र परदेशात आहेत, त्यांसही कळेल. आणि माझे मागे ही लिहिलेली गोष्ट राहून अपकीर्ती मागे राहील. या भयाने लोक अपराध किंवा वाईट कामे करीत नाहीत आणि जरी अद्यापि ज्याची अपकीर्ती छापणारांनी लिहिली त्याने स्वतः मूर्खपणाने वाईट कामे सोडली नाहीत; तत्रापि त्याची फजिती होऊन त्याचे वंशातले पुढचे लोक आणि इतर लोक हे सावध होतात की, अमक्याने वाईट काम केले, त्याची अपकीर्ती जहाली. तेव्हा आपण केले तर तसेच होईल, त्यामुळे ते करीत नाहीत. एणेकरून छापखाना हे लोकांस मोठे बंधारण आहे. तसेच लोकही शहाणे होतात व त्यांस कोठे काय होते, हे कळते आणि सावध राहतात.

जर छापखाना व डाक हिंदुस्थानात असती, तर परके लोक हिंदुस्थानात सुलभपणे आले, तसे आले नसते; परंतु या लोकांचे दुर्भाग्य. तेणेकरून छापखान्याचा फायदा त्यांस कळत नाही. जे ब्राह्मण प्राचीन समजुतीचे अद्यापि पुष्कळ आहेत, त्यांस असे वाटते की, छापखान्याचा काय उपयोग आहे? बुकात पैका घालून काय फळ? पृथ्वीवरच्या बातम्या ठेवून आम्हास काय करावयाचे आहे? आपले घरातले पण पहावे. मोठ्या गोष्टी कशास पाहिजेत? अशा ते रांडगोष्टी सांगतात.

असे हे हिंदू लोक शिथिल आणि मूर्ख, म्हणून या दशेस आले. जर

पेशव्यांचे अमलांत इंग्रज मोठे आहेत व त्यांची काय अवस्था आहे, हे लोकांस कळले असते, तरा राज्य न घालवते; परंतु पोटार्थी भट, त्यांनी गोड खाण्याशिवाय दुसरे काही मनात आणलेच नाही. गोड खाण्यास मिळाले, म्हणजे सर्व ब्राह्मण एकत्र डोंगळ्याप्रमाणे जमतात व मग त्याचे अवधान फार लागते. कोठे मुक्तद्वार किंवा ब्राह्मण -संतर्पण किंवा उत्साह आहे, अशी वार्ता आली की, ब्राह्मण मोठ्या हौसेने तेथे जमतात. दुसरी काही राज्यकारभाराची किंवा ज्ञानवृद्धीसाठी सभा असेल, तर हालणार नाहीत ? तात्पर्य, या जातीची नजर जेवण आणि दक्षणा याहून पलीकडे जात नाही व याहून दुसरा मोठा कारभार पृथ्वीवर आहे, असे या जातीस वाटत नाही.

एकास लाथ मारली तर दुसरा ' का ' म्हणावयाचा नाही. इतके तर हे भित्रे, रांड्ये व निर्बल आहेत. यांचमध्ये साहस, धैर्य आणि खरेपणा ही प्रायशः नाहीत. साहस म्हणजे मोठे कार्य डोकीवर घेणे, धैर्य म्हणजे आपल्यावर किंवा दुसऱ्यावर जुलूम कोणी करील, तर न सोसणे आणि खरेपणा म्हणजे लबाडीचे व्यापारात न शिरणे. यांपैकी एकही गुण याजमध्ये नाही. जनावरासारखे हे मूर्ख आहेत, जशा शेतात पुष्कळ चिमण्या खावयास जमतात व त्यांस एक काठी उगारली, म्हणजे त्या भुरकन् उडून जातात, तसे हे ब्राह्मण लोक आहेत. यांची पंगत करावयास मात्र चांगली; परंतु दुसरा काही उपयोग नाही आणि सांप्रत पहा की, पेशव्यांचे राज्य गेले, हे वाईट जहाले, असे जे ब्राह्मण लोक म्हणतात, ते एवढ्याच कारणाने म्हणतात की, त्यांस खावयास मिळत नाही. ब्राह्मण लोक इतके दुर्बुद्धी आहेत की, त्यांस खावयास द्या व मग काही करा, चिंता नाही. पोटास घालावे आणि पायपोस मारावे, त्यांस लज्जा वाटणार नाही. आणि त्यांची म्हण अशी आहे की, पोटावर मारू नका, पाठीवर मारा, म्हणजे जेवावयास घाला मग काही करा. याप्रमाणे फक्त जेवणाची मात्र काळजी. पोटाचा विचार ब्राह्मण लोकांस पहिल्याने आहे; मग पाठीमागून सर्व. परंतु बहुधा तेवढा बंदोबस्त असला, म्हणजे ते उजवे किंवा डावे बाजूस पहावयाचे नाहीत, हे आम्ही लिहिलेच आहे.

याविषयी कोणास खोटे वाटेल तर त्याने स्वदेशीय राजधानीतील लोकांकडे पहावे आणि त्यांस पुसावे की, ' इंग्रज हिंदुस्थानात कोठे कोठे राज्य करतात ? ' ते म्हणतील की, ' छी ! इंग्रज कोठे आहेत ? आमचे संस्थानात तो एक ताम्रमुखी मात्र असतो. ' याचप्रमाणे पेशवाईत अवस्था होती. पुण्यात वकील होता, तेवढी गोष्ट मात्र दरबारातील वागणारे यास माहीत. इतर लोकांस तेही माहीत नव्हते कोणी सुखी असेल तर त्यांनी प्रवास करावा असे नाही. परंतु ग्रंथद्वारे

किंवा वर्तमानपत्रद्वारे त्यांस वर्तमान तरी माहीत असावे!

एखादे गांवडे कुलकर्ण्यास पुसा की, कलेक्टरसाहेब यांची नेमणूक कोण करितो, त्यांस पगार काय आणि गवरनरसाहेब कोण आहेत व कोठून आले? तर त्यांच्याने काही सांगवणार नाही. ज्या शहरामध्ये काही गोष्ट आहे तीच गोष्ट त्या शहरात ठाऊक नसते. पुण्यामध्ये शाळा आहे, लायब्ररी आहे व छापखाना आहे. हीच गोष्ट पाचशे रुपये महिना पगार किंवा पेनशन खाणारास पुसा म्हणजे ठाऊक नाही असे तो म्हणेल. कारण की, हिंदू लोक शोध करण्यात फार आळशी आहेत. कोणी कोणी शोध करणारे आहेत. परंतु लोकांच्या घरच्या गोष्टी व चहाड्या एवढे मात्र ते मनास आणतात. दुसऱ्या उपयोगी गोष्टी काही मनास आणीत नाहीत. व थोर आहेत ते जेवतात आणि निजतात. अशी त्यांची अवस्था आहे.

मागे सांगतात की, दिल्लीचे बादशहाने, मिरची तिखट आहे किंवा कसे हे पुसले होते; व सूर्य हा पदार्थ काय आहे, हा प्रश्न पुसला होता. तद्वत् हल्लींही ऐकण्यात आहे की, कर्नाटकातील सरदारांपैकी एकाने पोलिटिकल एजंटास विचारले की, तुम्ही समुद्र पाहिला आहे किंवा नाही? व आणखी एक वेळ असा प्रश्न केला की, 'कृष्णातीरी घाट आहे तो पाण्याने वहात का नाही?' तेव्हा एक हुषार जवळ होता, त्याने सांगितले की, 'महाराज, पाण्याने घाट वाहून जातो, परंतु आमच्याजवळ हत्ती आहेत, त्याजकडून पुन्हा ओढून आणून जाग्यावर ठेवतो.' तेव्हा त्या मूर्खाची समजूत पडली. अशा किती एक अज्ञानपणाच्या गोष्टी ऐकण्यात आहेत. त्याचे वर्णन करून उपयोग काय? परंतु असे आहे तरी ज्यास खावयास मिळते त्यांस जरी फाशी द्यावयास काढले तरी वाचणे किंवा ज्ञान शिकणे, ही गोट त्याच्याने व्हावयाची नाही.

या लोकांच्या इतक्या समजुती आकुंचित जहाल्या आहेत की, ते वर्तमानकाळचा विचार करतात, उद्याची काळजी करीत नाहीत. लाच खाल्ला म्हणून एकाची धिंड निघाली, काय चिंता आहे? आपण मिळेल तोपर्यंत पैसा खाऊ; ज्या दिवशी काळ फिरेल त्या दिवशी पहातच आहोत. याप्रमाणे काळास दूषण देतात; पण आपण कर्मे कोणती करतो, याचा विचार करीत नाहीत. आणि इतके निर्लज्जपणास दुसरे कारण असे आहे की लोक शहाणे नाहीत. कुळंबी ते अडाणी कुळंबी; व ब्राह्मण ते शतपट मूर्ख आहेत. तेव्हा जो वाईट काम करतो, त्यांस असे वाटत नाही की, मला हे लोक वाईट म्हणतील. आणि वास्तविक पाहिले तर जे लोक वाईट कामे करतात, त्यांची निंदा पाठीमागे लोक पुष्कळ करतात; परंतु भित्रे आहेत, त्याजमुळे त्यांचे

तोंडावर होत नाही. व त्याचा त्याग करून सर्वांनी हलका मानणे व त्याचा लोकांत हरतऱ्हेने पाणउतारा करणे, हे धैर्य लोकांस नाही.

जी गोष्ट घडते ती सहज घडते; परंतु प्रयत्नपूर्वक काही घडत नाही. वाईटास वाईट म्हणावे व शहाण्यास शहाणे म्हणावे, हे शहाणपण लोकांस नसल्यामुळे लोकही पाहिजे तशी वर्तणूक करतात. खोटे बोलणे व लबाडी करणे हे तर त्यांचे अंगी पडले आहे. त्याचा विधिनिषेध ते जाणतच नाहीत. लबाडी ही लज्जेची गोष्ट, ही लोकांमध्ये समजूत नाही; असे हे लोक मूर्ख आहेत. जर त्यांस काही गोष्ट सांगितली तर तिचा अर्थ कळत नाही व न्याय करता येत नाही. असे लोक अज्ञानात आहेत.

✧ ✧

## भटांनी लावून दिलेले वेड

■

**पत्र नंबर ६१ : २० मे १८४९**

हिंदू लोक हल्ली आहेत, त्यापेक्षा चांगले होण्यास त्यांनी बहुतेक आपली मूर्ख मते सोडली पाहिजेत. प्रथम ही मूर्ख मते उत्पन्न कशी झाली म्हणाल, तर त्याचे कारण लिहितो.

प्राचीन काळी हिंदू लोकांनी विद्या बहुत केल्या. पुढे असे झाले की, ब्राह्मण लोकांनी नवीन विद्या अधिक अधिक शोधावयाचा सोडून ते काव्ये करू लागले आणि वेद पाठ करू लागले. अर्थ सोडून दिला आणि धर्मशास्त्रात असे आहे की, आपला कुलाचार रक्षावा. त्याप्रमाणे जे मागे बापाने केले तेच मुलाने करावे, अशी समजूत पडली आणि जो जो हे मूर्ख होत चालले तो तो मागले लोक त्यांस देवासारखे दिसू लागले.

निरक्षर भट म्हणू लागले की, व्यास अवतारी होता व त्यांनी गणिताचे ग्रंथ केले. ते देव होते, असे म्हणून मागले ग्रंथ मात्र वाचावे. पुढे काही करू नये, असे झाले. तेव्हा अज्ञान फार वाढले व त्यांस साधन मुख्य पुराणे आणि माहात्म्ये लिहावयाची, हाच काही दिवसपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हा त्यांनी मनास येईल ते लिहिले. कोणी कावेरी माहात्म्य, कोणी करवीरमाहात्म्य, कोणी शालिवाहनचरित्र, कोणी नाशिक माहात्म्य, कोणी अग्निपुराण, कोणी

गणपतिपुराण अशी लिहिली. प्रत्येकात त्यांचा हेतू इतकाच होता की, एखाद्या देवाचे वर्णन करून ईश्वर त्यात आणून ठेवून ब्राह्मणास पैसा मिळण्याची तजवीज पहावी.

तशीच व्रतमाहात्म्ये. कोणी म्हणाला सोमवारी उपास करावा, कोणी म्हणाला मंगळवारी, कोणी शनिवारी. दर एकाची कथा व त्याची देवता आणि त्याचप्रमाणे अमक्याने केले आणि त्याचे अमुक कार्य झाले व तसे जो करील, त्याचे तसेच होईल, म्हणून लिहिले; पण हे सर्व कवीचे लाघव आणि ब्राह्मणाचे कार्य करावयाची तजवीज आहे, असे उघड दिसते व याचा खोटेपणा उघड दिसतो. वर्षात तीनशे साठ दिवस व त्याहून अधिक व्रते आहेत. तसेच दर एक पुराणात दर एक देवाचे वर्णन, त्याचे नाव, अमके दैत्य त्याने मारले तो ईश्वर, त्यांस भजावे, इतरास भजले तर नरकाचे साधन, याप्रमाणे लागलाच शेरा, असे दर एकात आहे. दर एकात सृष्टीची उत्पत्ती, देवाचे चरित्र व भविष्ये याप्रमाणे सर्व तयारी केली आहे. तेव्हा कोणते देवास भजावे, कोणती व्रते करावी किंवा तीनशे साठही दिवस व्रते करावी?

धर्मशास्त्र पाहिले तर तो पर्याय काही वेगळाच आहे. वेद पाहिला तर त्यात काही वेगळेच आहे. वेदात अवतार आणि नाना प्रकारच्या देवता आणि व्रते हे काही नाही. फक्त होमाशी कारण आहे. याचा मेध, त्याचा मेध हे सर्व त्यात आहे. तेव्हा वेदशास्त्र व पुराणे यांचा धर्म पाहिला, तर अगदी वेगवेगळा दिसतो. पुराणात नित्य कर्म पाहिले, तर सगळा एक दिवस करावयास पुरणार नाही, इतके धर्म त्यात आहेत; पण त्यात काही नीती आहे, असेही नाही. कासोटा असा घालावा, गंध असे लावावे. शौचास अमुक कोस जावे, तोंड असे धुवावे, हेच फार आहे. याप्रमाणे नेम करणारास काय वाटले असेल, ते त्याचे त्यांसच ठाऊक. बरे, असे.

याचा आजपर्यंत कोणीच विचार केला नाही. अलीकडे भट वगैरे झाले, यांनी काही ग्रंथ केले आहेत, पण ते त्याहून अधिक. गोपीनाथ भटजींनी अमुक भट्टी केली, गणेश भटांनी अमुक भट्टी केली. अशा शेकडो भट्ट्या केल्या आहेत, परंतु त्यात काय आहे? संस्कृताचा अर्थ फार लोकांस कळत नाही, परंतु जर त्यांचा अर्थ कळावयाजोगा असता, तर मला वाटते की, लोक मागचे ते ग्रंथ समुद्रात नेऊन टाकते; परंतु ते भ्रमात आहेत. बरे, भरली मूठ सव्वा लक्षाची आहे. तेच बरे. श्राद्ध करावयाची कल्पना लिहावयास पन्नास पत्रे लागली आहेत. तसेच हर एक संस्काराच्या रीती फार मूर्खपणाच्या आहेत.

लग्नाचा, उष्टावणाचा, देवपूजेचा पद्धती आणि कोणते कर्म असे नाही

की त्याविषयी ग्रंथ नाही. शौच्यविधीवरदेखील एक ग्रंथ आहे. त्यात मनुष्यांनी शौच्य कसा करावा, हेच लिहिले आहे. वास्तविक पहा बरे, याचा काही उपयोग आहे काय ? कशाला भट या संस्काराच्या कंठाळभर पोथ्या बाळगतात ? यात काय आहे ? याचा काय उपयोग ? लोकांचे सुख व ज्ञान वाढवावयाची त्यात एक देखील गोष्ट नाही. मूर्खपणा वाढवावयाच्या गोष्टी आहेत. त्या ग्रंथांनी वेड लावले एवढे मात्र झाले.

अज्ञान्यास अजरामर करण्याकरिता या पोथ्या लिहिल्या आहेत, असे मला वाटते व त्यांची फजिती होऊ नये, म्हणून त्या गुप्त ठेवितात. कोणी सोडू नयेत व कोणी भलत्यानेच वाचू नयेत म्हणतात, याचे कारण हेच. जर त्यात खरे ज्ञान असते, तर कोणीही वाचले तरी चिंता काय ? परंतु ग्रंथ लिहिणारांची खात्री होती की हे गुप्त ठेवले, तर त्यांचे माहात्म्य राहील. हे भुसाचे लाडू आहेत. हे त्यांस माहीत होते. याप्रमाणे हे भट वेडे झाले आहेत. मनुष्य काही उद्योग करील किंवा विचार करील, तर त्यांस त्या भटाचे संगतीने वेळ-सापडावयाचा नाही.

हल्ली कर्नाटकांतील एक सरदार याजकडे पाहिले; म्हणजे समजते की, त्याचा वेळ हातपाय धुण्यात जातो. दिवसातून दोनशे वेळ पाय धुतो. पाचशे वेळ चूळ भरतो ! यास हे काय वेड किंवा शहाणपण आहे ?

तसेच बाजीरावाकडे पहा. हा पुरुष मराठ्यांचे राज्यास बुडविण्यास कारण झाला. असे का झाले, याविषयी विचार केला तर इतकेच दिसते की, यास जन्मापासून नाना फडणिसाने कोपरगावी भटाचे शाळेत ठेवला होता. म्हणून मोठेपणी केवळ भटच निपजला. याच्या राजकीय गुणाचे अंकुर जळून गेले. याप्रमाणे पूर्वीचे पेशवे भटाचे शाळेत नव्हते. कोणी असे म्हणतात की, राज्यास अयोग्य व्हावा, म्हणून नाना फडणिसाने त्यांस बुद्ध्या भट केला; परंतु तोच राज्यावर आला, हे देशाचे प्रारब्ध. अस्तु. त्यांस वेड लागले. त्याने राज्य केव्हा करावे, कारभार केव्हा करावा आणि हे नित्य कर्म केव्हा करावे, हे जाणले नाही.

आणि या कर्माचा फायदा काय ? जोपर्यंत निर्मळ वाटे, तोपर्यंत कोणीही हात धुतोच आहे. त्यांस अमुक वेळ हात धू, म्हणून सांगावयास कशाला पाहिजे ? परंतु इतक्या मूर्खपणाच्या गोष्टीस ब्राह्मण मात्र मान देतात. आणि कोणी उपास, कोणी व्रते, कोणी अनुष्ठान, असे सगळा दिवसभर करतात. ज्याजवळ पैसा त्यांस भट घेरतात आणि हा उपदेश करतात; आणि पुराणिकबाबास घेरतात व वेड लावतात. कोणी सांगतो, आवळीचे झाडाखाली जावे, पूजा

करावी, कापुसाच्या वाती जाळाव्या. त्याप्रमाणे अज्ञान बायका करतात. हे वेड त्यांस भट लावितात.

हे सर्व यांनी सोडून दिल्याखेरीज याची बरी गत मला दिसत नाही. मग ईश्वराची इच्छा.

✦ ✦

## ब्राह्मणांची शिक्षणपद्धती

■

**पत्र नंबर ६२ : ३ जून १८४९**

सांप्रत ब्राह्मण लोक हे काही उपयोगी नाहीतसे झाले आहेत. याचे कारण त्यांस सरकारी काम सांगितले, तर लाच खातात; लोकांस उपद्रव करतात व आपले जातीचा अभिमान धरतात. येणेकरून महार, चांभार इत्यादि जातीस त्यांचेपुढे येण्यास देखील योग्यता नाही, असे म्हणतात.

तस्मात् यांनी भिक्षा मागून वनात रहावे, हेच काम यास चांगले योजिले होते; परंतु ते सोडून या गृहस्थीपणात, सरदारीत व कारकुनापणात यास कोणी बोलाविले बरे? यांचे वाचून अडले होते काय? ते आपले संतोषाने दुसरे व्यापार करू लागले. तेव्हा आता त्यांस हे योग्य आहे की, त्यांनी आपल्यास व दुसऱ्यास सारखे मानावे, हे खरे. ब्राह्मण लोक अनिवार झाले आहेत व मूर्ख आहेत. याचे कारण त्यांस सुशिक्षा नाही. ब्राह्मणाचा मुलगा सातआठ वर्षांचा झाला, म्हणजे त्यांची मुंज करतात. नंतर भट व पंतोजी यांचे स्वाधीन होतो. आणि त्यांस ज्ञान, उपदेश किंवा कला-कौशल्य-विद्या हे काही एक शिकवीत नाहीत, ईश्वराचे भय व आपला वास्तविक धर्म त्याचे मनात कशाने येईल?

श्रीमंताचे पोर असले तर भट त्यांस वेद शिकवितात व तो फक्त पाठ करवितात. मग तो मुलगा जसा त्याचा गुरू टोणपा, तसा त्याचा शिष्य टोणपा होतो. बरे, ब्राह्मणास ज्या रीतीने वेद शिकवितात, त्याचा काही तरी उपयोग आहे? फक्त अक्षरे तोंडाने उरात रक्त पडे तोपर्यंत घोकून पाठ करतात. त्यापेक्षा दगड फोडावयाची मजुरी का सांगत नाहीत? अक्षर मराठी झाले, म्हणजे मुलगा शहाणा झाला. बाप म्हणतो माझा मुलगा रुद्र पाठ म्हणतो, पवमान पाठ म्हणतो.

आणि भटाच्या तोंडच्या मूर्खपणाच्या गोष्टी ऐकतो. तो असा दृढमूर्ख होतो की, त्याचे मनात जे येते, ते मोठे दृढ होते; कदापि निघत नाही.

त्यास वाटते पृथ्वी शेषावर आहे. ग्रहणात राहू चंद्रास खातो. हिंदुस्थानाएवढीच पृथ्वी. पलीकडे गतीच नाही. ब्राह्मण सर्व जगात श्रेष्ठ, भूदेव. जितक्या विद्या आहेत, त्या सर्व शास्त्रात आणि पुराणात आहेत. त्याखेरीज काही नाही. वेदाचा अर्थ करू नये. पुराण, शास्त्र ब्राह्मणाखेरीज कोणी वाचू नये. परदेशास गेले, तर भ्रष्ट होतो. अशा नाना प्रकारच्या समजुती त्यांच्या पडून ते शतमूर्ख होतात.

अशी थोर श्रीमंतांची मुले पुण्यात मला शेकडो आढळतात व मोठाले वयोवृद्ध कित्येक आहेत, त्यांची तर संख्याच नाही. वर्तमानपत्रे व बुके या द्वाराने ज्ञान मिळविणे, हे तर त्यांचे कुळाचे शत्रू, वाचणे व लिहिणे त्यांचे बापाचे वैरी, असे लोक आहेत. यास ईश्वर कोणत्या रीतीने ताळ्यावर आणील ते आणो. ईश्वराने ब्राह्मणांचा गर्व हरण करावयास दरिद्रांजन योजिले आहे. तरी त्यांचे डोळे अजून उघडत नाहीत. शास्त्र पुराणे घेऊन बसतात. पुराणात मूर्खपणा भरला आहे व ती फक्त ब्राह्मणास लाभ होण्याकरिता केली आहेत. यास्तव मला वाटते की; ब्राह्मणांची मुंज झाली, म्हणजे त्यांस विद्या पढवावी. काही चांगले ग्रंथ नवीन पद्धतीचे करून त्यात नीती व ईश्वराचा भजनाचा गोष्टी घालून व इतर भूगोल, खगोल इत्यादि वास्तविक आहेत, तशा गोष्टी लिहून ते ग्रंथ पढवीत जावे. म्हणजे मूर्खपणा जाऊन तो मुलगा चांगला तयार होईल. असे ग्रंथ कोणी तरी केले पाहिजेत.

नाही तर लोक सांप्रत काळचा शिक्षेचे रीतीने फारच मूर्ख होतील. शास्त्री, पंडित आणि त्यांस होय होय म्हणणारे गृहस्थ, हे काय बोलतात ते देखील त्यांस कळत नाही. कोणी सांगतो की, सप्त समुद्र आहेत. कोणी म्हणतो मेरु मध्ये आहे. कोणी म्हणतो, सात समुद्र रथाचा चाकांनी पाडले. कोणी म्हणतो अगस्ति मुतला. याचे तोंडास कोणी हात लावावा ? असे बोलणे ऐकून मला वाटते की, हे इस्पितळातले वेडे आहेत काय ? कोणी म्हणतो, हे इंग्रज जलचर (पाण्यातले राहणारे) आहेत. कोणी म्हणतो, ते वानर आहेत. कोणी म्हणतो त्यांस रामाचा वर आहे. तेव्हा माझे मनात येते की, तुम्ही बोलता हे डुकर आहा !

शेकडो लोक संभावित, सरकारचे चाकर, मोठे कामावर आहेत, पण त्यांस शपथ जर घातली की, तुम्ही आपले कामाशिवाय कधी काही ग्रंथ किंवा काही वाचले होते काय ? तर ते गंगाजल हातात घेऊन सांगतील की,

नाही. असे अक्षरशत्रू आहेत. या लोकांस वाचणे ठाऊक नाही. पाठ करणे ठाऊक आहे. 'प्रातःस्मरामि' पाठ करतात. देवपूजा पाठ करतात. भट तर दशग्रंथ पाठ करतात व कित्येक मूर्ख 'जटापाठी' आहेत, म्हणजे मागेपुढे, उलटीसुलटी अक्षरे पाठ करतात. याचा उपयोग काय ?

पण या ब्राह्मणांचा केवढा मान लोक करतात ? घनपाठी बुवांस शालजोडी द्या, रुपये द्या आणि मूर्खपणा वाढवा. कित्येक जुन्या ठशाचे लोक शंख करतात की, वेदविद्या बुडाली. पण महाराज, ही विद्या हवी कुणाला ? पाठ करावयाची मजुरी कशास ? अर्थासहित दोन अध्याय का म्हणा ना ? त्यातील ज्ञान समजून घ्या. म्हणजे दोन अध्याय अध्ययन घनपाठी टोणप्यापेक्षा बरे. पाठ करावयाची ही विद्या कोणत्याही देशात नाही. ,क एक अक्षर मागे-पुढे, उलटे-सुलटे पाठ केले, म्हणजे काही दूध निघते की काय ? सार्थ वेद म्हणावा. मग तो किती का होईना ? दशग्रंथी म्हणून मिरवतात कशाला ? हे तर मला बैल असे वाटतात. याचकरिता मी प्रार्थना करतो की, हा मूर्खपणा सोडून वाटेवर यावे.

## अर्थावाचून पाठ करणे

पत्र नंबर ६३ : १० जून १८४९

मला वाटते की, ब्राह्मण लोकांनी आता अर्थावर चित्त द्यावे. केवळ पाठ म्हणणे यात काही फळ नाही. पाठ म्हणावे, अशी आज्ञा शास्त्रात आहे, तिचा अर्थ तसा घेऊ नये. ते उगीच लोकांची भक्ती बसण्याकरिता लिहिले आहे. त्यात काही उपयोग किंवा वास्तविकपणा नाही. हे त्यांनी मनात आणावे. ब्राह्मण लोक मूर्ख, म्हणून अर्थाचा अनर्थ करतात. खरा अर्थ समजत नाहीत. जे लिहिले आहे, तसेच तर्क केल्यावाचून भलतेच समजतात. याजमुळे शेकडो गृहस्थ रोज गीता, विष्णुसहस्रनाम वाचतात. हा मूर्खपणा आहे की नाही बरे ? मला वाटते की, असे फक्त पाठ करणारे यांस काही कळत नाही आणि ब्राह्मण लोक सरासरी कामावर नेमले, तर मग त्यांचे ऐश्वर्यानुरूप स्नानसंध्या वाढते. ती कोणती म्हणाल तर एकादष्णी म्हणजे पाणी देवावर ओतावे, तुळशीची झाडे लावावी. तुळशीसहस्रनामे इत्यादिक पूजा वाढवून वेळ खर्च करावा व

अज्ञान वाढवावे. कोणाचे मनात ईश्वराविषयी काही नसते. जितके ब्राह्मण हल्ली आहेत, तितक्यांस जर देव कसा आहे, वगैरे ईश्वराविषयी कोणी एक प्रश्न विचारला, तर त्याच्याने उत्तर देववणार नाही. व मनुष्याचा धर्म काय, हेही त्यांस कळत नाही. वास्तविक पाहिले तर गृहस्थ व भट हे उभयता जितका वेळ ज्ञान मिळावयास पाहिजे, त्याचे चौपट खर्च करतात. पण उपड्या घागरीवर पाणी होते. त्यांचे आयुष्य व्यर्थ होऊन त्यांस स्वता व इतरांस उपयोग होत नाही. अर्थाचे अनर्थ बोलत बसतात. ब्राह्मण लोक पूर्वी सर्व जातीमध्ये प्रमुख होते खरे, परंतु आता तर मला नीच वाटतात. कारण की, हलके जातीचे लोक, काही सांगितले तर ऐकतात व त्यांची अंतःकरणे चांगली गोष्ट ग्रहण करण्यास पात्र असतात; परंतु ब्राह्मणांस गर्व फार. त्यातील प्रत्येकास असे वाटते की थोर काय ते आपण. सर्वांनी आपली पूजा करावी. याजमुळे त्यांस काही सांगितले, तर ते ऐकत नाहीत, पिसाळलेले आहेत. एका अंगाने दरिद्र व दुसऱ्या अंगाने त्यांचा गर्व, अभिमान व अज्ञान येणेकरून ते पूर्ण झाले. त्यांस असे वाटते की, ब्राह्मणांच्या महत्त्वाच्या गोष्टी पुराणात लिहिल्या आहेत, त्या अक्षरशः खऱ्या आहेत. आणखी असे समजतात की, शेवटी ब्राह्मणांचा जन्म होतो. नंतर तेथे संन्यास घेऊन मोक्षास जातो.

परंतु हे लिहिणे आम्ही किमपि ऐकत नाही. हे फक्त ब्राह्मणांचे महत्त्वाकरिता लिहिले आहे. ब्राह्मण हे मोक्षास पात्र व इतर लोक नाहीत, असे म्हणण्यास ब्राह्मणांमध्ये आता कोणता गुण आहे? संन्यासी चोऱ्या करतात, ब्राह्मण भडवेपणा, दरवडे इत्यादिक अपराधास अनुसरले आहेत. त्यांस मोक्ष कसा होईल? हे मत केवळ खोटे आहे. अन्य जातीचे अनेक साधू झाले, ते दुर्गतीस गेले, असे कोण म्हणेल? जुने काळचे लोकांस दुसरे देशचे लोकांचे वर्तमान काही ठाऊक नव्हते, म्हणून इतके ब्राह्मणांचे महत्त्व लिहिले आहे. इंग्रज लोक हेही असेच मत बाळगतात. ते म्हणतात की, खिस्तीयनाखेरीज कोणी मुक्तीस जात नाही. म्हणजे सर्व हिंदू नरकास पात्र आहेत. असेच मुसलमान म्हणतात.

तस्मात् हा सर्व घोटाळा आहे. यात काही हशील नाही. ज्याचे तो आपले वर्णन करितो. याप्रमाणे ब्राह्मणांचे थोरपण आहे; परंतु ते खेरीज करून लोक असे मूर्ख आहेत की, त्यांस अर्थदेखील करता येत नाही! पुराणे म्हणजे केवळ काव्ये आहेत. त्यात कोठे लिहिले आहे की, गंगा यमुनेप्रत बोलते; समुद्र यमुनेस म्हणाला; चंद्र रात्रीस म्हणाला; सूर्य अग्नीस म्हणाला; अशी पुष्कळ वाक्यं आहेत. त्याचा अर्थ हल्लीचे पुराणिक प्रत्यक्ष गंगा व यमुना देवता आहे, तीच बोलली असा करतात. आणि त्यांस आताचे लोक खरे

मानतात. लोकही असे समजत नाहीत की, नद्या प्रत्यक्ष जड़ पदार्थ; त्यांस कवीने सजीव मानून लाघव केले आहे. तसाच चंद्र रात्रीशी कसा बोलेल? त्यांस काही तोंड किंवा जीभ आहे काय? परंतु खरे मानितात. जड पदार्थांचे कवीने सजीव वर्णन केले असले म्हणजे झाले. त्यांस वाटते की, या देवताच आहेत. तसाच सूर्याचा रथ लक्ष योजने चालतो, असे म्हणतात. तेही कवीचे लाघव आहे. त्याचा अर्थ पुराणिक सांगतात तसा घ्यावयाचा नाही; परंतु पुराणिक लोकांस फार वेड लावितात. व लोकही मूर्ख होऊन सर्व निर्जीव पदार्थांस जिवंत मानून कोणी उमऱ्याची पूजा, कोणी ताकमेढीची पूजा, कोणी दरवाज्याची, कोणी मुसळाची, कोणी जात्याची, कोणी दिव्याची अशा पूजा करतात. यात किती मूर्खपणा आहे? मुलांचे वाढदिवसाचे दिवशी ताकमेढीची पूजा, दसऱ्याचे दिवशी न्हावी धोकटीची पूजा करतात, त्यांस नैवेद्य दाखवितात. बरे, न्हाव्याची धोकटी किंवा ताकमेढी नैवेद्य खाईल काय? धोकटीत कसली देवता आहे? व ताकमेढ एक वाळलेले लाकडाचा तुकडा. त्यात देवता कोणती आहे? लग्नामध्ये हे चमत्कार दृष्टीस पडतात. उपाध्या, मूर्ख, तो हजार ठिकाणी पूजा मांडतो. मडक्याची पूजा, घागरीची पूजा आणि तशात हे सर्व संस्कृत भाषेने करतात, म्हणून त्याचा अर्थ कोणास कळत नाही. परंतु आत पाहिले, तर शुद्ध वेड आहे.

मी गर्भादानाचा विचार थोडासा वाचून पाहिला आहे. त्याजवरून मला वाटते की, त्यातील प्रकरणी भटासमोर निर्लज्जपणाने जी कर्मे करावयास सांगितली आहेत, ती जर मराठी भाषेत बोलतील तर यजमान उपाध्यास जोडे मारून हाकून देईल व म्हणेल की, माझ्या बायकोची इतकी फजिती चौघांमध्ये करावयास मी काय तुमचे केले आहे? असे त्यात आहे. नाना प्रकारची वचने आणि येथे हात लावा, तेथे हात लावा इत्यादि. ते मला बोलण्यात लाज वाटती. या प्रकारचे संस्कार करणारे वेडे होते, यात संशय नाही आणि लोकांनी कसे ग्रहण केले असेल ते असो. जर या गोष्टी उघड्या होतील, तर खचित रद्द होतील. भटांनी अर्थ करावयाचे सोडिले. त्याजमुळे इतके अज्ञान वाढले आहे. नीती, ज्ञान ते काही पहात नाहीत. फक्त पोथ्या सोडून पाठ करीत बसतात आणि त्यात सर्व धर्म आहे, असे समजतात. याचमुळे नीती बुडाली, धर्म बुडाला व अज्ञान मात्र शिल्लक राहिले आहे आणि ब्राह्मणांचे हाडास भिनले आहे.

## भटाचा विद्येचा निरुपयोग

■

**पत्र नंबर ७१ : १२ आगष्ट १८४९**

पूर्वी एका पत्रात सांप्रत काळचे ब्राह्मणाचे स्थितीविषयी लिहिले होते. त्याचा जबाब पुण्यातील 'ज्ञानप्रकाश' पत्रात नंबर २२ यात एका 'यथार्तवादी'ने दिला आहे.

त्यात त्याने आमचे सहा निश्चय कबूल केले आहेत. (एक) ब्राह्मण अज्ञान; (दुसरा) अर्थ समजल्यावाचून ते जप वगैरे करतात, हे ठीक नाही; (तिसरे) देवाविषयी त्यांस काही कळत नाही; (चौथे) मनुष्यांनी कसे वागावे हे समजत नाही; (पाचवे) हल्लीचे ब्राह्मण हे कनिष्ठ जातीपेक्षा चांगले नाहीत व (सहावे) ते गर्विष्ठ फार. या निश्चयांचे त्याने उत्तर दिले आहे; परंतु त्याचे उत्तरात काही अर्थ दिसत नाही.त्याने केवल भटासारखे लिहिले आहे. शेवटी आपण म्हणतो की, हल्लीचा मूर्खपणा ब्राह्मण सोडतील तर बरे होईल! अस्तु.

याचा भाव पहिले उत्तरात असा आहे की, मला सर्व ब्राह्मणांची हकीकत कशी समजली? याचे प्रतिउत्तर असे आहे की, सर्व ब्राह्मणांची हकीकत समजावयास काय अवघड आहे? ब्राह्मण अज्ञानी किती आहेत, याचे वर्णन मी किती करावे? भटात व अतिक्षुद्रांत मला इतकेच अंतर दिसते की, एक बोलता राघू व एक न बोलता राघू, परंतु ज्ञान एकच. ब्राह्मण वेद वगैरे पाठ म्हणतात; परंतु अर्थज्ञतेविषयी उभयतांची योग्यता समान आहे. अतिशूद्र गरीब, ते आपला लहानपणा जाणतात; परंतु भट मूर्ख असून ज्ञानी समजतात व गर्व करतात, हा एक त्यामध्ये दुर्गुण अधिक आहे. हे ज्याचे मनास ठसावयास हवे असेल, त्याने वेदाच्या शाळेकडे पहावे. तेथे मुले शिकतात काय? व देवाविष्यी व आपले धर्माविषयी विचार करतात किंवा फक्त राघूसारखे पाठ करीत बसतात.

भटांनी लोकांस किती वेडे लाविली आहेत? व किती गैरसमजुती पाडल्या आहेत, त्याचा अंत नाही. ब्राह्मणभोजनादिक हा धर्म समजतात; परंतु निरुद्योगी माणूस भीक मागावयाचा व्यापार करतात आणि भिक्षेचा उपयोग काही करीत नाहीत; विद्या वाढवीत नाहीत; अर्थेकरून अंतःकरण पवित्र करीत नाहीत; जिव्हेचा उपयोग मनास एकीकडे ठेवून करतात. त्यांस धर्म केला असता पुण्य कशाचे आहे? जसे पात्रावर मिठापासून भातापर्यंत वाढलेले असते, त्याचप्रमाणे मनुष्यास मनापासून इंद्रियांपर्यंत ईश्वराने वाढून दिले आहे. त्यात मन हे उत्तम भाताप्रमाणे; त्याचा धिक्कार करून लवणच जे भक्षितात, त्यांस किती मूर्ख

म्हणावे ?

देवाचे हिताचे विचारांत ब्राह्मण आजपर्यंत कधी तरी पडले आहेत काय ? पडावयाचे त्यांस सामर्थ्य तरी आहे ? व योग्यता आहे ? जर या देशात पार्लमेंट झाले आणि त्यात सर्व जातीचे लोक पाठविले, तर त्यामध्ये महारांपेक्षा भट अधिक शहाणपणाने आपले देशाचे हिताविषयी बोलतील काय ? व कोणत्याही गावात पहा की, गावचा कुळकरणी, जोशी हे ब्राह्मण असतात याचमुळे त्यांजवर कपटाच्या व खोटे कागद-पत्रांच्या वगैरे फिर्यादी होतात व वास्तविक हे लोक रयतेस बुडवितात. व साक्षीही खरी देत नाहीत. ब्राह्मण कुळकरणी यांस शिक्षा होऊन ते तुरुंगांत पडतात. व गावचे महाराची साक्ष खरी समजतात व ते अडाणी असून गावची चाकरीही नीट करतात; कुळकरण्यापेक्षा गावकऱ्यास कमी ठकवितात व दगाबाजीही कमी करतात. व हक्काची चाकरी करून हलाल खातात, तसे कुळकरणी करीत नाहीत.

याजवरून ब्राह्मणांची योग्यता समजती. मोठे शहरात पहाल तर तुम्हास असे वाटेल की, इतके भट येथे आहेत, यांस खावयास मिळते, त्याबद्दल हे कोणती चाकरी करतात ? असे जर मनात आणिले, तर तुम्ही काय म्हणाल ? मला तर एक मनुष्य दाखवा की, भटांनी शाळा घालून कोणी तयार केले किंवा कोणास विद्वान केले किंवा ग्रंथ केले किंवा ज्ञान सांगितले किंवा लोक सुधारले किंवा मजुरी केली असे काही तरी मला या भटांचे व भिक्षुकांचे खाण्याचे मोबदला त्यांचा उपयोग दाखवा ! चांभाराचा उपयोग मी तुम्हास सांगतो व दर एक मनुष्याचे पायात जोडे दाखवितो. तुम्ही आम्हास भटांची निशाणी दाखवा. बाजीरावाकडून भटांनी व शास्त्री यांनी भलभलतेच सांगून अनुचित कर्मे करविली. व मुसलमान लुटून आपण केसरी भात जेवले. राजास नीती काहीच सांगितली नाही. फक्त ब्राह्मणभोजन घाल म्हणून सांगितले. आणि कलियुगाचा कर्ण म्हणून त्याचे वर्णन केले. आणि बिघडवून राज्याचा व त्याचे कुळाचा सत्यानास केला. याचे कारण हे भटच आहेत.

असे जे हे ब्राह्मण लोक, यांचे शहाणपणाचे प्रतिपादन ‘ यथार्थवादी ’ करितो. त्याने काही तरी नावासारखी करणी करावी. त्याचे बोलण्यात जर काही वास्तविक भाग असला, तर मी कबूल करीन. माझे द्वेषी कोणी आहेत, असे नाही; परंतु मी ज्याचे अज्ञान त्यांस कळविण्याकरिता झटत आहे, परंतु ते ग्रहण करण्यास ब्राह्मणांस इतके अवघड पडले आहे की, त्यांस बोध न होता निंदा वाटते. भट व शास्त्री अमुक कामास लावावयाचे उपयोगी आहेत, हे कोणी तरी सांगावे. यांस मरणाचे समयी बोलावले तर ईश्वराविषयी काही

न सांगता द्रव्य हरण करतील व ते असे म्हणतील की, काही पैसा असला तर सर्व प्रायश्चित्त करा आणि आमचे हातावर उदक सोडून आम्हास द्या. म्हणजे तुम्ही देवाजवळ जाल. अशी पैसा काढावयाची तजवीज सांगतील. श्रीमंताचे घरी भट गेला, तर सर्व सांगेल आणि गरिबाचे घरी गेला, तर त्याच्याजवळ पैसा नाही, असे पाहून त्याचे मनात येईल की, हा भिकारी, यांस मोक्षास नेण्यास पैशाशिवाय मी काय सांगू? पैसा असता तर मग काही तरी सांगितले असते. पैशाशिवाय ईश्वरप्राप्ती होत नाही. जे द्रव्यवान तेच धर्म करून देवाजवळ जातात. हे मत ब्राह्मण लोकांमध्ये चालू आहे. त्याप्रमाणे भट गरिबाजवळ मुळीच जाणार नाहीत. श्रीमंताजवळ पैसा काढावयाकरिता जमतात. अशी या भटांची वर्तणूक आहे.

भट एखाद्याचे घरी त्याचा नातलग असला, म्हणजे यजमानाचे मनात त्यांस काही तरी पोचवावे असे असते. मग भट सांगू लागतो की, चार महिने नित्य दान करावे. रोज देवापुढे पैसा ठेवावा. नैवेद्यास रोज साकर असली पाहिजे. असे सांगून ते सर्व आपण घेतो. याप्रमाणे यजमानापासून शेंपन्नास रुपये मिळवून निर्वाह करतो. बरे, यात काही उपयोग किंवा धर्म झाला काय? प्रत्येक गृहस्थाचे घरी भट म्हटला म्हणजे बहुधा बायकोचा भाऊ असतो. याप्रमाणे नाती असतात. मग बायकोही आपल्या भावास पैसा पोचविण्याकरिता नवऱ्यास सांगते की, पुढे चातुर्मास आला आहे; दर व्यतिपातास गोप्रदानाबद्दल दोन रुपये देत जा. मग ते आपले भावास देवविते. याप्रमाणे किती एक लोक ठकले जातात; परंतु हा व्यय काही चांगला झाला की काय? याप्रमाणे माझे उत्तर पहिल्या कलमाचे आहे.

आता दुसरे कलमाचा जबाब लिहिला आहे, त्याचे उत्तर. परमेश्वराचे स्मरण करतात, असे ‘यथार्थवादी’ म्हणतो; परंतु कोणता ब्राह्मण देवाचे स्मरण करतो? जर कोणी मरण पावत असला किंवा श्राद्ध असले, तर ब्राह्मणाचे स्मरण करण्याची रीती अशी आहे की, वेदाचे दोनचार वर्ग मोठ्याने म्हणतात; परंतु जो मरत असतो, त्यांस किंवा जो म्हणतो, त्यांस त्यातील अर्थ काही समजत नाही. ईश्वराचे स्मरण करण्यात काही तरी ईश्वराचा विचार झाला पाहिजे. जे २४ पाठ गीतेचे किंवा विष्णुसहस्रनामाचे ३०० पाठ करतात, किंवा कोटिलिंगे सकाळपासून सारा दिवस करतात, त्याजकडून वास्तविक काही भजन झाले की, काय? व त्यांस ईश्वराजवळ गती मिळेल की काय? व त्यांस आपण लहान, मनुष्याची शक्ती लहान असे वाटेल की काय? जे नित्य पाठ करतात आणि अर्थ समजत नाहीत, ते ईश्वराविषयी काय समजले? व त्याचे अंतःकरण

व मन शुद्ध कसे झाले? कपाळाशी भट कटकट करितो, तेणेकरून त्याचे अंतःकरण बरे झाले काय? व जे अर्थ समजत नाहीत, ते परमेश्वराचे वचनावर भरवसा ठेवून कसे चालतील? जर मुनसफास कानडी गोष्ट येत आहे, तर त्याजपुढे मराठी कायदा ठेवला आणि त्याजवर जुलूम करून त्याजकडून पाठ करविला आणि त्यांस काही अर्थ त्यातील समजला नाही, तर तो मुनसफ त्या कायद्याप्रमाणे फैसल्ले करील काय? तसेच हे जप करणारे भट वगैरे लोक ईश्वरास आपले बडबडीने प्रसन्न करतील काय? निंदा खरी असेल, तर तो बोध म्हणावा; निंदा म्हणू नये, हे 'यथार्थहितवादीचे' मनात का येत नाही?

## ब्राह्मणांचे ईश्वरी ज्ञान

■

पत्र नंबर ७२ : २६ आगष्ट १८४९

मागील पत्रातील अवशेष मजकूर राहिला आहे, तो संक्षेपेकरून लिहितो.

ब्राह्मणांस ईश्वराविषयी बहुत कळते, असे 'यथार्थवादी' म्हणतो. त्याचे उत्तर असे आहे की, अमुक बरे आणि अमुक वाईट, हे प्रथम ब्राह्मणास कळत नाही. लक्ष ब्राह्मणांची सभा असली व त्यांस एक प्रश्न केला तर उत्तर येणार नाही. फार कशास, कोणासही इतकाच प्रश्न करावा की, जर कांदा खाल्ला तर नीतीस वाईट आहे काय? त्याचे उत्तर ब्राह्मण काय करतील ते पहा! ईश्वराविषयी ब्राह्मणांचे एकमत नाही. कोणी तीन ईश्वर म्हणतात; कोणी बहुत ईश्वर म्हणतात; कोणी वेदास ईश्वर म्हणतात; कोणी २४ पदार्थांस ईश्वर म्हणतात; पुराणे तर सर्वांस ईश्वर म्हणतात. व व्याकरणी अक्षरास ईश्वर म्हणतात. याप्रमाणे अनेक भेद आहेत. ब्राह्मणांस ईश्वराविषयी खरे ज्ञान जर असते, तर जी हल्ली त्यामध्ये वेडे आहेत, ती नसती.

कोणी म्हणतात, द्यावे तसे घ्यावे; किती एक म्हणतात, कष्टी फळ आणि तपी राज्य. म्हणजे तप केल्याविना ईश्वर फळ देत नाही. कोणी म्हणतात की, ईश्वराने देखील कृष्ण अवतारी लबाड्या वगैरे केल्या, अशी उदाहरणे दाखवितात. किती एक गोष्टी मी ब्राह्मणांचे तोंडून ऐकल्या आहेत व त्या अगदी वास्तविक विचारेकरून ईश्वराचे जे गुण दिसतात, त्यांस विरुद्ध आहेत.

किती एक म्हणतात की, ब्राह्मणाचे मुखी पडले की, देवाचे मुखी पडले. किती एक म्हणतात, " ते मंत्रा ब्राह्मणाधीनं " तस्मात् " ब्राह्मणो मम दैवतम्. " किती एक म्हणतात की, ईश्वराचे भजन ब्राह्मणाचे भजन केल्यापोटी आहे. किती एक ईश्वराची सेवा म्हणजे उपास वगैरे ब्राह्मणांकडून करवितात. किती एक म्हणतात की, ज्याच्या पुण्याचा प्रताप आहे, त्याजपुढे देवाचा उपाय नाही. कोणी म्हणतात की, जग हाच ईश्वर आहे. दुसरे म्हणतात की, आपला जीव हाच ईश्वर आहे. तिसरे म्हणतात की, विष्णू ईश्वर आहे. चौथे म्हणतात, विष्णूस आयुष्य आहे व शिव ईश्वर आहे. आणखी म्हणतात की, संन्यास घेतल्यावाचून ईश्वर मुक्ती देत नाही. इत्यादी ईश्वराविषयी वाद आहेत. याजवरून ब्राह्मणास किती कळते, हे उघड दिसते.

भट तर अगदीच मूर्ख; परंतु शास्त्री, पंडित, पुराणिक नीति, ज्ञान व धर्म जाणत नाहीत. मोठे नीतीविरुद्ध कर्म असले, तरी ते क्षुल्लक मानतात. आणि मोठे वाईट कर्म आहे, ते चांगले म्हणतात, त्यात काही पाप नाही, असे मानतात.

पाचवे प्रश्नाचे उत्तर देण्याची जरुरी नाही; कारण यथार्थवादीच्याने उत्तर देववले नाही. केवळ काही ल्याहावे म्हणून लिहिले आहे. सहावे. किती एक ब्राह्मण अतिशय गर्विष्ठ आहेत. मला खचित दिसते की, इतर लोक सुधारतील आणि ब्राह्मण लोक मागे राहतील; कारण त्यांस उपदेश ठीक वाटत नाही. सर्वांस तुच्छ मानून ब्राह्मण आपणास सर्वांहून श्रेष्ठ असे समजातात. जरी त्यामध्ये काही श्रेष्ठत्व नसले तरी श्रेष्ठत्व भोगावे असे वाटते. पैसा प्राप्त झाला, म्हणजे बाजीरावाने गंगाधरशास्त्री याजला मारले त्याचा दोष मानणार नाहीत. ब्राह्मण म्हणतात की, द्रव्य खर्च केल्यास सर्व दोष दूर करून देऊ. याजमुळे ब्राह्मणांसारखे नीच लोक कोणीच नाहीत. ते सर्व गुन्हेगारांस द्रव्याने पावन करतात. प्रायश्चित्त भाडेकऱ्याप्रमाणे होते. असे जर दोष जातील तर मग ईश्वराचा न्याय कोठे राहिला? परंतु साधारण ब्राह्मण ईश्वराचा न्याय जाणत नाहीत व दुष्ट कर्माची भीती त्यांस वाटत नाही. ते म्हणतात की, काय चिंता? कामदाराने पैसा खाल्ला तरी तो ब्राह्मणाच्या घरी पडला, असे म्हणून लुटतात. आणि त्याची कर्मे पाहिली तर अन्नछत्रे घालितात. परंतु तेथे एकटे ब्राह्मणास मात्र सोय असते. दुसरा कोणी येऊ देत नाहीत. इतका पक्षपात करतात.

तात्पर्य ब्राह्मण लोक हल्ली दुसरा काही व्यापार करीत नाहीत. गरीब, अज्ञानी लोकांस लुटून आपला निर्वाह करतात. तेली असला म्हणजे त्यांस सांगतात, तू आपल्या घाण्याची पूजा केलीस तर तेल फार निघेल. असे म्हणून

त्याजपासून चार रुपये काढतात. कुंभारास म्हणतात आव्याची पूजा केली, म्हणजे विटा चांगल्या निघतात. आणि शेतकरी कुणब्यास म्हणतात की, तुझ्या दाण्याची रास करून तिची पूजा करावी, म्हणजे बरकत येईल. याप्रमाणे लूट आणि कपट करतात. वास्तविक पाहिले, तर कुळंबी, माळी वगैरे अडाणी व नीच जातीचे लोकांस खरा धर्म व खरी नीती सांगावी आणि ढोंग व अज्ञान काढून टाकावे; परंतु ते बळेच त्यांस अज्ञानात ठेवतात. आपला चरितार्थ नीट चालावा व लोकांनी आळशांस खावयास द्यावे, इतकाच त्याचा हेतू आहे. ब्राह्मणांचा पक्ष घेतला, परंतु त्या पक्षास बळ नाही. कर्नाटकातील स्वामी व आचार्य हे दिवसास लूट करतात, व लोकांस ठकवितात. मुद्रा देत जातात आणि अज्ञानी लोक त्यांस मान्य करतात आणि आचार्यांचे व स्वामींचे ज्ञान पाहिले, तर मुद्रेने मोक्षास नेणार व पैशाने स्वर्ग दाखविणार, ही त्यांची मते किती खोटी आहेत, हे सहज समजते.

## धर्मव्यवहारासंबंधी खोट्या समजुती

**पत्र नंबर ७३ : २ सप्टेंबर १८४९**

सांप्रत हिंदू लोकांमध्ये ज्या वेड्या समजुती आहेत त्यांचे मूळ बहुतकरून हेच आहे की, पुराणे वगैरे जे ग्रंथ आहेत त्यात जे लिहिले आहे त्याचा अर्थ यथास्थित व वास्तविक रीतीने कोणी समजत नाहीत व कवीचा भाव जाणत नाहीत. अर्थाचा अनर्थ करतात. याची उदाहरणे,

लंका सोन्याची म्हणून वर्णन केले आहे, परंतु त्याचा अर्थ इतकाच की, तेथील लोक द्रव्यवान होते. केवळ तेथील भूमी व घरेदारे सोन्याची होती हा अर्थ नव्हे. परंतु लोक अज्ञानी असल्यामुळे सोन्याचीच लंका होती असे समजतात व त्यांस सहायभूत अलीकडील काही किरकोळ कवि जे झाले, त्यांनीही खरा अर्थ काढावयाचा सोडून ते लोकांचे मताचे पोषण करीत गेले. त्यामुळे अडाणी लोकांच्या समजुती दृढ झाल्या. अमृतराय, मोरोपंत हेही आपले कवितेमध्ये लंका सोन्याची होती, असे वर्णन करतात. त्यापेक्षा हेच खरे, असे लोक म्हणतात. कोठे पुराणात असे लिहिले आहे की, कलियुगात भूमी मृत्तिकारूप

आहे, तशी पूर्वी नव्हती. मागे कृतियुगी सुवर्णाची भूमी व त्रेतायुगी रुप्याची भूमी व द्वापारात ताम्रभूमी होती; परंतु याचा अर्थ इतकाच घ्यायचा की, त्या त्या काळी, कवींच्या मते लोक त्या मानाने सुखी व धनवान होते. केवळ सोन्याचीच भूमी होती असे नव्हे. सारासार विचार पहावा, तो पहात नाहीत आणि पुराणिकही वेड लावण्याजोगे अर्थ करून सांगतात. त्याजमुळे खरेखुरेच लोक वेडे झाले आहेत.

शास्त्रात पाहिले तर ठीक आहे, व त्याचे हेतू व त्या वेळची व्यवस्था व काळ पाहून निर्णय केला पाहिजे. तेव्हा ब्राह्मण हे रानात रहात होते. त्या समयी त्यांस जोडे द्यावे असे लिहिले आहे, ते ठीक आहे; कारण की सर्व काम सोडून विद्या करण्याकरिता रानात ते जाऊन बसतात, त्याचे चालविणे आवश्य आहे. आणि असे ब्राह्मण होते त्या काळी इच्छा भोजन, गृहदान, वर्षभर दाणापाणी व अर्घ्यपादप्रक्षालन हे सर्व ठीक होते, कारण की, ब्राह्मणांमध्ये कोणास अन्न मिळत नव्हते, तेव्हा शहरचे व्यापारी, उदमी व राज्यकर्ते यांनी जर त्यांस न द्यावे, तर त्याचे कसे चालेल? परंतु ते ब्राह्मण कसे होते की, व्यासासारिखे, आणि अठरा अठरा पुराणे लिहिली. केवढा त्यांचा उद्योग म्हणावा? किती एक ग्रंथ केले! वेदाचा शोध लावून ते एकत्र जमविले! शाळा घातल्या! व ज्ञानवृद्धी केली! असो. ती ज्ञानवृद्धी बरी की वाईट, परंतु त्या काळी बरी होती. कारण त्या काळी लोक अगदी मूर्ख होते, म्हणून नाना प्रकारचे धर्म कोणीकडून ब्राह्मणांचे चालावे आणि विद्यावृद्धी सदोदित व्हावी, ही तजवीज त्यांणी केली.

परंतु जेव्हा ब्राह्मणांस समजले की, आम्हास द्यावे हा धर्म लोकांस कळला; आणि त्यांचा हेतू सर्व लोक विसरले, हे पाहून ते रानातून उठोन गावात आले व पोथ्या बांधून ठेवू लागले. व वेद पाठ करू लागले. अर्थ टाकला व पशूसारखे झाले. परंतु आता लोकांनी पहावे की, अशा ब्राह्मण लोकांस पैसा देण्यास योग्य नाही. हे आळसाचे सागर आणि अज्ञानाचे रक्षक झाले. कारण अज्ञान टाकून त्यांचा परिणाम नाही. जर अज्ञान मोडावे तर त्यांचा पैका बुडतो. व ते उपाशी मरतात. व त्यांस सरकारची उपजीविका काही नाही. याजमुळे त्यांस हे मूर्खपण रक्षण करणे जरूर झाले. परंतु लोकांचे डोळे उघडून वास्तविक दान कोणते ते समजतील. तेव्हा भटांचा थोरपणा सहज मोडेल. परंतु बहुत लोक अद्यापि भटांचे नादी लागले आहेत. व पाठ म्हणण्याकडे द्रव्य जाते ते व्यर्थ जाते, त्याचा उपयोग होत नाही, याजकरिता विचार करून पहावा, व शास्त्रात जरी काही लिहिले असले तरी त्याचा हेतू

व शास्त्र करणाराचा मानस जाणावा म्हणजे ठीक होते. केवळ शब्द घेऊ नये. म्हणजे उघड सर्व दिसू लागेल व लोक ताळ्यावर येतील.

कोणती मूर्खपणाची गोष्ट असो, परंतु त्यात दोन पैसे जर भटास मिळण्याचे असतील तर त्यांस अनुकूल होण्यास भट आळस करीत नाहीत. व गृहस्थ बोलून चालून मूर्ख म्हणवितात. वास्तविकच आहे की, त्यांस काही समजत नाही व वाचता देखील येत नाही. मग विचार करायचे दूरच आहे. याजकरिता भट हे अगदी नाहीसे झाले पाहिजेत व गृहस्थांनी व इतर जातीचे लोकांनी भटाचा नाद सोडून द्यावा. परंतु त्यांस ज्ञान आल्याखेरीज हे होणार नाही. त्यांस काही काळ पाहिजे.

मोठी अविचारी म्हटली म्हणजे सांप्रत भट मंडळी आहे. त्यांस काही ठाऊक नसले तरी ते होय म्हणतात. व इंग्रज लोकांचे राज्य लंकेत आहे असे म्हटले तर खोटे म्हणतात. व पुराणातील उदाहरणे दाखवून समाधान करतात. आपला गर्व सोडत नाहीत. आपल्यास पूर्वीच्या विश्वामित्र जमदग्नीच्या तुळणा देतात. याजमुळे अनाडी लोक फारच भितात. आणि भटांचा आशीर्वाद हे मोठे उत्तम नाणे समजतात व त्यांस मोल देऊन ते खरेदी करतात. जर कोणी मेला तर जसे गयावळ यांनी 'सरक भयो' म्हटल्याखेरीज मुक्ती होत नही अशी समजूत आहे, तद्वत् भटांचेही माहात्म्य आहे.

भट जेवल्याखेरीज कोणतीही गोष्ट पुरती होत नाही. जन्म, मरण, लग्न इत्यादी सर्वांस भट पाहिजेत. व ते नसतील तर अडाणी म्हणतात की अमका मेला पण भटांच्या तोंडात घास पडला नाही. असे समजून प्रयत्न करून खर्च करतात. म्हणून ही मोठाली श्राद्धे व गयावर्जने होतात. परंतु लोकांस असे वाटत नाही की, जो मेला त्याने जे कर्म बरेवाईट केलेअसेल त्याप्रमाणे त्यांस ईश्वरी फळ देईल. मग त्यांस गयेचे माहात्म्य काय? गयेस मोक्ष होतो तर तेथे गेल्याने तरी सुटका नाही. तेथील गयावळ यानी मोक्षाची परवानगी दिली पाहिजे. आणि मनुष्यास ते खरेच वाटते. म्हणून गयावळाचा संतोष करावयाकरिता हजारो रुपये देतात व तेही लुटून घेण्यास कमी करीत नाहीत. परंतु कोणी असे समजत नाही की, एक माणसाचे म्हटल्याने दुसरे माणसास मुक्ती कशी होईल? व हे कोण? त्याची आमची गती एक! मग त्याचे तोंडचे म्हटल्याने काय होते? परंतु हा सर्व मूर्खपणा आहे. भटांनी सर्वांस मोह घातला आहे व अज्ञानपाशाने बांधले आहे. ते ज्ञान आल्यावाचून सुटणार नाहीत.

✦ ✦

## ब्राह्मणांचा लोभ

■

**पत्र नंबर ७५ : १६ सप्टेंबर १८४९**

ब्राह्मण लोक यांची अलीकडची बुद्धी कशी आहे, याचे उदाहरणार्थ मी तुम्हास एक प्रमाण लिहून कळवितो.

पूर्वी होळकरांनी व बाजीरावाचे बंधू अमृतराव यांनी पुणे शहर लुटून लोकांस मारिले व पीडिले. त्यात किती एक मुले व बायादेखील ठार मेल्या व किती एक बायांनी जीव दिले. याप्रमाणे द्रव्य हरण केले. लोकांस राखेचे तोबरे दिले आणि कानात आणि बेंबीत बंदुकीची दारू घालून उडविली. धुऱ्या दिल्या. तक्त्यात माणसे पिळली. तवे तापवून त्यांजवर उभी केली व तेल कढवून पोरांच्या देखील अंगावर शिंपले. इतके करण्याचा हेतू की, लोकांनी लवकर पैसा द्यावा. तेव्हा किती एक निर्धन होते, त्यांस असे केल्याने ते मरण पावले. असे नाना तऱ्हेचे अन्याय व निर्दयपणाची व्यवस्था जो राजा म्हणवीत होता, त्यानेच केली आणि असे अन्यायाचे द्रव्य चार कोटी रुपये घेऊन अमृतराव काशीस पळून गेले.

तेव्हा तेथील ब्राह्मणांनी हा पुष्कळ द्रव्य घेऊन आला आहे, याचे हरण कसे होईल, याविषयी तजवीज योजिली. आणि त्यांस जातीत न घेण्याचा मनोरथ दर्शविला. आणि त्यांस कळविले की, तुम्ही अन्यायाने द्रव्य आणले आहे. याजकरिता तुमचे पंक्तीस भोजन कोणी करणार नाही. तेव्हा अमृतराव हा मूर्खांचा शिरोमणी होता; त्याने त्याचे भय मानिले. मग ब्राह्मणांनी सांगितले की, हे तुम्ही जे द्रव्य आणिले आहे, त्यापैकी निम्मे ब्राह्मणद्वारा धर्मादाय करावे, म्हणजे तुम्ही जातीत याल. तेव्हा त्याचे बोलणे कबूल करून त्याने मोठा धर्मादाय ब्राह्मणभोजने, अन्नछत्रे, यज्ञ व नाना प्रकारची दाने काशीस केली. मग ब्राह्मणांनी त्यांस जातीत घेतले व त्याची स्तुती करू लागले. आणि तो दुष्ट अमृतराव सर्व प्रकारे शुद्ध केला.

आता याविषयी विचार केला, तर ब्राह्मण हे किती नीच व दुष्टाचा प्रतिपाल करणारे आहेत, हे सहज लक्षात येते; कारण की, ज्या दुष्टाने द्रव्य अन्यायाने मिळविले, तो ब्राह्मणांस द्रव्य दिल्याने शुद्ध झाला कसा? जर त्या ब्राह्मणांनी असे सांगितले असते की, हे द्रव्य ज्याचे ज्याचे आणले आहे, त्यांस व्याजासुद्धा परत पाठवावे, आणि आम्हास यातील काही एक नको,

तर काही प्रायश्चित्त मात्र होते.

परंतु हे लोभिष्ट ब्राह्मण. यांस न्याय, दया नाही आणि धर्म नाही. केवळ आपल्या नफ्यावर दृष्टी ठेवून कितीही अन्यायाने कोणी द्रव्य मिळविले असले, तरी त्याची स्तुती करतात. आणि जर कोणी न्यायाने द्रव्य मिळवून त्यांस दिले नाही, तर त्याची खचित निंदा करण्याम चुकत नाहीत. म्हणतात की, अहो, या गृहस्थाकडे केवढा रोजगार? या कामावर दुसरा होता, तो केवढा खर्च करीत होता. धर्म किती? ब्राह्मणांचा सन्मान किती? किती वेळ इच्छाभोजने? किती दक्षणा देत असे? तो पुरुष दैवशाली होता. त्याचे हातून ब्राह्मणांस पोचले; परंतु हा हल्ली जो मनुष्य आहे, त्यांस काही द्रव्य मिळवता येत नाही. हा केवळ हाडकपाळी आहे. लग्न केले, मुंज केली, पण कधी सभा किंवा दोन हजार ब्राह्मण घरी जेवले, असे झाले नाही. व्यर्थ याचा जन्म आहे! मोठा अधार्मिक! असा त्याचा डांगोरा पिटीत फिरतात. याजमुळे सांप्रतचे गृहस्थ व कामदार यांस त्यांनी भ्रमात घातले आहे.

कामदारांस असे होते की, मी अन्यायाने द्रव्य मिळवीन; परंतु यांची तोंडे बंद करीन तर बरे. नाही तर मी चौघांत चांगला दिसणार नाही. इतके दिवस दक्षिणेत इंग्रजांचे राज्य आहे. त्यांपैकी जे कामदार झाले, त्यात बाबा भिडा, ठाण्याचा प्रिन्सिपल सदर अमीन हा लाच खात नसे, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. परंतु सर्व ब्राह्मण त्याची निंदा करतात. त्याचे गुण पहात नाहीत. आणि तो जेवावयास घालीत नव्हता, हा द्वेष करून त्याविषयी वाईट बोलतात.

तस्मात् भट लोक जे आहेत, हे केवळ भाडेकरी; परंतु मजुरासारखे नव्हत. मजुरदार मजुरी करून उगेच राहतात; परंतु हे मजुरी करण्यात लोकांची नीती बिघडवितात. आणि त्यामध्ये अज्ञान वाढवून दुर्गुणवृद्धी मनापासून करतात. त्यातील मुख्य समजुती अशा आहेत की, सर्व दानधर्म ब्राह्मणद्वारा. ब्राह्मणाखेरीज पैसा दिला, तर तो धर्म नव्हे. आणि भटांचा युक्ती तरी किती आहेत? त्या अशा की, पिंपळाचा पार बांधावा, अशी आज्ञा शास्त्रात आहे; परंतु पार कोणी बांधला तर ब्राह्मणाकडून मुंज करवावी लागते. म्हणजे पाराइतके द्रव्य त्यांस मिळते. याप्रमाणे सर्व ठिकाणी ब्राह्मण द्रव्यहरण करण्यात हुषार.

घर बांधिले तर ब्राह्मण पाहिजे. मंडप घातला तरी देखील तो पाहिजे. लिहावयास आरंभ केला तर भट पाहिजे. सर्व प्रकरणांत लहानथोरांस भटाशिवाय होत नाही, अशी समजूत लोकांची पाडून त्यांस असे दृढ केले आहेत की जर इतर जातींचा मनुष्य मरत असला, तर कोणा गृहस्थास दया येत नाही.

पण भटांची सहस्रभोजने करतात. कारण त्या गृहस्थास असे वाटते की, यात लोकांस व इतर कामास भटाखेरीज जो पैसा जाईल तो व्यर्थ. त्याचे फळ ईश्वर देणार नाही. याजकरिता सांप्रतचे गृहस्थांची व्यवस्था अशी आहे की, ते पाहिजेत तशी कर्मे करून द्रव्य मिळवितात. व त्याचे बहुधा दोन हिस्से करतात. एक घरात राहतो व दुसरा भटाकडे जातो. याजमुळे आळस फार वाढला आहे आणि उपयोगी कामे व व्यापार सर्व बंद झाला.

गृहस्थ पन्नास हजार रुपये मरतेवेळेस किंवा लग्नात खर्च करील; परंतु एक पैसाही ज्ञानवृद्धीस, व्यापारास किंवा लोकसुखाकडेस उपयोग व्हावा, म्हणून खर्चणार नाही. तेव्हा अशी ज्या ठिकाणी व्यवस्था आहे, तेथे लोक कसे सुधारतील ? ब्राह्मणांचा दुसरा एक चमत्कार आहे; तो असा की, उपास, पूजा व धर्मकृत्ये ते मजुरीने करतात. व पुण्य विकत देतात. हा एक मोठा विलक्षण चमत्कार आहे. दुसऱ्याबद्दल उपास करावा आणि त्यांस पुण्य विकावे, याचा अर्थ काय ? जर कोणास ताप येत असला तर तो भटास उपास करावयास सांगतो आणि भटापासून पुण्य विकत घेतो. म्हणजे आठचार आणे भट घेऊन यजमानास सांगतो की, तुमचे व्रत मोडले नाही. तुम्ही उपास केल्याप्रमाणे फळ आहे. अशी युक्ती करतात.

याशिवाय हजारो तऱ्हेने लोकांकडून पैसा काढतात. हिंदू लोकांची सुधारणा होण्यापूर्वी भटांनी विद्या जरूर शिकली पाहिजे; उद्योग केला पाहिजे. किंवा इतर लोकांनी भट हे बेवकूफ आहेत, असे समजून त्यांचा कुजलेले फळासारिखा त्याग करावा. आणि आपल्यास दान करणे तर चांगल्या रीतीने विद्यावृद्धीकडे करीत जावे. असे केल्यानंतर भय अर्थातच मोडतील आणि वास्तविक विद्वान पुढे सरतील. आजचा काळी लोकांपाशी भटामुळे पैसा उरत नाही. याजमुळे ते बहुधा विद्यावृद्धीस प्रतिकूल आहेत.

सांप्रत दोन्ही पक्ष, भट व गृहस्थ व इतर जातीचे लोक हे सर्व सारखे मूर्ख आहेत. यापैकी कोणी तरी शहाणा पाहिजे व कोणास तरी दुसऱ्यांशी कसे वागावे, हे समजले पाहिजे. सांप्रत भट इतर लोक अज्ञानांधकाराने भ्रमिष्ट होऊन चालले आहेत. यास्तव लोकांनी विचार करावा आणि याचा उपाय योजावा. भट विद्वान होतील आणि पाठ करणे सोडतील तर चांगले होईल.

# ब्राह्मणांचे पुढारीपणापासून अनहित व वेदान्त

■

पत्र नंबर ९६

आमचे लोकांत ब्राह्मण पुढारी झाले, याजमुळे फार घात झाला. जर कुळंबी, क्षत्री इत्यादिक पुढारी असते, तर बरे होते.

कारण ब्राह्मणांच्या हातापायांत बिड्या आहेत, त्यांस जर सांगितले की, पृथ्वीवर बहुत देश हिमालयाचे पलीकडे आहेत, तर ते खोटे म्हणतात व उत्तर समुद्राचा अंत नाही, असे म्हणतात. बरे, या गोष्टींचा शोध करण्याकरिता आपण फिरावयास जाऊन स्वनेत्राने सर्व देश पाहून येत नाहीत. आमचे लोक इंग्रज लोकांच्या सर्व गोष्टी व भूगोलविद्या मिथ्या म्हणतात. तर स्वतां पाहून येण्याकरिता पैसा खर्च करून फ्रान्स, पोर्तुगाल, चीन, विलायत, उत्तर समुद्र व लापलंड इत्यादिक देशांत फिरावयास ब्राह्मण पाठवून त्याचे हातून लिहून बखरी आणून प्रसिद्ध कराव्या, म्हणजे लोकांची भ्रांती जाईल आणि लोकांवर उपकार होतील. परंतु ब्राह्मणांस परदेशात जाण्याचा प्रतिबंध आहे. याजकरिता हे न करून उगेच बसल्या जाग्यावर लंका बिभीषणाचे राज्य, दुधाचा समुद्र, सोन्याची जांभळे इत्यादी पुराणातील मत खरे असेच म्हणत असतात. याजमुळे इतर जातीचे लोक अधिक भ्रांतीत पडतात. जर हे दुसरे जातीचे लोक पुढारी असते, तर परदेशात जाते व ब्राह्मण लोकांचे डोळे उघडते; परंतु ते आता घडत नाही. ब्राह्मण लोक प्रतिबंधात पडले व त्यांच्यामुळे इतर जातीचे लोक सर्व प्रतिबंधात पडून आंधळ्यासारखे घरच्या उंबऱ्यापर्यंत चाचपीत बसले आहेत, हे मोठे वाईट झाले.

आता ब्राह्मणांचे प्रतिबंध मोडून त्यांस बाहेर काढावयास व त्यांच्या जुन्या समजुती सर्व मोडावयास बहुत काल लागेल, परंतु त्यांस काही उपाय नाही. जे मराठे राजे वगैरे आहेत ते ब्राह्मणाधीन आहेत. याजमुळे ते काही उद्योग करीत नाहीत व स्वतां त्यांस लिहितावाचता येत नाही. त्यांस काहीच खबर नाही. जवळचे ब्राह्मण असतात, त्यांस तर या सर्व गोष्टींचा कंटाळा आहे. याजकरिता ते आपलेबरोबर नावेत सर्व लोकांस बसवून बुडत आहेत व त्यांस बाहेर काढावयास इंग्रज लोक यत्न करताहेत; परंतु तूर्त आमचे लोकांची संख्या जास्ती आहे. याजमुळे इंग्रज लोकांचा उपाय चालत नाही.

हे वेडे लोक पाहून मला तर फारच दुःख वाटते व जे दयाळू आहेत व जे लोकांचे हित इच्छिणारे आहेत, त्यांस असेच दुःख वाटेल जे भिकारी आहेत, ते काही बरे आहेत. दरिद्राचे योगाने ते काही तरी गोष्टी ऐकतात. परंतु श्रीमंत लोक व ब्राह्मण जातीचे मनुष्य हे तर फार अंदाधुंद आहेत. ब्राह्मणांस घरी राहण्यापुरती सोय झाली म्हणजे पुरे. तो आपल्या ठिकाणी मस्त होऊन पुराणातील गोष्टी वाचीत बसतो. किंवा वेदान्त काढतो, म्हणजे हे सर्व मिथ्या. या लोकांस सुख होऊन तरी उपयोग काय ? व याचे कल्याणास झटावे कशास ? असे त्यास वाटते. हे सर्व मिथ्या म्हणतो. कोणी 'बालोन्मत्त पिशाच्चवत्' असे भागवतात आहे, ती वृत्ती धारण करून वेड्यासारखे फिरतात आणि माझा जीव ईश्वरास मिळाला, व मी जीवनमुक्त आहे असे समजून शेवटी संन्यास घेतात. म्हणजे देहाचे सार्थक झाले, असे त्यांस वाटते. आणि दगडासारखे पढतात. सर्व आशा, रुचि बळेच सोडितात आणि निरुपयोगी होतात, ही वेदान्त्याची स्थिती.

कर्मठ आहेत ते अग्निहोत्र घेऊन बसतात, म्हणजे यज्ञयागात सरासरी जन्म व्यर्थ जावा, अशी तजवीज करतात. लोक आंधळे आहेत, त्यांस डोळे द्यावे, ज्ञान शिकवावे, व सुखी होण्याचे मार्ग दाखवावे, हे मनात देखील आणीत नाहीत. असे मूर्ख असतात. भट, वैदिक शास्त्र्यांच्या बुद्धीचा प्रकाश तर सर्वांस दिसतच आहे. याप्रमाणे बहुतकरून ब्राह्मण लोक आळशी किंवा मूर्ख असतात, याची चित्ते लोकांकडे नाहीत. वेदान्ती आहेत, त्यांस असे समजत नाही की, आम्ही लोकांस मिथ्या मानले, तरी लोक मिथ्या झाले की काय ? अवर्षणात लोकांस धनधान्यसमृद्धी मानिली, तरी झाली की काय ? मानल्याने मिथ्या होतात कसे ? तुम्ही आपल्या मनात काही तरी समजूत केली आणि लोक व जग हे सर्व खोटे आहे, असे म्हटले, तरी इतके प्राणी सुखदुःखात, अज्ञानात व मूर्खदशेत आहेत ते सुटले की काय ? मग मानल्याचा उपयोग काय ? रोगी बहुत आहेत; त्यांस वैद्याने निरोगी मानले; म्हणजे त्यांचा रोग जातो की काय ?

तद्वत् हे मूर्ख वेदान्ती आहेत. त्यांस मी म्हणतो की, तुम्ही आपणांस काही नको असे म्हणा, व सर्व आशा सोडून ईश्वरावर भार ठेवा, हे चांगले; पण व्यर्थ आयुष्य घालवू नका व ज्ञान, विद्या व सुख इत्यादिकांचे वृद्धीस झटा. तुम्ही सर्व जग जरी मिथ्या मानले, तरी आम्ही सर्वांनी असे मानले नाही. याजकरिता आम्हाकरिता तुम्ही झटून आमचे कल्याण करा. म्हणजे तुमचा वेदान्त खरा आहे. असा विलक्षण व आळशी वेदान्त उपयोगी काय ?

तुम्ही निराश झालेत, तर तुम्ही आपल्याकरिता काही करू नका, तुम्ही

निराश व आम्हीच ईश्वर असे मानणारे नाही, याजकरिता आमच्यावर दया करा. आमच्याकरिता जे तुम्हास कर्तव्य ते करा. दगडासारखी वृत्ती करून तेच सार्थक असे म्हणू नका.

✦ ✦

## पंडितांची योग्यता

पत्र नंबर १०३

ज्यास समजत नाही, त्याने उगेच बसावे, हे बरे; बोलू नये, म्हणजे शहाणपणाचा ठाव लागत नाही, असे आहे.

परंतु तो मार्ग सोडून 'कल्याणोन्नायक मंडळी'ने आपले ज्ञान प्रसिद्ध करावयास इच्छा केली, हे पाहून मला फार आश्चर्य वाटते. याचे ज्ञान कोणाचे उपयोगी नाही. लोकांचे कल्याण हे कसले करतात? त्यांस प्रथमच प्रश्न उलगडत नाही. हे पुसतात की, सुधारणा म्हणजे काय? यास आपली सुधारणा झाली पाहिजे, हेच कळत नाही. आम्ही सर्वज्ञ व भूदेव व आमच्या पोथ्यांत सर्व ज्ञान आहे, व आम्हास काय आणखी कर्तव्य आहे? असे वाटते. हे अजून पहिल्याच धड्यात आहेत?

ज्या गोष्टीचे सिद्धान्त सर्वतोमुखी झाले आहेत, त्याचे निवारण हे करतात. हे शास्त्री, पंडित व भट हे मूर्ख असता विद्वान म्हणून हिंदुस्थानात मोडतात. यामुळे देशाची फार बुडणूक झाली. इतर लोक यांनी अज्ञानात बळेच ठेविले आहेत. दक्षणा दोन पैसे मिळवायची असली, म्हणजे हे कावळ्यासारखे जमतात व पैशाकरिता सर्व दिवस घालवितील, परंतु उद्योग करावयाचे नाहीत.

पुण्यात दक्षणा ग्रंथकर्त्यास द्यावी म्हणून कोणी इंग्रज शाळेतील लोकांनी सरकारास लिहिले, त्याजबद्दल पाठशाळेतील पंडितास अत्यंत क्रोध येऊन त्यांणी एकत्र जमून सभा केली, परंतु एणेकरून काही फळ झाले नाही. सरकारने उत्तम बेत मान्यच केला. या पंडितांनी गवगवा करून काही उपयोग झाला नाही. त्याची अप्रतिष्ठा होऊन गेली, व सरकारने जे करावयाचे ते केले. पंडितांनी आपला मूर्खपणा मात्र जगात प्रसिद्ध केला. हे सुधारणेचे महा वैरी आहेत. असे हे गुण यांचे प्रसिद्ध झाल्यामुळे सरकारातून पाठशाळा हे दुर्गुणांचे माहेरघर

व मूर्खपणाचे बीज मोडून टाकावे, असा बेत झाला आहे. तेव्हा पंडितांची योग्यता किती आहे, हे यावरून पहा.

हे बाबांस मात्र फशिवतात. व्रते, उपवास, प्रायश्चित्ते वगैरे पोट भरावयाचे मार्ग तेवढे ठेवण्याचा प्रयत्न यांचा आहे. दुसरे यास काही नको. हे विद्येचे भुकेले नाहीत. ग्रंथ वाढविण्यास उत्सुक नाहीत. देशकंटक आहेत. लोकांचे सुधारणेविषयी व हिताविषयी प्रयत्न करावयास अनुकूल नाहीत. राज्य कसे चालले आहे ? व लोक बरे अवस्थेत कशाने येतील ? नवीन कायदे काय पाहिजेत ? याचा विचार करीत नाहीत. सोरटपणाची गोष्ट, खराब चाल, स्वहित, सोदेगिरी, सुधारणुकीची बंदी व आपसांत कलह लावून ग्रामण्ये करून चार पैसे मिळवावयाचे, अशी कुत्सित कर्मे करण्यास हे पंडित कसे जुडतात की, जशा मोहळाच्या माशाच मधावर बसतात.

यांणी लोकहिताचा प्रयत्न केला, असे कोणास आजपर्यंत स्मरण नाही. त्यांनी आपल्या पोटावर व शालजोड्यांवर नजर देऊन सर्व देश खराब केला ! जोपर्यंत काही मूर्ख लोक देशात आहेत व ते मानतात, तोपर्यंत त्यांची ग्रामण्ये चालतील व काही दिवसांनी हे जुने लोक गेले, म्हणजे पंडित उताणे पडतील, परंतु या गोष्टीस दहावीस वर्षे आणखी पाहिजेत. म्हणजे आम्हीच या पंडितांचा तमाशा पाहू. तथापि प्रथम पाठशाळेचा विध्वंस झाला पाहिजे, म्हणजे एक पुरंदरचे बंड मोडले.

## खरा धर्म करण्याची आवश्यकता

पत्र नंबर १०७

'कल्याणोन्नायक मंडळी'ने आपले शहाणपण दाखविण्याकरता दोन विषय पुढे काढले. (एक) संस्कृत भाषेतील ग्रंथ सर्वोत्तम व त्यात सर्वोपयोगी ज्ञान आहे. (दुसरा) पुनर्विवाह करू नये व विधवा बायकांनी मीठ सोडून वगैरे जेवीत जावे व उपासतापास करून रहावे. पुनर्विवाह करून उपयोग नाही. दोन विषयांची उत्तरे समर्पक झाली असता त्यांजकडून काही उत्तर आले नाही.

तेव्हा मी या पंडितांची प्रार्थना करून त्यांस सांगतो की, लोकांचे हित

तुमच्याने होणार नाही. व तुम्हाकडून सुधारणा करविण्यास जे झटतात, ते भ्रांतीत आहेत. कारण लोकांचे हित इच्छिणे हे तुमचे वतनवृत्तीस विरुद्ध आहे. लोक जितके मूर्खपणात असतील व बायका जितक्या वेड्या असतील तितके तुमचे पीक अधिक. असे असता तुम्हाकडून हित होईल कसे? अग्नी घर विझवावयास जाईल काय? व मांजर उंदिरास सोडून देईल काय? या गोष्टी घडणार नाहीत. तुम्ही पुराणिक, भट व पंडित या सर्वांचे हित लोकांचे मूर्खपणात आहे. लोक खरा धर्म करू लागले तर तुमची उपजीविका कशी चालेल? बायकांची व्रते, सहस्रभोजने, दांपत्य-पूजने, चातुर्मासाचे नेम, दक्षिणा, शांति, भूयश्री, संपूर्णे ही जाहली तर तुमचे पोट भरणार. शाळांत, पुस्तकालयांत तुम्हास काय भाग आहे बरे?

लोक शहाणे झाल्याअंती असे होईल की, शाळा, ग्रंथ व विद्या वाढतील; गरीब, आंधळे, लंगडे यांस खावयाची सोय होईल, व रोगी यांस औषध देण्याची सोय होईल असे करण्यास तुम्ही धर्म म्हणाल काय? चांगल्या रीतीने कोणी धर्म करावयास इच्छील तर आम्ही त्यांस सांगू की, 'अरे बाबा, हा धर्म नव्हे. जेणे करून गरीब, आंधळे, पांगळे अन्नास मिळतील व धष्टपुष्ट आहेत ते उद्योगास लागतील आणि लोक विद्वान होतील असे धर्म करा.' असे तुमच्याने लोकांस सांगवेल काय? ही गोट कदापि घडणार नाही. तुम्ही असेच सांगाल की, "अरे शाळा कशास? यांस पैसा देऊ नये. देऊन काय पुण्य आहे? ब्राह्मणाचे मुखी घातले तर पुण्य आहे. पुस्तके कशास? यातील ज्ञान काय उपयोगी आहे? ब्राह्मण बोलावून त्यांस दाने करावी. गुप्तदान केले म्हणजे पुढले जन्मी मिळते; केळीचे दान सुवर्णसहित केले म्हणजे पुत्र होतो. एक गोप्रदान केले तर अनंत कोटी पापे जातात. देवास अलंकार करून द्यावे. ब्राह्मणास सुवर्णाचे दागिने करून वाटावे. यात पुण्य आहे. ब्राह्मणास भोजन दिले म्हणजे राज्य चिरकाल चालते. जरीमरी उठत नाही. शत्रूचा नाश होतो. रोग परिहार होतात." असे तुम्ही सांगाल, तर तुमचे पोट भरेल.

तुम्हास एखाद्या वेड्या बाईने पुसले की, मी जेवताना बोलत नव्हते, हा माझा नेम होता व त्याचे संपूर्ण काय करावे? तर तुम्ही काय सांगाल? "अगे बाई, वामनव्रत काय उपयोगी आहे? त्या काळी ही युक्ती काही तरी ब्राह्मणांस धर्म व्हावा म्हणून सांगितली. परंतु आता इतकेच की, चार मुलांस २५ रुपयांचे ग्रंथ घेऊन वाचावयास द्या म्हणजे त्यात मोठा धर्म झाला." असे तुमच्या तोंडाने कधी तरी येईल? दगडास घाम येईल, सूर्य पश्चिमेस उगवेल परंतु तुम्ही हे कधी सांगणार नाही.

तुमच्या देखत एखादा लबाड उठून मी सांबबाबा म्हणून साधूचा वेष धरून मुंबई, बडोदे, असे ठिकाणी लोकांस फसवून पैसा आणतो आणि तुमचे देखत रांडा बाळगून असतो. त्याचे हजारो लोक पाया पडतात, आणि धर्म करतात, व अशा लबाडास पोशितात. परंतु यांस कशास पैसा देता? हा लबाड धर्मास योग्य नाही, असे तुमच्याने म्हणवेल? कदापि म्हणवत नाही. तुम्ही असे म्हणाल की, ब्राह्मणजातीचा आहे, तस्मात् त्यांस धर्म सर्वांनी करावा, पुण्यच लागेल. व तो देवाचे नाव घेतो, याजमुळे त्याची सर्व पापे जळून गेली. त्याचे पायावर डोकी ठेवावयास चिंता नाही. असे सर्व तुम्हास ठाऊक आहे की, जर यांस असे नाव ठेवावे आणि लोकांस जागृत करावे, तर आम्ही या सांबबुवाहून अधिक चांगले नाही. जे त्याचे गुण तेच आमचे, असा तुमचा कट आहे. याजवर कोणी हल्ला करील तो करो.

अज्ञानवृद्धीस आपले हिताकरिता झटता आणि जितके जितके ज्ञान वाढेल त्यांस नास्तिकपणा असे नाव देता. मूर्खास आस्तिक, भाविक, धर्मिष्ठ असे म्हणणे तुम्हास जरूर आहे. जर तुम्ही 'कल्याणोन्नायक' असाल तर खरा धर्म कोणता, तो आपले स्वहित सोडून सांगावा. पुराणिकाने पुराण कसे सांगावे, हरदासाने कथा कशी करावी, ती त्यांस सांगा. एक म्हणतो, विष्णूस तुळशी वाहिल्या म्हणजे हजार जन्माचे पाप जाते. त्यामुळे जो लबाड श्रोता आहे तो म्हणतो की, पुराणिकबाबाने हे चांगले सांगितले. मी पाप करीत जाईन आणि तुळशी वहात जाईन. त्यांस वास्तविक नीती आणि धर्म सांगूनही रिकामी खटपट त्याजकडून टाकवा. परंतु हे तुमचे काम नव्हे असे आम्हास वाटते.

# ४. स्त्रीजीवन

## लहानपणाच्या लग्नापासून अडचणी

■

पत्र नंबर २

तारीख ५वी, माहे मार्च सन मजकूरचे पत्रांत 'प्रवासी' याने पत्र लिहिले, ते आपण कृपा करून लोकांत प्रसिद्ध केले, त्यातील मजकूर पाहता फार समर्पक आहे. यास्तव त्याचे अनुमोदनार्थ हे पत्रही प्रसिद्ध कराल असा हेतू आहे.

सांप्रत काळातील लोक अल्पायुषी व रोगिष्ट असतात, असे महाराष्ट्र देशातील लोक म्हणतात. व त्याचे प्रतिपादनार्थ वृद्ध पुरुष अंगापिंडाने सुदृढ असतात. त्याचे उदाहरण दाखवितात. असे होण्याचे कारण प्रवासी याने लिहिले आहे त्याजवरून साफ दिसत आहे की, लोकांच्या चाली आणि नीती भ्रष्ट झाल्यामुळे हा परिणाम निदर्शनास आला आहे. केवळ काळाचे सत्तेने अशी गोष्ट घडते असे नाही. हा तर निश्चय दिसतो; परंतु अविचारी लोक मनास येईल तसे बोलतात आणि कारण लक्ष्यात आणीत नाहीत. त्यामुळे त्यांस आपली नीती ही सुधारता येत नाही. जर लोक थोडासा विचार करतील व शास्त्राज्ञा कशी आहे, हे पाहतील तर हल्लीचे उत्पत्तीतील लोकही पूर्वीचे लोकांप्रमाणे सुदृढ आणि दीर्घायुषी होतील व असे झाले म्हणजे पूर्वीचे लोकांप्रमाणे पराक्रमीही होतील; परंतु असे न करिता बहुत लोक व त्यात मुख्यत्वेकरून ब्राह्मण फार वाकडे आणि अशास्त्र चालतात.

हल्ली लग्नाचे दिवस आहेत. याजमुळे किती एक ठिकाणी वारंवार असे पाहण्यात येते की, मोठे मोठे संभावित गृहस्थांचा मुलगा पाच वर्षांचा झाला, म्हणजे ते काळजीत पडतात. ती त्यांची काळजी दोन प्रकारची असते; एक मुलाचे लग्न लौकर कसे होईल आणि त्यांस हुंडा पुष्कळ कसा मिळेल? यास्तव मोठा प्रयत्न करून ही दोन्ही कार्ये साधितात आणि सात आठ वर्षांचे मुलास बरोबरीची मुलगी मिळाली किंवा ती विद्रूप व हीनकुलोत्पन्न असली, तरी द्रव्याच्या आशेने ती करतात, व मग लग्न उभे राहिले, म्हणजे आपल्यास धन्य मानून कर्ज करून पुष्कळ खर्च करतात. या प्रकारे करून कर्जबाजारी होऊन ते लग्न कोणीकडून तरी दगडीवर दगड घालून सिद्धीस नेतात. पुढे लवकरच 'प्रवासी' याने जे परिणाम लिहिले आहेत. ते निदर्शनास येतात आणि बहुधा बापाचे, आईचे डोळ्यादेखत पुत्राचे व सुनेचे वाकडे पडते व पहिल्याने जी

जोडी गोजिरवाणी दिसते, ती मग शत्रूप्रमाणे दिसू लागते. जो विद्या करण्याचा काळ व जा वयात शरीर बळकट व्हावयाचे, त्या समयी पुत्र संसारी व मुलाबाळांचा धनी होतो. मग त्याची विद्या तरी कशी संपूर्ण होईल ? आणि शरीरात जोम कसा येईल ?

घोडा किंवा बैल मेहनतीसाठी तयार करावयाचा असेल तर त्यांस घोडीचे व गाईचे दर्शन होऊ देत नाहीत. याचे कारण हेच की, मग तो वळू होईल आणि मेहनतीची कामे करावयास अयोग्य होईल. तसेच मनुष्याविषयी आहे; कारण मनुष्य तरी एक जनावरच आहे. व या जनावरास ईश्वराने बुद्धिकौशल्य इतरांपेक्षा अधिक दिले आहे, असे असता रानचे जनावरांपेक्षाही मूर्खपणाने कोणी कोणी वागतात. तेव्हा त्यांस ईश्वराने बुद्धिविशेष व विचार दिल्याचा उपयोग काय आहे ? कोणी अल्प वयात मुलास यौवन प्राप्त आहे किंवा नाही, याचा संशय आहे. तो इतक्यात स्त्रीविषय-लुब्ध झाल्याने त्यांस दुर्गुण आणि अपौरुष प्राप्त होते. आणि त्याचा बदलौकिक झाला, म्हणजे सर्व कुळाचाही होतो, मग त्याचे बापाने लवकर लग्न करून शिफारस मिळविल्याचे त्यांस बक्षीस काय मिळाले बरे ? व्यभिचार मात्र अशाने बहुत वाढला आहे आणि विप्रस्त्रियांनी इतर जातीपेक्षा ताळ टाकला आहे. हे बहुधा लोक समजतात. व पूर्वीपासून बाजीराव पेशवे यांचे अमलात लोकांमध्ये भ्रष्टाकार होऊन जी अधर्म-प्रवृत्ती उत्पन्न झाली, तीस लोकांचे अज्ञानाने उत्तेजन आले आहे व येणेकरून ब्राह्मणधर्मास फार लज्जा आली आहे. ही दूर करण्याकरिता आपले सारख्यांनी भगीरथ प्रयत्न केला पाहिजे. वारंवार लोकहितासंबंधी मजकूर आपण प्रगट केल्यास काळेकरून तरी त्या गोष्टी हृदयात ठसून नीती आणि धर्म यांचे स्थापन होईल.

यास्तव ही माझी विनंती सर्व लोकांस कळवावी की, ज्या चाली एक वेळ पडतात, त्या जरी वाईट असल्या, तरी लोकांस फार लाडक्या वाटतात. याजमुळे त्यांचा त्याग करण्यास अनमान होतो व जे लहान किंवा गरीब आहेत, ते तर अगदीच धजत नाहीत. ते मोठे लोकांकडे पाहून दबतात. यास्तव कोणी संभावित लोकांनी आरंभ केल्याशिवाय हे होणार नाही. महाराष्ट्र देशात जे मोठाले गृहस्थ आहेत, त्या सर्वांस बहुत करून मुलेबाळे आहेत. त्यांणी ही गोष्ट मनात वागवून केली, तर इतर लोक त्यांचे पाठीमागे चालू लागतील. जसे बाजीराव याचे राज्य बुडाले, तेव्हा शूरांचा फार तोटा पडला, तसे आता इतके मूर्खपण पसरले आहे की, लोकांस मार्ग दाखविण्याजोगे शहाणे देशात नाहीत, असे अवर्षण का पडले ?

लहानपणी बापांनी आपली मुले शहाणी केली, तर किती एक चांगले निघतील आणि लग्न हे केव्हा तरी त्याचे स्वसामर्थ्याने घडेल; परंतु मुलास रोजगारधंदा नाही, शहाणपण नाही व पुढे कसा निघतो त्याचा अंकुर दिसत नाही, तो त्याचे गळ्यात मुलगी बांधून जोखिमांत घालावा व त्याची विद्या, आयुष्य सर्व बुडवावे यात काय लाभ होतो ? लग्न बापाने केले, म्हणजे त्यात काय मोक्षसाधन आहे ? ज्याचा तो आपले पराक्रमाने करील, तर फार चांगले; आणि मोठेपणी लग्न झाले, म्हणजे लग्संबंधी शपथा व वचने साक्षीनिशी व ईश्वरास स्मरून घ्यावी लागतात. ती पुरुषाचे मनात सार्थ वागतील, आणि त्याप्रमाणे तो वर्तेल; परंतु लहानपणी हे सिद्धीस जात नाही व खाण्यापिण्याची सोय झाल्यापूर्वी स्त्री व मुले गळ्यात पडतात. मग त्याणें पोटास मिळवावे ? किंवा स्त्रीचे बरोबर राहावे ?

थोडके दिवसांत पुण्यात असा पर्याय झाला की, एके संभावित गृहस्थाचे मुलाने एक गरीब व्यापाऱ्याची मुलगी फसविली, म्हणून तोहमा उत्पन्न झाला होता. कोणी लबाड मनुष्य होते, त्यांस सरकारातून शासन होऊन निवारण झाले; परंतु कारण पाहिले असता त्या स्त्रीचे लग्न झाल्यापासून नवरा बाहेरगावी पोट भरावयास गेला होता व त्याचे पश्चात ती कन्या यौवनदशेस आली. तेव्हा तिने एक द्रव्यवान शेजारी गृहस्थ होता, त्याचे संबंधाने बहुत कुकर्मे केली, याजमुळे तो नवरा पुन्हा पुण्यात आला, तेव्हा त्याने ते वर्तमान ऐकून स्त्रीचा त्याग केला; असे ऐकण्यात आले आहे. तेव्हा यात अपराध कोणाचा ? हे वाचणाराचे लक्ष्यात येईलच.

माझे म्हणणे इतकेच की, असे दुराचार घडतात व फार ठिकाणी घडले आहेत, त्याचा विचार करून जे चांगले गृहस्थ आहेत, त्यांनी काही तजवीज काढावी, म्हणजे बरे होईल. नाही तर पापवृद्धी फार होत आहे, तीस कोण आवरील तो आवरू.

✦ ✦

# पुनर्विवाह

■

**पत्र नंबर १० : १४ मे १८४८**

सांप्रत आपले लोकांमध्ये हा केवढा अनर्थ आहे की, स्त्रियांस पती वारल्यावर पुनरपि लग्ने करू देत नाहीत! ईश्वराने स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत. असे असता पुरुषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई, हा केवढा जुलूम आहे?

चार शहाणे लोक मनावर घेऊन हे कार्य करतील, तर किती एक जीव विनाकारण दुःखात व अपराधात पडत आहेत, त्यांचे संरक्षण होईल; परंतु हे भाषण साधारण लोकांचे कर्णी पडले, म्हणजे त्यांस असे वाटेल काय? नाही. ते म्हणतील की, आम्ही भूदेव, आमचे शास्त्र ईश्वरोक्त आहे; त्याचे उल्लंघन आम्ही करणार नाही, व काशीपासून रामेश्वरापर्यंत ब्राह्मणांचा दबदबा आहे, तो जाऊन लोक थट्टा करतील; व जुने चालीस विरुद्ध येईल. आणखी ते म्हणतात की, 'त्यात काय आहे? ज्या स्त्रीच्या नशिबी सुख नाही, तिचाच नवरा मरतो.' अशी मूर्खपणाची प्रमाणे दाखवितात.

परंतु त्यांस असे समजत नाही की, आमच्या ज्या कन्या त्यांचे रक्षण करण्याचा आमचा धर्म असून त्यांचा असा घात करू नये व आमचे लोकांमध्ये पुष्कळ शास्त्र जाणते व ग्रंथ पाहणारे व विद्वान म्हणून मिरवणारे आहेत; परंतु त्यांस खरे विद्वान असे कोणी म्हणेल काय? नाही. ज्यास आपण सुखी कोणत्या रीतीने होऊ हे कळत नाही व जे आपले कन्यांचा सर्वस्वी घात करतात, ते विद्वान कशाचे? हा एक चमत्कार आहे की, पाच वर्षांपासून पंधरा वर्षेपर्यंत कन्येचा पुनर्विवाह करावा, म्हणून शास्त्राज्ञा आहे; तीदेखील मानीत नाहीत. शास्त्राज्ञा आहे ती झाकून ठेवितात, हा केवढा अनर्थ आहे?

अहो लोकांनो! तुम्ही आपले कन्याचे वध करणारे आहात. सांप्रतचे ब्राह्मणास शिकवणे फार अवघड आहे. चालीविरुद्ध गोष्ट त्यांचे कानी पडली, म्हणजे ते नाक मुरडितात आणि म्हणतात, 'छेः, हे काय? त्यात काय आहे? पूर्वापार चालत आलेली चाल असून तीस विरुद्ध कसे बोलता? आमचे वडील तर लक्षावधी रुपये मिळवीत होते. आता आम्ही हलक्या अवस्थेप्रत पावलो, म्हणून अशी बुद्धी झाली.' जसा एखादा पहिलवान एक पल्ला ओझे उचलणारा असतो आणि त्यांस क्षयरोग झाला, म्हणजे तो औषध घेत नाही. तो म्हणतो

की, ‘ अरे माझे पल्लाभर उचलायचे बळ होते, तेव्हा मी औषध घेतले नाही. आता मी थकलो, आता औषध घेऊ काय? मी कधी घेणार नाही. ’ आणि औषध तुच्छ मानून जर्जर होऊन मरण पावतो. तसे ब्राह्मण लोक मूर्ख होऊन विचार करतात आणि म्हणतात की, ‘ अहो, आमचे पूर्वज विश्वामित्र, त्याने नवी सृष्टी केली; अगस्तीने समुद्र प्राशन केला; दुर्वासाने शापाने विष्णूने दहा जन्म धारण केले व भृगूने लक्ष्मीनारायणास लाथ मारली; असे आम्ही देवांचे देव आणि सर्वांहून वरिष्ठ; आम्हास शहाणपण शिकवावयास कोणी समर्थ नाही. ’

“ अरे अरे! ” फुकट हे ब्राह्मण लोक गर्वाने जळतात! मागील गोष्टी मनात कशास आणतात? मी तुम्हास पुसतो की, जेव्हा तुम्ही आपले जावयाचे मरणाची खबर ऐकता आणि तुमची कन्या तर लहान, तिचे आणि जावयाचे अजून दर्शन झाले नाही; असे असता त्या लहान अर्भक बालकाविषयी तुम्ही आपले मनात निष्ठुरपणा का आणिता? आणि आपले कन्यांस तुमचे तुम्हीच खाटीक का होता बरे? अरे परकी लोक यांनी जर तुमच्या कन्या रस्त्यातून जाताना पाहिल्या, तर त्यांची अवस्था पाहून अंतःकरण चरचरा भाजते आणि दया उत्पन्न होती; परंतु तुम्ही आईबाप, भाऊबंद, शहाणे व विचार करणारे व बरे-वाईट जाणणारे असे असून एवढा तुमच्या घरातील अनर्थ तुमच्याने दुर कसा होत नाही? तुम्ही आपल्या स्त्रिया व कन्या मूर्खपणाचे अवस्थेत जन्मापासून बाळगिल्या आहेत; म्हणूनच हा तुमचा जुलूम त्यांजवर चालतो व त्या सोसतात.

जर त्यांस थोडेसे ज्ञान असते, तर त्यांनी त्याचा विचार काढून ते पुनर्विवाह करू नये म्हणतात, त्यांचे श्रीमुखात दिली असती, यात संशय नाही; परंतु अज्ञान आणि भोळसरपणामुळे सर्वत्र जुलूम चालतो, असा नेम आहे. त्याप्रमाणे हे झाले आहेत. जर आपल्या देशात दहा स्त्रिया विद्वान असत्या आणि त्या जर विधवा झाल्या असत्या, तर त्यांनी आपला पुनर्विवाह करण्याचे ठरविले असते. आणि दुष्ट ब्राह्मणांचे तंत्रात त्या कधी राहिल्या नसत्या, यात संशय नाही.

परंतु आजपर्यंत ब्राह्मणांनी मोठी सावधगिरी केली की, कन्यांस विद्या शिकविली नाही. हे अनर्थ घरोघर आहेत. आईबाप शेकडो आहेत, किती एक दुःखाने विव्हळ आहेत; परंतु त्याचा उपाय त्यांस सुचत नाही. बरे, असे पहा की, पुनर्विवाह जे इतर लोक करतात ते काय ब्राह्मणांपेक्षा कमी आहेत?

कन्येचे दुसरे लग्न केल्यास ब्राह्मणास काय लहानपणा येईल? व त्यात काय लाज आहे? ब्राह्मणांनी सर्व धर्म कोठे चालविले आहेत? किती एक अधर्म करतात, त्यातच त्यांची गणना करून हे दुःख त्यांनी दूर करावे. यात काही अप्रतिष्ठा नाही, आणि यात काही अधर्म नाही, आणि असे केले, तर काही भ्रष्टाकार जाईल; परंतु हे त्यांचे मनात कधी येईल न कळे.

आज काळी तर वृद्ध लोक आहेत, त्यांची समजूत पडणे अवघड आहे, त्यांचे मन त्या दुष्ट बुद्धीशी बहुत दिवस राहून तन्मयच झाले आहे व तसेच अलीकडील जे लोक ते वृद्ध लोकांच्या समागमाने बसले आहेत. सांप्रत विद्या म्हणजे कागद लिहिता यावा व वाचता यावा, दुसरे त्यांस काही ठाऊक नाही. असे जरी अविचारी आहेत, तर ते नाक मुरडितात. त्यांचे कानी अशी गोष्ट पडली तर त्यांचे अंतःकरणास शस्त्र लागते; त्याचे त्यांस कारण पुसले तर सांगता येत नाही. त्यांस 'चाल' इतका शब्द मात्र ठाऊक, बाकी काही विचार नाही व ते सद्‌बोधास वाईट मानितात. तेव्हा जे गुजराथेतील रजपूत कन्या उपजताक्षणी मारतात, ते अधिक किंवा दक्षिणी ब्राह्मण जे आपले कन्यास दुष्ट कर्मात प्रवीण करतात आणि पुनर्विवाह करू देत नाहीत, ते अधिक, याचा न्याय करणे लोकांकडे आहे.

## लग्नाविषयी विचार

■

**पत्र नंबर १५**

सांप्रत काळी ब्राह्मण लोकांत स्त्रियांचे हाल व विपत्ती बहुत होतात व कन्या झाली म्हणजे लोक नाक मुरडितात. याचे कारणाचा विचार केला असता सहज कळून येईल. बहुधा मोठे गृहस्थाचे कुळात कन्या जन्मली म्हणजे त्यांस असे वाटते की, माझे घरात अवदसा शिरली, व जर कन्या मेली तर ते सुखी होतात. याचे कारण लोकांमध्ये काही मूर्खपणाच्या चाली आहेत. कच्छ देशात झाडीज रजपूत म्हणून एक जातीचे लोक आहेत, ते आपल्या कन्या मारितात. कारण की तसे न केल्याने खर्चवेच व नवरा पाहण्याची मेहनत पडते. दक्षिणी ब्राह्मण लोक आहेत हे तरी आपले कन्येविषयी बहुत अडचणी

भोगतात. त्या अडचणी आपले देशातून जातील तर लोक बहुत सुखी होतील.

(१) कन्यादान ब्राह्मणाहून इतर जातीशी करावे किंवा न करावे याचा विचार दुसरे वेळेस करू. परंतु इतकी तरी मोकळीक असावी की, देशस्थ किंवा कोकणस्थ वगैरे ब्राह्मणजातीचा वर असावा. अमुक एक जातीचा पाहिजे हे नसावे, म्हणजे मोठी अडचण दूर होईल व संबंध यथायोग्य होतील. किती एक लोक नवरा मुलगा श्रीमंताचा मिळत नाही म्हणून गरीब मुलास घरजावई करतात तसे करण्यास नको. व आईबापांस संकट पडणार नाही; व मुलीचेही कल्याण होईल. आणि तिचे जन्माचे दुःख सुटेल. हा एक लाभ.

(२)ज्योतिषी यांस लग्नासंबंधी काही एक पुसू नये. गणमैत्री, खडाष्टक आणि मुहूर्त हे पाहण्याची काही गरज नाही; येणेकरून फार अकल्याण होईल. चांगले सुस्थळ मिळावे व सर्व गोष्टी अनुकूल झाल्या तरी हे जोशी यांचा विध्वंस करतात; पहा बरे, आजपर्यंत ब्राह्मणांनी जोश्यांचे अनुमताने लग्ने केली तरी बहुत विधवा झाल्या आहेत. व बहुत विघ्ने आली आहेत. तेव्हा परिणाम पाहता या फुकट अडचणी वेडेपणाच्या आहेत. जोश्याचे नादी लागून लोकांनी आपला घात करू नये.

(३) मुलीचे लग्नास पैका खर्च करतात, तो आपले योग्यतेप्रमाणे व मिळकतीप्रमाणे करतात असे नाही. लोकांचे खुशीप्रमाणे करतात. हा मोठा मूर्खपणा आहे. लोकांचे संतोषाकरिता आपले धन उधळावे याचे कारण काय ? नेमका खर्च बेताप्रमाणे करावा हे उत्तम. फार पैसा खर्चिल्याने मुलीस काही नफा होतो असे नाही. व आईबापांसही नाही. त्यापासून चार लबाड व आळशी पोसतात इतके मात्र होते.

(४) मुलीचे लग्नास अमुक वय असावे हा नियम असू नये. आठ नऊ वर्षे मुलीस झाली म्हणजे आईबापांस काळजी पडते की, आता या पोरीचे लवकर लग्न केले पाहिजे; नाहीतर आम्हास लोक हसतील की, पहा यांनी आपली मुलगी केवढी वाढविली ? अजून लग्न नाही ! परंतु ही सर्व वेडेपणाची समजूत आहे; याचा बेत कशास पाहिजे ? लहानपण विद्या शिकविण्यात घालावे व पुढे सरासरी वीस वर्षांचे आत तिला कळू लागले म्हणजे तिचे व आईबापांचे संमतीने लग्न करावे. येणेकरून बहुत फायदे होतील. आजच्या काळात आईबाप मुलीची लग्ने जबरदस्तीने करतात म्हणून त्यांस आपली मुलगी आपले स्वार्थाकरिता विकावयास सापडते, हा केवढा जुलूम आहे बरे ?

आता किती एक म्हातारे पुरुष मरणास पात्र, ज्यांच्या तोंडात एकही दात राहिला नाही, डोळ्याने न्याहाळवत नाही, अंगावर सुरकुत्या पडल्या आहेत,

असे वयस्कर लोक आपल्यास तरुण स्त्रिया नऊ-दहा वर्षांच्या करतात. हा केवढा चमत्कार आहे! जर स्त्रियांना स्वसत्तेत लग्न करू दिले तर, अशा प्रेतरूप पुरुषांस त्या वरतील की काय? तेव्हा या चालीने फार वाईट होते व जे विद्या करण्याचे वय, ते सासऱ्यास राहण्यात व हाल सोसण्यात जाते व लवकर लग्नाचा संबंध झाल्यामुळे कोणतेही प्रकारे सुखावह होत नाही. आणि जनावराप्रमाणे मुली वाढतात, परंतु जी भये धरून लहानपणी लग्न करिता, तीच पुढे येतात. चुकत नाहीत.

(५) स्त्रियांचा पुनर्विवाह होत नाही. याजमुळे मुलीचे जन्माचे मोठे संकट प्राप्त होते. कारण तिचा नवरा मेला म्हणजे सर्वस्वी घात हाऊन ती आईबापांचे येथे येऊन राहणार; तेव्हा आईबापांस असे होते की, जन्मापर्यंत हिला आम्ही खायास घालावे त्यापेक्षा ही मेली तर बरे; कारण अन्न घालून तरी सुख नाही. तिचे विद्रूप आणि हाल इतकेच पाहावयाचे. आणखी सासरचे लोक म्हणतात की आमचा मुलगा मेला तेव्हा या रांडेचा पायगुण वाईट. मग ही कशास पाहिजे? असे म्हणून तिला वाईट कामे सांगतात, आणि अमेरिका खंडात गुलाम नेऊन त्यांचे हाल करीत होते, मारून काम घेत होते व त्यात तो मनुष्य मेला तरी फिकीर करीत नव्हते; तद्वत किंवा पृथ्वीवर एक लांब प्रदेश आहे, त्या स्थळी अशी चाल होती की, मनुष्यास मारून खावे व किती एक ठिकाणी अशी चाल होती की, कोणास मुलगी झाली तर तिला जिवंत पुरावे व आणखी एक ठिकाणी अशी चाल होती की, ज्याचे घरात जुळी जन्मतील त्याने आपली बायको गावकऱ्यास व पोरे रानातील जनावरास खाण्यास टाकावीत; अशा अनेक चाली पृथ्वीवर होत्या. व असे चमत्कारिक दुष्ट लोक पृथ्वीवर होते. मला वाटते, की पूर्वी दैत्य आणि राक्षस होते म्हणतात, ते असलेच लोक असतील. राक्षस म्हणजे मानवाचे शत्रू तेव्हा जे मनुष्याचे मांस भक्षितात ते राक्षसच होत. असे पूर्वी हिंदुस्थानात असतील व यावरून अशी कल्पना होते की, पूर्वी हिंदू लोक सीथिया देशातून हिंदुस्थानात आले त्या वेळेस त्यांस हे राक्षस इकडे आढळले, तेव्हा त्यांची वर्णने पुराणात त्यांनी लिहिली आहेत. अस्तु.

या दुष्ट लोकांपासून ही पृथ्वी आता निर्धूत होत चालली आहे व किती एक घातकी चाली लोक सोडीत चालले आहेत, परंतु असे हे रानटी लोक व हिंदू लोक जे आपल्यास मोठे थोर व सुधारलेले शहाणे म्हणवितात, यांनी अशा अनर्थकारक चाली पुढे चालवाव्या, हे मोठे आश्चर्य आहे.

पूर्वी परशरामभाऊ पटवर्धन यांची मुलगी विधवा झाली. तेव्हा त्यांनी

मार्तंड वगैरे पुस्तकांवरून असे ठरविले की, पुनरपि विवाह करावा; परंतु राज्यात नाना फडणीस मोठे शहाणे होते. त्यांनी त्यांस विघ्न केले आणि सांगितले की, ‘ तुम्ही असे करू नका. कारण एकाने केले म्हणजे सर्व करतील. ’ तेव्हा ते सिद्धीस गेले नाही. ही गोष्ट केवढी झाली; तत्राप त्यांचे लोक वर्णन करतात, आणि सांगतात की, पानसे हे तोफखान्यावरील सरदार होते. त्यांचे घरी सत्तावन्न बोडक्या होत्या. हे मोठे शहाणपण समजतात. परंतु मला वाटते की, हा मोठा अनर्थ आणि मनुष्ययज्ञ होय. पहिले लोक दांडगे होते, व बायकांस घरात कैदेत ठेवीत व पाहिजे तसे हाल करीत. त्यांची स्तुती काय करावयाची आहे ? वंशवृद्धी व्हावयाची तिचा नाश व किती एक जिवांस दुःख, यांचे कारण कोणाचे लक्षात न येऊन शंकराचार्यांस धर्माचे मोठे अध्यक्ष म्हणविता व शास्त्रीपंडित आहेत ते सर्व आंधळे, उंटाचे कतारीसारखे एकाच्या नाकात वेसण तो दुसऱ्याचे, तेव्हा ओढत ओढत चालतात. लोकांचे हित कसे होईल, याचा विचार करीत नाहीत. जर स्त्रियांचा पुनर्विवाह केला तर किती लोक सुखी होतील ! व मला खचित वाटते की, यामुळे एका जिल्ह्यात सरासरी शंभर बाळवध होत असतील. या मानाने पुण्यात व आसमन्तात प्रांती शंभर कोसात दोन तीन हजार लेकरे मारली जातात. मग कच्छ आणि काठेवाड येथील कन्याहत्त्या व हे सारखेच नव्हे काय ?

दक्षिणेतील ब्राह्मणाच्या विधवा पुत्र व कन्या या दोघांस एकंदरच मारतात; आवडनिवड करीत नाहीत. इतके असूनही लोक डोळे झाकतात आणि म्हणतात की, आमची चाल आहे व हिच्या जर विपरीत केले तर सर्व बुडेल; परंतु काय बुडेल, हे कोणी सांगत नाही ! कोणी म्हणतात की, अरेरे ! असे शास्त्र आहे व मनूने असे स्मृतीत लिहिले आहे. परंतु त्यांस मी एक प्रश्न करितो; मनूने असे ठरविले आहे की, ब्राह्मणाच्या स्त्रीने एक वेळ नवरा मेला तर पुनरपि लग्न करू नये, तिने आयुष्य तसेच घालवावे किंवा आपल्यास जाळून घ्यावे; परंतु मनु हा जर ईश्वरांश होता तर त्याने अशीही सत्ता पृथ्वीवर का प्रकट केली नाही की, जर आपण असे शास्त्र केले तर असेही करू की कोणे एकेही ब्राह्मणाचे स्त्रीचा नवरा मरणार नाही ? प्रथम स्त्री मरावी, नंतर नवरा मरावा; असा क्रम जर पृथ्वीवर घातला असता तर मी म्हटले असते की मनु ईश्वर होता व ब्राह्मण हे ठीक करतात. आणि मनु हा ईश्वर-अंश असे मी समजलो असतो. परंतु ज्यापेक्षा तसे नाही, मरावयाचे ते मरतात व जगावयाचे ते जगतात. त्याचा बंदोबस्त मनूच्याने काही होत नाही; शास्त्रे करून त्यांस लोकांस सांगावयास मात्र येते, घात चुकत नाही असे आहे, तर मग त्यांस

फिरविण्यास काय चिंता आहे ?

अहो, नवरा मरणे हे कोणाचे स्वाधीन नाही. ते ईश्वराधीन आणि स्त्री व नवरा यांचा संबंध संसारापुरता आहे. तेव्हा एखाद्या ब्राह्मणास मी जर सांगितले की, तुम्ही यज्ञोपवीत घेतले आहे, हे तुमचे अखेरीचे आहे. जर हे तुमचे अंगावर तुटले तर त्या दिवशी तुम्ही त्यासहवर्तमान जाळून घ्यावे किंवा आम्ही तुमचे पाच पट काढून तुम्हास विद्रूप करून जन्मपर्यंत तुमचे हाल करू व बोडकीप्रमाणे तुम्हास ठेवू; तर त्या ब्राह्मणास ते आवडेल काय ? तद्वत् स्त्रीचा नवरा तिला थोर व त्याचे आज्ञेत चालावे हा धर्म खरा. परंतु जर तो मेला तर काय उपाय आहे ? दुसरा वरावा हे ठीक आहे. याविषयी थोडके लिहिले आहे. पुढले प्रसंगी तपशीलवार लिहू.

## विधवापुनर्विवाहाविषयी

■

**पत्र नंबर १६ : ४ जून १८४८**

आपले लोकांत पुनर्विवाह चालू करण्यास फार अवघड नाही, परंतु मूर्ख लोकांची अडचण फार आहे. नाही तर मला खास ठाऊक आहे की, बहुतांचे मनात हा धर्म वागला आहे; व किती एक लोक या अनर्थकारक चालीस त्रासले आहेत. व आईबाप मुलीचे दुःख पाहून केवळ पोटात दगड घालतात.

ही दुष्ट रीती हिंदुस्थानात लोकांचे अज्ञानामुळे किती एक वर्षे चालली; परंतु राजाचा जुलूम फार झाला म्हणजे प्रजा दंगा करिते व कायद्याचा जुलूम झाला म्हणजेही लोक त्याचा त्याग करतात. तसे सांप्रत काळी बहुत लोकांचे मनात पुनर्विवाह करण्याचे आहे. परंतु शास्त्रीपंडित अनुकूल करण्यास पाच चार लाख रुपयांचे काम आहे. जर इतके कोणी देईल तर आता ही चाल चालू होईल. ब्राह्मणास एक एक शालजोडी दिली म्हणजे त्याजकडून कोणतेही कामास अनुमोदन देण्यास आळस होणार नाही; परंतु आजकाळी इतका मुब्बलकपणाने कोणी खर्च करील असा सामर्थ्यवान व शहाणा आपले लोकांमध्ये नाही. कोणी द्रव्यवान आहेत ते मूर्ख आहेत. त्यांना दिवस उजाडल्याची

व मावळल्याची शुद्ध नाही.

तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, ज्या लोकांचे मनात ही गोष्ट कर्तव्य आहे, त्यांनी एक सभा करून अनुमती घ्याव्या. प्रथमतःच पाच-चारशे संमती पडतील, यात संशय नाही. व असेच जागोजाग होईल. मग इतके लोक जमल्यावर त्यांस कोणी प्रतिबंध करणार नाही. सरकार तर अशा सुधारणुकीस अनुकूल आहे; किंबहुना आपले लोक जातीबाहेर टाकतील तर काय चिंता आहे? सांप्रत सर्व ब्राह्मण वगैरे हिंदू लोकांनाही इंग्रजास जातीबाहेर ठेविले आहे. म्हणून इंग्रजांचे काय कमी झाले? व ब्राह्मणांचे काय अधिक झाले? उभयतांचे सारखे आहे. मूर्ख लोकांचे मताप्रमाणे चालावे यात काही हित नाही. दोन हजार लोक एकत्र जमले तर ती एक प्रजाच होईल. तीस कोणाची गरज नाही. तिने ब्राह्मणांप्रमाणे धर्म आचरावे आणि पुनर्विवाहाविषयी मात्र सुधारणा करावी. आता त्याबद्दल मूर्ख लोक काय दोष देतील तो देवोत; परंतु अशा हितकारक सुधारणेस उशीर किमपि करू नये.

ही पुनर्विवाह करणारी जात उभी राहिली म्हणजे अर्थातच इतर ब्राह्मण त्यांस येऊन मिळतील व काही दिवसांनी सर्व एक होतील. पुनर्विवाह हिंदू लोकांचे सुधारणेचे मूळ आहे, व त्यात निम्मे सुधारणा आहे. व तेणेकरून फार लाभ आहेत. हे पाहून कोणा गृहस्थाची मुलगी विधवा झाली म्हणजे त्याचे मनात येईल की, आपले मुलीचा घात करावा आणि मूर्ख ब्राह्मणांचे जातीत राहावे, त्यापेक्षा सुधारक हिंदू जातीत का जाऊ नये? तेथे काय कमी आणि येथे काय जास्ती आहे? असे लोक पुष्कळ मिळतील. परंतु प्रथमतः करण्यास कोणी धजत नाही, हा वेडेपणा आहे. त्यात काही ब्राह्मणाचे बुडत नाही. व काही थोरपणा कमी होत नाही आणि धर्म बुडत नाही. परंतु त्यांनी वेडेपणाने धर्म, रीती, चाली, शास्त्र हे सर्व एकत्र केले आहे.

पहा, सांप्रत काळचे लोक इतके मूर्ख आहेत की, त्यांस चाल म्हणजे काय, असे कोणी पुसले तर ते म्हणतात की, अरे, चाल म्हणजे धर्म; परंतु त्यांस असे कळत नाही की, धर्म, चाल व शास्त्र ही सर्व वेगळाली आहेत. परंतु हे लोक इतके विद्वान व समजूतदार असते तर मूर्खपणाने स्वतःचे घातास का प्रवर्तक होते?

शास्त्र यद्यपि असेल की, स्त्रीचा पुनर्विवाह करू नये, तर शास्त्र हे कायदे आहेत व जे अनहितकारक कायदे असतील ते सोडून दुसरे करण्यास काही चिंता नाही. मला वाटते की मनुष्ये लवकर संपवावीत व लोक वृद्धिंगत होऊ नयेत, म्हणून स्त्रियांनी पुनर्विवाह करू नये, असे ठरविले नसेल ना?

ब्राह्मणांचे ताब्यात त्यांनी राहावे व आपला नवरा गेला, मेला, रुसला तर मला त्राता कोणी नाही, तस्मात् यांचीच आर्जवे करावी असे स्त्रियांस वाटावे, म्हणून ब्राह्मणांनी त्यांस आपल्या दासी करण्याकरिता आपले जाळ्यात त्यांस धरले. सर्व प्रजा व राजे इत्यादी त्यांनी आपले ताब्यात घेतले आहे. मग स्त्रिया तरी कशा सुटतील ?

ब्राह्मणांनी शास्त्र केले की, राजाने प्रथम ब्राह्मणांचे प्रतिपालन करावे, नाही तर त्याचे राज्यात वाईट होईल. परंतु असे लिहिले नाही की, राजाने सर्वांचे प्रतिपालन करावे. ब्राह्मणांचेच विशेष करावे, हे कशास पाहिजे ? याचप्रमाणे ब्राह्मणांची पोटे भरावी व त्यांचे महात्म्य राजापासून आपले स्त्रियांपर्यंत सारखे या भूमीवर राहावे व ब्राह्मणांचे कोठे न्यून पडू नये, यास्तव हे शास्त्र आहे. ब्राह्मणास मडकी द्यावी, फळे द्यावी, धान्याच्या राशी द्याव्या, इतक्या युक्ती याजकरिता केल्या की, त्यांस काही न्यून नसावे. परंतु या सर्व युक्ती लोक अज्ञान व ब्राह्मण मात्र शहाणे होते, तेव्हा चालल्या. आता ज्ञान सर्व ज्ञातीत प्रसृत झाले आहे, म्हणून आता या तजविजी सर्व व्यर्थ होतील. आणि ब्राह्मण व इतर जात सारखीच होईल.

जो विद्वान तोच ब्राह्मण; जो शूद्राचे आचरण करितो तो ब्राह्मण कशाचा ? असे होऊन भेद आहे तो अर्थातच निघेल व जुने शास्त्र स्त्रियांस दासी करण्याकरिता केले ते फिरेल. ब्राह्मण पहिले भिकारी व रानात राहणारे होते, त्यांस खावयास मिळावयाचीही भ्रांत होती व स्त्रियांस सुखप्रद काही नव्हते, म्हणून त्या नाखूष राहून कदाचित पळून जातील किंवा त्यांस कोणी घेऊन जाईल, यास्तव हे अवघड शास्त्र केले आहे की, स्त्रीने सती जावे, नाही तर पुनर्विवाह करू नये, विधवा जन्मपर्यंत असावे व विद्रूप व्हावे. अलंकारशून्य असावे व दोनदा जेवूही नये. याचे तात्पर्य पहाल तर (एक) पुनर्विवाह करू नये; या आपले हितार्थ ब्राह्मणांनी शास्त्र केले; व त्यापासून हे सर्व उत्पन्न झाले. पुन्हा लग्न करू नये म्हटले. तेव्हा अर्थातच स्त्रिया व्यभिचार करतील; पण त्यांस वरण्यास कोणा पुरुषाची इच्छा होऊ नये म्हणून केश काढून बोडक्या करण्याचे शास्त्र केले, म्हणजे त्यांस कोणी पुरुष अनुकूल होणार नाहीच. हे तात्पर्य. असो.

हे सर्व जुलूम आहेत व स्त्रियांस विद्या शिकवू नये म्हणतात. याचेही कारण हेच आहे की, त्यांनी जर शास्त्राभ्यास केला तर त्या विरुद्ध गोष्टीस प्रतिकार करतील. सारांश, एकदा मनुष्य जसा स्वतंत्र कारभार करण्यास इच्छितो व मध्ये दुसरा कोणी असेल तर त्यांस हाकून देऊन आपण एकटे बसावयाचे करितो तद्वत् पहिले ब्राह्मण होते. त्यांचा असा मतलब की आपली बरोबरी

कोणी करू नये; म्हणून त्यांनी कायदा केला की, शूद्रांनी व स्त्रियांनी पोथी उघडू नये. व जर त्यांस काही शास्त्र पहावयाचे असेल तर त्यांनी ब्राह्मणांचे मुखांनी ऐकावे. ज्या वेळेस हे कायदे केले त्या वेळेस तरी लागलेच लोकांनी हे ग्रहण केले असतील असे म्हणवत नाही. बहुत कालेकरून पहिले लोकांची योग्यता मोठी, असे समजू लागले. मग जसजसा तो जुना होतो तसतसे लोक त्याचे भजन करतात व अगदी आंधळे होतात. अस्तु.

स्त्रियांचे हाल विपत्ति, जनावराप्रमाणे अवस्था, ज्ञानशून्यता व पुरुषांची क्रूरता प्राचीन शास्त्राधारे बहुत दिवस चालली, पण आता तरी हा ईश्वरी क्षोभ जावो आणि जसे पुरुष तशा स्त्रिया आहेत, असे आंधळ्या हिंदू लोकांस समजो, ही माझी अतिशय इच्छा आहे, तर जे सुधारक हिंदू असतील त्यांनी या कामास निर्भयपणाने प्रारंभ करावा.

## स्त्रियांची स्थिती

**पत्र नंबर ३० : ८ आक्टोबर १८४८**

सांप्रत काळी हिंदू लोकांचे स्त्रियांची अव्यवस्था व दुर्दशा फार आहे. स्त्रिया पुरुषांवर अमल करीत असतात व त्याचे स्वभावाप्रमाणे बहुत लोकांस वागावे लागते. त्यांचे गुण लहान मुलांस प्राप्त होतात. त्याजमुळे स्त्रिया शहाण्या असणे जरूर आहे. ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत त्या देशात लोकांची स्थिती वाईट असते. हिंदू लोकांत फारच मूर्खपणा आहे; यास्तव स्त्रियांची दुर्दशा फार आहे. प्राचीन काळी असे नव्हते.

कारण मागील काळचे कथेवरून पाहिले असता असे दिसते की, पूर्वी हिंदू लोकांत स्त्रियांचा मान फार होता. हल्ली लग्नात स्त्रिया पुढे चालतात व मागे पुरुष असतात, व पुण्याहवाचन वगैरे धर्मसंबंधी काही एक कर्म स्त्री बरोबर बसल्यावाचून होत नाही. याजवरून स्त्रियांचा प्रमुखपणा मानला आहे असे दिसते. राज्याभिषेकामध्येही राणीस मान फार आहे.

आता ब्राह्मणांच्या समजुती आहेत, त्या पूर्वी असत्या तर शास्त्रात प्राचीन ब्राह्मण असे न लिहिते. तेव्हा आता स्त्रियांचा अपमान होण्यास कारण काय,

याचा शोध लाविला असता असे दिसते की, हिंदुस्थानात इंग्रज येण्याचे पूर्वी मुसलमान आले, त्यांस सांप्रत आठशे वर्षे जाली. तेव्हा त्या लोकांच्या रानटी चाली फार होत्या. त्या सर्व हिंदू लोकांस लागल्या. म्हटले आहे की, "यथा राजा तथा प्रजा" व "राजा कालस्य कारणम्" असे भारतात आहे. हिंदू लोकांच्या सुंदर स्त्रिया पाहून मुसलमान जबरीने घेऊन जात, याजमुळे स्त्रियांस झाकून ठेवणे जरूर झाले व मुसलमान लोक फार मूर्ख आहेत; त्यांची चाल जनानखाना तुरुंगासारखा असावा अशी आहे, तीच चाल हिंदू लोकांस लागली आहे. मुसलमान लोक यांचे राज्य पाचशे वर्षें हिंदुस्थानात चालले. त्यामध्ये हिंदू लोकांची स्थिती फार बदलली, भाषा बदलली, फारशी शब्द चालू झाले. जमाखर्च, हिशेब, गाणे, रीतभाती सर्व मुसलमानांच्या चालू झाल्या. पूर्वी संस्कृत सनदा देण्याची चाल होती, ती जाऊन फारशी सनदा देऊ लागले. पेशव्यांचे राज्य होते तरी त्या वेळी हिंदू लोकांस मूळचे स्थितीस आणावयाचा प्रयत्न कोणी केला नाही. जास्ती जास्ती घसरतच गेले. हिंदू लोक ताबूत करू लागले. फकीर होऊ लागले. धर्मभ्रष्ट झाले. त्याजमुळे हिंदू लोक स्त्रियांचा अपमान करून त्यांस जनावराप्रमाणे मानू लागले. पूर्वी रामाबरोबर सीता सभेत बसत होती. पांडव द्रौपदीसहित बसत होते. पण लोकांची मने आता इतकी बिघडली आहेत की, जर त्यांस हे सांगितले, तर ते देव होते, असा जबाब देतात; परंतु असे लक्षात आणीत नाहीत की, ती माणसेच होती. देवांनी अवतार घेतले तरी माणसांचे चालीप्रमाणे ते वागले. तेव्हा त्या वेळच्या मनुष्याच्या चाली तशाच होत्या. त्याप्रमाणे आताही चालावयास चिंता नाही. आणि हिंदू लोकांच्या मूळच्या चाली त्याच आहेत. परंतु हल्ली त्यांस ही गोष्ट मोठी वाईट वाटते व इंग्रज लोकांत स्त्रियांचा मान ठेवण्याची चाल आहे, हे त्यांस मोठे आश्चर्य वाटते व ते म्हणतात की, हा फार निर्लज्जपणाचे व्यभिचारवृद्धीचे कारण आहे.

परंतु हिंदू लोकांस शहाणपण नाही. व त्यांचे मन हल्ली मूर्खपणाने, दुष्ट बुद्धीने व वाईटपणाने इतके भरले आहे की, ते शुद्ध होण्यास हिंदुस्थानात ज्ञानाची फार प्रसृती झाली पाहिजे व लोक सुधारले पाहिजेत व पूर्वीचे मूर्ख वृद्ध लोक आहेत ते सर्व मेले पाहिजेत. जेव्हा नवीन प्रजा शहाणी व पुष्कळ होईल तेव्हा लोकांच्या रीतीभाती बदलून चांगल्या होतील यांत संशय नाही. परंतु त्यांस किती एक वर्षे पाहिजेत.

ज्ञान म्हणजे काय; हे लोकांस ठाऊक नाही. इंग्लंडातील थोरली सनद, पार्लमेंट, फराशीस यांची राज्यक्रांती, रूमचे राज्याचा नाश, अमेरिका खंडात

युरोपियन लोकांची वस्ती, लोक सत्तात्मक राज्य या शब्दांचा अर्थही बहुत हिंदू मनुष्यांस ठाऊक नसेल. हे इतिहास इकडे प्रसिद्ध होण्यास बहुत दिवस पाहिजेत. हल्ली ज्यांस लिहिता वाचता येते ते शहाणे, र, ट, फ करता येते ते बोलणारे, व दंगालूट झाली म्हणजे ती राज्यक्रांती, इतके या देशातील लोकांस ठाऊक आहे. पृथ्वीवर काय आहे व लोक कसे आहेत, याविषयी त्यांस काही कळत नाही. पुराणिक एक पोथी सोडून बसला म्हणजे सर्व आनंदाने डोलतात व रावणास दहा डोकी व सहस्रार्जुनास हजार हात, पृथ्वीचा अंत नाही, उत्तर समुद्राचा ठिकाण नाही, दुधाचा व दह्याचा समुद्र आहे व पृथ्वीवरील काही देशांत घोडमुखी माणसे आहेत, इत्यादी गोष्टी ऐकल्या म्हणजे सर्व आनंदाने डोलतात, बायका फार खूष होतात व पुरुष म्हणतात की, आम्ही आज मोठे ज्ञान संपादन केले. त्यांस असे ठाऊक नाही की, चमत्कारिक परंतु या खोडसाळ गोष्टी दहा-पाच हजार वर्षांपूर्वी लिहिले गेले आहेत. तर हल्ली पृथ्वीची स्थिती कशी आहे व तिजवरील राजे कसे आहेत व समुद्र कसा आहे. व लोक कसे आहेत याचा विचार केला पाहिजे, म्हणजे खरे ज्ञान वाढेल. केवळ लहानपणचा अंगरखा व मोठेपणाचा अंगरखा सारखा नाही. तेव्हा व्यास व वाल्मीक यांनी ग्रंथ लिहिले त्यापुढे अलीकडे कोणी ग्रंथ लिहिले नाहीत व शोध केला नाही. तेव्हापासून हिंदू लोक स्वस्थ निद्रेत आहेत. त्यांची बुद्धी पुढे चालण्याची बंद झाली.

परंतु इंग्रज वगैरे लोक यांनी उद्योग चालविला व त्यांनी नवीन ग्रंथ पुष्कळ केले. ते पाहिल्यावाचून हे लोक समजणार नाहीत. मागील पेशवाईतील जे शहाणे आहेत, ते म्हणतात की, त्यात आहे काय? इंग्रजांचा लाभकाळ होता म्हणून हे इकडे आले. त्याजवळ आमच्यापेक्षा जास्ती शहाणपण काही नाही. त्यांस जर कोणी वेडे म्हटले तरी त्यांस फार राग येतो आहे. हे उत्तर करतात की, आम्ही पेशवाईत लाखो रुपये मिळविले व फौजा बाळगिल्या, त्या आम्ही मूर्ख म्हणून बाळगल्या नाहीत. आणि आताचे लोक, नवीन ज्यास काही ठाऊक नाही, ते आम्हास वेडे म्हणतात, यास काय म्हणावे? आमचे नशीब असते तर आम्हांस कोणी वेडे म्हणते ना. परंतु आमचे नशीब वाईट म्हणून आमची शहाणपणे अदृश्य झाली आहेत, असे ते म्हणतात.

वास्तविक पाहिले तर, पहिले जुने लोक आहेत ते शुद्ध बैल आहेत. त्यांस खाण्याचे व पिण्याचे मात्र ज्ञान आहे. व ते जनावरासारखे कर्म करतात. परंतु माणसासारखे काही करीत नाहीत व त्यांस काही ठाऊक नाही. मोठ्या प्रमाणात तोंड घालावयाची देखील त्यांस योग्यता नाही. व इंग्रज कोठले, हे

काही त्यांस ठाऊक नाही. व इंग्रजांनी अलीकडे ज्ञान किती वाढविले आहे. याची त्यांस खबर नाही. अन्नवस्त्र इतक्यापर्यंत त्यांची समजूत आहे. जास्ती काही नाही. जेव्हा सगळे मूर्ख होते तेव्हा त्यातच ते पराक्रमी झाले.

परंतु आता नवीन मंडळींत ते मूर्खासारखे दिसतात. कारण की, इंग्रजांचे योगाने हिंदुस्थानात बहुत प्रकारचे ज्ञान वाढले आहे व ते जाणे संपादले त्यासच त्याची गोडी; इतरांस नाही. तेव्हा या जुन्या मंडळींचा गर्व व्यर्थ आहे. त्यांनी असे समजावे की, आम्ही शहाणे, असे म्हणून नवीन लोकांची निंदा करू नये. कारण की, त्यांची अक्कल आता सर्व उजेडात आली. व ते पूर्वी लंगड्या गाईत वासरू प्रधान म्हणून शहाणे होते, परंतु आता नाहीत. त्यांजमध्ये पराक्रम, विद्या व शौर्य नाही. लिहिण्यावाचण्याची भ्रांति. प्रवास ठाऊक नाही. व लढाईची कला ठाऊक नाही; मग त्यांनी गर्व कशास करावा ?

हल्ली पुण्यात जे गृहस्थ आहेत त्यांच्या अवस्थेचा विचार व त्यांचे शहाणपण पाहिले म्हणजे सर्व हिंदू लोकांचा वृत्तान्त कळतो. जसा कोणी मेला म्हणजे त्याचे नावे वृषोत्सर्ग सोडतात; तशी मराठ्यांची राजधानी गेली आणि बाजीरावाचे नावाचे इंग्रजांनी पोळ सोडले म्हणजे इंग्रजांनी कोणास जहागिरी व कोणास पेनशने दिली आहेत ती ते खातात आणि पोळासारखे फिरतात. याचप्रमाणे सर्व हिंदू लोकांची ज्या ज्या ठिकाणी संस्थाने आहेत व जेथे ब्राह्मणांस खाण्याची सोय आहे, तेथे असेच आहे, पहा ! लोक किती धुंदीत आहेत ? किती आपले ठिकाणी गर्वात आहेत ? राज्यात काय होते याचा त्यांस ठिकाण नाही.

सांप्रत पुण्यात पुस्तकगृह आहे. पण त्यात कोणी जुन्या लोकांपैकी किंवा ज्याजवळ खाण्यापुरता पैका आहे तो येत नाही. असे अलीकडील ब्राह्मण आहेत. कोणास ज्ञानाची आस्था आहे. असे नाही. मग इतर लोकांची अवस्था काय पहावयाची आहे ? अशा समयी स्त्रियांची अवस्था सुधारणे अवघड आहे. बहुतकरून आणखी दोनशे वर्षे, निदान शंभर वर्षें, तरी पाहिजेत, तेव्हा हे लोक जागृतीत येतील. आता हे लोक आहेत त्यांच्या दोन चार पिढ्या झाल्या पाहिजेत व ज्ञान वाढले पाहिजे. पुरुष शहाणे झाले म्हणजे अर्थातच स्त्रिया शहाण्या व ज्ञानी होतील. अल्पवयात लग्न आणि जन्मपर्यंत विधवा रहाणे, या दुष्ट चाली मोडल्याखेरीज काही एक सुधारणा व्हावयाची नाही.

✦ ✦

# पुनर्विवाह

पत्र नंबर ७० : ६ आगस्ट १८४९

ब्राह्मण लोकांच्या विधवा पाहून फार हळहळ वाटते. त्यांस कोणता उपाय करावा? हे ब्राह्मण तर स्वहितास आंधळे, म्हणून पुनर्विवाह करू देत नाहीत. प्रत्येकाचे घरी विधवा नाही, असे नाही. आणि किती एकांच्या कन्या अशा लहानपणी विधवा झाल्या आहेत की, त्यांस नवरा म्हणजे काय, ते ठाऊक देखील नाही आणि त्यांचे पुन्हा लग्न नाही; हा केवढा जुलूम आहे!

हे सर्व शास्त्री, जुने लोक मेले म्हणजे हे लौकर होईल. सांप्रत अडचण आहे. किती एक पोरी व्यभिचारी निघतात. पोरे मारतात पण त्यांस लग्न करून नांदिवल्या तर फार चांगले होईल. हजारो जीव मरतात आणि दुःखी होतात आणि बोडकी झाली म्हणजे तिचे हाल करतात. तिला जेवावयास कमी घालितात; सर्व प्रकारे तिचे हाल. तिला हजामत करविण्याची लज्जा. तात्पर्य, सर्व गोष्टी तिला प्रतिकूल होतात. जी आज सुंदर सौभाग्यवती दिसते, तीच उद्या केशरहित, अलंकाररहित होते आणि तिचे तोंड पाहिले तर देखील वाईट म्हणतात. तेव्हा विधवांचा अपमान केवढा होतो! त्यांजला असे वाटते की, आमचा जीव व्यर्थ; जन्मास येऊन सुख नाही. आमचे तोंड पहात नाहीत. लग्नकार्यास आम्ही कामास नये. बरे आम्हास दुखणे लागले तर सर्व इच्छितात की, मरतील तर बऱ्या. आम्हाला लुगडी घ्यावयास कोणी नाही. स्त्रियांस नवरा म्हणजे त्यांचा भर्ता व सोबती. ईश्वराने त्यांस निर्बल केल्या आहेत. त्यांस पुरुषांचा आश्रय असला म्हणजे त्यांस मोठे बल असते. परंतु ते बल त्यांचे दैवाने गेले तर त्यांनी काय करावे? तथापि त्यांस पुन्हा नवरा करण्याची परवानगी नाही. हा शास्त्राचा अतिशय जुलूम आहे.

मला वाटते की, असे निर्दय, मूर्ख आणि आंधळे लोक या चारी खं पृथ्वीत नसतील आणि कोणत्या तरी शास्त्रावरून असा जुलूम दुनियेत झाला नसेल! बायका अगदी गरीब; त्यांस अबला असे म्हणतात. आणि त्यांची अवस्था अशी करतात, हे कोठे फेडतील? आजपर्यंत बायका किती जाळिल्या आहेत? अजून जिवंत किती जाळितात? याविषयी कोणी दुष्टाभिमान धरून एकदम सर्वजण एकत्र होऊन हे कार्य करावे. तुम्ही न कराल तर सर्व लोक कधी तरी करतीलच; यात संशय नाही. परंतु यश घ्याल तर बरे आहे. इतके

दिवस तुम्ही स्त्रियांस या देशांत दुःखात घातल्या; अजून तरी त्यांस तुमच्या ब्राह्मणी पाशापासून सोडवावे.

मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो, ब्रह्मदेवाचे का असेना; " बुद्धिरेव बलीयसी, " असे आहे. त्यापेक्षा तुम्ही जे उघड पहाता त्यांचा बंदोबस्त शास्त्रात नाही म्हणून करीत नाही, हे योग्य नाही. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा, विचार करून पहा. घातक वचनावर हरताळ लावा. हा प्रसंग तुम्ही कसा जाणत नाही? मी तुम्हा सर्वांस असे म्हणतो की, तुम्ही आपल्या मुली व बहिणी विधवा पाहता तेव्हा तुम्हास लाज वाटत नाही काय? त्यांस सुखी करण्यास तुम्हास सामर्थ्य आहे, परंतु तुम्ही करीत नाही, हा मूर्खपणा आहे.

तुम्ही आजपर्यंत बायकांचे शाप घेतलेत. व पुढे घेता, त्याचे झाडे कोठे द्याल? अहो, जिचा नवरा मरतो तिचा अधःपात होतो, ती दुःखी होते; आणि तुम्ही तशा अवस्थेत निर्दयपणाने तिचे केश काढिता, आणि तिचे अंगावरचे दागिने काढून घेता हा काय धर्म आहे? आणि तुम्ही असे म्हणता की, तिचे दैव वाईट म्हणून तिचा नवरा मेला; परंतु तुम्ही दुष्ट म्हणून तिला दुसरा नवरा करून देत नाही. दुर्दैवी मनुष्याशी दुष्टपणा करणे हे फार नीचपणाचे काम आहे. बायकांचे नवरे प्रारब्धाने मरतात. त्यांस दुसरा करण्यास मना करता, आणि हा धर्म आहे असे समजता! हा धर्म कशाचा बरे? धर्मशास्त्र हा केवळ कायदा आहे. व्यावहारिक गोष्टी करता त्यातील एका वाक्यास हरताळ लावली म्हणून काय झाले?

आणि लोक तरी कोठे आता धर्मशास्त्राप्रमाणे चालतात? किती एक चालत नाहीत. अधर्म करतात. असे तुमच्या डोळ्यांपुढे असून तुम्ही आपल्या बहिणींची व पोरींची बुद्ध्या घरे बुडविता, हे तुम्हास कसे बरे वाटते? नाही. तुमच्या पोरीची दया तुम्हास येत नाही. तुम्ही आपल्या पोटात दगड कसे घालता? याजकरिता माझे ऐका, आणि स्त्रियांस पुरुषांसारखे अधिकार आहेत असे ठरवा आणि हा धर्म चालू करा. स्त्रियांनी विद्या करावी. जाणतेपणी पुरुषाचे व स्त्रीचे लग्न व्हावे हे चांगले. आणि जिचा नवरा मरेल तिने खुशी असल्यास दुसरा नवरा करावा. म्हणजे तुम्ही फार सुखी व्हाल. लग्न लवकर करून पोरांचे आयुष्य संपविता व प्रजा निर्बल व भिकारी करता, आणि विधवांस दुःख देऊन हाल करता, याची पारणी कोठे फेडाल?

आता पुरे करा. आजपर्यंत विधवा जाळिल्या तितक्या पुरे करा. तुम्ही म्हणाल की, इंग्रज लोकांनी जशी सती बंद केली, तसेच हेही करावे. परंतु

विधवांची लग्ने करावयास इंग्रज इकडे आले नाहीत. तुमची तुम्हास खबर नाही. मग त्यांस कशास असावी! ते दूरचे लोक. तुम्ही मेलेत तर त्यांस सुतक येणार नाही, हे ध्यानात धरा.

✦ ✦

## लग्ने

■

**पत्र नंबर ९०**

हिंदू लोकांमध्ये लग्नसंबंधाविषयी विचार केला तर पृथ्वीवर असे कोणतेही लोक नसतील. (प्रथम) मुलीस तर मुदतीचा कायदा लावून दिला आहे. पूर्वीचे कायदे करणारे ऋषी यास लग्नाची फार घाई असे आणि त्यांचे मनात मुलीस त्वरित देऊन टाकाव्या व कोणीकडून तरी लग्न होऊन प्रजावृद्धी व्हावी, अशा धोरणाने त्यांनी ठरविले की, आठ वर्षांचे आत मुलगी दिली तर उत्तम. निदान दहा वर्षांचे आत तर मुलगी दिलीच पाहिजे. यामुळे वर हाणे प्रशस्तपणी होत नाही. जशी खताची मुदत जाऊ लागली म्हणजे कोणी तरी वकील पाहून, फिर्याद लावून टाकावी, मग काही होऊ; तसे आठ वर्षांची मुलगी झाली म्हणजे बापास तातड लागते.

(दुसरे), अशी त्वरित लग्ने केल्यामुळे मुलीस विद्याभ्यास होत नाही. (तिसरे), लग्नास मुहूर्त पाहतात व जातक पाहतात त्यात गुणाकार, भागाकार कमीजास्ती समविषम आला म्हणजे एकनाड, खडाष्टक वगैरे येऊन पटत नाही, असे म्हणतात. यामुळेही चांगले वर टाकावे लागतात. (चौथे,) गोत्र प्रवर एक असू नये, म्हणून ठराव आहे. त्यानंतर (पाचवी,) अडचण अशी आहे की देशस्थ, कोकणस्थ, यजुर्वेदी, ऋग्वेदी, कण्व, माध्यंदिन, गुजराथी व दक्षिणी ब्राह्मण इत्यादी हजारो भेद आहेत. त्यामध्ये विवाह-व्यवहार होत नाही. अशा अनेक अडचणी घालून त्यापासून फल कोणते झाले म्हणाल, तर सुंदर रत्नासारख्या मुलींची धुळधाणी आणि दुर्दशा झाली. बरे, इतक्या अडचणीतून त्यांस बरावाईट नवरा मिळाला व तो देवी, गोवर, जरीमरी इत्यादी रोगांनी मारला, तर ती बिचारी जन्मपर्यंत विधवा. तिकडून सासरा, दीर, सासू, जावा यांनी म्हणावे की, करंटी अवदसा नवरा मारून तोंड कशाला दाखवते? बाप आपले घरी

का ठेवीना? बरे इकडे माहेरी यावे तो भाऊ, बहिणी म्हणतात, आमचे घरी तुझे काय आहे! इथे कशाला येतेस? बरे, रस्त्यात फिरले तर लोक म्हणतात की, बोडकी पुढे आली. आता पुढे पाऊल कसे टाकावे? त्याप्रमाणे त्या पोरीने आपली तिन्ही वये काढावी लागतात.

बरे, कोणाचा आश्रय करावा तर तेथे तरी टीका होते की, रंडकीमुंडकीस तूप-दही कशास हवे? गादी निजावयास कशास हवी? तेव्हा तिने बैराग्यासारखे संसारात राहून दिवस काढावे लागतात. याप्रमाणे खाटिकाचे घरी मेंढराचीही दुर्दशा नाही. तो त्यांस एक वेळ सुरी लावतो. त्या वेळेस मात्र काय दुःख होते तेवढेच. परंतु तेथपर्यंत तो हाल करीत नाही. आणि हे हिंदू लोक किती दुष्ट आहेत की, जे आपल्या स्त्रियांची अशी दुर्दशा करतात, त्यांस जगात तरी कोठे दुसरी तुळणा मिळेल की काय? यास्तव या सर्व अडचणी मोडून स्वयंवर व्हावे, हेच प्रशस्त आहे. स्वयंवर होऊ लागले म्हणजे बाकीच्या अडचणी सर्व आपल्या आपण जातील आणि लग्न हे ज्याचे त्याचे काम आहे. त्यात इतरांनी पडणे अयोग्य आहे. बाप जरी झाला तरी त्याने लग्नाचे काम मुलीचे इच्छेवर व मुलाचे इच्छेवर ठेवावे, हे योग्य.

परंतु अज्ञानी लोकांस दया नाही व स्वजातीचा कळवळा नाही. अज्ञानाने ते आपले मुलीविषयी व बहिणीविषयी खाटकाहून खाटीक होऊन गेले आहेत. आता ते बुद्धिपुरस्सर असे झाले नाहीत व त्यांस इतर कामात माणसाची तर काय परंतु जनावरांची देखील दया आहे. परंतु अज्ञानाचा जोर मोठा, म्हणून स्त्रियाकरिता असा दुष्टपणा होतो. आता हा जरी त्यांनी बळेच किंवा बुद्ध्या केला नाही तरी स्त्रियांस फळ सारखेच आहे.

(दुसरे) लग्नास विनाकारण खर्च करतात; आणि लौकिक संपादन करतात व भटा-भिक्षुकांस गावयास गोष्टी पुष्कळ होतात. परंतु लग्नाचे खर्चाचे जुलुमामुळे हजारो लोकांस कर्ज होऊन ते दरिद्री झाले आहेत. शास्त्राप्रमाणे लग्न पाच रुपयांत होईल. परंतु त्याचा लौकिक इतका वाढला की, दहा रुपये महिन्याची ज्यास प्राप्ती आहे, त्यांस दोनशे रुपये खर्चास पाहिजेत. उभय पक्षांची समजूत पडत नाही. दोघेही खराबीस येतात. मनुष्याचे पोटाचे कर्ज इतके होत नाही. कारण नित्यापुरते मनुष्य मिळवितोच. परंतु एकदम दोनशे रुपये कर्ज केले, म्हणजे त्याचे व्याजदेखील सावकाराचे फिटत नाही. असे किती कर्जभरी झाले आणि किती कुळंबी खर्चाचे पेचात आले. याचा दीर्घ विचार केला तर हा मोठा अनर्थ आहे, असे दिसते. परंतु याजविषयी लोक काही विचार करीत नाहीत. पाच रुपयांत सर्व लोक लग्ने करितील, तर कर्ज होण्याचे मूळच उपटून

जाईल.

पूर्वीचे ऋषी वगैरे शास्त्र करणारे होते, त्यांनी ही मोठी चूक केली की, मुलीचा विवाह स्वच्छंदाने व्हावा, तो न होऊ देता जबरदस्तीने करण्याची चाल घातली. तिच्यापासून होणारे अनर्थ आता अगदी स्पष्ट दिसू लागले आहेत. तरी नियम लोक फिरवीत नाहीत. मागाहून शास्त्राचा ओघ पाहिला तर जुने नवे होत आलेच आहे. हजारो शास्त्रांचे नियम ऋषींनी फिरविले आहेत. परंतु लोक असे म्हणतात की, हे ऋषींनी केले. आता ऋषी कोठे आहेत ?

परंतु मी त्यांस पुसतो की, ऋषी म्हणजे काय ? जे ग्रंथकर्ते त्यांसच ऋषी म्हणतात. आपण नवे ग्रंथ केले तर आपण ऋषि होऊ. कायदे करणे हे तर राष्ट्राचे काम आहे. कोणी जर असे म्हणेल की, लहानपणी माझी आई मला बाळकडू पाजीत होती आणि आता मी म्हातारा झालो आहे व मला अर्धांगवायू झाला आहे; तर मी औषध कसे घेऊ ? माझी आई कोठे आहे ? तर त्या वेड्यास लोक हसतील की नाही ? आई मरून बहुत वर्षे झाली. पण आता रोग झाला तर वैद्याकडून जे औषध मिळेल ते घ्यावे. तद्वत् आता मरून गेले ते ऋषी कोठून आणावेत ? आपण ऋषी होऊन शास्त्र यथायुक्त असेल ते ठरवावे, हेच योग्य. सांप्रत इंग्रज सरकार दर दिवशी नवे कायदे करतात. त्यावरून सर्व व्यवहार, राज्यकारण व फौजेचा बंदोबस्त होतो. आणि लग्नाकार्याविषयी क्षुल्लक ठराव आपण केले तर चालणार नाहीत की काय ?

परंतु या लोकांत कोणी चांगला पुढारी सुधारणा करणारा नाही व जरी कोठे असला तरी लोक इतके हलके स्थितीस आले आहेत की, त्याचे ते ऐकणार नाहीत. पूर्वी शंकराचार्य, भास्कराचार्य इत्यादी झाले, त्याचे ग्रंथ लोकांनी मान्य केले. परंतु अलीकडे अज्ञान फार दृढ झाले आहे, सांप्रत हे लोक शिकविण्याचे स्थितीत नाहीत. यास्तव यांचा पुढारीपणाही कोणी घेत नाहीत. जसे लहान अर्भकास पंतोजी शिकवील. परंतु अगदी इस्पितळात वेडे आहेत, त्यांस कोणी उजळणी शिकवू शकेल की काय ?

## पुनर्विवाह

■

**पत्र नंबर ९९**

जो दिवस उजाडतो, त्या त्या प्रत्येक दिवशी असे अनुभवास येते की, ब्राह्मण जातीत स्त्रियांचा पुनर्विवाह त्वरित चालू करणे जरूर आहे. ही जात हतभाग्य आहे, याजमुळे आपली सुधारणा हे समजत नाहीत व त्यांचे प्रारब्धी अजून पुढे किती एक दिवस महान दुर्घट भोक्तृत्व आहे, यास्तव त्यांचे बुद्धीस हे कर्तव्य अजून स्पष्ट दिसले नाही.

जशी बहुत काळाची ग्रंथी असते, ती लवकर सुटत नाही. तद्वत त्यांची बहुतकालिक ही समजूत पडली आहे, ती त्यांचे बुद्धीचा त्याग लवकर करीत नाही. दृढपणाने चिकटून बसली आहे. ती इतकी की, जरी मोठाले षड्शास्त्रपंडित, ज्यांची बुद्धी व विचार चपळ झाले आहेत व युक्तिप्रयुक्ती त्यांस सांगता येतात, परंतु पुनर्विवाहापासून नफा काय आहे, येविषयी त्यांची बुद्धी केवळ शून्य असोन अंतःकरण निर्दय व क्रूरकर्मी प्रवृत्त झाले आहे.

ब्राह्मण लोकांमध्ये लग्नाची घाई बहुत करतात. याजमुळे किती एक मुलगे व मुली आठ वर्षांच्या देखील विवाहित होतात. आणि पुढे दोनचार वर्षांचे आत विपरीत गोष्ट घडून भर्ता निधन पावतो. त्या काळी वास्तविक पाहिले, तर त्या स्त्रीस आपली जाती किंवा नाते कळत नाही. केवळ बाल, अज्ञान आणि परस्वाधीन अशी व्यवस्था तिची असते; परंतु पुनरपि तिचा विवाह करीत नाहीत. आणि मायबाप आपले मन क्रूर व निर्दय, दृढ पाषाणवत् करून स्वकन्येची विपत्ती पाहतात. ती विपत्ती एक पर्यायाची नाही; परंतु अनेक पर्याय त्यात असतात. ते ब्राह्मणास विदित आहेतच. आणि जामात मेल्याचे दुःख सर्वांहून ब्राह्मणास अधिक आहे.

कारण की कन्येस प्रारब्धयोगाने पती नाहीसा झाला, हे एक; खर्चवेच झाला तो व्यर्थ गेला, हे दुसरे. ही दोन दुःखे आहेत. जरी पुनर्विवाहप्रवृत्ती चालू झाली, तथापि ही चुकणार नाहीत. याशिवाय, ब्राह्मणांच्या दुःखाचा महजर फार लांब आहे. तो असा की, पुनश्च पती जरी प्रिय, सुशील, विद्वान, सधन असा साध्य असेल, तरी अप्राप्त, यास्तव जन्मपर्यंत तिचा निर्वाह कसा चालेल? अन्न कोण घालील? याची काळजी. वंशाचा छेद झाला. यद्यपि सासऱ्याचे घरी खावयापुरती सोय असली, तरी तेथे सर्व माणसे विधवा स्त्रीस

काम जास्ती सांगतात. आणि हाल करतात. आणि तिला कोणी मालक नाही, म्हणून निराश्रित होत्साती सर्वांचे दुष्ट शब्द तिला सहन करावे लागतात. दागिन्यांवर वांच्छा जाता कामास नये. चोळी घालिता कामास नये. काळे लुगडे नेसता कामास 'नये. कुंकू व नाहाण करता कामास नये. फार तर काय, दुसऱ्याने जेवावयास बसली, तर लोक हासतात व उपहास करतात. याजकरिता एकपोटी, एकवाढी जेवण करावे लागते. कार्यप्रयोजनास जाता नये, मंगळ कार्यास अपशकुन होतो; तोंड पाहिले तर वाईट शकुन झाला म्हणतात; म्हणून लज्जेने दूर राहावे लागते; असा दुःखात जन्म काढावा लागतो.

या गोष्टी जेव्हा आईबापांच्या मनात येतात, तेव्हा म्हणतात की, मेला जावई मोठा दुष्ट. इचा कोणी पूर्वजन्मीचा वैरी, दावेदारी होता. इचा छळ करण्याकरिता जन्मास येऊन इच्याशी लग्न करून मेला. असे श्राप देत असतात. दर एक दिवसास आईबापांस परम दुःख होते. जो जो मुलगी वाढत जाते, तो तो त्यांचे रक्तमांस जाऊन कृश होतात. आणि कन्या जिवंत असता मेली अशी समजूत करून दुःखाचे सहन मोठ्या धैर्याने करतात.

परंतु या सर्व दुःखाचे मूळ पाहिले, तर कोठे आहे? ज्याच्या त्याच्या समजुतीत आहे. आपणच होऊन गैरसमजुतीने आपला गळा कापावयास प्रवर्तक झाला असतो. त्यांस असे वाटते की, मी हे सर्व दुःख सहन करीन आणि असे करण्यात माझी धन्य आहे. असे जे कोणी प्राचीन काळचे मूर्ख समजुतीचे लोक आहेत ते म्हणतात व किती एक म्हणतात की, काय करावे, दुष्ट जात ही ब्राह्मणांची पडली. जर पुनर्विवाह करावा, तर लोक हसतील, ही गोष्ट मनातील काढता देखील येत नाही. आणि माझे मनातील दुःख कोण जाणतो? तस्मात् सर्व देशचे, जातीचे, शेजारी, नातलग इत्यादिक सोडावे, त्यापेक्षा ही मुलगी मेली म्हणावे हे बरे, असे समजून किती एक उगेच आहेत.

परंतु इतक्यावरून इतके सिद्ध होते की, ब्राह्मणांमध्ये समजूत व विचार अगदी नाही. परदुःख जाणतच नाही. आपले देशचे लोकांचे दुःख किंवा आपले जातीचे दुःख किंवा आपला शेजारी याचे दुःख किंवा आपला मित्र यांचे दुःख मनात आणीत नाहीत व त्यांचा कळवळा करीत नाहीत. दुसऱ्याची मुलगी विधवा झाली तर त्यात आपले काय गेले? असे म्हणून अशा दुसऱ्याचे महान संकटाविषयी विनोद व उपहास करतात.

अरे! अरे! काय हे दुष्ट, चांडाळ ब्राह्मण आहेत आणि कोण यांचे पुढारी पंडित शास्त्री आहेत! या जातीचे पुढारी दुसरे कोण होतील? बरे यांचे संगतीने सर्व ब्राह्मण लोक दुर्भाग्य होऊन दीनवाणे झाले आहेत. गरीब, तरुण

दुर्भाग्य स्त्रियांचे हाल पाहून या चांडाळांस दया येत नाही. पुनर्विवाहाची गोष्ट कोणी बोलला, तर त्यांस असे वाटते की, हा कोणी राक्षस धर्म बुडविणारा आहे. याचे ऐकू नये. असे हे विचारास पराङ्मुख झाले आहेत.

परंतु मला असे वाटते की, सर्व ब्राह्मणजातीने निश्चय करून पुनर्विवाह चालू करण्याचा शिरस्ता घालावा व पंडितांचे ऐकू नये. दोन-चारशे लोकांनी असा एक कटाव केला, म्हणजे पंडित उगीच रहातील किंवा सामील होतील. परंतु त्यांच्याने द्वेष होणार नाही व काही उपद्रव होणार नाही. पंडितांस सामर्थ्यहीन करण्यास एक कटाव मात्र पाहिजे, मला वाटते की, असे होण्यास बहुत दिवस नकोत. हे पंडित, शास्त्री मूढशिरोमणी आहेत. आणि त्या गृहस्थादिकांस शास्त्र सांगणारे म्हणवितात, त्यांस कनिष्ठ जातीचे ठरवावे आणि चांगले शहाणे लोक जे धर्माचे संरक्षण, धर्माचे कल्याण, सुखोत्पत्ती करतील त्यांस पुढारी करावे.

त्यांस असे समजत नाही की, पूर्वी ब्राह्मण कंद-मुळे खाणारे व रानात राहणारे व थोडके होते. याजमुळे त्यांच्या स्त्रियांशी लग्ने झाली तरी चिंता नव्हती. व त्या काळचे व त्या स्थितीस लागू असे केलेले शास्त्र आहे. ज्या शास्त्रात पुनर्विवाह करू नये, असे लिहिले आहे. त्यात आणखी किती एक गोष्टी आता उपयोगी नाहीत, अशा आहेत. पहा की, बारा वर्षे ब्रह्मचर्य, वेदाभ्यास, गृहस्थाश्रम याप्रमाणे सर्व काळ तपश्चर्या करीत भिक्षा मागून असावे. याप्रमाणे कोणी आज करीत आहे किंवा कोणी करील की काय? सती जावे असे त्यात आहे. परंतु ही मूर्ख रीती नाहीशी झाली किंवा नाही?

ज्याने पुनर्विवाह करू नये म्हणून ठरविले त्याच्यावर चढ, जाणे सती जावे म्हणून ठरविले, त्याने केला. असे कायदे करणारे यांची स्त्रियांविषयी किती गैरसमजूत होती, हे उघड दिसते, कारण की, त्यांस स्त्रिया म्हणजे जनावरे वाटत असतील. एका खाटकाने एक बकरू देवीस द्यावे म्हणोन सांगितले; त्याजवर दुसरा शहाणा निघाला, तो पाच द्यावी, म्हणोन सांगतो. याप्रमाणे किती गरीब जनावरांचा प्राण जातो. आपल्यास लाभ होतो त्यापेक्षा गेले काय? "देवो दुर्बलघातकः" याप्रमाणे हे शास्त्रार्थ जाणावे. देशकालवर्तमान पाहून यांस मागे ठेवावे. जसे इतर बहुत रद्द आहेत, तसे हेही समजावे आणि हल्लीचे ब्राह्मणाचे रोजगार, धंदे आहेत, त्याप्रमाणे शास्त्रही पाहिजे. तात्पर्य, सारासार विचार करावा. चांगली गोष्ट विचाराने दिसेल ती अंगीकारावी.

# पुनर्विवाह

**पत्र नंबर १०२**

हल्ली 'कल्याणोन्नायक मंडळी' पुण्यातील पंडितांनी उभी केली आहे. या मंडळीचे दोन-तीन उद्गार तुमचे पत्रद्वारे आले, त्याजवरून या मंडळीचे ज्ञानाची व विचाराची प्रशंसा अत्यंत झाली व येणेकरून पाठशाळेत विद्या कोणत्या प्रकारची शिकतात, याची प्रसिद्धी दिगंतापर्यंत होईल.

या प्रकारची विद्या प्राप्त होऊन हे लोक देशाचे कल्याण करण्यास समर्थ कसे होतील, हे आश्चर्य आहे. या विद्येचा उपयोग इतकाच दिसतो की, जे लोक अज्ञानात आहेत त्यांस मात्र आपली विद्या मोठी आहे अशी भ्रांती दाखवून पैका उपटावा. म्हणून लोकांस सावध करणे अवश्य आहे. मागील एक पत्री या मंडळीतील एकाने पुनर्विवाहाविषयी पत्र लिहिले ते वाचून बहुतेक समजदार लोक यांनी काय म्हटले असेल बरे? हे हल्ली शके १७७२चे शालिवाहनाचे वर्ष चालले आहे. या वर्षी अशी मूर्खपणाची गोष्ट पत्रद्वारे प्रसिद्ध करतात, ही कशी मान्य होईल? जेवहा हिंदू लोक भोळसर व पंडित सांगतात तसे ऐकणारे होते, तेव्हा त्यांनी सती जावे म्हणून सांगितले, तेच लोकांनी कबूल करून आपल्या सुना, मुली, बहिणी जिवंत जाळल्या. विधवा स्त्रियांची लेणी वगैरे घेऊन त्यांची हजामत करू लागले आणि फार तर काय परंतु त्यांचा अशुभ प्रश्न दर्शनेकरून होतो, त्यांस एकदा जेवण द्यावे व हाल करावे. म्हणून जे प्रतिपादन करतील ते कलियुगातील राक्षस माणसे खाणारेच समजावे.

त्यांच्या पुनर्विवाहाविषयी ज्या समजुती आहेत, त्यांतील एकही योग्य नाही. त्यांस असे वाटते की, काही तरी लिहिले म्हणजे झाले. दर एक शब्दास नवीन कोटी म्हणतात; परंतु त्यात अर्थ व ज्ञान काय याचा विचार करीत नाहीत. आजचे काळी मूर्खांचेही मनात असे नाही की, पुनर्विवाह न व्हावा. हे पंडित सांप्रत काळचे विद्येशी व ज्ञानाशी आपले जीर्ण ज्ञान (परंतु वास्तविक पाहिले तर तो मूर्खपणाच होय, त्यास) युद्धास उभे करतात मग हे जय पावतील कसे? ही गोष्ट खरी आहे की, जो काळपर्यंत जुने वेडसर लोक आहेत, तोपर्यंत हे पंडित आपले ज्ञान मिरवतील परंतु त्याचा परिणाम नाही. पंडिताचा धर्म म्हणजे जितका लोकांनी केलेला मूर्खपणा आहे तितका त्यांचा धर्म. वास्तविक विचार व ईश्वरभक्ती व लोकहित हे त्यांनी टाकून दिले आहे.

पंडितांनी हिंदू धर्मास काळिमा लाविली आहे. त्यांस विद्वान म्हणावे कोणी? हे पंडित व हे भट खरे विद्वान असते तर या देशाची माती का होती? ज्या देशात शंभरांत एखादा विद्वान आहे त्या देशाकडे पहा किती सुधारणा झाली आहे? त्या लोकांचे झेंडे पृथ्वीवर या टोकापासून त्या टोकापर्यंत लागले आहेत. आमचे देशातील हे पहा विद्वान! की त्यांची संख्या म्हटली तर पुण्यातच विद्वान म्हणविणारे भट व पंडित हजार आहेत व दर एक गृहस्थाचे घरी दोनचार विद्वान आहेत, इतकी विद्वानांची स्वस्तता आहे. परंतु विद्या पाहिली तर शून्य! हे फुकट खातात व जेवणाच्या गोष्टी व ग्रामण्ये व प्रायश्चित्ते शोधीत असतात. यांनी लोकांचे हित कधी मनात आणले आहे? व आपलेकडून पलीकडे कधी पाहिले आहे? हे जाति-अभिमानाने मरतात. जरी यांनी हित केले तरी म्हणतील की, "गोब्राह्मणहिताय च." हे सर्व लोकांचे हित कदापि करणार नाहीत.

हे विचारतात की, सुधारणा म्हणजे काय? तर याचे उत्तर असे आहे की, आपुली विद्या अपूर्ण व यत्किंचित असता, ती पूर्ण म्हणून गर्व करिता; सार्वजनिक हिताचा मार्ग तुम्हास दिसत नाही, तो दिसावा, याचे नाव सुधारणा, हे समजा.

## पुनर्विवाह

**पत्र नंबर १०४**

अलीकडे दोन पत्री 'कल्याणोन्नायक मंडळीत' प्रमुख यांनी आपले मत मोठे गूढ ज्ञान प्रगट केले आहे. ते कोणते म्हणाल, तर पुनर्विवाह करू नये हे! यांस असे वाटते की, ब्राह्मण-जातीत पुनर्विवाह करणे वाईट, आणि त्यांस शास्त्र व युक्ती अनुकूल नाही. व त्यात काही लभ्यही नाही. याजकरिता मोठे डौलाने दोन-तीन वेळ पत्रे त्यांनी लिहिली आणि उत्तर मागितले.

त्यास असा विचार करणाऱ्या पुरुषांशी वाद करणे म्हणजे आंधळ्यापुढे मशाल धरणे किंवा प्रेताच्या तोंडाशी औषधाची वाटी लावणे याप्रमाणे आहे. हे पहिल्या काळचे वेडे. यांस काहीच युक्तायुक्त समजत नाही. मी तरुण लोकांच्या सुधारणेकरिता लिहितो आणि पुनर्विवाहाचे प्रतिपादन करितो ते ऐका.

शास्त्रीपंडितांच्या कोट्या करणे म्हणजे अशा आहेत की, शब्द प्रमाण आहेत की नाही, असे पुसतात. म्हणजे तुमचा आजा होता, हे तुम्हास ऐकून ठाऊक, आहे हे खरे मानता की नाही? उत्तर खरे आहे तेव्हा शब्द प्रमाण जहाला. यास्तव ग्रहणात स्नानदान करावे, म्हणून विधी सांगितला आहे, तो खरा की, नाही याप्रमाणे कोटी करतात.

परंतु तो शब्द प्रमाण मानला, म्हणून हा शब्द प्रमाण नाही. तुम्ही म्हणाल की, "तुम्ही प्रेत आहा" तर मी शब्द प्रमाण घेऊन खरे मानावे की काय? शब्द प्रमाण कोठे कोठे मानू? जेथे विचार व युक्ती वसत नाही, तेथे मानणार नाही. याप्रमाणे शास्त्रीपंडितांचे वाद आहेत. भलतेच आकाशाचे टोक पाताळास मिळवितात आणि म्हणतात की, आम्ही मोठी कोटी केली परंतु विचार केला तर केवळ मूर्खपणा होय. अशा कोट्या करून पंडितांनी या देशात अज्ञान वाढविले आहे. कोठे झरा असला, म्हणजे त्यांस गंगा म्हणतात आणि माहात्म्य वाढवितात. अद्यापपर्यंत त्यांस विचार करणे म्हणजे काय, याचे भान नाही.

हिंदुस्थानात एक झरा आहे. त्याचे मूळ एका माहात्म्यात लिहिले आहे की एका राजाचे बायकोने स्वयंपाक करीत असता राग येऊन पाणी ओतून टाकले. तो झरा झाला. दुसरे, गाईचे तोंड खरबरीत आहे त्यांस ते म्हणतात की, कृष्णाने उष्ट्या शिताचे हाताने तिला मारल्यापासून ते तसे झाले. तुळशीला म्हणतात की, ही एक स्त्री होती. तिने विष्णूचे आराधन केले, ती तुळस झाली. उंबराची फुले सोन्याची आहेत, ती देव नेतात. घोड्यास पंख होते. याप्रमाणे जे जे स्वाभाविक होते ते उलटे लोकांस समजून दिले आहे.

याप्रमाणे हे लोक मूर्ख असतात. याजपासून विचार खरा कसा निघेल? पुनर्विवाहास शास्त्राधार नाही, असे कोणी म्हणतात व कोणाचे मते अनुकूलता आहे. त्यास, आम्ही पुनर्विवाह करणाऱ्याचे पक्षी आहो. ते असे की, शास्त्र असो किंवा नसो. परंतु हित जाणून शास्त्र एकीकडे ठेवून ही रूढी घालावी. किती एक रूढीने शास्त्र रद्द होते. कालमानेकरून शास्त्र बंद करावे लागते. जसे, मुंज केल्यावर बारा वर्षे कोण रहातो? तद्वत् जे घातुक ते टाकले पाहिजे. शास्त्र म्हणजे लोकांस सुख होण्याकरिता रीती घातलेली आहे. त्यातून जर विपरीत काही असेल तर एकीकडे ठेवल्यास चिंता काय? जसे इंग्रजांनी सती बंद केल्या, त्यांस तुम्ही वाईट म्हणाल की काय? तसेच, पुनर्विवाह चालू करण्यात बहुत फायदे आहेत. एक मुख्य असा की, स्त्रियांचा अधिकार पुरुषांप्रमाणे चालू झाला. विचारास हेच येते की जो अधिकार संसार संबंधी व सुखाविषयी

पुरुषांस आहे, तोच स्त्रियांस असावा. जर पुरुषास पुनर्विवाह करण्यास चिंता नाही; तर स्त्रियांसदेखील नाही. कारण की, आचार आणि धर्म ईश्वरी नेमानुसार असावे. जसे चोरी न करणे, व्यभिचार न करणे, इत्यादी नीती स्वस्थता होण्याकरिता ठरविली; परंतु ग्रहणात स्नान करावे, हा नीतीचा नेम नाही. नीती म्हणजे जे नेम सर्व देशांत, सर्व धर्मांत सारखे चालतात आणि आचार म्हणजे कल्पित नेम. एक राष्ट्रात मानले जातात. दुसरे राष्ट्रांत मानीत नाहीत. तेव्हा दुसऱ्यास दुःख देऊ नये, हा नीतीचा नेम आहे. आपल्यास दुःख वाईट लागते, तसे ते दुसऱ्यासही वाईट आहे.

आपले कोणी चोरले तर ठीक नाही. तसेच आपण दुसऱ्याचे चोरू नये. ईश्वरी संकेतास अनुसरून जो शास्त्रार्थ असेल, तो आम्हास मान्य आहे; त्यांस विपरीत असेल तो मान्य नाही. हेच शास्त्राचे रूप आहे. खरे बोलावे, नम्रता धरावी, दुसऱ्यास साह्य करावे, इत्यादी धर्म जे आहेत, ते विचाराने सिद्ध होतात व अंतर्याम याविषयी साक्षी देते की, हे खरे धर्म आहेत. बाकीच्या ज्या खटपटी आहेत, त्या हे मुख्य धर्म राखण्याकरिता योजिल्या असतील, हे स्पष्ट आहे; परंतु त्यांची गरज जेव्हा नाहीशी होईल, तेव्हा सुधारणा पाहिजे, आणि ते मुख्य धर्म राहाण्याकरिता ज्या खटपटी पाहिजे असतील, त्या कराव्या. जसा अंगरखा करतात हा अंगास वारा लागू नये, इजा होऊ नये व हवेपासून रक्षण व्हावे, म्हणून करतात. मग पुढे चार वर्षांचे मूल होते, तेव्हा जो अंगरखा केला तोच तिसावे वर्षी उपयोगी पडेल की काय ? तो बदलला पाहिजे. कारण जर तुम्ही मुख्य हेतूची स्मृती कराल, तर तेच योग्य आहे की, तो लहान अंगरखा टाकून नवा करावा. जर तुम्ही मुख्य हेतूस विसरलेत, तर तोच ठेवाल.

तद्वत् हल्लीचे हिंदू लोक इतके मूर्ख झाले की, तुळशी वहाणारास चांगला म्हणतात; परंतु खरे बोलणारास म्हणत नाहीत. याप्रमाणे जुन्या काळच्या खटपटी त्यांस बऱ्या वाटतात. व मुख्य हेतू समजत नहीत, पोरपणाचा अंगरखा बापाने दिला तो कसा टाकावा, म्हणून तोच तिसावे वर्षी घालावयाचा यत्न करून अनर्थ करतात.

तद्वत् या काळी स्त्रियांस पुन्हा विवाह करण्याची परवानगी देणे हे प्रशस्त आहे. ईश्वराने जितके पुरुष तितक्या स्त्रिया उत्पन्न केल्या आहेत. व त्या परस्वाधीन; तेव्हा त्यांचा विसावे वर्षी नवरा मेला तर जन्मपर्यंत कोण सांभाळ करील बरे ? त्यांस कोण सुख देईल ? त्यांनी आपला जीव कोठे ठेवावा ? मनातील सुखदुःख कोणास सांगावे ? अन्नवस्त्राकरिता कोणाकडे पहावे ? लहान मूलबाळ असेल तर याचा परामर्ष कोणी घ्यावा ?

ब्राह्मण लोकांमध्ये किती एक घरे असतील की जेथे एका एका गृहस्थाची चार पाच तरुण मुले ज्वानीत मरून गेली. आणि त्यांच्या तरुण स्त्रिया पाठीमागे राहिल्या आहेत. जवळ काही नाही. त्या बोडक्यांकडे पाहून आईबाप झुरतात. त्यांस खावयास घालावयास नाही म्हणून श्रमी; आणि त्या लज्जेने जशा समुद्रात टाकाव्या त्याहूनही अवघड प्रसंगी दुःखाचे सागरी बसतात. अन्नाची सोय नाही. जरी तारुण्य आणि लावण्य असेल तरी बळेच वेडेविद्रे स्वरूप करून बसतात. आणि शास्त्री पंडित म्हणतात की, त्या बाईने पूर्वजन्मी वाईट तपश्चर्या केली म्हणून हे फळ असे प्राप्त झाले. ईश्वराने उन्हात उभी केली हे पूर्वजन्माचे दुष्कृताचे फळ. म्हणून आता तरी व्रते करा, आणि आमचे पोट जाळा. म्हणजे सुकृत होऊन सात जन्म वैधव्य प्राप्त होणार नाही. असे सांगून भोळे व गरीब जिवांस फसवितात.

मला तर असे वाटते की, स्त्रियांचे दुःख इतके भारी आहे की, त्याची स्मृती झाली तर रोमांच उभे राहतात आणि आईबापांस दुःखाचे पर्वत पडतात. आणि दुष्काळात पाऊस पडत असता राहतात. अरेरे! हा अनुभव घरोघर आहे. इतके असून जुन्या काळाची ही समजूत दृढ बसली आहे की, आपली पोरे आपण मारतात. हे ब्राह्मण लोक आपल्या मुली मारल्या पेक्षा अधिक दुःखात ठेवतात. त्या दुःखास पारावार नाही. अद्यापि या सुधारणेविषयी उलटे बोलणारे आहेत. परंतु जसा व्याघ्र रानात माजला तर सर्वजण जाऊन मारतात; तसे या उलटे बोलणारांचा लोक धिक्कार का करीत नाहीत? व याविषयी एकमत का होत नाही? बारा, पंधरा, वीस, तीस वर्षांच्या पोरीचे गळे कापतात. हे पाहून अंतःकरण खवळून न जावे काय? ही मूर्ख समजूत पडून गेली आहे. स्त्रियांनी पुनर्विवाह केला म्हणून त्यात काय तुमचा नामोश झाला? तुमच्या पोरी, बहिणी सुखेकरून नांदतील; हल्ली जो कल्होळ दृष्टीस पडतो तो पडणार नाही. पोरे आणि बाळे घेऊन पतीशिवाय काय काय उपासतापास, दुःखे या विधवा भोगितात? परंतु भले हिंदू हो, धन्य तुमची! तुम्हीच आपल्या मुलीचे खाटीक स्वस्थपणाने होता! तुमच्यासारिखे राष्ट्र आणि तुमच्यातील विद्वानासारखे विद्वान यांस तुलना पृथ्वीवर कोठेही मिळणार नाही, हेच खरे.

पुनर्विवाह झाल्याने व्यभिचार कमी होईल, व्यवस्था चांगली राहील. पतित स्त्रियांस पती होतील आणि सुखी राहतील. आणि त्यांनी असे रहावे हा ईश्वराचा संकेत आहे. स्त्रीपुरुषांचे विधिरूप लग्न होऊन त्यांनी नांदावे असा क्रम; त्यांस विघ्न करणारे शास्त्रातील नेमधर्म आहेत. फक्त पुरुषांनीच स्त्रियांस जनावरांप्रमाणे पशू मानून त्यांजवर पाहिजे तसा जुलूम चालविला आहे. त्यात

नीती नाही, धर्म नाही, सत्कर्म नाही व युक्ती नाही. मागे करीत आले व लिहून ठेविले म्हणून पुढे करतात; परंतु त्याची काही मर्यादा पहा. लक्षावधी स्त्रिया उपाशी मरतात. घर नाही, दार नाही, वस्त्र नाही, आणि हे दुष्ट पंडित अशा प्रकरणी दैत्यासारखे निष्ठुर होऊन बोलतात. त्यांस काय म्हणावे ?

## पुनर्विवाह

■

**पत्र नंबर १०५**

पुनर्विवाहाची चाल ब्राह्मण जातीत पडली असता मोठी सुधारणा होईल. पुनर्विवाह न करू देणे हा महान अविचार आहे. आणि हे लोक भोळसर म्हणूनच यांनी हा कहर सोसला.

आता किती एक विचार करून पाहू लागले की, आमच्या जातीत बायकांस इतका अधिकार नाहीसा करून त्यांस जनावरांप्रमाणे मानितात व दुःखसागरी लोटून देतात. पुरुषावर स्त्रीची प्रीती अधिक असावी व तिणे त्याला देवच मानावा. आणि तिने त्याचा नाश कदापि इच्छू नये. या हेतूने हा धर्म स्थापन केला असेल. परंतु हे कारण अयोग्य आहे. या पृथ्वीवर ब्राह्मण जातीत स्त्रियांस दीनत्व विनाकारण प्राप्त होते. आजपर्यंत दोन चार हजार वर्षे तरी हा कायदा चालू असेल, परंतु याविषयी कोणाचे तोंड उघडले नाही. सर्व लोकांच्या डोळ्यांवर झोप होती. युरोपियन लोक इकडे आले त्यांच्या सहवासाने हिंदू लोकांस विचार आला. त्यामुळे त्यांचे नेत्र उघडले. त्यांनी सती बंद केली. हे मोठेच यश घेतले. आता पुनर्विवाहवादही चालू लागले.

पूर्वीची रीत अशी होती की, चालीप्रमाणे मुकाट्याने चालावे, कोणी विचारू नये. बायकोस जिवंत जाळू लागले. आणखी याचे वर्चस्व चालते तर पुराणात एखादा आणखी श्लोक घालते की आईबरोबर लेकीने व भावाबरोबर बहिणीने जळावे; असाही कारखाना चालता; परंतु मसुलमान या देशात आल्यापासून ब्राह्मणांचे माहात्म्य संपले. इंग्रजांनी तर त्यांस जर्जर केले. आमच्या देशापलीकडे काय आहे याचा विचार ब्राह्मणांनी व पंडितांनी केला नाही. परंतु त्यांची झोप जाऊन त्यांनी जागृत व्हावे म्हणून त्यांची व परदेशीय यांची

गाठ देवाने घांतली. जसे पांडवांचे अक्षौहिणी सैन्य मेले आणि रामाचे युद्धात पद्मेच्या पद्मे मेली. त्याचप्रमाणे आज इतकी वर्षे हजारो बायका जिवंत जाळल्या; व बळेच भादरून दुःखाचे विहिरीत टाकल्या.

याप्रमाणे ब्राह्मणांनी युद्ध केले. परंतु निर्दय पुरुषांनी काही विचार केला नाही. ते भटांचे व पंडितांचेच मानीत होते. पुढे ग्रामस्थ म्हणजे शूद्र वृत्ति करून पोट भरू लागले. ब्राह्मणांत ती एक आडजात निघाली व तेही पंडितांसच मानू लागले; परंतु कोणाचा धीर असा झाला नाही की, अरे हा माझा शास्त्रार्थ आहे म्हणतात खरा; परंतु किती एक शास्त्रार्थ लौकिकाकरिता एकीकडे ठेविता व विचाराने सारासार पाहता, तसेच हे घातकी वचन म्हणून टाकावे आणि जो विधी विचारास विरुद्ध असेल त्या विधीचा निषेध करावा. हेच योग्य आहे. आणि हा अनर्थ तर उघड आहे. किती एक स्त्रिया दुःखसागरात लज्जेने दीन होऊन, व्यभिचारी होऊन मेल्या.

'कल्याणोन्नायक मंडळी'चा सभासद लिहितो की, अशा स्त्रियांनी एक वेळ जेवावे, चांगले अन्न खाऊ नये, उपासतापास करावे, यात्रा कराव्या. परंतु बळेच त्यांस अडचणीत घालून हे सांगावे काय? नवरा मरणे ही प्रारब्धाची गोष्ट आहे व तत्संबंधी जुलूम फक्त हिंदू लोकांच्या अज्ञानी व गरीब बायकांनीच सोसला आहे. जेव्हा या स्त्रिया विद्वान होतील तेव्हा या पंडितांस चरण-संपुष्टांनी पूजा अर्पण करतील; यात संशय नाही. परंतु याच कारणास्तव ब्राह्मण लोक स्त्रियांस शहाण्या करण्यास असे प्रतिकूल आहेत, जुलुमाने शास्त्र जेथे चालू आहे तेथे जरूरच आहे की बायका जनावरांप्रमाणे नीच अवस्थेत राखल्या पाहिजेत. स्त्रिया सुशिक्षित होतील, तेव्हा आपला अधिकार स्थापतील. आणि संसारसुखास हानी करणारे पंडितापासून असा तहनामाच करून घेतील. परंतु सांप्रत बायका अगदी जनावरे पडल्या म्हणून पंडितांस संधी सांपडली आहे.

हिंदू लोक सुधारत नाहीत? तोपर्यंत मोठ्या पदवीवर येण्यास योग्य नाहीत. पहा, जर एखादा पंडित न्यायाधीश केला आणि त्यापुढे ब्राह्मणी स्त्रिया विधवा गर्भपात करून आल्या तर तो त्याजला बळेच महान अपराधी असे जाणून मोठी शिक्षा देईल. परंतु त्यांस असे वाटणार नाही की, आमचे शास्त्राने एवढी अडचण घातली आहे की, ती तोडण्यालायक आहे. याजमुळे ही स्त्री अपराधी कमी आहे, असे त्यांस किमपि वाटणार नाही.

# पुनर्विवाह

■

**पत्र नंबर १०६**

पुनर्विवाहाची चाल पाडणे, हे शास्त्रविरुद्ध म्हणतात; परंतु लोकांचे हिंताकरिता करावे हेच माझे म्हणणे आहे. जसा दुष्काळ पडला असता श्राद्ध करावयाचे असल्यास ठेवावे; कारण की, पोटास मिळून आपला जीव जगत नाही, तर खर्च कशास करावा ? तद्वत् चांगली व्यवस्था होईल तो नियम करावा; आणि जे पूर्वी शास्त्र लिहिले तेच सर्व काळ चालले पाहिजे, असे म्हणणे हा मूर्खपणा आहे.

जसे पूर्वीचे वैद्यक आहे. परंतु त्यात आता जी सुधारणा झाली असेल ती घेतली पाहिजे; तसेच ज्योतिष, तसेच धर्मशास्त्र. यात फेरफार केले पाहिजेत; व त्यातील नियम सुधारले पाहिजेत. किती एक रद्द करण्याजोगे जे होते ते लोकांनी कोणास न पुसता रद्द केले आहेत. कारण की तसे करणे जरूर पडत गेले. ब्राह्मणांनी राज्य करू नये; परंतु पेशवे यांनी केले. मुंजीनंतर बारा वर्षे गेल्यानंतर लग्न करावे; ते सोडून पूर्वीच करीतात. अशा शास्त्रविरुद्ध चाली लोकांनी स्वमताने हजारो काढल्या आहेत. त्यांस शास्त्री म्हणतील की या बहुत दिवसांच्या आहेत. तेव्हा मला इतकेच पुसावयाचे की, बहुत दिवस गेले म्हणजे बहुत दिवसांच्या होतात. परंतु या माणसांनी केल्या किंवा ईश्वराने केल्या. हे पहा. तसेच एकदा संमत देऊन पुनर्विवाहाची चाल घातली म्हणजे या लोकांचा स्त्रियांवर जुलूम नसावा. जे सरकार लोकांवर जुलूम करते त्यांजवर लोक बंड करीतात. जे शास्त्र लोकसुखास विरुद्ध आहे त्यांस लोक सोडतात, हा निश्चय. याजकरिता जे सुखास आडवे येईल ते दूर करावे. लग्नाचा नियम हा धर्म नव्हे; ही रीत आहे. लोकांमध्ये व्यवस्था होण्याकरिता केला, तो जर वाईट असे स्पष्ट दिसेल तर दुसरे नियम करण्यास चिंता नाही.

तुम्ही म्हणाल की, लोकांस व्यभिचार करण्यास सांगावे म्हणजे सुख आहे. परंतु येथे तुम्ही चूक करिता. व्यभिचाराने लोकांत व्यवस्था राहणार नाही. जरी एकास सुख झाले तरी दुसऱ्यास ते दुःख आहे. याजकरिता आपले सुखरक्षणाकरिता व्यभिचार सोडावा. साधारण नियम असा आहे की, एकाचे सुख दुसऱ्याने हरण करू नये. सर्वांनी व्यभिचार केला असता लोकांची दुर्दशा होईल. म्हणून तो अधर्म व नीतीचे विरुद्ध व त्याचेच नाव पाप. ज्याचे साधारण परिणाम चांगले वजे सर्व मुलखात चालू झाल्याने लोकांचे काही वाईट होत

नाही आणि चांगले होते, तेच पुण्य व तोच धर्म, असे माझे मत आहे.

ज्या काळी ऋषींनी शास्त्र लिहिले त्या काळी त्याचे सर्व नियम लोकांचे सुखवृद्धीकरिता व व्यवस्थेकरिता लिहिले; त्यांनी लोकांचे घात व्हावे असे जाणून लिहिले नाही. बरे, यांस लोक बहुतकाळपर्यंत मानीत आले. ते फिरविण्यास आपण चांगला विचार करावा. उगेच दांडगाईने मोडू नये खरे; परंतु पुनर्विवाहाचा निषेधी दुष्ट परिणाम सर्वांस समजला आहे. परंतु अंध परंपरेस भितात इतकेच. यास्तव जितकी त्वरा होईल तितकी अशा समयी करावी. कारण की, एक घटका उशीर झाला तर हजारो स्त्रियांस समुद्रांत लोटून दिल्याचे पातक डोकीवर बसते.

यास्तव लोकांस मी उपदेश करितो की, अगदी भिऊ नका. रस्ता सुखाचा व सोयीचा आहे. तुमची सुधारणा करावी हे पंडितांचे उपजीविकेस विरुद्ध आहे. तुम्हास शहाणे करण्यास विद्या पाहिजे. नवीन ग्रंथ हजारो पाहिजेत. शाळा पाहिजेत; हे खरे आहे. आता एक गृहस्थाजवळ एक लाख रुपये आहेत; असे म्हणा; आणि तो धर्म करावयास इच्छितो. आणि त्याने जर शाळा व ग्रंथकर्ते व पुस्तकगृहे इत्यादिकांस धर्म केला तर पंडितांचे व भटांचे हाती एक पैसा तरी जाईल ? तेव्हा या धर्मास ते अनुकूल होऊन आपला रोजगार कसा बुडवतील ? यास्तव ते असे सांगतात की, भट-भिक्षुकांस बोलाव आणि दोन रुपये दर एकास दे. आणि शंभर गोप्रदाने कर, शंभर प्रायश्चित्ते कर. आणि दहा दहा रुपयांचा विषय एका एका ब्राह्मणांस पोचीव. आणि एक सहस्र भोजन घाल, एक इच्छाभोजन घाल, एक कोट तुळशी घाल, ब्राह्मणद्वारा महारुद्रकर, पाच शालजोड्या विद्वान भटास दे. मोठाले पंडित गावात आहेत, त्यांची संभावना कर; दर एक स्त्रीस नथ दे, भटास धोतरजोडा दे, म्हणजे महान धर्म होऊन मोक्षास जाशील. या गोष्टीचे उलटे ते कधी तरी सांगतील ? तस्मात् या सुधारणेस ते सर्वथैव विरुद्ध आहेत. म्हणून त्यांची आशा धरतील ते मूर्ख आहेत.

✦ ✦

# पुनर्विवाह वगैरे सुधारणा

■

**पत्र नंबर १०८**

'कल्याणोन्नायक मंडळी'ने आपली विद्वत्ता बाहेर दाखविण्याकरिता दोन प्रश्न प्रथम काढिले. एक संस्कृत विद्या सर्वांहून वरिष्ठ व दुसरा पुनर्विवाह करू नये. या दोहोंची समर्पक उत्तरे झाली. आणखी माझे त्यांस उत्तर आहे की, तुम्ही असे मनात आणा, मी जर एक कायदा केला की, पुरुषाची स्त्री मेली तर त्यांस श्मश्रू करून लागलाच संन्यास द्यावा; व घराबाहेर काढून द्यावा व त्या दिवसापासून त्याचा रोजगार, व्यापार सर्व बंद, त्याने गंध देखील लावू नये. आणि हा कायदा चालू करण्याचे मला सामर्थ्य असते, तर पुरुषांनी काय म्हटले असते?

आता पंडित म्हणतात की, बायकांस परवानगी दिली तर त्या नवरे मारतील. परंतु माझे उत्तर हे आहे की, इतर देशांत व जातीत परवानगी आहे म्हणून पुरुषांनी आपल्या बायका मारून दुसऱ्या केल्या आहेत की काय? पुरुषास परवानगी असावी आणि बायकांस नसावी काय? जी कारणे तुम्ही दाखविता ती पुरुषांसही लागू आहेत. मग आम्ही असे म्हणू की, पुरुषाची बायको मेली म्हणजे त्याचे सौभाग्य गेले. मग त्याने मीठ खाऊ नये, तीर्थयात्रा कराव्या व विधवेसारखे होऊन असावे. तर मग पंडितांस केवढा चमत्कार वाटेल बरे?

अहो, हा प्रत्यक्ष अनर्थ, यांस विचार कशास पाहिजे? अनेक गोष्टींची सुधारणा आमचे लोकांत केली पाहिजे. विद्वान कोणास म्हणावे? हे समजले पाहिजे. विद्या म्हणजे काय? हे समजले पाहिजे. कर्ममार्ग वृथा आहे. नीती हाच मार्ग खरा; हजार तुळशी वाहिल्यात काही नाही, मन शुद्ध पाहिजे; चांगले ग्रंथ नवीन तयार होऊन ते प्रसिद्ध व्हावे असे केले पाहिजे. पुनर्विवाहादिक चाली घातल्या पाहिजेत. लोक विचार करू लागतील अशी युक्ती पाहिजे. लोक विद्वान होतील अशी युक्ती पाहिजे. अधिकारावर असल्यास कोणती प्रकारची वर्तणूक असावी, खरेपणा इत्यादी सद्‌गुण असावे, या सर्व सुधारणेच्या गोष्टी लोकास कळाव्या म्हणून 'कल्याणोन्नायक मंडळी'ने मेहनत करावी व सांप्रतचा मूर्खपणा सोडून द्यावा.

तुम्ही म्हणाल की, विधवेचे लग्न करावे, असे अनुमत दिल्यास आम्हास

सर्व जन हसतील. तर बाबांनो, हे खरे आहे, लोक हसतील खरे, परंतु पाच चार वर्षांनी चांगले म्हणतील, तुम्हास योग्य वाटेल तसे करा. लोकांस भिऊ नका. तुम्हास लोकांचे कल्याण कर्तव्य असेल तर चांगला मार्ग दाखवा. लोक मूर्ख होऊन राहिले आहेत. म्हणून त्या मूर्खपणास तुम्ही साहाय होऊन वाढवू नका. तुम्ही शहाणे आहा हे दाखवा. जर तुम्ही लोकांसारखे मूर्ख आहो असे दाखवाल व लोकास प्रिय ते बोलाल तर तुमचे नावास बट्टा आहे. याजकरिता तुम्ही मोठाले मान्य पंडित आहा, तेव्हा हा प्रसंग फुकट घालवू नका; त्याचे सुधारणेस तुम्ही लागा. सरकार जबरीने किंवा ईश्वरसत्तेने किंवा आम्हासारखे जे पुढे होतील ते आपली मते चालू करतील, परंतु तुम्ही आपली विटंबना होऊ देऊ नका.

हे झाल्याखेरीज राहणार नाही. तुम्हास कळत नाही म्हणून तुम्ही संशयात आहा. तुम्ही जरी पन्नास हजार ग्रंथ पाठ केले असले तरी तुम्ही घोके आहा. तुमचे ज्ञान निरुपयोगी जाणून तुम्ही लौकर शुद्धीवर या. हे माझे तुम्हाजवळ मागणे आहे. तुम्ही मंडळी स्थापन केली याचा मला संतोष आहे. हे करणे तुमचे चांगले आहे. परंतु भलतेच बोलता म्हणून वारंवार तुम्हास सुचवितो. तुम्ही चांगले रीतीने विचार करा व पहिला वेडेपणा सर्व सोडून द्या. विचाराने चाला म्हणजे सर्व आहे. तुम्ही लोकांचे कल्याण करा ही माझी तुम्हास शेवटची विनंती आहे.

✦ ✦

# ५. जातिभेद

# जातीविषयी विचार

■

पत्र नंबर २२

हिंदू लोकांचे काही वर्णन लिहावयाचे असले, तर मुख्यत्वेकरून ब्राह्मण लोकांचे लिहावे. म्हणजे त्यात सर्व लोकांचे स्थितीचे वर्णन आले; कारण हिंदू लोकांत विद्येचे महत्त्वाचे मुख्य मालक ब्राह्मण आहेत; व त्यांची मते लोकांमध्ये प्रबल आहेत. यास्तव आम्ही बहुधा हिंदू लोकांचे वर्णन लिहावयाचे असले, म्हणजे ब्राह्मणाचेच लिहू व तेणेकरून सर्वांचे वर्णन झाले, असे समजावे.

प्राचीन हिंदू शास्त्राप्रमाणे लोकांचे चार वर्ण आहेत. ते अशा प्रकारचे वर्ण दुसऱ्या देशांत नाहीत. हिंदुस्थानात मात्र अशी व्यवस्था आहे. ते चार वर्ण असे – एक ब्राह्मण, दुसरा क्षत्रिय, तिसरा वैश्य आणि चवथा शूद्र. शास्त्रात असे लिहिले आहे की, हे चारी वर्ण कुळपरंपरा चालावे. जो ब्राह्मण त्याचा वंशही ब्राह्मणच. तसे, जो शूद्र त्याचा वंशही शूद्रच, असा नियम स्मृतिरूप धर्मशास्त्रात आहे, परंतु ते शास्त्र लिहिण्यापूर्वी व पश्चात असा नियम चालला असेलसे वाटत नाही, कारण वाल्मीक ऋषी हा प्रथम कोळी होता व नंतर ऋषी झाला. गाधि राजा क्षत्रिय असता ब्राह्मण झाला. पाराशर ऋषीने शूद्र स्त्री केली. हरिश्चंद्र राजाने काशीस जाऊन महाराचे कर्म पत्करिले व किती एक राजे क्षत्रिय असता ब्राह्मण झाले. तसेच, दुसरे ब्राह्मण असता क्षत्रिय झाले, अशी वर्णने पुराणात लिहिली आहेत. आणि मोठ्या कुळात राजे वगैरे जे लिहावयासारखे झाले, त्यांची नावे पुराणात सापडतात. तेव्हा त्या काळी अशी बहुधा चाल असेल, परंतु सर्वांची नावे पुस्तकात लिहिली गेली नाहीत, म्हणून पक्के समजत नाही. तथापि चाल पुष्कळ होती, असे विचारे करून सिद्ध होते. आणि उत्तम मार्ग हाच की, कर्मे करून जातीचा आणि वर्णांचा निश्चय असावा.

ब्राह्मण असून शूद्राहूनही नीच कर्म करील, तर तो ब्राह्मण नव्हे. तसेच क्षत्रियाने ब्राह्मणकर्म केले, तर तो ब्राह्मण व्हावा, असे केले नाही, तर किती एक अयोग्य लोक ब्राह्मणाचे नावाने मिरवतील. आणि किती एक वास्तविक ब्राह्मण शूद्राचे नावाने आच्छादित राहतील. जर कोणी राजाने असा नियम केला की, जे हल्ली कामदार आहेत, त्याजकडे ती कामे वंशपरंपरा चालवावयाची, तर ते जोपर्यंत आहेत, तोपर्यंत ती कामे बरोबर चालतील. पुढे त्यांचे मुलगे

वगैरे अर्थातच मूर्ख निघतील; कारण बापाप्रमाणे मुलगा निघतो असा निश्चय नाही. यास्तव ज्याचे त्याचे स्वयमेव गुण पाहून त्याची योजना करावी, हा उत्तम पक्ष होय. नाहीतर घालमेल होऊन जे शहाणे ते मागे राहून मूर्ख मंडळी परंपरेच्या कायद्याचे जोराने सर्व मोठे मोठे कामात शिरू लागेल व मग त्या राज्यात काय व्यवस्था होईल बरे ?

बाकी चार भेद हिंदुस्थानात आहेत. इतर देशांत नाहीत असे नाही. प्रत्येक मुलखात चारी वर्ण आहेतच. (१) पंडित, (२) शिपाई, (३) सावकार आणि (४) चाकर हे सर्वत्र आहेत. याशिवाय तर कोठेही चालावयाचे नाही. परंतु अंतर इतकेच आहे की, अन्य देशांत हे धर्म परंपरा चालत नाहीत. वाणी आहे आणि त्याचा मुलगा बुद्धिमान निघाला, तर तो पंडितामध्ये जातो. आणि पंडिताचा मुलगा मूर्ख निघाला, तर तो चाकरात जातो. अशा रीतीने हे चारी वर्ण सर्व देशांत आहेत.

परंतु हिंदुस्थानात त्याची वेगळाली कुळे झाली आहेत, आम्हास वाटते की पूर्वी जातीत फेरफार होण्याची चाल असे. रावण ब्राह्मणाचा मुलगा. परंतु दैत्य झाला; कारण तो महा दुष्ट होता. याजवर किती एक लोक असे म्हणतील की, ते मागले युगातील लोक. त्यांचे उदाहरण आता घ्यावयाचे नाही, परंतु हे म्हणणे उपयोगी नाही; कारण वर्ण, व्यापार व जात तर मागील युगातीलच आहे.व मागील युगात तरी माणसेच होती. देवाचे अवतार जरी झाले, तरी मनुष्ये होतीच. प्रत्येक जीव देव नव्हता; व आतासारखेच सर्व लोक तेव्हाही होते. म्हणजे दुष्ट होते व सुष्टही होते. फरक इतकाच की, आता विचार करीत नाहीत. बहुधा चालीवरून चालतात.

सांप्रत काळचे ब्राह्मण कोणी विद्वान आहेत काय, असे पाहिले तर सर्वांस दिसेल की, हे भट विद्वान नाहीत. शुद्ध टोणपे दिसतात. त्यांस काहीच ज्ञान नाही. जसे बैरागी अंगास राख लावून भीक मागतात, तसे कोणत्या तरी वेशाने हे पोट भरितात. हे स्वभावाने आळशी व काम करावयास नको. तेव्हा निर्लज्जपणाने भीक मागून पोट भरितात. एवढाच त्यांचा रोजगार आहे. मला वाटते की; त्यापेक्षा आचारी, पाणके बरे. व हे त्याहून निंद्य. कारण हे हरामाचे खातात. आणि लोकांस यापासून काही उपयोग नाही. ब्राह्मणांचा स्वधर्म असा आहे की, आपली सद्वर्तणूक आणि पवित्रपणा बाळगून विचार करीत अरण्यात स्वस्थ बसावे म्हणजे तेच मुनी व ऋषी होत. व असे त्यांचे कर्म पवित्र व वागणूक निर्दोष म्हणून, राजे ब्राह्मणास थरथर कापत होते. व सर्व लोक त्यांचे भय बाळगीत होते. अशा कथा आहेत, व ते आपले सत्कर्मेकरून व उपदेशेकरून

सर्वांस सुशिक्षा लावीत होते, व धर्मसुधारणेचा आणि लोकहिताचा विचार करीत होते. तेव्हा लोकही त्यांस मानीत होते. त्या प्रकारचा एक तरी ब्राह्मण काशीपासून रामेश्वरापर्यंत आता आहे काय ?

आताचे ब्राह्मण असे आहेत की, जेवावयापुरती काळजी करतात. सकाळपासून पोट कोठे भरेल, याचा शोध करून जेवावयास मिळाले, म्हणजे उताणे पडतात. किंवा स्वस्थ गोष्टी सांगत बसतात. कोणी म्हणतो की मी ५० लाडू खाल्ले. कोणी म्हणतो की मी शेरभर तूप प्यालो. सारांश जे भटांचे मंडळीत क्षणभर बसतात ते जाणत असतील की, त्यांचे भाषण किती उपयोगाचे व किती शास्त्रपर आहे. त्यांचा मोठा गुण ज्यावरून ते आता प्रशंसा पावतात, तो खावयाचा आहे. म्हणजे जो फार खाईल तो उत्तम भट. गृहस्थही मूर्खच असतात. त्यांस वाटते की, ब्राह्मण जितके खातील तितके आम्हास विशेष पुण्य लागेल.

मी एका गृहस्थाचा खरा वृत्तान्त जाणतो की, त्याचा बाप मेला आणि त्याजजवळ पाच हजार रुपयांची जिनगी होती. तेव्हा त्याचे मनात काय वेड भरले, ते न कळे. त्याने असा बेत केला की, हे सर्व रुपये ब्राह्मण भोजनात घालावयाचे. मग त्याने चार वर्षेपर्यंत शेकडो ब्राह्मणास यथेच्छ परोपरीने भोजन घातले. आणि आपली सर्व जिनगी गमावली. तेव्हा मला असा चमत्कार वाटतो की, हे ब्राह्मण फार दुष्ट आहेत. त्या गृहस्थास कोणी असे म्हटले नाही की, अरे, तुम्ही, पोरे-बाळे व बायका जेणेकरून मरतील; असा हा धर्म कोठला ? तू आपले कुटुंबाचे रक्षण कर. ' असा उपदेश कोणी एकाही ब्राह्मणाने केला नाही. सर्वांनी त्याचे सरेतोपर्यंत खाल्ले व सरल्यावर घरोघर निघून गेले.

दुसरे उदाहरण, बाजीराव पेशवे यांनी अनंत ब्राह्मण जेवावयास घातले. त्यांस तर नेहमी हेच वेड होते; परंतु त्यांतील एका ब्राह्मणाने तरी असे म्हणावयाचे होते की, ' अरे राजा, तुझे कर्म प्रजा-पालन करावयाचे, ते तू नीट कर, प्रजेपासून जुलमाने पैसा घेऊन रिकामे ब्राह्मणास जेवू घालू नको; कर कमी कर; बंदोबस्त नीट ठेव. व्यभिचार करू नको; राज्य बुडवू नको; फौज नीट बाळग, हेच तुला स्वर्गास नेईल; लूट करून ब्राह्मणांस घातल्याचा उपयोग नाही. ' असे एकाने तरी सांगितले काय ? नाही.

तस्मात् हे ब्राह्मण लुटारू आहेत. हे धर्माचे नाव करून लुटतात. पेशव्यांचे राज्यात एकच ब्राह्मण होता आणि जोपर्यंत तो होता, तोपर्यंत ते राज्य कृतयुगाप्रमाणे चालले. त्या ब्राह्मणाचे नाव रामशास्त्री होय. एके दिवशी माधवराव

पेशवे स्नानसंध्या करीत असता शास्त्रीबोवा भेटीस गेले आणि त्यांनी विनंती केली की, "मला आज्ञा द्यावी. मी काशीस जातो. कारण आमची कर्मे तुम्ही करावयास लागला. तेव्हा आता आम्ही राहणार नाही."

श्रीमंतांनी पुसले, "हे काय ?" त्यांनी सांगितले की,

"तुम्ही ब्राह्मण जातीचे खरे; परंतु तुम्ही स्नानसंध्येचा धर्म सोडून क्षत्रियांचा धर्म घेतलात. आणि शिपाईगिरी करून राज्य करिता. आता स्नानसंध्या केली तर धड ब्राह्मणाचे कर्मही साधावयाचे नाही. व वेळ फुकट जाऊन क्षत्रियांचे कर्मही बुडवाल. आणि कोणतेच कर्म न केलेसे होऊन नरकात जाल. तर तुम्ही जी वेळ स्नानसंध्येत घालता तीच वेळ रयतेस दाद देण्यात घालवा. व येथून दोनशे कोसपर्यंत तुमचे अमलात कामगार कसे काय करतात, हे पहा. जप कशाचा करिता ? जर तुम्हास जप करावयाचा असेल, तर राज्य सोडा. आणि दुसरा कोणी गादीवर बसवा आणि वनात चला. तुम्हीआम्ही बरोबर जाऊ व असे करावयाचे नसेल, तर राज्य चांगल्या रीतीने नीट करा. लोकांचे घात करू नका. अशी स्नानसंध्या ईश्वरास मान्य होणार नाही." असे सांगून त्या दिवसापासून त्याने श्रीमंतास प्रातःकाळी दरबारात येऊन बसावे, असे ठसवून दिले. याचे नाव ब्राह्मण व याचे नाव सारासार विचार.

ज्याने आपले अकलेस आले, ते खरे जाणून सुचविले; भीड धरिली नाही; तोच धन्य. तसेच, जेव्हा घाशीराम कोतवालाने काही माणसे मारली, तेव्हा रामशास्त्री याजकडे नाना फडणीस यांनी शास्त्रार्थ नेला आणि सांगितले की, 'मी तुमचा स्नेही आहे व माझा स्नेही घाशीराम आहे. त्यापक्षी याचा जीव जाऊ नये असे करावे.' त्यांनी सांगितले की, 'मी वास्तविक असेल तेच सांगेन, तुमचा प्रपितामह आला तरी सत्याचा अव्हेर तुमचे भिडेमुळे मी करणार नाही.' आणि त्यांनी तसेच श्रीमंतांस सांगितले व त्याजवरून त्याचा वधही झाला. सारांश जे असे असतील ते ब्राह्मण. नाही तर सहस्रभोजनास पुष्कळ जमतात तेव्हा विचारावे, तुमचे नाव काय ?

'ब्राह्मण.'

'येते काय ?'

'शंख.'

'जेवता किती ?'

'चार शेर.'

'करता काय ?'

'आगांतुकी.'

वाः हे ब्राह्मण कशाचे? आताचे शास्त्री याजवळ म्हटला तो शास्त्रार्थ तयार आहे. ‘भटजीबुवा, असत्य भाषण केले, तर काय करावे?’

उत्तर – ‘ब्राह्मणास पुतळी दक्षणा द्यावी.’

याजवरून हल्लीचे ब्राह्मणात काही विचार, नीती किंवा पवित्रपणा नाही. शास्त्री व भट मजूरदार आहेत. जसे हेलकऱ्यास चार पैसे दिले, म्हणजे कोसभर जातो व आठ पैसे दिले म्हणजे दोन कोस. तद्वत् पाच रुपये दिले म्हणजे प्रायश्चित्त व शालजोडी दिली म्हणजे दारू प्याली तरी चिंता नाही. तो निर्दोष. असा ब्राह्मणांचा रोजगार आहे.

## चार वर्णांची सांप्रतची स्थिती

**पत्र नंबर २३**

सांप्रत ब्राह्मण जे आहेत, ते नावाचे आहेत व ब्राह्मणपणा फक्त कुळात आला आहे. गुणात नाही, हे मागील पत्रात बरेच सिद्ध झाले.

आता दुसरा वर्ण क्षत्रिय. याचे काम म्हटले तर यांनी देशाचे रक्षण करावे. या वर्णाची जबाबदारी ब्राह्मणांहून कमी, ब्राह्मणांनी लोकांस शहाणे करावे आणि क्षत्रियांनी शिपाईगिरी करून स्वराष्ट्र रक्षावे व नीतीप्रमाणे राज्य करावे. विद्येकरिता त्यांनी ब्राह्मणाचा प्रतिपाळ करावा व व्यापार नीट चालून सुबत्ता व्हावी, म्हणून वैश्यांचे रक्षण करावे. तसेच शूद्रांचे धारे कमी करून ओझे हलके करावे, असे तीन वर्णास सुखेकरून नांदवावे.

श्रीकृष्णांनी अर्जुनास गीतेत बोध केला, तो असा आहे की, ‘आपल्या धर्माप्रमाणे वर्तणूक कर. त्यात तुला मोक्ष आहे व इहलोकी कीर्ती आहे.’

असे सांगून अर्जुन वैराग्य घेत होता, त्याला प्रपंचात आणले आणि त्याजकडून राज्य करविले, व लढाई करविली. असा क्षत्रियांचा धर्म आहे.

हल्ली असा कोणी नाही. शूरत्व त्या मुलखातून गेले व परदेशचे लोक राज्य करीतात. क्षत्रिय धर्माचा लवलेशदेखील राहिला नाही. ही गोष्ट कबूल करावयास अवघड नाही. हिंदुस्थानात रजपूत आहेत, ते क्षत्रियच आहेत; पण जसे हल्लीचे ब्राह्मण आहेत, तसेच ते निस्तेज व हतवीर्य आहेत. यांस लुटावयाची

बुद्धी मात्र राहिली आहे. लोकांचे कल्याणाची बुद्धी नाही. व दक्षिणेत असे मत आहे की, क्षत्रिय वर्ण बुडाला. ही गोष्ट खरी आहे. जे क्षत्रिय आहेत, ते त्या कुळातील असोत; परंतु ज्यापेक्षा ते आपल्या धर्मास अनुसरत नाहीत, त्यापेक्षा ते क्षत्रिय नव्हत. हल्ली कोणी क्षत्रिय असते, तर राज्य परकी लोकांचे हाती का जाते? व धर्मही बुडता ना? तस्मात् ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन्ही वर्ण नाहीत.

आता तिसरा वर्ण वैश्य. या वर्णाचे लोक अद्यापि तैलंगण देशात कोमटी वगैरे आहेत; परंतु त्यांनी आपला धर्म सोडून दिला. व्यापार ते करते तर परकी लोक इकडे येऊन व्यापार करते ना! परंतु असे झाले, त्यापेक्षा वैश्यवर्णही बुडाला याप्रमाणे तीनही वर्णांचा अभाव झाला. आणि चवथा वर्ण शूद्र तेवढा मात्र बाकी राहिला आहे.

आता ब्राह्मण लोक बहुतकरून चाकरी करून पोट भरतात, व भट देवपूजा पत्करतात; तरी ती गुरवकी झाली. तस्मात् वास्तविक ब्राह्मण कोणी नाहीत. सांप्रत जितके लोक हिंदुस्थानात आहेत, तितक्यांचा एक वर्ण मला दिसतो की, हे सर्व शूद्र आहेत. इतर वर्णांची नावे मात्र घेतात; परंतु त्यांचे गुण व कर्म नाही.

हिंदुस्थानात तीनही वर्णांचे काम इंग्रज चालवितात. कसे म्हणाल, तर इंग्रज लोक शहाणे व विद्वान आहेत. तेव्हा ब्राह्मणांचे कर्म त्यात आले. दुसरे शिपाईगिरीचेही कसब त्यात आहे. हल्ली या देशात इंग्रजांचे लष्कर बलवत्तर आहे तेव्हा क्षत्रियांचे काम तेच चालवितात. व तिसरा वर्ण वैश्य. त्यांचा व्यापारही इंग्रजच करीतात. इकडील देशचे लोकांकडे फारसा व्यापार राहिला नाही.

तेव्हा बाकी चवथा वर्ण शूद्र. त्यांनी शेतकी करावी व चाकरी करावी. त्याप्रमाणे हिंदुस्थानातील सर्व लोक हल्ली वागतात. हे सर्व चाकर आणि शेतकरी आहेत. सर्व विद्येप्रकरणी थोरपणा व सैन्याधीशत्व व व्यवहारप्रकरणी ऐश्वर्य, ही सर्व इंग्रजांकडे आहेत. आता जे ब्राह्मण म्हणवितात, ते उगेच व्यर्थ अभिमान बाळगितात. एकाचे नाव त्याजवळ बहुत द्रव्य असल्यामुळे नवलाख्या पडले व पुढे त्याचे पणतू व नातू भिकारी झाले तरी त्यांस नवलाखे म्हणत असते; परंतु त्यांस ते शोभेना. लोक थट्टा करू लागले, तद्वत् ब्राह्मण लोक नीच व हीन झाल्यामुळे त्यांचा सर्वस्वी मान गेला. आता चार सरदार वगैरे आहेत; पण ते असे दिसतात की, जसे महामारीचा उपद्रव होऊन एका गावात दहा मनुष्ये मरतात व चारपाच असामींचा वाखा होऊन मरणोन्मुख होऊन

पडतात. का तर क्षणभराने ते मरावयाचेच. तद्वत् आताचे सरदार आहेत.

यावर कोणी लोक असा वाद करतील की, अजून शिंदे, होळकर, रास्ते व पटवर्धन आहेत. परंतु उपयोग काय? ते आहेत नाहीत सारखे. इंग्रजांनी सारखे आपले शहाणपणाने राज्य काबिज केले आहे. त्यांचे पराक्रमापुढे हे सर्व लोक अडाणी दिसतात. हे परम आळशी लोक आहेत व अज्ञानेकरून मदांध आहेत. याजमुळे मुलखात काय होते, हे त्यांस दिसत नाही. अद्यापि ज्याजवळ खाण्यापुरती सोय आहे, ते म्हणतात की, आमचे लेकीस व आमचे मुलास काही चिंता नाही. सर्व लोक भिकारी झाले तर झाले. असे म्हणून स्वस्थ बसतात. त्यांच्यामध्ये शहाणे इंग्रज अंमल करीतात. हे जसे एक गुराखी असला म्हणजे पन्नास गुरे हाकतो त्याप्रमाणे आहेत. याचे कारण काय? गुराख्याला शहाणपण असते व गुरास ते काही नसते. त्यांना जिकडे फिरविले तिकडे फिरतात. आणि गुराखी शहाणा असतो, म्हणून सर्व गुराची वागणूक त्याचे ध्यानात असते. याजमुळे पन्नास गुरांचे वास्तविक बळ पाहिले, तर एक मनुष्यापेक्षा शंभरपट जास्ती आहे. पण उपयोग काय? ते आंगचे बळ, अकलेचे नव्हे.

आमचे पन्नास मण बळ अकलेच्या पाव रतीस हात जोडून असते. उदाहरण, हत्ती अंकुशाने आज्ञेत असतो. जर त्यांस शहाणपण असते, तर तो महातास फेकून देण्यास उशीर न करता. सारांश, अक्कल ही सर्वांपेक्षा जास्त आहे व ती मनुष्यास ईश्वराची देणगी आहे. कोणी शहाणे व कोणी लोक वेडे असे पर्याय आहेत. हिंदू लोक इतर देशांचे लोकापेक्षा इतके नीचपणास का पावले आहेत? याचा विचार केला तर कारणे सापडतील. परंतु कित्येक लोक असे म्हणतात की, कारणे कशाची? सर्व सद्दीचा आणि नशिबाचा खेळ आहे. तर त्यांस असे उत्तर आहे की, सद्दी आणि नशीब अंशतः खरे आहे. परंतु सर्वांस ते लागू नाही. मी म्हणतो हल्ली इंग्रज एवढ्या पदवीस आले आहेत की, समुद्राचे व पृथ्वीचे मालक ते आहेत. व त्यांचा शहाणपणा वगैरे अधिक आहे. हा परिणाम कारणावाचून घडला नाही.

आता ही कारणे कोणती याचा विचार करावा. तसेच हिंदू मूर्ख झाले याची तरी कारणे आहेत. जसा शरीरात रोग होतो याचे कारण काय? हे त्या समयी लक्षात आले असते तर त्याचा उपाय केला असता. परंतु रोगाने वेढल्यानंतर तरी विचार करावा. मग असे म्हणू नये की, हे नशिबाने झाले. तसे म्हणणे हे अगदी वेडेपणाचे आहे.

मला वाटते की, जाती, धर्म वेगळाले केले त्याजमुळे एकमेकांचे मनात

द्वेष येऊन विभक्तपणा फार झाला. हे एक कारण असेल, किंवा ब्राह्मणांनी आपले कर्म विद्या वाढवावयाचे असून सोडून दिले आणि इतर लोकांसही शिकवावयाचे बंद केले. येणेकरून कोठेच काही नाहीसे झाले. हे एक कारण. आणखीही असे कारण आहे की, सांप्रत लोकांची समजूत वेडी झाली आहे. मागे वैद्यशास्त्र, ज्योतिष व कोश वगैरे जे काही ग्रंथ झाले, ते करणारे देव व ऋषी होते. त्यांची शक्ती आता कोणास यावयाची नाही, असे म्हणून त्यांनी विद्या सर्व बंद पाडिली. व अलीकडे सरासरी १५०० किंवा २००० वर्षांत ग्रंथ कोठे झाले नाहीत. व या घालमेलीत संस्कृत भाषा तर अगदीच बुडाली.

अलीकडे कोणी कवींनी वगैरे ग्रंथ केले आहेत. परंतु ते नवीन ग्रंथ नाहीत. ते ग्रंथ संस्कृत ग्रंथांचे तरजुमे आहेत. आणि कोणास असे वाटत नाही की आपण कल्पना वाढवून नवीन ग्रंथ करू किंवा देश फिरून पृथ्वी कशी आहे तिचा शोध करू. या लोकांची बुद्धी अगदी गेली आहे. आणि पूर्वीचे ग्रंथात जितके शहाणपण आहे तितके पुष्कळ मानून ते राहिले आहेत. येणेकरून अलीकडील दोन हजार वर्षांत नवीन युक्ती निघाल्या नाहीत व कोणी काढल्या तरी ग्रहण करीत नाहीत. पहिली चाल अशी होती की, भांड्यास भोक पाडून त्याने दिवस, घटिका मोजीत होते. आता अलीकडे घड्याळे निघाली आहेत. येणे करून भांडे बाळगावयास नको. घड्याळ जवळ बाळगिले म्हणजे सुलभपणाने दिवस, वेळ कळतो. परंतु अद्यापि जोशी वगैरे पाण्याचा उपयोग करतातच. कोणी घड्याळावर लगीन लाविले असा नाही.

याजवरून असे दिसते की, एक गरीब ब्राह्मण होता तो पंचा नेसत असे. पुढे त्याचा मुलगा दौलतवान झाला तथापि तो पंचाच नेसे; आणि सांगे की, आमचा बाप पंचा नेसत होता. याप्रमाणे आम्हीही नेसतो. आपला कुळाचार आहे तसे करावे हेच बरे. लोकांनी त्यांस पुष्कळ सांगितले तेव्हा त्याने रोज नेसावयाचा टाकून देऊन श्राद्धपक्षास नेसावयाचा बेत केला; परंतु मरेतोपर्यंत त्याने पंचाची खोड टाकली नाही. तसे हे हिंदू लोक दिसतात. यांची जी चाल मूळची आली आहे त्याप्रमाणे करण्याची इच्छा त्यांस फार असते. त्याचा उपयोग असो नसो, मूर्खपणा असो अथवा शहाणपणा असो, परंतु त्या वेळेस काळ कसा होता व आता कसा आहे, याचा सारासार विचार कोणीच करीत नाही. मागील चाल म्हणजे काय तो धर्म, असे समजतात. परंतु वास्तविक पाहिले तर धर्माशी आणि चालीशी फार अंतर आहे.

✦ ✦

## वर्णविचार

■

**पत्र नंबर ३९ : १७ डिसेंबर १८४८**

हल्ली ब्राह्मण जातीस मोठा अभिमान आहे. त्यांस असे वाटते की, आम्ही श्रेष्ठ, आमच्यासारखा कोणी पृथ्वीवर नाही. इतर लोक कसेही असले तरी आमची योग्यता पावणार नाहीत.

परंतु जातीविषयी कोणी गर्व करू नये. आपले कर्म तशी आपली जाती आहे. जात म्हणजे कर्मावरून योग्यता. क्षत्रिय म्हणजे त्यांनी युद्ध करावे, ब्राह्मण म्हणजे त्यांनी विद्या करावी. सोनारांनी सुवर्णाचे काम करावे. परीट यांनी वस्त्रे धुवावी. हीच कामाची नावे आणि जात. जातीची सोय वेगळी खाण नाही. सर्वांचे मूळ एक. याविषयी तुकारामांचा अभंग असा –

तुम्ही नका करूं गर्व। निज जाती म्हणुनी सर्व॥
शुक्रशोणिताची खाणी। तुम्हा आम्हा एकच योनी॥
रक्तमांस चर्महाडें। सर्वां ठायीं सम पाडें॥
अन्नउदक घरोघरी। निष्ठा नाही हो दूसरी॥
तुका म्हणे हेंचि खरें। नाहीं देवाशीं दुसरें॥१॥

याजवरून उघड न्याय होत आहे की, जातीचा अभिमान मानणारे मूर्ख आहेत. आणि जाती व्यवहारावरून आणि कर्मावरून झाल्या आहेत, यात संशय नाही. येविषयी मनूचे वचन आहे की, ब्राह्मणाचा शूद्र होतो आणि शूद्राचा ब्राह्मण होतो –

(अध्याय १०वा)

शूद्राय ब्राह्मणाज्जातः श्रेयसा चेत् प्रजायते।
शूद्रो ब्राह्मणतामेती ब्राह्मणश्चैती शूद्रताम्।
क्षत्रियाज्जातमेवं तु विद्याद्वैश्यास्तथैव च॥ (६५)

(अध्याय ७वा)

कुबेरश्च धनेश्वर्यं ब्राह्मण्यं चैव गाधिजः॥ (४२)

इत्यादी वचनेकरून असे सुचविले आहे की, धर्माचे फेरफाराने क्षत्रियाचा

ब्राह्मण होतो, शूद्राचा ब्राह्मण होतो, असे आहे.

मग आता दुसरे जातीचे लोक ब्राह्मणांचा गर्व हरण करण्याकरिता बळेच नमस्कार करीतात, बळेच अग्निहोत्र घेतात इत्यादी खटपट करीतात. आणि ब्राह्मणांचा मत्सर करीतात, यात त्यांस लाभ म्हटला तर काही नाही. ब्राह्मणांचे कर्म कोणी सुखाने करणार नाही. वास्तविक त्यात सुख नाहीच. फार उपद्रव. त्रास व कष्ट आहेत; परंतु तितकेही सहन करून नीच जातीचे लोक ब्राह्मणपणा मिळविण्याकरिता जो जो खटपट करीतात, तो तो ब्राह्मण चिडतात आणि दोघांचे वादविवाद सुरू होतात. त्यात अर्थ पाहिला तर काही नाही. माझे मते हल्लीचे ब्राह्मण आणि नीच जातीचे लोक हे दोघेही एकसारखेच आहेत. कारण की, उंच म्हणविणारे यांची व नीच म्हणविणारे यांची कर्मे समान आहेत. येविषयी प्रमाण –

त्र्यहेण शूद्रीभवती ब्राह्मणः क्षीरविक्रयात्।

इत्यादी वचने धर्मशास्त्रात आहेत. त्याप्रमाणे म्हटले, तर सर्व ब्राह्मण काही तरी दोषाने शूद्राचे योग्यतेस आले आहेत. आता कुळाचार मात्र राहिला आहे. दोरी जळाली पण पीळ राहिला. तसे हे आहे.

ब्राह्मणांस आपले कर्म काही ठाऊक नाही. सर्व प्रकारचा व्यापार, चाकऱ्या, धंदे हे करतात; विद्याशून्य व ज्ञानशून्य आहेत, हे ब्राह्मण कशाचे ? असे असता अभिमानाकरिता दुसरे लोक झटतात, हेही अज्ञान आहे. असो, भले लोकांनी जातीचा अभिमान कधी करू नये; त्यात काही हशील नाही. लोकांस असे वाटते की, ब्राह्मणांनी रामोशाची सोयरगत करावी काय ? तर असे नव्हे. साधारणतः असे कधीही होणार नाही. जे ब्राह्मण आहेत, हे ब्राह्मणांतच बहुधा सोयरगती करतील. ब्राह्मणांची सोयरीक मिळेल ती टाळून बळेच परिटाचे घरात शिरणे जरूर नाही. व कोणी तसे करणारही नाही. ज्या लोकांमध्ये जाती नाहीत त्या लोकांमध्येही असे करीत नाहीत. मोठा मुसलमान मोठे मुसलमानाशीच संबंध ठेवितो. ही परंपरा चाल आहे, बळेच कोणी अगदी शेवटल्याचे घरी जात नाही.

यास्तव जातिअभिमान सोडला, तरी जाती कायम राहतील. यात संशय नाही. परंतु तंटे व भांडणे मोडतील. मत्सर करणार नाहीत. इतका फायदा होईल. सर्व लोक एकत्रपणाने वागतील. ब्राह्मण असे म्हणणार नाहीत की, अमका तो महार आहे. त्याचे तोंड पाहू नये. त्याचा विटाळ होतो. ह्या वेडेपणा मात्र जाईल. मग तो महार अर्थातच ब्राह्मणांचे गर्विष्ठपणाचे शब्द ऐकून नीट

इंग्रजांचे घरी जातो आणि म्हणतो, ब्राह्मण आता फार मांजले. मी त्यांस हात दाखवीन. इंग्रज लोकांचे फौजेत नीच जातीचे लोक फार असतात; कारण त्यांस ब्राह्मण लोक तुच्छ मानतात. त्यांस उष्टे खावयास घालतात व केवळ जनावरांप्रमाणे समजतात. याजमुळे त्यांस उपाय सुचतो, तो ते करीतात. आणि ब्राह्मणांचे काम काढीतात. हा परिणाम जातिअभिमानाचा आहे. ब्राह्मण आपसांतदेखील फुटले आहेत. देशस्थ, कोकणस्थ, पळशे, कुडाळे, जौळ, खिस्ती, तीरगुळ, कराडे, किरवत, शेणवी इत्यादीक ब्राह्मणांच्या जाती असून, त्यांचे दरम्यान अनेक विपर्यास आले आहेत. आणि ते परस्परविवाह करीत नाहीत. ही चाल वाईट आहे.

ब्राह्मणांशी ब्राह्मणांनी खुशाल सोयरीक करावी. त्यांस त्याविषयी अटकाव असू नये. जर कोकणस्थाची जात मिळेल तर कोकणस्थाने कोकणस्थाची सोयरीक करावी; परंतु देशस्थाची करण्यास प्रतिबंध नसावा. जसे ज्यास सोईचे वाटेल, तसे त्याने करावे. बहुधा जो तो आपले जातीची आणि आपले देशाची मुलगी करील हे उघड आहे; जरी प्रतिबंध नसला, तरी दक्षिणेचा राहणारा गुजराथ्याची मुलगी करणार नाही, हे उघड आहे; परंतु याचा प्रतिबंध नसावा. आता जातीचे फार भेद जहाले. मराठे लोकांतही जातकुळाचा भेद, ब्राह्मणांचा पाहून झाला आहे. सात कुळातील मराठे विधवेचे लग्न करीत नाहीत. हा सर्व मूर्खपणा आहे. यात काही शहाणपण नाही; परंतु लोकांस जे मोठे वाटतात, त्याप्रमाणे ते चालतात. यास्तव हे लोक अभागी आहेत. ईश्वर त्यांस सुबुद्धी देवो.

# ६. हिंदूंचे आर्थिक जीवन

# आर्जवीपणा व डौलीपणा

▣

**पत्र नंबर १८**

सांप्रत काळी दोन दुर्गुण हिंदू लोकांत फार उत्पन्न झाले आहेत. एकाचे नाव दिवाळखोरी व दुसऱ्याचे नाव गुलामगिरी; अशी आम्ही त्यांस नावे ठेवितो. याहून दुसरे शब्द आम्हास सुचत नाहीत व जे या दुर्गुणानुगामी आहेत त्यांनी कीर्ती किंवा धन संपादन केले, असे लोकांस वाटून त्यांचा आचार अधिकाधिक वृद्धिंगत होत चालला आहे.

आम्हास मोठा चमत्कार वाटतो की, ज्या पुरुषास एक महिन्याचे वीस रुपये मिळत आहेत त्याने थोराचे नादी लागून तीस रुपयांचा खर्च करावा, यात काय कीर्ती आहे? परंतु असे करणाराचे मनात येते की, "साखरेचा खाणार, त्याला देव देणार." अशी म्हण लोकांत चालत आली आहे, परंतु मला तिचा खरेपणा काही वाटत नाही. गरिबाचे मनात येते की, मी थोरासारखा वागून त्यांचे मंडळीत मिरवेन; आणि तेणेकरून माझी मान्यता वाढेल. परंतु अशा डौलाने योग्यता चढत नाही. इतकेच होते की, तोंडावर कोणी मूर्ख म्हणत नाहीत. निष्पक्षपाती असेल, तो तोंडावरही म्हणतो. बाकी सामान्यतः पाठीमागे म्हणतात.

आता बहुत लोक असेही पाहण्यात येतात की, पाच रुपये महिन्याची मिळकत आणि पंधरा रुपयांचे त्यांच्या डोकीला पागोटे. एक म्हण आहे की, "मिजाज बादशहाची आणि अवलाद भडबुंजांची" अशी ते वहिवाट करीतात आणि पैसा नाहीसा झाला म्हणजे काही कामकाज वगैरे असेल तर लाच वगैरे घेऊन किंवा कोणास फसवून, बाता मारून, लबाड्या करून चार रुपये उपटतात. त्याजवर पोट भरावे व ते नाही तर बापआई याजवळ काही संपदा असली तर घरात उचकाउचक करावी; व तेही नाही तर शेवटी बाहेर चोऱ्या कराव्या, मग अब्रू जाईल ती जाईल; राहील ती राहील.

परंतु त्यांचे लक्ष्यांत असे वागत नाही की, वस्त्रप्रावर्ण, डौल आणि ढोंग यात थोरपणा काही नाही. आपले मिळकतीप्रमाणे आपण खर्च करावा. थोरांचे गुण घ्यावे. पण त्यांचा खर्च आपल्यास काय होय? थोरांनी विहिरीत उडी टाकली तर आपण कशास टाकावी? हे त्यांस कळत नाही. ते थोरांची बरोबरी करण्यास जातात व थोरांनी एके ठिकाणी पाच रुपये खर्च केला,

तर आपणही करीतात. आणि असे मनात आणीतात की, यांचे बरोबरीने खर्च केला, आता आम्हास याची योग्यता आली, असे लोक समजतील. परंतु जाणणारे आहेत, ते आपल्या मनात यांस मूर्ख म्हणून समजून उगेच बसतात. इतके हे दिवाळखोरीचे वर्णन झाले.

आता गुलामगिरी हा तर दुर्गुण सर्व हिंदू लोकांचा आहे, असे मला वाटते. यातून एकही मुक्त नाही. याजवर किती एक मूर्ख आपल्यास गोष्टी सांगणारे आर्जवी इत्यादी दुर्लौकिकाचे हुद्द्यावर मुकरर करीतात. आणि त्यांचा बहुधा मतलब असा असतो की, थोरांस दुर्गुण व नाना प्रकारच्या खोडी लावाव्या, अखेरीस त्यांस बुडवावे. जोपर्यंत त्याजजवळ अर्थ आहे, तोपर्यंत त्यांस भुलवून पैसा घ्यावा व त्याजकडे कामकाज असले तर त्याजवळ लोकांची मध्यस्ती करून लाच देववावी व आपणही काही खावी व नेहमी स्तुती करावी व ते जे म्हणतील त्यांस रुकार द्यावा. नेहमी बरोबर फिरावे. असे लोक बहुत झाले आहेत व बहुधा द्रव्याची ठिकाणे अशा लोकांनीच वेष्ठिली आहेत.

यातच भटभिक्षुक यांस मानले पाहिजे, कारण हे आर्जवी लोक आहेत. ते काही धर्मरक्षक नव्हत. परंतु त्यांचा व्यापार इतकाच की, यजमानाने चोरी व लबाड्या इत्यादी गुन्हे करून द्रव्य आणिले तरी चिंता नाही, भटास खावयास घातले म्हणजे झाले. इतकाच त्यांचा हेतू. आणि द्रव्यवानाने कसेही कर्म केले ती त्यांस शास्त्रार्थ काढून द्यावा; असे लबाड लोक बहुत धर्म म्हणून बाळगतात. परंतु ते उभयलोकी अकल्याणकारक आहेत. कोणताही श्रीमंत पहा, त्याचे घरी पंक्तीबारगीर फार असतात. परंतु त्याची निवड केली तर शेकडा दोनचार उपयोगी निघतात. बाकी सर्व गुलागगिरी करणारे होत; असे विचारी आहेत यांचे मनात येईल. अस्तु.

ही चाल या लोकांत बहुत आहे. आणि जे केवळ गरीब आहेत, ज्यांस खावयास नाही, तेच असे करीतात असे नाही. ज्यास स्वार्थ आहे त्यासही ही निर्लज्जपणाची गुलामगिरी करावी असे वाटते. आणि आपल्याहून थोर म्हटलेले असतात, त्यांचे ते आर्जव करतात? बहुत स्तुती करतात आणि आपले घरून त्यांचे घरी जाऊन पायमळणी करतात. तेणेकरून त्यांस असे वाटते की, आम्ही त्याच्यासारखे होऊ आणि आमची प्रतिष्ठा अधिक होईल. परंतु लोक त्यांस मूर्ख मात्र म्हणतात. आणखी काही होत नाही. पहिला थोरपणा आणि स्वतंत्रपणा असतो, तोही जातो.

आम्ही किती एक लोक असे पाहिले आहेत की, जोपर्यंत शिरस्तेदारी, नाझरी किंवा असा दुसरा कोणता मोठा हुद्दा कोणा माणसाकडे आहे तोपर्यंत

त्याजकडे हरवक्त लोक येतात. व मेजवान्यांची बोलावणी येतात. जसे कोणी म्हणेल की, याचा व त्यांचा परमस्नेह हर एक प्रकारे " जीवश्च कंठश्च " आहे; परंतु त्याजकडील काम गेले म्हणजे तो जर मरावयास भूमीवर काढला असेल तर तो जिवंत आहे काय, असा समाचारही घेत नाहीत. व पूर्वी ज्यांचे बंधू असे म्हणवीत होते, त्यांचा मुलगा भीक मागू लागला तरी त्यांस एक दिवस देखील बोलावीत नाहीत. कामावरून दूर झाला म्हणजे बोलावण्याचे यादीतून त्याचे नाव निगते. असे ते स्नेही. या प्रकारे करून आर्जवी लोक वेष घेऊन लोकांस बुडवितात. त्यांचा सर्व काळ हाच उद्योग. हे लोक " असतील शिते तर मिळतील भुते " याप्रमाणे आहेत आणि इतकेही करून नफा काय ? पोट मात्र भरते आणि मेले तर पाठीमागे व जिवंत असताना दुष्कीर्ती लोकांत होते. असे आयुष्य घालविण्यापेक्षा गरीब राहून मेहनत करावी व स्वतंत्रपणाने भाकर मिळाली तर ती आगंतुकीपेक्षा बरी, परंतु हा स्वतंत्रपणाचा लाभ कोणास कळत नाही. मुळापासून हिंदुस्थानात एकतंत्री राज्य. याजमुळे लोक सतकी गुलामगिरी करावयास शिकले. दुसरे कारण दिसत नाही.

नाना फडणीस यांची गोष्ट सांगतात की, मराठे लोकांत नाना फडणीस शहाणा प्रधान होता. तो बाजीराव झाल्यावर बडतर्फ झाला व त्यांस काही कामकाजही नाहीसे झाले. तेव्हा कोणी त्याचे मित्राने सुचविले की, आता तुमचा वृद्धापकाळ झाला व बाजीरावाचे तुमचे नीट नाही, त्यापेक्षा सरकारात विनंती करून काही पोटापुरती नेमणूक करून घेऊन काशीस जावयाचा बेत करावा. त्याजवर त्यांनी उत्तर दिले की, स्वामींची सेवा मरणापर्यंत करावयाची; आपले कामावर मरावे, असे सांगितले आणि, त्याप्रमाणे केले, तात्पर्य, मराठे लोकांची चाल याप्रमाणे आहे की, जन्मपर्यंत चाकरी करावी, चाकरीसारखे दुसरे सुख मानीत नाहीत. हाही गुलामपणाच आहे.

चाकरी हे नित्यकर्म होय. हे कामापुरते करावे आणि सामर्थ्यानुसार लवकर सोडावे. परंतु जे लबाड लोक आहेत ते नेहमी नीटपणे चाकरी करीत नाहीत. यास्तव बहुत दिवस ते चाकरी करतात. सरकारी चाकरी हे लोकांचे धर्माप्रमाणेच काम आहे. व हे नीट करण्याहून दुसरा सद्धर्म कोणता नाही. असे मनात न आणितार ते असे समजात की, सरकार चाकरी चांगली मिळाली म्हणजे आपणास भूमीतील द्रव्य सापडेल; मग पाहिजे तसे करावे, लोकांस बुडवावे आणि आपले घर भरावे. द्रव्य मिळविण्याचा हाच हंगाम आहे, असे जाणून त्याप्रमाणे ते जुलमाची वहिवाट करतात. म्हणूनच अशी लबाडी करावयाचे ठिकाण सोडून त्यांच्याने जाववत नाही. इतकाच नेटीव लोकांचे स्वभावाचा

अर्थ दिसतो आणि जो शोधून पाहील त्यांस असेच वाटेल की, हे लोक फार अप्रामाणिक व लोकांस बुडविण्याविषयी धुरंधर आहेत. याची म्हण अशी आहे की, ‘सरकारचे खाऊ नये तर कोणाचे खावे ?’

तर मनुष्यास स्वस्थतेचे सुख व व्यापार-शेतकी वगैरे धंदे यातील थोरपणा समजेल तर ते चाकरी तुच्छ मानतील. परंतु ते कळत नाही. याजमुळे अशी दुराशा धरून लोक दुष्टपणा करतात. याजमुळे आपले लोक आपल्या राज्यास मुकले आहेत. कारण स्वदेशीय राजाचा जुलूम लोकांस सोसवत नाही. इंग्रज व परकी दुसरे बरे वाटतात. अस्तु. नेटीव लोकांनी आपला लुटारूपणाचा स्वभाव गुलामगिरी आणि दिवाळखोरी ही सोडून स्वदेशी लोकांचे हिताविषयी विचार केला पाहिजे. गुलामगिरीपासून दिवाळखोरी होते. जर मनुष्य आपला स्वतंत्रपणा राखील तर त्यांस दुसऱ्यासारखे करण्याची जरूर नाही. गुलामगिरी आणि दिवाळखोरीपासून लुटारूपणा वगैरे अनर्थ होतात.

## हिंदू लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता

**पत्र नंबर ४४ : २१ जानेवारी १८४९**

प्राचीन काळचे हिंदू लोक हे आपले देशात स्वस्थ होते, परकी लोक या देशात फार येत नव्हते व प्रजा थोडी होती, हे प्राचीन काळचे इतिहासावरून कळते. कारण दक्षिणभागी हिंदुस्थानात पहिली वस्ती थोडी व अरण्ये फार होती. हिंदुस्थानात उत्तरभागी मात्र लोक रहात होते व तेही फार थोडे असतील. हे याजवरून दिसते की, त्या वेळचे राज्याच्या राजधान्या फार जवळ जवळ होत्या; म्हणजे अयोध्या, मथुरा, कानपूर, हस्तिनापूर इत्यादी; याजवरून त्या राजाचे राज्य संक्षेपित होते, यात संशय नाही. व लोकही विरळा असतील आणि पीकपाणी फार, यामुळे शिल्लक रहात असेल.

कारण जितके लोक खाणारे होते तितक्यांचे उद्योगाने जे पिकत होते ते फाजील रहात होते, याजमुळे आळसांच्या प्रवृत्ती निघाल्या. आता तसे नाही. आता लोक फार वृद्धिंगत जहाले व त्यांस खावयास मिळत नाही; कारण सर्व उद्योग करीत नाहीत. जितके लोक उद्योग करतात तितक्यांचे उद्योगाचे

उत्पन्नावर आळशी लोक फार जाले, त्यांचा निर्वाह होत नाही. तत्रापि उद्योग करण्याचे या लोकांस अजून समजत नाही.

मुख्यत्वेकरून ब्राह्मण लोक उद्योगाचे शत्रूच आहेत. ते पहिल्याप्रमाणे पहातात; परंतु त्यांचे शापाचे ढोंग होते, ते अगदी गेले, त्यांस जेवावयास दिल्हे म्हणजे ईश्वर तृप्त जहाला; त्यांचे मुख तेच देवाचे मुख; त्यांचा हात तो देवाचा हात; हे ढोंग लोकांस कळून आले. हे फुकट खाणारे असे लोक समजतात. परदेशचे लोक या देशात आले, त्यांनी तर या ढोंगाची परिस्फुटता फारच केली. सर्व आळशी लोकांस पुरेल अशी सामग्रीही या देशात नाही. जसे एका घरात दहा मनुष्यांचे अन्न असते, तेथे पंचवीस पाहुणे आले म्हणजे घरच्या माणसांनी उपाशी रहावे तरच पाहुण्यांचा काही निर्वाह होईल. तशी या देशाची हल्ली स्थिती आहे. पहिल्याने मुसलमान लोक या देशात आले. बाहेरचे लोक जे येतात ते काही मेहनत करण्यास येत नाहीत; ते आयते खावयास येतात. तेव्हा हजारो मोगल लोक नबाब, अमीर, सरदार हे या लोकांचे उद्योगावर खाऊ लागले. मग अर्थातच या लोकांस कमती पडू लागली.

नंतर अलीकडे इंग्रज इकडे आले. तेही काही इकडे शेतभात मळाटळा करण्यास आले नाहीत. ते इकडे श्रीमंत होऊन चार पैसे इकडून घेऊन घरी जावे यास्तव येतात. व ते शहाणे आहेत. तेव्हा ते गरीब लोकांप्रमाणे का खपतील बरे ? त्यांनी सुखाचा जागा, मोठाली कामेकाजे उपटली. हजारो इंग्रज लोक अमीरांप्रमाणे इकडे येऊन रहातात. व हजारो इंग्रज शिपाई इकडे येतात. इतक्या या लोकांचे पोषण हिंदू लोकांचे मेहनतीने जे उत्पन्न व्हावयाचे त्यातच होते. वास्तविक म्हटले तर फार पाहुणे आले म्हणजे त्यांनी उपाशी रहावे. परंतु हे साधारण पाहुणे नव्हत. ते शूर, विद्वान्, गुणी व जबरदस्त आहेत. तेव्हा आपले लोकांपुढे ठेविलेल्या पत्रावळी त्यांनी ओढल्या आणि हे लोक त्यांचे तोंडाकडे पहात बसले. याजमुळे या लोकांस पाऊस पडूनही दुर्भिक्ष आहे. कोणत्याही देशात तेथील लोकांचा सुखेकरून निर्वाह व्हावा, इतके पीक होते; परंतु जर बाहेरचे लोक त्यात पुष्कळ आले तर जमिनीने अन्न सर्वांस कोठून पिकवावे व पुरवावे ? याजमुळे हे लोक भिकारी झाले आहेत. अमीरपणा, शिपाईगिरी, राज्यकारभार या लोकांकडे होता तेव्हा कोणतेही प्रकारचे दुर्भिक्ष नव्हते. कारण देशात जे उत्पन्न होत होते ते खाऊन ते स्वस्थ होते. ही गोष्ट स्पष्ट रीतीने कळण्याकरिता मी थोडा अजमास करून हिशेब लिहितो.

सरासरी हिंदुस्थानात एकंदर पाच लक्ष कोस औरस चौरस आहेत. त्यापैकी अडीच लक्ष कोस राने, डोंगर, नद्या, खडक, झाडे, घरे, शहरे इत्यादिकांमुळे

नापीक आहेत. ते वजा देऊन बाकी अडीच लक्ष कोस चांगले पिकाचे आहेत आणि एकंदऱ्या देशात माणसे दहा कोट आहेत. तितक्यांना अन्न पाहिजे तेव्हा याची वाटणी बसविली तर दर एक कोसास चारशे माणसे पडली. त्यात चारशे माणसांपैकी निम्मे स्त्रिया. बाकी दोनशेपैकी शंभर माणसे उद्योगावाचून म्हणजे आजारी, वृद्ध, बाळे, आंधळे वगैरे व्यंग व व्यापारी, अंमलदार, तमासगीर, श्रीमंत हे सरासरी शंभर. बाकी शंभर राहिले, ते काम करणारे. इतक्यांनी मेहनत करून चारशे लोकांचा निर्वाह करावा. तेव्हा शंभर माणसे एक कोस जमिनीत खपली तर चारशांचे पोट भरण्याइतके उत्पन्न करतील, किंबहुना जास्ती करतील.

परंतु काळेकरून लोकांमध्ये श्रीमंती वाढत चालली, तो आळशी लोक वाढत चालले. म्हणजे जो एकटा श्रीमंत आहे तो आपणच कामे केल्याशिवाय खातो असे नाही. त्यांस चाकर पाहिजे, घोडे पाहिजेत. परीट धुवावयास पाहिजे, शिंपी शिवावयास पाहिजेत, ऊन लागेल म्हणून अब्दागिरी पाहिजे. रस्ता दिसत नाही म्हणून मशालजी, चोपदार इत्यादी मिळून तो एकटा पंचवीस माणसे घेऊन बसला. आणखी जो जो श्रीमंती वाढली तो तो गाणारे पाहिजेत, वाद्ये वाजविणारे पाहिजेत, देवपूजा करावयास भट पाहिजे व पंक्तीस दहा पाने पाहिजेत, हे अनर्थ झाले. तत्रापि सर्वांचा भार शंभर माणसांनी सोसला आणि सुखेकरून राहिले. परंतु आता काय झाले की, या लोकांच्या ताटात इंग्रज लोक, मुसलमान लोक आले व काही बरोबर घेऊन आले नाहीत. आमच्यापैकी खावयास आले आणि तेही एकटे खाणारे नव्हेत. एक एक असा श्रीमंत की, त्यांचे मागे पन्नास रिकामे माणूस; कोणी घोडे खाजविणारा, कोणी रथ हाकणारा, कोणी हिशेब लिहिणारा, कोणी कारकून, कोणी कपडे नेसविणारा, कोणी शिजविणारा, कोणी पोराला दूध पाजणारा असे होते. कारण ते स्वतां काही काम करावयाचे नाहीत. याजमुळे हा समुदाय चारशांमध्ये येऊन पोचला व आपले लोक जे श्रीमंत होते हे काही आपली खोड टाकीत ना. ते श्रीमंती असावी अशी इच्छा करणार व इंग्रज तशीच इच्छा करणार. तेव्हा दोघांचा निर्वाह चालेना आणि आपले लोक भिकारी होत चालले.

ब्राह्मण म्हणतात की, आजपर्यंत आम्ही काम कधी केले नाही व पुढे करणार नाही. स्त्रिया काम करावयाच्या नाहीत. तेव्हा इतक्या सर्वांचा निर्वाह कसा होईल ? याजमुळे जरूरी येऊन पडली की, आपले लोकांनी श्रीमंती सोडावी आणि ती सर्व इंग्रजांकडे द्यावी, तरच निर्वाह होईल. व काही काळ असेच चालले तर आपले लोकांत एकही श्रीमंत वाचणार नाही. कारण श्रीमंती राहणे अवघड पडेल. इतक्यांचा निर्वाह होत नाही. याजमुळे हे लोक अर्थातच भिकारी

झाले. त्यात आणखी या देशातील कामे व व्यापार इंग्रजांनी घेतले. जड्ज तेच; माजिस्त्रेट तेच; वस्त्र विकणारे तेच; माल आणणारे तेच; टकसाळ घालणारे तेच व शिपाई तेच. इतक्या लोकांची कामे पूर्वी आमचे लोकांमध्ये होती तेव्हा ठीक होते. परंतु ती सर्व त्यांचे हाती गेली, तेव्हा ज्या ज्या लोकांची कामे त्यांनी घेतली ते ते लोक रिकामे झाले आणि उपाशी मरू लागले. यात त्यांनी इतक्या सर्वांस अन्न कोठून पुरवावे ?

तेव्हा परिणाम असा होईल की, आपले लोक सगळे शेतभात करणारे होतील. आणि श्रीमंत, सावकार व अमलदार इंग्रज होतील. जितकी मेहनत करून पिकवावयाचे काम, तितके आपले लोकांकडे राहील. जितके सुखाने खाऊन रहावयाचे काम तितके ते लोक बळकावतील. तेव्हा अर्थातच हे लोक भिकारी झाले. परंतु इतकी मजल येऊन पोचली नाही. कारण अद्याप कोठे काही संस्थाने आहेत व ती जरी धुंदीत आहेत तरी द्रव्यवान आहेत. याजमुळे चार माणसांचा निभाव होतो व हिंदू लोक सुखी आहेत, असे नजरेस पडतात. परंतु हे फार दिवस चालणार नाही. कारण जी संस्थाने आहेत, ती मृतप्राय होऊन राहिली आहेत. कोणामध्ये शहाणपण नाही. ती एका पाठीमागून एक जाणार. अस्तु.

असा प्रसंग आला, तेव्हा आपले लोकांस सुखी होण्याची युक्ती कोणती म्हणाल, तर अशी आहे की, जितके इंग्रज लोकांचे व्यापार व रोजगार इकडे कमी होतील तितके या लोकांस जास्ती सुख आहे. याजकरिता या लोकांनी विद्या व ज्ञान यांचे प्राप्तीस झटावे व इंग्रजांप्रमाणे शहाणे व्हावे आणि जे व्यापार ते करतात ते आपण करावे. कोणी म्हणतील की, त्यांस द्रव्य अनुकूळ आहे आणि या लोकांजवळ द्रव्याची अनुकूळता नाही, तर ही गोष्ट खरी; परंतु त्याचा निर्णय आज लिहिणे जरूर नाही; जेव्हा सर्व लोक पुढे सरावे अशी इच्छा करतील व रानटीपणाच्या समजुती सोडून देतील, तेव्हा अनुकूलता सहज होईल.

✦ ✦

# हिंदू लोकांची द्रव्योपयोगाविषयींची समजूत

■

**पत्र नंबर ५१ : ११ मार्च १८४९**

मागील पत्रात विद्येचा उपयोग विद्वान लोक या देशात करीत नाहीत, म्हणून लिहिले आहे. व आता एक गोष्ट आम्हास सुचली आहे की, द्रव्यवान लोक द्रव्याचाही उपयोग करीत नाहीत. द्रव्य कोणत्या रीतीने वृद्धिंगत करावे, हे त्यांस अश्रुत आहे व द्रव्य वृद्धिंगत केले असता फार उपयोग होईल, हे त्यांस कळत नाही.

यास प्रमाण-प्रथम लग्न, मुंज वगैरेमध्ये समारंभात हिंदू लोक पुष्कळ द्रव्य खर्च करतात, व भटांस खावयास घालून उधळितात. दुसरे प्रमाणे-हे लोक द्रव्य असले म्हणजे लागलेच दागिने करतात आणि घरात साठवितात. त्यांस असे तर वाटत नसेल ना. द्रव्य जसे आम्ही अन्यायाने मिळविले तसे अन्यायाने खर्च करावे? किती एक लोक म्हणतात की, जितका खर्च केला तितकी अधिक जमा होते. किती एक म्हणतात की, साखरेचा खाणार त्यांस देव देणार! किती एक म्हणतात की, नशिबी असेल त्यांस द्रव्य मिळेल. या प्रकारची किती एक मूर्ख मते चालू आहेत व त्यांस भट वगैरे लोक साहकारी आहेत. ते म्हणतात की, द्रव्यवान आहे तो पुण्यवान आहे. द्रव्याने मोक्षास जातो. म्हणजे त्यांस सध्या खावयास मिळते.

बहुधा अन्यायानेच हिंदू लोकांमध्ये द्रव्य संपादन केलेले असते. कोणी स्वकष्टार्जित मेहनतीने मिळवीत नाहीत, म्हणून असा मूर्खपणाने व्यय करतात. जो मेहनतीने मिळवितो तो असे कधी करणार नाही. जे द्रव्यवान आहेत त्यांस व्यापार करण्याचे वगैरे ज्ञान नसते व ते बहुधा मूर्ख असतात. म्हणून त्यांचे प्रथम कर्तव्य हे असते की, दहा हजारांचा जडावांचा कंठा, पन्नास हजारांची पोची, छपन्न हजारांची आंगठी इत्यादी पदार्थ घेऊन घरात ठेवावे. साधारण श्रीमंतांकडे पहा की, त्यांचे घरी दागिने जितक्या किंमतीचे असतात तितका पैका त्यांचा व्यापारात किंवा कोणत्याही उद्योगाचे कामात नसतो. जशा मुंग्या बिळात धान्य साचवून ठेवतात, त्यांस पेरावयास समजत नाही. आणि ते धान्य सरले म्हणजे पुन्हा शोधावयास जावे व कोणाचे सापडेल ते आणून पुन्हा साठवावे, पुन्हा खावे असे त्या करतात; तद्वत् हिंदू लोक आहेत.

माझे म्हणणे या लोकांनी अलंकार अगदी टाकावेत असे नाही. परंतु

ज्यांजवळ लाख रुपये आहेत याने फार झाले तर दहा पाच हजारांपर्यंत भूषणे वगैरे जिन्नस बाळगावे व बाकीचा पैसा उपयोगास लावावा. परंतु श्रीमंत लोक ज्याजवळ द्रव्य आहे, ते पैसा रोख काही बाळगीत नाहीत आणि उपयोग करीत नाहीत. म्हणतात की, रोख पैसा कशास पाहिजे? सोने घेऊन टाकले म्हणजे घरात राहील आणि द्रव्याचा पायात बिड्या पडतील; मग कोठे जाणार नाही. कालदेशवर्तमान आहे; आपली मुलेमाणसे मोडून खातील असे म्हणतात. परंतु हे लोक किती मूर्ख आहेत हे याजवरून पहावे. यांस असे कळत नाही की, द्रव्य ही चालती वस्तू जितकी अधिक फिरेल तितकी चांगली. यास्तव व्यापार इत्यादी मोठी कामे अंगीकारावी व धर्म तरी यथायुक्त करावा.

परंतु ते काही न करून द्रव्य घरात बाळगतात, उराशी धरून निजतात आणि मरतेवेळेस काळजी करतात की, माझे इतके धन आहे याची व्यवस्था कोण करील? रात्र आली म्हणजे म्हणतात की, माझे घरावर आज दरवडा तर यावयाचा नाही ना? अशी काळजी करतात. चोऱ्या होतात. एकदा चोरी झाली म्हणजे सर्व द्रव्य घेऊन जातात. किती एकाची मुले वाईट निघतात, ती द्रव्य उधळून टाकतात. किती एकांच्या बायका लबाड निघून द्रव्याचा नाश करतात. जी द्रव्याची गाठोडी बांधून ठेवतात ती थोडेच दिवसांत नाहीशी होतात व अशा द्रव्यसंग्रहाने मुले अवश्य वाईट निघतात. कारण की, त्यांस प्रथम शिक्षा ही लागते की, घरातून बाहेर जाऊ नये; कारण गेले तर द्रव्य कोठे ठेवावे? यास्तव रात्रंदिवस घरात बसतात आणि त्यातले मोडून खातात.

वास्तविक पाहिले तर मुलास बापाने पंचवीस वर्षांपर्यंत खावयाची बेगमी ठेवली आणि त्यांस शहाणे केले म्हणजे पुष्कळ जाहले. जो बाप मुलास जन्मापर्यंत पुरेसे साचवून ठेवतो आणि त्यांस विद्या वगैरे शिकवीत नाही, परंतु आळशी व निरुपयोगी मूर्ख करतो, तो त्याचे अनहितकर्ता आहे. व देशाचा लुटणारा आहे; कारण की, सर्वांचा पैसा हरण करून त्याने आपले घरी मूर्खांचे जीवन होण्याकरिता व लबाडी वृद्धिंगत होण्याकरिता ठेविला, असे होते.

यास्तव जे बाप मुलास पुष्कळ द्रव्य ठेवतात, त्यांनी त्या द्रव्याचा उपयोग करता यावा, अशी मुले चांगली करावी. परंतु त्यांचे कपाळी बहुधा मूर्ख पुत्र असावे असे असते व असे करण्यास तेही कारण होतात. पैसा अशा रीतीने साचवून ठेवण्याची खोड या लोकांस लागली आहे. याजकरिता बहुत लोकांस दुःख होते. कारण या रीतीने सुखवृद्धी व्हावयाची ते मार्ग ज्यांचे हातात असतात, तेच त्या मार्गांस बंद करतात आणि आपण मूर्ख होऊन द्रव्याचा व्यय मूर्खपणाने करतात. हा सांप्रदाय फार वाईट आहे. यास्तव ज्या ज्या

जवळ द्रव्य आहे, त्यांनी त्यांनी चांगला विचार करावा की, याचा उपयोग कोणता करावा? आणि जेणेकरून लोकांचे हित होईल व आपले द्रव्याची वृद्धी होईल असे उपाय करावे.

हिंदू लोकांत अनंत गोष्टी कमी आहेत व त्यांस अजून पुष्कळ शहाणे करावयाचे आहेत, अशा कामात द्रव्य घालतील तर मोत्यांचा कंठ्या, पोच्या, शिरपेच घातल्यापेक्षा शोभा अधिक पडेल. यात संशय नाही.

## हिंदू लोकांचा व्यापार

■

**पत्र नंबर ५७ : २२ एप्रिल १८४९**

सांप्रत हिंदू लोक भिकारी होत चालले आहेत व त्यांस रोजगारधंदा नाही. याचे कारण मला असे दिसते की, या लोकांचा व्यापार अगदी बुडाला; इंग्रज व दुसरे देशचे लोक फार शहाणे होऊन या लोकांस सर्व जिनसा पुरवितात. आणि हे मुकाट्यांनी स्वस्ताईमुळे खरेदी करतात.

यास्तव या लोकांनी एकत्र होऊन जर असा कट केला की; आपले देशांत दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाही; आपले देशांत पिकेल तेवढाच माल घ्यावा; आपले लोक कापडे जाडी वाईट करतात, परंतु तीच नेसावी. इकडे छत्र्या करतात, त्याच घ्याव्या, म्हणजे या लोकांत व्यापार राहून इकडे सुख होईल. परंतु हे लोक असे करीत नाहीत. आणि थोडी किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. वास्तविक पाहिले तर हल्ली दाणे मात्र इकडे पिकवून हे लोक खातात. अजून दाणे परदेशातील येऊ लागले नाहीत. बाकी सर्व पहावे ते परदेशचे आहे. आमचे कपडे, आमची छत्री, आमची चाकू-कात्री, आमचे घड्याळ, आमची गाडी, आमची बुके, सर्व परदेशातील आहेत. आम्ही दाणे मात्र आपले खातो. यामुळे सर्व व्यापार बुडाला. उदमी, मजुरदार, कसबी, कारागीर घरी बसले. आणखी तर काय सांगावे, परंतु आमचे रुपये, आमचे घरास सनकाड्या देखील युरोपच्या. इकडे लोक पैशाच्या शंभर सनकाड्या देतात. त्या पेटवावयास विस्तव पाहिजे; ठेवावयास मोठी जागा पाहिजे; परंतु विलायतेचा सनकाड्या सुंदर पेटीमध्ये तयार करून भरलेल्या

पैशाचा शंभर मिळतात. विस्तव पेटवावयास नको. अशी सोय पाहून आम्ही आपले देशचा लोकांचा सनकाड्या घेत नाही. परंतु याजमुळे आमचे लोक किती भिकारी झाले आहेत!

याजकरिता सर्वांही असा कट करावा की, जे आपल्या देशांत पिकेल तेच नेसू, तेच वापरू, कसेही असो. आणि तितक्यात चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास विद्या शिकू. आम्हास मिळेल तसेच घेऊन आम्ही काळ काढू. मग हजारो खंडी कापूस इकडून विलायतेस कशास जाईल? कापूस विकणारांनी असा बेत करावा की, इंग्रजास इकडे तयार केलेली कापडे द्यावी, परंतु कापूस देऊ नये. येणेकरून हे लोक सुखी होतील. सांप्रत आपलेच लोक आपल्या लोकांस मारीत आहेत. जशी बाहेरची चांगली स्त्री पाहून घरची लग्नाची स्त्री टाकून तिचे पाठीस लागतात आणि भुलतात, तसे या लोकांचे झाले. येणे करून हाहाकार झाला आहे आणि जो तो शेत करू लागला. दुसरा व्यापार काही नाही.

परंतु शेत करण्यात तरी काय नफा? वर्षभर मजुरी मरेमरेतो करावी तरी लंगोटी आणि शिळी कोंड्याची भाकर देखील मिळावयाची भ्रांति. बहुत दाणे पिकवितात, परंतु घेतो कोण? पैसा दुसऱ्या देशांत चालला. श्रीमंत लोक, ज्याजवळ लाखो रुपये आहेत, ते विलयती जिनसा घेतात आणि पैसा उडवितात. त्यांचे पोटास पावशेर दाणे पाहिजेत, त्याची मात्र किंमत रयतेकडे जाते. बाकी हजारो रुपये विलायतेस थेट जातात. याप्रमाणे हमेश चालले आहे. असा कट करणे वगैरे उपयोगी गोष्टी आहेत, त्या पुराणिक, हरदास यांनी लोकांस सांगाव्या, त्या टाकून दुसऱ्या गोष्टी सांगतात आणि याजकडे लक्ष्य देत नाहीत.

लोक भिकारी झाले, याचे कारण कोणी मनात आणीत नाहीत. जर हरदास व कथेकरी यांनी अशी मते घेतली आणि लोकांस जर भरविली, तर बहुत लोक एकत्र होतील. कारण की, ही गोष्ट उघड आहे. परंतु देव आधी बुद्धी नेतो मग भांडवल नेतो. तशी या लोकांची बुद्धी पापाचरणाकडे गेली. नंतर या संकटात ते आले, परंतु सर्व मागील पुराणातील कथा एकीकडे ठेवून हल्लीचे लोकांची स्थिती सुधारण्याबद्दल लोकांस उपदेश केला. तर महान पुण्य आहे. तसे हे हरदास करीत नाहीत. चांगल्या गोष्टी छापखान्यातून निघाव्या, असेच नाही. हरदासांनीही काढाव्या व त्यांस लोक एकत्र करण्याची फार शक्ती आहे, कारण की, ते चौघांत उभे राहून उपदेश करण्याचा आरंभ करतात. त्यांनी असे उपयोगी विषय लोकांस शिकविले, तर सर्व आख्यानांहून ही आख्याने चांगली होतील.

आणखी लोकांस समजवावे की, तुम्ही मूर्ख आहा. विचार करीत नाही. यास्तव विचार करा. व विद्या करा. व विलायतेतील लोकांप्रमाणे अक्कलवान व्हा. म्हणजे तुम्हास लक्ष्मी अनुकूल होईल. छापखाने पुष्कळ ठेवा. पुष्कळ ग्रंथ वाचा, म्हणजे तुम्हास सर्व बातम्या लागतील. लष्करच्या भाकऱ्या कोण भाजतो, असे म्हणू नका. परदेशांत गेले तर विटाळ होतो; ही कल्पना सोडा. म्लेंच्छांच्या देशांत जाऊ नये, म्हणून अटकाव होता. पण आता तुमचा देश म्लेंच्छांचा झाला. तेव्हा तो शास्त्रार्थ राहिला नाही. तात्पर्य विद्या करा. विद्वानांचे ऐका. मदोन्मत्त होऊ नका. अशा प्रकारचा कथा सांगितल्या. तर फार फायदा होईल.

हे गोसावी कथा करतात, हे व्यर्थ लोकांस आणखी मूर्ख करतात. कारण की अमानुष गोष्टी त्यांस सांगतात. काळवयन आला आणि कृष्णाने त्याला मुचकुंदाचे हातून जाळिला. रामास संकट पडले, तेव्हा मारुतीने एक पाय लंकेत आणि दुसरा अयोध्येत ठेवला. भीष्म ऐकेना तेव्हा अर्जुनाने पाशुपतास्त्र व नारायणास्त्र सोडिले, या गोष्टी सांगून काहीतरी उपयोग आहे काय? आता लोक भिकारी आहेत. याजवर सोन्याची वृष्टी होत नाही व मागील गोष्टी झाल्या, तशा आता होत नाहीत, यात संशय नाही. तस्मात् अमानुष कथा लोकांस सांगितल्या, तर लोकांस काही उपयोग नाही. त्यांस आळशी अधिक करण्याचा मात्र उपयोग आहे.

परंतु त्यांस काही माणसासारख्या कथा सांगाव्या की, अमुक राज्य हे कशाने गेले? दिल्लीचे राज्य, बाजीरावाचे राज्य, का गेले? काय व्यंग त्यात होते हे काढावे. तसेच विलायतेत राज्य कसे आहे? परंतु या गोष्टी आपले लोक मूर्ख आहेत, त्यांस सांगितल्यावर ते म्हणतील की, राज्य कशाने गेले? तर सद्दी फिरली म्हणजे राज्य जाते. हे काळाचे माहात्म्य. इंग्रजांची सद्दी फिरेल तेव्हा त्यांचेही राज्य जाईल. परंतु हे काही उत्तर नाही. लोक अगदी मूर्ख झाले आहेत. त्यांची चित्ते मागील अमानुष गोष्टींवर फार आहेत.

याजमुळे त्यांस वाटते की, अवतारी पुरुष होईल, तेव्हा आमचे कल्याण करील. हे मनुष्याचे कृत्य नव्हे. अशा मूर्खपणाच्या समजुती आहेत. परंतु जरी ईश्वर सर्व गोष्टी घडवितो, तरी मनुष्यांनी मूर्खासारखा नशिबावर भरवसा ठेवून आळशीपणात राहू नये. जो उद्योग करतो, त्यांस ईश्वर सहाय्य होतो. म्हणून लोकांनी उद्योग करावा, हेच उत्तम. सद्दी या शब्दाचा अर्थ पाहिला तर काही नाही; लोकांचा मूर्खपणा आहे.

## उद्योगप्रशंसा

◘

पत्र नंबर ६८ : २२ जुलई १८४९

हिंदू लोकांची बुद्धी फारच क्षीण झाली आहे, याजमुळे ते कितीएक गोष्टी विनाकारण तुच्छ मानतात. जर कोणी एखादे गृहस्थास सांगितले की, इंग्रज लोकांमध्ये विद्या फार आहे व ते लढाईत जय मिळवितात, याचे कारण विद्या आहे, तर तो उत्तर देईल की, कशाची विद्या? सद्दी फिरली म्हणजे असेच होते. प्रारब्ध अनुकूल झाले, म्हणजे विद्या वगैरे सर्व येते. व ज्या मनुष्यास दैव अनुकूल नाही, त्याचे ठायी सर्व गुण असले, तरी व्यर्थ दिसतात.

भर्तृहरि वगैरे कवी यांनी फक्त प्रारब्ध वर्णिले व उद्योगाची प्रशंसा सोडून दिली. येणेकरून लोकांमध्ये हे मत आता असे प्रबल झाले आहे की फक्त दैवावर भरवसा ठेवून लोक बसतात. क्षणभर देखील विद्या काय आहे, याचा विचार करीत नाहीत. रामाने रावण जिंकला तेव्हा वानरांनी राक्षसात मारिले इत्यादी दृष्टान्त देतात. आणि जी जी सुधारणुकीची गोष्ट तिजवर भरवंसा ठेवीत नाहीत. जर कोणी ग्रंथ किंवा वर्तमानपत्र हाती दिले तर म्हणतात की, यात काय आहे? याने काय ज्ञान वाढणार आहे? आजपर्यंत हेच कोठे होते? इत्यादी भाषणांनी उद्योग व्यर्थ मानितात. हे मोठे दुर्दैव आहे. ईश्वरइच्छेने हे लोक असेच नाहीसे होणार असले, तर, कोणाचा काय उपाय आहे? परंतु मला कठीण दिसते व या लोकांचा परिणाम भयंकर आहे, असे भासते. कालेकरून हे सर्व ख्रिस्तीयन धर्मात जातील. किंवा स्वधर्मास जाणून सुधारून त्याची स्थापना करतील हे समजत नाही.

इंग्रज इकडे राज्य करतात, ते आताच आम्हास गुलामाप्रमाणे मानतात व आफ्रिकेत लोक आहेत ते इतके मूर्ख आहेत की, त्यांच्याने राज्य किंवा एकत्रपणा काही होत नाही. याजमुळे जो पाहिजे तो त्यांस धरून विकावयास रानच्या जनावराप्रमाणे देशांतरी नेतो. तद्वत् या हिंदू लोकांची स्थिती होईल. काही दिवसांनी इंग्रज येथे येऊन घरेदारे करून राहू लागतील. म्हणजे बहुतकरून आमचे रोजगार गेलेच आहेत; व जे राहिलेले आहेत, ते समूळ जातील; कारण की ते लोक शहाणे आहेत. मग आम्हास दर एक इंग्रजांच्या घरी गुलामगिरीची कामे करावी लागतील. आणि सर्व मोठेपणा, धनीपणा इंग्रजांकडे जाईल. असे होता होता उत्तर अमेरिकेत इंग्रज लोक राहिले आणि चारपाचशे वर्षांत तेथील

लोक सर्व मरून नाहीसे झाले. व सर्व इंग्रजांचीच वस्ती झाली. तसा हा देश केवळ इंग्रजांचे वस्तीचा होईल की काय ? अशा प्रकारचे प्रश्न माझे अंतःकरणात येतात व यांची विवंचना करता करता ईश्वरइच्छा काय आहे ते समजत नाही.

म्हणून या देशांत जे राहिलेले, सुधारलेले लोक आहेत, त्यांस मात्र मी पुसतो की, तुम्हासही जर सर्व गोष्टी भयंकर दिसतात, तर तुम्ही स्वस्थ कसे बसलेत ? लौकिक रीतीत, चालीत, धर्मात सुधारणा करावयास झटावे तर सर्व लोक आपल्यास वाईट म्हणतील, म्हणून तुम्हास भय वाटते काय ? परंतु मला वाटते की, शंभर मूर्खांनी वाईट म्हटले तर आणि एका शहाण्याने चांगले म्हटले तर ते चांगले म्हणणे अधिक; याजकरिता लोकापवाद मूर्खांचा आपण मानू नये. हे लोक अतिशय वेडे आहेत; आणि याजवर भ्रांती पडली आहे. येणेकरून जसा मद्यपि मनुष्य मस्त असतो व त्यांस काही सुचत नाही, तसे हे लोक भुलले आहेत व यांस काळाने घेरले आहे, म्हणून असा आळस करतात.

मी पुष्कळ सामर्थ्यवान पुरुषांस विचारले की, तुम्ही याविषयी काही उद्योग करता काय ? तर म्हणतात की, ईश्वरइच्छा असेल तसे घडेल; आपल्याच्याने काय होणार आहे ? रती फिरली म्हणजे काही उपाय चालत नाही. जसे होणार तसे होऊ, आपला आपण विचार पहावा. इत्यादी पोरांसारखी मूर्खपणाची भाषणे करतात. आणखी जर त्यांस म्हटले की, शिखांचा पराभव इंग्रजांनी विद्येने केला; तर म्हणतात काही नाही. सर्व नशिबाने केले. याप्रमाणे नशिबावर त्यांची श्रद्धा आहे. त्यांस एखादे कारण दाखविले तर त्याचा विचार करीत नाहीत. आणि यात काय आहे, असे म्हणतात असा या लोकांचा चमत्कार आहे.

विद्या म्हणजे काय, हे काही एक त्यांस ठाऊक नाही व लष्कराचे, कवाइतीचे फळ काय हे माहीत नाही. ज्यांनी याचा विचार मुळीच केला नाही, ते देखील धिक्काराने म्हणतात की, यात काय आहे ? कशाची कवाईत ? व कशाचे शहाणपण ? विदुराचे शहाणपण थोडे होते काय ? पण काय झाले ? अशी उत्तरे हरएकांविषयी अर्थ न जाणता धीटपणाने देतात. कारण त्यांची श्रद्धा दैवावर आहे. त्यांस असे वाटते की, आमच्या ज्या पूर्वापार समजुती आल्या आहेत त्या खऱ्या. याजमुळे हे लोक उद्योग करीत नाहीत; यास्तव कोणीतरी या लोकांची समजूत व्हावयाजोगा ग्रंथ लिहून प्रकट करावा की, दैव म्हणजे काय ? मुळी तो पदार्थ; नाही. नाव मात्र आहे. व आळशी लोकांस हा फार प्रिय आहे; परंतु वास्तविक पाहिले तर ईश्वरइच्छा अशी आहे की,

सर्वांनी उद्योग करावा. रामाने लंकेत जाण्याचा उद्योग केला की नाही? मग वानराच्या हातून सिद्धी होऊ द्या. परंतु उद्योग करणे आवश्यक आहे, मुळीच उद्योग सोडून राम अयोध्येत बसला असता तर रावणास मारू शकता काय?

ईश्वरइच्छा खरी, परंतु जसे तुम्ही त्यांस प्रार्थाल तशी तुम्हास सिद्धी होईल. तुम्ही संसारात आहा, परंतु उद्योग केला तर मोक्षास जाल की नाही? ईश्वरइच्छा तुमचे भावनेप्रमाणे व प्रार्थनेप्रमाणे आहे. ईश्वराची प्रार्थना करणे, याचाच भाग उद्योग करणे आहे. उद्योग न करता कोणी प्रार्थील तर ईश्वराचे क्षोभास मात्र तो पात्र होईल. याजकरिता तुम्ही दैवावर भार ठेवू नका. दैव पांगळे आहे.

## एकत्र राहण्याची चाल

**पत्र नंबर ८७ : ६ जानेवारी १८५०**

आमचे लोकांमध्ये अशी चाल आहे की, कुटुंबाचे माणसातील सर्वांनी एकत्र रहावे, यापासून लाभ किंवा विभक्त राहिल्यापासून लाभ याचा विचार केला, तर असे नजरेस येते की, एकत्र राहण्याची चाल बहुत काळापासून चालत आली आहे. व लोकांमध्ये तिची प्रतिष्ठा अधिक मानितात. दोघे बंधू पाहिले तर त्यांस प्रथम हा प्रश्न विचारतात की, विभक्त किंवा एकत्र आहा? एकत्र म्हणाले म्हणजे ते भले माणूस आहेत, असे समजतात.

परंतु उद्योगवृद्धी होण्यास विभक्त राहण्याची चाल चांगली आहे. ती कशी म्हणाल, तर ऐका. एक बंधू रोजगारावर असला म्हणजे त्याचे इतर बंधू, पुतणे, चुलते, मामा, उभय पक्षांचे लोक त्याचे आसमंतात येऊन राहतात व जरी त्यांस सामर्थ्य असले, तरी याचे घरी जेवतात; काळ व्यर्थ घालवितात व उद्योग काही करीत नाहीत. बळे मूर्ख होतात व निर्लज्जपणाने अन्न खातात. यास्तव इतके लोक रिकामे बसून खाणारे निरुपयोगी असतात.

सामान्यतः श्रीमंताचे घरी पाहिले तर पन्नास पाने पंक्तीस असतात. त्यात बहुतकरून चाकर एकदोन व बाकी सर्व आप्तसंबंधी असतात. ते काही उद्योग करीत नाहीत. घरचा एकटा जो मिळविता असतो, त्यासही त्यामध्ये थोरपणा वाटतो की, मी सर्व कुटुंबाचा स्वामी आहे. माझे घरी सर्व माझे कुलातील

जेवतात, मी कुटुंबवत्सल आहे. आणि लोकही त्याचे वर्णन अधिक करतात. त्यांस म्हणतात की, 'अहो, अमका गृहस्थ केवढा कुटुंबी आहे! त्यांस कुळदीपक म्हणावे, पहा की, ज्याचे पंक्तीस पन्नास पाने होतात' व सरकारात अर्जी करणे झाल्यास ही मोठी सबब लिहितात की, आम्ही कुटुंबवत्सल आहो, आमचे सरकारने चालवावे व प्राचीन काळच्या सनदा पाहिल्या तर त्यात हेच शब्द असतात की, "अमके भटजी, याचे कुटुंब मोठे व याचे कुटंबाचे चालवल्यास श्रेयस्कर आहे, असे जाणून कुटुंबाचे योगक्षेमार्थ अमुक गाव दिला आहे." याजवरून कुटुंबाचे एकाने चालवावे व सर्वांनी उगीच बसावे, हा धर्म परंपरागत चालत आला आहे.

परंतु यापासून अनर्थ होतात; व आळसाची प्रवृत्ती फार होते. मागले काळी कसे निभले असेल ते असो; पण आम्हास हे तर विलग व अवघड दिसते. एकट्याने मिळवावे आणि सर्वांनी खावे आणि तो मरेल त्या दिवशी सर्वांनी वर हात करून जावे किंवा भीक मागावी, हे अगदी वाईट आहे. आणि असे बहुत लोक भट वगैरे आढळतात. त्यांस जर प्रश्न केला की, 'तुम्ही इतके दिवस काय केले?' तर ते उत्तर देतात की, 'काय करावे? अमका गृहस्थ दैवशाली होता, सर्व कुटुंबाचा योगक्षेम तो करीत असे, त्याचे घरी आज पन्नास वर्षे सुखेकरून भोजन केले, आता तो मेला. तेव्हापासून कोठे उभे रहावयास थारा नाही. शंभर मनुष्यांचे अन्न गेले. त्याचे पदरी बहुत लोक असत व बहुतांचे तो चालवी. आता आम्हास काही आधार नाही.' अशी चाल या लोकांची पडली आहे.

प्रत्येक श्रीमंताचे पाठीमागे निरुपयोगी लोक शेकडो असतात व त्यात जहागिरदार वगैरे असले, तर त्यांजवर जशा मोहोळांवर माशा बसतात त्याप्रमाणे आळशी लोक बसतात. किती एक आप्त म्हणून असतात, किती एक बायकोचे भाऊ म्हणून असतात. किती एक भट, पंडित, शास्त्री यांस पंक्तीस घेऊन जेवले म्हणजे पुण्य आहे; म्हणून हे बाळगलेले असतात. किती एक आर्जवी असतात, त्यांनी स्तुती करावी. म्हणजे महाराजांनी म्हटले की "आज सूर्य पश्चिमेस उगवला." तर त्यांनी "होय." म्हणावे आणि काय? (सुप्रयुक्त) भाषण केले तरी, "महान बुद्धिवान बरे," अशी स्तुती करावी. याप्रमाणे हे लोक दुसऱ्यास वेडे करतात. असे किती एक निरुपयोगी लोक असतात.

याप्रमाणे प्रत्येक श्रीमंताचे घरी वहिवाट असती. यांचे विरुद्ध कोणी बोलले, तर त्यांस ते म्हणतात की, 'तो त्यांच्या अन्नावर उठला' परंतु या वाकड्या समजुती टाकून ज्याने त्याने उद्योग करावा, हे बरे. स्वउद्योगाने घोंगडी

मिळविली तर ती लोकांच्या शालजोडीस मागे सारते. यास्तव श्रीमंतांनीही आपले पदरचे व कुटुंबाचे लोकांस शहाणे व उद्योगी करावे हे चांगले. केवळ आपण मेलो तर बाकीच्यांनी भिक्षा मागावी. अशी तजवीज आपले थोरपणाकरिता करून ठेवावी, हा थोरपणा नव्हे, हा मूर्खपणा आहे. व पदरच्या लोकांनीही मनात आणावे की, हे चांगले नाही. अस्तु.

एकत्र कुटुंबाचा असा परिणाम होतो. आता यापासून काही लाभही आहेत. एक भाऊ अशक्त किंवा विपत्तीत असला, तर त्याची उघडीक पडत नाही. कार्यप्रयोजन जसे एकाचे, तसेच दुसऱ्याचे होते, सांभाळ होतो. परंतु हे केवळ एकत्र राहिल्याने होते असे नाही. विभक्त असल्यानेही हे होईल. उभयता भावांचे सौजन्य असले म्हणजे एकमेकांस विपत्ति-अनुपपत्ती काळी सहाय्य करतील. एकत्र असले म्हणजेच करतात असे नाही. यास्तव विभक्त असले म्हणजे बरे. परंतु विभक्त असून बंधुधर्म सोडू नये. आमचे लोकांत बहुधा विभक्त असले म्हणजे अत्यंत वैर असते आणि वैर पडल्याशिवाय विभक्तपणा येत नाही. हे चांगले नाही. तर विभक्त राहून एकमेकांनी सुहृदभावाने रहावे व उद्योग केल्यावाचून राहू नये, इतकेच तात्पर्य आहे.

सांप्रत काळी जो श्रीमंताचे घरी परिवार असतो तो केवळ मूर्खपणास कारण आहे. आम्ही स्वतः एका श्रीमंताचे घरी पाहिले की, त्यांचे वय सरासरी पंचवीस वर्षांचे होते. त्यांस जहागीर मोठी आहे. त्याचे पदरी रोज पन्नास पाने होत होती. त्यात बहुतकरून आप्तमंडळी व किती एक भट, शास्त्री, पंडित, कथेकरी व पुराणिक होते व वैद्यही होते. त्यात वैद्य हे उपयोगी आहेत. त्यांची गोष्ट खेरीज; परंतु बाकीचे लोक केवळ आर्जवी आणि यजमान जरी अक्षरशत्रू आणि मूर्खशिरोमणी होता, तरी प्रत्येकजण त्याची अतोनात स्तुती करीत होते. कोणी पंडित म्हणे, 'या पुरुषाची बुद्धी केवढी विशाल आहे. कोणताही विषय काढिला तरी त्यात समजूत आहेच.' कोणी आप्त होते ते म्हणत की, 'हा मोठा या कुळात दैवशाली आहे. आमचे सर्वांचे आयुष्य यांस होऊ. आज पन्नास-शंभर मनुष्ये याचे पदरी आहेत. शेकडो मनुष्ये मरोत, परंतु त्यांचा पालनवाला न मरो.' अशा अनेक गोष्टींनी त्यांस मूर्ख करून ठेवतात.

या गृहस्थाची अवस्था पाहून मला फार आश्चर्य वाटले आणि त्यात आणखी एक चमत्कार पाहिला की, इतक्यात किती एक जण त्यांस पुनर्विवाह करण्याची मसलत देत आणि सांगत की, दुसरी बायको करावी, कारण पुत्र नाही. म्हणजे सरासरी त्यांस पुरती पंचवीस वर्षे नव्हती तो पुत्राची काळजी;

व पुत्राकरिता अनुष्ठाने करीत दहा ब्राह्मण बसले होते. आणि लग्न पुन्हा करावयाची तयारी करणे हा केवढा मूर्खपणा आहे ? अस्तु.

यापमाणे आमचे लोकांमध्ये प्रत्येक श्रीमंताचे घरी हीच अवस्था आहे व राजे वगैरे यांचे घरी तर याहून अधिक असते. सर्वत्र पहा की, कोठे कोणी राजा शहाणा आहे असे नाही व त्याचे पदरी प्रधान इत्यादी असतात तेही मूर्ख. ते त्यांस विद्या शिकवीत नाहीत. व जुन्या काळच्या पुराणातील मते बाळगणारे व आपले ठिकाणी विद्वान म्हणविणारे पंडित यांस पुसले तर त्यांस विद्या माहीत नसते. जसे विक्षिप्त असतात, त्याप्रमाणे त्यांचे बोलणे. कोणी म्हणतो, पृथ्वी कमलपत्रासारखी आहे. कोणी म्हणतो, यवन हे पूर्वीपासून आहेत; परंतु त्यांस काही देश नाही. समुद्रात कोठे लहान जागा आहे. तेथे त्यांचा वास आहे. पृथ्वीचा अंत हिमालयाजवळ आहे. व पृथ्वीभोवती सात बेटे आहेत. समुद्र दह्याचे व दुधाचे आहेत. इत्यादीक मूर्ख मते शिकवून श्रीमंतांस निरुपयोगी करतात व त्यांचे हातून लोकांस काही उपयोग होत नाही; व ही पुराणातील मते खोटी आहेत, अशी खात्री लोकांची झाल्यावाचून त्यांची बुद्धी शाश्वत पावणार नाही.

ज्या काळी ही पुराणातील मते व शास्त्रीपंडितांशी मते कल्पित कादंबरीच्या खोट्या व पोरकट गोष्टीसारखी आहेत अशी खात्री होईल, त्याकाळी या लोकांची भ्रांती जाईल; आणि हे ताळ्यावर येतील.

# ७. आमचे राजकारण व राज्यकर्ते

# इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुतीविषयी

**पत्र नंबर १ : १९ मार्च १८४८**

हल्ली अशी बातमी कळली आहे की, पुणे येथे राज्य बुडाल्यापासून फौजदार कोतवालीचे कामावर ठेवीत होते, त्यांपैकी जे ब्राह्मण फौजदार झाले, त्या सर्वांची बहुतकरून वहिवाट दुरुस्त नाही, असे अनुभवावरून कळले, व माजी फौजदार बळवंतराव गोविंद याजवर तर दरवड्याचे वगैरे अपराध स्पष्टपणे शाबीद होऊन त्यांस मोठी शिक्षा झाली. तेव्हा ब्राह्मण लोक अविश्वासू आहेत; याजकरिता येथील अधिकाऱ्यांनी असे मनात आणले आहे की, या कामावर पुनरपि ब्राह्मण नेमिता खिस्तीयन धर्मातील मनुष्य नेमावा. त्यांस याविषयी मी थोडासा मजकूर आपल्यास लिहून पाठवितो, हा जर कृपा करून आपले पत्रद्वारे प्रसिद्ध होईल, तर ब्राह्मणांवरील दोष निवारण होईल, असे वाटते.

ब्राह्मण लोकांनी वाईट वर्तणूक केली, असे अनुभवावरून जे दिसले ते खरे आहे; परंतु त्याचा दोष ब्राह्मणांकडे नाही. कारण चांगले-वाईट लोक सर्व जातीत असतातच. परंतु त्यांपैकी पक्का शोध करून चांगले, कुलीन, संभावित, नीतिमान असे असतील त्यांस अधिकारावर नेमावे. धर्मशास्त्री व्यवहार-मयूरवात प्रथमतः श्लोक आहे तो असा की,

> व्यवहारन्नृपः पश्येद्विद्वद्भिर्ब्राह्मणैः सह।
> धर्मशास्त्रानुसारेण क्रोधलोभविवर्जितः ॥१॥
> श्रुताध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः।
> राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रे च ये समाः ॥२॥

याप्रमाणे बहुत अध्ययन केलेले, बहुत ऐकलेले, धर्म जाणणारे, सत्य बोलणारे निःपक्षपती सभासद राजाने अधिकारावर नेमावे म्हणून आहे. याप्रमाणे जर ब्राह्मण लोक नेमले असते तर असे का होते? इंग्रजी राज्यात हे रयतेचे फार नुकसानास कारण व दुर्दैव आहे की, ज्या साहेब लोकांचे हाती मोठ्या नेमणुका द्यावयाच्या असतात, ते त्या देते वेळेस काही विचार पहात नाहीत. म्हणून अयोग्य लोक मोठमोठ्या कामावर मुकरर होऊन लाचेचे वगैरे मोठे बोभाट उठले आहेत. साहेब लोकांचे हाती राज्य गेले, परंतु ते इकडील लोकांप्रमाणे

काम करण्यात माहितगार आहेत असे नाही. ते विद्वान, शहाणे व निःपक्षपाती आहेत हे खरे, पण देशाची व भाषेची माहिती नेटीव लोकांप्रमाणे त्यांस नाही. यामुळे नेटीव लोक जे त्यांचे हाताखाली आहेत यांचे हाती रयतेचे वाईट बरे करावयाचे पुष्कळ असते. गरीब लोकांस साहेबांची भेट किंवा त्याशी स्वस्थपणाचे भाषण होत नाही. तेव्हा त्यांस कामगार हेच साहेब असतात. आणि हे कामदार लोक वाईट चालीचे, आशाबद्ध व द्रव्यलोभी असतात. म्हणून लोकांस फार छळितात. त्यातून एखाद्याचे अपराध बाहेर दृष्टोत्पत्तीस येऊन त्यांस शासन होते, परंतु तसे सर्वांस होत नाही. नेटीव लोक महान धूर्त आहेत म्हणून त्यांचे अपराध सापडणेही फार कठीण आहे. साहेब लोक मोठे काम ज्यास देतात त्याची हुषारी मात्र पाहतात. परंतु कामगाराचे फक्त हुशारीचा उपयोग काय? तीशिवाय दुसरे बहुत गुण त्यांस पाहिजेत. मनुष्य कृत्रिम अंतःकरणी व तोंडापुढे चांगले बोलणारा व इकडे तिकडे धावून आर्जवासाठी काम करणारा, तो समक्ष मेहनत घेतो, त्यामुळे इंग्रज लोकांस वाटते की, हा फार चांगला हुषार आहे, परंतु त्याचे अंतःकरण मलिन व त्यांस धर्मशास्त्र कळत नाही. त्याचा दुष्टपणा हृदयात असतो. तो साहेबाने तोंड मागे फिरविले की पुरे, लागलाच प्रगट होतो. तेव्हा असे प्रकारचे लोक अधिकारावर नेमल्यावर मग त्याचे सद्गुण ऐकावयाची आशा कोठून? परंतु तेणेकरून सर्व जातीस बट्टा लागला असे नाही. नेमणाऱ्यांचे अलक्ष यामुळे या गोष्टी घडतात. पुण्यात बहुत संभावित व कुलीन व सरंजामदार व पेन्शनवाले गृहस्थ आहेत. परंतु त्यातील चांगला मनुष्य आणि विद्वान आजपर्यंत कामावर कोठे ठेवला असे जाहले नाही. शाळेतील शिकलेले, कुलीन व विद्वान यांचेविषयी तर सरकारने बहुत वेळ हुकूम पाठविले आहेत. परंतु जिल्ह्यातील साहेब लोक या सर्वांस एकीकडे ठेवतात. आणि आपले कृपेतील एखादा मनुष्य त्याचे कुलशील चांगले नसले व अगदी कवडीचा माल असला, तरी त्यांस ठेवून 'रजाचा गज' करतात व याप्रमाणे कुलहीन लोक इंग्रजांचे दरबारात फार जमले आहेत. त्यामुळे ब्राह्मण लोकांची अब्रू कमतर दिसते, हे त्यांचे दुर्दैव म्हणावे, याची तजवीज कोणी मनात आणीत नाहीत. साहेब लोक मनास येईल तसा दोष ठेवतात हे ठीक नाही. राजाने खराब लोक सन्निध केले तर कारभार चांगला कसा होईल? मागे कारभार अशा रीतीने चालत नव्हता व माधवराव पेशव्यांचे वेळचे किती एक गोष्टी ऐकण्यात आहेत, त्याजवरून दिसते की, ब्राह्मण लोक सगळे वाईट आहेत असे नाही. बाजीरावाचे कारकीर्दीत बहुतेक ब्राह्मणांस नीचत्व येऊन ते दुर्गुणी झाले हे खरे आहे. तत्रापि अद्याप न्यायनिष्ठुर व योग्य असेही पुष्कळ आहेत.

परंतु त्यांस परीक्षक मिळून जसे कवी म्हणतो काकः पिकः पिकः असे करणारे भेटतील, तेव्हा व्यवस्था नीट होईल. साहेब लोक भाषा वगैरे शिकण्याची मेहनत करतात. तशी जर मनुष्य निवडून काढण्याची मेहनत घेतील, तर लोकांचा फार फायदा होईल. बहुतेक ठिकाणी असे आहे की, एखादी जागा खाली झाली तर वेळेस जो उभा असेल त्यात ती देऊन आपली मेहनत चुकवतात. कारण जर बातमी फुटली तर कोणी शिफारशी आणतात व किती एक अर्जी पडतात. तेव्हा त्या वाचावयाची मेहनत कोण करतो ? म्हणून तात्काळ भलत्याच एखाद्या शुंभास ती जागा देतात. तेव्हा चांगले लोक कोठून मिळणार ? काही दिवस जागा खाली राहून किंवा परीक्षा घेऊन जितके उमेदवार जमतात, तितके जमू देऊन त्यांची नीट चौकशी करून जागा द्यावी. तसे करीत नाहीत. आणि जाग्याची सोडत काढतात. येणेकरून लोकांची अब्रू जाते आणि ठेवणारांचे बुद्धीची प्रशंसाही होत नाही. याचा बंदोबस्त लवकर होईल आणि उगेच कारणाशिवाय ब्राह्मणांचे अब्रूस दूषण लावणार नाहीत, अशी आशा आहे. इंग्रज लोक फार शोधक आहेत. म्हणून त्यांस अवघड नाही. कदाचित येविषयी सरकार लक्ष देईल तर बरे होईल. याजबाबत आणखी काही सूचना पुढे लिहून पाठविण्यात येतील.

## नेटीव अंमलदार

पत्र नंबर ९ : ७ मे १८(६३) ?

आपले मागील पत्री 'एक हिंदु' या सहीचे पत्र छापले होते. त्यात बहुत करून बोभाटाचा मजकूर लिहिला होता. तो सर्व तथ्य नसला, तरी काही खरा आहे.

नेटीव लोकांमध्ये विद्वान मुळी थोडे आणि जे वास्तविक विद्वान व गुणी आहेत, त्यांची प्रतिष्ठा इंग्रज सरकारात होते. एखादे वेळी विरुद्ध गोष्ट झाली म्हणून तेच प्रमाण धरू नये. सामान्यतः वहिवाट असेल ती लिहिली पाहिजे हे एक; दुसरे असे आहे की, इंग्रज शाळेत वगैरे जे लोक अभ्यास करतात, त्यात इंग्रजी लिहिणार असे नाव मिरविणारे पुष्कळ असतात. घरात

काम करण्यात माहितगार आहेत असे नाही. ते विद्वान, शहाणे व निःपक्षपाती आहेत हे खरे, पण देशाची व भाषेची माहिती नेटीव लोकांप्रमाणे त्यांस नाही. यामुळे नेटीव लोक जे त्यांचे हाताखाली आहेत यांचे हाती रयतेचे वाईट बरे करावयाचे पुष्कळ असते. गरीब लोकांस साहेबांची भेट किंवा त्याशी स्वस्थपणाचे भाषण होत नाही. तेव्हा त्यांस कामगार हेच साहेब असतात. आणि हे कामदार लोक वाईट चालीचे, आशाबद्ध व द्रव्यलोभी असतात. म्हणून लोकांस फार छळितात. त्यातून एखाद्याचे अपराध बाहेर दृष्टोत्पत्तीस येऊन त्यांस शासन होते, परंतु तसे सर्वांस होत नाही. नेटीव लोक महान धूर्त आहेत म्हणून त्यांचे अपराध सापडणेही फार कठीण आहे. साहेब लोक मोठे काम ज्यास देतात त्याची हुषारी मात्र पाहतात. परंतु कामगाराचे फक्त हुशारीचा उपयोग काय? तीशिवाय दुसरे बहुत गुण त्यांस पाहिजेत. मनुष्य कृत्रिम अंतःकरणी व तोंडापुढे चांगले बोलणारा व इकडे तिकडे धावून आर्जवासाठी काम करणारा, तो समक्ष मेहनत घेतो, त्यामुळे इंग्रज लोकांस वाटते की, हा फार चांगला हुषार आहे, परंतु त्याचे अंतःकरण मलिन व त्यांस धर्मशास्त्र कळत नाही. त्याचा दुष्टपणा हृदयात असतो. तो साहेबाने तोंड मागे फिरविले की पुरे, लागलाच प्रगट होतो. तेव्हा असे प्रकारचे लोक अधिकारावर नेमल्यावर मग त्याचे सद्गुण ऐकावयाची आशा कोठून? परंतु तेणेकरून सर्व जातीस बट्टा लागला असे नाही. नेमणाऱ्यांचे अलक्ष यामुळे या गोष्टी घडतात. पुण्यात बहुत संभावित व कुलीन व सरंजामदार व पेन्शनवाले गृहस्थ आहेत. परंतु त्यातील चांगला मनुष्य आणि विद्वान आजपर्यंत कामावर कोठे ठेवला असे जाहले नाही. शाळेतील शिकलेले, कुलीन व विद्वान यांचेविषयी तर सरकारने बहुत वेळ हुकूम पाठविले आहेत. परंतु जिल्ह्यातील साहेब लोक या सर्वांस एकीकडे ठेवतात. आणि आपले कृपेतील एखादा मनुष्य त्याचे कुलशील चांगले नसले व अगदी कवडीचा माल असला, तरी त्यांस ठेवून 'रजाचा गज' करतात व याप्रमाणे कुलहीन लोक इंग्रजांचे दरबारात फार जमले आहेत. त्यामुळे ब्राह्मण लोकांची अब्रू कमतर दिसते, हे त्यांचे दुर्दैव म्हणावे, याची तजवीज कोणी मनात आणीत नाहीत. साहेब लोक मनास येईल तसा दोष ठेवतात हे ठीक नाही. राजाने खराब लोक सन्निध केले तर कारभार चांगला कसा होईल? मागे कारभार अशा रीतीने चालत नव्हता व माधवराव पेशव्यांचे वेळचे किती एक गोष्टी ऐकण्यात आहेत, त्याजवरून दिसते की, ब्राह्मण लोक सगळे वाईट आहेत असे नाही. बाजीरावाचे कारकीर्दीत बहुतेक ब्राह्मणांस नीचत्व येऊन ते दुर्गुणी झाले हे खरे आहे. तत्रापि अद्याप न्यायनिष्ठुर व योग्य असेही पुष्कळ आहेत.

परंतु त्यांस परीक्षक मिळून जसे कवी म्हणतो काकः पिकः पिकः असे करणारे भेटतील, तेव्हा व्यवस्था नीट होईल. साहेब लोक भाषा वगैरे शिकण्याची मेहनत करतात. तशी जर मनुष्य निवडून काढण्याची मेहनत घेतील, तर लोकांचा फार फायदा होईल. बहुतेक ठिकाणी असे आहे की, एखादी जागा खाली झाली तर वेळेस जो उभा असेल त्यात ती देऊन आपली मेहनत चुकवतात. कारण जर बातमी फुटली तर कोणी शिफारशी आणतात व किती एक अर्जी पडतात. तेव्हा त्या वाचावयाची मेहनत कोण करतो ? म्हणून तात्काळ भलत्याच एखाद्या शुंभास ती जागा देतात. तेव्हा चांगले लोक कोठून मिळणार ? काही दिवस जागा खाली राहून किंवा परीक्षा घेऊन जितके उमेदवार जमतात, तितके जमू देऊन त्यांची नीट चौकशी करून जागा द्यावी. तसे करीत नाहीत. आणि जाग्याची सोडत काढतात. येणेकरून लोकांची अब्रू जाते आणि ठेवणारांचे बुद्धीची प्रशंसाही होत नाही. याचा बंदोबस्त लवकर होईल आणि उगेच कारणाशिवाय ब्राह्मणांचे अब्रूस दूषण लावणार नाहीत, अशी आशा आहे. इंग्रज लोक फार शोधक आहेत. म्हणून त्यांस अवघड नाही. कदाचित येविषयी सरकार लक्ष देईल तर बरे होईल. याजबाबत आणखी काही सूचना पुढे लिहून पाठविण्यात येतील.

## नेटीव अंमलदार

पत्र नंबर ९ : ७ मे १८(६३) ?

आपले मागील पत्री ‘ एक हिंदु ’ या सहीचे पत्र छापले होते. त्यात बहुत करून बोभाटाचा मजकूर लिहिला होता. तो सर्व तथ्य नसला, तरी काही खरा आहे.

नेटीव लोकांमध्ये विद्वान मुळी थोडे आणि जे वास्तविक विद्वान व गुणी आहेत, त्यांची प्रतिष्ठा इंग्रज सरकारात होते. एखादे वेळी विरुद्ध गोष्ट झाली म्हणून तेच प्रमाण धरू नये. सामान्यतः वहिवाट असेल ती लिहिली पाहिजे हे एक; दुसरे असे आहे की, इंग्रज शाळेत वगैरे जे लोक अभ्यास करतात, त्यात इंग्रजी लिहिणार असे नाव मिरविणारे पुष्कळ असतात. घरात

खुर्ची, मेज, पिसे व बुके आली म्हणजे आईबाप व शेजारीपाजारी सर्व त्यांस इंग्रजी लिहिणार व शहाणा असे समजतात.

परंतु वास्तविक पाहिले तर त्यांस वाचल्याचा अर्थही कळत नाही. आणि ग्रंथावलोकन केलेले नसते. इतिहास, विद्या, शास्त्रे यांचा अभ्यास नसतो. इंग्रजी विद्या समुद्रासारखी आहे. परंतु दोन बुके वाचातात आली व चार विरखुड्या आढता आल्या म्हणजे कानावर पागोटे, खिशात रुमाल आणि हातात सोटा असा वेश पुष्कळ घेतात. परंतु त्याने ते विद्वान होत नाहीत. शाळेत शिकलेले सर्व शहाणे आहेत असे नाही.

"सहस्रेषु च पंडितः" असे कवीने म्हटले आहे. इंग्रज लोकांतील साधारण मनुष्य जरी असला, तरी हिंदू लोकांपेक्षा तो सहस्र गुणांनी श्रेष्ठ आहे व तुम्हास असेही वाटू देऊ नका की, विद्वान नेटीव पुष्कळ जहाले, तर त्यांस मोठ्या जागा मिळणार नाहीत. कारण की, विद्या शिकण्याचे बक्षीस विद्या हेच आहे व ज्ञान हीच शक्ति. मोठे धुरंधर विद्वान शे-दोनशे होऊ द्या आणि मग मोठ्या चाकऱ्या मिळतील किंवा नाही पहा! जर इंग्रज न देतील तर ते विद्वान हरएक प्रयत्ने करून त्या मिळवतील. एकमत हीच शक्ती आहे. शहाणपण असेल, तर पैक्यास तोटा नाही. एक विद्वान झाला असेल आणि त्यांस मोठी प्रतिष्ठा मिळाली नसेल, तर आश्चर्य नाही. कारण की, अशी परीक्षा होत नाही. हे प्रयत्नाचे काम आहे. काळेकरून याचा फायदा होतो. व इंग्रज लोकांस तरी इतबार आला पाहिजे, तेव्हा ते अधिकार देतील. आज नेटीव लोकांचा इतबार मोठा नाही. कारण की, शंभर नेटीव कामगारांस जर दिव्य दिले, तर पाच पार पडतील की नाही न कळे व परकी इंग्रज नेहमी ढेकणासारखे त्यांस चिरडतात. व किती एकाचा फडशा झाला आहे असे जरी आहे, तरी नेटीव कामगारांशी संबंध ठेवतात त्यांस त्यांची कर्मे विदित आहेत.

नेटीव कामगार याजमध्ये चांगला गुण कोणचा असतो, हे तरी मनात आणा, ते बहुत करून अविद्वान, ढोंगी व लबाड असतात. कोणी मागल्या अवस्था पाहून काही दिवस नीट चालतात; परंतु मग त्याचे मनात असे येते की, आता मला काय भय आहे? मी आता श्रीमंती भोगावयास शिकतो. खर्च तरी कसा निभेल? असा विचार करून पाहिल्याने भयाने व लज्जेने खऱ्याकडून पैका घ्यावयास आरंभ करतात. व एकदा सवय पडली म्हणजे अंगवट्यास पडते. नंतर लिलाव सुरू करतात. म्हणजे जो अधिक बोलेल त्याचा फैसला होतो. अशा तर गोष्टी हमेशा पाहण्यात येतात. डौल करणारे हे लोक असे आहेत की,आपली योग्यता व थोरपणा काही जाणत नाहीत. यांनी कचेरीतून घरी जाताना

रोज १५/२० शिपाई बरोबर नेत असावे आणि त्यामध्ये आपण झुलत झुलत मोठे डौलाने चालावे म्हणजे घरच्या बायका किंवा रांडा यांनी आपले यजमानास पाहून धन्य मानावे. अशाकरिता हे प्रयत्नाने शिपाई मिळवतात. व पुढे चालवतात. असे काही चमत्कारिक रिवाज या मूर्ख लोकांचे आहेत.

त्यास असे वाटत नाही की, सरकारी चाकर हे विनाकारण मी आपल्या जवळ कशास ठेवावे ? हे जर आपले कामावर जातील, तर किती एक लोकांची कामे आठ दिवसांनी व्हावयाची ती उद्या होतील. आपण कैदी नाही तर आपणाभोवते इतके शिपाई कशास पाहिजेत ?

परंतु मला वाटते की, पुढे जे होणार त्याचे ते चिन्ह दर्शवितात. तात्पर्य, सांप्रत नेटीव अंमलदार आहेत हे मूर्ख आहेत. यांस इंग्रज आता चाकऱ्या देतात, एवढ्याही देण्याची योग्यता याजमध्ये नाही, परंतु इंग्रज मेहेरबानी करतात. मी एकदा खेड्यात एका कुळंब्याचे तोंडाने ऐकिले की, साहेबांचे राज्य चांगले. साहेब न्याय इनसाफ चांगला करितो, पण ब्राह्मण लोक त्यांस शिकवून आमची घरे बुडवितात, आणि बहुतकरून सर्व रयतेची समजूत अशीच आहे आणि ती खरी आहे. हे हलकट लोक फार प्रळय करतात, आणि त्यांस आशा फार; म्हणून जोपर्यंत नेटीव लोक दुर्गुणी व लोभी आहेत, तोपर्यंत त्यांचा पक्षपात कोणी धरावा ?

✦ ✦

## हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा विचार

■

**पत्र नंबर १२ : २१ मे १८४८**

क्रमांक ११ च्या पत्रात ' प्रवासी ' या सहीचे पत्र छापले, त्याचा अभिप्राय पहाता इंग्रजांचे राज्यात प्रजेस सुख नाही असा आहे, सबब याविषयी आम्हास काही विचार सुचला आहे तो लिहितो. म्हणजे त्यावरून लोकांस न्याय करिता येईल.

ईश्वर सर्व गोष्टीचा नियंता आहे व पृथ्वीवर आणि सर्व ब्रह्मांडात ज्या गोष्टी घडतात त्याजवर त्याची सत्ता आहे. तसेच ईश्वर सर्वज्ञ आहे. तो असा की जसे जसे योजावयाचे तसे तो योजतो. त्याने क्षुधा केली आहे; तर अन्नही तो उत्पन्न करतो व सूक्ष्म आणि स्थूळ पदार्थांचे नियंतृत्व त्याजकडे आहे, म्हणून

एक राज्य जाते व दुसरे होते. अशा मोठाल्या घालमेली होतात, त्या भगवंताचे प्रेरणेशिवाय घडत नाहीत. तेव्हा हिंदू लोकांचे मूळचे राज्य मुसलमानांनी घेतले, व याजकडे चार-पाचशे वर्षे राहून आता सर्व भारतखंड इंग्रजांचे अमलात गेले. या गोष्टी ईश्वराचे चांगलेपणाकरिता योजिल्या असे मला वाटते.

कारण ईश्वर स्वतः कोणास शहाणपणा शिकवीत नाही. एक भिकारी होतो. दुसरा मातबर होतो, तद्वत एका देशाची सुधारणा तो देश दुसऱ्या देशाचे अमलात गेल्याशिवाय होत नाही. असे तर चराचर चालत आले आहे. पूर्वी हिंदू लोक शहाणे होते. त्यांचे शहाणपण मिश्र देशांत व यवन देशांत गेले व ते देश रूमचे अमलात गेले. तेव्हा रूमचे लोक शहाणे झाले. रूम टोपकर लोकांचे अमलात गेले तेव्हा त्यांचे शहाणपण टोपकर लोकांस आले; परंतु घालमेलीत मूळचे हिंदूचे शहाणपण राहिले नाही. ते मुद्दल. परंतु त्याची चक्रवाढ दर एक ठिकाणी होता होता सांप्रत इंग्रज लोक हिंदू लोकांपेक्षा शंभरपट शहाणे झाले आहेत व ते शहाणपण हिंदू लोकांस प्राप्त व्हावे एतदर्थी ईश्वराने हा मुलुख त्यांचे ताब्यात दिला आहे. हे स्पष्ट दिसत आहे. तुम्ही विचार करून पहा की, इंग्रज लोकांमध्ये सांप्रत शहाणपण व शहाणे मनुष्य आहेत, त्यांचा शंभरावा हिस्सा तरी हिंदू लोकांत आहे काय ?

पहा की, इंग्रज लोक अखबारी वगैरे वाचतात; त्यांस आपले लोक असे म्हणतात की, यात काय आहे? हे व्यर्थ काम आहे? आताच्या चाली व रीती-प्रकरणी कोणी संभाषण केले, तर ते म्हणतात की, ' छिः, या रिकाम्याकथा कशास काढतात ? ' किती एक लोक विद्येचे व ज्ञानाचे परम शत्रू आहेत बरे ? असे मूर्ख लोकांमध्ये मला वाटते की, असेच परकी राज्य चांगले. कारण की, विलायतेत लोकसत्तात्मक राज्य आहे व दुसरे टोपकर लोकांचे मुलखात तसेच प्रकारची राज्ये आहेत, तसले राज्य जर हिंदुस्थानात असले, तर घटकाभर तरी चालेल काय ? तसले राज्य जर येथे झाले व जर त्यात ब्राह्मण लोकांचा हात शिरला, तर लागलीच लक्ष भोजने व कोटि होम मात्र चालू करतील, परंतु लोकांच्या हिताच्या गोष्टी किंवा ज्ञान व जगात काय व्यवस्था आहेत, याचा शोध लावण्याचा उद्योग करणार नाहीत. व याचे एकमत राहणार नाही. ब्राह्मण म्हणतील की, हाडखाऊ कुळंबी हे कामात कशास पाहिजेत. व कुळंबी म्हणतील की, हे बामण माजलेले पोळ यांचा उपयोग काय ? परभू म्हणतील, सोनार कशास पाहिजेत; वाणी म्हणतील की, तेली कशास पाहिजे, असा घोटाळा होईल की नाही ? हिंदू लोक हल्ली ज्या स्थितीत आहेत तीप्रमाणे त्यांचे नाकात वेसण घालून चालविणारा एक दांडगा राजा पाहिजे, यांस मोकळीक देऊन उपयोग

नाही. जसे इस्पितळातले रोगी आणि वेडे यांस स्वसत्ता दिली तर काय उपयोग ? तद्वत् हे आपले लोक आहेत. यांस काही तरी ठाऊक आहे काय ? गर्व मात्र यांचे जवळ राहिला आहे. यांची एकत्र ठिकाणी नांदणूक क्षणभरही होणार नाही.

पहा, पेशवे, शिंदे, होळकर, भोसले यांच्या आपसांत लढाया किती झाल्या ? वाकडे किती पडले ? मारामाऱ्या आणि द्वेष किती झाले ? नाना फडणिसास कैदेत बसविले की, नाही ? व शेवटी राज्य बुडाले की, नाही ? जर सर्व एकमत असते, तर असे न होते. पेशवे यांचे राज्य शंभर वर्षे होते, त्या शंभर वर्षांत कोणती सुधारणा झाली आहे पहा ? आणि इंग्रजांनी शंभर वर्षेच राज्य केले; पण त्यात किती सुधारणा झाली ? लोकांस किती शहाणपण आले ? व पुढे किती येणार ? मागील लोक इंग्रजांचे राज्याचे फायदे जाणत नाहीत. ते म्हणतात की, आम्ही सर्वस्वी भिकार झालो, पैसा गेला, पेशवाईत थोडे शहाणपणाने पैसा मिळत होता; परंतु आता तो प्रसंग नाही. म्हणून फार शहाणपण पाहिजे. द्रव्याचे व भोजनाचे एकीकडे ठेवा. आणि फक्त शहाणपणाचाच विचार करा. शहाणपणाचे अंती सर्व आहे. आठ दिवस खाल्ले नंतर महिनाभर अजीर्ण झाले ते बरे, किंवा नित्य थोडे थोडे खावे आणि अजीर्ण न होऊ द्यावे ते बरे ? तद्वत पेशवाईतील द्रव्य पुष्कळ अनुभविले खरे, परंतु त्याचा परिणाम मूर्खपणाचाच झाला. आता शंभर वर्षे सुख भोगिले. आणि तेव्हा काही ज्ञानसंपादनाचा व आपले राज्य नीट चालविण्याचा यत्न केला नाही म्हणून आता ५०० वर्षे इंग्रजांचे अमलात रहावे लागेल. आणि आता ५०० वर्षांत जे शहाणपण मिळवू ते दोन हजार वर्षेपर्यंत पुरेल. कधी राज्य दुसऱ्याचे हाती जाऊ देणार नाही. तेव्हा याजवरून इंग्रजांचे राज्य पेशव्यापेक्षा बरे.

कारण गीतेत सांगितले आहे की, जे परिणामी चांगले तेच चांगले. आदौ थोडे दिवस चांगले व पुढे फजिती, त्यांस चांगले म्हणू नये. तेव्हा आपले लोक जेवणाचे व द्रव्याचे आशेने काय स्तुती करतील ती करोत. परंतु इंग्रजांचा अंमल हा हंगाम बरा आहे. कोकणस्थ पूर्वी भिकारी होते. व पेशव्यांचे राज्यात कोणी काही सुख भोगिले. परंतु विचार केला नाही. खाल्ले मात्र, शेवटी दुसऱ्याने तोंडात मारून नेले, तेव्हा डोळे उघडले. तस्मात्, इंग्रजांचे अमलाचा परिणाम चांगला व लोक शहाणे होण्यास खुशी नाहीत, तरी ईश्वर जबरीने करवितो आहे. तुम्ही नको म्हणाल तरी तो ऐकणार नाही. ही त्याची दया मानावी. असा प्रसंग कोठून येणार ? ईश्वर दयाळू आहे.

## राज्यसुधारणा

■

**पत्र नंबर १४ : २८ मे १८४८**

सांप्रत युरोप-खंडातील बातमीपत्रे आली, त्यात मुख्य वर्तमान असे आले की, फरासिसांचे मुलखात राज्यसुधारणा झाली. त्यांस फ्रेंच रिवोल्युशन असे इंग्रजीत म्हणतात, व त्याचा अर्थ राज्यसुधारणा असा होतो.

लोकांमध्ये दंगा, बंड इत्यादी शब्देकरून ते प्रकरण समजतात ही चूक आहे. कारण की, ते काही बंड नव्हे. हिंदुस्थानातील लोकांस स्वैर राज्याचे ताब्यात रहाण्याची सवय आहे. व दुसरे रीतीने राज्य ठाऊक नाही. यास्तव राज्यसुधारणा यांचा अर्थ त्यांस समजत नाही. याजकरिता त्याजविषयी मी थोडासा मजकूर लिहितो.

एशिया खंडातील देशांत बहुधा एक राजा स्वैर असून अंमल करितो. त्याची रयत याचे गुलामाप्रमाणे व तिचा नाश नफा करण्याविषयी संपूर्ण मुखत्यारी स्व-इच्छे राजास असती. अशा राज्यात बंदोबस्त कमी असल्यामुळे चार दुष्ट लोक जमा होतात, आणि गरीब रयतेस लुटण्याकरिता व आपले दुसमान यांचा सूड घेण्याकरिता ते जागोजाग हल्ले करतात. त्याचे नाव बंड. या प्रकारची बंडे व तोतये हिंदुस्थानात पुष्कळ झाले आहेत. मागे पेशवाईत भाऊसाहेबांचा व यशोदाबाईंचा तोतया आणि चतुरशिंग राजा, उमाजी रामोशी, राघु भांग्या, पेंढारी, शिंद्यांच्या बाया व तेलणी यांचे दंगे झाले, ती बंडे म्हणावी कारण की, तो चोर व लबाड लोकांचा समुदाय व त्यांचा हेतू रयतेस सुख देण्याचा नव्हता. दरिद्राने त्रासलेले किंवा काही एक कारणामुळे चवताळलेले लोक उगेच जमून लोकांचे नाश करतात. मग अर्थातच लोक त्यांचा द्वेष करून त्यांस मारतात व फाशी देतात.

परंतु राज्यसुधारणा हे या रीतीचे बंड नव्हे. व हिंदुस्थानसारख्या देशांत ते व्हावयाचेही नाही. ज्या देशांत लोक शहाणे व ज्ञानी व एकमेकांचे सहोदर बंधूप्रमाणे हित पहाणारे असे आहेत, त्या देशांत मात्र अशी राज्यसुधारणा होते. सांप्रत टोपकर लोक शहाणे आहेत व त्यांच्यामध्ये किती एक हितावह व चांगल्या गोष्टी आहेत. त्या आपले लोकांस अद्याप माहीत नाहीत. आपले देशाचे हित करावे हा मुख्य धर्म, असे युरोपात समजतात. आणि जर काही अपाय किंवा वाईट वर्तणूक राजाकडून किंवा त्याचे प्रधानाकडून होईल तर

लोक त्यांस बडतर्फ करतात.

ही गोष्ट आपले इकडील लोकांस फार अशक्य व चमत्कारिक वाटेल. कारण की, इकडील लोकांस राजा म्हणजे विष्णूचा अवतार व प्रधान म्हणजे ब्रह्मदेव वाटतो. त्यांनी अन्याय केला तरी म्हणतात की,

"राजा हरति सर्वस्वं तत्र का परिदेवना"

असे आहे, तेव्हा या लोकांस सुधारणा माहीत नाही, परंतु ज्यास ज्ञान संपादन करण्याची इच्छा असेल त्याने इंग्लंड देशाचा वृत्तान्त काढून पहावा म्हणजे जान राजा म्हणून होता, त्याजकडून अन्याय झाला; याजमुळे सर्व रयतेने त्याजवर उठून त्याजपासून करार करून घेतला. तो करार हल्लीपर्यंत चालू आहे हे समजेल. सर्व कायद्यांचे मूळ तेच आहे. पुढे राजा चार्लस याने पुनरपि अन्याय केले, तेव्हा त्यांस रयतेने धरून आणून कैदेत ठेवले. आणि त्यांस त्याचे वडिलांचा करारनामा दाखविला आणि मोठी न्यायसभा भरून तेथे त्याचा न्याय केला. तेव्हा राजाने अन्याय व लोकांचे अनहित केले असे शाबीत झाले. नंतर त्यांस शिरच्छेद करण्याची सजा झाली. तसाच राजा जेम्स याने जुलूम केल्यावरून त्यांस पदच्युत करून परदेशास हाकून दिला. अशा गोष्टी तिकडे घडतात. त्या इकडे अनश्रुत आहेत.

जशी राजसुधारणा होते तशीच धर्मसुधारणाही होते. म्हणजे धर्माची व्यवस्था करून वाईट प्रकरणे बंद करतात. अशा गोष्टी हिंदुस्थानातही घडल्या आहेत. जेव्हा जैनमत झाले होते तेव्हा कुमारिलभटाने ते मोडून हिंदू धर्म स्थापिला व किती एक शास्त्रार्थ रद्द करून नवे चालू केले. त्याचे नाव धर्मसुधारणा. परंतु राज्यसुधारणा अद्यापि हिंदुस्थानचे इतिहासात आढळलेली नाही. कोणी कदाचित शिवाजी राजाच्या प्रकरणास राज्यसुधारणा म्हणतील व मलाही वाटते की, ते राज्यसुधारणाच होय; कारण जरी केवळ राज्यसुधारणेच्या हेतूने शिवाजीने मोगलांशी युद्ध करण्यास आरंभ केला नाही, तरी त्याचे स्वाभाविक कृत्य त्या स्थितीवर गेले. व मराठ्यांचे व सर्व हिंदू लोकांचे राज्यासंबंधी माहात्म्य सरासरी पाचशे वर्षेपर्यंत मुसलमानांनी बळकावले होते ते पुनरपि हिंदू लोकांचे हिंदू लोकांकडे शिवाजीचे कृत्यामुळे आले. तस्मात् ती 'रिवोल्युशन' म्हणावी. त्यानंतर मग शिवाजीचे पाठीमागे तसा सद्बुद्धिवान पुरुष न झाल्यामुळे ते कार्य तसेच राहिले, व मुलूखही इंग्रजांचे हाती गेला. तथापि शिवाजी राज्यसुधारक म्हणावयास योग्य आहे, यात संशय नाही. असो.

आता फराशिसांचे मुलुखात असे झाले की, राजा रयतेस पीडा करू

लागला व विनाकारण खर्च करून रयतेकडून नाना प्रकारचे कर वगैरे बसवून पैका घेऊ लागला, तेव्हा पारीस म्हणून फ्रेंचांची राजधानी आहे व तेथे मोठमोठे विद्वान लोक आहेत. त्यांनी संपूर्ण रयतेस त्रास आला आहे, असे जाणून तेथे एक युद्धविद्या शिकविण्याची शाळा आहे, तेथील विद्यार्थी वगैरे। लोक मिळवून राजवाड्यावर गेले व तेथे फौजफाटा होता त्यांस सांगितले की, आम्ही राज्याची सुधारणा करावी व आपल्यास स्व-इच्छे राजापासून सुख होत नाही, यास्तव लोकसत्तात्मक राज्य करावे यासाठी झटतो. आमचा हेतू इतकाच की, सर्व लोकांस सुख व्हावे व ज्याचे त्याचे हक्क कायम रहावे; आम्ही लुटणारे नव्हत; व आम्हास काही नको. हे ऐकून ती फौज त्यांस वश झाली आणि त्यांचेबरोबर गेली. मग ते सर्व लुईस फिलीप राजास हस्तगत करणार तो तो स्त्रीसहित धाकाने पळून गेला. मग मागे शहरचे लोकांनी वाडा घेऊन सभा भरवली व असे ठरविले की, आजपासून रयतेचे राज्य रयतेने करावे. व त्याप्रमाणे नऊशे आसामी सभेस बसण्यास मुकरर केले. आणि राजाचे असबाबास काही हात लाविला नाही. राजाचे खोलीत जे मोहोर केलेले लखोटे सापडले तेही ज्यांचे नावावर होते त्यांजकडे पाठवून दिले. असे मर्यादेने ते लोक चालले. हल्ली फ्रेंचांचे राज्यात लोक राज्य करतात, हे पाहून दुसरे टोपकराचे मुलूख म्हणजे अमेरिका व सुइजरलंड वगैरे यांनीही आपले देशांत लोकांचे राज्य स्थापन केले. फ्रेंचांचे देशांत ज्या वेळेस राजास काढून टाकिले तेव्हा फौजेमध्ये बोनापार्ट म्हणून एक नामांकित सरदार होता. त्याने जय पुष्कळ मिळविले व त्यांस राज्याचा लोभ उत्पन्न होऊन त्याने राज्य बळकावले, तेव्हा इंग्रजांनी वेलसलीसाहेब म्हणजे ड्यूक वेलिंग्टन यांस पाठवून त्यांस कैद करून टाकले आणि पूर्वीचे राजाचा वंशज बसविला; परंतु हल्ली फ्रेंचांचे राज्यात हात घालू नये असा निश्चय इंग्रजांनी केला आहे; कारण संपूर्ण लोकांचा एकोपा ठरला की, राजा नसावा आणि प्रजा एकत्र होऊन राज्य चालवितात व इंग्रजांशी स्पर्धाही करीत नाहीत. त्यापेक्षा आपल्यास बोलण्यास काहीच जरूर नाही. असे इंग्रजांनी ठरविले आहे व इंग्रजांचे काही जिल्ह्यांत दंगे झाले आहेत; परंतु ते मोठे नाहीत. किती एक मोडले, त्यांचेही कारण हेच की, राजाकडून काही जुलूम जास्ती होऊन लोक त्रासले असे पाहून पुन्हा त्याचे शांतवन करतात व वाईट कायदे व कर बंद करतात, म्हणजे बंदोबस्त होतो. असे त्यांनी अद्याप शहाणपणाने राज्य चालविले आहे.

## राज्यसुधारणा

▣

पत्र नंबर २५

सांप्रत हिंदुस्थानातील लोकांस अज्ञानदशा आहे याजमुळे राजा कोण आहे व व्यवस्था कशी आहे, ते कळत नाही. ज्यांस खावयास आहे त्यांस आपल्यासारखे सर्व श्रीमंत आहेत असे वाटते. पटवर्धन जहागीरदार यांचे प्रांतांत जे रहातात, त्यांस असे वाटते की, पृथ्वी चक्रवर्ती राजे पटवर्धनच आहेत व ते चिरकाल नांदतील. शिंद्याचे राज्यांत आहेत, त्यांसही असेच वाटते. जे पेशव्यांचे अंमलात पुण्यात रहात होते, त्यांस असेच वाटत होते आणि एक एक राज्य जात चालले, त्याचा कोणास ठिकाण नाही. सर्व आपले ठिकाणी धुंद आहेत.

इंग्रज कोठून आले आहेत व ते आपल्यावर राज्य कोणत्या रीतीने करतात व त्यांचे मुलखात राज्य कसे चालते हे कोणास ठाऊक नाही. लोक मूर्खपणात राहून भिकारी होत चालले व अज्ञान-रोगाने ग्रस्त होऊन मरावयास टेकले. त्यांस औषधे कशाची ? स्वदेशीय राजधानीतील लोकांस आम्ही काही म्हणत नाही, कारण त्यांची निद्रा कुंभकर्णासारखी आहे. जरी आम्ही त्यांचे कानाशी नौबती वाजविल्या तरी ते जागृत होणार नाहीत, घोरत असतील व जेव्हा त्यांस कोणी येऊन लाथ मारील, तेव्हा ते जागे होतील. असो. परंतु गतश्री जे लोक झाले आहेत, त्यांस सांप्रतकाळचे राज्यामुळे अडचणी किती आहेत, याची माहिती असेल. पुण्यासारखी बुडती शहरे व तुच्छ मानलेली जात ब्राह्मणासारखी, त्यांतील लोकांस माहिती असेल की आपला देश निर्धन होत चालला आहे. याचा विचार करणे सर्वांस उचित आहे. आणि मुलखाचे दरिद्र काढावयाचा उपाय करणे, तर आधी राज्य सुधारले पाहिजे. उत्तम रीतीने राज्य चालावे. अशी काही तरी युक्ती निघाली पाहिजे.

मी जाणतो की, लोक मूर्ख आहेत याजमुळे त्यांस याचा विचार करण्यास शक्ती नाही, तत्रापि काही उपाय मला सुचला आहे, तो मी लिहून प्रकट करतो. हल्ली हिंदुस्थानात बहुतेक राज्य कंपनी-सरकारकडे आहे व लोकांस राज्यात काही अखत्यार नाही. इंग्रजांचे स्वदेशीय राज्यात पाहिले तर तसे नाही. तेथील लोकांस राज्यात हात घालण्याचा व कायदे करण्याचा अधिकार

आहे. विलायतेतील राजा जडजाचे नाझराप्रमाणे आहे. जेव्हा लोकांची सभा म्हणजे पार्लमेंट हे कायदे फर्मावितात, तेव्हा राजा त्याबरहुकूम वहिवाट करतो. दर वर्षास राजाचे खर्चास पैसा पाहिजे. तो लोकांस मागील सालचा हिशेब देऊन पुढे वसूल करण्याची परवानगी घेतल्यावर त्यांचे हुकमाप्रमाणे कर व धारे बसून वसूल होतो. येणेकरून जसे लोकांस पाहिजे तसे राज्य चालते. एक राजा स्वइच्छेने राज्य करतो, त्यापेक्षा ही युक्ती बरी आहे व याप्रमाणे हिंदुस्थानात राज्य चालेल, तर फार चांगले होईल, जे सुज्ञ लोक असतील, त्यांस मोठे जाग्यावर व अधिकारावर नेमता येईल. असे इकडे राज्य असावे.

सन १८३४ साली कंपनीची सनद २० वर्षांची बाहाल झाली. त्या समयी या गोष्टीचा विचार पडला होता. किती एक विलायतेतील दयाळू लोक यांनी सांगितले की, इंग्रज लोकांचे राज्य ज्या रीतीने चालते त्याप्रमाणे हिंदू लोकांचे चालावे; तेव्हा कंपनी सरकारने अशी शाबिती केली की, हिंदू लोक मूर्ख आहेत, त्यांस पार्लमेंट म्हणजे काय हे ठाऊक नाही. याजमुळे तेथे असे राज्य बसविल्याने बखेडा मात्र होईल आणि सर्व बेबंद होईल. पार्लमेंटात बसणारे लोक मोठे शहाणे पाहिजेत. त्यांचे मनात लोकांचे हित नेहमी वागले पाहिजे. तेव्हाच ती सभा नीट चालेल. त्याप्रमाणे पार्लमेंटात बसावयास सर्व हिंदुस्थानात एकही योग्य मनुष्य मिळावयाचा नाही, ही मोठी अडचण आहे. याजमुळे विलायतेतील बादशहाने कंपनी-सरकारची सनद कबूल करून वीस वर्षेपर्यंत कमाविशी कायम केली.

ती वीस वर्षे सन १८५४ त भरतात. तेव्हा अजून ६ वर्षांचा अवकाश आहे. इतक्यात किती एक लोक शहाणे होतील व हल्ली किती एक शहाणे सापडतील; याजकरिता आजपासून सर्व गरिबांनी व श्रीमंतांनी एकत्र होऊन विलायतेतील राणीसाहेबांस तपशीलवार एक अर्ज करावा की, हल्ली राज्यपद्धती आहे, तीपासून आमचा फायदा नाही व आमचे राज्यासंबंधी हक्क चालत नाहीत व हिंदू लोक जसे, तसे इंग्रज लोक मनुष्ये आहेत, याजकरिता इनसाफ बरोबर होण्याकरिता सर्व इंग्रज व नेटीव लोक यामध्ये सांप्रत मोठा भेद आहे, तो मोडून एकसारखे होण्याकरिता हिंदुस्थानचे देशांत पार्लमेंट ठेवावे व ही मोठी सभा मुंबईस भरावी. आणि तेथे दरएक शहरातून व दरएक जिल्ह्यातून दोन दोन आसामी घेऊन त्या सर्वांस कौंसलांत बसवून गवरनराने त्यात मुख्य असावे व जे लोक दर जिल्ह्यातून आणावयाचे ते सर्व जातीतील सारखे असावे. दर जिल्ह्याचे माजिस्ट्रेट साहेबांकडून दवंडी पिटवावी की, राज्याचा विचार चांगले रीतीने होण्याकरिता संपूर्ण लोकांनी विचार करून दोन शहाणे मुखत्यार

नेमावे व त्याप्रमाणे नेमिलेले सर्व लोकांनी हजर व्हावे. हे लोक बोलणारे, चतुर व मुच्छदगिरी केलेले असावे; कारण हे राज्याचे हिस्सेदार आहेत. केवळ शिरस्तेदार, मुनसफ व मामलेदार नव्हत व या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादी जे शहाणे दिसतील, ते नेमावे व त्यांनी राज्य चालवावे, म्हणजे लोकांचा फार फायदा होईल.

यापमाणे अर्जी करून, विलायतेस दहापाच आसामी प्रयत्न करण्याकरिता नेमून, त्याजबरोबर ती पाठवावी म्हणजे आपले लोकांचा काही उदयकाळ होईल. नाही तर हे असेच किती एक वर्षेपर्यंत रहातील, यास्तव जे लोकांचे हित पाहणारे आहेत, त्यांनी हा बेत केला पाहिजे. म्हणजे दरिद्र वगैरे बोभाट लोक सांगतात, हे त्वरित दूर होतील. आणि इंग्रज लोक इकडील लोकांस मूर्ख असे समजतात, तेही मत मोडेल आणि राज्याची उत्तम प्रकारची सुधारणा होऊन एके राजाचे अंमलात सुख काय व लोकसत्तात्मक राज्यात सुख काय, हे सहज दृष्टोत्पत्तीस येईल. असे सरकार झाल्याने मग शिंद्यांचे किंवा हैदराबादचे राज्य चांगले की काय हे त्वरित ध्यानात येऊन चांगले राज्य चालविण्याचे रीतीची माहितगिरी सर्व लोकांस होऊन बहुधा हे उदाहरण पाहून सर्व दुसरी राज्येही याचप्रमाणे होतील व येणेकरून एका राजाचे ताब्यात राहून त्याचा जुलूम सोसावयाची खोड हिंदू लोकांस लागली आहे, ती ते विसरून जातील. राज्य करण्यास गरीब व मातबर नीच जातीचे व उंच जातीचे लोक समान मानावे, हे सर्वांस कळू लागेल. अशा सभेत जातीविषयी निवड नको, हे वर सांगितलेच आहे. जे फार विद्वान व चांगले चालीचे लोक आहेत, तेच नेमले पाहिजेत. मग त्यांची कोणतीही जात असो, परंतु ब्राह्मणांस गर्विष्ठपणा फार आहे, याजकरिता ती जात फार थोडी असली पाहिजे.

सदाशिवराव भाऊ पेशवे हे स्वारीस गेले, तेव्हा लढाईचा विचार करण्याकरिता मराठे, मुसलमान व ब्राह्मण सरदार बसत; परंतु ते इतरांस तुच्छ मानीत. शेवटी त्यांच्या गर्विष्ठपणाचा त्रास होऊन होळकर म्हणू लागला की, या बामणाचा गर्व हरण झाला तर बरे होईल. शेवटी अशानेच सदाशिवराव भाऊंनी सर्व फौज बुडविली व आपणही बुडाले.

याप्रमाणे नाना फडणीस यांचा स्वभाव सर्वांस माहीत असेलच, त्यांनी आपले गर्विष्ठपणानेच इतर लोकांस तुच्छ मानिले. यांचे पुराणात वगैरे ब्राह्मण म्हणजे देव, असे म्हटले आहे, त्या समजुतीवर ते जातात. त्यांस अद्याप इतर लोक व आपण सारखेच आहो, हे कळले नाही. ईश्वरेच्छेने लवकरच कळेल.

# लाच

पत्र नंबर ३२ : २२आक्टोबर १८४८

इंग्रज लोक हल्ली हिंदुस्थानात राज्य करतात. हे सामान्यतः इकडील लोकांपेक्षा शहाणे, विद्वान, ज्ञानी, माहितगार व निष्कपटी आहेत. परंतु शेकडा पाच या सुमाराने त्यात वाईटही असतात. तसेच, जे चांगले आहेत, ते तरी सर्व कामे करू शकत नाहीत. कारण एकटा मनुष्य; त्यांस दोन हात. तेव्हा त्याने कितीही काम केले तरी ते थोडेच करील आणि त्यांचे पाठीस डोळे नसतात. याजमुळे त्यांचे हाताखालचे लोक चांगले सज्जन असल्याखेरीज सर्व कामे चांगली चालणार नाहीत व इकडील लोक लबाड म्हणून जरी प्रसिद्ध आहेत, तरी ते इंग्रजास राजकीय कारणास्तव आणि अडचणीमुळे पुष्कळ ठेवावे लागतात. या लोकांची वर्तणूक फार वाईट म्हणून लोकांचे फार नाश होतात. दिवसानुदिवस त्यावर भरवसा कमी राहतो.

हिंदू लोक लाच खातात, याचा संशय नाही. कंपनी सरकारचे चाकरात हजारांत लाच न खाणारा व ईश्वरास भिऊन चालणारा क्वचित असतो. बाकी सर्व शिपायापासून प्रिन्सिपाल सदर अमीनपर्यंत शपथेचा व्यभिचार करतात. याचे कारण असे की, या लोकांस ज्ञान आणि धर्म नाही हे एक; आणि दुसरे इंग्रज लोकांस हिंदू लोकांची परीक्षा करिता येत नाही. याजमुळे कोणत्याही कामावर यथायोग्य गुणाने योजना होत नाही. हिंदू लोक जरी मूर्ख आहेत, तरी त्यांत निवड केली, तर चांगले शहाणे व ईश्वरास भिणारे असे काही सापडतील; परंतु सरसकट नेमणुका करतात; याजमुळे वाईट लोक पुष्कळ अधिकारावर येतात. जर असा ठराव केला की, इंग्रजी विद्या शिकलेले लोकांस कामावर नेमावे, तर लाचाचा काही बंदोबस्त होईल, मोठे शास्त्री जरी असले, तरी त्याचाही उपयोग नाही. कारण मी एका शास्त्र्यास प्रश्न केला की, 'लाच घ्यावा किंवा नाही ?' त्याने सांगितले की लाच खाणे हा न्यायाधीशाचा धर्म आहे. परंतु खरा असेल त्याजपासून घ्यावा असे शास्त्र आहे.' तेव्हा हिंदू लोकांचे शास्त्राचा या गोष्टीस काही प्रतिबंध करतो; परंतु कायदा चुकविण्याचे सोपे आहे. ज्या पुरुषाचे मनात ईश्वराज्ञेचा निर्धार नाही त्यांस कायदा दिला तरी तो लाच खाल्ल्यावाचून राहणार नाही. तेव्हा हिंदू लोकांचे मनच फिरले पाहिजे. ही गोष्ट वाईट, असे त्यांस पक्के समजल्यावाचून लाचाचा प्रतिबंध

होणार नाही.

जरी इंग्रजांनी भगीरथ प्रयत्न केला, तरी हे लोक अडून अडून लाच खातात. हे जगप्रसिद्ध आहे. आणि वास्तविक पाहिले, तर जो मनुष्य मुनसफाचे काम करितो, तो वेतना इतका खर्च ठेवून पाच वर्षांत दहा हजार रुपये जवळ करतो. तसेच शिरस्तेदार आपले सर्व वेतनाइतका किंबहुना जास्तीच खर्च करून सालात पाच हजार रुपये जवळ करतात. तसाच नाझरही सालाचे पाच हजार रुपये मिळवितो. सामान्य कारकूनही दहा वर्षे काम करतो, तर तो दोन हजार रुपये जवळ करितो. तसेच चपराशी पगाराचे दुप्पट मिळवितात. फौजदार व मामलेदारही याजप्रमाणे; जर बारीक शोध केला, तर ही सर्व बातमी लागते आणि जरी जड्ज किंवा कलेक्टरसाहेब प्रमुख असतात; तरी त्यांचा इलाज़ चालत नाही. पहा! एक मनुष्याने हुकूमनामा बजावण्यास नेला, तर पहिल्याने शिरस्तेदाराचे आर्जव करावे लागते. त्याशिवाय साहेब काही करीत नाही. तेव्हा लोक त्याची पूजा करून नंतर हुकूम घेतात. तो बार करणार कारकून याजवळ देतात. तेव्हा शिरस्तेदार व कारकून एका मताचेच सिद्ध साधक असतात. ते त्यांस तसदी देत नाही की, अमक्याचे काम जरूर करावे. जेव्हा त्या कारकुनास चार आणे द्यावे तेव्हा तो बार करून मालकाजवळ देतो. मग मालक नाझराकडे जातो. तेव्हा नाझर म्हणातो की, 'आता मजजवळ शिपाई नाही, जा, पाहिजे तर साहेबास सांगा.'

तेव्हा सावकार तर एक वेळ खर्च करून साहेबाकडून आला असता, तो पुन्हा जाईल, तर दाद लागणार नाही. आणि जर नाझरावर फिर्याद करील तर साहेब म्हणतो की, "अरे, अमलदारावर हा फिर्याद करतो! त्याची शपथ घ्या आणि बसवून ठेवा." अशी त्याची तिकडे शोभा होते. तेव्हा काही खर्च पडेल तो करावा हे ठीक असे समजून नाझराची मूठ भरतो. नंतर सर्वांची पंचोपचार पूजा करून शेवटी शिपाई जप्तीस मिळतो. तो मिळाला की म्हणतो, 'दादा, रामराम. आपणाकडे नेमणूक झाली. देवाने केले, असे कूळ मिळाले म्हणजे आपल्यास काय कमी?' आठचार आणे त्यांस द्यावे. तेव्हा तो बरोबर काम करतो. नाही तर कुळाकडे जाऊन अगोदर बातमी लावून माल पळवितो. पुढे माल जप्त केला, तो लिलाव होईपर्यंत याचप्रमाणे खर्च पडतो. शेवटी रुपये आले म्हणजे तरी लवकर पदरी पडत नाहीत. नाझर म्हणतो, 'जाऊ द्या. या पहिल्या तारखेस.' तेव्हा उत्तरपूजा करावी लागते. शेवटी पन्नास रुपयांचा दावा असला तर चाळीस रुपये खर्च होतो. मग त्या सावकाराने म्हणावे, अरे, रुपये नाही आले तर नाही, बुडाले; परंतु कूळ पैसा देत नव्हते. त्याची

तर खोड मोडली ? ' एवढा मात्र आनंद मानून बसतात.

तेव्हा या रीतीने रयतेची किती खराबी होईल बरे ? या प्रकारे इंग्रजांच्या दरबारात न्याय चालला आहे. छापी कागद, वकील, मुनसफ लूट करतात. हुकूमनामा झाला, तरी सदरी लिहिल्याप्रमाणे व्यवस्था होते. कित्येक लोक असे आहेत की, शंभर रुपयांची फिर्याद करतात. तीत चारशे रुपये खर्च करतात व शिवाय आर्जवे व नित्य खेपा, आपला रोजगारधंदा सोडून कज्जाचे पाठीस लागतात. याजमुळे बेजार झाले आहेत, असा अनर्थ सरकारी कामदार करतात. या तऱ्हेने पैसा काढून आपला नफा करतात, रयतेची दया किंवा ईश्वराचे भय किंवा धर्माचा प्रतिबंध किंवा मनाची लज्जा किंवा परलोकाची काळजी किंवा अब्रू हे काही एक मनात आणीत नाहीत. तेव्हा व्यापार आणि व्यवहार व देणेघेणे कसे नीट चालेल ? इंग्रज तर या गोष्टीस वाकब असे थोडेच आहेत ? काही काही पुरते आहेत; परंतु त्यांचा तरी उपाय चालत नाही.

यांस एवढाच उपाय आहे की, चांगले लोक पाहून अधिकारावर ठेवावे अधिकारावर ठेवणे याची फार चौकशी करून लोकांची निवड करावी व त्यांचे गुणांचा विचार करावा. आणि लाच न खाणारे आणि इंग्रजी जाणणारे आहेत व जे फार विद्वान आणि विचारशील आहेत त्यांस ठेवावे; तरच त्यांचा बंदोबस्त होईल, नाही तर कदापि होणार नाही. मोठा शहाणा साहेब असला, तरी काय करतील ? मराठी अर्जी असली तरी ती वाचावयाला शिरस्तेदार पाहिजे. हुकूमनामा बजावण्यास नाझर पाहिजे. शिपाई, कारकून पाहिजेत. अव्वल कज्जे फैसला करण्यास मुनसफ पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाही. परंतु त्यांची वाईट वर्तणूक असली तरी साहेब काय करतील ?

हल्ली लोकांस असे वाटते की, इंग्रजांचा रोजगार करून पैशास जय नाही व बरकत नाही. म्हणजे उघड लाच घेता येत नाही; परंतु वास्तविक पाहिले तर बरकत असेल कशी ? "हपापाचा माल गपापा जातो," अशी म्हण आहे. हे लोक शपथ खाऊन पैसा मिळवितात. तो पैसा राहील कसा ? त्यांनीच शिक्षा पावून तुरुंगात शृंखळाबंधनात असावे, ही त्यांची योग्यता असते, परंतु कित्येक लोकांची ही अप्रतिष्ठा चुकते, हेच त्यांचे पुण्य म्हणावे. त्यांचे कल्याण होईल कसे ? जरी कोणी म्हणवितो की, मी पन्नास वर्षे व चाळीस वर्षे व तीस वर्षे व वीस वर्षे चाकरी केली; माझी सरकारने प्रतिष्ठा वाढवावी; पण त्यांनी आपल्या मनात विचार करून पाहिला तर समजेल की, कोणत्या धर्माने आम्ही चाकरी केली ? सरकारास फसविले. रयतेस लुटले. लबाड्या केल्या. त्यांत कोणाचे मी चांगले केले ? ज्यांस शिक्षा होते, तो तुरुंगात जातो.

जे राहतात ते म्हणतात की, आमची योग्यता हीच आहे; परंतु चालेल तितके दिवस करून घ्या. पुढे काय होईल ते पाहू! असेही लोक म्हणतात, परंतु त्यांची वास्तविक योग्यता पाहिली, तर जे लाचाकरिता तुरुंगात आहेत, त्या कैदीची योग्यता आणि जे कोर्टात मोठे अब्रूचे लोक म्हणून बसून न्याय करतात, अंमलदारी करतात, त्यांची योग्यता यांत काय अंतर आहे ? ज्या दिवशी सापडतील त्या दिवशी यांचीही गत तीच होणार. याजमुळे सरकारी अंमलदाराची योग्यताही लोकांत नसते. ते कामावर असतात, याजमुळे चार लोकांस त्याजजवळ जाणे जरूर पडते; परंतु त्यांची योग्यता प्रसिद्ध असते.

जरी हिंदू लोक हुशार आहेत, तरी या दुर्गुणाने त्यांची माती झाली व अब्रू गेली, याची कोण लाज बाळगीत नाही. कामावरून गेले म्हणजे त्यांचेकडे कोणी पहात देखील नाही. कारण की त्यांची योग्यता सर्वांस ठाऊक असते. जर पुरुषास खरी प्रतिष्ठा असली, तर ती त्याची चाकरी गेल्याने कमी होत नाही व द्रव्य आले गेले, तरी त्याने त्याची अब्रू कमी होत नाही. ती शाश्वत अब्रू; परंतु हे लबाड लोक जी अब्रू मिळवितात, ती मुलाम्यासारखी; ही टिकावयाची नाही. जे लोक लाच देतात, ते तरी मूर्खच असतात. जर सर्वांनी कट केला की, सरकारचे अंमलदारास लाच द्यावयाचा नाही, तर त्यांची खोड जाईल; पण असे चांगले कट करण्यापुरते शहाणपण जर या लोकांत असते, तर मग राज्य का जाते बरे ?

हे लोक फार मूर्ख आहेत. याजमुळे असे प्रकार यांजमध्ये आहेत व इंग्रज तर पक्के लोक आहेत. ते म्हणतात की, आपआपल्यांत हे लोक लुटून खातील. तर आमचे काय गेले ? आमची तितकी चांगलेपणाची प्रशंसा वाढेल. हेही खरे की, साहेबलोकांस लोक चांगले म्हणतात व नेटीव कामगारास बहुधा वाईट म्हणतात; परंतु आता सुधारलेले लोक व सुशिक्षित सरसावत चालले आहे. ते इंग्रजांची बरोबरी करतील, यांत संशय नाही.

✦ ✦

# वेळेचा व्यर्थ खर्च

पत्र नंबर ३४ : १२ नोव्हेंबर १८४८

आपले लोक वेळेची किंमत समजत नाहीत. वास्तविक म्हटले तर मनुष्यास ईश्वरी दत्त आयुष्य हेच धन आहे, जे या धनाचा अविचाराने व्यय करतात, ते उपाशी मरतात आणि जे या विचाराने व्यय करतात, ते स्वच्छपणाने सुख भोगितात.

सांप्रत हिंदू लोकांस अशी खोड आहे की, वेळ व्यर्थ घालवावा. आमचे पाहण्यात असे लोक आले आहेत की, आपले घरून उठून लोकांचे घरी जावे आणि त्यांचा व आपला वेळ गोष्टीत घालवावा. त्यांचे रिकामे गोष्टीवर सर्व ध्यान असते. जेवणदेखील ते विसरून गोष्टी सांगत बसतात. बरे, गोष्टी सांगतात त्या तरी उपयोगी, विचाराच्या व ज्ञानवृद्धी व्हावी अशा प्रकारच्या असाव्या, तर तेही नाही. मनुष्य उत्तम प्रकारचे भाषण करील तर त्यांस व श्रोत्यांस ज्ञान होईल. परंतु हिंदू लोकांमध्ये जे गोष्टी सांगणारे आहेत यांचा वेळ शहाणपणाचे गोष्टीत जात नाही. व्यर्थ मूर्खपणाच्या गोष्टींत जातो. त्यांचा काही उपयोग नाही. बहुधा भट लोकांच्या जेवणाच्या गोष्टी. हे आम्ही फार खाल्ले, थोडे खाल्ले, यजमानाने असे वाढले, इत्यादी मूर्खपणाच्या आणि अधाशीपणाच्या गोष्टी सांगत बसतात. त्यांचा मुख्य विषय बोलण्याचा काय तो जेवण हा असतो.

त्याचप्रमाणे कुळंबी लोक व मराठे सरदार वगैरे आपल्या बढाईच्या गोष्टी सांगतात. काम काही करीत नाहीत. त्याचप्रमाणे गृहस्थ लोकांत कोणी निद्रेने, कोणी दुर्व्यसनाने काळ काढतात. खाणे, पिणे, लेणे याहून दुसरा सुखाचा अनुभव काही त्यांस नसतो. माझे पाहण्यात लक्षावधी लोक आले आहेत. त्यांस पुसले तर ते म्हणतात, 'आम्ही काही करीत नाही. सरकारातून इनाम आहे, तेवढ्यावर निर्वाह करून घरी सुखरूप असतो.' त्यांचे आयुष्याचा हिशेब जर त्यांस पुसला तर जन्मापासून मरणापर्यंत त्यांचे आयुष्यात अशी एकही गोष्ट सापडावयाची नाही की, ती कागदावर लिहिण्यास योग्य व ऐकण्यास योग्य. अशा रीतीने ते काळ घालवितात. भटही असेच असतात. जर त्यांस म्हटले की, तुम्ही काय करीत असता, तर ते म्हणतील की, स्नानसंध्या करून गंगातीरी स्वस्थ असतो. मोगलाकडून इनाम आहे, तितक्यावर चरितार्थ चालतो.

तसेच मराठे लोकांस पुसले तरी ते म्हणतात की, सातारच्या राजाचे पदरी असतो, काम काही नाही; पंक्तीचे ताट, मानकऱ्यांमध्ये असामी व महाराजांबरोबर फिरावे. असे लोक मोठ्या राजधानीत आढळतात.

जेथे हिंदू लोकांचे राज्य आहे, तेथे सर्वत्र न्यायाचा अंधकार असतो; एवढेच नाही, परंतु विद्येचा व विचारांचाही असतो. बाहेर होते काय व जाते काय, याचा काही एक विचार नसतो. ज्याचे त्याचे ज्ञान आपलेपुरते व आपले घरापुरते असते. त्यांस दुसरे काही ठाऊक नसते. कोणी म्हणतील की, थोर लोकांच्या पदरी भिक्षुक, भट, शास्त्री, पंडित असतात. परंतु ते लोक निरुपयोगी असतात, शास्त्री जे आहेत, त्यांस मागील हजारो वर्षांचे ग्रंथ उलटतानाच पुरे होते, कारण संस्कृत भाषेचे कुलपात ते असतात. तेव्हा प्रथम ते कुलूप उघडावयास म्हणजे भाषा शिकण्यास पाच दहा वर्षे लागतात. मग पुढे काही ज्ञान व्हावे, तो लोक ' शास्त्रीबोवा ' असे म्हणू लागतात. मग अंगावर शालजोडी घेऊन मिरवतानाच पुरेसे होते. मग विद्या कशाची? अलीकडे पाच हजार वर्षांत झाले काय, याचा पत्ता कोणास नाहीच. शास्त्री, पुराणिक द्वापारयुगापर्यंत गोष्टी सांगू शकतात. परंतु पुढे अलीकडील अनेक देशचे वर्तमान, व नवीन कला व विद्या वगैरे उत्पन्न झाल्या आहेत याविषयी खबर नसते. जे संस्कृतात देश लिहिलेच नाहीत ते आता आहेत. त्यांचे वर्तमान त्यांस ठाऊक नाही.

हल्लीचे सरकारची व्यवस्था ठाऊक असल्यास उपयोग अधिक पडेल. परंतु हे ते समजत नाहीत. तस्मात् शास्त्री यांचे ज्ञान अपुर्ते आहे, जसे घरात पन्नास असामी, वृद्ध, ज्यांस जाग्यावरून उठवत नाही असे आहेत, तर त्या लोकांचा उपयोग काय? काही तरुण यामध्ये असतील तरच त्यांचा निभाव लागेल. आणि अलीकडील इतिहास व विद्या जाणून मग प्राचीन राजाचे इतिहास ठाऊक असले तर चांगलेच आहे. परंतु अलीकडील सोडून मागील राजांच्या कथा जन्मपर्यंत वाचल्या तरी उपयोग काय? मागील युगात मनुष्ये ताडभर उंच होती व दहा हजार वर्षे जगत होती आणि सोन्याची भूमी होती, अशा गोष्टी खऱ्या असोत-नसोत, परंतु त्यांचा मुळीच काही उपयोग नाही, यांत संशय नाही. भागवताची हजार पारायणे केली व रामायण नित्य वाचले, तरी हिंदुस्थानात इंग्रज कसे आले, हे समजणार नाही. तसे जन्मपर्यंत जुन्या गोष्टी सांगितल्या आणि सांप्रतचे विचार केले नाहीत तर त्यांचा उपयोग काय?

परंतु हे शास्त्री व भट संपूर्ण हिंदू लोक अजून मागल्या गोष्टींचे भरात आहेत. त्यांस अजून सांप्रतचे काही सुचत नाही. याजमुळे कित्येक लोक पोरासारखे बोलतात की, विलायतेत बेट लहान, दोन चार कोसांचे आहे.

कोणी म्हणतो टोपकर हे पाण्यातले राहणारे! कोणी म्हणतो, रूमशामचे राज्य मोठे. कोणी म्हणतो, सात लाख घोडे तेथे आहेत, कोणी म्हणतो, पंधरा लाख पायदळ तेथे आहे. कोणी म्हणतो, कंपनी सरकार बायको आहे. अशा नाना प्रकारच्या गैर माहितीच्या गोष्टी सांगतात. इंग्रजांस राज्य करू लागल्यास दोनशे वर्षे झाली आणि या लोकांच्या डोकीवरचे केसदेखील त्यांनी मोजले. परंतु या लोकांस त्यांचे डोळेही ठाऊक नाहीत, हा केवढा चमत्कार! भट लोक हे तर या पृथ्वीवर जन्मास आले, व न आले सारखेच आहेत. यांचा काहीच उपयोग नाही. अन्नास मात्र खर्च, लोकांस उपद्रव, भीक मागणे, व्यर्थ वेळ घालविणे, हीच त्यांची वृत्ती. कोणी काही करील, तर यांचा कर त्यावर आहेच. याचा काहीच उपयोग लोकांस नाही. परंतु यांचा सन्मान ठेवणारे गृहस्थ पुष्कळ आहेत. येणेकरून द्रव्याचा व्यय होऊन विद्याशून्य लोकांचा प्रतिपाल होतो आणि मूर्खपणा वाढतो. या लोकांस काही तरी काम शिकविले तर बरे.

ब्राह्मण लोक शिंपी वगैरे यांचा रोजगार करतील तर अब्रूने पोट भरतील. भिक्षुकी करावी आणि निर्लज्जपणाने दुसऱ्याचे दारी उभे रहावे, त्यापेक्षा धंदा करून वेळ आणि आपली शक्ती उपयोगास लावून पोटे भरावी ते बरे नाही काय? हे लोक जर आपले आयुष्याची किंमत करतील आणि व्यर्थ दिवस घालविणार नाहीत, तर यांचे फार कल्याण होईल.

## इंग्रजी राज्यापासून लाभ

**पत्र नंबर ३८ : १० डिसेंबर १८४८**

सांप्रत किती एक लोक असे म्हणतात की, इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानातून जाईल तर चांगले; परंतु आम्हास वाटते की, इंग्रजांचे राज्यापासून बहुत लाभ आहेत.

प्रथम लोकांचे मत असे आहे की, या सरकारात कोणास बहुमानाची जागा मिळत नाही, हे तर सामान्यतः खरे आहे; परंतु ही गोष्ट स्वाभाविक उत्पन्न जहाली आहे. परकी लोकांवर भरवसा कमी; परंतु उभयतांचे तर्फे अधिक माहिती होईल तेव्हा विश्वास पटेल. व्यापाराचे बाबतीत इंग्रज लोक इकडील

लोकांपेक्षा विशेष शहाणे आहेत, तेव्हा पदार्थ करून ते इकडे स्वस्त विकावयास आणितात. तेव्हा याचा शब्द त्यांजकडे नाही; परंतु काही दिवसांनी हेच लोक त्यांच्या विद्या घेऊन त्यांचेप्रमाणे माल उत्पन्न करतील व काचा, घड्याळे, सुऱ्या, कातऱ्या, कापडे वगैरे जिन्नस इकडे न होतील, असे नाही.

परंतु प्रस्तुत लोक आळशी, याजमुळे देश भिकारी जाहला हे खरे. दुसरा उपाय असा की, जर या लोकांस परदेशांत जाण्याचा अटकाव नसता, तर आजपर्यंत यांनी किती एक देश व किती एक ठिकाणे पाहून तेथील ज्ञान, शहाणपण, रीती, कलाकौशल्या इत्यादी इकडे आणले असते. परंतु लिहिणारे-वाचणारे जे ब्राह्मण त्यांची नजर उत्सव, समाराधना, जेवणावळी याजवर; कारण "ब्राह्मणो भोजनप्रियः" तेव्हा घरात आळस, बाहेर मनाई, अशा दोहोकडून यांस अडचणी, तेव्हा याचा दोष कोणावर बरे? बरे, मोठ्या मोठ्या जागा इकडील लोकांस आता नाहीत. असा अभिप्राय बहुत लोकांचा आहे. त्यांस पहा बरे, इंग्रज लोक इकडे आले, त्यांचे देशचे हजारो लोक इकडे लढाईत मेले. व इतके दुरून ते तेथे आले त्यांस लाभ कोणता असावा? जर त्यांनी आपले लोकांचे महत्त्व राखू नये, तर मग त्यांस लाभ काय? कोणी काही काम करतो, त्यांत लाभ पाहतो, दुनयेची रीती अशीच आहे. जर हिंदू लोक शहाणे असून, धैर्य करून परकी देशांत राज्य संपादन करते. तर असेच करते किंवा याहून अधिक करते, याचा विचार करावा. म्हणजे इंग्रजांची वर्तणूक कशी आहे, हे ध्यानात येईल.

जेव्हा मराठे लोक शिंदे, होळकर, परमुलखात (म्हणजे त्यांचे समजुतीप्रमाणे परमुलूख, परंतु वास्तविक पाहिले तर मुलूख एकच) गेले, तेव्हा त्यांची वर्तणूक कशी होती? किती गाव ते जाळीत होते? दरसाल ते खंडणी किती घेत होते? शहरे व सावकार किती लुटीत होते? या गोष्टीचे स्मरण ठेविले, तर इंग्रज बरे आहेत असे लक्षात येईल. हे लोक सुधारून मूर्खपणाचे शृंखलेपासून मुक्त व्हावे. याजकरिता त्यांचा उद्योग बहुत चालला आहे. आपली विद्या ते पसरीत आहेत. शिकणारास उत्तेजन देतात.

जे लोक इंग्रजांशी संबंध ठेवतात त्यांस बहुधा ठाऊक असेल की, इंग्रज साधारणतः इकडील लोकांपेक्षा अधिक काम करणारे, मेहनती, शहाणे, हुशार, खरे व प्रामाणिक आहेत. इकडील लोक त्याप्रमाणे नाहीत. शंभर इंग्रजांत पाच लबाड असतात; परंतु १०० हिंदू लोकांत पाच प्रामाणिक असतात. तेव्हा याजकडे मोठे अधिकार दिले तर लोकांची स्थिती नीट राहणार नाही. जे गुण राज्यकर्त्यांमध्ये असावे ते हिंदू लोकांमध्ये नाहीत. राज्याची पद्धती त्यांस ठाऊक

नाही. आजपर्यंत ब्राह्मण लोकांनी राज्य कधी केले नाही. हा एवढाच १०० वर्षे पेशवाईत काय तो दिवा लागला. तद्वत् मराठे. त्यांनी कधी राज्य केले नाही.

पूर्वी क्षत्रिय लोक राज्य करीत होते. ते तर आता नाहीत. तेव्हा राज्यकर्त्यांची शहाणपणे या लोकांस आल्याखेरीज काही उपयोग नाही. हे लहान पदवीधर आहेत, हेच बरे! कारण जेव्हा शिंदे व होळकर लक्ष्मीचे अंधकारात होते, तेव्हा त्यांनी ५०,००० पेंढारी लुटायचे कामावर ठेविले होते. त्यांचे निर्मूळ इंग्रजांनी केले. जे राज्य करतात तेच लुटारू लोकांस बाळगतात. हे कधी कोणी ऐकले होते काय? जे राजे चोरांचे रक्षण करतात आणि लुटारू लोकांस बाळगतात, त्यांचे वर्णन काय करावे? तद्वत् दक्षणेत रामोशी व भिल्ल वगैरे वाटपाडे लोक होते. त्यांस राजेच सामील होते व लोकांत लूट करण्यास त्यांस परवानगी देत होते. परंतु या राजांनी त्या लोकांस सुधारावयाचा यत्न कधींच केला नाही. ब्राह्मण लोक हे स्वहिततत्पर, गर्विष्ठ व कृत्रिमी आहेत, असे दिसते; कारण ते लोक नीच आहेत त्यांचे सुधारणेस यत्न करीत नाहीत.

त्यांस असे वाटते की, आम्हास ईश्वराने निर्माण केले आणि दुसऱ्यास ईश्वराने नीच निर्माण केले आहे; परंतु हे मत खोटे आहे; कारण ईश्वराने सर्व मनुष्ये सारखी निर्माण केली आहेत. तेव्हा ईश्वरकृपेने किंवा काळगतीने जे थोरपणास चढतील, त्यांनी आपल्याहुन जे नीच त्यांस सन्मार्गास लावण्याचा प्रयत्न करावा, हांच सद्धर्म आहे, परंतु ब्राह्मणांचे समजुतीस हे विरुद्ध आहे. जर ब्राह्मणांनी कैकाडी, कामाठी, रामोशी इत्यादी लोक पाहिले, तर त्यांचा द्वेष करतात. हलालखोर पाहिला तर त्याची निंदा करतात; परंतु त्यांस असे वाटत नाही की, प्रत्येक माणूस आपला आपणच हलालखोर आहे की नाही? जेव्हा जे काम जो मनुष्य आपले आपण करतो, तेच जो मनुष्य फार वेळ करतो, तर तेवढ्यातच तो त्यापेक्षा नीच कसा? वास्तविक विचार पाहिला तर हे अभिमान आहेत इतकेच. वास्तविक पाहिले तर कैकाडी लोक हे सुधारल्याच्या अंगी ब्राह्मणांसारखे शहाणे होतील, हे खचित आहे. परंतु त्यांस नीच मानून अगदी टाकावे, त्यांची दया करू नये, हे योग्य नाही. त्यांस मनुष्य समजून, ब्राह्मण आंधळा अथवा नीच जातीचा आंधळा असला, तरी धर्मास सारखाच आहे.

ब्राह्मण विद्येने थोर तर त्याप्रमाणे जे ब्राह्मण वेद अर्थसहित पढतील, त्याचा मान करणे योग्य आहे; परंतु हे आतासारखे 'पोपटभट' कैकाड्यासारखेच ज्ञानशून्य आहेत. यांत काही संशय नाही. इंग्रज लोकांनी हिंदू लोकांस स्थितीवर

आणण्याचा बहुत यत्न चालविला आहे व देशांत स्वस्थता केली. चोर, लुटारू नाहीसे केले. हे त्यांचे मोठे उपकार आहेत. किती काळ जरी ब्राह्मणी राज्य चालते, तरी सतीबंदी होती ना, पेंढार मोडते ना व बालहत्या बुडती ना. पहा बरे, पोरे बेलाशक मारीत होते. कोणी नवसाची पोरे टाकीत होते. कोणी मारून टाकीत होते. या प्रकारच्या चाली होत्या, कोणी स्त्रियांस जाळून टाकीत. कोणी जिवंत पुरीत, कोणी गळ्यात दगड बांधून बुडवीत. हे सर्व मूर्खपण कधी तरी हिंदु लोकांच्याने बंद करवले असते काय ? नाही.

अद्यापि पुनर्विवाहाविषयी किती एक प्रयत्न करतात; परंतु पहा, कोणी त्याच स्वीकार करीत नाही. जो तो भितो. ज्यांच्या पोरी बुडतात त्यांचे जिवास खाते; परंतु धैर्याने ही चाल बुडवून टाकण्यास कोणी उभे रहात नाहीत. तर पोरे मारल्याप्रमाणेच हे नव्हे काय ? रानात पोर सोडल्याप्रमाणे पोरी सोडतात. त्यांस कोणी त्राता नाही. हे जर सरकार मनावर घेईल, तरच सिद्धीस जाईल, नाही तर काही उपाय दिसत नाही. किंवा हिंदू लोक तरी काळेकरून शहाणे होतील तेव्हा होईल. अशा वगैरे बहुत कामांस इंग्रजांचे राज्य हितावह आहे.

## लाचेचा गुन्हा

**पत्र नंबर ४० : २४ डिसेंबर १८४८**

धर्मशास्त्रांत लाचेचा गुन्हा नाही. लोभिष्टपणा नसावा असे आहे; परंतु ही गोष्ट लाचेच्या गुन्हाविषयी नाही. या वचनाचे लाचेवर ओढून चंद्रबळ आणिले तर न कळे.

पेशवाईत रामशास्त्री न्यायाधीश होते व ते धर्मशास्त्राप्रमाणे चालत होते. त्यांचा आचार असा होता की, सरकारचे वेतन देखील घ्यावयाचे नाही. कोणाचा विडा किंवा पाणीदेखील प्यावयाचे नाही व धन संपादन मुळीच करावयाचे नाही. हा शास्त्राचा प्रतिबंध खरा; परंतु सामान्यतः लोभ घराण्याविषयी मात्र जहाले; तथापि न्यायकर्त्यांनी आपले नेमले वेतन घ्यावे. त्यात द्रव्य जमले तरी जमवावे आणि जे आपलेकडे न्याय करण्यास येतात, त्याजपासून त्याचे कार्य जाहले या कारणाने सत्पक्षाचे अथवा असत्पक्षाचे धन किंवा काही मोलवान

वस्तु घेऊ नये; घेतली असता त्या कर्माचे नाव अमुक व त्यांस शासन अमुक, असा निषेध शास्त्रात कोठे स्पष्ट नाही. केवळ लोभनिषेधावरून ही गोष्ट स्पष्ट होत नाही. मला तर स्पष्ट वचन कोठे आढळले नाही. इंग्रजी भाषेत "ब्रैब," फारशी भाषेत "रिश्वत" त्या अनुरोधाने लोभार्थी शब्द मूळचा हिंदुस्थानी असून, हल्ली महाराष्ट्रभाषेत 'लाच' हा योजिला आहे. या दोघांचा अन्वर्थक शब्द संस्कृत भाषेत नाही. मला वाटते की, लाचेचा गुन्हा आणि त्यांस शासन हा प्रकार प्रथमच या देशात इंग्रजांनी चालू केला. याचे पूर्वी कधी प्रसिद्ध नव्हता.

यास्तव कवीने म्हटले आहे की,

रिक्तहस्तं न गन्तव्यं राजानं देवतां गुरुम्।

याजवरून लोकांमध्ये काय अभिप्राय आहे, हे समजते. लोभाचा निषेध बहुत ठिकाणी सापडेल; पण लाचेचा सापडणार नाही. जर कोणी दुसऱ्याचा न्याय वास्तविक करील आणि वास्तविक पक्षकाराने स्वइच्छेने काही न्यायकर्त्यास दिले तर ते घ्यावे किंवा नाही, याचे उत्तर शास्त्रात कोठे नाही. लोभाच्या वचनावरून इतकेच होते की, न्यायकर्त्याजवळ काही असू नये. त्याने निर्वाहापुरते घ्यावे. स्वतंत्र असावे. त्यांचा संसार फकिराप्रमाणे असावा, असा शास्त्राचा हेतू दिसतो.

ब्राह्मणांनी न्याय करीत जावा, असे शास्त्रमत आहे आणि ब्राह्मणाजवळ द्रव्य कोणतेही प्रकारे राहू नये, त्यांनी द्रव्याचा धिक्कार करावा आणि भिक्षा मागून रहावे, हे धर्मशास्त्रात पुष्कळ सापडतील. जर ब्राह्मणाने काही दान घेतले तर त्याने अमुक प्रायश्चित्त करावे असे आहे व श्राद्धास बसला, तर अमुक प्रायश्चित्त करावे असे आहे, याचे कारण दानाने व श्राद्धाने दक्षिणेने जे त्यांस प्राप्त जहाले, ते पंधरा दिवस घरी बसवून किंवा त्यांस काही दुसरा खर्च घालून ते सरवावयाचे आणि ब्राह्मणास पुन्हा कफल्लक करून ठेवावयाचे, हा हेतू शास्त्राचा आहे. एकास दान केले असता पुण्य व दुसऱ्यास दान घेतले असता पाप, असे शास्त्र सांगते. याचा हेतू दुसरा काही दिसत नाही.

धर्मशास्त्रांत न्याय करण्याचे मार्ग पुष्कळ आहेत आणि त्यातील नेम किती एक चांगले आहेत खरे; परंतु त्यातील किती एक धर्म आहेत, ते पाच हजार, दहा हजार वर्षांमागील लोक जे होते त्यांसच योग्य. सांप्रत काळी ते विलक्षण दिसतात. हिंदू लोकांची समजूत मुसलमानांचे समजुतीसारखी आहे की, धर्मशास्त्रात जे काही ज्ञान आहे, ते संपूर्ण आहे. मुसलमान लोक म्हणतात

की, सर्व शास्त्राचे आणि विद्येचे मूळ किमयासुद्धा कुराणात आहे; परंतु हे म्हणणे अविचाराचे आहे, मागील प्राचीन काळचे पदार्थांची स्तुती करण्याची चाल पडून गेली आहे, ती चूक आहे. सांप्रत काळी राज्याच्या रीती लोकसत्तात्मक इत्यादीक ज्या निघाल्या आहेत, त्या धर्मशास्त्रांत सापडणार नाहीत. धर्मशास्त्राप्रमाणे राजा स्वच्छंदी आहे. तो म्हणेल ती पूर्व दिशा व करील तो विधी; परंतु हे सांप्रत काळी चालणार नाही व त्याचा काही उपयोग नाही. हल्ली स्वतंत्र राजे असल्यामुळे जागोजाग, देशोदेशी अनर्थ जहाले आहेत, ते मनात आणावे.

आजच्या काळी यथास्थित उत्तम राज्य अमेरिकेतील युनायटेड स्टेट येथे आहे. त्याचेखाली विलायतेतील मिश्र राज्य व त्याचे खाली इतर राज्ये, एशिया खंडातील राज्ये तर फारच दुष्ट. तेथे लोकांस पीडा फार. यास्तव राज्यात सुख होण्याकरिता लोकसत्तात्मक राज्य जरूर असले पाहिजे. ज्या देशात कायदे होतात, त्या देशातील लोकांची संमती त्यांस असावी आणि कायद्याप्रमाणे राज्य चालवण्यास लाचाचा बंदोबस्त मुख्यत्वेकरून जहाला पाहिजे. पूर्वीप्रमाणे आता धर्मशास्त्र चालवू म्हटले, तर चालणार नाही. ही गोष्ट अशक्य आहे. आता ब्राह्मण राज्यकारभारात, शिपाईपणात व व्यापारात पडून सर्व धंदे करतात. इतक्यात भिकारी करून कंदमुळे खावयास लावून तपश्चर्या करविणे, ही गोष्ट कोणी बरी असे म्हणणार नाही.

तेव्हा आता लोक आहेत त्याचा प्रतिबंध सांप्रत काळी कसा करावा, हा विचार केला पाहिजे. यास्तव पूर्वीचे ब्राह्मण कसेही असोत, तसे आता होऊ शकत नाही. आणि पूर्वीप्रमाणे करण्याविषयी जे आग्रह धरतील ते मूर्ख आहेत. ते वृद्धास तरुण करण्यास इच्छितात. ते कालमान पहात नाहीत. जे कालमान पाहतात आणि त्याप्रमाणे वर्तणूक करतात. तेच उत्तम शहाणे. म्हातारे लोक म्हणतात की इंग्रज लोकांच्या विद्या पुष्कळ आहेत; पण आम्हांस त्याचे काय करावयाचे आहे? आमचा आजपर्यंत काळ गेला की नाही? मागले पुरुष शहाणे होते की नाही? परंतु हे म्हणणे केवळ अज्ञानाचे. मागले काही पुरुष मागले काळीचे अज्ञानी लोकांत शहाणे होते, म्हणून ते आता शहाणे आहेत असे नाही. परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय केली; पण भीष्म असताना काही झाले नाही, तसे, जोपर्यंत इंग्रजांसारखे शहाणे लोक इकडे येत नव्हते, त्याच काळी हे लोक शहाणे, बुद्धिवान व विद्वान होते; कारण वरिष्ठांचा अभाव होता.

परंतु आता नवीन युद्धादिकांच्या युक्ती इंग्रजांनी आणल्या आहेत. त्यापुढे

कोणताही हिंदू राजा जय पावला नाही; कारण शहाण्यापाशी वेडा टिकत नाही. हे केवळ प्रारब्ध नाही, पण शहाणपणच आहे, परंतु अज्ञानाने आपले लोक आपला पूर्वीचा थोरपणा राखण्याकरिता इंग्रज शहाणे व त्यामध्ये विद्या विशेष हे कबूल करीत नाहीत. असो.

तात्पर्य, लाचेचा गुन्हा शास्त्रात कोठे नाही आणि याविषयी कोणी जाणता मनुष्य प्रमाण दाखवील, तर आम्ही स्वीकारावयास आळस करणार नाही.

## नाना फडणिसाचे शहाणपण

**पत्र नंबर ४१ : ३१ डिसेंबर १८४८**

सांप्रत मराठे लोकांत अशी म्हण आहे की, नाना फडणिसासारखा कोणी शहाणा नाही. परंतु मला वाटते की, आता इंग्रजांमध्ये सहस्रशः नानापेक्षा शहाणे आहेत. नाना फडणिसाचे शहाणपण वर्णन करण्याजोगे सर्वोत्कृष्ट नव्हते. त्या लोकांमध्ये त्याची कीर्ती होण्याचे कारण इतकेच की, मूर्खांचे सभेत थोडासा कोणी शहाणा असला, म्हणजे त्याची ख्याती होते. आणि गांवढा जोशी गावढ्यांत पंडित असतो; कारण की, त्या गावचे लोक जितके ज्ञानी असतात. त्याहून त्यांस विद्वानपणा अधिक असतो.

वास्तविक पाहिले तर नाना फडणीस काही विद्वान नव्हता व त्यांस दूरदृष्टी नव्हती. जन्मापासून त्याने कारभार केला, याजमुळे त्याची बुद्धी बरीच होती व मराठे दरबारचा बंदोबस्त त्याला चांगला करता येत होता; परंतु मेंढक्यास मेंढ्या वळता आल्या, म्हणून तो काही घोडेस्वार होत नाही. इंग्रज लोकांतील कारभारी यांची बुद्धी विशाल, मसलत खोल, अनेक देशीचे वृत्तान्त त्यांस माहीत व त्यांचे आपसात एकमत असे. नाना फडणिसाचे ठायी हे नव्हते. तो जुन्या चालीचा ब्राह्मण; त्याची माहिती कमी व आपसांत दुष्टपणा फार होता.

पहा बरे, नाना फडणिसाचे हाती सर्व राज्यकारभार होता; परंतु त्याने काही राज्यात अधिकाऱ्यांची रचना व पदव्या हे ठरविले नाही. इंग्रजीत एक मेला, म्हणजे दुसरा तयार असतो. हा क्रम मराठी राज्यात नव्हता. कायदे

काही नव्हते. बरे, त्याचे समीप इंग्रज होते, त्यांचा शोध तरी त्याने काही करावा. तेही काही नाही. इंग्रजांनी मात्र सर्व लोकांच्या डोक्यावरचे केस मोजून ठेवले; परंतु मराठे लोकांस इंग्रजांविषयी काही माहीत नाही. त्यांचा देश व नावगाव काही एक ठाऊक नाही. नानाचे वेळचे पत्रात कोठे इंग्रजांस जलचर, कोठे कलकत्तेकर असे म्हटले आहे. याजवरून त्यांचे ज्ञान समजते. टिपूशी लढाई केली, तेव्हा लॉर्ड कॉर्नवालीस तेथे गेले होते. व त्याजबरोबर परशुरामभाऊ वगैरे सरदार पेशव्यांकडून गेले होते. परंतु त्याजपैकी एक जणासही ते कोण होते, हे ठाऊक नाही. व कोठून आले, हे माहीत नव्हते. इंग्रजांचा वकील पुण्यात होता. त्याची मात्र त्यांस ओळख होती, परंतु त्याचा शेंडाबुंधा किंवा हिंदुस्थानात इंग्रज कोठे कोठे आहेत व फरांशीस कोठे आहेत व फिरंगी कोठे आहेत, याचा काही शोध लागत नाही.

नाना फडणिसाची बातमी फार होती, असे म्हणतात; परंतु ती बातमी फुसक्या गोष्टींची होती. शिखाचे व नेपाळ वगैरे संस्थान दूरवर होते; त्याचा त्यांस ठिकाण नव्हता. व राज्यात टपाल वगैरे नव्हते. नानाची बातमी इतकीच होती की, आपले ओळखीचे लोकांतील कोण कोठे गेला, कोण काय जेवला, ही मात्र बातमी तो चित्त देऊन काढीत असे. एवढ्यावरून मूर्ख लोकांस असे वाटते की, आम्ही काल अमुक करीत होतो, ते नानास ठाऊक कसे झाले? परंतु या बातमीचा उपयोग काय? बातमी म्हणजे संपूर्ण जगात कोणती राष्ट्रे आहेत, कोणते मुलूख मोठे आहेत, हे समजावे. तळेगावास इंग्रज आले होते. तेव्हा मराठे लोकांनी एकावर हजार जाऊन त्यांचा पराभव केला. या गोष्टीचे मराठे लोक मोठे वर्णन करतात; परंतु असली गोष्ट काही मोठी नव्हे. व त्यात काही शहाणपण नाही. घोडे मनुष्यास मारील यात काय आश्चर्य आहे? परंतु त्यामुळे घोडा शहाणा व मनुष्य वेडा, असे म्हणू नये. ती गोष्ट एखादे वेळेस झाली, म्हणून वारंवार होणार नाही. नेहमी मनुष्य घोड्यावर बसतात; तद्वत् इंग्रजांचा पराभव मराठे लोकांनी केला; पण त्याजमुळे इंग्रज नाहीसे झाले नाहीत. आणि इंग्रज लोक शहाणे, ते इकडे आल्यावर त्यांनी त्या लोकांच्या सर्व माहितगाऱ्या काढल्या आणि मग त्यांस जिंकण्यास उशीर लागला नाही. अशी मराठ्यांनी इंग्रजांची माहितगारी का काढली नाही?

नाना फडणिसास ही गोष्ट करण्यास अनुकूल होते. परंतु त्यांस हे काही ठाऊकच नाही. त्याच्या समजुती अशा होत्या की, पृथ्वी काय ती एवढीच; व सर्व जग इतकेच आहे. याशिवाय कोठे काही नाही, इंग्रज हे कोणत्या बेटातून आले आणि प्रथम दहा वीस जण, नंतर शे-दोनशे असे इतके दूर

येऊन एवढे राज्य जमविले. ही कृती विश्वकर्म्यासारखी नव्हे काय ? परभाषा, परमुलूख, परजात, परधर्म, तत्रापि वरिष्ठता पावले, हे केवढे शहाणपण बरे ? इंग्रज कोण हे वर्तमान ठाऊक नाही, हा केवढा मूर्खपणा आहे ? आपले लोक पेशवाईत मूर्ख होते यात संशय नाही. त्यांस काहीच कळत नव्हते. बरे, आणखी नानाँ फडणीस यांस काही आपले देशाचा अभिमान नव्हता व शौर्यही नव्हते. तो स्वभावाने कुत्सित होता व हलके मनचा होता. सर्व देशाचे कल्याण करण्याचे त्याचे मनात क्षणभर देखील येत नव्हते. परंतु त्याची आतून बहुत सरदारांशी वाकडी मात्र होती.

त्याने सर्वांस एक कायदा लावून देऊन सर्वांस एकत्र जमविण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. आपले घरापर्यंत व आपले राज्यापर्यंत मात्र नजर ठेविली. लोकांच्या सुधारणेचा प्रयत्न केला नाही. श्रीकाशीक्षेत्रास जाणे तरी बरोबर दोनशे लोक लागत. तेव्हा मनुष्ये माघारी येत होती. नाही तर भिल्ल, रामोशी, पेंढारी वगैरे चोरटे लोक लुटीत होते. त्यांचा बंदोबस्त त्याच्याने झाला नाही. काशीही आपलेकडे इंग्रजांकडून घेवविली नाही. व त्यांस आपले राज्याबाहेर कोण अंमल करितो, याची खबर बिलकुल नव्हती. या लोकांचे कोणतेही कल्याण त्याचे हातून झाले नाही. मग त्यांस कोणत्या प्रकाराने लोक शहाणा म्हणतात, हे काही कळत नाही.

नीति, सुधारणा किंवा विद्येची वृद्धी त्याने केली नाही. व कलाकौशल्येही वाढविली नाहीत. नशिबाने राज्य चालले, नाही तर असे लोकांचे हातात राज्य क्षणभरदेखील असू नये. परंतु काळाच्या योगाने इंग्रज त्या वेळेस इकडे फारसे आले नाहीत. याजमुळे हे राज्य चालले; नाही तर असे लुटारू, अडाणी लोकांचे बेकायदा राज्य निभू नये, परंतु ईश्वरसत्तेने ते झाले.

तात्पर्य, नाना फडणिसाविषयी जो अभिप्राय लोकांचा आहे, तो खोटा आहे. आता जर नाना फडणीस असता, तर त्याजला लोक वेडा म्हणू लागते. आणि तो पळूनही जाता, यात संशय नाही.

✦ ✦

# हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे

▣

**पत्र नंबर ४५ : २८ जानेवारी १८४९**

इंग्रज लोकांनी हिंदुस्थानचे राज्य घेतले, या गोष्टीविषयी लोकांस भृगूळ वाटते आणि ब्राह्मण लोक म्हणतात की, त्यांची सद्दी आहे. ब्राह्मणाहून कुळंबी वगैरे लोक यांस तर राज्य कोण करितो, याची खबरच नाही. याविषयी लोकांस काही वर्तमान कळले असता फार उपयोग जाणून मी संक्षेपेकरून लिहितो.

प्रथम मला हिंदुस्थानचे लोकांचे स्थितीचे वर्णन केले पाहिजे, म्हणजे त्याजवरून इंग्रज लोकांचे इकडे पाय रोवले कसे, याची कारणे स्पष्ट होतील. मला वाटते की, हिंदू लोकांचे माहात्म्य सृष्टी उत्पन्न जहाल्यापासून काय असेल ते असो; परंतु पांडवांचे वेळेस हिंदू लोक मोठे ऐश्वर्यास आले आणि विद्या वगैरे त्यांनी फार चित्त लावून शोधून काढिल्या. मोठेमोठे विद्वान व बुद्धिमान म्हणजे व्यास, वाल्मीक हे कवी, नारदासारिखे गायनशास्त्री, कपिलासारिखे शास्त्रज्ञ, अर्जुनासारिखे युद्धकर्ते, धर्मासारिखे सत्यवक्ते इत्यादी प्रकारचे उत्तम लोक त्या काळी होऊन गेले आणि असे विद्वान विचारशील लोक ज्या देशांत असतील, त्या देशांत काही न्यून पडेल हेही अशक्य आहे. परंतु त्या समयी संपूर्ण जगात ऐश्वर्यवान प्रदेश एवढाच होता. याजमुळे हिंदू लोकांनी आपले देशाचे व आपले भाषेचे व आपले विद्येचे पराकाष्ठेचे वर्णन केले आणि हे काही आश्चर्य नाही. सांप्रत इंग्रज लोक तसे करतात.

परंतु हिंदू लोकांनी पृथ्वीचे स्वरूप त्या काळी कसे आहे व देश कोणते कोठे आहेत, येविषयी विशेष शोध केला नाही आणि करण्याचे कारणही नव्हते, कारण हे लोक स्वस्थ बसून आपले देशात जे निष्पन्न होईल, ते खाऊन स्वराज्य यथास्थित करीत होते. लोकही चांगले व राजेही चांगले होते, प्रजेस पीडा वगैरे काही होत नव्हती. तेव्हा परदेशात जाणे किंवा व्यापार करणे, समुद्रातून नौकारूढ होणे हे विषय पहाण्याचा प्रसंग त्यांस नव्हता. येणेकरून ते लोक जसे आईबापांचे द्रव्य पुष्कळ असते आणि घरात मुलगा ते खाऊन वाढतो, त्यांस दरवाज्याबाहेर काय आहे, हे ठाऊक नसते तसे ते लोक अभोवाळ वाढले. नंतर काळेकरून त्यांनी विद्या जास्त वाढविण्याची सोडून दिली; कारण की त्यांस आपले महत्त्वाचा आणि सुखाचा अनुभव फार आला.

तेव्हा पांडवांपासून अलीकडे दोन हजार वर्षे सुमारे तरी त्यांनी विद्येवर

चित्त बरेच ठेविले होते, असे त्या वेळेस ज्योतिषशास्त्रावर व लीलावती वगैरे ग्रंथ जहाले त्यांजवरून दिसते व काही पुराणे व माहात्म्येही पुढे लिहिली गेली आहेत. पुढे काळेकरून संस्कृत भाषा सुटोन प्राकृत भाषा जाहल्या. तेव्हा असा भ्रम पडला की, प्राकृत भाषण बोलावे आणि ज्यास विद्या पाहिजे, त्याने संस्कृत पढून विद्या शिकाव्या; कारण की, प्राकृत भाषेत ग्रंथ नाहीत, हे एक कारण.

दुसरे असे की, जो जो प्राकृत भाषा वाढत गेली, तो तो संस्कृताचा अंधार जहाला. विद्या जास्ती वाढविणे राहिले आणि लोकांची अशी समजूत पडली की, ज्यांनी संस्कृतात ग्रंथ लिहिले ते देव होते आणि तसे ग्रंथ लिहिणे हे काही मनुष्याचे काम नव्हे, हे दुसरे कारण. तिसरे कारण असे आहे की, त्यांस असे भय राहिले नाहीच की, मूर्खपणामुळे नीचत्व येईल. त्यांस असे वाटू लागले की, माझा जन्म ब्राह्मण कुळात आहे, मग ती विद्या शिकलो काय, नाही काय ? एकच आहे. माझा ब्राह्मणपणा कोणी नेत नाही. मला इतर लोक कुळामुळे पूज्य म्हणतील आणि माझे पायाचे तीर्थ घेतील, यात संशय नाही.

चवथे कारण असे दिसते की, देशात राहणे वगैरे जे प्रतिबंध पूर्वीचे शास्त्रकारांनी केले; त्याचे हेतू न जाणून त्यांस धर्म म्हणू लागले. पाचवे कारण असे दिसते की, कलियुग निघाले आहे, याजमुळे लोकांचा नाश व दुर्गुणप्रवृत्ती व्हावी हा ईश्वरसंकेत आहे, असे भय शास्त्रकाराने लिहिले आहे. तरी त्याचा हेतू न जाणून लोक ते यथातथ्य मानू लागले. सहावे, प्रारब्धवाद म्हणून जे घडते ते पूर्वीच ईश्वर लिहितो, ते कोणत्याही उद्योगाने फिरावयाचे नाही. सातवे, पूर्वीचे लोक ऋषी व देव होते, मनुष्य नव्हेत. यास्तव जे वडील करीत आले, तेच करावयाचे, नवीन मार्ग काढावयाचा नाही. आठवे कारण ज्या ज्या गोष्टी, चालीरीती लोकांमध्ये आहेत, त्या सर्व धर्मच. व्यवहार धर्म; ईश्वरभक्तीही धर्म, पागोटे, धोतर, अंगरखा घालावा, हे सर्व धर्मामध्ये मोडू लागले. ही समजूत विलक्षण लोकांची पडली.

या आठ कारणांचे नाव मी ‘ हिंदुनाशाष्टक ’ ठेविले आहे. या कारणांनी लोकांनी विद्या वगैरे सर्व सोडून देऊन स्वस्थ घरात बसले आणि परकी लोक त्या काळी अगदी मूर्ख अवस्थेत होते, याजमुळे त्यांचा शोध किंवा वार्ता यांनी काही काढली नाही. आणि त्या सर्वांस एक म्लेंच्छ म्हणून नाव देऊन टाकले. याप्रमाणे या देशात वर्तणूक जहाली. हिंदू लोकांत काही किंचित जागृती व्यासापर्यंत होतीच त्यापुढे जी दृढ झोप लागली, ती आजपर्यंत तशी आहे,

ती अशी की, या लोकांमध्ये एकचित्त नाही. आपले देशात कोण राज्य करतो, याची खबर नाही. जो कोणी राज्य करील तो विष्णूचा अवतार, ही एक मूर्खपणाची समजूत पडली. पिठोरा राजा हस्तिनापुरी क्षत्रियवंशी शेवटचा जहाला. त्यांस मुसलमानांनी मारून राज्य घेतले, त्यांस आठशे वर्षे जहाली; परंतु त्या गोष्टींचे वाईट कोणास वाटले नाही. शास्त्री, पंडित, भट हे मुसलमानाचेच आर्जवे करून पोट भरू लागले. ब्राह्मण कारकूनपणा, शिलेदारी, सरदारी स्वीकारून चाकऱ्या करू लागले. तेव्हा विद्येचा अंधकार फार माजला.

कारण की, ब्राह्मणांनी युक्तीने आपले स्वाधीन विद्या ठेविली व इतरांस शिकवू नये, असा धर्म लावून दिला. आणि आपण शूद्राचे कर्म अंगीकारिले. तेव्हा मग विद्या कशाने राहील ? विद्येबरोबर सर्व ऐश्वर्य गेले व शूरत्व गेले. देशाभिमान नाहीसा जहाला. जशी पुष्ट बकरी व्याघ्रास सापडतात, तसे हे लोक मुसलमानास सापडले. पूर्व काळी यवनादीक मुसलमान म्हणजे यवन इकडे आले, असे ग्रंथांतरी आहे; परंतु ते इकडे राहिले नाहीत, हा त्यांचा मूर्खपणा होय. अलीकडे यवन लोक पहिल्या मूर्खपणातून निघाले आणि हुशार जहाले. त्यांनी आता केवळ स्वारी करून परत जावे, तसे केले नाही व हस्तिनापूरच सिंहासनारूढ होऊन बसले.

परंतु ब्राह्मण लोक हे आपले घरी आले म्हणजे सोवळे करतात व यवनाचा विटाळ जहाला म्हणून म्हणतात. तथापि त्यांस राज्य करावयास त्यांनी हरकत केली नाही व किती एक लोक मुसलमानांवर इतके फिदा जहाले की, राज्य करणे व शूरत्व करणे हे काम मुसलमानांचे होय, इतरांस यावयाचे नाही, असे म्हणू लागले; परंतु त्या मूर्खांस असे समजत नाही की, आठशे वर्षांपूर्वी हिंदू राजे जहालेले पांडव, राम, परशुराम हे मुसलमान होत की काय ? आणि त्या मूर्खपणाचे बीज मनात ठेवून त्याच स्थितीत हिंदू लोक राहिले. त्यांस परदेशाची किंवा स्वदेशाची लांबीरुंदीदेखील ठाऊक नाही. हिंदुस्थानचे लोकांस दक्षण ठाऊक नाही. दक्षणेत ‘ नेपाळ ’ ठाऊक नाही. कोणी म्हणतात ती पुण्यभूमी, कोणी म्हणतात ती राक्षसभूमी व त्या गोष्टीस शास्त्री मान डोलवितात. त्यांचा मूर्खपणा किती आहे ? त्यांस असे काही वाटत नाही की, आपले देशात हे यवन लोक आले ते कोठले, यांस इकडे वस्ती करू द्यावी कशाकरिता व यांस हाकून देण्यास आम्हास काही शक्ती नाही की काय ?

सर्व हिंदू लोक निर्बळ व अपौरुष आहेत की काय ? परंतु ही गोष्ट विसरले आणि सोवळे घरात आले. देश सोवळा राखावयाचा विसरले व जो तो आपला स्वार्थ पाहू लागला. अशा अवस्थेत असता मुसलमानी राज्य घेतले.

ते राज्य मुसलमान लोकांचे मूर्खपणाने बुडवावयाची संधी आली. तो इंग्रजाचा प्रवेश जहाला. त्यांनी तर हेच लोक चाकरीस ठेवून याच लोकांच्या तोंडात मारल्या; परंतु हिंदू लोकांचा असा मूर्खपणा आहे की, इंग्रज आले कधी, कोठले, कोण हे त्यांस अद्याप माहीत नाही. पेशव्यांचे वेळेस कोणते राजाने याचा विचार केला नाही. आता मात्र दक्षिणेत इंग्रज ठाऊक जहाले. तसेच आता कोणत्याही हिंदू लोकांच्या संस्थानात जाऊन पहावे तरी हीच वृत्ती लोकांची आढळते. भट जेवणापुरती काळजी करतात, आणि सरदार गृहस्थ पैका मिळविण्यापुरती काळजी करतात आणि स्वस्थ बसतात. मग असे होईल हे काय आश्चर्य आहे ?

## इंग्लिश राज्याची आवश्यकता

■

**पत्र नंबर ४६ : ४ फेब्रुवारी १८४९**

मागील पत्राचा विषय आणखी लिहिण्याचा आहे तो असा की, इंग्रज लोक यांनी इकडे राज्य संपादन केले, याचे कारण काय ? याचा विचार करता दिसते की, हिंदू लोकांमध्ये मूर्खपणा वाढला, तो दूर होण्याकरिताच हे गुरू दूर देशातून इकडे ईश्वराने पाठविले आहेत. पहा, हिंदू लोकांस हा मोठा लाभ आहे की, इंग्रज लोकांच्या राज्यामुळे हिंदू लोकांस जागृती जहाली व पृथ्वीवर काय काय आहे, हे कळू लागले. ज्यास कोकणापासून पुण्यापर्यंत प्रदेश ठाऊक, त्यांस पूर्वीचे लोक मोठा माहितगार असे म्हणत; पण आता बहुतांस इंग्रजाचा देश इंग्लंड व अमेरिका माहीत झाली.. हे सर्व इंग्रजांमुळे झाले. ईश्वराने ही शहाणपणानेच योजना केली आहे. लोकांची झोप जाण्यास दुसरा इलाज नव्हता. सती जाणे, जलसमाधी घेणे, पोरे मारणे, प्रयागास करवत घेणे, जगन्नाथास रथ उरावर घेणे व हिमालयात स्वर्गास जाणे इत्यादी अघोरी व लज्जास्पद चालींमुळे ईश्वराचा क्षोभ अत्यंत जहाला. तेव्हा दुष्ट लोकांस ताळ्यावर आणण्यास ईश्वराने इंग्रज सरकारची योजना केली.

परंतु त्यांनी न्यायाने राज्य मिळविले किंवा कसे, याविषयी कोणास अंदेशा वाटेल, म्हणून त्यांचे इकडे राज्य स्थापन जहाले, त्याचा इतिहास पाहिला,

त्याजवरून माझे असे मत झाले आहे की इंग्रजांनी यथान्याय वर्तणुकीने राज्य घेतले आणि ईश्वराने त्यांस हे राज्य अशा प्रकाराने दिले की, त्यांस कोणी दोष ठेवणार नाही. पहा, प्रथम हिंदुस्थानात मुसलमान लोकांचा अंमल होता व त्यांनी संपूर्ण देश व्याप्त केला होता. त्यांचे राज्य मोडावयाचे संधीस इंग्रज येथे आले; तेव्हा जागोजागचे नबाब व नियम वगैरे हे आपले यजमानास सोडून आपले ठिकाणी अंमल हाती लागेल, तितका बळकावून बसले होते. तेव्हा इंग्रजांस ठीक संधी सापडली. आणि ते प्रथम इकडे आले, तेव्हा त्यांनी दुकानास जागा घेतली, ती मुसलमानांचे परवानगीवरून सुरतेस व कलकत्त्यास घेतली. पुढे तेथे ते व्यापार करून स्वस्थ होते; परंतु त्यांस हे लोक चैन पडू देईनात. इंग्रज लोकांचा मूळचा असा संकेत होता की, इकडे राज्य घेऊ नये, फक्त व्यापार मात्र करावा.

परंतु हे लोक त्यांस राहू देईनात. कधी त्यांची दुकाने लुटीत, कधी खंडणी मागत. तेव्हा ते तह करू लागले; तरी ते तह सोडून वर्तणूक करू लागले. इकडील देशचे लोकांत वचनाचा प्रामाणिकपणा, खरेपणा, शूरत्व कमी आणि द्रव्याचा लोभ फार. याजमुळे दौलत वाढवावी हा हेतू फार; परंतु कशी वाढवावी ते व न्यायमनसुबीचा बंदोबस्त ठेवून धारा कमी करून प्रजा सुखी ठेवण्याचे ज्ञान नाही. सन १७५७ साली १३० गोरे लोकांस कलकत्त्याचे नबाबाने खोलीत कोंडल्यामुळे ते ठार झाले; तेव्हा इंग्रज लोकांस लढाई करणे प्राप्त जहाली आणि त्यांस जयही मिळाला. तेव्हा आपल्या ठिकाणाचे रक्षण करण्याकरिता सभोवताल मुलुख आपलेकडे घ्यावा लागला. एक वेळ मनुष्याचे तोंड दुधाने भाजले म्हणजे ताक फुंकतात, तद्वत् इंग्रज लोकांनी इकडील लोकांचा भरवसा सोडून दिला; कारण त्यांचे त्यांस काहीच प्रमाण वाटेना आणि दहावीस कोसपर्यंत त्यांस हद्द करून दिली की, इतक्याचे आत तुम्ही येऊ नका. तत्रापि तोही करार मोडला. तेव्हा मुलूख हस्तगत करून राज्य घ्यावे लागले.

याप्रमाणेच दक्षिणेची अवस्था झाली. बाजीराव स. १८०२त पळून जाऊन आपले बापाचे स्नेही इंग्रज यांचे पाठीस पडला आणि त्यांची प्रार्थना केली की, होळकराने माझे शहर लुटिले व शिंदे, होळकर, भोसले माझ्याशी वितुष्ट करतात. तेव्हा पुन्हा गादीवर माझे स्थापन करणार समर्थ तुम्ही आहा. तेव्हा तह जहाला व मुलूख देण्याचा वगैरे करार जाहला. नंतर इंग्रजांनी त्यांस मदत करून गादीवर बसविले; परंतु कराराप्रमाणे त्यांस मुलूख देईनात, तरी त्यांनी युद्धास प्रारंभ केला नाही. पुढे १८१७ त विश्वासघात करून बाजीरावाने लढाई आरंभली, तेव्हा तो शासनपात्र जहाला; आणि पेशवे यांचा अंमलही वाजवी

नव्हता. त्यांनी सातारचे राजापासून बळकावलेला अधिकार होता व बाजीरावाचे कर्म चांगले नव्हते. भट व भटवे मात्र त्याची स्तुती करीत. दुसरे सर्व त्यांस कंटाळून राहिले होते. इंग्रजांस सर्व वश होते. तेव्हा इंग्रजांनी मुलूक घेतला.

असे रीतीने त्यांस मुलूख प्राप्त जाहला. तो त्यांनी घ्यावा किंवा न घ्यावा, असे कोणी विचारील तर त्याचे उत्तर असे आहे की, अलपिष्टन साहेब (मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन) यांस जे मानपत्र राजे वगैरेनी दिलेले, त्यात स्पष्ट लिहिले आहे की, तुम्ही राज्य घेतले, हे बरे जहाले. राज्यातील लोक मूर्ख त्यांस शहाणे करणे जरूर आहे. अशा लोकांस सोडून देणे व पुन्हा बाजीरावासारख्या मूर्खाचे हाती देणे, हे काम वाईट व अधर्म आहे. असे आंधळ्याला रस्त्यात पावसात सोडावे, तद्वत् होते. यास्तव इंग्रजांनी दक्षण घेतली हे वाजवी व न्यायाप्रमाणे आहे. जर त्यांनी हा मुलूख लोक शहाणे होत तोपर्यंत सोडला. तर ते गुन्हेगार होतील. परंतु त्यांनी इकडील लोकांस त्वरित शहाणे करून, जसे मुलास वाढवावे व वाढले म्हणजे सोडावे, तद्वत् करणे योग्य आहे.

इंग्रज सरकारचा या देशात मोठा धर्म हाच आहे की, त्यांनी विद्या वाढवून या लोकांस शहाणे करावे आणि जेव्हा स्वदेशाचे राज्य करण्याचे व्यावहारिक ज्ञान यांस येईल आणि हे पृथ्वीवरची हकीकत सर्व जाणतील आणि दुर्गुण सोडतील तेव्हा हे राज्य त्यांनी त्यांचे हवाली करावे. परंतु जर हल्ली या लोकांचे अधीन राज्य होईल, तर पहिल्यापेक्षा अनर्थ फार होतील; कारण की आपले लोक फार भ्रष्ट आहेत व त्यांची अंतःकरणे फार मळीन, ते द्रव्याकरिता दुराचार करतात.

पहा की, कोणी अंमलदार या देशाचा असला, म्हणजे तो फार जळजळाट करतो व आपला अधिकार प्रकट करण्याकरिता व लाच खाण्याकरिता छळितो. म्हणून रयत त्यांस राजी नसत्ये. इंग्रज लोकांवर रयत राजी असते, याचे हेच कारण आहे. आपले लोक कधीही नीट वागत नाहीत व आपले लोकांचा आपसांत मत्सर, द्वेष इत्यादी फार असतो. तेव्हा असे मूर्ख लोकांचे हाती राज्य असणे हे दुर्भाग्य आहे. स्वदेशीय राज्ये हल्ली आहेत, त्यात काय गर्दी आहे ती पहावी, म्हणजे बाजीरावाचे मूर्तिमंत राज्य डोळ्यांपुढे उभे रहाते. मक्ते मामलेदार चढ़ करून रयत लुटतात. जमा येते ती रांडा, गोंधळी, भट, आर्जवी, ढोंगी वगैरे खाऊन जातात. हेच बाजीरावाने केले व अद्याप मराठी राज्यात हेच आहे. पहा म्हणजे खातरी होईल. उजाडले किंवा मावळले याची त्यांस खबर नसत्ये, फक्त जनावराप्रमाणे खाणे, निजणे एवढ्यापुरती त्यांस

काळजी. तिसरी गोष्ट ते पहात नाहीत व सामान्यतः ब्राह्मण वगैरे हिंदू लोक यांची समजूत अशी आहे की, सर्व उद्योग व विद्या पोटाकरिता, दुसरा अर्थ काही नाही. याजमुळे लोकहिताचे उद्योग, विद्या, ज्ञान ही वाढविण्याची मेहनत त्यांस होत नाही.

✦ ✦

## सरदार लोक

▣

**पत्र नंबर ४९ : २५ फेब्रुवारी १८४९**

दक्षिणेतील सरदार लोक, याविषयी कोणास काही मजकूर ठाऊक नसेल म्हणून मी त्यांचे अवस्थेचे व समजुतीचे थोडे वर्णन करतो. पेशवाईत हे सर्वजण बाजीरावास कंटाळून इंग्रजांकडे मिळाले. यांस अशी आशा होती की, पेशव्यांचे पदरी राहून आम्हास खावयास मिळते, परंतु चाकरी करावी लागत्ये; तेव्हा आता इंग्रजांच्या पक्षात मिळाले म्हणजे खावयास फुकट मिळेल व आमची जहागीर वगैरे सरंजाम सर्व आम्हांकडे चालतील; आणि घरी बसून राहू. हे ब्राह्मण लोक भटबुद्धि, यांस हा मोठा फायदा वाटला की, चाकरी केल्याशिवाय आम्हास इंग्रज खावयास देतात, मग पेशव्यांची ताबेदारी कशास पाहिजे? हा विचार करून त्यांनी इंग्रजांचे बंदोबस्त कबूल केले व पुढे आता कायद्याप्रमाणे जप्त होऊ लागले, तेव्हा त्यांस असे वाटते की, अरे, हे काय? आम्ही केले काय? आणि झाले काय? त्यांचे मुखात आता दुसरी गोष्ट नाही.

सरदार लोकांजवळ बसले म्हणजे प्रथम पेनशनाची गोष्ट. आता जप्ती जहाली, कसे करावे? इंग्रजांचे राज्य फार वाईट. कारण आमचा सरंजाम गेला. कोणी म्हणतो माझे पेनशन गेले! आम्हास पहिले वाटत होते की, पुस्त दर पुस्त चालवतील; परंतु आता कायदे फार वाईट निघाले. आता सरदार लोकांस दुसरी काळजी नाही. फक्त तेवढ्या गोष्टी असतात. कोणी आहेत त्यांस मुले नाहीत. कोणी परघरातील मुले आणून दत्तक बसविली आहेत. किती एक बाजीरावाचे समयातील आहेत; किती एक जुने आहेत, पण आता त्यांचे वारस आहेत, ते काही शहाणे नाहीत व नेहमी अर्जा करतात की, दत्तकास आमचा सरंजाम चालवावा. आम्हास दत्तक घेण्याची परवानगी असावी; आणि आमचच्या गावचा फौजदारी आणि दिवाणी अमल आम्हाकडे असावा; आणि वसुलास आम्हास मदत द्यावी. म्हणजे रयतेस बुडवून पैसा घेऊन खर्च

पाहिजे तसा करू; परंतु इतके सरदार आहेत यांपैकी एक जणास आणून पाहिले की, हा गृहस्थ कोणत्या उपयोगी पडेल? तर मला वाटते की, या पृथ्वीवर कोणतेही काम त्याचे लायक सापडावयाचे नाही.

कारण की, पंचवीस वर्षांपासून त्याचे वृद्धापकाळास आरंभ होतो आणि क्षयरोगाने व्याप्त होऊन तो जिवंत मात्र राहिलेला असतो. किती एक इतके अशक्त आहेत की, त्यांस घोड्यावर बसून दहा पावले जाववत नाही. किती एकांस चाळिसावे वर्षी दुसरे लोक धरावयास लागत. स्वतः लिहिणे, पुसणे तर कोणासही येत नाही. सर्वांस वकील व कारभारी पाहिजेत. ज्यास वकील कारभारी नाहीत, त्यांनी दरबारात जाण्याचे दिवशी एकादा मजूरदार करून तरी बरोबर नेला पाहिजे. यजमानास बोलावयाचे माहीत नाही, मग कारकून याने यजमानास बरोबर नेऊन येथे बसा म्हणून सांगावे. यजमानास स्वता काही ज्ञान नाही. मग कारकुनांनी त्या मूर्ख यजमानास जसा पिसे लावून कावळा करतात, तसा करून एजंटास भेटवावा; हे आमके म्हणून सांगावे; परंतु खासे पाहिले तर नंदी किंवा शुद्ध नर्मदेतले बाण. लिहिता येत नाही, बोलता येत नाही. वेड्यासारखे दिसतात. त्यांस दिवाणजीनी आपले पोटाकरता सजवून दरबारात आणावे. महाराजांस उठा म्हणून देखील सांगितले पाहिजे, तेव्हाच ते उठावयाचे, नाही तर उठावे केव्हा हेही ठाऊक नाही. मग घरी येऊन म्हणावे, 'वाहवा! आज दरबारात गेलो होतो, फार श्रम झाले.' कारकुनाने पोटार्थाकरिता पुढे यावे आणि म्हणावे की, 'महाराज, आज साहेब फार खूष होता. आपल्यापाशी फार बोलला. इतके कोणापाशी बोलत नाही.' मग यजमानांनी म्हणावे, 'वा, आमचा दिवाणजी हुशार आहे.' याप्रमाणे यांची अवस्था आहे.

सरकारास या लोकांशी राजकारणार्थ सलूखा राखण्याची जरूर आहे. म्हणून मात्र या लोकांचा मानपान ते करतात. नाही तर या लोकांसारखे अप्रयोजक कोणी नाहीत; यांचे हातून कोणतेही काम व्हावयाचे नाही. घरात व्यवस्था पाहिली तर दरबारापेक्षा अधिक. वाण्याची उचापत आणि सराफाचे कर्ज, त्यांस व्याज शेकडा २५ रुपये. जे खत कारकून लिहून आणील त्याजवर सही करतात. एखादे दिवशी मेले म्हणजे सर्व सरकारात जप्त होते व सावकार बुडतात.

याप्रमाणे हे कारकून लोक व दिवाणजी यजमानास फसवितात. त्यांचे वडिलांनी मिळविले असते, ते सर्व चोरांचे हाती जाते. एके दिवशी मेजवानी करावी, सरकारचे कामगारास जेवावयास बोलवावे, आणि यजमानास सांगावे की, "महाराज, आपले सर्व काम दरबारात असते, तेथे साहेब लोकांस काय समजते? सर्व काम कामगारांचे हाती; याजकरिता त्यांचे आर्जव संपादन केले

पाहिजे.'' मग यजमानाने पुसावे, की, ' ते आपल्या घरी येतील काय ? '

' होय महाराज. मी प्रयत्न करतो. मी दरबारची मंडळी अशी वश ठेवली आहे की आपले कृपेने आपले सेवकावर ते सर्व लोभ करतात. '

याप्रमाणे गोष्टी सांगून छमछमाट करावे.

' महाराज, कामगार असे म्हणतात की, दोन हजार रुपये पाहिजेत. ' त्यापैकी एक हजार आपले घरी व एक हजार कामगारांचे घरी टाकून सरासरी यजमानास लुटून खातात. किती एक कामगार सरदाराचे येथे देव्हाऱ्यातील देवाप्रमाणे पूजन करण्यास योग्य असतात. यजमानास कारकुनाने सांगितले की, महाराज, आपण यांस साष्टांग नमस्कार घातला पाहिजे. म्हणजे यजमान उठले!

याप्रमाणे कामगार व कारकून हे लोक सरदारांस बुडवितात. यांचे घरचे वाद वाढवितात. स्त्रियांचे व पुरुषांचेही वितुष्ट पाडितात. म्हणजे आपले पोट भरते व पैसा उधळावयास सापडतो. यजमान मूर्ख, त्यांस आईपासून फितवितात, बापाशी वितुष्ट करवितात व स्त्रियांसही बिघडवितात. याप्रमाणे दुर्गुणी करतात. आणि त्यांस वीस वर्षे झाली नाहीत, तो रोगिष्ट व दुर्गुणी करून त्यांचे घरावर पन्नास जप्त्या एकामागून एक बसवून ठेवतात. मग यजमान भीतीत पडतो. यांस असे वाटते की माझा कारभारी माहितगार आहे, त्यांस सोडावे तर वाईट; अशा अडचणीत तो सापडला म्हणजे त्याची मालमिळकत खातात. मग जे काय नेमून देतील ते खावे आणि बसावे. याप्रमाणे सरदार लोकांची व्यवस्था आहे. त्यांस उजाडल्या-मावळल्याची खबर नाही, व योग्यता काही नाही. व्यापाराच्या कामात उपयोगी नाही. विद्वान नाहीत. चाकरी करण्यास बळकट नाहीत. सरासरी जिवंत मात्र असतात.

परंतु असे हे लोक जे जिवंत रहातात, त्यांचे जिणे फार वाईट आणि लज्जेचे आहे. मला वाटते की, यांनी आता सरंजामाची आणि पेनशनाची आशा सोडावी. आपले सुधारणुकीकडे लागावे. शहाणपण शिकावे. मुलास तयार करावे. त्याची लवकर लग्ने करू नयेत, त्यांस चांगले हुशार करावे, दत्तक घेऊ नये. दत्तक घेण्याचे कारण, तो आपले श्राद्ध-पक्ष करील, हे लोकांस मुख्य वाटते; पण हा मूर्खपणा आहे. जर अजून सरदार लोकांनी सावधगिरी केली तर ते माणसात येतील. मराठी ग्रंथ वाचून शोध करावे. आजपर्यंत जहाले ते जहाले. आपला मूर्खपणा पदरी घ्यावा. अजून तरी बंदोबस्त करून कारकुनास घालवावे. तंटे करू नयेत. वाद सांगू नये. म्हणजे कामगारांचे आर्जव नकोत, आणि अब्रूने रहावे; यात शोभा आहे. नाही तर आणखी फजितीस कारण होईल.

# उद्याचा विचार

■

**पत्र नंबर ५२ : १८ मार्च १८४९**

माझ्या पाहण्यात हिंदू लोकांचा स्वभाव एक विलक्षण आला आहे. तो असा की, हे लोक उद्याचा विचार करीत नाहीत. कितीएक लोक असे म्हणतात की, ही गोष्ट बोलून काय उपयोग ? आमचे डोकीस हे कार्य घडत नाही, मग कशास प्रयत्न करावा ? ही समजूत लहानापासून थोरांपर्यंत आहे.

राजा म्हणतो आपण मेल्यावर कसे का होईना; याजमुळे तो काही कायदाकानू किंवा नेम, आपल्यामागे राज्य कसे चालावे, याविषयी करीत नाही. आणि आपले मरणापर्यंत मात्र आशा बाळगतो. आपण आहो तेथपर्यंत चाललेच आहे. पाठीमागे कसेही होऊ, याजमुळे हे लोक अगदी बुडाले. जी काही गोष्ट पन्नास वर्षांनी फळास यावयाची असते, ती जर या लोकांमध्ये काढली, तर ते मनापासून हसतात आणि म्हणतात पन्नास वर्षे कोणी पाहिली ? उद्याचा भरवसा नाही. ईश्वर काय करील ते कोणास ठाऊक ? पन्नास वर्षे कोणीकडे ? आपला आताचा आतापुरता विचार पहावा ! इतक्या दूरच्या खबरा पाहिजेत कशास ? या प्रकारची भाषणे करतात.

परंतु या मूर्खांस असे कळत नाही की, (थोडेसे स्पष्ट उदाहरण देतो) जर पेशवे सरकारने व बाजीरावाने उद्याचा विचार पाहिला असता, तर राज्य बुडते ? जर इंग्रज पहिल्याने आले, तेव्हा हिंदू लोक सावध असते, आणि समजते की, हे लोक आज थोडे दिसतात. उदमाकरता आले आहेत. परंतु त्यांचे पाठीमागे पेंडें फार लांब आहे, यांस फार जपले पाहिजे. व यांस फौज वगैरे ठेवू देऊ नये, कारण की हे उद्या राज्य बळकावतील. असा जर आमचे वडील, आजे, पणजे यांनी उद्याचा विचार पाहिला असता, तर आज हे लोक इंग्रजांच्या अमलात दीनवाणे का फिरते ? परंतु उद्याचा विचार केला नाही, त्याचे फळ आम्ही भोगितो. असाच जर आम्ही उद्याचा विचार केला नाही तर आमचे नातू, पणतू दुःखाविष्ट होतील, हे लक्षांत कसे येईल ?

इंग्रज लोक हे या देशात ईश्वराने गुरू पाठविले आहेत. त्याजकडे पाहिले, म्हणजे ते उद्याचा विचार करतात, हे समजते. जर नाना फडणिसासारखा आपल्यापुरता विचार ते करते, तर त्याजमध्ये पराक्रम नसता. परंतु ते सर्व

एकमताने पाचशे वर्षांपुढे होणार ते आज पाहतात. कल्पना वाढवितात आणि बंदोबस्त करतात. आपल्याच्याने एकही गोष्ट घडत नाही, तितकीच ठेवतात. पुढे येतो तो तेच करतो. याप्रमाणे पन्नास जणांचे हात लागतात, तेव्हा १०० वर्षांनी ती गोष्ट सिद्धीस जाते. जर इंग्रज लोक मुळी व्यापाराच्या निमित्ताने या देशात यावयास धजते ना, तर आज त्यांचे इकडे एकछत्री राज्य झाले नसते.

लाखो इंग्रज अमीरासारखे इकडे येऊन रोजगार करतात. आणि हिंदू लोक दीनवाणे मूर्खासारिखे तोंडाकडे पाहतात व त्यांनी केलेल्या रस्त्यावर चालतात व त्यांनी केलेली वस्त्रे नेसतात, असे होते काय? हे सर्व उद्याचा विचार केला म्हणून झाले की नाही? यास्तव ही समजूत लोकांनी सोडावी. इंग्रज उद्याचा विचार आज करतात. जर हिंदू लोकांनी एक कंपनी केली असती आणि विलायतेत व्यापार करण्यास गेले असते आणि तेथे किल्ले बांधिते व शिपाई ठेविते तर या घटकेस हाकून देते. हे लोक इकडे दंगा करण्यास आले आहेत, असे म्हणते. असे ते सावधपणाने आपले देशात वागतात. व एक दिशेच्या कोपऱ्यावर काय होते, ते सर्व मुलखातील लोकांस समजते आणि पत्ता लावतात हे कोण? कोठचे? येथे यांचे येण्याचे प्रयोजन काय? याचा तपास करतील. सुस्ती करणार नाहीत.

परंतु तुम्ही मनात आणा की, जेव्हा इकडे इंग्रज, फराशीस, पोर्तुगीज, मुसलमान इत्यादी लोक आले तेव्हा हिंदू लोक किती अंधारात होते! मुसलमान लोक सातशे वर्षे राज्य हिंदुस्थानात करीत होते तरी कोणास ठाऊक नाही. दक्षिणेत लोक निद्रिस्त होते. तसेच पोतुगीज लोकांनी गोवे घेतले, परंतु हिंदुस्थानाचे लोकांस काही खबर नाही व आजपर्यंत देखील किती एकांस ठाऊक नसेल. याप्रमाणे हे लोक झोपेत आहेत. ज्यास स्वदेशाचे ज्ञान नाही ते परदेशास जाऊन काय पराक्रम करतील बरे? हे तर अर्थातच आहे.

परंतु जर कोणास पुसले, तर आम्ही अज्ञान आहो, असे म्हणणार नाहीत व ब्राह्मण तर कधीच कबूल करणार नाहीत. ते म्हणतील की, प्रारब्ध, देवाची मर्जी, ईश्वरी संकेत, त्यांस काय उपाय? परंतु यांनी उपाय केले असते, तर आम्ही ईश्वरी संकेत म्हटला असता; परंतु ज्यांनी उद्योग केला नाही ते मूर्ख समजावे.

तात्पर्य, या लोकांची स्थिती जसे एखादे जनावराचे प्रेत पडते आणि ते कुजते म्हणजे, त्याचा एक एक केस वेगळा होतो; तद्वत हिंदू लोक मूर्ख होऊन कुजून गेले आहेत. याजमुळे त्यांची प्रत्येकाची चित्ते पृथक् आहेत.

पेशवे म्हणतात टिपू बुडवावा; होळकर म्हणतात शिंद्यास मारावा; व गायकवाड म्हणतात पवारास मारावे. असे आपलेमध्ये कज्जे करता करता परकी लोकांचे काम झाले. आणि हे गमावून बसले. याचे कारण या लोकांस विद्या नाही. मोठे लोक आहेत, त्यांस तर विद्येविषयी त्यांच्या बापाची शपथ आहे. त्यांचे हातास कधी ग्रंथाचा स्पर्श झाला नाही. व वडिलांपासून तो संस्कारच नाही. कोणी भीष्माचार्य वृद्ध असतील ते गीताबीता वाचतात; परंतु फळ काय? त्याचा अर्थ समजेल तर शपथ! हे विद्येचे व ज्ञानाचे वैरी लोक आहेत, म्हणून यांची अशी दशा आहे.

## इंग्लिश राज्यापासून फळ

**पत्र नंबर ५४ : १ एप्रिल १८४९**

सांप्रत हिंदू लोक एकत्र बसले, म्हणजे सहज गोष्टी निघतात की, हिंदुस्थानची पुढे गत कशी होईल? लोक अगदी भिकारी होत चालले. व्यापार, धंदा, रोजगार ही कामे नाहीशी झाली. ब्राह्मणांस अन्न नाही. घरे ओसाड पडत चालली. माणसे स्वस्थ झाली. पदार्थांच्या किंमती उतरल्या. पैसा नाहीसा झाला. इंग्रज लोक एक पाठीमागे एक आपली राज्ये, संस्थाने, जहागिरी, पेनशने घेत चालले. कोणी शिपाई राहिला नाही व लोक दरिद्री झाले. तेव्हा पुढे या प्रजेची गत कशी होईल? याप्रमाणे ब्राह्मणांचा हाहाकार ईश्वराचे कानावर कधी जाईल?

अशा तऱ्हेचे विस्मययुक्त प्रश्न करतात. त्यात मग कोणी बहुत शहाणा, जुने काळचा असला म्हणजे तो म्हणतो, "अहो बाबा, मागे यादव कसे मेले? रावणाने प्रळय थोडा केला होता का? सर्व देव बंदीस घातले होते. नंतर रामाने वानराकडून लंका घेतली की नाही? पाण्यावर दगड तरले की नाही? तसेच इंग्रज कधी तरी बुडतील, धर्मसंस्थापना होईल. ब्राह्मण लोक सुखी होतील व इतर लोकही आपले वर्णाश्रमधर्मे करून वागू लागतील." अशा प्रकारची संभाषणे चार ब्राह्मण एकत्र बसले म्हणजे होतात.

आमचे ऐकण्यात हे पुष्कळ आले आहे. याविषयी आम्हास काय वाटते, ते लोकांस कळवावे म्हणून आम्ही आपले मत लिहितो. मुख्य आमचे बोलण्याचा

येथून आरंभ आहे की, ज्या गोष्टी ईश्वर घडून आणतो, त्या वाइटाकरिता नसतात. जरी त्या वाईट असा प्रथम मनुष्याचे ज्ञान थोडे म्हणून भास होतो, तरी शेवटी त्याजपासून मोठा उपयोग असतो. ही गोष्ट खचित आहे. तेव्हा हिंदुस्थानचे लोक हे फार मूर्ख व धर्मकर्म सोडून अनाचारास प्रवर्तले, ते असे की, सती जाण्याची चाल, मुले मारावयाची चाल, तीन वर्णांची नीच स्थिती, ब्राह्मणांचे महात्म्य, विद्या क्षणिक, अतिशय गर्व, संपूर्ण देशाचे लोक आम्हापुढे तुच्छ व आम्ही श्रेष्ठ. तेव्हा हा भाव हिंदू लोकांचा मोडण्यास व त्यांस ताळ्यावर आणण्यास परदेशातील सुधारलेले लोक यांची गाठ घालून देण्यापेक्षा उत्तम उपाय दुसरा काही आहे, असे वाटत नाही. यास्तव ईश्वराने या देशात इंग्रजांची प्रेरणा केली आहे.

आता हिंदू लोकांनी उघड पहावे की, आम्ही श्रेष्ठ की दुसऱ्या देशचे लोक श्रेष्ठ. ग्रंथावरून पहावे आणि लोकांचे तोंडून ऐकावे. त्यापेक्षा समक्ष अशी भेट झाली तर चांगले की नाही ? याचा विचार पहावा. तेव्हा या साक्षात शहाणे लोकांची गाठ पडून, हिंदू लोकांच्या वाईट चाली बहुत सुटल्या व आणखीही किती एक सुटतील. आणि यांची मने शुद्ध होऊन यांस राज्यकारभार, व्यापार-धंदा कसा कसा करावा, हे ज्ञान येईल. देशसुधारणा क्षणात होत नाही. तीस पुष्कळ विलंब लागतो. लहान मुलास हुशार होण्यास दहावीस वर्षे लागतात, मग देश चांगला होण्यास अर्थातच दोनशे-चारशे वर्षे लागतील. तोपर्यंत या लोकांस दुःख आहे; परंतु त्यांस उपाय नाही. जशी शाळेमध्ये मुलांनी शिक्षा घेतली पाहिजे, तद्वत् हे आहे. यापासून उत्तम फळ पुढे होईल. या देशचे लोकांनी वर्णसंकर होईल व धर्म बुडेल, हे काही भय बाळगू नये. वर्णसंकर होत नाही व धर्म बुडत नाही; परंतु मूर्खपणा मात्र बुडेल आणि धर्मामध्ये अधर्म मिसळ झाला आहे; त्यांस लोक धर्म म्हणतात, ते मात्र ज्ञानचक्षू आल्यावर जाईल.

वर्ण जे आहेत ते स्वाभाविक सृष्टीत आहेत; म्हणजे कोणतेही देशात वर्ण नाहीत असे नाही, वर्ण म्हणजे इतकेच की, चार प्रकारचे व्यापार. जसे ब्राह्मण हे धर्म रक्षणारे व विद्या वाढविणारे, क्षत्रिय शिपाईगिरी करणारे, वैश्य व्यापार करणारे आणि शूद्र शेत करणारे. हे धर्म सर्वत्र आहेत व ते जलप्रलय होईपर्यंत पृथ्वीवर रहातील; परंतु लोकांच्या अडाणी समजुती म्हणजे ब्राह्मण विद्वान चांगला असला तरी सिंधू नदी उतरून पलीकडे गेला म्हणजे किंवा त्याने कांदा खाल्ला म्हणजे त्याचे ब्राह्मण्य गेले. हे कसे गेले ? म्हणून म्हणाल तर याचे उत्तर कोणास देता येणार नाही. त्यांस जी विद्या येते, ती तो विसरत

नाही. त्याचा धर्म आहे. तो त्याने सोडला नाही. त्याचे काही नुकसान झाले नाही. मग कांदा खाताच ब्राह्मणपणा गेला कसा ? केवळ मनाची ही कल्पना आहे. वास्तविक काही नाही. या मूर्ख समजुती जातील आणि हल्ली जो वर्णसंकर आहे, म्हणजे वास्तविक ब्राह्मण नसता ब्राह्मण म्हणवितात, व शूद्र असता ब्राह्मण म्हणवितात व ब्राह्मण असता ब्राह्मण म्हणत नाहीत. हा वर्णसंकर मात्र जाईल आणि व्यवस्थित होतील.

या लोकांच्या पायातील शृंखला सुटतील, हे चहो देशांत जाऊन व्यापार करू लागतील, विद्वान होतील व आपले देशात कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील तेव्हा सुखी होतील. लोक शहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील की, आम्हास तुमच्या देशात आहे तसे पार्लमेंट द्या. नंतर आपले लोक त्यामध्ये बसू लागले म्हणजे हळूच म्हणतील की, तुम्हासारखे आम्ही शहाणे आहो मग आम्हास अधिकार का नसावे ? मग हिंदू लोकांचे बहुत मत असे पडले, म्हणजे सरकारास देणे अगत्य आहे. इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करू लागले, लाच खावयाचे सोडून दिले, म्हणजे बहुतकरून मोठाली कामे गवरनरीचीसुद्धा यांचे हाती येतील आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहतील. म्हणजे जसे हिंदुस्थानात प्रथम इंग्रज आले, त्या स्थितीवर येतील आणि आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील, राज्यकारभारात व व्यापारात त्यांस महत्त्व प्राप्त होईल आणि मग परदेशाशीदेखील व्यापार करतील.

असे हे लोक प्रबळ झाले, म्हणजे इंग्रजांस काही दिवसपर्यंत आभारी मानतील; कारण की त्यांचे योगाने हे ज्ञानी झाले; परंतु ज्या काळी इंग्रज गडबगड करू लागतील किंवा काही नवीन कानू बसवावयाचा आग्रह करतील, त्या काळी अमेरिकेत झाले तसे होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील की, तुम्ही आपले देशास जावे. आता आमचे देशाचा कारभार आम्हास चांगला करता येतो. तुमचे गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरते इकडे येत जा. आमचे प्रजेचे जसे आम्ही रक्षण करतो, तद्वत् तुमचेही करू; परंतु तुमचे वर्चस्व नको. याप्रमाणे या देशाची गती होईल आणि नवीन राज्यस्थिती चांगले रीतीची होईल, पहिले अज्ञान अगदी नाहीसे होईल. यांस दोनशे वर्षे तरी पाहिजेत. परंतु असे होईल यात संशय नाही. अशी मागले इतिहासावरून कल्पना होते. आणि हे तथ्य आहे, अशी खातरजमा आहे.

✦ ✦

# हिंदू लोकांनी काय करावे ?

**पत्र नंबर ६० : १३ मे १८४९**

पुण्यात मागे एक साहेब आला होता व त्यांस कारकून ठेवावयाचे होते. हे वर्तमान बाहेर फुटताच दोन हजार उमेदवार त्याचे येथे आले.

मग त्याने निवडून निवडून त्यातून थोडेसे ठेविले आणि म्हणू लागला की, हे फार आश्चर्य आहे. जर एक न्हावी किंवा शिंपी ठेवू लागलो तर मिळत नाही. आणि चांगले कारकून बोलावल्याखेरीज हजारो येतात. कारकुनीचा धंदा हिंदू लोकांमध्ये इतका स्वस्त आणि इतर धंदे स्वस्त नाहीत; याजवरून विचार करता मला वाटते की, ही गोष्ट खरी आहे. पुण्यात आज पाहिले तर दोन हजार ब्राह्मण उमेदवार चांगले लिहिणारे आहेत. परंतु त्यांस रोजगार नाही. कित्येक दहा दहा वर्षे कचेरीत जाऊन मेहनतीने लिहितात. फुकट चाकरी करतात. परंतु पाच रुपयेदेखील कोणास मिळत नाहीत. तसेच भट हजार आहेत; कित्येक जन्मपर्यंत वेद पाठ करण्याची मेहनत करतात. परंतु आगांतुकी करावयास लागतील. याजकरिता मी या भटांस व उमेदवार कारकुनास फार उत्कंठेने बोध करतो की, "तुम्ही दुसरा काही व्यापार करीत जा." यावर ते म्हणतात की, "पेशवाईत आमचे यथास्थित चालत होते. आता चालत नाही. हे इंग्रजांचे पायगुणाने झाले." असो.

या गोष्टीचे उत्तर देणे जरूर नाही. ते कशानेही असो, पेशवे चांगले असोत अगर इंग्रज वाईट असोत, जे प्राप्त झाले आहे ते खरे. सांप्रत ब्राह्मण लोकांची हलाखी आहे, हे सर्व कबूल करतील. बरे, जे इंग्रजी राज्यास नावे ठेवतात व मनात चुरमुरतात, त्यांनी व्यर्थ काळजी करू नये. कारण पेशव्याचे किंवा दुसरे कोणाचे चांगले त्यांस पाहिजे तसे राज्य त्यांच्याने स्थापवत नाही. व इंग्रजांसही सध्या जा किंवा अमुक रीतीने चाला, हे म्हणण्याचीही या भटांची व कारकुनांची प्राप्ती नाही.

यास्तव जे आपणांस कर्तव्य, त्यावर विचार मात्र आपण करावा. तो कोणता म्हणाल, तर ऐका. सांप्रत काळी जे दरिद्र प्राप्त झाले आहे, हे मोडावे कसे, याचा विचार पडला आहे. वास्तविक पाहिले तर ब्राह्मण लोकांचे अज्ञान व मूर्खपणा पराकाष्ठेचा आहे. त्यांस दरिद्र फार आले आहे. कारण इंग्रजांचे

राज्यात न्हावी, परीट, मोची इत्यादिक जे मजुरीने पोट भरणारे, त्यांचा रोजगार कायम आहे; आणि ब्राह्मण लोक व मोठे सरदार, मराठे कुलीन हे तेव्हा मजुरीने पोट भरीत नव्हते, ते आता विलायतेस जसे लॉर्ड आहेत, तसे ते होते व मोठाली कामे आणि सरदाऱ्या करीत होते. हे लोक आता इंग्रजांच्या उपयोगी नाहीत.

कारण या देशात जे लाभ म्हणजे मोठ्या जागा व अधिकार ते ते सर्व आपल्या लोकांस देतात व फक्त मजुरीचे रोजगार इकडील लोकांस शिल्लक राहिले आहेत. याजमुळे फार दरिद्र व मोठ्या लोकांस लज्जा प्राप्त झाली आहे. हीं दूर होण्यास हे लोक थोडेसे शहाणे झाले म्हणजे उपाय सुचतील. ते असे की, विलायतेत पार्लमेंट आहे. परंतु ते इकडील देशाचा काही विचार करीत नाही. कारण त्यांस स्वदेशाचा कारभार फार आहे. पहा, सातारच्या राजाने किती प्रयत्न केला, परंतु पार्लमेंटाच्याने काही झाले नाही. सर्व मेहनत व्यर्थ केली व शेवटी कंपनी सरकारने केले ते बहाल झाले.

तात्पर्य, विलायतेतील पार्लमेंट यांस हा देश कसा वाटतो की, जसा आपले घरी गडी आहे. त्याने एकादा व्यापार केला व त्यात त्याने अन्याय केला तरी आपण ते मनास आणीत नाही. कारण आपण आपले घरचे काम टाकून गड्याचा घरचा कारभार कशाला पाहू? तद्वत् पार्लमेंट म्हणजे की, आमचे देशातील सावकार लोक यांनी परदेशातून मुलूख घेतला; तेथील न्यायमनसुबी आम्ही पाहण्यास काय गरज? आमचे देशातील आम्हास काय थोडे आहे? याप्रमाणे आहे. सवतीचे मुलाची काळजी कोण करितो?

तेव्हा आमचे लोकांनी एकत्र होऊन पार्लमेंट मागावे आणि मुंबई, कलकत्ता अशा ठिकाणी ते नेमून तेथे काही इंग्रज व आपले सर्व जातीचे शहाणे शहाणे लोक त्यात ठेवावे आणि त्यांचे हुकुमाने कारभार करावा. म्हणजे विलायतचे बादशाहज्यादीसही नाही म्हणवणार नाही. कारण की विलायतेत पार्लमेंट असावे व येथे नसावे अशी आम्ही काही चोरी केलीं नाही. हा एक मोठा उपाय साध्य व्हावयाजोगा आहे.

दुसरा तूर्त दरिद्र मोडण्यास उपाय असा आहे की, ब्राह्मण लोकांनी आपल्या मूर्खपणाचा समजुती सोडाव्या व केवळ कारकून आणि भट हे दोनच रोजगार आम्ही करू, असे म्हणू नये. या देशात आणखी पुष्कळ रोजगार आहेत व तेही आता दिवसेंदिवस इंग्रज घेत चालले. सावकारी, शेतकी वगैरे इंग्रज करू लागले. हेच रोजगार आपले लोकांनी करावे, कोणते म्हणाल तर काच, कापड, सुरी, लाकडी सामान, घड्याळे, चाबूक, यंत्रे इत्यादी पुष्कळ

इकडे इंग्रज खपवितात. ही सर्व आपले लोकांनी करावयास शिकावे व येथे जो माल खपणार नाही तो दुसऱ्या देशास घेऊन जावा, आणि तेथे विकावा. पुष्कळ देश आहेत. या गोष्टीचा शोध करावा. व इंग्रज देशचे सामान बंद करावे किंबहुना आपले सामान त्यांस द्यावे. परंतु त्याचे आपण घेऊ नये. जो इकडे उत्पन्न होईल तितका माल द्यावा. विलायती कापड घेऊ नये. यास्तव आपल्यास जाडी, मोठी नेसावयास लागली तर काय चिंता आहे? परंतु आपले देशाचे रक्षण करावे. असे झाले म्हणजे बहुत रोजगार राहतील.

परंतु हे लोकांस सुचत नाही. यांस असे वाटते की, आम्ही आजपर्यंत केले नाही, ते करणार नाही, व भलताच रोजगार करणार नाही. दहाबरोबर मरण लग्नासमान आहे, असे ते मानितात. आणि उपाशी मरतात. भट पन्नास हजार खेपा घालतात. तेव्हा एक श्राद्धाचे आमंत्रण येते. तसेच शंभर धक्के कोंडीत खातात, तेव्हा दोन पैसे दक्षिणा मिळवितात. चोरा-लबाडाची स्तुती करतात, तेव्हा चार पैसे काढतात. दारू पिणाराने शुद्ध व्हावयास पैसा दिला म्हणजे त्यांस शुद्ध करतात. तात्पर्य, सांप्रत ब्राह्मण पैशाकरिता कसलेही दुष्कर्म करावयास सोडीत नाहीत. तसेच उमेदवार, कारकून दोनशे खेपा घालतील, तेव्हा दप्तरदाराची भेट, पाचशे खेपा घालतील, तेव्हा तो 'या' म्हणतो. मग पंचवीस वर्षे गांवात भीक मागून त्याच घरात काम करावे. चाकरी क्वचित कोठे येणार व ती तो आपल्या सोयऱ्याधायऱ्यास प्रथम देणार; म्हणजे सर्व उमेदवारांनी हात आपटीत असावे. असे त्यांचे हाल होतात व माणसे अशी जिकिरीस येतात, ती पहावत नाहीत.

यास्तव त्यांनी स्वस्थपणाने दुसरे रोजगार करावे. म्हणजे इंग्रज लोकांचा, शिरस्तेदाराचा शिव्या, भटांचा अपमान हे काही सोसावयास नको. याचप्रमाणे अलीकडे इंग्रजी लिहिण्याची अवस्था आहे. जो तो इंग्रजी शिकतो. परंतु इतक्यांची गरज नाही. याजमुळे दीनवाणी फिरतात. या गोष्टीचा विचार केला असता बरे पडेल.

## सरकारी कामदार

■

**पत्र नंबर ६६ : १ जुलाई १८४९**

आपले लोकांमध्ये अशी चाल पडून गेली आहे की, त्यांनी उडवे असावे म्हणजे त्यांनी मनास येईल तितके कर्ज करावे, सावधगिरी करू नये. हे लक्षण सरदारांचे असे लोक समजतात.

दुसरे, सराफ लोक, हे सावध असतात. म्हणजे त्यांनी कवडीपासून मिळवावे. कधी गैरशिस्तपणे पैका जाऊ देऊ नये. कारकून यांनी ठकपणाने संसार करावा. हा शिरस्ता आहे. आणि सरकार हे लुटारू असावे व सरकारने पाहिजे तसे वागावे. खंडण्या घ्याव्या, लूट करावी, हा धर्म सरकारचा, असे लोक समजतात आणि तसेच आचरण करतात. याजमुळे पुष्कळ अनर्थ होतात.

गृहस्थ आहेत ते म्हणतात की, आमचा द्रव्य मिळविण्याचा धर्म; भट म्हणतात आमचा भीक मागण्याचा धर्म. भटाजवळ पन्नास हजार रुपये असले, तरी आणखी भीक मागतोच व गृहस्थास दोनशे रुपये महिना असला तरी तो लाच खातोच, चोऱ्या करतो आणि पैका मिळवितो. आपले लोकांपैकी कामगार सरकार चाकरीस आहेत, त्यांपैकी शेकडो या लाच खाण्याबद्दल वगैरे तुरुंगात गेले; परंतु अद्याप ते खोड टाकीत नाहीत. याचे कारण असे आहे की, त्यांस ती सवय पडून गेली आहे हे एक; दुसरे त्यांस ईश्वराचे भय नाही, विद्या नाही व शहाणपण नाही; याजुमळे नीती समजत नाही; तिसरे कारण इंग्रज लोक जे विलयतेतून इकडे येतात, ते शुद्ध टोणपे असतात, त्यांस काही कळत नाही. मग शिरस्तेदारावर वगैरे भरवसा ठेवतात व शिरस्तेदार जे सांगेल त्याप्रमाणे करतात याजमुळे शिरस्तेदार जडजाचे काम स्वतः करीत असतो. म्हणून तो लाच खातो. चौथे पगार फार कमी. साहेब लोक मूर्ख असतात; परंतु दोन हजार, तीन हजार रुपये वगैरे पगार खातात आणि त्याचे हाताखालील कामगारास शेपन्नास रुपये दरमहा देतात आणि सर्व काम तो करितो, हेही कारण आहे. पाचवे कारण असे आहे की, इंग्रज लोकांस या देशातील लोक निवडता येत नाहीत. लुच्चे, सोदे आणि भले हे एकसारखे या राज्यात झाले आहेत.

ज्या लोकांची योग्यता पाच रुपये मिळविण्याची असते, त्यांस १०० रुपये देतात. आणि ज्यांची पाचशे रुपयांची योग्यता त्यांस पाचदेखील देत

नाहीत. सरासरी आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते, अशी वर्तणूक आहे. याजमुळे इकडचे लोक म्हणतात की, कसेही केले तरी इंग्रजांस निवाडा समजत नाही. निभेल तितके दिवस निभेल, मग खावयास तरी कशाला कमी करावे ? जितके दिवस जातील, तितके जातील. पुढे पहातच आहोत, अशी समजूत आहे. ब्राह्मण लोक राज्याचे व अधिकाराचे उपयोगी नाहीत, हे स्पष्टपणे आज दिसते आहे. जेव्हा ब्राह्मणांच्याने शेपन्नास रुपयांच्या जागा व लहान लहान अधिकार नीट चालवत नाहीत, तेव्हा ते पुढे करणार काय ? याचे हाती राज्य दिले, तर हे दिवसास लुटतील, हे उघड आहे. कोणी म्हणतात, इंग्रज जे कामगार ठेवतात, ते अगदी लबाडाचे अर्क, असे जाणून ठेवीत नाहीत; परंतु अज्ञानाने तसे घडते. तथापि फळ एकच आहे. हे जर कुलीन, लोकांस ठेवतील, तर असे कधी होणार नाही. याजकरिता विद्वान, चांगले कुलीन, मोठ्या योग्यतेचे लोक ठेवावे. छचोर, लबाड व हलके लोक जे आता भरले आहेत, यांचे हातून वर्तणूक कशी चांगली होईल ? परंतु असे साहेब लोकांच्या हातून घडणे कठीण.

कारण त्यांचे अज्ञान या देशाविषयी पुष्कळ आहे. अब्रूदार कोण, कसा हे त्यांस कळत नाही. सकट घोडे आणि बारा टक्के मानतात. मला वाटते की, हे इंग्रज हल्ली सरकारातून नेमणूक होऊन जे इकडे येतात, त्यांचे तीन वर्ग आहेत. शंभर सिविलीयन असले, तर त्यात पंचाण्णव असे असतात की, त्यांचे चित्त पैका मिळवून घरास जावे. ते दुसरे काही पहात नाहीत, फक्त पिशवीवर नजर ठेवतात. व शिरस्तेदाराने कागद पुढे मांडले, म्हणजे सह्या करतात. अर्जी कोणाकडे पडो, तरी फैसल करतात, व इकडे तिकडे न पाहता घरी जातात.

दुसरे दिवशी पुन्हा तोच क्रम. ते आपले दिवस मोजितात. याप्रमाणे उदास असतात. आणि शेकडा चार मध्यम प्रतीचे असतात, म्हणजे ते चित्त लावून काम करतात. हाताखालचे माणसांचे काम, त्यांची वर्तणूक व वहिवाट पाहतात. विदुरनीतीत राजास विदुर सांगतो, राजाचा धर्म असा आहे की, बातमीदार ठेवून वर्तमान पहात जावे. तो नेम इकडील लोकांस फार लागू आहे. ज्यास अधिकार करणे त्याने आपल्या लोकांची वर्तणूक पहावी, म्हणजे त्यांस भय वाटते; परंतु असे करणारे साहेब लोक शेकडा चार असतात; व शंभरात एक उत्तम प्रतीचा असतो. त्याचे मनात आपण नीट काम करावे, हे तर काय, परंतु आपले जिल्ह्यातील सर्व लोकांचे कल्याण असावे, अशी त्यांची इच्छा असते. त्यांस वाटते की आम्ही या लोकांचा दरमहा खातो,

हा त्यांचा माल घेतो व हे लोक अज्ञानात फार आहेत. याजकरिता यांस सुधारावे व विद्यावृद्धी करावी अशी प्रजेची काळजी करणारा क्वचित याप्रमाणे आहे. तेव्हा अशा उदासीन राजांचे हातून राज्य कसे चांगले होईल ?

ते आपले हिताकडे पाहतात. लोक मेले तर मरेनात ? यांस काय त्याचे सुतक यावयाचे आहे? आपले लोक आतापासून सुधारले आणि जरा अक्कलहुशारीत आले व लाच खाणे वगैरे दोष टाकले म्हणजे खचित साहेब लोकांचे शंभरपट काम चांगले करतील. यांस प्रथम भाषा चांगली कळेल. साहेब लोकांचे मुळी प्रथम तेच व्यंग असते व स्वदेशातील लोक राज्य करण्यास योग्य होण्यास अवकाश आहे, तत्रापि जर विद्वान लोकांस मोठाल्या जागा देऊ लागले, तर त्याच्या योगाने लवकर सुधारणा होईल. हल्ली जे कामगार आहेत, ते इंग्रजापेक्षा स्वदेशाचे हित करण्यास उदार आहेत. याजपासून देशाचे कल्याण काय होणार ?

आज जे लोक आहेत, त्यांस काही कळत नाही. ज्ञान व विद्या हे विषय त्यांचे स्वप्नात देखील नाहीत. गर्विष्ठ ब्राह्मणांच्या समजुती त्यांचे मनात आहेत. फक्त पैसा मिळविण्याकरिता साहेब लोकांचे आर्जव करून पोट भरितात. या लोकांच्याने काम कधी चांगले होणार नाही. याजकरिता चांगले लोकांची योजना सरकारातून करावी. आता सरकारचाकरीस लोक आहेत, हे फार हलक्या प्रतीचे, यांस काही ज्ञान नाही. फक्त आर्जव करावे, इतके त्यांस समजते. व साहेब लोक किती एक स्तुतिप्रिय असतात, त्यांची आर्जवाने मर्जी खुषी होते, आणि ते त्यांस मोठी जागा देतात. याप्रमाणे अवस्था आहे.

तात्पर्य, कोणत्याही प्रकारे या लोकांची बरी गत नाही. सरकार या प्रकारचे व लोक या प्रकारचे, मग दरिद्र असले तर नवल काय ? यास्तव या लोकांस माझी विनंती आहे की, तुम्ही जरी हलक्या कुळातले असाल तरी तेच तुम्ही बिरीद बाळगावे असे नाही. थोरपणा धरावा. तुमचे नशिबाने हे इंग्रज इकडे आले, म्हणून तुमच्यासारख्यांस जागा मिळतात. तर तुम्ही देशातील लोकांची अब्रू राखा.

✦ ✦

## स्वदेशप्रीती

### पत्र नंबर ६७ : ८ जुलाई १८४९

या देशातील शास्त्री, पंडित यांस व ज्यास आपले धर्माचा अभिमान आहे व जे धर्म जाणतात, त्या सर्वांस माझे काही प्रश्न आहेत. त्यांची उत्तरे कोणी देतील तर मी त्यांचे आभार मानीन आणि न देतील तर मी आपल्यास विजयी म्हणेन.

(१) पुराणे ही काव्ये समजावी किंवा वेदशास्त्राप्रमाणे त्यांस मानावे?

(२) वेदातील धर्म व पुराणातील धर्म (देवता, आचार, कर्मे इत्यादी) वेगळा आहे की नाही?

(३) सांप्रत हिंदू धर्म बिघडला आहे की नाही? व त्यांस सुधारणे जरूर आहे की नाही?

(४) आचार प्रमुख मानावा किंवा नीती प्रमुख मानावी?

(५) हल्ली हिंदू लोकांवर जे प्रसंग आले आहेत, ते सर्वांस विदित आहेत. त्यातून तरणोपाय होण्याकरिता उपाय करणे अवश्य आहे; परंतु त्या उपायास सांप्रतचे काळी धर्म अगदी बुडोन अज्ञान पसरले आहे, हे विघ्न आहे किंवा नाही?

(६) वेद, शास्त्रे, पुराणे याचा सारांश ग्रंथ करून सर्व लोकांस तो धर्मपुस्तकाप्रमाणे देणे बरोबर आहे किंवा नाही? किंवा प्रत्येकाने दहा उंट पोथ्या वाचाव्या, तेव्हा त्यातील काही धोरण कळणार, असेच गूढ राहू द्यावे? अर्थ करणे बरे की पाठ करणे बरे?

(७) जातिधर्मास कूळ मुख्य किंवा वर्तणूक मुख्य?

(८) पुराणातील व तंत्रातील धर्म काही काही नीतीस विपरीत आहेत. जसे शाक्त दारू पितात, जारकर्म करतात, इत्यादी, आणि काही युक्तीस प्रतिकूल आहे. म्हणजे ग्रहण भलतेच रीतीने वर्णन केले आहे व पृथ्वीचे स्वरूप मनास येईल तसे कल्पनेने लिहिलेले आहे. याजवर भरवसा ठेवावा व आंधळ्यासारखे होऊन जे उघड खरे दिसते, ते खोटे म्हणावे, यात परिणाम आहे की काय?

(९) सांप्रत लोकांमध्ये किती एक चाली मुळीच आधार नसता पडल्या आहेत, म्हणजे लवकर लग्न करावयाचे इत्यादी. या मोडणे जरूर आहे की नाही?

(१०) वास्तविक धर्माचे तात्पर्य हल्ली कोणास कळत नाही. शास्त्रीपंडित हे लोभावर दृष्टि ठेवून लोकांस बरा वाटेल तो शास्त्रार्थ सांगतात. याजमुळे धर्म अगदी ग्लानीस आला आहे. याचा अभ्युदय करणे जरूर आहे की नाही ?

(११) अशा मोठाल्या गोष्टी ईश्वराने कराव्या, असे म्हणून उगेच बसणे बरे किंवा उद्योग करावा; त्यात ईश्वर सहाय्य होतो, हे मानणे बरे ?

(१२) संस्कृत ग्रंथ आहेत, त्यांचे मराठी करून ज्ञान वाढविणे हे बरे किंवा ब्राह्मणांचे हक्क त्यात काही बुडत आहेत ?

इतके त्रयोदश (द्वादश ?) विध माझे प्रश्न आहेत. त्यातील तारतम्य जाणून कोणी उत्तर द्यावे व उत्तर देतेसमयी जे कोणी शहाणे आहेत, त्यांस पुसावे.

किती एक लोक ज्यांचे अज्ञान दृढ आहे, ते या सर्व प्रश्नांची उत्तरे बाळकासारखी तत्काळ देतील; कारण की ब्राह्मणांचा असा स्वभावच आहे की, जर त्यांचे समजुतीविरुद्ध काही बोलले, तर ते अगदी वाईट असे समजतात. कारण की, ते मुळी आपल्यास देव समजतात. त्याचमुळे गर्व होऊन आम्ही थोर, आम्ही करतो ते चांगले, आम्हास कोण नाव ठेवणार आहे ? अशा समजुतीने त्यांचे वादविवाद नाहीसे होऊन, लोक थंड झाले आहेत. एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट, हे ठरविणे त्यांस कळत नाही. एक गोष्ट सांगतो व बाकीचे माना डोलवितात, त्याचा विचार करीत नाहीत. हे अत्यंत गर्वाचे व मूर्खपणाचे लक्षण आहे. याजकरिता माझे प्रश्न साधारण नाहीत, अपूर्व आहेत व असे आजपर्यंत कोणी केलेही नसतील, म्हणून यांची उत्तरे देण्यास शास्त्री, पंडित, धर्मवेत्ते व इतर लोकहितेच्छू असतील, त्यांनी सर्व गोष्टींचा दूरवर विचार करून व सर्व कल्पना आणि तर्क ध्यानात आणून उत्तरे दिली पाहिजेत. मी रागाचे किंवा घाईचे उत्तर मागत नाही; विचाराचे व सत्याचे उत्तर मागतो.

याकरिता जे कोणी अज्ञानाचे दास नसतील, त्यांनी मन मोकळे करून भागवताचे वाक्याप्रमाणे "मनःपूतं समाचरेत्" खरे दिसेल ते बोलावे. खऱ्याची लाज धरू नये. ज्यांणी स्वदेशाचेच हिताचे विचार केले आहेत व जे सर्व शास्त्रे जाणतात, व जे बहुश्रुत व देशोदेशीचे इतिहास जाणतात, त्यांसच हे प्रश्न सुलभ जातील, असे मला वाटते. कारण जे लोक विचारी आहेत, त्यांचे मन अज्ञानाचे दास्यत्व किंवा कोणत्याही मताचा पक्षपात करीत नाही; वास्तविकपणाने व विचाराचे धोरणाने सुबुद्धी करून ते चालतात. यास्तव माझे देशचे लोक विविध जातीचे आणि मुख्यत्वेकरून ब्राह्मणजातीचे (कारण की

ब्राह्मण हिंदू लोकांचे धर्माध्यक्ष आहेत) याजकरिता त्यांस माझी अशी प्रार्थना आहे की, माझे प्रश्नांची उत्तरे द्यावी. व मी त्या गोष्टीचे 'होय' म्हणून प्रतिपादन करणार आहे. तेव्हा कोणाचा पक्ष सिद्ध होतो हे पाहू ? आणि सिद्ध झाल्याअंती सर्वांनी तसेच आचरण करावे आणि स्वदेशाचे हितास झटावे ही मुख्य धर्मसुधारणा आहे.

स्वदेशास जे हितावह ते करावे. जसे आपण मातोश्रीस वंद्य मानतो व तिच्या पोटी जे आले ते सर्व बंधुप्रीतीने वागतात. तद्वत् या जमिनीवर जे आपण आहोत ते सर्व एकमेकांचे बंधू आहोत व हा देश आपणा सर्वांची मातोश्री आहे. याजकरिता कोणी सुखी व द्रव्यवान असतील, त्यांनी बहुत लोक उपाशी मरतात व दरिद्री आहेत, त्यांचे रक्षण होण्याचा प्रयत्न करावा. आपण सर्वांनी आज दोन हजार वर्षेपर्यंत यथेच्छ सुखाने झोप घेतली व काही उद्योग केला नाही. म्हणून आता तरी जागृत होऊन काय आहे ते पाहू व बुद्धीचा उपयोग करू.

मेल्यावर आपण एकमेकांस उपयोगी पडणार नाही. तेव्हा या जन्मात ही संधी लोकांवर उपकार करण्याची आहे, ही सोडू नये व आयुष्याचा व्यय दुसऱ्याचे हिताकरिता करावा. तो व्यय सुखकारक आहे, आणि दुसऱ्यास सुखप्राप्ती करणे हे स्वतां आपणास लहान सौख्य नाही. तुम्ही जेव्हा निर्वेध बसाल तेव्हा तुम्ही चांगले काम केले असेल, त्यांस आठवून केवढे सुख पावाल; परंतु वाईट काम केले, तर कुत्र्याचे मरणाने मराल, याजकरिता मी इतका तुम्हास विनवीत आहे.

## राज्यांविषयी विचार

**पत्र नंबर ७८ : १४ आक्टोबर १८४९**

सांप्रत काळी हिंदू लोक मूर्ख; त्यांस राज्यकारभार करता येत नाही व आपले राज्य सांभाळण्याची ताकद नाही. याजकरिता पहा त्यांस किती संकटे प्राप्त झाली आहेत की, गवरनरापासून असिस्टंट व कलेक्टरापर्यंत व कमांडर चीफपासून एनसाईन व सोजीरपर्यंत दुसरे देशचे लोक भाड्याने आणले

आहेत. ते कसे म्हणाल तर त्यांनी लाखो रुपये पगार आम्हापासून घ्यावा आणि स्वदेशास जावे. त्यांची घरेदारे इकडेस काही नाहीत. त्यांचे हाती पैसा गेला तो इकडे अगदी यावयाचा नाही. अशा प्रकारचे लोक आम्हास भाडेकरी आणून राज्यकारभार करावा लागतो.

हेच भाडेकरी जर इकडे राहतील आणि आम्हा लोकांमध्ये घरेदारे बांधतील तर एवढे दरिद्राचे कारण राहणार नाही. पूर्वी मुसलमानांचे राज्य होते, तरी मुसलमान जे इकडे आले. ते इकडे राहिले. याजमुळे ते आमचेच देशचे झाले. आणि जसे स्वदेशात सर्व श्रीमंत नसतात परंतु काही लोक श्रीमंत असतात; तसे मुसलमान श्रीमंत लोक होते व त्यांचा परकी भाव गेला. तद्वत् इंग्रज लोक इकडे राहतील, तर ते आमचे देशचे होऊन त्यांस व आम्हास काही विशेष अंतर राहणार नाही.

परंतु सांप्रत काळी फारच विपरीत झाले आहे. आता या देशचे लोक इंग्रजांइतके काबील होऊन त्यांचेबरोबर शहाणपणास येण्यास युगे पाहिजेत; परंतु त्यांस एक युक्ती आहे की, जर विलायत सरकारशी व कंपनी सरकारशी फूट झाली किंवा काही तंटा झाला आणि इकडील गवरनर जनरल वगैरे येथील सर्व राज्य बळकावून राहिले व पुन्हा परत जाण्याच इरादा ठेविला नाही, तर एकदम आमचे लोक शहाणे होतील आणि राज्याचे अधिकारात इंग्रजांचे समागमे शिरतील व इंग्रजही आता जसे त्यांस दूर मानतात, तसे मानणार नाहीत. एक, दोन, तीन पिढ्या इंग्रजांच्या इकडे झाल्या, म्हणजे ते आमच्यातील होतील किंवा फराशीस वगैरे राज्यातील लोक यांनी हिंदुस्थानच्या दरम्यान समुद्राची वाट बंद केली, तर इकडचे इंग्रज इकडेच राहतील व मग त्यांस इकडची काळजी लागेल.

सांप्रत त्यांस इकडची काळजी नाही व इंग्रज लोक राज्य करतात; परंतु याजमुळे किती एक जास्ती खर्च वगैरे अडचणी अशा आहेत की, इंग्रजांकरिता इंग्रजी व मराठी दप्तर बाळगावे लागते; परंतु आणखी इंग्रजांस इकडील किती एक गोष्टी समजत नाहीत. तथापि ते लोक याजपेक्षा हजारो पट शहाणे आहेत. याजमुळे अडचणी असूनही लोक कबूल करीत नाहीत. कारण की, याचे शहाणपण सर्व लोकांस बुडविण्याकरिता उपयोगास येते.

आमचे राजे असतात, ते किती मूर्ख असतात! याचे उदाहरणास बाजीराव पेशवा व सातारचा राजा व दौलतराव शिंदे ही उदाहरणे घ्या म्हणजे समजेल. सातारचा राजा जसे एखादे चित्र समजून न्यावे तसा रेसिडेंटाकडे जातो आणि घरात पाहिजे तितकी दारू पिऊन मस्त होऊन रहातो. काही न्यायकारभार

कगीत नाही. बसला असता तेथून लोकांनी हात धरून उचलले पाहिजे. ही त्याची शक्ती, एक पत्र सरकारातून आले, तर त्याचा जाब लिहिणे तो माहीत नाही. राज्यात खबर काय हे, हे यांस ठाऊक नाही. रयतेकरवी विद्या करविणे हे त्यांस ठाऊक नाही. फार कशाला ? राजे तर केवळ पशू असतात; परंतु थोर लोकांकडे पहा की, यांस किती ज्ञान असते ? दर एक थोर माणसास वकील पाहिजे. वकिलाशिवाय बोलता येत नाही. व एखादे पत्र आले, तर त्याचा जाब लिहून कामदारास दाखवत फिरतात आणि मनास येईल तसे यजमानास सांगतात.

बहुधा असे होते की, वकीलच मालक होता. आणि मोठे लोक स्वतां मूर्ख असून त्यांजला काही समजत नही. भलतेच करतात. आणि वकील लोक हे बहुधा तंटे उत्पन्न करणारे असतात. आणि यजमानास यात गुंतवून मग आपलेशिवाय काही होऊ नये, असे करतात. जे काम व्हावयाचे नाही, ते यजमानास सांगतात की, आम्ही करतो. आणि सरकारचा अंमलदार त्यांस लांच वगैरे देऊन याजकडून होईल असे म्हणतात. व मग यजमानास असे भासवितात की, त्या वकिलाचा प्रवेश फार, आमच्याने न होईल ते काम हा करील. सर्व कामदार यांस अनुकूल आहेत. असे करून मग वकिलास जरूर पडते की, कामदारावर त्याचे पोटिस्त व यजमानास वेड लावण्यास कामदार अनुकूल आहेत. याजकरिता कामगारास कधी मेजवानी, कधी यजमानाशी भेट करून देऊन, सर्व काळ कामगारांचे आर्जव करून त्यांस लाच देतात आणि यजमानास बुडवितात. त्यांचे घरातून हजारो रुपये काढले, तरी त्यांपैकी निम्मे आपण खातात आणि निम्मे कामदारास देतात, याप्रमाणे सर्व जहागिरदार व मोठाले लोक यांची हकीकत आहे.

कर्नाटक प्रांतात जहागीरदार वगैरे आहेत. त्यांची तोंडे माणसासारखी आहेत, म्हणून मात्र त्यांस माणसे म्हणावी. नाहीतर ते केवळ जनावरेच आहेत. त्यांचे मनास व जनावरांचे मनास काही अंतर नाही हे सर्व इंग्रज लोकांस कळते. व पोलिटिकल एजंट व रेसिडेंट हे सर्व जाणून आहेत. परंतु ते सावध आहेत. याजकरिता त्यांस राखून ठेवतात. एकदम अन्यायाने बुडवीत नाहीत; परंतु त्यांची किंमत व योग्यता समजती. किती एक सरदार असे समजतात की, कायद्यात व कानूत काही नाही. एजंट करील ते होईल. यास्तव दरबारात कधी बोलाविले, तर मनास येईल तसे बोलतात व मनास येईल ते मागतात.

किती एक सरदार इतके मूर्ख आहेत की, ते साहेब लोकांस म्हणतात, तुम्ही देवाप्रमाणे आम्हास आहा. तुम्ही जे कराल ते होईल; अशी भाषणे

ऐकून शहाणे लोक या बोलणारांची आपले मनांत किंमत करीत असतील, ते मनात समजावे. अस्तु. याप्रकाराचे आमचे लोक लहान व वेडे आहेत. त्यांस न्याय, नीती व वाकबगिरी नाही. असे असून जो बेवकूब असतो, त्यांस चांगला माणूस असे म्हणतात. ज्यास काही कळत नाही, त्यांस थोर, संभावित म्हणतात व जो अन्याय करितो, त्यांस दयाळू म्हणतात. अशा नाना प्रकारच्या वाकड्या समजुती आहेत. लोकांस अन्याय करून देतो, त्यांस म्हणतात हा थोर व भिडस्त आहे. जो सरकारचा पैसा लुटू देतो किंवा रयतेकडून लाच घ्यावयास फुरसत देतो त्यांस उदार म्हणतात. दुसऱ्याची लबाडी धरून देतो त्यांस लबाड म्हणतात व सरकार म्हणजे त्यांस असे वाटते की, जसा समुद्र; त्यातील कितीही पाणी खर्च केले, तरी ते सरावयाचे नाही, तद्वत् सरकारचा पैसा सहज खर्चावा.

कोणी विरुद्ध म्हणाला; तर म्हणतात की, अरे तुझ्या पदरचे काय गेले ? सरकारचा पदरचे जाते, सरकारास काय कमी ? सरकारचे खाऊ नये, तर खावे कोणाचे ? सरकारास लुटू नये, तर काय गरिबास लुटावे ? या प्रकारचा पहिल्या काळचा समजुती आहेत. ज्या काळी लोक बेवकूब, श्रीमंत व राजे होते, तेव्हा ते आपल्या चाकरास पाहिजे तशी वर्तणूक करू देत होते. त्या समयीची समजूत अद्यापि राहिली आहे; परंतु आता पहिलेप्रमाणे उदारत्व, न्याय व थोरपणा नाही. आताचा थोरपणा व उदारत्व फार शुद्ध आहे. चंदुलाल लोकांची घरे बुडवून धर्म करीत होता. तसे असता त्यांस चांगला म्हणत होते. हे प्रकार लोकांनी सोडले पाहिजेत व सरकारविषयीचा वाकड्या समजुती सोडल्याशिवाय या लोकांस लायकी येणार नाही. सरकार यांचे हाती आले, तर मनास येईल तसा खर्च करतील, पैसा नाहीसा झाला, म्हणजे लोकांची घरे लुटतील. असे गैरशिस्त हे लोक आहेत. यांस कायदा, कानू व शहाणपणा नाही. याकरता राज्य करण्यास इंग्रज लोक जरूर झाले.

आताप्रमाणे कधी कोणी पूर्वी राज्य केले नव्हते. रामाचे राज्य चांगले म्हणून कीर्ती आहे; परंतु हल्लीचे राज्यात एक कमी आहे की, लोकांस रोजगार व श्रीमंती नाही; परंतु शहाणपण नाही म्हणून या गोष्टी नाहीत. शहाणपण असेल व लोकांचे हाती राज्य असेल, स्वदेशीय अंमलदार असतील आणि त्याजकडून जशी इंग्रजाकडून इकडे निष्पक्षपाताने वर्तणूक होते अशी होईल, तर इंग्रजांचे राज्याहून शंभरपट सुख होईल, आणि मग रामराज्यही मागे सरेल. यात संशय नाही. परंतु असे होण्यास लोकांस समजू लागले पाहिजे. व कायदाकानू ठाऊक नाहीत म्हणून वकील लोक वगैरे फसवितात. तसे लोक नसून जाचा

त्यांस आपला प्रपंच सावधगिरीने करता येतो. इतके झाल्याअंती याच कायद्याने व याच नियमाने हे लोक राज्य बहुत उत्तम करतील. इंग्रज करतात; पण त्यांस परकीपणा आहे, व स्वदेशीय लोक रोजगार नाही याजमुळे एकंदर भिकारी झाले.

परंतु हे जर उत्तम झाले, जातिअभिमान सोडून सर्व लोकांचे हितास झटणारे झाले; सर्वांस विद्या करविण्याचा यत्न करू लागले. ब्राह्मण श्रेष्ठ इत्यादी मूर्ख समजुती सोडून राज्य करू लागले, महार, रामोशी, कैकाडी, कोमटीदेखील यांनी सुधारले आणि मोठे कामाचा लायक झाले, तर ईश्वर कृपा करणार नाही असे नाही.

## इंग्लिश सरकार

**पत्र नंबर ८९ : २० जानेवारी १८५०**

आमच्या लोकांच्या रीती अगदी बदलल्याशिवाय या देशाचे हित होणार नाही व या लोकांस स्वतः राज्य चालविण्याचे सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशातून गेले तरी उपयोग होणार नाही. पुन्हा गर्दी होईल व बेबंदी, अंदाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय राहणार नाही. जो जबरदस्त त्याचे हाती सर्व जाईल व जो निर्बल असेल तो उपाशी मरेल. सर्व त्याचे हरण होईल.

यास्तव सूज्ञांनी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करू नये. याप्रमाणे सरकार व याप्रमाणे चांगले सुधारलेले लोक हिंदू लोकांस सोबतीस कदापि मिळणार नाहीत. इंग्रजांचे गुण पाहून हे लोक केही तरी शिकतील; परंतु याचे दरम्यान इंग्रज लोक हिंदू लोकांस अगदी भिकारी करू लागले, तरी इंग्रज सरकारशी भांडून ज्या ज्या कायदेशीर तजविजी आहेत, त्या करीत जाव्या. जसे मोठ्या चाकऱ्या हिंदू लोकांस देत नाहीत व हिंदू लोकांशी बहुत भेद ठेवतात. हे मोडण्याचा यत्न केला असता प्राप्त होईल. आणि भेद मोडतील हे साध्य आहे. परंतु अगदी इंग्रजांचे राज्य जाऊन हिंदूचे होणे म्हटले म्हणजे पुनरपि हिंदू लोकांस मूर्ख करणे आहे. अस्तु.

हे ईश्वरही करणार नाहीच. कारण की, अशा अघटित घटना होणे त्या माणसांच्या कृतीने होत नाहीत; ईश्वरसत्तेने होतात. जेव्हा हिंदू लोकांचा मूर्खपणा जाईल तेव्हा ईश्वर इंग्रजास या देशातून जाण्याची आज्ञा करील. जेव्हा ज्वर जातो तेव्हाच मुखास रुची येते. असा प्रकृतीचा स्वभाव आहे. ही गोष्ट त्वरित सिद्धीस जाणार नाही. हिंदू लोक आज आंधळे आहेत. ते डोळस व्हावयास काय उपाय करावे ? हे कळविणे योग्य आहे. असे जाणून हिंदू लोक जे आपले स्वदेशीय परमप्रिय होत, त्यांस मी उपदेश करतो. हा त्यांनी लक्षात आणावा. माझी निश्चयरूप खात्री आहे की, असे लोक झाल्याशिवाय हे लोक कदापि सुधारणार नाहीत.

हे कोणते म्हणाल, तर प्रथम ज्ञान मिळविणे. ते ज्ञान कोणते, वेदांचे ज्ञान नव्हे. स्वधर्मसंबंधी जी पुस्तके आहेत, त्यातील सारांश व जो बोध साधुसंत इत्यादी लोकांनी सारासार विचार करून सांगितला आहे. त्यावरून ईश्वराची दृढ भक्ती व पवित्र अंतःकरणाने ध्यान करावे. हे ज्ञान प्रथम पाहिजे. हे या लोकांस नाही. कोणी ढोंगाने देवपूजेची भांडी मांडून सकाळी प्रहरभर पूजा करीत बसतो; परंतु देवाविषयी त्यांस लेशभर ज्ञान असेल तर शपथ ! अंतःकरण पवित्र नाही, नीती नाही. केवळ ढोंगी गारुड्याचे जसे पेटारे असतात, तद्वत् ते संबळ्या मांडून बसतात, तर असा प्रहर दोन प्रहर बसून वेळ घालवला, तर उपयोग काय ? त्यात ईश्वराची पूजाही झाली नाही, उद्योगही झाला नाही. केवळ तो आयुष्याचा वेळ व्यर्थ मेला असे जाणावे.

हिंदू लोक हे धर्म म्हणून किती उपद्व्याप करतात, याचा ठिकाण नाही, कोणी जन्मापासून लुच्चा, लबाड, नित्य घरे बुडविणारा व खोटी शपथ करणारा असतो; परंतु सकाळी उठून बागेत जाऊन स्वहस्ताने तुळशी तोडून नेमाने आणतो. हा नेम कधी टळत नाही. तसे अग्निहोत्री हे नाना प्रकारच्या खटपटी करतात. विस्तव पेटवून त्याचे आराधनेत वेळ घालवितात; परंतु त्यांचे अंतःकरणाची शुद्धता नसते, व त्यांस नीती नसते. त्यांचे आयुष्य केवळ कर्मठपणात जाते. यास्तव त्यांच्याने दुसरा काही उपयोग घडत नाही. यांस एक आणि दोन किती म्हणून पुसले, तर तीन समजत नाहीत. व्यवहारातील त्यांस गम्य नसते. लोक त्यांस पवित्र समजतात आणि पैसा देतात; म्हणून त्यांचे रक्षण होते. नाही तर ते कशाचे उपयोगी नाहीत. लोकांस उपयोगी त्यांच्याने काही व्हावयाचे नाही.

असेच भट व शास्त्री हे तर महामूर्ख होत. गोंधळी बरे, पण शास्त्री अधिक मूर्ख. त्यांस लिहिता येत नाही; वाचता येत नाही; व्यवहार कळत

नाही वा हिशेब समजत नाही. कोणी पुसले की, तुम्ही जन्मापासून केले काय ? तर ते म्हणतात की, कृष्णातीरी अमक्याचे घरी जेवणाची सोय होती, तेथे जेवीत होतो व आता बारा वर्षे अधयन करून तयार झालो आहे. कोणाशीही वाद करू, पोथ्या सर्व पाठ आहेत; साठ हजार कौमुदी अवगत आहे. उपस्थिती चांगली आहे. याप्रमाणे हे एवढाले मोठे पंडित असतात; पण त्यांस यत्किंचित ज्ञान नसते. त्याजकडे काही कारभार सांगा आणि मग त्यांचा चमत्कार पहा की, ते किती भितील, किती गोष्टी लोकांस पुसतील! त्यांस लिहिणार दुसरा पाहिजे, हिशेब करता येत नाही, स्वतः बुद्धी नाही, शहाणपण नाही, कोणत्याही कामाच्या उपयोगी ते पडत नाहीत.

जसे जन्मास आले म्हणजे अज्ञान, तसेच ज्ञान असून स्वतः उपजीविका मिळविण्याचे सामर्थ्य नाही. त्यांस कोणी असा श्रीमंत पाहिजे की, नेहमी पाचशे रुपये घरी पोचवील आणि शालजोड्या देईल. असो. असा मान करून कोणी त्यांस जवळ ठेवले, म्हणजे मग शास्त्रीबाबा बहुत शोभतात. परंतु श्रीमंताचा आसरा नसू द्या, म्हणजे मग त्यांची काय अवस्था होईल ती पहा. हे काय करतील? यांस काही व्यवहारी विद्या येतच नाही. व्यापारधंदा काही कळत नाही व कायदाकानू काही माहीत नाही. असे गोळे असतात. अशा लोकांचे तुम्ही काय कराल ?

बरे, लोकांस उपदेश करण्यास योग्य म्हणावे, तर तेही नाही. त्यांचे हातून चांगला उपदेश व्हावयाचा नाही व धर्माची सुधारणा व्हावयाची नाही. केवळ उकिरड्याचा ढीग आणि त्यांचे पटणे सारखे आहे. मला कोणी तरी दाखवावे की, शास्त्र्यांचा अमुक उपयोग आहे. काही दिसत नाही. ज्या देशात असे लोक मूर्खशिरोमणी आहेत, तेथे दरिद्र, कुनीति, अज्ञान, मूर्खपणा हेच वृद्धिंगत होत जातील. व हल्लीचे गृहस्थ जे आहेत, ते बदलून दुसरे प्रकारचे झाले पाहिजेत. यांच्या आधारावर हे सर्व मूर्खपणा वाढवितात. सरकारचा आसरा आता नाही; परंतु रयतेचा खुशीचा आसरा अजून फार आहे. तो देऊ नये असे या गृहस्थांस कळले पाहिजे.

कोणी गृहस्थ एका भटापासून एक चंडी म्हणवितो, आणि त्यांस रुपया देतो. कोणी गृहस्थ शास्त्र्याचे बोलणे करवितो व त्यांस शालजोडी देतो व कोणी अग्निहोत्र्यास इनाम देतो. याप्रमाणे देऊन निरुपयोगी माणसे वृद्धिंगत करतात. हेच देणे उपयोगास लागले, तर किती फायदा होईल ? द्रव्यवान असेल त्याने आपले द्रव्य नदीत टाकले, तरी तो व्ययच झाला व व्यापारात ठेविले किंवा धर्म केला, तरीही व्ययच झाला; परंतु चांगले कोणते, याचा विचार

करावा. एक लबाड कांबळेबाबा म्हणून उत्पन्न झाला. त्याने चार लुच्चे जमा करून ढोंग उभे केले. ते मुळी पुण्यात उभे केले. त्याचे मूळ प्रसिद्ध आहे व त्या बाबाचे दुराचरणही प्रसिद्ध आहे. तो चार मजूरदार उभे करून ढोलकी, झांज, वीणा वाजवीत लोकांची कानठळे बसवीत तो पुण्यात ओरडत फिरे. याप्रमाणे तो लबाड ढोंगी सर्वांस ठाऊक असून त्यांस पैका मिळाला. व लोक त्याचे आचरण न पाहता, व त्याने आपली स्त्री त्यागिली व आणखी किती लबाड्या केल्या, त्या मनात न आणता त्याचे पायावर डोकी ठेवतात, त्यास पैसा देतात व फुले घालितात. हे तमाशे पुण्यातील सर्व लोकांस माहीत आहेत. जसे तमाशाचे फडावर लोक मिळतात, तसे या बाबाचे भोवते तुळशीबागेत लोक जमत आणि त्याची कोणी थट्टा करीत; परंतु भजन करणारे शेकडो होते. म्हणून त्यांस द्रव्य मिळाले. तो बाबा बडोद्यास गेला व मुंबईस गेला; परंतु त्याने द्रव्यच मिळविले. कोठे भिकारी झाला नाही. तस्मात् सर्व ठिकाणी हिंदू लोक सारखे मूर्ख आहेत.

म्हणून धर्म कोणास कळत नाही. ईश्वराचे भय कोणाचे मनात नाही. परधर्म त्यांस वाईट वाटतो; परंतु एक चमत्कार पहा की, जो प्रथम स्वधर्म टाकून दुसरा धर्म घेतो, त्याची हेळणा फार होते. जो मूळचा परधर्मी किंवा दोन चार पिढ्यांचा आहे, त्याचे द्वेष लोक करीत नाहीत. याचे कारण की लोकांस धर्माचा द्वेष येत नाही; परंतु चाल व जात मोडण्याचा येतो. धर्म कसा काय हे ते जाणत नाहीत. रूढी जाणतात. व त्या रूढीविरुद्ध जे चालतात, सर्वांस शहाणपण येऊन ते धर्मात्मे झाले पाहिजेत.

नीती, ज्ञान विस्तीर्णतेने लोकामध्ये प्रसिद्ध झाले पाहिजे. व ढोंगी लोक नाहीसे झाले पाहिजेत. वरती उदाहरण एकच लिहिले आहे. परंतु असे किती एक ढोंगी लोक या हिंदुस्थानात फिरून गृहस्थांचा पैसा खात आहेत त्यांचा उपयोग काही नाही. हे लोक कमी होऊन, वास्तविक विद्वान वाढून ते आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांस करतील व जे लोकांची नीती, व धर्म व सदाचरण वृद्धी करण्याचा प्रयत्न करतील, त्यांस मात्र लोकांनी द्रव्य देऊन त्यांचे चालवावे.

असे न करतील, तर मग त्यापेक्षा मजुरी करणारे बरे. ते आपल्या पोटास मिळवून खातात. परंतु असे लोक फुकट खावयास योग्य नाहीत. जे उगेच ढोंग माजवून बसतील आणि लोकांस सांगतील की, आम्ही देवाजवळ पारायण केले, आम्ही उपास केले. आम्ही प्रदक्षिणा घातल्या. आम्ही नवस केला. आम्ही तपश्चर्या केली. आम्ही पंढरपुरी राहतो, आम्ही आळंदीस राहतो, व आम्ही यात्रा करतो; तर या लोकांस देण्याचा संबंध काय ?

एकाने पंचविसावे वर्षी संन्यास घेतला आणि मग यात्रा करण्याकरिता पैसा मिळविला. मला वाटते की, हा मूर्ख संन्यासी आहे. याला रोजगाराने पैसा मिळविण्याचा टाकून संन्याशी व्हावयास कोणी सांगितले ? बरे, संन्यासी झाला, तर मग भीक मागत का फिरावे ? तसेच यात्रेकरू, तसेच लग्ने करण्याकरिता पैसा मागणारे, हे सर्व लोक बेवकूब आहेत. हे सर्व उद्योग करून पोट भरतील तर चांगले व गृहस्थांनी असा विचार द्रव्ये करून कदापि वृद्धिंगत करू नये.

मला मोठा चमत्कार वाटतो की, एक मनुष्य येतो आणि म्हणतो - माझे लग्न व्हावयाचे आहे; मला दोनशे रुपयांचे साहित्य पाहिजे. ज्या मनुष्यास साहित्य नाही; तो लग्न करतो कशास ? तसेच बैरागी शंभर आसामींचा मेळा घेऊन फिरतात. ते सगळे जर चाकरी ठेविले, तर एक रिजमिंट चांगले भरेल, असे ज्वान बळकट असतात, आणि म्हणतात की, आम्ही यात्रा करीत फिरतो व त्यांस लोक पैसा देतात. पण ही ढोंगे मोडून सर्व लोकांस शुद्धीवर आणले पाहिजे. तसेच विद्वान जे लोक आहेत, त्यांनी स्वदेशाचे व्यवहार, रोजगार व द्रव्य यांची वृद्धी कशाने होईल ? जगात वर्तमान काय चालले आहे ? लोकांची दशा काय झाली आहे ? याचा विचार केला पाहिजे. केवळ व्याकरण पढून जन्म घालवून उपयोग नाही. ही रीत मोडेल, तेव्हा या देशाची सुधारणा होईल, हे सत्य आहे.

## इंग्रज सरकार

■

**पत्र नंबर ९४**

इंग्रज सरकार या देशात आहेत, याविषयी लोक उघड नाही, तरी मनातले मनात कुरकुर पुष्कळ करतात व मुख्यत्वेकरून भट, पंडित, शास्त्री हे तर फार हैराण आहेत; परंतु माझे मत असे आहे की, या देशास हेच सरकार ठीक आहे.

प्रथम असे पहा की, मागले सरकार किती वाईट व मूर्ख होते. जिकडे-तिकडे जुलूम होत होता. हे हल्ली जे इंग्रज सरकारचे पदरी मराठे अंमलदार आहेत, त्यांची वर्तणूक कशी आहे, हे पाहिले म्हणजे ध्यानात येते.

याच प्रकारचे मागे सर्व लोक होते. त्यांनी देशाची सुधारणा व विद्यावृद्धी काहीच केली नाही. फक्त भट, वैदिक व मूर्ख लोकांचे पोषण करून रक्षिले. तसेच पेंढारी, रामोशी, काटक, डाकवदे, ठक, चोर इत्यादिकांस राखिले आणि देशात लूटसांड पुष्कळ करीत.

होळकर स्वतः श्रीमंताचा चाकर असता त्याने पुणे लुटिले, व लोकांचे हाल केले. अशा सरकारास कोण चांगले म्हणेल? जो बळकट असेल, तो मात्र पोटभर खाई. पाहिजे त्याने शेतभात, गांवघर लुटावे; दादफिर्याद कोठे लागत नव्हती. हल्ली हैदराबाद, ग्वाल्हेर येथे वर्तमान काय आहे ते पहा, म्हणजे मागील राजाचे सर्व लक्षात येईल.

तेव्हा मागील राज्य अगदी वाईट होते हे सिद्ध आहे. याशिवाय हल्ली आमचे लोकांस राज्य मिळाले तर तीच अवस्था करतील. तेव्हा हेही उपयोगी नाही. बरे, दुसरे देशचे लोक मोगल, फराशीस वगैरे आले, तर तेही वाईट लोक आहेत. यास्तव इंग्रज हेच सुधारलेले चांगले लोक आहेत. यांचे राज्य या देशात आहे, हेच चांगले. व ईश्वराने हे आम्हास चांगले राजे दिले आहेत. हे खचित दिसते. याहून चांगले राजे आम्हास कदापि मिळणार नाहीत. याशिवाय हे सरकार लोकांची सुधारणा करण्याकरता अत्यंत मेहनत करीत आहे. त्यांस विद्या शिकविते. तीही कशा रीतीने शिकविते की लोकांत तर जुलूम वाटू नये.

त्यांची देवस्थाने वगैरे सर्व कायम पहिल्यप्रमाणे ठेवून त्यांची मर्जी राखून, त्यांस वाईट न वाटता शिकविण्याची तजवीज चालविली आहे. इतक्या युक्तिप्रयुक्तीने कदापि कोणी राजा या लोकांस शहाणा करणारा होणार नाही. इंग्रज लोक अत्यंत सुधारलेले म्हणून या रीतीने त्यांनी विद्यावृद्धीचे व लोकसुधारणेचे व त्यांच्या जुन्या मूर्ख समजुती जाण्याचे काम चालविले आहे. इतकी तजवीज कोण करील? आता येऊन जाऊन इतकेच म्हणतात की, अद्यापि ते लोकांस मोठ्या चाकऱ्या देत नाहीत; परंतु मोठी चाकरी देण्यास लायक लोक अद्यापि झाले नाहीत.

ज्या लोकांस लाच खावा हे पाप वाटत नाही, ज्यास ब्राह्मणापेक्षा कुळंब्याचा जय कमी व्हावा, असे वाटते; त्यांस विद्यावृद्धी व्हावी असे वाटत नाही, लोकांस कायदे कोणचे असावे. पहिले शास्त्र कोणत्या योग्यतेचे व पुढे कायदे कोणत्या योग्यतेचे असावे, हे समजत नाही; व कायदा राज्यास असावा, हे अवश्य आहे किंवा नाही; हे राजास कळत नाही; व आपले जातीचा अभिमान

धरावा हे वाटते, व पक्षपात करावा हे वाटते, व फौजेस कवाईत पाहिजे, हे वाटत नाही. सुधारणा काय पाहिजेत, हे माहीत नाही; व्यापारवृद्धी होण्याची रीती ठाऊक नाही; अशा लोकांस चाकरी कशी देतील ? ज्या काळी हे लोक सुधारतील, त्या वेळी खचित त्यांस मोठ्या चाकऱ्या देतील.

या लोकांस सरकार म्हणजे लोकांचा कारभार करणारे आहेत, त्यात अन्याय केले, तर सर्व लोकांचा घात होईल, हे त्यांस वाटत नाही; सरकारास लुटावे, सरकारचा पैसा खावा, सरकारचे काम जहाले तर जहाले, न जहाले तर न जहाले असे त्यांस वाटते; अशा लोकांस मोठी चाकरी काय उपयोगी ? यास्तव हे लोक सुधारल्यावर त्यांस अधिकार देण्यास कमी करणार नाहीत हे लोकांनी पक्के समजावे. याजकरिता सरकारचे कृपेस पात्र होण्याची इच्छा मात्र धरावी.

परंतु सांप्रत काळी लोक अगदी उलटे करीत आहेत. लाच खातात, लबाड्या करतात, विद्यावृद्धीस मदत करीत नाहीत; सर्व सरकारने करावे, असे इच्छितात. व जर सरकार चांगले करीत असेल तर वाईट समजतात, व सरकारास लोक सुधारण्याचे कामात अगदी मदत करीत नाहीत. सरकारने आज जर असे म्हटले की, अनुष्ठानाचा व अमुक देवस्थानाचा खर्च व्यर्थ होत आहे. तो मोडून अमुक विद्यावृद्धीचे काम करितो, तर लोकांस पसंत होणार नाही. दक्षणा पहिली मूर्ख रीतीने देत होते, तिचा काहीच उपयोग नव्हता. तेच रुपये जर नीट खर्च केले, तर बहुत उपयोग होऊन लोक शहाणे होतील; परंतु असे जर केले, तर लोक खुषी नाहीत.

लोकांस असे वाटते की, पहिला मूर्खपणा कायम ठेवावा; आळशीपणाचे स्वभाव कायम ठेवावे. म्हणजे ते सरकार चांगले, परंतु लोकांनी या दुर्बुद्धी सोडून देऊन सरकारास हरएक कामात मदत करावी, हे योग्य. म्हणजे सरकारास आनंद होतो आणि त्याचे हातून सुधारणा पुरतेपणी होते. हल्ली फार तर काय परंतु जेथे म्हणून सरकारी शाळा आहेत, तेथे लोकांच्या कमिट्या आहेत, परंतु त्या पंचांस पुसले तर कदी त्यांनी शाळा पाहिली नाही, असे सांगतील व शाळा आहे किंवा नाही, याविषयी संशयात्मक बोलतील. जे सुपरिंटेंडेंट येतात, त्यांस पंचांस शोधावे लागते व बळेच परीक्षेचे दिवशी उभे करतात, ते मनापासून मेहनत करीत नाहीत.

कोणी जर सरकारी कामदार असला, तर त्यांस सरकारी काम विशेष

नसले, तरी तेच ओझे वाटते व दुसरे काम करावयास कंटाळा येतो. जर कामदार तरुण असला, तर लबाडीचे कामात, नाच तमाशात रात्रंदिवस काळ घालवितो. त्याच्याने सरकारी काम देखील चित्त घालून करवत नाही, मग शिवाय काम होणार कोठून? व जर तो म्हातारा जुना कपी असला, तर त्यांस सरकारी काम आटपून घरी जाऊन स्नानसंध्येत संध्याकाळी व प्रहरभर सकाळी गोष्टी सांगत देवतार्चन पुढे मांडून बसावे लागते. त्यांस सरकारी कामाशिवाय दुसरे काम पाहणे व शाळा पाहणे, हे तर असे वाटते की, व्यर्थ काळ गेला. यात धर्म नाही, पुण्य नाही, देवपूजाही नाही. तेव्हा कशास करा?

देवपूजा प्रहरभर केली, म्हणजे चार भिक्षुक वगैरे मूर्ख येतात, ते म्हणतात की, 'वाहवा! दादासाहेब मोठे भक्तिवान, पुण्यशील. दोन प्रहर स्नानसंध्येत घालवितात व सरकारी काम संभाळून नित्य नेमाने हे चालवितात.' अशी स्तुती करतात. ती गोष्ट लागून त्याला शाळा पाहण्याचे मोठे संकट पडते.

याप्रमाणे लोकांचे उदासीन स्वभाव आहेत. विद्यावृद्धीविषयी व शिवाय किती एक दुसरे प्रकरणांत असेच आहे. सरकारास मदत मिळत नाही. यास्तव सरकारचा उपाय नाही. तर हे स्वभाव लोकांनी सोडले पाहिजेत.

## डौल व नेटिव राजे

■

**पत्र नंबर ९८**

आमचे लोकांची बुद्धी अद्यापि सुधारली नाही. याजमुळे त्यांस अद्यापि असे वाटत नाही की, आम्ही मूर्ख आहो.

इंग्रज वगैरे युरोपियन आपणास केवळ मूर्ख म्हणतात व आम्हास दुसऱ्यापासून बुद्धी शिकोन घेतली पाहिजे. एखादा सरदार याचा डौल पाहिला, म्हणजे त्यांस असे वाटते की, वाहवा, हा मोठा सरदार, याचा डौल फार, हा थोर. परंतु त्याची योग्यता व गुण पहात नाहीत. फक्त त्याचे सोनेरूपे पाहून त्यांस चांगला म्हणतात. गाईकवाड यांचा डौल पाहून सर्व लोक म्हणतात की, पहा यांची गजान्त लक्ष्मी, आणि इंग्रज हे भिकारी. यांस स्वारी नको,

चोपदार, हत्ती, उंट काही नको. असे म्हणतात.

पण कोणी असे मनात आणीत नाही की, या डौलाचा काही उपयोग नाही. इंग्रज लोक डौलाची गरज ठेवीत नाहीत; फक्त कामाची गरज ठेवतात. बरे, निरुपयोगी डौल लोकांस दाखवावयास बाळगत नाहीत. दहाच माणसे बाळगतात; परंतु चांगली, सर्व उपयोगी पडावी अशा रीतीची बाळगतात; परंतु आमचे राजे डौली त्यांस आम्ही थोर, हे स्वारी मोठी करून दाखवावयाचे असते; परंतु पराक्रमहीन, गुणहीन, त्यांस कोणी पुसत नाही. गोंधळी व ते बराबर. याजमुळे ते दहाशांच्या खर्चांत ५० माणसे बाळगतात; परंतु ते काही उपयोगी पडावयाचे नाहीत. असे असतानाही देशातील आळशी लोक त्यांस चांगले म्हणतात. हे केवढे आश्चर्य आहे!

कोणास हा विचार कळत नाही की, हे गोंधळी, वऱ्हाडी, दिसतात चांगले; सोने; रुपे, हिरे यांचे दागिने अंगावर घालून नटतात व सजतात, परंतु त्यांच्या तोंडात कोणी मारली, तर त्यांचा हातदेखील वर होत नाही. इतके अज्ञानी व अशक्त असतात. मग त्यांचा उपयोग काय? याजकरिता हा डौल काही उपयोगी नाही. राजाने जितका लोकांच्या रक्षणार्थ खर्च लागेल. तितकाच करावा. अधिक केला, तर तो दोषी व चोर होतो; परंतु ही गोष्ट राजे मनात आणीत नाहीत. आणि राज्य हाती लागताच लोकांची गरज सोडून देतात आणि मनास येईल तसे उडवितात. त्यांस त्याची लाज वाटत नाही. याजकरिता डौलाची प्रीती अगदी करू नये तर बरे.

फौज पाहिजे व उपयोगाच्या सर्व गोष्टी पाहिजेत. तसेच आमचे लोक धर्म करणे, तोही उपयोग मनात आणून करीत नाहीत, याजमुळे बहुत पैसा व्यर्थ जातो; परंतु लोक असे मूर्ख आहेत की, जो मनुष्य अशी पैशाची उडव करितो, त्यांस चांगले म्हणतात व आळशी लोकांचे पोषण व निरुपयोगी व्यय पाहिला, म्हणजे त्यांस चांगले म्हणतात. अशा गोष्टीस चांगल्या म्हणणारांत प्रमुख कसबिणी आणि भट आहेत. हे लोक बहुत लोकांस वेडे करतात. पैशाची उधळपट्टी जितकी होईल, तितकी त्यांस हितावह आहे, म्हणून उत्तेजन देऊन उधळपट्टी करतात; मग त्यात जरी मोठाले अनर्थ झाले, तरी चिंता नाही; परंतु आपले पोट भरले, म्हणे झाले. कदाचित म्हणतात, त्याने इतका अन्याय केला; परंतु ब्राह्मणभक्त व ब्राह्मणाचे घरात सर्व पैका घातला. तस्मात् तो पुण्यवान प्राणी आहे.

याजमुळे जो आता लोकांमध्ये संभावितपणे वागतो, त्यांस मुख्य गोष्ट ही करावी लागते की, भटांची मर्जी राखिली पाहिजे. भटास देणे हे मोठे

लौकिकाचे धोरण आहे. जरी कोणास असे वाटले की, भटास देणे निरुपयोगी आहे. तरी त्याचा उपाय नाही. ही लौकिकाची गोष्ट आहे. जर भटास दिले, तर लौकिक होतो. ‘धर्मात्मा धर्मात्मा’ म्हणून भट उठवितात; नाही तर निंदा करतात. गाईकवाडास म्हणतात की, तेरा हजार रुपये इंग्रजी शाळेस दिले, ते भटास देते, तर बरे होते. धर्म करावयाचा टाकून शाळेस पैसा कशास दिला ? असे म्हणतात. तात्पर्य, शाळा घालणे, विद्या वाढविणे हे त्यांस धर्मकृत्य वाटत नाही. टोणपे भटास लौकिकाकरिता देतात, त्यांस धर्म म्हणतात.

याजमुळे असे सिद्ध होते की, ब्राह्मण आपले पोट भरावयाचे मात्र उद्योगात असतात. काही उपयोगी काम न करिता व विद्या न करिता फक्त शास्त्रीबुवा, मोठे थोर, म्हणून बसल्या जाग्यावर जो देईल तो धर्म, असे समजतात. शाळा घालणे हा धर्म त्यांस वाटतच नाही. हा केवढा चमत्कार आहे ? प्रथम त्यांस असे वाटते की, शिकावयाचे काही राहिलेच नाही. संहिता पाठ म्हणतो, आता विद्या शिकावयाची राहिली काय ? असे वाटून त्याशिवाय विद्या शिकविण्यास कोणी पैसा देईल, तर त्यांस दुःख वाटते. आणि व्यर्थ पैसा टाकला असे वाटते.

परंतु या मूर्खांस असे कळत नाही की, पाठ म्हणणे व अक्षरे तीन तीन वेळा उलटसुलट म्हणणे ही विद्या नव्हे, हा मूर्खपणा आहे. यास्तव असा मूर्खपणा वाढविणारे, त्यांस द्रव्य देऊन पाठ म्हणणारे मात्र पढविले, असे होईल. नवीन विद्या काय शिकविली, नवीन इतिहास त्यांस काय कळला व लोकातील दुर्गुण त्यांनी कोणता कमी केला, नवीन शोध त्यांनी काय लाविले, हे पहावे. फक्त जेथे राहतील तेथे पुष्कळ श्राद्धे करवतील; क्षीर व दक्षणा मिळवतील. एवढा मात्र या विद्वानांचा उपयोग आहे. हे विद्वान कसे, हे कोणी विचार करून पहात नाही.

जे फक्त पाठ म्हणविणारे, अक्षरशत्रू, अर्थ काही कळत नाही, धड व्यवहारप्रकरणी बोलता येत नाही, त्यापासून राज्याचे विचार व लोकांस चांगल्या रीतिभाती व शहाणपण लावणे कसे होईल ? मूर्ख कुळंबी, शेतभात करणारे व बिगारी याहूनही निरुपयोगी भट आहेत, त्यांस विद्वान म्हणतात. आणि असली विद्या वाढावी, म्हणून इच्छितात, ही चूक आहे. आजपर्यंत ही विद्या वाढून लोकांची घरे बुडाली. इंग्रज लोक इकडे येऊन आम्हास शिकवू लागले, आम्हास शहाणपण नाहीसे झाले; आम्हास काही ठाऊक नाही, हे भटाचे विद्येचे परिणाम झाले. जर हे लोक खरी विद्या म्हणजे ज्ञानाचा शोध करावयाचा तो करिते, तर इंग्रज इकडे येण्याचे पूर्वी आम्हीच त्यांचे देशात का गेलो नसतो ?

परंतु त्यांचे देशाची वार्तादिखील इकडे ठाऊक नाही. मग जाणार कोठून? वास्तविक विद्या काय ती त्यांस कळत नाही व पुढे पाऊलही टाकीत नाहीत. आपसांत रडत बसतात; परंतु विचार कोणीच करीत नाहीत. लग्नाचे आमंत्रण केले, तर पाचशे लोक येऊन चार घटका येऊन बसतील; परंतु विचाराचे सभेस जमावयाचे असेल तर एकही येणार नाही व एकाच्यानेही भाषण व विचार सयुक्त होणार नाही.

असे हे लोक निर्बल व वेडे झाले. मग त्यांच्या तोंडात प्रथम मुसलमानांनी मारली. नंतर इंग्रजांनी मारली, याचे आश्चर्य काय आहे? त्यांच्याने आपले रक्षण होईना, उगेच बसवेना, आपसांत भांडू लागले. चोऱ्या, दरोडे घालू लागले. रोज स्वतः दरोडे घालू लागले. तेव्हा त्यांचे पारिपत्य करण्याकरिता इंग्रज यांची योजना ईश्वराकडून ये देशात झाली, हे सर्वोत्कृष्ट आहे. लोकांनी असे जाणावे की, हे लोक आम्हास उत्तम गुण व चांगल्या नीती व विचार व विद्या देऊन जातील यात संशय नाही.

टीपा

## १. विद्या

**पृष्ठ ६६ : बुधवारचे वाड्यातील इंग्रजी शाळा**

१८२१ साली पुण्यात विश्रामबागवाड्यात 'संस्कृत पाठशाळा' सुरू करण्यात आली. तिला १८४२ साली इंग्रजीच्या वर्गाची जोड देऊन तिचे रूपांतर इंग्रजी शाळेत करण्यात आले. त्या आधी १० वर्षे सरकारने पुण्यात वेगळी इंग्रजी शाळा काढली. ही शाळा बुधवारवाड्यात होती.

**पृष्ठ ६६ : त्या ठिकाणी... लायब्ररी सुरू झाली**

७ फेब्रुवारी १८४८ रोजी बुधवारवाड्यात 'पुणे नेटिव्ह जनरल लायब्ररी'ची स्थापना केली गेली. दक्षिणेतील सरदारांचे एजंट जे. वार्डन यांची या स्थापनेमागे प्रेरणा होती, तर लोकहितवादी, मोरो रघुनाथ ढमढेरे, आबासाहेब पटवर्धन, पदमनजी पेस्तनजी इत्यादी मंडळींचा स्थापनाकार्यात पुढाकार होता.

**पृष्ठ ६७ : अज्ञान दूर होण्याचा उपाय पुण्यातच केला असे नाही**

जितांवर केवळ सत्ता चालवावी असे इंग्रजांना कधीच वाटले नाही. आपण सत्ता गाजवीत आहोत त्या समाजाचा अभ्यास करावा आणि आपल्या ज्ञानाचा फायदा इतरांना द्यावा, अशी प्रेरणा मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या व इतरांच्याही मनात निर्माण व्हावी, अशी धडपड मॅकिंटॉश, एल्फिन्स्टन, माल्कम यांच्यासारख्या इंग्रज अधिकाऱ्यांनी मोठ्या कसोशीने केली. या धडपडीतून 'लिटररी सोसायटी' सारख्या संस्था जन्माला आल्या. पुण्यातील लायब्ररीची स्थापना यातूनच झाली. आणि इ.स.१८३८ मध्ये अहमदनगर येथे वाचनालय सुरू झाले तेही अधिकाऱ्यांच्या ज्ञानप्रसारक प्रयत्नांमुळेच होय.

**पृष्ठ ६८ : बाजीराव पेशव्यांचे अंमलात**

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत अपराध्यांना अत्यंत अमानुषपणे वागविले जात असे व कमालीच्या क्रूर शिक्षा केल्या जात असत. घाशीराम

कोतवालाला बाजीरावाने लोकांच्याच स्वाधीन केले व वाटेल ते शासन करण्यास मोकळीक दिली, असे इतिहासावरून समजते. घाशीरामाला लोकांनी हालहाल करून मारले अशी इतिहासाची साक्ष आहे. खुद्द बाजीरावाने विठोजी होळकरास हत्तीच्या पायाखाली मारले, हे ऐतिहासिक सत्य आहे. (अधिक माहितीसाठी 'महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना' हे डॉ. रा. शं. वाळिंबे यांचे पुस्तक पहा. पृष्ठे १७, १८, २०)

**पृष्ठ ७० : बाजीराव पेशवे यांचे अपराध**

कमालीची भोगलोलुपता हेच दुसऱ्या बाजीरावाच्या वृत्तीतील महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. बायकांच्या मेळाव्यात घुटमळत राहणे हेच त्याच्या जीवनाचे सार होते. आपल्या सुखात कसलाही व्यत्यय येऊ नये, यासाठीच त्याचा सतत आटापिटा चाललेला असावयाचा, त्याच्या सुखाच्या आड कोणी आले तर त्याच्या मनात नेहमी दंश राहत असे आणि त्याचे तळपट करण्याच्या बाबतीत वाटेल ते कृत्य करण्यास त्याला दिक्कत वाटत नसे. १८०१ साली माधवराव रास्त्यांना विश्वासघाताने अटक करून त्याने रायगड येथे डांबून ठेवले, यावरून हेच दिसते. बाजीरावाचे चारित्र्य हे असले असल्यामुळे राज्याचा बंदोबस्त, न्यायदान, शिक्षण या बाबतीत त्याचे पूर्ण दुर्लक्ष झाले.

**पृष्ठ ७३ : पूर्वी इंग्रज.. याहूनही मूर्ख होते**

रोमनांच्या अंमलात, इसवी सनाच्या पाचव्या शतकापर्यंत, इंग्रज लोक रानटी अवस्थेतच होते. रोमनांच्या पकडीतून मोकळीक मिळेपर्यंत इंग्लंड संस्कृतीच्या अगदी खालच्या पायरीवर होते.

**पृष्ठ ७४ : हिंदुस्थानातील लोक दोन हजार वर्षांपूर्वी मोठे पराक्रमी होते**

लोकहितवादींच्या एकूण लिखाणातील सुरावरून असे वाटते की, फार वर्षांपूर्वी हिंदुस्थानातील लोक मोठे पराक्रमी होते, असे त्यांना तेथे सुचवावयाचे असावे; पण १०व्या शतकाच्या अखेरीपर्यंतही हिंदुस्थानातील लोक पराक्रम करीत होते. गुप्तांच्या अमदानीत सुवर्णयुग निर्माण झाले होते. राजकारण, अर्थकारण, शास्त्र, साहित्य, कला अशा अनेक क्षेत्रांत मानवी प्रज्ञेचे व प्रतिभेचे मुक्त आविष्कार सतत होत होते, हे ऐतिहासिक सत्य आहे. अर्थात् हे लोकहितवादींसारख्या इतिहासाच्या व्यासंगी व्यक्तीला विदित नसेल असे म्हणता येणार नाही, तथापि उपरिनिर्दिष्ट विधानातील 'दोन हजार' या शब्दांवरून

काहीसा गैरसमज होण्याचा संभव असल्यामुळे येथे हा खुलासा करणे अवश्य वाटते.

**पृष्ठ ८७ : शिकंदर बादशहास जो गुरू होता**

शिकंदर- ख्रि. पू. ३५५-३२३. हा मॅसिडोनियाचा राजा दुसरा फिलिप व एपिरोटची राजकन्या ऑलिंपियस यांचा मुलगा. ॲरिस्टॉटल हा त्याचा गुरू. त्याच्याविषयीची दंतकथा लोकहितवादींनी प्रस्तुत स्थळी उल्लेखिली आहे.

**पृष्ठ १०० : निर्णयसिंधू, मनोरमा, कौमुदी इत्यादिक ग्रंथ**

निर्णयसिंधू हा एक प्रसिद्ध धर्मग्रंथ, यात अनेक धर्मविषयक व आचारविषयक नियमांची चर्चा केली असून निर्णयविवेकही केला आहे. मनोरमा, कौमुदी हे असेच वेगवेगळ्या विषयांवरील प्राचीन ग्रंथ. ‘मनोरमा’ या ग्रंथात शांकरभाष्यावर टीका लिहिण्यात आली आहे, तर कौमुदी या ग्रंथात व्याकरणाशास्त्राचे विवेचन केले आहे.

**पृष्ठ १०२ : अहिल्याबाईने सोळा कोट रुपये धर्मादाय केला**

मल्हारराव होळकरांनी आपली पत्नी गौतमाबाई हिच्या नावे ठेवलेली रक्कम तिच्या पश्चात अहिल्याबाईस मिळाली. अन्नदान, वस्त्रदान, विहिरी खोदणे, तळी बांधणे, घाट बांधणे या कामांत आपल्या जवळील रकमेचा व्यय तिने केला. प्रजेचे किंवा सरकारचे द्रव्य या कामी तिने मुळीच वापरले नाही.

**पृष्ठ १०८ : बाजीरावासारखे मनास येईल तसे द्रव्य**

दुसऱ्या बाजीरावाने मन मानेल तसे द्रव्य ब्राह्मणास वाटले. या बाबतीतील रियासतकार सरदेसायांनी दिलेली माहिती लक्षात घेण्याजोगी आहे. श्रीमंतास देण्याचा सुमार नाही. इ.स. १७९७च्या श्रावणमासात ब्राह्मण सालाबादापेक्षा जास्त आले. प्रथमदिवशी तीस हजार आले. गुदस्ता वीस हजार होते. दुसऱ्या दिवशी छत्तीस हजार शिधा पावले. शिवाय तीन हजार रिकामे आले. यंदा साठ हजारपर्यंत ब्राह्मण होईल अशी बोलवा आहे.... गेल्या वर्षी दीड लक्ष दक्षिणा होती ती यंदा दुप्पट झाली. श्रीमंतांनी आपल्या हाते दोनशे, चारशे, बाराशे, चवदाशे, दोन हजापर्यंत दक्षिणा दिली...श्रीमंतानी मोहरा, होन, पुतळ्या, रुपये, मोती वगैरे मिळून खिचडी करून वाटली...मेजवान्या, लग्ने यासाठीही असाच हजारोनी खर्च केला. (पेशवे दप्तरात याची बरीच माहिती मिळते.)

**पृष्ठ ११६ : शहाणे पुरुष एलफिन्स्टनसाहेबाप्रमाणे**

एलफिन्स्टन - माऊन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन (१७७९-१८५९) पेशव्यांच्या दरबारचा रेसिडेंट. दक्षिणेचा कमिशनर. मुंबईचा गव्हर्नर (१८१९-१८२७). हा अतिशय बुद्धिमान, धूर्त व धोरणी अधिकारी होता. 'Report on the Conquered Territories ofl the Peshwas 'हा त्याचा अहवाल वाचनीय आहे.

हेस्टिंग्ज-मार्क्विस ऑफ हेस्टिंग्ज (१७५४-१८२६) १८१३-१८२३ या काळातील हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल. पेशवाईचा शेवट याच्या कारकीर्दीत झाला.

**पृष्ठ ११६ : कोर्ट डैरेक्टर गवरनरादिक**

कोर्ट डैरेक्टर-ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाचे सभासद. धोरण ठरविण्याचे व नेमणुका करण्याचे अधिकार यास होते.

गव्हर्नर-हिंदुस्थानातील प्रमुख प्रांतांचे अधिकारी. मुंबई, कलकत्ता व मद्रास या तीन ठिकाणी हे होते. १७७३ साली रेग्युलेटिंग ॲक्टान्वये गव्हर्नरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कलकत्त्यास गव्हर्नर जनरलची योजना करण्यात आली.

**पृष्ठ १२३ : ग्रंथ करणाऱ्यास खप नाही**

इंग्रजांच्या अमदानीत सुरुवातीस नवी छापील पुस्तके लोक हाती धरण्यास तयार होत नसत. छापील ग्रंथ हा चरबीयुक्त शाईने छापलेला, तो हातात धरणे म्हणजे भ्रष्टाचार अशी समजूत याच्या मुळाशी असे. यामुळेच पुस्तके खपत नसत. हरि केशवजी यांचे एक पुस्तक ७ हजार रुपये खर्च करून छापले; पण त्याची एकही प्रत खपली नाही अशी नोंद ' Selection from Educational Record ' मध्ये मिळते. (ग्रंथ खपावे यासाठी तुपाच्या शाईत ते छापण्याचा व शाई शुद्ध आहे, असा निर्देश करण्याचा प्रयोग काही मंडळींना यामुळेच करावा लागला. या प्रयोगातून निर्माण झालेले एक ' तुपातले गुरुचरित्र ' प्रसिद्ध आहे.)

**पृष्ठ १२६ : जसे पारशी लोक... विद्यावृद्धीचे उदाहरण**

पाश्चात्त्य विद्येचे महत्त्व पारशी लोकांनी फार लवकर ओळखले आणि नव्या विद्या आत्मसात करण्यास त्वरित प्रारंभ गेला. एलफिन्स्टन, इन्स्टिट्यूशन, ग्रांट वैद्यकीय शाळा यांसारख्या शैक्षणिक संस्थांतून पारशी लोकांनी मोठ्या संख्येने आधुनिक शिक्षण घेतले. यामुळे त्यांची दृष्टी व्यापक झाली, अंगी

औदार्य बाणले; आणि मग त्यांनी सुधारणाविषयक कार्यक्रम तातडीने हाती घेतला, 'स्टुडन्टस लिटररी असोसिएशन' सारख्या संस्थेतून निबंध वाचून स्त्रीशिक्षणादी सुधारणांचा आग्रहाने पुरस्कार केला. पारशी लोकांनी औद्योगिक सुधारणांसही स्थान दिले व व्यापारात हिरिरीने भाग घेऊन कर्तृत्व दाखविले. बयरामजी कर्सेटजी, नवरोजी फर्दुनजी, दादाभाई नवरोजी, नसरवानजी वाडिया, फ्रामजी कावसजी, जमशेटजी जिजीभाई आदी व्यक्तीचें कार्य या दृष्टीने लक्षात घेण्याजोगे आहे. (अधिक माहितीसाठी पु. बा. कुलकर्णीलिखित 'नाना शंकरशेट यांचे चरित्र' पाहावे.)

**पृष्ठ १२८ : कल्याणोन्नायक मंडळी**

'पुणे पाठशाळे'चे प्रमुख मोरशास्त्री साठे यांनी मंडळीची स्थापना केली. जनमानसावर चांगले संस्कार करण्याचा व लोकमतास नवे वळण लावण्याचा हेतु या स्थापनेमागे होता, परंतु तो फारसा सफल झाला असे त्या मंडळीच्या कार्यावरून वाटत नाही, लोकहितवादींच्या दृष्टीने तर मंडळीचे कार्य अनर्थकारक ठरलेले दिसते. पृष्ठ....वरही 'कल्याणोन्नायक मंडळी'चा उल्लेख लोकहितवादींनी पुन्हा केला आहे. त्यावरूनही हेच दिसून येते

(लोकहितवादींचे म्हणणे बरोबर नसल्याचे ग. त्र्यं. माडखोलकरांनी सूचित केले आहे. पाहा - 'चिपळूणकर - काल आणि कर्तृत्व' पृ. ५१-५५)

## २. हिंदूंचे धार्मिक जीवन

**पृष्ठ १३६ : तो पंथ अलीकडे... पुणे इ. ठिकाणी बहुत चालू**

शिवाची शक्ती हीस आराध्य दैवत मानणारा पंथ तो शाक्तपंथ. जातिबंधने त्यास अमान्य. मद्य-मांस-मैथुनादी 'पंच-मकार' या पंथात फार बोकाळलेले. १८४८च्या सुमारास पुण्यामध्ये हा पंथ फार जोरात होता असे तत्कालीन 'ज्ञानप्रकाशा'तील उल्लेखावरून दिसते.

**पृष्ठ १४२ : पुराणप्रसिद्ध मुचकुन्दाप्रमाणे निद्रा करतो**

मुचकुन्द हा मांधाता राजाचा सर्वांत धाकटा मुलगा. तो फार प्रतापी होता. त्याने अवघी पृथ्वी पादाक्रान्त केली. दैत्यांशी लढणाऱ्या देवांना साह्य केले. तेव्हा देवांनी याला वर मागण्यास सांगितले. 'आपल्या निद्रेचा जो भंग करील तो जळून खाक व्हावा व त्या क्षणी आपल्याला विष्णूचे दर्शन व्हावे'

असा वर त्याने मागून घेतला... पुढे एकदा हा गुहेत झोपलेला असताना कृष्णाने आपला शेला याच्या अंगावर घातला. मागून तेथे आलेल्या दुष्ट कालयवनाने शेल्यामुळे मुचकुंदासच कृष्ण समजून त्याला लाथ मारली, तेव्हा मुचकुंद जागा झाला आणि वराप्रमाणे कालयवन जळून गेला.

**पृष्ठ १४२ : क्रिस्तियन धर्म युरोपखंडात वृद्धिंगत झाला**

पॅलेस्टाइन हे ख्रिश्चन धर्माचे मूलस्थान. तेथे रोमन लोकांचे वर्चस्व होते. त्या वेळी रोमन साम्राज्यात ख्रिश्चनांचा अतिशय छळ झाला. नीरो (इ.स. ६४), डॉमिशियन (इ.स. ८५), टॅजन आणि सम्राटांच्या अमलात व पुढे इ.स. २५० नंतर तर खिस्त्यांचा अनन्वित छळ झाला. कॉन्स्टन्टाइन (इ.स. ३१३) या सम्राटाने ख्रिश्चन धर्माकडे औदार्याने पाहिले व त्यावरील नियंत्रणे काढून टाकली. त्यानंतर इ.स. ३७९-३९५ या काळात थियोडोशियसच्या कारकीर्दीत ख्रिश्चन धर्म हा राजधर्म झाला; आणि मग तो झपाट्याने युरोपात व इतर ठिकाणी प्रसार पावला.

**पृष्ठ १४३ : इराण देशांत जरस्ताचा अग्निपूजेचा धर्म**

झरतुष्ट्र (सुमारे इ.स. पूर्वी ९ वे शतक) या पारशी धर्मसंस्थापकाचा जन्म मीडियाचे पश्चिमेस असलेल्या अट्रोपेटन या गावी झाला. याने पर्शियन लोकांना नव्या धर्माची तत्त्वे सांगितली. सत् व असत् यांच्या संघर्षात शेवट सत्याचा विजय होऊन कल्याण होते; तेव्हा अहिरिमनचे अनुयायित्व न पत्करता अहुरमज्दाचे अनुयायित्व पत्करावे. सद्‌विचार, सत्शब्द, सत्कृत्य यांच्या परिपालनाने साधुत्व येते असा त्यांच्या तत्त्वप्रतिपादनाचा आशय होता. हिंदुधर्मातील काही तत्त्वांशी ही तत्त्वे जुळती आहेत. झरतुष्ट्राचे हे प्रतिपादन 'अवेस्ता' नावाच्या धर्मग्रंथात वाचावयास मिळते.

**पृष्ठ १६० : कोणी म्हणतात शिव अधिक**

भक्तिपंथातील दोन संप्रदाय म्हणजे शैव संप्रदाय व वैष्णव संप्रदाय हे होत. शैव संप्रदाय आपल्या तत्त्वज्ञानात 'शिवा'स अग्रस्थान देतो, तर वैष्णव संप्रदाय विष्णूस मुख्य दैवत मानतो. एका काळी या दोन संप्रदायांत दैवतविरोधावरून रणे माजली. पुढे शंकराचार्यांनी पंचायतनपूजा सुरू करून दोन पंथांचा समन्वय साधण्याचा व त्यातील वैर कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

**पृष्ठ १८९ : बाजीराव राज्यावर होता तेव्हा... स्त्रिया भ्रष्ट**

दुसरा बाजीराव केवळ कलावंतिणींच्याच नादी लागलेला होता असे नव्हे, तर चांगल्या कुलीन स्त्रियांच्याही मागे लागला होता हे त्याने दिलेल्या बक्षिसांच्या नोंदीवरून दिसून येते. बायकांच्या घोळक्यात काळ घालविल्याशिवाय व रासवट विदूषकी चाळे केल्याशिवाय, इतकेच नव्हे तर किळसवाणे व्यभिचार पाहिल्याशिवाय, त्याचा एक दिवस जात नसे. त्याच्या वाड्यात येणाऱ्या बायका बहुधा थोरामोठ्यांच्या घरातील असत आणि जे सरदार आपल्या घरांतील स्त्रिया वाड्यात पाठविण्यास खळखळ करीत त्यांच्यावर बाजीरावाचा अनावर संताप होई. खंडेराव रास्त्याने आपल्या घरातील बायका वाड्यात पाठविण्यास नकार दिला याच कारणामुळे बाजीरावाने त्याचा काटा काढला आणि माधवराव रास्त्याचा त्याने जो दीर्घकाळ छळ केला त्याच्याही मुळाशी बहुधा हेच कारण असावे. बापू गोखल्यावर प्रथम बाजीरावाचा राग होता आणि नंतर तो राग मावळून त्याच्यावर बाजीरावाची बहॉल मर्जी बसली याचे कारण बापू गोखल्याने आपल्या घराची बेअब्रू होण्यास संमति दिली हेच होते असे माहितगार लोक बोलत असत. एलिफिन्स्टनच्या लिखाणात व त्याच्या कृष्णाजी बल्लाळ गोडबोले लिखित चरित्रात याविषयीचे उल्लेख मिळतात. (डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या 'महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना' या ग्रंथावरून. पृष्ठे ३१-३२)

**पृष्ठ १९५ : यास आधार शांडिल्याची स्मृति**

शांडिल्य हा अश्वलायन सूत्रातील गोत्रांच्या यादीत असून शांडिल्य सूत्रे भक्तिज्ञानाविषयी आहेत. एक स्मृति, धर्मसूत्र व तत्त्वदीपिका शांडिल्याच्या नावावर आहे.

**पृष्ठ १९५ : विशिष्टाद्वैत**

रामानुजाचार्यांनी प्रतिपादिलेले वेदान्तमत. शंकराचार्यांचा मायावाद आणि अद्वैतसिद्धान्त ही दोनही खरी नसून जीव, जगत व ईश्वर ही तीन तत्त्वे जरी भिन्न असली तरी जीव (चित) व जगत (अचित) ही दोनही एका ईश्वराचेच शरीर असल्यामुळे चित-अचित-ईश्वर एकच होय. शरीरातील या सूक्ष्म चित-अचित यापासून पुढे चित-अचित किंवा अनेक जीव व जगत निर्माण होतात. ब्रह्म हे अद्वैत खरे, परंतु केवळ अद्वैत नव्हे. तर विशिष्ट अद्वैत होय.

**पृष्ठ २०१ : जेवणापलीकडे त्यास कर्तव्यच राहिले नाही**

या संदर्भात १८६८ सालच्या ना. वि. जोशी लिखित 'पुणे वर्णना'तील पुढील उतारा लक्षणीय आहे—

"या वेळच्या लोकांची स्थिती म्हटली म्हणजे अशी होती की, सुग्रास खावे आणि रिकामटेकड्या गप्पा मारीत बसावे. माहिती म्हटली म्हणजे इतकीच की, इंग्रज हा कलकत्ता म्हणून एक बेट आहे तेथील राहणारा. याहून विशेष माहिती म्हटली म्हणजे ब्राह्मणभोजनास किती शेर तूप लागते, उन्हाळ्यात किती पायल्यांचे पुरण, पावसाळ्यात किती पायल्यांचे, हिवाळ्यात किती पायल्यांचे, याप्रमाणे कोशिंबिरी-भाज्यांचा सुद्धा सारखा बेत उरकण्याजोगा तोलाने सांगत. याचे नेहमी संभाषण म्हटले म्हणजे विशेषेकरून जेवणाविषयी व ग्रामण्याविषयी असावयाचे. त्यांची विद्या दोन प्रकारची होती- एक कारकुनी व दुसरी याज्ञिकी.

"शूरत्वाविषयी म्हणावे तर ते लोकांत अगदी नव्हते. पाचशे वर्षांपूर्वीच्या लोकांची आणि आताच्या लोकांची जर शूरत्वाविषयी तुलना करून पाहिली तर शेवटील बाजीराव येईपर्यंत त्यांच्यात काहीतरी शौर्य होते. परंतु बाजीरावाने लोकांस अगदी नादान करून विषयनिमग्न करून सोडले; पराक्रमहीन, निर्लज्ज, दुर्गुणी, स्त्रैण, मूर्ख, अशक्त, उन्मत्त, कपटी, अविश्वासू, स्वहित न जाणणारे, दूरदृष्टिहीन, आळशी, पुष्कळ खाणारे असे केले. **पराक्रम, विद्या, सावधान या गुणांचे मौल्य अगदी गेले. ऐषआरामाच्या बाबी वाढल्या. साखरभात खाणारास मान व मौल्य आले.** राज्याचा बंदोबस्त गेला. आणि जसे एखादे घर सर्व ठिकाणी कुजके, पडीत, खिळखिळे होते, तसे राज्य झाले; तेणेकरून प्रभू राज्यभ्रष्ट होऊन धुळीचे-दिवे खात गेले." (पृ. ७०) याच 'पुणे-वर्णना'त 'ज्ञानप्रकाशा'तील एक उतारा- असाच बाजीरावकालीन- पुण्यातील समाजस्थितीवर प्रकाश टाकणारा-देण्यात आला आहे. जिज्ञासूंनी डॉक्टर वाळिंबे यांच्या 'महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना' या पुस्तकातून (पृ. ३७-३८) तो वाचावा. ('पुणे वर्णन' हे पुस्तक अतिदुर्मिळ आहे.)

उदरपरायण, भोजनभाऊ ब्राह्मणांवर लोकहितवादींनी अनेक ठिकाणी कोरडे ओढले आहेत. त्याचे करणे अस्थानी नव्हते हे लक्षात यावे एवढ्यासाठीच वरील दीर्घ उतारा येथे उद्धृत केला आहे.

**पृष्ठ २०४ : मुंबईत... धर्म बुडाला...**

या संदर्भात 'प्रभाकर' पत्रातील पुढील पत्र पाहण्याजोगे आहे. पत्रलेखक 'हिंदुधर्माभिमानी' आपल्या १६-१-११५२ च्या पत्रात लिहितो– "..आश्चर्याची व दुःखाची गोष्ट म्हणजे येथे (मुंबईत) येताच तेथील हिंदूंची मने बहकून गेली आहेत असे मला आढळून आले! काही लोक म्हणतात पुनर्विवाह करा, कित्येकांस आपल्या मुलीबाळी शाळेत पाठवाव्या असे वाटू लागले आहे! आणि कित्येक तर जातिबंधने तोडण्यासाठी प्रयत्न करीत आहेत!.. वजनदार... गृहस्थही अशा कार्यास हातभार लावीत आहेत!...जगन्नाथ शंकरशेट यांची स्वधर्मावरील श्रद्धा सर्वप्रसिद्ध आहे. परंतु त्यांचे दाखवावयाचे दात वेगळे व खावयाचे दात वेगळे आहेत." (नाना शंकरशेट यांचे चरित्र-पु. बा. कुलकर्णी; पृ. ११०वरून)

मुंबईमधील सुधारणांकडे सनातनी लोक कोणत्या दृष्टीने पहात होते याची कल्पना या पत्रावरून येईल व लोकहितवादींचे उद्‌गार किती अर्थपूर्ण आहेत हे लक्षात येईल.

## ३. आमचे वर्णगुरू

**पृष्ठ २१५ : ब्राह्मण...लोक यांणी दीडशें वर्षें राज्य केले; परंतु असे काही (शोधन वगैरे) केले नाही**

एका प्रसंगी नदीचे पाणी हटविण्यासाठी नाना फडणविसाने इंग्रजांकडून 'कळ'(यंत्र) आणविली. 'कळी'शिवाय पाणी हटणार नाही हे नानास कळले; पण 'कळ' आपणच निर्माण करावी हे त्याच्या मनात आले नाही किंवा आले असले तरी त्यातून काही निष्पन्न झाले नाही. याचे कारण शोधप्रवृत्तीच त्या काळात नष्ट झाली होती. यामुळे साध्यासुध्या वस्तूंसाठी सुद्धा लोकांना परकीयांकडे पहावे लागत असे. या संदर्भात, न. चिं. केळकर यांनी 'मराठे व इंग्रज' या ग्रंथात जे लिहिले आहे (समग्र केळकर वाङ्मय, खंड ७, पृ. ३०४) ते लक्षात येण्याजोगे आहे– "पल्लेदार तोफा, बंदुका, पाणीदार तलवारी व कट्यारी, होकायंत्रे, दुर्बिणी वगैरे युद्धोपयोगी पदार्थ, तसेच घड्याळे, हंड्या-झुंबरे, आरसे, उत्तम रेशमी कपडा, तलम बारीक मलमल वगैरे व्यवहारोपयोगी पदार्थ याकरिताही त्यांना (मराठ्यांना) इंग्रज, चिनी, मुसलमान वगैरे लोकांच्या तोंडाकडे पहावे लागे... या जिनसा उत्पन्न करण्याची इच्छा त्यांना फारशी झाली नाही." ही इच्छा का झाली नाही याची मार्मिक मीमांसा

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी ' राधामाधवविलासचंपू ' च्या प्रस्तावनेत (पृ. १०७) फार चांगली केली आहे. तीही या ठिकाणी लक्षात घेण्याजोगी आहे. " उत्तम, रेखीव व नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रात व्हावी लागते ती त्या काळी महाराष्ट्रात नव्हती. शहाजीच्या हयातीत युरोपात डेकार्ट, बेकन इत्यादी विचारवंत, सृष्ट पदार्थ संशोधनकार्याचे वाली, ज्यारीने पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते. आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत.. इत्यादी संत पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटीत होते. अशांना स्क्रू, टाचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यात नवल कसचे ? "

हिंदुस्थानातील लोकांनी आपल्या राजवटीत शोध केला नाही हे यावरून स्पष्ट होईल. (अधिक माहितीसाठी जिज्ञासूंनी प्रा. द. के. केळकर यांच्या ' संस्कृतिसंगम ' व ' उद्याची संस्कृती ' या ग्रंथातील अनुक्रमे ' विचारदौर्बल्याचे शेवाळे ' व ' धर्मांची रेशमी काढणी ' ही दोन प्रकरणे वाचावी.)

**पृष्ठ २१८ : त्यांची ती कायम.. पेशव्यांचेच बुडाले**

शिंदे, होळकर, गायकवाड, हे पेशव्यांचे सरदार होते. पेशवे त्यांचे प्रभु असले तरी त्यांच्या प्रदेशात (संस्थानात) त्यांचा अधिकार असे. १८१८ साली पेशव्यांचे राज्य बुडाले. पण इतर ' संस्थानिक ' होऊन पूर्ण शरणागती पत्करून टिकून राहिले.

**पृष्ठ २२१ : जर छापखाना व डाक हिंदुस्थानात असती**

' अव्वल इंग्रजी ' मध्ये सुज्ञांना मुद्रणविद्येचे (महत्त्व लक्षात आल्यामुळे) फार अगत्य वाटले हे कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या ' अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहां 'तील पुढील विधानांवरून लक्षात येईल. " छापण्याची युक्ती न निघती तर वर्तमानपत्रे व नियमित काळी निघणारी पुस्तके न होती. हल्ली पृथ्वीवर एका महिन्यात जितके कागद छापले जातात, तितके हाताने लिहावयाचे असते तर कोट्यवधी मनुष्ये लागली असती. परमेश्वराने ही अप्रतिम व अत्युत्तम कला, विद्यास्वातंत्र्य-सौजन्य-संपत्ति इत्यादी उत्तमोत्तम गोष्टी उत्तरोत्तर वाढाव्या म्हणून पाठविली. "

इंग्रजी अमलात मुद्रणविद्येविषयी जे अगत्य लोकांस वाटले ते पेशवेकालीन महाराष्ट्रातील लोकांस वाटले नाही. " योगवासिष्ठासारख्या एका पोथीची नक्कल

करून घेण्यास त्या काळी सुमारे ४०० रुपये खर्च येई. '' (पेशवेकालीन महाराष्ट्र- वा. कृ. भावे; पृ. १०५) पण एकाच वेळी अनेक प्रती तयार करणाऱ्या छापखान्याची कल्पना कोणास सुचली नाही किंवा सुचली असली तरी कायम स्वरूपात मूर्त करण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. शिवछत्रपतींनी छापखाना काढण्याचा प्रयत्न केला असे म्हणतात; पण तो यशस्वी झालेला दिसत नाही. नाना फडणविसाने लाकडाच्या ठोकळ्यावर अक्षणे कोरून गीता छापण्यास सुरूवात केली असे उल्लेख मिळतात; पण नानाच्या प्रयत्नासही विशेष फळ आलेले दिसत नाही. खिस्ती मिशनरी हिंदुस्थानात आल्यावर (१९व्या शतकाच्या प्रारंभी) मुद्रणविद्या प्रसार पावू लागली. तोपर्यंत तिचा अभावच होता. राज्य गेले त्याचे मूळ यात आहे या लोकहितवादींच्या म्हणण्यात फार खोल अर्थ आहे.

**पृष्ठ २२२ : पुण्यात वकील होता**

पुण्याच्या दरबारात इंग्रजांचे वकील (मॅलेट, इंचबर्ड...) थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीपासून राहू लागले. मराठ्यांना ' वकील आहे. ' एवढीच खबर असे. वकिलाचे धोरण, त्याच्या राजकारणाचे मर्म जाण्याची कुवत त्यांच्यात नव्हती.

**पृष्ठ २३६ : बाजीरावाने गंगाधरशास्त्री याजला मारले**

गंगाधर कृष्ण पटवर्धन हे मेणवलीचे राहणारे. पेशव्यांच्या वाड्यात कर्नाटक प्रकरणाच्या दप्तरात ते कारकून म्हणून काम करीत. पेशवे व गायकवाड यांच्यामधील बेबनाव मिटविण्याच्या कामी त्यांनी नेमणूक झाली होती. त्या वेळी दुसऱ्या बाजीरावाने त्यांचा खून आपला कारभारी त्रिंबकजी डेंगळे याच्याकरवी पंढरपूर येथे करविला असा लोकापवाद आहे. (१४ जुलै १८१५) (या प्रकरणाच्या अधिक माहितीसाठी ' मराठे व इंग्रज ' हे न. चिं. केळकर यांचे पुस्तक पाहावे. पृ. १०४-१०६)

**पृष्ठ २४० : पूर्वी होळकरांनी... पुणे शहर लुटून लोकांस मारिले**

अमृतराव (दुसऱ्या बाजीरावाचा भाऊ) याच्या अमलाखाली पुणे असताना १८०२ साली यशवंतराव होळकराने पुण्यावर धाड घातली. बाजीरावाने त्याच्या भावास-विठोजीस क्रूरपणे मारले. त्याचा सूड उगविण्यासाठी यशवंतराव नोव्हेंबर महिन्यात पुण्यावर चाल करून आला. त्याने पुण्यात मन मानेल तशी

लुटालूट केली. शस्त्रागार, अंबाऱ्या, सोने, रूपे, जवाहिर, कापड सारे त्याने लुटून नेले. लूट करिताना त्याने लोकांवर अनन्वित अत्याचार केले. 'पुणे-वर्णन' कर्ते ना. वि. जोशी लिहितात (पृ. ६६), "त्या वेळेस होळकर हे नाव ऐकण्यापेक्षा यमाजीपंत याचे नाव ऐकण्यास लोकांस बरे वाटे." (होळकर प्रकरणाच्या अधिक माहितीसाठी व 'पुणे-वर्णना'तील लुटीच्या व अत्याचारांच्या तपशीलवार वर्णनासाठी डॉ. रा. शं. वाळिंबे यांचा 'महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना' हा ग्रंथ पाहा. पृ. २०-२३).

**पृष्ठ २४४ : वेदान्ती आहेत त्यांस, असे समजत नाही**

उपनिषदात सांगितलेले तत्त्वज्ञान ते वेदान्त. पण शंकराचार्यप्रणीत अद्वैतासच सामान्यतः वेदान्त म्हणून संबोधिले जाते. जीव व ब्रह्म एक आहे; जग हा केवळ भास आहे असे अद्वैत-वेदान्त सांगतो. लोकहितवादींस हे म्हणणे मुळीच मान्य नाही. ते जगाचा विचार आध्यात्मिक पातळीवरून न करता ऐहिक भूमिकेतून करतात. त्यामुळेच परब्रह्माचा विचार करणारे त्यांना मूर्ख वाटतात आणि इहलोकातील गांजलेल्या जीवास ज्ञान-सुख देणारे त्यांना खरे वेदान्ती वाटतात.

**पृष्ठ २४५ : दक्षणा ग्रंथकर्त्यास द्यावी**

सेनापती खंडेराव दाभाडे यांनी तळेगाव येथे विद्वानांना दक्षिणा द्यावयास सुरुवात केली. ५ लक्ष रुपये दरवर्षी वाटले जात. इ.स. १७३० मध्ये खंडेराव दाभाडे याचा मुलगा त्रिंबकजी याचा बाजीराव बल्लाळ पेशवे याने धोरणीपणाने पराभव केला. नंतर दक्षिणा पुण्यात वाटण्यास प्रारंभ झाला. एलफिन्स्टनने दक्षिणा वाटण्याचा क्रम पुढेही चालू ठेवला, पण कालांतराने दक्षिणा देण्याचे सरकारने हळूहळू बंद केले. १८४९ साली निम्मी दक्षिणारक्कम मराठी ग्रंथांना उत्तेजन देण्यासाठी सरकारने 'दक्षिणा प्राइझ कमिटी' निर्माण केली. असे करावे ही मागणी सरकारकडे काही एतद्देशीयांनीच केली होती, असे लोकहितवादी सांगतात.

**पृष्ठ २४६ : म्हणजे एक पुरंदरचे बंड मोडले**

१८२१ साली 'पुणे-संस्कृत-पाठशाळा' स्थापन झाली. १८२३ साली ती बंद करावी अशी सूचना कंपनीच्या डायरेक्टरांनी केली; पण ती एलफिन्स्टनने फेटाळली. पाठशाळेत प्रचलित असलेल्या संस्कृत-शिक्षणात लोकहितवादींस अनर्थाचे मूळ दिसत असल्यामुळे पाठशाळेचा विध्वंस प्रथम करावा असे ते

म्हणतात. हे म्हणत असताना लोकहितवादींनी पाठशाळेचा (आणि 'कल्याणोन्नायक मंडळी'चाही) अधिक्षेप 'पुरंदरचे बंड' या शब्दात केला आहे. 'पुरंदरचे बंड' असा शब्दप्रयोग करण्याचे कारण ठामपणे सांगता येण्याइतकी स्पष्टता येथे नाही. तथापि दूरान्वयाने अर्थ लावता येईल, तो असा – माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत इ.स. १७६४ मध्ये पुरंदर किल्ल्यावर कोळ्यांनी एक छोटेसे बंड केले. वस्तुतः कोळी हे तेथील रखवालदार; पण त्यांनीच हे विपरीत कृत्य केले. या कृत्यासारखेच कृत्य पुण्यातील 'कल्याणोन्नायक मंडळी'चे सभासद व 'पाठशाळे'चे अभिमानी हे करीत आहेत. हे विद्वान, पंडित यांनी खऱ्या विद्येचे रक्षण करावयाचे, तर हे जुन्या, गतार्थ विद्येची कड घेतात, ग्रामण्यादिकांत शक्ती खर्च करतात; म्हणजे एक प्रकारे कोळ्यांच्या बंडासारखेच हे विद्याविरोधी बंड होय, असे **लोकहितवादींना येथे सुचवावयाचे असावे**.

## ४. स्त्री जीवन

**पृष्ठ २५५: (१) विश्वामित्राने नवी सृष्टी केली; (२) अगस्तीने समुद्र प्राशन केला; (३) दुर्वासाचे शापाने विष्णूने दहा जन्म धारण केले व (४) भृगूने लक्ष्मीनारायणास लाथ मारली.**

(१) विश्वामित्राने त्रिशंकूला सदेह स्वर्गी चढविण्यासाठी प्रतिसृष्टी निर्माण केली अशी कथा आहे.

(२) पूर्वी राक्षस समुद्रात लपून राहून देवांना त्रास देत असत. तो चुकविण्यासाठी इंद्राने अग्नि आणि वायू यांना समुद्र शोषण्याची केलेली आज्ञा त्यांनी न मानल्यामुळे त्यांस इंद्रशापामुळे मृत्युलोकी जन्म घ्यावा लागला. तो त्यांनी अगस्तीच्या रूपाने घेतला; आणि समुद्राचे शोषण करून देवांना राक्षसांच्या त्रासातून मुक्त केले.

(३) विष्णूने जे दशावतार घेतले ते येथे अभिप्रेत आहेत.

(४) श्रीवत्स हा श्राद्धदेवाचा पुत्र. त्याचा विवाह ठरला, त्यावेळी चातुर्मास असल्यामुळे मुहूर्त मिळेना. श्रीवत्साला विवाह लवकर उरकावयाचा असल्यामुळे तो क्षीरसागराकडे गेला व त्याने झोपलेल्या विष्णूच्या छातीवर लाथ मारून त्यास जागे केले व आपला विवाह उरकला, अशी भागवतात कथा आहे.

**पृष्ठ २५८ : पूर्वी हिंदू लोक सीथिया देशातून हिंदुस्थानात आले**

पूर्वी भारतात उत्तर आशियातील अनेक भटक्या टोळ्या आल्या. त्यातील एक टोळी ही सीथियन होती.

**पृष्ठ २६१ : पुनर्विवाह हिंदू लोकांचे सुधारणेचे मूळ आहे**

पुनर्विवाहविषयक खल अव्वल इंग्रजीत बाळशास्त्री जांभेकरांपासूनच सुरू झाला होता. त्यांनी १८३७ सालच्या 'दर्पण'च्या काही अंकांत (१८ ऑगस्ट, ८ व १५ सप्टेंबर १८३७ च्या अंकात) या विषयावर तीन लेख लिहून व अन्य प्रस्तावना वगैरे लिहून एतद्विषयक अनुकूल मतप्रदर्शन केले होते. (पाहा - बाळशास्त्री जांभेकर ग्रंथ, खंड २रा. संपादक- ग. गं. जांभेकर, पृ. १३०-१३५ व २९३). यावरून पुनर्विवाहात सुधारणेचे मूळ आहे हे त्या काळात कसे प्रतीत होऊ लागले होते हे स्पष्ट होते. पुढे पुनर्विवाह प्रकरण चांगलेच धसाला लागले होते, हे त्या काळातील गाजलेल्या पुनर्विवाहावरून व विष्णुशास्त्री पंडितांसारख्यांनी केलेल्या वादावरून सहज लक्षात येते. (अधिक माहितीसाठी लोकहितवादी व न्या. रानडे यांची चरित्रे पाहा.)

**पृष्ठ २६४ : इंग्लंडातील थोरली सनद**

इ.स. १६८८ मध्ये इंग्लंडमध्ये रक्तविहीन राज्यक्रांती होऊन इ.स. १६८९ मध्ये ३रा विल्यम व मेरी ही अधिकारारूढ झाली. त्या वेळी त्यांच्याकडून भाषणस्वातंत्र्य, निर्वाचनस्वातंत्र्य, राजावरील पार्लमेंटचे नियंत्रण इत्यादी कलमे असलेली एक हक्कांची सनद (Declaration of Rights) पार्लमेंटने संमत करून घेतली व तिला पुढे कायदेशीर रूप दिले. यासच (इंग्लंडातील) हक्कांची सनद असे म्हटले गेले.

**पृष्ठ २६४ : फराशीस यांची राज्यक्रांती**

१६ व्या लुईच्या कारकीर्दीत इ.स. १७८९ मध्ये फ्रान्समध्ये समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय असंतोषाचा उद्रेक एका मोठ्या राज्यक्रांतीच्या रूपाने झाला. या क्रांतीच्या वेळीच 'स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व' या तत्त्वत्रयींचा उद्घोष प्रथम केला गेला आणि परिणामी राज्यसत्ता संपुष्टात येऊन लोकसत्तेचा उदय झाला.

**पृष्ठ २६४ : रूमचे राज्याचा नाश**

इ.स. १४५३ मध्ये रोमन साम्राज्याच्या राजधानीवर - कॉन्स्टँटिनोपलवर तुर्कांनी धाड घातली तेव्हा रोमन सत्ता लयास गेली आणि त्याबरोबरच मध्ययुगाची -तमोयुगाची इतिश्री झाली. याप्रमाणे १५ व्या शतकाच्या मध्यावर रोमन साम्राज्याचा शेवट झाला असला तरी ४थ्या, ५ व्या शतकापासूनच ही प्रक्रिया चालू झाली होती.

**पृष्ठ २६५ : अमेरिका खंडात युरोपियन लोकांची वस्ती**

१४९२ साली अमेरिकेचा शोध लागला. ६ वा एडवर्ड व मेरी ट्यूडर यांच्या कारकीर्दीत ज्यांचा छळ झाला त्यांनी मग तेथे जाऊन वसाहत केली. पुढे एलिझाबेथच्या काळात व्यापारामुळे वसाहतीत वाढ झाली व अनेक इंग्रज तेथे जाऊन राहिले. पुढे स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स येथील लोकांनीही तेथे जाऊन वसाहती केल्या.

**पृष्ठ २६८ : शास्त्रास एकीकडे ठेवा...विचार करून पाहा**

अंधश्रद्धेची कास सोडून बुद्धीची-विवेकाची कास धरण्याचा हा आग्रह म्हणजे इंग्रजांच्या आगमनामुळे झालेल्या युगांतराचा परिपाक होय. 'अव्वल इंग्रजी' मधील नवशिक्षितांनी एकसारखा असा आग्रह धरलेला दिसतो. ''शोध व विचार यापासून उपयोगी फले होतात.. प्रतिघटका नवे ज्ञान काहीतरी माहीत करून देतात'' (दर्पण-२ मार्च १८३२), ''ईश्वराने आपणास बुद्धि दिली आहे तिच्या योगाने विचार करावा'' (हिंदू लोकांच्या सणाविषयी निबंध-पुरवणी-बाबा पदमनजी), यांच्यासारख्या विधानांवरून हेच दिसून येते.

**पृष्ठ २८५ : तुम्ही मंडळी स्थापन केली याचा मला संतोष आहे**

लोकहितवादींनी 'कल्याणोन्नायक मंडळी' वर टीका केली असली तरी विशिष्ट मर्यादेपर्यंत तिचा गौरवपूर्वक उल्लेखही त्यांनी केलेला दिसतो. यावरून लोकहितवादींची टीका वैयक्तिक नसून तत्त्वमूलक कशी होती, हे उघड होण्यास प्रत्यवाय नाही.

## ५. जातिभेद

### पृष्ठ २८७ : ते शास्त्र लिहिण्यापूर्वी व पश्चात असा नियम असेल असे वाटत नाही

लोकहितवादींचा कयास खरा आहे. 'जन्मतः शूद्र असलेला माणूस संस्कारांनी द्विजपदवीस योग्य ठरतो,' 'ज्याच्या ठायी संस्कारजन्य शील दिसून येईल त्यास ब्राह्मण म्हणावे, 'शूद्राअंगी ब्राह्मणाचे गुण असल्यास त्यास ब्राह्मण म्हणू नये.' अशी अनेक वचने संस्कृत वाङ्मयात आढळतात. (जिज्ञासूंनी 'अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ' व 'स्पर्शास्पर्श' ही श्रीधरशास्त्री पाठक व पंडित सातवळेकर यांची पुस्तके पाहावी.)

### पृष्ठ २८९ : बाजीरावास तर नेहमी हेच (जेवणावळीचे) वेड होते.

१८०५ ते १८०९ या चार वर्षांच्या काळात केवळ इंग्रज अधिकाऱ्यांना मेजवान्या ('बडा खाना') देण्यासाठी (दुसऱ्या) बाजीरावने जवळजवळ तेरा हजार रुपये खर्च केले असे पेशवे दप्तरातील कागदपत्रांवरून (क्र. २२) दिसते. (पाहा- महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना- डॉ. रा. शं. वाळिंबे, पृ. २८.) इतरांसाठी केलेल्या मेजवान्या व रोजच्या पंक्ती वेगळ्याच. यावरून बाजीरावाचे भोजनवेड स्पष्ट होईल.

### पृष्ठ २९१ : शूरत्व या मुलखातून गेले

पृष्ठ --- वरील 'पुणे वर्णना'तील उतारा या संदर्भात पुन्हा लक्षात घेण्याजोगा आहे.

## ७. आमचे राजकारण व राज्यकर्ते

### पृष्ठ ३२६ : त्यास फ्रेंच रिवोल्युशन म्हणतात

पृष्ठ --- वरील ('फराशीस यांची राज्यक्रांती' यावरील ) टीपा पाहा.

### पृष्ठ ३२६ : मागे पेशवाईत...दंगे झाले

(१) पानिपतच्या युद्धात सदाशिवरावभाऊ (भाऊसाहेब) धारातीर्थी पतन पावले, पण त्यांचा पत्ता लागला नाही. याचा फायदा पुढे माधवराव पेशव्यांच्या

कारकीर्दीत सुखनिधान नावाच्या माणसाने घेण्याचा प्रयत्न केला व बरीच गडबड उडविली.

(२) चतुरसिंग भोसले हे धाकट्या शाहूचे सख्खे भाऊ. ते हुशार व धाडशी असल्याचे आणि म्हणून छत्रपतींच्या गादीस लायक असल्याचे रियासतकार सरदेसाई सांगतात. इ.स. १८०३ मध्ये इंग्रजांची मदत घेऊन दुसरा बाजीराव पेशवेपदावर आला हे त्यांना आवडले नाही. म्हणूनच पुढे शिंदे व इंग्रज यात झालेल्या धुमश्चक्रीत त्यांनी शिंद्यांची बाजू घेतली.

(३) ब्रिटिशांच्या अमदानीत महाराष्ट्रात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेक छोटे मोठे उठाव झाले. १८४६ मधील उमाजी नाइकांचे दरोडे-दंगे हे यातीलच होत.

(४) उमाजीच्या दंग्यासारखेच राघू भांगऱ्याचे १८४४ मधले दंगे होत. त्याने इंग्रजांचे अधिकारी व पोलिस ठार मारून आणि सरकारचा पाठपुरावा करणाऱ्या लोकांची नाके कापून सरकारला सळो की पळो करून सोडले.

(५) पेंढारी हे लूटमार करणारे लोक. शिंदे-होळकरांसारख्या मराठे सरदारांच्या फौजात यांची पथके असत. युद्ध आटोपले म्हणजे मग ही पेंढाऱ्यांची पथके मोकाट सुटून उच्छाद मांडत. पुढे पुढे त्यांचा उपसर्ग समाजास फारच पोहोचू लागला. (कालांतराने इंग्रजांनी त्यांचा पक्का मोड केला.)

(६) महादजी शिंदे मरण पावल्यावर त्यांच्या स्त्रिया लक्ष्मीबाई, भागीरथीबाई, यमुनाबाई आणि अंगवस्त्र केशरी यांच्यावर सर्जेराव घाटगे यांनी अत्याचार करून त्यांना जबरदस्तीने नगर येथे अटकेत ठेवले (१७९८). दुसऱ्या बाजीरावाचा भाऊ अमृतराव व यशवंतराव होळकर यांनी आणि बुंदेलखंडातील लखबादादा यांनी या स्त्रियांची बाजू घेतली. यातून जे वादंग निर्माण झाले ते तीन चार वर्षे टिकले.

(७) दुसरा बाजीराव व परशुरामपंत प्रतिनिधी यांचे संबंध सलोख्याचे नव्हते. तेव्हा बाजीरावाचे सेनापती बापू गोखले यांनी परशुरामपंतास कैद करून मसूरच्या गढीत डांबून ठेवले (१८०६). पंतांची रखेली ताई तेलीण हिने वासोटा किल्ल्याच्या आश्रयाने पुंडावा केला. (पुढे धान्य अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडल्यामुळे व अन्य रसद मिळणे शक्य नसल्यामुळे ८ महिन्यांनी तिला गोखल्यांपुढे दाती तृण धरून जावे लागले.)

**पृष्ठ ३२७ : इंग्लंड देशाचा वृत्तान्त काढून पाहावा**

(१) जॉन राजा (११९९-१२१५) – 'मॅग्नाचार्टा' ही ६३ कलमी मोठी सनद त्याने जनतेला दिल्यामुळे अनियंत्रित राजसत्ता नियंत्रित झाली.

(२) चार्लस राजा १ ला (१६२५-१६४९) – 'राजाची ईश्वरदत्त सत्ता' या तत्त्वाच्या जोरावर त्याने मनास येईल तसा राज्यशकट हाकला. पण शेवटी वेंटवर्थ, पिम, इलियट, हॅम्पडेन यांसारख्या पुढाऱ्यांच्या हक्कांच्या मागणीच्या खलित्यावर ('पिटिशन ऑफ राईट्स') त्याला स्वाक्षरी करावी लागली (१६२८) यामुळेच पार्लमेंटशी असलेले संबंध बिघडून त्यातून युद्ध उद्भवले आणि त्यात त्याचा पराभव झाला. १६४९ मध्ये त्याला फासावर चढविण्यात आले.

(३) जेम्स राजा २ रा (१६८५-१६८८) – राज्यकारभार चांगला न केल्यामुळे त्याच्या राज्यातील संत्रस्त नागरिकांनी त्याचा जावई हॉलंडचा राजपुत्र - विल्यम यास राजपद स्वीकारण्याचे आवाहन केले (१६८८). नंतर जेम्सने फ्रान्समध्ये पलायन केल्यावर जे सत्तांतर झाले त्यास रक्तशून्य राज्यक्रांती असे इतिहासात म्हणण्यात आले.

**पृष्ठ ३२७ : जेव्हा जैनमत झाले होते तेव्हा**

(इ. स. ७०० च्या सुमारास) कुमारिलभट्टांनी बौद्ध मताचे खंडन करून वैदिक धर्माची प्रतिस्थापना केली, बौद्ध व जैन तत्त्वज्ञानांच्या अतिरेकामुळे समाजावर जे संस्कार झाले होते ते वैदिक तत्त्वज्ञानाच्या पुरस्कारामुळे नष्ट झाले.

**पृष्ठ ३२७ : तस्मात् ती "रिवोल्युशन" म्हणावी**

शिवाजीमहाराजांनी फार मोठी क्रांती केली. त्यांनी कलियुग कल्पना नष्ट केली, हरिहर हिंदूंना पाठमोरे झाले आहेत. आपले देवच मुसलमानांना वश आहेत हा घातकी समज जनमनातून समूळ काढून टाकला; अदृष्टफलप्रधान कर्म उच्छिन्न करून टाकून 'महाराष्ट्र धर्मा'ची संस्थापना केली, पतितांची शुद्धी, परदेशगमन, समुद्रप्रवास हे नवे आचार सुरू केले. जन्मजात श्रेष्ठत्व कमी करून गुणास मोल दिले, वतनदारी मिरासदारी मोडून काढली. अशा अनेक नव्या गोष्टी त्यांनी केल्या. (पाहा- 'शिवछत्रपतींचे क्रांतिकार्य' हा डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचा लेख - 'वैयक्तिक आणि सामाजिक कार्य' या निबंधसंग्रहामध्ये.)

**पृष्ठ ३२८ : अमेरिका व सुइजरलंड यांनीही लोकांचे राज्य स्थापन केले.**

अमेरिकेतील संयुक्त संस्थाने व युरोपातील स्वित्झरलंड यांनी लोकमतराज्यपद्धती सुरू केली हे सांगून लोकहितवादींना भावी राज्यपद्धतीविषयी काही सांगावयाचे आहे.

**पृष्ठ ३२८ : इंग्रजांचे काही जिल्ह्यांत दंगे झाले आहेत**

१८३८-१८४८ या काळांत झालेल्या चार्टिस्ट चळवळीस अनुलक्षून हे विधान केले आहे. व्हिक्टोरिया राणी अधिकारपदावर आली त्या वेळी देशात अशांतता होती. रिफॉर्म बिल मान्य झाल्यावर आपली दुरवस्था नाहीशी होईल अशी कामगारवर्गाची समजूत होती, पण ती व्यर्थ ठरली. अपुरी मजुरी, भरमसाट महागाई, वाढती बेकारी यामुळे गरीब वर्गाची स्थिती फार वाईट झाली. ती सुधारण्यासाठी १८३७ साली फिअर्गस, ओकोनॉर व विल्यम लोबेट यांनी चळवळ सुरू केली. त्यात मागण्यांची सनद (The People' Charter) तयार करण्यात आली. त्यामुळे ती चार्टिस्ट चळवळ म्हणून ओळखली गेली. या चळवळीमुळे १८३९ मध्ये बरेच दंगे झाले.

**पृष्ठ ३४७ : (१) नारदासारिखे गायनशास्त्री, (२) कपिलासारखे शास्त्रज्ञ.**

(१) प्रसिद्ध नारदमुनी-तंबोरी छेडीत ईश्वरगुणगान करीत सर्वत्र संचार करणारे - हे येथे अभिप्रेत आहेत.

(२) कपिल-सांख्य हे सहा दर्शनांतील एक दर्शन (तत्त्वज्ञान) त्यांचे हे प्रवर्तक.

**पृष्ठ ३०५ : ज्योतिषशास्त्रावर व लीलावती वगैरे ग्रंथ**

भास्कराचार्य (इ.स. ११४४). प्रख्यात भारतीय ज्योतिषशास्त्रज्ञ. 'सिद्धान्तशिरोमणि' आणि 'करणकुतूहल' हे त्यांचे ज्योतिष-गणितविषयक ग्रंथ. सिद्धान्तशिरोमणि ग्रंथाचा पहिला खंड पाटीगणित किंवा लीलावती हा अंकगणित व महत्त्वमापन यावरचा स्वतंत्र ग्रंथ असून दुसरा खंड बीज-गणितावरचा आहे.

**पृष्ठ ३४८ : कलियुग निघाले आहे...हा ईश्वरसंकेत**

कलियुग हे चौथे युग. कलियुग कल्पना ब्राह्मणग्रंथातून आढळते. (तै.ब्रा.

१५) तैत्तिरीय संहितेत युगकल्पना आहे, परंतु त्या ठिकाणी कृत, त्रेता व द्वापर ही तीनच नावे आढळतात. ब्राह्मण ग्रंथात मात्र चारही युगांची नावे आली आहेत.

याची वर्षसंख्या चार लक्ष बत्तीस हजार वर्षांची असून मगा नक्षत्री सप्तर्षी आले म्हणजे कलियुगास प्रारंभ होतो. हे युग सर्वांत खालच्या प्रतीचे मानतात व त्यात माणसे भ्रष्ट होतात, वाटेल तसे आचार करतात आणि परिणामी यातना भोगतात अशी समजूत आहे.

कलियुगकल्पनेचा पगडा मराठी माणसांवर शिवछत्रपतींच्या अगोदरच्या काळात फारच होता. नमुन्यासाठी ‘महिकावतीच्या बखरी’तील पुढील अवतरण पाहा– “कलियुगांत असा (हिंदू राज्ये नष्ट होण्याचा) प्रकार होणार अशी भाक लक्ष्मीनारायणाने दिली होती. ती शके १२७०त खरी ठरली. हरिहर गुप्त झाले, ऋषी बदरिकाश्रमी गेले, वसिष्ठही गेले. सूर्यवंशी, चंद्रवंशी क्षत्रिय यांची शस्त्रविद्या लुप्त झाली.”

**पृष्ठ ३५६ : (इंग्रज राज्य बळकावतील) असा जर विचार पाहिला असता**

लोकहितवादी म्हणतात तसा विचार मराठ्यांच्या मनात आला नव्हता असे नाही. इंग्रज हे वरकड साहूकार नव्हत’ यांसारखे मार्मिक उद्गार बखरवजा ग्रंथातून व पत्रांतून आढळतात; त्यावरून हे उघड होते, पण मराठ्यांनी विचार केला तसा आचार केला नाही हेही तितकेच सत्य आहे.

**पृष्ठ ३६५ : विदुरनीति**

धृतराष्ट्राचा भाऊ व महामंत्री विदुर याने महाभारतातील उद्योगपर्वात राजा धृतराष्ट्राला उपदेश केला आहे (अ. ३३-४०). त्याने माणसाच्या गुणदोषांची चर्चा करून आदर्श व्यक्तित्व कसे असते हे स्पष्ट केले आहे.

**पृष्ठ ३७३ : (१) भालेराई (२) होळकरी गर्दी (३) पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील**

(१) भालेराई– संभाजीच्या वधानंतर मुसलमानांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी आपली ठाणी बसविली. राजाराम मुसलमानांशी मुकाबला करण्याच्या प्रयत्नात होताच. पण मधल्या काळात रामचंद्रपंत अमात्यांच्या आज्ञेवरून मराठ्यांनी मुसलमानांची ठाणी उठविण्याचे प्रयत्न स्वतंत्रपणे केले. रूपाजी व बाबाजी **भालेराव** या नावाचे दोन सरदार या कामी मराठ्यांचे

पुढारी होते. त्यांनी जी गडबड उडवून दिली तिला त्यांच्या नावावरून 'भालेराई' असे म्हटले गेले.

(२) होळकरी गर्दी– पृष्ठ --- वरील (पूर्वी होळकरांनी पुणे शहर लुटून लोकांस मारिले ही) टीप पाहा.

(३) पेंढारी– मोगलांच्या पडत्या काळात हे लोक पुढे आले. वाटेल त्या राज्यांच्या सैन्याबरोबर बाजारबुणगे म्हणून हे जात असत. यांना नेहमीचा पगार असला तरी लुटीतील काही भाग आणखी दिला जात असे. यांनी स्वतंत्रपणेही पुष्कळ लूटमार केली. इंग्रजांच्या राजवटीत यांचा आश्रय तुटला. तेव्हा तर यांच्या लूटमारीस फारच ऊत आला. (पुढे लॉर्ड हेस्टिंग्जने त्यांचा नायनाट केला.)

# पत्रांचा मूळ क्रम व या आवृत्तींतील पृष्ठांक

| पत्र नं. | | पृष्ठांक | पत्र नं. | | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ... | ३१९ | २७ | ... | १४२ |
| २ | ... | २५१ | २८ | ... | १४६ |
| ३ | ... | ६६ | २९ | ... | १५१ |
| ४ | ... | १३३ | ३० | ... | २६३ |
| ५ | ... | २०९ | ३१ | ... | ७९ |
| ६ | ... | १३५ | ३२ | ... | ३३२ |
| ७ | ... | ६८ | ३३ | ... | ८३ |
| ८ | ... | ७० | ३४ | ... | ३३६ |
| ९ | ... | ३२१ | ३५ | ... | १५५ |
| १० | ... | ३५४ | ३६ | ... | १५७ |
| ११ | ... | २१० | ३७ | ... | १६० |
| १२ | ... | ३२३ | ३८ | ... | ३३८ |
| १३ | ... | १३८ | ३९ | ... | २९५ |
| १४ | ... | ३२६ | ४० | ... | ३४१ |
| १५ | ... | २५४ | ४१ | ... | ३४४ |
| १६ | ... | २६० | ४२ | ... | १६२ |
| १७ | ... | २१३ | ४३ | ... | १६६ |
| १८ | ... | २९९ | ४४ | ... | ३०२ |
| १९ | ... | ७३ | ४५ | ... | ३४७ |
| २० | ... | २१६ | ४६ | ... | ३५० |
| २१ | ... | २१८ | ४७ | ... | १६९ |
| २२ | ... | २८७ | ४८ | ... | २२१ |
| २३ | ... | २८९ | ४९ | ... | ३५३ |
| २४ | ... | ७६ | ५० | ... | ८५ |
| २५ | ... | ३२९ | ५१ | ... | ३०४ |
| २६ | ... | १३९ | ५२ | ... | ३५६ |

| पत्र नं. | | पृष्ठांक | पत्र नं. | | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| ५३ | ... | १७२ | ८१ | ... | १०५ |
| ५४ | ... | ३५८ | ८२ | ... | १०७ |
| ५५ | ... | ८८ | ८३ | ... | ११३ |
| ५६ | ... | ९० | ८४ | ... | ११० |
| ५७ | ... | ३०८ | ८५ | ... | ११४ |
| ५८ | ... | १७५ | ८६ | ... | ११७ |
| ५९ | ... | ९४ | ८७ | ... | ३१३ |
| ६० | ... | ३६१ | ८८ | ... | ११६ |
| ६१ | ... | २२४ | ८९ | ... | ३७३ |
| ६२ | ... | २२७ | ९० | ... | २६९ |
| ६३ | ... | २२९ | ९१ | ... | २०० |
| ६४ | ... | १७८ | ९२ | ... | २०३ |
| ६५ | ... | १८१ | ९३ | ... | १२० |
| ६६ | ... | ३६४ | ९४ | ... | ३७४ |
| ६७ | ... | ३६७ | ९५ | ... | १२३ |
| ६८ | ... | ३११ | ९६ | ... | २४३ |
| ६९ | ... | ९७ | ९७ | ... | १२६ |
| ७० | ... | २६७ | ९८ | ... | ३७७ |
| ७१ | ... | २३२ | ९९ | ... | ३७२ |
| ७२ | ... | २३५ | १०० | ... | ६३ |
| ७३ | ... | २३७ | १०१ | ... | १२८ |
| ७४ | ... | १८३ | १०२ | ... | २७५ |
| ७५ | ... | २४० | १०३ | ... | २४५ |
| ७६ | ... | १८६ | १०४ | ... | २७४ |
| ७७ | ... | ९९ | १०५ | ... | २८० |
| ७८ | ... | ३६९ | १०६ | ... | २८२ |
| ७९ | ... | १९० | १०७ | ... | २४६ |
| ८० | ... | १०२ | १०८ | ... | २८२ |

**इतिहासप्रेमी वाचकांसाठी संग्राह्य ग्रंथ**

---

**छोडो भारत – १९४२ :** श्रीपाद केळकर
**असहकाराचे आंदोलन :** श्रीपाद केळकर
**भारताचा शोध :** पंडित नेहरू
**आधुनिक भारत :** आचार्य जावडेकर
**महाराष्ट्र संस्कृती :** पु. ग. सहस्रबुद्धे
**आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण :** व. मं. सिरसीकर
**सत्तावनचे स्वातंत्र्यसमर** (संक्षिप्त) : वि. दा. सावरकर
**सत्तावनचा सेनानी :** वसंत वरखेडकर
**प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास :** गायधनी–राहुरकर
**खानदेशचा इतिहास :** टी. टी. महाजन
**पेशवे घराण्याचा इतिहास :** प्रमोद ओक
**इतिहास म्हणजे काय :** इ. एच्. कार
**इंदिरेस पत्रे :** पंडित नेहरू
**शिवपुत्र संभाजी :** कमल गोखले
**पेशवाईतील विलासी जीवन :** वर्षा शिरगावकर
**मराठ्यांचा युद्धेतिहास :** ब्रिगेडियर का. गं. पित्रे
**महाराणी येसूबाई :** मीना मिराशी
**भारताच्या राज्यघटनेची ५० वर्षे :** सत्यरंजन साठे
**लाल महासत्तेचा उदय आणि अस्त :** नरेंद्र सिंदकर

---

**कॉन्टिनेन्टल प्रकाशन**
विजयानगर, पुणे ४११०३०